# लोकहितवादींचीं
# शतपत्रें

संपादक

श्रीपाद रामचंद्र टिकेकर

उषा प्रकाशन, औन्ध

जून १९४०

प्रकाशक
वसन्त श्रीपाद सातवळेकर, बी. ए.
उषा प्रकाशन
औंध [ सातारा ]

मुद्रक
व० श्री० सातवळेकर बी. ए.
भारत मुद्रणालय
औंध [ सातारा ]

# अ नु क्र म णि का


| | |
|---|---|
| सं पा द की य | ५ |
| लोकहितवादी – परिस्थिति व चरित्र | ९ |
| शतपत्रांचा मूळ अनुक्रम | २३ |
| शतपत्रांचा इत्यर्थ | २९ |
| शतपत्रें | ३५ – ४६० |
| १ राजकीय मतें | ३५–१०४ |
| २ वि द्या व र्ध न | १०५–१६३ |
| ३ आ चा र ध र्म | १६५–१८९ |
| ४ पा र मा र्थि क | १९१–२२१ |
| ५ अनिष्ट चाली | २२३–२७८ |
| ६ ब्राम्हणांचा दांभिकपणा | २७९–३२६ |
| ७ स मा ज सु धा र | ३२७–३५८ |
| ८ वि वा ह वि ष य क | ३५९–४०८ |
| ९ सं की र्ण | ४०९–४६० |

# संपादकीय

संकल्पित कार्य तडीस गेल्यामुळे होणारा आनंद अवर्णनीय असतो. शतपत्रांचें हें प्रसिद्धीकरण आज बरींच वर्षे संकल्पित असल्याने आज या प्रकाशनाचे वेळीं मला विशेष आनंद वाटत आहे.

प्रथम माझा बेत असा होता की, शतपत्रांची संक्षिप्त आवृत्ति काढावी; कारण पुष्कळ पत्रांत पुनरुक्ति झालेली आहे; आणि बराचसा मजकुरास आज केवळ ऐतिहासिक महत्त्व उरलें आहे. परंतु तसें केलें असतें, तर लोकहितवादींची खरी कर्तबगारी वाचकांना समजली नसती. शिवाय प्रो॰ कृ॰ पां॰ कुलकर्णी, डॉ॰ भीमराव आंबेडकर इत्यादि विद्वानांचें मत शतपत्रें समग्र असावीं असेंच पडलें. म्हणून शतपत्रें आहेत तशींच आता छापून प्रसिद्ध होत आहेत. मात्र त्यांचा क्रम बदलून नऊ विभागांत त्यांची वाटणी केली असून, त्यांचा मूळ क्रमांक आहे तोच ठेवला आहे. शिवाय एक सूचि प्रारंभींच दिली आहे. तीवरून मूळ क्रमांक व प्रस्तुत प्रतींत त्या पत्रांचा पृष्ठांक यांचा उलगडा सहज होतो.

हीं शतपत्रें ज्या प्रतीवरून नकलून घेतलीं, ती प्रत शिळाप्रेसवर छापलेली असून, तींत लोकहितवादींचे इतरही अनेक लेख छापले आहेत. शतपत्रांत त्यांच्या शेजारचीं आठ पत्रेंही समाविष्ट केलीं आहेत, त्याचें कारण उघड आहे. शिळाप्रेसवरील लेखसंग्रहाच्या प्रारंभीं म्हटलें आहे:–

" या विद्वान् ग्रंथकाराचे परोपरीच्या विषयांवरील शोध व विचार पाहून कोणासही नवल वाटल्यावाचून रहाणार नाही. अलीकडे नेटिव विद्वान बहुत असतील व यांहूनही अधिक विद्वान असतील, पण त्यांनी असे अनेक विषयांवर स्वीय विचारांचे लेख लिहिलेले कोठे आढळत नाहीत आणि या परोपकारी व लोकहितवादी गृहस्थाने जाति, धर्म, शास्त्र, आचार, राज्य, लोकव्यवहार

इत्यादि विषयांवर निर्भिडपणाने रास्त विचार दर्शवून एक महासागराएवढा लेखांचा साठा करून ठेविला आहे व तो प्रसिद्धीस येण्याचा हा पहिला शुभ शकून आहे, म्हणून हा ग्रंथ सर्वांच्या आदरास अगत्य पात्र होईल, असा भरंवसा आहे. "

ज्ञान-प्रसाराची तळमळ लोकहितवादींची इतकी उत्कट होती की, त्यांनी "...जाहिरात लावून पुस्तकालयांस आणि ज्ञानसंपादनेच्छु व वाचनेच्छु बांधवांस आपले ग्रंथ मोफत वाटले."

शिळाप्रेसवरील लेखसंग्रहांत शतपत्रें आहेत, तीं शक्य तों अर्थाच्या तशींच नकललीं असून, नव्या शुद्धलेखनाप्रमाणे छापलीं आहेत. तसें करतांना अडचणी अनेक आल्या. शिळाप्रेसवरील छपाई जुनी झाली असल्याने कित्येक ठिकाणीं अक्षरें पुसलीं गेलीं. यावच्छक्य तीं लावण्याचा प्रयत्न केला आणि लागलीं नाहीत, तेथे ××× अशा फुल्या घातल्या. कांही शब्दांचे अर्थही सापडले नाहीत., त्यांचेपुढे प्रश्नचिन्ह करून ठेवलें आहे. प्रत्येक पत्राचा आरंभ " विनंती विशेष " असा व शेवट " कळावें हे विनंती—

आपला

लो० वादी "

असा असे, तो गाळून टाकला आहे. मूळांत पुष्कळ ठिकाणीं शब्द न तोडतां ओळीच्या ओळी आहेत; परिच्छेदही अगदी क्वचित् आढळतात; पण मजकूर वाचनीय व्हावा, म्हणून त्या बाबतींत मूळाबरहुकूम वागण्याच्या भरीस पडलों नाहीं. पत्र- विभागणीबद्दल मतभेद खात्रीने होतील; पण मतभेदातीत अशी विभागणी करतां येणें अशक्यप्राय आहे. प्रस्तुत विभागणींत प्रो० कृ० पां० कुलकर्णी व श्री० चं० वि बावडेकर यांची अमोलिक मदत मला मिळाली आहे.

शिवाय हस्तलिखित तयार करतांना व मुद्रितें तपासतांना श्री० गोविंदराव पतके, पी' नाथ रेगे, नवलकऱ्याकर गो० वि० रानडे इत्यादि स्नेहीमंडळींनी मनोभावें सहाय्य केलें आहे; प्रो० कुलकर्णी व श्री० बावडेकर हे तर या कार्यांतले प्रोत्साहकच म्हटले पाहिजेत. ह्या सर्वांचे आभार मानून मोकळे होण्याचा हेतु

माझा नाही. त्यांच्या सहाय्याविना हें कार्य पार पडलें नसतें; म्हणून त्यांच्या मदतींचा येथे कृतज्ञतापूर्वक उल्लेख करीत आहें. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचें ऋण या बाबतींत मोठें आहे. शिळाप्रेस वरील लोकहितवादींचा जाडा ग्रंथ वारंवार लागत असे, तो व इतर संबद्ध पुस्तकें विनायासें उपलब्ध करून दिल्याबद्दल ग्रंथसंग्रहालयाच्या अधिकारीवर्गाचा मी आभारी आहें. तसेंच, पुण्याचे श्रीमन्त सरदार हणमंतराव घोरपडे यांनीं आपल्या अमूल्य ग्रंथसंग्रहांतील शिळा-प्रेसवर छापलेली सदर पुस्तकाची प्रत दिल्यामुळे मुद्रितें तपासण्याचें काम सुलभ झालें. सदर कृपेबद्दल श्रीमंत सरदारसाहेबांचा मी फार आभारी आहें. नव्या दमाचे 'उषा–' प्रकाशनकार श्री० वसन्तराव सातवळेकर यांना तर या प्रकाशनश्रेयाचा मुख्य वाटा दिला पाहिजे. त्यांनी तयारी केली नसती, तर हा संकल्प असाच आणखी किती दिवस असाध्य राहिला असता, कुणास ठाऊक !

प्रो० कुलकर्णी यांजकडून या शतपत्रांस विवेचक प्रस्तावना यावयाची होती. आणखीही एकदोन मित्रांना लोकहितवादींच्या कामगिरीबद्दल लिहावयाचें होतें; पण अनेक कारणांमुळे तें जमलें नाही— म्हणून वाचकांची व माझीही मोठी निराशा झाली; तिला इलाज नाही.

१० जून १९४०
२१३ चर्नी रोड
मुंबई ४

श्री० रा० टि०

---

# लो क हि त वा दी

## [ स० १८२३ ते स० १८९२ ]

### १ त्यांच्या वेळची परिस्थिति

लोकहितवादींचा जन्म पेशवाईच्या अस्तानंतर पांच वर्षांनी (स. १८२३) झाला. पेशवाई जाऊन 'आंग्लाई' आली किंवा शनिवार वाड्यावर भगवा झेंडा फडकत असे, त्याच्या जागीं ब्रिटिश बावटा फडफडूं लागला, हा फरक मोजक्या शब्दांत व्यक्त होतो; पण त्याचें वास्तविक स्वरूप किती तरी व्यापक होतें! स्वतंत्र मराठी राज्य – मग त्याचा अर्थ कसाही असो-लयाला गेलें; परकी, परधर्मी, दूरदेशीं रहाणारे टोपीकर इथले सत्ताधीश बनले; त्यांच्या व अत्रस्थांच्या संस्कृति परस्परभिन्न असल्यामुळे समाजांत अव्यवस्था बोकाळली. आधीच मराठशाही मोडकळीस आली होती; कारण रावबाजीने मराठ-शाहीचें उदक इंग्रजांचे हातावर सोडलें, तेव्हाच मराठी समाज एकाएकी खालावला, असें म्हणतां यावयाचें नाही; किंवा एकट्या रावबाजीच्या असामान्य प्रतापामुळे सबंध मराठी राज्य डुबलें, असें म्हणणेंही रास्त ठरणार नाही. समा-जाची अधोगति सर्वतः होत राहिल्याने तीबद्दल कुणा एकट्यास दोष कसा यावा? रावबाजीबद्दल ब्राम्हणांना वाटे—

> "तो मोठा ब्राम्हण प्रभु! केवढा दानशूर! केवढा पट्टीचा विद्वान् ब्राम्हण! ...... ब्राम्हणांचा तर केवळ अन्नदाता. पंक्तींत स्वतः आग्रह किती म्हणून करावा? ...... गेलें बिचारें ब्राम्हणांचें राज्य!"

तर त्यांच्याच घरांतल्या बायका म्हणत—

> "बाजीरावाचें आता पुण्यास राज्य नाही, बरें झालें! चांगलें मेल्याचें तळपट झालें! मोठा चांडाळ होता तो. बाईत आला तर ५०० बायकांनी विहीरींत जीव दिला!"

यांत अतिशयोक्ति आकड्याचीच असली तर असेल; पण रावबाजीच्या कारकीर्दीचें इतकें मार्मिक व वस्तुस्थितीस धरून दुसरें वर्णन आढळणार नाही. हा प्रताप एकट्या रावबाजींचाच नव्हता. त्यांचे बंधु अमृतराव यांनी पुणें लुटलें, तेव्हा काय काय पराक्रम केले, ते ऐका —

> "लोकांस राखेचे तोबरे दिले; कानांत आणि बेंबींत बंदुकीची दारू घालून उडविली. धुऱ्या दिल्या. तक्त्यांत माणसें पिळली. तवे तापवून त्यांवर उभीं केलीं. तेल कढवून पोरांच्यादेखील अंगावर शिंपलें!"
>
> ( शतपत्रें — नं. ७५ )

आणि हें सर्व लोकांकडून पैसा उकळण्याकरिता!!

सारावसुलीची पद्धत तेव्हाची निराळी होती. दारुगुत्त्याचे किंवा 'टोल' नाक्याचे सध्या लिलाव पुकारतात, तसे तेव्हा सरकारी अधिकाराच्या जागांचे लिलाव होत. रयतेवर अशाने अनन्वित जुलूम होई. हल्ली सारा रयतवार आहे, तसा तो तेव्हा नव्हता; तो मौजेवार असे. म्हणजे प्रत्येक रयताने सारा किती द्यावा, हें ठरलेलें नसून, एका गावचा मिळून वसूल किती, एवढाच आकडा ठरवीत. त्यामुळे व मक्तेदारीमुळे गावकऱ्यांना अनन्वित जाच सोसावा लागे. तऱ्हतऱ्हेचे ( व तऱ्हेवाईक ही ) कर आणि पट्ट्या त्यांना भराव्या लागत.

राज्यकर्ते व प्रजाजन यांची ही अवस्था. त्याखेरीज राहिलेला धनिक वर्ग व विद्वत्तेचा गड्डा म्हणून निव्वळ मानलेला शास्त्रीपंडित कंपू. पैकी, धनिकांना राजकारण बिजकारण कांही कळत नाही. "मूर्तिरूपें उरावें" हें त्यांचें ध्येय असल्याने तिजोरीचीं वेतें कशीं वाढतील, इकडेच त्यांचें लक्ष्य असतें. ज्याच्या कृपेने दोन पैशांचे चार पैसे होतील व आहेत, ते सुरक्षित रहातील, तो त्यांचा देव, तोच त्यांचा प्रभु, मालक. त्यांत इतर कसला विचार ते करीत नाहीत — त्यांना करतां येत नाही. त्यामुळे अशा धनिक वर्गाचें इंग्रजांशीं सख्य लवकर जमलें. पैसा कमावणें हें उभयतांचें गोत्र आणि गोत्राप्रमाणे सर्वांशी सर्व काळ मैत्री जमवणारें होतें. इंग्रजी सैन्याच्या व छावणीच्या आधारावर धनिकांची सावकारी

फोफावली आणि धनिकांच्या आश्रयाने व मदतीने इंग्रजी राज्यवृक्ष जोराने फोफावला–अशी ही परस्परावलंबी जोडी होती.

शिपाइगिरी करणारे मराठे जवान निकामी झाले; शेतीवर सर्वांचें चालणें शक्य नव्हतें. मग अशा लढवय्या बेकारांनी काय करावें ? सर्वत्र गोंधळ झाला आणि समाजच अशा रीतीने पोखरला गेला असल्याने इंग्रजी अमल तत्कालीन लोकांना हितकर वाटला. किंबहुना दुसरा कोणताही अमल त्यांनी राजीखुषीने पत्करला असता, इतके ते मराठी स्वराज्याला विटलेले असल्याने इंग्रजी अमदानीचा त्यांना मोह पडला, तिला ते भुलले, यांत आश्चर्य कसलें ? इंग्रजांच्या वागणुकींत पूर्वीच्या राजवटींत मुळीच नसलेली शिस्त होती; त्यांचे सगळे व्यवहार पद्धतशीर चालत; इंग्रजी अमलदारांचें बोलणें–चालणें परधर्मीय व परभाषी रयतेवरही छाप पाडण्यासारखें होतें; त्यांचें ज्ञान व्यापक व सर्व प्रकारचें असून, दया, वैयक्तिक स्वातंत्र्य, स्त्रीपुरुष समानहक्क, लोकसत्ता, समाजसेवा, स्वार्थत्याग, कर्तव्यबुद्धि इत्यादि गुणांची व विचारांची जाणीव ते आपल्या आचरणाने, चौकस बुद्धीने व बोलण्या चालण्याने इतरांस करून देत. त्यांच परिणाम झाल्याशिवाय कसा राहील ? त्याखेरीज, इंग्रजी दानत, त्यांची कवायती फौज, त्यांचा दारुगोळा, त्यांच्या तोफाबंदुका, यांचें वजन अडाणी बहुजनसमाजावर साहजिकच विशेष पडलें आणि इंग्रजी राज्य, खुद्द इंग्रजांनाही वाटलें नाही, इतक्या झपाट्याने लोकप्रिय झालें. त्यांना पद्धतशीर व व्यवस्थित असा विरोध फारसा कुणीं केला नाही.

शाळांमधून साहेब शिकवीत असत. तेव्हा तेथे मुलांना पाठवावें कीं नाही ? हा प्रश्न पडे. शाळेंत मुलांना (मुलींना शाळेंत घालण्याचा विचार त्या वेळीं स्वप्नांतही आला नव्हता) घातल्यानंतर, धर्मरक्षणासाठी बराच त्रास होई. विद्यार्थ्यांनी शाळेंतून घरीं आल्यावर प्रथम सचैल स्नान करावयाचें, ही सर्रहा रीत होती. मग शाळेंत असतांना खाणेंपिणें अजिबात वर्ज्यच ! घरी विद्यार्थी अभ्यास करूं लागले की, त्यांना वडिलाकडून एवढ्या तेवढ्या बाबतींत मनस्वी त्रास होई.

Owl हा शब्द पाठ करण्यास आई, मावशी, बहीण हरकत घेत. विशेषतः संध्याकाळनंतर तो शब्द उच्चारणें अत्यंत वाईट, अशी समजूत असल्याने घरांतली

घरांतील मंडळी 'इंग्रजी' शिक्षणाबद्दल नाखूष होत. तीच गत Beef या शब्दाची असे. पुस्तकांना चामड्याचा पुठ्ठा पाहून गृहिणींना वाईट वाटे. असलीं पुस्तकें ('पोथ्या') आपल्या घरांत आल्यानें तें भ्रष्ट होतें, ही त्यांची समजूत होती. खुद्द लोकहितवादींना आपली 'पोथी' विहिरीतल्या कोनाड्यांत ठेवावी लागे व तेथेंच बसून ते अभ्यास करीत असत. Feather शब्द व त्याचा अर्थ पाठ केल्यानें आपल्या धर्मावर आघात होतो, असें त्यांना वाटे.

त्या वेळीं लोकांच्या समजुती अगदी हास्यास्पद होत्या. ब्राम्हणांनीच काय ती विद्या करावी; इतरांस तिचा अधिकार नाही; सर्व ज्ञान काय तें संस्कृत ग्रंथांत साठविलें आहे. श्रीमंतांनी घरीं बसून खावें– कोणत्याही प्रकारचा उद्योग करूं नये– केला तर त्यांच्या खानदानीपणाला बट्टा लागतो. शिकणें ही श्रीमंतीला कमीपण आणणारी बाब अशीच सर्वांची समजूत. दानधर्म करायचा तर तो ब्राम्हणांना करावा, इतरेजनांस करूं नये; ब्राम्हण नाही तो साध्या दयेमायेलाही पात्र नाही; अशा ब्राम्हणवर्चस्वाच्या कल्पना ब्राम्हणांत तर बद्धमूल होत्याच; पण ब्राम्हणेतर जातीही या समजानें पछाडलेल्या होत्या !

मुलीला आठवें वर्ष लागण्याच्या आंत तिचें लग्न उरकून घेण्याची धडपड व नातवंड मांडीवर खेळविण्याचा हव्यास, या दोन कारणांमुळें समाजाची अधोगति होऊं लागली होती. खुद्द लोकहितवादींचें लग्न त्यांच्या सातव्या वर्षी झालें! म्हणजे नोवरी फार तर चार वर्षांची!! हीच रीत सर्वत्र रूढ होती. वृद्ध-बाला विवाहांत कुणालाच कांही वाटत नसे. खुद्द नाना फडणिसांची शेवटची पत्नी (त्यांनी एकंदर ९ लग्नें केलीं) मुसलमानी म्हणीप्रमाणे नाना 'कबरी' त गाडले गेल्यानंतर 'उमरी' त आली!! [म. रि. उ. वि. १ पृ० ९८] नानांचे मृत्युसमयीं ती अवघी ९ वर्षांची होती.

त्यावरून अनुमान एकच निघतें. सामाजिक वा राजकीय बाबतींत कांही न्यायान्याय असतो, असें कुणास वाटत नव्हतें. वाटलें तरी अन्यायाविरुद्ध ओरड करावी, असें कुणास सुचत नव्हतें— त्यांना तितका विचार व धाडसमुद्धा नव्हतें. नाही तर रावबाजींच्या शृंगारिक चाळ्यांचा निषेध कुणीं तरी केला असता— अमृतरावाच्या अमानुष क्रौर्याबद्दल त्याला कुणीं जाब विचारला असता. तें सर्व

बाजूलाच राहिलें. द्रव्यार्थी भट, रावबाजी व अमृतराव यांची मनसोक्त स्तुतिस्तोत्रें गाऊं लागले, हें और नव्हे काय ? पैशाने ती मंडळी वश होत आणि मग दुर्गुणांचा सागर, स्तुतिपात्र सज्जन ठरे. अशी त्यांची दानत होती.

असल्या समाजांत व्यसनें भराभर फैलावलीं; अनाचार भयंकर माजले; नव्या इंग्रजी अमलाचें वैशिष्ट्य असें होतें की, एतद्देशीयांच्या "धार्मिक" चालीरितींत ढवळाढवळ करावयाची नाही; त्यांच्या "धार्मिक" भावना दुखवतील, असें वर्तन होऊं द्यावयाचें नाही. आपल्या समाजांत धर्माच्या व्यापक नांवाखाली काय येत नाही ? गणेशोत्सव होतो तो धार्मिक; तसाच 'शिमगा' चालतो तोही धार्मिकच ! आठ वर्षांच्या आत मुलींचीं लग्नें धर्माज्ञा म्हणून करावयाचीं; त्याचप्रमाणे विधवांचें वपन व तदुत्तरचा घरगुती छळ, हें सर्व धर्मानुसारच वर्तन होतें. आपण एकाच ईश्वराचीं लेकरें असें सांगणारा धर्म, अस्पृश्यांची सावलीदेखील पडूं देऊं नका, असा आदेश समाजांतील एका घटकाला देऊं लागला. सदाचरणाचें महत्त्व गाणारा धर्मच शाक्तपंथीय शिकवणुकीने, 'अनाचाराची कमाल कराल तितके शंकराला अधिक प्रिय व्हाल', असें गर्जूं लागला. ... अशा परस्परविरोधी व विसंगत आचारांचा समावेश "धार्मिक" या व्यापक सदरांत होत असल्याने त्यांत सरकारी सहाय्याने सुधारणा होणें अशक्य झालें.

नैतिक आचरणाची मर्यादा त्या वेळीं अगदी निराळी होती. प्रिय पात्र अथवा "अंगवस्त्र" असणें ही मोठेपणाची खूण होती. कसबिणींना समाजव्यवस्थेंत शिष्टसंमत, विशिष्ट स्थान होतें. सणावारांचे निमित्ताने त्या "देवांगनां" ना कांही दक्षिणा पोचविली नाही, तर पुष्कळांना चुकल्या चुकल्यासारखें वाटे. कर्ज काढून कसबिणीस दोन रुपये तरी दिले पाहिजेत, अशा खुळचट समजुतीने बहुतेक लोक पछाडलेले असत. श्रीमंतीची व चैनीची कमाल मर्यादा म्हणचे रांडांचे ताफे बाळगणें. या खात्यावर खर्च किती होतो, त्यावरुन एखाद्याची श्रीमंती किंवा थोरवी ठरे. मग कसबिणींच्या घरांत देवळें स्थापन झालीं किंवा कांही देवळें त्यांच्याचकडे भाड्याने राहूं लागलीं, तर बिघडलें कुठे ?

हा अनैतिक आचार एकीकडे वाढला. ढोंगी वागणेंही वाढतच गेलें. पन्नास ठिकाणीं पाणी शिंपणें; दोनशे ठिकाणीं हात धुणें; तीनशे केळा पाय धुणें;

जागोजाग नेत्रस्पर्श व मार्जन — असे प्रकार पाहून आज आपणांस मोठा उद्वेग वाटेल; पण खरोखर असें करणारे लोक तेव्हा अनेक होते. अशांचें जीवन कसें असावयाचें ? त्यांच्या आयुष्याचा हिसाब त्यांना पुसला, तर जन्मापासून मरणापर्यंतच्या काळांत एकही गोष्ट कागदावर लिहिण्याजोगी किंवा कानानें ऐकण्याजोगी सापडत नसे. निव्वळ आळसांत काळ घालविण्यांतच इतिकर्तव्यता मानणारे पंडित अनेक होते. एखाद्या मिळवित्याच्या पंक्तीस ५० माणसें निव्वळ आयतीं खाणारीं व खाऊन स्वस्थ झोपणारी असत; त्या खाणारांना त्याबद्दल कांहीं वाटत नव्हतें– ज्याचें खात त्यांस मात्र मोठी भलाई वाटे. भटांना वाटे, भीक मागणें हाच आमचा धर्म. आणि असल्या भिक्षेकरू व परजीवोपजीवि भटांना खूष राखल्याखेरीज संभावितपणें रहाणें गृहस्थांना अशक्य होई. आणि इतका डौल कायम ठेवण्यासाठीं लाचलुचपतीस उत्तेजन द्यावें लागे. मुन्सफाचें काम करणारा पगाराइतका मासिक खर्च करून पांच वर्षांत दहा हजारांची माया जवळ करी; शिरस्तेदारांची कमाई याहीपेक्षा अधिक झटपट असे. त्यांचा खर्च नेहमीच पगाराहून जास्त असायचा; तरी सालीना पांच हजार शिल्लक चुकायची नाही. नाझरही त्याच माळेचे मणी. इतक्या नीच वृत्तीचीं माणसें समाजांत शिष्ट म्हणून मिरवीत. कारण ब्राम्हणांस त्यांचेकडून "धर्म" होई, तेवढ्यावर ते खूष होत.

अव्वल इंग्रजींत एतद्देशीयांच्या आचरणाबद्दल गवगवा झाला, तो निष्कारण नव्हे. फौजदारांचें आचरण शुद्ध नव्हतें. कित्येकांवर दरवड्याचें आरोप शाबीत झाले होते. सरकारी चाकरी मिळाली की भूमींतलें द्रव्य सापडलें. वाटेल तें करावें, लोकांस बुडवावें, आपलें घर भरावें, हाच मार्ग सर्वांना न्याय्य वाटे. सरकारचें खाऊं नये, तर खावें कुणाचें ? सरकारास लुटूं नये, तर काय गरिबांस लुटावें ? अशी वृत्ति सर्वसामान्य जनांची होती. मोठमोठे अमलदारही तिला अपवाद नव्हते. शिपायापासून प्रिन्सिपल सदर अमीनापर्यंतचे सर्व अमलदार शपथेचा व्यभिचार करीत. कुणांतच प्रामाणिकपणा नव्हता, म्हणून परकी इंग्रज त्यांना ढेकणासारखे चिरडत. त्यांची डौलाची कल्पना मजतीच होती. कचेरींतून घरीं परततांना बरोबर १५-२० शिपाईप्यादे त्यांना लागत. हा त्यांचा लवाजमा पाहून वारांगनांनी तारीफ केली, म्हणजे त्यांना धन्य वाटे.

अशी रीत सरकारी अधिकाऱ्यांची, म्हणजे अव्वल इंग्रजींत थोडें फार शिकून तयार झालेल्यांची होती. उच्चवर्गीय सरदारांची अवस्था काय विचारावयाची आहे? त्यांनी उडवे-उधळे असावें, मन मानेल तितकें कर्ज करावें, हें त्यांचें आद्य कर्तव्य. सोनें, रुपें, हिरे यांचे दागिने घालून ते नटत सजत; पण त्यांच्या तोंडांत कुणी मारली, तरी त्यांचा हात वर होत नसे. या सरदारांच्या चेहऱ्याकडे पाहून वाटे की, यांना कोणतेंही काम करतां यावयाचें नाही. इतके निरुपयोगी हे लोक होऊन बसले होते. ऐन पंचविशींत त्यांच्या वार्धक्यास भर येई! लिहितां येत नसे; वेड्यासारखे दिसत. सर्वस्वी कारकुनाच्या तंत्राप्रमाणे चालणारे. कारकुनाच्या मदतीवाचून त्यांचें एक पाऊल पडणें शक्य नव्हतें.

रहातां राहिला भटाभिक्षुकांचा वर्ग. वास्तविक त्यानेच समाजाचें धारण करावयाचें. धर्म लावून देऊन समाजाला शिस्त राखण्याचें काम त्यांचें. पण रखवालदारांनीच चोरी करावी, तशापैकी प्रकार त्यांचा झाला. ब्राम्हणांनीच अनाचाराची कमाल केली. धर्म हें त्यांचें उपजीविकेचें साधन बनलें. फुकट जेवण कसें व कुठे मिळवावें, हें त्यांचें रोजचें मुख्य काम. माया बाळगून असलेल्या बायाबापड्यांना किंवा पुरुषांना फसवून-भुलवून धर्माच्या नांवाने ब्राम्हणांची धन करायला लावायची, हा त्यांचा पद्धतशीर कट असे. कसबिणी व भट हे बहुत लोकांस वेडे करीत. पैशाची उधळपट्टी जितकी होईल, तितकी त्यांस हवी असे; कारण तिजवर त्यांचें पोट अवलंबून.

म्हणून लोकांना शहाणपण शिकविणारे ब्राम्हण त्यांना दिवसेंदिवस अधिकाधिक अज्ञानांत डांबून ठेवूं लागले; धर्माच्या नांवाने ढोंगी व मूर्ख आचारांचें स्तोम माजवूं लागले. शिवाय त्या ब्राम्हणांना तरी विद्या म्हणजे काय, हें ठाऊक होतें कुठे? पाठांतर मात्र येत असे. अर्थाच्या नांवाने शून्य. अशा शुद्ध पाठांतरावर त्यांनी विद्वत्तेची ऐट मारावी; लोकांना ठकवावें, त्यांचें द्रव्य आपल्या पदरी घेऊन वर संभावितपणाने मिरवावें, ही केवढी अधोगति होय! त्यांचा सबंध दिवसाचा कार्यक्रम पाहिला तर आळसाची शेती! एक क्षण कांही उपयुक्त कार्यास खर्च होत नसे. सरकारी किंवा लोकांचें द्रव्य आपण घेतों, त्याचेबद्दल सेवा काय करतों, हा विचारच त्यांना सुचत नसे. उलट, तो त्यांना आपला हक्क

आहे— त्रिकालाबाधित जन्मसिद्ध हक्क आहे— इतकेंच नव्हे तर आपण दानधर्म स्वीकारून यजमानावर मोठा उपकार करीत आहोंत, अशी खरीखुरी भावना त्यांची असे. अशांना सांगणार तरी कोण आणि कसें ?

ब्राम्हण वेदपाठास असले की, तंबाखू व भांग यांचा बार भरल्याशिवाय त्यांना ' श्रीमन्महा ' करतां येत नसे. आळसाचे आगर, व्यसनांचें आगर व अज्ञानाचे रक्षक असे त्यांचें वर्णन वास्तविक होतें. मद्यपान किंवा अभक्ष्य-भक्षण धर्ममान्य करण्यास त्यांना शाक्तमार्ग उपयोगी पडला. पुण्यांत ब्राम्हणांपैकी निदान ५०० जण पद्धतशीर " पिणारे " होते. कांही जण घरीं दारू गाळीत, कांही बाजारची घेत आणि कित्येक जण तर्र होऊन गटारगंगेंत पावन होत. शाक्तपंथीयांचा धुडगूस याच्याही पलीकडे जाई. त्यांना कसलाच विधिनिषेध नसे, एवढेंच नव्हे तर ज्या ज्या निषिद्ध गोष्टी, त्या त्या हटकून करण्यांत आणि गलिच्छ, बीभत्सपणा, त्यांत वाढविण्यांत अधिक पुण्य आहे, अशी संकृत वचनां-धारें समजूत प्रसृत करण्यांत आली. " जितकें लौकिक दृष्ट्या निंद्य, तिरस्कार-णीय, घाणेरडें व किळसवाणें, तें तें केल्यानें मी अधिक प्रसन्न होतों— तो तो भक्त मला अधिक आवडतो," असें संस्कृत वचन शंकराचें म्हणून तयार केलें. मग काय विचारतां ? धास्ता कुणीच नसलेला समाज; मानलेलें धर्मबंधन असें भ्रष्ट झालेलें; स्वतः होऊन यमनियम पाळावयाचे तर डोकें अगदीच रिकामें; ब्राम्हण ( भटभिक्षुक ) यांचेकडे बुद्धि गहाण पडलेली; आणि तेही खुद्द व्यसनाधीन. वाईट सवयी, घाणेरडीं व्यसनें, अनिष्ट व घातुक चाली यांचा फैलाव भराभर झाला. समाज अगदीं मोडकळीस आला. न्यायाची चाड कोणास उरली नाही; अन्यायाची चीड कुणालाच येईना. जो तो किस्मत, नशीब, प्राक्तन, भोक्तृत्व, प्रारब्ध, विधिलिखित, म्हणून कपाळावर हात मारून घेऊं लागला. ' कली मातला; असें व्हावयाचेंच ' म्हणून ब्राम्हणांनी त्यांचें समाधान केलें. अशी समाजस्थिति लोकहितवादींचे वेळीं होती. *

* [ ह्यांतील बहुतेक माहितीस शतपत्रांचाच आधार आहे. ]

## २ त्यांचें चरित्र

लोकहितवादी या टोपण नांवाचे लेखक गोपाळ हरि देशमुख हे अव्वल इंग्रजींतील मोठे कर्तबगार विद्वान् होऊन गेले. रावबाजींनी आपला सर्व कारभार इंग्रजांकडे सोपवून स्नानसंध्या करण्यासाठी गंगाकिनारी ब्रम्हावर्तचा रस्ता धरल्यानंतर पुणें येथे त्यांचे वकील म्हणून हरिपंत देशमुख रहात असत. गोपाळराव हे हरिपंतांचे तिसरे चिरंजीव. पुण्यास १८ फेब्रुआरी १८२३ रोजीं गोपाळराव जन्मले.

वयाच्या ६ व्या वर्षी व्रतबंध व लगेच पुढील वर्षी विवाह असे महत्त्वाचे संस्कार गोपाळरावांच्या बालपणींच उरकले. हरिपंतांची नवी सून घरीं आली, ती अवघी चार वर्षांची होती. गोपाळराव १२-१३ वर्षांचे असतां त्यांचेवर कौटुंबिक आपत्ति कोसळल्या. प्रथम वडील (सावत्र) बंधु व नंतर त्यांच्या वियोगदुःखाने हरिपंत अशीं दोन वडील माणसें एका वर्षांत मृत्युमुखीं पडल्याने कुटुंबाची पुष्कळशी जबाबदारी त्यांचेवरच पडली. हरिपंतांची तैनात त्यांच्या मृत्यूबरोबरच बंद झाल्याने तर या जबाबदारीचा बोजा वाढला. तीन वर्षे दरबारी कारवाया केल्यावर मुलांना नोकरी लागेपर्यंत सालीना दोनशे रुपये प्रत्येकीं व गोपाळरावांच्या मातुःश्रीस सालाचे सहाशे रुपये, अशी तैनात मिळाली.

त्या वेळच्या रीतीप्रमाणे गोपाळरावांनी 'कोडतांत' उमेदवारी पत्करली. तीन–चार वर्षे उमेदवारी केल्यावर त्यांनी पुण्यांतील सरकारी शाळेंत नांव घातलें. तेथील तीन वर्षांचा अभ्यासक्रम उत्तम तऱ्हेने संपवून इतिहास व इंग्रजी या विषयांत प्राविण्य मिळवून गोपाळराव नोकरीच्या शोधांत राहिले. शाळेंतील शिफारसीच्या जोरावर त्यांना लगेच सरदार एजंट कचेरींत मासिक ७७ रु० ची जागा मिळाली. (स. १८४४). हें काम संभाळून त्यांनी मुन्सफीची परीक्षा दिली; (स. १८४६). पण प्रत्यक्ष मुन्सफीची नेमणूक वाईक्षेत्रीं स. १८५२ मध्ये झाली.

वाईस चार वर्षे काम केल्यावर ते इनाम कमिशनरांपैकी दुय्यम कमिशनर झाले. तें काम स. १८५६–६१ पर्यंत चालल्यावर इनाम कमिशनचें कामच संपल्याने

मुंबई हायकोर्टांत डिजेस्ट ( digest–गोषवारा ) काढण्याची कामगिरी गोपाळरावांवर सोपविली; तेथून पुढल्या वर्षी त्यांची असिस्टंट जज म्हणून अहमदाबादेस बदली झाली. एक वर्षाने त्याच हुद्द्यावर अहमदनगरास ते गेले. सनदी नोकरासाठी डिपार्टमेंटल परीक्षा असे, ती स. १८६१ ते उत्तीर्ण झाले; पण गोऱ्या लोकांची इभ्रत आड आल्याने, तिचा पुरा फायदा गोपाळरावांना मिळूं शकला नाही. तरी ॲक्टिंग जज्ज म्हणून प्रथम मुंबई व नंतर अहमदाबाद येथे त्यांना जावें लागलें. (स. १८६५–६६) या वरिष्ठ अधिकारावर त्यांचें अहमदाबादेस सुमारें १० वर्षे वास्तव्य झालें.

स. १८७६ च्या दिल्ली दरबारास गोपाळरावांना निमंत्रण होतें. त्याप्रमाणे ते तेथे गेल्यावर त्यांस रावबहादुरी मिळाली. परत आल्यावर जॉइंट जज्ज म्हणून त्यांची नेमणूक नाशकास झाली. त्याच वर्षी (स. १८७७) त्यांना जे. पी. होण्याचा मान मिळाला. पुढील वर्षी मुंबई युनिव्हर्सिटीचे फेलो म्हणून ते नेमले गेले. आणि एक वर्षाने लगेच ५५ वय भरल्याने त्यांना सेवानिवृत्त व्हावें लागलें. ( स. १८७९ ).

गव्हर्नरच्या कौंसिलचे सभासद होण्याचा मान त्यांना स. १८८० मध्ये मिळाला व स. १८८१ त फर्स्ट क्लास सरदारांत त्यांची गणना झाली स. १८८४ मध्ये रतलाम संस्थानची दिवाणगिरी त्यांना पत्करावी लागली; पण एक वर्षाने त्यांनी ती सोडली. अशा प्रकारें दर वर्षी त्यांची बढती होत गेली; पण उतार वयांत म्हणजे स. १८८५ मध्ये पत्नीवियोगाची आपत्ति त्यांचेवर कोसळली.

स. १८९२ च्या ऑक्टोबर महिन्यांत गोपाळरावांनी इहलोकची यात्रा संपविली.

लोकहितवादींच्या जीवनक्रमाची रूपरेषा ही अशी आहे. प्रस्तुतची शतपत्रें त्यांनी स. १८४८ ते १८५० या दोनअडीच वर्षांत लिहिलीं. म्हणजे मुन्सफीची परीक्षा पास झाल्यानंतर पण वाईस नेमणूक होण्यापूर्वीच्या काळांत लोकहितवादी हें नांव धारण करून मुंबईच्या ' प्रभाकर ' साप्ताहिकांत नियमितपणें पत्रें लिहिण्यास गोपाळरावांनी सुरवात केली; त्या वेळीं त्यांचें वय २५-२६ वर्षांचें असावें. स. १८५०-१८७० हा वीस वर्षांचा काल लोकहितवादींनी दर

तऱ्हेची माहिती जमविण्यांत व तिचीं टिपणें करून ठेवण्यांत घालवून पुढील ग्रंथरचनेची तयारी केली. 'जातिभेद, हें पुस्तक स. १८७७ मध्ये प्रसिद्ध झालें. त्यानंतर पुढील वर्षी **गीतातत्त्व** व **सुभाषित अथवा सुबोध वचनें** अशीं दोन पुस्तकें त्यांनी ~~प्रचार केलीं. जातिभेद या पुस्तकांतील~~ विषय नांवावरून कळण्यासारखा आहे. 'गीतातत्त्व'ही तसेंच. थोडक्यांत गीतेचें तत्त्व सांगणारे श्लोक एका बाजूस छापून त्यांच्यासमोर तेवढ्यावरील 'वामनी' टीका दिली आहे. 'सुभाषित' ह्या पुस्तकांत संस्कृत सुभाषितांचा मराठी अर्थ दिला असून, विषयवारीने त्यांचा क्रम लाविला आहे. **स्वाध्याय** आणि **आश्वलायन गृह्यसूत्र** हीं दोन पुस्तकें स. १८८० मध्ये प्रसिद्ध झालीं. **स्वाध्याय** हा ग्रंथ अनेक दृष्टींनी अपूर्व आहे. त्यांत त्यांची चिकित्सक व संशोधक बुद्धि दृष्टीस पडते. वेद, ऋचा, मंत्र यांची माहिती, पारायणाचे प्रकार, ते कसे झाले, पठण कसें करावें, वगैरे सर्व माहिती त्यांत एखाद्या विद्यार्थ्यांच्या 'गाईड' मध्ये असते, त्याहून अधिक आहे. ब्रम्हकर्मांची यथासांग ओळख करून घ्यावयाची असेल, तर स्वाध्यायाविना दुसरा वाटाड्या मिळणार नाही. मूळ विषय प्रतिपादल्यावर एकंदर २१ परिशिष्टांत इतिहास, भूगोल, भरतखंडांतील जाति, वर्णभेद, राज्यमीमांसा, प्रस्तुतची राज्यव्यवस्था, देशसुधारणा, हिंदुस्थानांतील यात्रा ...... असे किती तरी विविध विषय आणले आहेत. हिंदुस्थानचा राज्यकारभार कसा चालतो, जगांत राज्यपद्धतीचे आणखी प्रकार कोणते आहेत, इंग्लंडचें राज्य कोणत्या तऱ्हेने चालतें, अशा विषयांचीही माहिती त्या परिशिष्टांत आहे.

**आश्वलायन गृह्यसूत्रांत** सर्व संस्कारांचे मंत्र व विधि सांगितले असून, त्यांचा सरळ अर्थही दिला आहे. त्याची दुसरी आवृत्ति स० १९१५ मध्ये निघाली.

**ग्रामरचना**–त्यांतील व्यवसाय व त्यांची हल्लीची स्थिति– हा सामाजिक निरीक्षणात्मक प्रबंध मानता येईल. हें पुस्तक स० १८८३ त प्रसिद्ध झालें.

**आगमप्रकाश** हा ग्रंथ स० १८८४ मधला. याने पुष्कळांना घोटाळ्यांत पाडलें आहे. तो वेद–वेदांगांबद्दल असावा, असें वाटणें साहजिक आहे. त्याच्या जोडीचा **निगमप्रकाश** असा दुसराही एक ग्रंथ असावा, अशी उभय चरित्र-

लेखकांची समजूत झालेली दिसते. माझ्या अवलोकनांत 'आगमप्रकाशा'ची जी प्रत ( मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयांतील ) आली, तिजवरून कोडें उलगडतें तें असें:— आगमप्रकाश व निगमप्रकाश हीं दोन्ही नांवें एकाच ग्रंथाचीं आहेत. ग्रंथालयांतील प्रतीत पहिल्या ... पानापर्यंत निगमप्रकाश असें दर पानावर छापलें असून, पुढे मात्र आगमप्रकाश असा बदल केलेला आहे. मलपृष्ठावर आगमप्रकाश असें छापलें असलें, तरी आंतील बाजूस पुस्तकाचें नांव दुसऱ्यांदा छापतात, तेथें 'निगमप्रकाश' असें म्हटलें आहे. पुस्तकास असलेलें इंग्रजी मलपृष्ठ, इंग्रजी अर्पणपत्रिका व इंग्रजी प्रस्ताव यांमुळे गोंधळ वाढतो. इंग्रजींत कुणा के. रघुनाथजीचें नांव ग्रंथकार म्हणून आहे. आगम शब्दाचा अर्थ वाचतांना हा ग्रंथ कशासंबंधी आहे, याचा खुलासा कळतो. वेद अगर वेदांगें यांचा त्यांत कांहीचाही संबंध नाही. शाक्त-मार्गाची ती पोथी आहे.

लोकहितवादींनी ऐतिहासिक संशोधनांतही पुष्कळ मेहनत घेतलेली आहे. ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती हें तीन भागांचें पुस्तक प्रथम केव्हा प्रसिद्ध झालें, ठाऊक नाही. त्याची दुसरी आवृत्ति स. १८९२ ची सापडते. तीवरून किती तरी महत्त्वाची व उपयुक्त अशी माहिती, जी अन्य ग्रंथांवरून मिळणार नाही, ती मिळते.

राजस्थानचा इतिहास ( स. १८९२ ) गुजराथ देशाचा संक्षिप्त इतिहास ( स. १८९४ ) लंकेचा इतिहास ( ? ) सुराष्ट्र देशाचा इतिहास ( ? ) पृथ्वीराज चव्हाण यांचा इतिहास ( ? ) हे इतिहासपर ग्रंथ लोकहितवादींना इतिहासकाराचा कायमचा मान प्राप्त करून देणारे आहेत. राजस्थानच्या इतिहासाची दुसरी आवृत्ति लगेच दोन वर्षांनी निघाली, असें दिसतें. गुजराथच्या इतिहासाचे शेवटीं राज्यतुलना म्हणून एक पुस्ती जोडलेली आहे. तीत इंग्रजी व देशी राज्यें यांची ३४ कलमी तुलना आहे. तींत इंग्रजींतील दोष स्पष्टपणें दाखविले असून, देशी राज्यांतील सोई व गैरसोई यांचें निर्भीड विवेचन आहे.

रेव्ह. जी. आर्. ग्लीग यांच्या " हिस्टरी ऑफ दि ब्रिटिश एंपायर इन इंडिया " या इतिहासाचा भाग पूर्वार्ध म्हणून लोकहितवादींनी कधी अनुवादिला, तें कळण्यास मार्ग नाही; पण त्यांतही त्यांचें स्वतंत्र ज्ञान उत्तम प्रकारें व्यक्त होत आहे. सुमारें ११५ पृष्ठांची प्रस्तावना त्यास लोकहितवादींनी जोडली असून,

मुसलमानी धर्माबद्दल सांगोपांग व सविस्तर माहिती तींत आली आहे. त्याच्याच ग्रंथांत संस्कृत धर्मग्रंथांसंबंधींचें ज्ञान जसें चिकित्सक बुद्धीनें लिहिलेलें आढळतें, तसेंच इस्लामी धर्मग्रंथांसंबंधानें या प्रस्तावनेंत दिसून येतें. हा ग्रंथ शुद्ध अनुवाद म्हणतां येत नाही; तरी ग्लीगच्या इतिहासास धरून लिहिलेला आहे, हें खरें.

पानिपतची कढाई ( ? ) उदेपूरचा इतिहास ( ? )

हीं हीं ऐतिहासिक पुस्तकें लोकहितवादींनी लिहिलेलीं होत. त्यांच्या सर्व ग्रंथांत माहिती खच्चून भरलेली आढळते– मग तो ग्रंथ कसलाही असो. ऐतिहासिक व भौगोलिक माहिती देण्याची वेळ आली, म्हणजे त्यांच्या लेखणीला जसें कांही स्फुरण चढतें. " लंकेच्या इतिहासां" त अशा वर्णनात्मक माहितीची रेलचेल आढळते. आज इतकीं पुस्तकें, इतके विविध ज्ञानकोश व अनेक प्रवाशांचे वाटाडे ( guide books ) उपलब्ध असतां आम्हांस जें ज्ञान नाही, तें लोकहितवादींनी आपले सर्व व्यवसाय सांभाळून कुठून पैदा केलें, याबद्दल कुतूहल तर वाटतेंच; पण त्यांचेबद्दल आदर वाटून मस्तक नत होतें.

वरील मुख्य मुख्य ग्रंथांखेरीज लहानमोठीं अनेक पुस्तकें लोकहितवादींनी लिहिलीं; व छापून प्रकाशितही झालीं. त्यांपैकी विद्यालहरी, हिंदुस्थानांतील बालविवाह; एका दिवसांत लिहिलेलें पुस्तक; भिक्षुक, कलियुग; लाच, हिंदुस्थानास दारिद्र्य येण्याचीं कारणें ... वगैरे पुष्कळ आहेत. हीं बहुधा त्यांच्या संकीर्ण लेखांचीं पुस्तकें असावींत. ' लाचे ' वरील लोकहितवादींच्या निबंधांचीं १०–१२ मुद्रणें झालीं असल्याचा पुरावा सापडतो. सरकारी खात्यानें त्याच्या प्रती मोफत वाटल्या, असेंही कळतें.

शिवाय ' लोकहितवादी ' नामक मासिक गोपाळराव चालवीत होते. त्यांतील अनेक लेख अशा पुस्तकस्वरूपांत प्रसिद्ध होणें शक्य होतें.

अप्रकाशित असेंही लोकहितवादींचें लिखाण बरेंच पडून असलें पाहिजे. त्यांचे अधिकृत चरित्रकार श्री० कृ० ना० आठल्ये, त्याबद्दल साधार ग्वाही देत आहेत. " इंग्लिश कारकीर्दीचा इतिहास " हस्तलिखित रूपानें अद्याप पडून रहावा, हें केवढें दुर्भाग्य होय ! याशिवाय अनेक विषयांचीं टाचणें, त्याच्या दप्तरीं पडून आहेत. कित्येक थोरामोठ्यांशीं झालेला पत्रव्यवहार पोतींभर आहे.

ती उपलब्ध होणें आवश्यक आहे; पण हें कार्य कुणी करावें ? असो.

लोकहितवादींच्या वाङ्मयीन संसाराचा विस्तार सांगितल्यानंतर त्यांनी संवर्धिलेल्या संस्थांचा वृत्तान्त थोडक्यांत तरी पाहिला पाहिजे; म्हणजे लोकहितवादींच्या कर्तबगारीची कल्पना येईल. समाजसुधारणा करण्यांत त्यांनी धडाडीने भाग घेतला, हें उघड आहे. प्रार्थनासमाज, आर्यसमाज, थिऑसफी या सर्व धर्मपंथांशीं व पंथीयांशीं ते अगदी दाट मैत्रीने वागत. स. १८६९ त पुनर्विवाहप्रकरण कडाक्याने गाजलें; तिचें अध्वर्यु 'सप्तर्षि' होते, त्यांपैकी एक लोकहितवादी होते व त्यांना तन्निमित्त प्रामण्याची झळ पुढे अनेक वर्षे बाधत राहिली. 'ज्ञानप्रकाश' व 'इंदुप्रकाश' हीं दोन्हीं पत्रें काढण्यांत त्यांनी पुढाकार घेतला होता. त्याचप्रमाणे अहमदाबादेस 'हितेच्छु' हें अँग्लो-गुजराती पत्र काढवून बरेच दिवस त्याचा इंग्रजी मजकूर ते लिहीत होते. पुण्याची डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी व तिची अहमदाबादची गुजराती बहिण अशा दोन्ही संस्था स्थापणशांत लोकहितवादीच प्रमुख होते. गुजरातेंत प्रार्थनासमाजाची शाखा, वक्तृत्वसभा, पुनर्विवाहमंडळ, प्रेमाभाई-इन्स्टिटयूटमधील व्याख्यानसत्रें, इत्यादि संस्थापन व चालनकार्यें लोकहितवादींच्याच खातीं जमा आहेत. पंढरपुरचा अनाथ बालकाश्रम काढण्यास त्यांचें प्रोत्साहन होतें. तसाच प्रयत्न त्यांनी स. १८७७ त नाशिकासही करून पाहिला होता. मुंबईच्या आर्यसमाजाचें अध्यक्षस्थान त्यांजकडे कांहीं वर्षे होतें आणि दयानंदजींनी तर त्यांना अजमेर आर्यसमाजाचे ट्रस्टी नेमलें होतें. अशा प्रकारें आपल्या वेळच्या सर्व प्रगतिपर संस्थांशीं त्यांचा निकटचा संबंध असे. यावरून त्यांच्या व्यापाची कल्पना येईल.

लोकहितवादींची आणखी ओळख ती कशी करून घ्यावी ? त्यांचीं शत-पत्रें वाचून थोडीशी कल्पना येईल; त्या थोर पुरुषाच्या व्यासंगाची, त्याच्या आजन्म विद्यार्थी-वृत्तीची माहिती होणें आवश्यक आहे. असे द्रष्टे, दूर दृष्टीचे समाज-धुरीण, विचारी पुरुष दर पिढीला लाभत नसतात. आम्हांस ते लाभले होते, ही जाणीव इतक्या वर्षांनी होत आहे, इतके आम्ही अंध व गाफिलखोर बनलों होतों. अतःपर तरी लोकहितवादींची योग्यता मराठी वाचकांनी नीट ओळखावी, एवढीच विनंती आहे.

---

# शतपत्रें

## मूळचा अनुक्रम


| क्रमांक | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | इंग्लिश लोकांच्या व्यक्तिमात्राच्या गैर समजुतीविषयी. | ३९ |
| २ | लहानपणच्या लग्नापासून अडचणी. | ३६१ |
| ३ | पुण्यांत लायब्ररीची स्थापना. | १०९ |
| ४ | शिमग्याचा दुराचार. | २२७ |
| ५ | कन्याहत्या-गवरनरसाहेबांची बदली व ब्राम्हण लोकांचें अज्ञान. | २८३ |
| ६ | शाक्तमार्ग | २३० |
| ७ | छापण्याची कला आणि म्हातारपणीं लग्न. | ३६४ |
| ८ | जुन्या समजुती. | २३३ |
| ९ | नेटीव अमलदार. | ४२ |
| १० | पुनर्विवाह. | ३६७ |
| ११ | ब्राम्हणांचे आचार. | १६७ |
| १२ | हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याचा विचार. | ४५ |
| १३ | वाईट चालीचे प्रकार. | २३७ |
| १४ | राज्यसुधारणा. | ४८ |
| १५ | लग्नाविषयी विचार. | ३७० |
| १६ | विधवापुनर्विवाहाविषयी. | ३७५ |
| १७ | ब्राम्हणांचें अज्ञान. | २८५ |
| १८ | आर्जवीपणा व डौलीपणा. | २३८ |

१९ हिंदु लोकांचा आळशी स्वभाव. ३२९
२० ब्राम्हणांचें महत्त्व. २८८
२१ गृहस्थ आणि भिक्षुक यांचा भेद. २९२
२२ जातीविषयी विचार. ४१२
२३ चार वर्णांची सांप्रतची स्थिति. ३३२
२४ नशिबावर हवाला. २४२
२५ राज्यसुधारणा. ५३
२६ वैराग्य. १९३
२७ नाना पंथ. १९७
२८ विधिनिषेधरूप धर्माचें मूळ. १७०
२९ बुद्धीने ईश्वर किती कळतो, त्याविषयी. २०३
३० स्त्रियांची स्थिति. ३७९
३१ इंग्रजी विद्या. ११२
३२ लाच. ५७
३३ अर्थशून्य ब्राम्हणविद्या. ११७
३४ वेळेचा व्यर्थ खर्च २४६
३५ मानास व दानास पात्र. ३३७
३६ स्नानसंध्या. १७६
३७ देवपूजा. १७९
३८ इंग्रजी राज्यापासून लाभ. ६२
३९ वर्णविचार. ४१७
४० लाचेचा गुन्हा. ६५
४१ नाना फडणिसाचें शहाणपण. ४२१
४२ डोले करण्याची चाल. २५०
४३ निरुद्योगीपणाच्या चाली. २५४
४४ हिंदु लोकांनी उद्योग करण्याची आवश्यकता. ३४०
४५ हिंदुस्थानच्या पराधीनतेची कारणें. ६९

४६ इंग्लिश राज्याची आवश्यकता. ७३
४७ दया. ४२४
४८ ब्राम्हण लोकांचा स्वभाव. २९५
४९ सरदार लोक. ३४४
५० स्वराज्यांतील विद्वान. १२०
५१ हिंदु लोकांची द्रव्योपयोगाविषयीची समजूत. ३४८
५२ उद्याचा विचार. ४२८
५३ मन हेंच ईश्वरी शास्त्र. २०८
५४ इंग्लिश राज्यापासून फळ. ७७
५५ पुराणांतील ज्ञान. २९९
५६ नादविद्या. ४३१
५७ हिंदुलोकांचा व्यापार. ३५१
५८ आचार. १८२
५९ लोकांची समजूत व पुराणादिकांचें सौरस्य. ३०३
६० हिंदु लोकांनी काय करावें ? ३५५
६१ भटांनी लावून दिलेलें वेड. ३०७
६२ ब्राम्हणांची शिक्षणपद्धति. ३१०
६३ अर्थावाचून पाठ करणें. १२३
६४ धर्मसुधारणा. २१२
६५ नीतिप्रशंसा. ४३५
६६ सरकारी कामदार ८०
६७ स्वदेश प्रीति. ८४
६८ उद्योगप्रशंसा ४३८
६९ संस्कृत आणि इंग्रजी विद्या. १२७
७० पुनर्विवाह. ३८४
७१ भटांचा विद्येचा निरुपयोग. ३१३

७२ ब्राम्हणांचें ईश्वरी-ज्ञान. ११८
७३ धर्मव्यवहारासंबंधी खोट्या समजुती. २५८
७४ देवळें व नेमधर्म. १८६
७५ ब्राम्हणांचा लोभ. १२०
७६ मद्यपान. २६१
७७ पाठ करण्याची चाल. १२९
७८ राज्याविषयी विचार. ८७
७९ दया. ४४१
८० कमती कशाची ! २६६
८१ प्राचीन ग्रंथांचे अर्थ. ११३
८२ प्राचीन ग्रंथांचें महत्त्व. ११६
८३ भक्ति, कर्म, आणि ज्ञान. २१६.
८४ संस्कृत-विद्या. १४०
८५ ज्ञान हाच पराक्रम. ४४५
८६ सांप्रतचे पंडितांचें ज्ञान. १४६
८७ एकत्र रहाण्याची चाल. २७०
८८ नीति-प्रशंसा. ४४८
८९ इंग्लिश सरकार. ९२
९० लग्नें. ३८७
९१ दानधर्म करणें. २७४
९२ भिकारी. ४५३
९३ नवीन ग्रंथांची आवश्यकता. १५०
९४ इंग्रज सरकार. ९८
९५ अभिमान. ४५७
९६ ब्राम्हणांचे पुढारीपणापासून अनहित व वेदांत. १२४
९७ सुशिक्षा व पंतोजी आणि संस्कृत व इंग्रजी विद्या. १५४

| | | |
|---|---|---|
| ९८ | डॉल व नेटिव राजे. | १०१ |
| ९९ | पुनर्विवाह. | ३९० |
| १०० | शतपत्रांचा इत्यर्थ. | २९ |
| १०१ | संस्कृत विद्या. | १५७ |
| १०२ | पुनर्विवाह. | ३९४ |
| १०३ | पंडितांची योग्यता. | १६१ |
| १०४ | पुनर्विवाह. | ३९६ |
| १०५ | पुनर्विवाह. | ४०१ |
| १०६ | पुनर्विवाह. | ४०४ |
| १०७ | खरा धर्म करण्याची आवश्यकता. | २१९ |
| १०८ | पुनर्विवाह वगैरे सुधारणा. | ४०६ |

पत्र नंबर १००

# शतपत्रांचा इत्यर्थ

मी आपले श्रम या पत्रांत संपूर्ण करणार. यास्तव या लिखित पत्रशतकाविषयी कांही सुचवितों.

आज दोन वर्षे मीं लोकांस त्यांची स्थिति, रीती कशी आहे ती अगदी भीड न धरता उघड करून सुचविली. त्यांत एखादें अक्षर अधिक-उणें, शुद्ध अशुद्ध, कोणास वाटलें तर त्यांणी क्षमा करावी. माझे जिवाची पक्की खात्री आहे की, जो कोणी या पत्रांचें अवलोकन करील आणि विचार करून पाहील, त्यास प्रत्येक शब्द खरा आहे असें वाटेल. लोकहितवादीने कोणाची मजुरी पत्करली नाही; कशाची अपेक्षा, आशा किंवा इच्छा धरली नाही, कोणाचे सांगण्यावरून किंवा शिकविल्यावरून कृत्रिम वर्णन केलें नाही. लाभावर किंवा द्रव्यावर नजर ठेवून कीर्ति व्हावी या हेतूने लिहिलें नाही. इतके श्रम जे केले ते लोकांस त्यांची वास्तविक स्थिति कशी आहे ती कळावी, त्यांणी सुधारावें, त्यांस इहलोकीं सुखवृद्धि व्हावी, परलोकाचें साधन घडावें, व आपले बहुत काळापासून दृढ ग्रह झाले आहेत त्यांपैकी कांही अविचाराने व कांही मूर्खपणाने जडलेले आहेत ते कमी व्हावे. किंवा नाहीसे व्हावे, इतक्याच हेतूने मीं यथामतीने व स्वइच्छेने वेतनावाचून श्रम केले आहेत. व जितकें लिहिलें आहे तितकें अक्षरशः खरें खरें निवडून, विचार करून काळजीने लिहिलें आहे. हें सर्व लोकांस नजर आहे.

हें लिखित शतक कोणी बाळबोध अथवा मोडी छापून मुलांस लिखितासारखें वाचनास दिलें तर बहुत नफा होईल. यास्तव या ग्रंथावर लोकहितवादी आपली सत्ता ठेवीत नाही. पाहिजे त्यांणी हीं पत्रें छापून प्रगट करावीं. किती एक प्राचीन काळचे लोकांस किती एक लोक-हितवादीचीं मतें विपरीत व हिंदुधर्मास विरुद्ध भासतील, परन्तु हा

त्यांचा मिथ्या भास आहे; कारण की, त्यांत हिंदुधर्मास कांही विपरीत नाही. फक्त मूर्खपणास मात्र विपरीत आहे. याविषयी विचार केला तर खात्री होईल. यापुढे कांही दिवसांनी लोकहितवादी दुसऱ्या कामास आरंभ करील; परन्तु ही गोष्ट ईश्वराचे स्वाधीन आहे. मला वारंवार इतकेंच लोकांस सुचवावयाचें की, मी कांही व्यर्थ, मिथ्या किंवा असत्य लिहिलें नाही. जें लिहिलें तें यथार्थ आहे, असें मला तर खचित वाटतें. जे सारासार विचार करणारे, व ज्यांची मनें पंडितांसारखीं कुत्सित नसून विस्तीर्ण झालीं आहेत त्यांस हें समजेल.

माझी सर्व जनांस एवढीच विनंती आहे की, तुम्ही सर्व जण विचार करण्यास लागा, वाचावयास लागा, नवीन ग्रंथ व वर्तमानपत्रें वाचा, व तुमचे शेजारीं काय होत आहे याचा विचार करा. इंग्रजांमध्ये किती एक चांगले गुण आहे व ते तुम्हास प्राप्त व्हावे म्हणून ईश्वराने त्यांची तुमची संगत घातली आहे हें लक्षांत आणा. सारासार पहा, परंपरा आंधळ्याची माळ लावली म्हणून तीच चालवूं नका, धर्मशील ईश्वरतत्पर व्हा. या गुणांवाचून सर्व व्यर्थ आहे. सत्य बोला, दुष्टवासना सोडा, धर्मसुधारणा करा, म्हणजे टाकू नका. परंतु त्याचा अर्थ ध्यावयाचा तसा काळ पाहून घ्या. व ईश्वरसंबंधी व जगासंबंधी ज्ञान सर्व लोकांस वृद्धिंगत करा. आळस सोडा, तुमच्यामध्ये वास्तविक बुद्धिमान असेल त्यास पुढारी करा त्याचे अनुमताने चाला. सर्व लोकांची जूट असू द्या, आपसांत फूट नसावी हें ध्यानांत वागवा. विद्या अधिक होऊन तुमचें पाऊल पुढे पडूं द्या. सर्व देशाची काळजी प्रत्येक जणाने करावी. राज्य कसें चाललें आहे व राजा कोण त्याची वर्तणूक कशी हें पहात जा. माहितगार व्हा.

तुमच्या प्राचीन काळच्या विद्या, ग्रंथ, तर्क व कल्पना यांचे ऐवजी आता चांगल्या विद्या व अधिक कल्पना निघालेल्या आहेत, त्या सर्व पहा. तुमचे संपत्तीवर लक्ष देऊन तुम्ही आळसांत राहूं नका. भट व पंडित हे

केवळ मूर्ख हें पक्कें समजा. खरी नीति कोणती तें पहा. पैसा खाऊं नका. रांडबाजी करूं नका. प्रपंच, संसार भलाईने करा. आपले शत्रूंसदेखील वाईट इच्छूं नका. शरीराने व मनाने देखील पाप करूं नका. प्राणीमात्रावर दया करा. अपराध क्षमा होतील तितके करा, परंतु क्षमा न करण्याचा प्रसंग येईल तेथे क्षमा करूं नका. एकमेकांवर प्रीति करा. नित्य उठून ईश्वराचें भजन व प्रातःकाळीं चिंतन करीत जा. त्याजवळ क्षमा मागा. आपले हातून पापें व अपराध बहुत घडतात, त्यांची क्षमा भगवंताशिवाय करणार समर्थ कोणी नाहीं. ढोंग सोंग करूं नका, लबाडी सर्वत्रा ईश्वरास दिसती, यास्तव कदापि करूं नका. कोणचेंही पाप करूं नका. तें फार वाईट. इहलोकीं क्षणभर सुख वाटेल, परंतु त्याचा झाडा घावा लागेल. मरावयाचें आहे, हें नित्य मनांत आणा.

तुम्ही आपले मुलांची काळजी करून त्यांस शहाणी करा, व सर्व लोकांची काळजी करा. नित्य कांहीं तरी सर्व देशाचें कल्याण केल्याशिवाय एक दिवस जाऊं देऊं नका. मुख्य ईश्वर भजन करण्याचा मार्गच आहे की, कोणास दुःख देऊं नये. व सर्व लोकांचें हित करावें. स्वदेशाचें हित इच्छावें आणि परदेशाची हानि इच्छावी असें नाहीं. परंतु सांप्रत आपले लोक फार वाईट अवस्थेंत आहेत, सबब फार खबरदारी ठेवली की, या लोकांचें कल्याण होईल. तुम्ही आपल्यास योग्य करा, अन्न वाढवा. पैका मिळाला तर अन्न वाढते, असें नाही. अन्न, खरेपणा व निर्मळपणा यांपासून उत्पन्न होते. विद्या केली तर त्याप्रमाणे वागणूक पाहिजे, नाहीं तर विद्या व्यर्थ आहे. विद्येचें सार्थक रोजगार नव्हे. ज्यास विद्येचा अर्थ ठाऊक नाही, ते असें म्हणतात. परंतु फक्त पोटच भरणारी ती विद्या नव्हे, ती मजुरी आहे. विद्या म्हणजे ज्ञान, जेणेंकरून मनुष्य निर्मळ होतो, विचारी होतो, समर्थ होतो. उनाड लोक जे आहेत ते विद्येचें तात्पर्य द्रव्य मिळविण्याचें असें समजतात. परंतु विद्येपासून द्रव्यलाभही होतो, व दुसरे अनेक लाभ होतात.

## शतपत्रांचा इत्यर्थ

याप्रमाणे तात्पर्य मीं निरूपण केलें. याप्रमाणे सर्वांनी चालावें आणि असें होण्यास माझे श्रम कांही उपयोगी पडले असें दृष्टोत्पत्तीस आल्यास माझे श्रम परिहार होतील. माझें मागणें सर्व लोकांस आहे की, मीं जें लिहिलें आहे त्याचा विचार करून पहा. तुमच्या चांगल्यावाचून या लिहिण्याचा हेतु नाही. तुमचें कल्याण व्हावें म्हणून मी झटलों व तुमच्या चुक्या वगैरे उघड करून दाखविण्यांत तुम्हांस रागरोष येईल हें मी मनांत आणलें नाही. कारण की, माझी उत्कंठा तुमच्या सुधारण्याकडे फार आहे. माझें अंतःकरण सर्व तिकडे आहे. यास्तव मी जें लिहिलें आहे, त्याचा तुम्ही विचार करावा. कारण की, आम्हीं तुमची सेवा एकनिष्ठेने व निष्कपटपणाने केली त्याजवर तुमची इतराजी नसावी. किंबहुना तो काय बोलतो, हें तरी मनन करावें. अस्तु तुमची आमची गाठ आज दोन वर्षे सतत होती याचा मला मोठा आनंद सर्व काळ वाटेल. सर्वांनी कृपा लोभ असो द्यावा, हे विनंती.

# लोकहितवादींचीं
# श त प त्रें

# राजकीय मतें

लोकहितवादींच्या राजकीय मतांची ओळख, हीं १७ पत्रें वाचून सहज होईल. इंग्रजांना ते गुरुस्थानीं मानीत; व त्यांचें राज्य येथे झालें तें ईश्वरी योगायोगामुळे, अशी त्यांची खात्री होती. तशीच खात्री " इंग्रज शुद्ध टोणपे असतात " ( ६६ ) व "हल्लीचे राज्यांत लोकांस रोजगार व श्रीमंती नाही" ( ७८ ) या बद्दलही त्यांची होती. " लोकांचे हातीं राज्य असेल, व स्वदेशीय अंमलदार " इंग्रजांप्रमाणे निःस्पृहतेने कारभार चालवितील तर " इंग्रजांचे राज्याहून शंभरपट सुख होईल.... रामराज्यही मागे पडेल " ( ७८ ) असें ते स्पष्टपणें सांगतात. इंग्रज हिंदुस्थानवासीयांस " अगदी भिकारी करूं लागले " म्हणून सरकारशीं भांडून कायदेशीर तजविजी करण्याचा आग्रह त्यांनी धरला ( ८९ ). इतकेंच नव्हे, तर सहा वर्षांनी " कंपनी सरकारची सनद बहाल होईल, तेव्हा आपल्या देशांतील राज्यव्यवस्थेसाठी लोकांनी विलायतेंत " राणीकडे अर्जी करून " हिंदुस्थानचें पार्लमेंट " ( २५ ) मागून घ्यावें, अशी सूचना केली; आणि " दहापांच असामी प्रयत्न करण्याकरता नेमून त्यांजबरोबर ती " अर्जी विलायतेंत पाठवावी, असा सल्ला दिला ( २५ ). " राज्यांत सुख होण्याकरिता लोकसत्तात्मक राज्य जरूर असलें पाहिजे " ( ४० ) आणि जेथे कायदे होतात, तेथील " लोकांची संमति त्या कायद्यांस असावी " ( ४० ) असें त्यांनी प्रतिपादिलें. परदेशांतून येणारा सर्व माल इकडेच तयार करण्यास लोक शिकले म्हणजे ते सुखी व शहाणे होतील आणि मग इंग्रजांना म्हणतील, की आम्हांस पार्लमेंट द्या...आणि मग इंग्रज फक्त व्यापार करून राहतील... " परंतु...इंग्रज गडबड करूं लागतील किंवा कांही कानू बसवावयाचा आग्रह करतील तेव्हा अमेरिकेंत झालें तसें होऊन हे लोक आपणांस स्वतंत्र करून घेतील " ( ५४ ). असें भविष्य लोकहितवादींनी १८४९ मध्ये वर्तविलें. " या जमिनीवर जे आपण

आहोंत ते सर्व एकमेकांचे बंधु आहोंत व हा देश आपणा सर्वांची मातुःश्री आहे" (६७) असें त्यांनी शिकविलें. "ईश्वरानें सर्व मनुष्यें सारखी निर्माण केली आहेत" (३८) आणि म्हणून "कैकाडी हे सुधारल्याच्या अंगीं ब्राह्मणा-सारखें शहाणे होतील हें खचित" (३८) असें ते म्हणत.

आपणांस विद्या शिकावयाची तर ती "विद्या शिकण्याचें बक्षिस विद्या हेंच आहे" (९) असें मानून शिकली पाहिजे; "ज्ञान हीच शक्ति आहे" (९). म्हणून ज्ञान मिळवा, असा त्यांचा कळकळीचा आग्रह आहे.

लोकहितवादींची ही सर्व मतें व त्यांचे हे व्यापक विचार लक्षांत घेऊनच त्यांची योग्यता ठरविली पाहिजे. मुंबईत उच्च इंग्रजी शिक्षणाची सोय होण्या-पूर्वी वयाच्या २५–२६ व्या वर्षी एका 'अर्धशिक्षिताने' स्वयंस्फूर्तीने लोकांचें हित करण्याच्या शुद्ध बुद्धीने हे विचार सरकारी नोकरींत असतांना नियमित-पणें लिहून वर्तमानपत्रांत प्रकट केले, ही परिस्थिति देखील लक्षांत घेणें जरूर आहे. मग समजून येईल की, "**खरोखर लोकहितवादींसारखा द्रष्टा आपणांत अद्याप झाला नाही.**" कारण, आज आपल्यांपैकी अग्रेसर आहेत, त्यांच्या आकांक्षा तरी, लोकहितवादींनी ९० वर्षांपूर्वी जें लिहून ठेवलें त्याच्यापुढे कोठे गेल्या आहेत !

# १ राजा–प्रजा संबंध

१ इंग्लिश लोकांच्या व्यक्तिमात्राच्या गैरसमजुती
९ नेटीव अमलदार
११ हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याचा विस्तार
१४ राज्यसुधारणा
२५ राज्यसुधारणा
३२ लाच
३८ इंग्रजी राज्यापासून लाभ
४० लाचेचा गुन्हा
४५ हिंदुस्थानच्या पराधीनतेचीं कारणें
४६ इंग्लिश राज्याची आवश्यकता
५४ इंग्लिश राज्यापासून फळ
६६ सरकारी कामदार
६७ स्वदेशप्रीति
७८ राज्याविषयी विचार
८९ इंग्लिश सरकार
९४ इंग्रज सरकार
९८ डौल व नेटीव राजे

# इंग्लिश लोकांच्या व्यक्तिमात्राच्या गैरसमजुतीविषयी

हल्ली अशी बातमी कळली आहे की, पुणें येथे राज्य बुडाल्यापासून फौजदार कोतवालीचे कामावर ठेवीत होते, त्यापैकी जे ब्राम्हण फौजदार झाले, त्या सर्वांची बहुत करून वहिवाट दुरुस्त नाही, असें अनुभवावरून कळलें, व माजी फौजदार बळवन्तराव गोविंद याजवर तर दरवड्याचे वगैरे अपराध स्पष्टपणें शाबिद होऊन त्यास मोठी शिक्षा झाली. तेव्हा ब्राम्हण लोक अविश्वासु आहेत; याजकरिता येथील अधिकाऱ्यांनी असें मनांत आणलें आहे की, या कामावर पुनरपि ब्राम्हण न नेमितां खिस्तीयन धर्मांतील मनुष्य नेमावा. त्यास याविषयी मी थोडासा मजकूर आपल्यास लिहून पाठवितों. हा जर कृपाकरून आपलें पत्रद्वारें प्रसिद्ध होईल, तर ब्राम्हणांवरील दोष निवारण होईल, असें वाटतें.

ब्राम्हण लोकांनी वाईट वर्तणूक केली, असें अनुभवावरून जें दिसलें तें खरें आहे; परन्तु त्याचा दोष ब्राम्हणांकडे नाही. कारण चांगले वाईट लोक सर्व जातींत असतातच. परन्तु त्यांपैकी पक्का शोध करून चांगले, कुलीन, संभावित, नीतिमान् असे असतील त्यांस अधिकारावर नेमावें. धर्मशास्त्रीं व्यवहार–मयूखांत प्रथमतः श्लोक आहे तो असा की—

> व्यवहारान्नृपः पश्येद्विद्वद्भिर्ब्राह्मणैः सह ।
> धर्मशास्त्रानुसारेण क्रोधलोभविवर्जितः ॥ १ ॥
> श्रुताध्ययनसंपन्ना धर्मज्ञाः सत्यवादिनः ।
> राज्ञा सभासदः कार्या रिपौ मित्रे च ये समाः ॥२॥

या प्रमाणे बहुत अध्ययन केलेले, बहुत ऐकलेले, धर्म जाणणारे, सत्य बोलणारे, निःपक्षपाती सभासद राजाने अधिकारावर नेमावे म्हणून

आहे. या प्रमाणे जर ब्राम्हण लोक नेमले असते तर असें का होतें! इंग्रजी राज्यांत हें रयतेचें फार नुकसानास कारण व दुर्दैव आहे की, ज्या साहेब लोकांचे हातीं मोठ्या नेमणुका यावयाच्या असतात, ते त्या देते वेळेस कांहि विचार पहात नाहीत. मनांत येईल त्यास देतात. त्यांची विद्या, गुण, नीति, वगैरे यांचा शोध करण्याचे श्रम करीत नाहीत; म्हणून अयोग्य लोक मोठमोठ्या कामावर मुकरर होऊन कायेचे वगैरे मोठे बोभाट उठले आहेत. साहेब लोकांचे हातीं राज्य गेलें, परन्तु ते इकडील लोकांप्रमाणे काम करण्यांत माहितगार आहेत असें नाही. ते विद्वान्, शहाणे व निःपक्षपाती आहेत हें खरें, पण देशाची व भाषेची माहिती नेटीव लोकांप्रमाणे त्यांस नाही. यामुळे नेटीव लोक जे त्यांचे हाताखाली आहेत त्यांचे हातीं रयतेचें वाईट बरें करावयाचें पुष्कळ असतें. गरीब लोकांस साहेबांची भेट किंवा त्यांशीं स्वस्थपणाचें भाषण होत नाही. तेव्हा त्यांस कामगार हेच साहेब असतात. आणि हे कामदार लोक वाईट चालीचे, आशाबद्ध व द्रव्यलोभी असतात. म्हणून लोकांस फार छळितात. त्यांतून एकाद्याचे अपराध बाहेर दृष्टोत्पत्तीस येऊन त्यांस शासन होतें, परन्तु तसें सर्वांस होत नाही. नेटीव लोक महान् धूर्त आहेत म्हणून त्यांचे अपराध सांपडणें-ही फार कठीण आहे. साहेब लोक मोठें काम ज्यास देतात त्याची हुशारी मात्र पाहतात. परन्तु कामगाराचे फक्त हुशारीचा उपयोग काय! तीशिवाय दुसरे बहुत गुण त्यास पाहिजेत. मनुष्य कृत्रिम अंतःकरणी व तोंडापुढे चांगलें बोलणारा व इकडे तिकडे धावून आजेवासाठी काम करणारा, तो समक्ष मेहनत घेतो त्यामुळे इंग्रज लोकांस वाटतें की, हा फार चांगला हुशार आहे, परन्तु त्याचें अंतःकरण मलिन व त्यास धर्मशास्त्र कळत नाही. त्याचा दुष्टपणा हृदयांत असतो; तो साहेबाने तोंड मागे फिरविलें पुरें की, लागलाच प्रगट होतो. तेव्हा असे प्रकारचे लोक अधिकारावर नेमल्यावर मग त्यांचे सद्गुण ऐकावयाची आशा कोठून! परन्तु येणें करून सर्व जातींस बट्टा लागला असें नाही. नेमणाऱ्याचें अलक्ष यामुळे

या गोष्टी घडतात. पुण्यांत बहुत संभावित व कुलीन व सरंजामदार व पेन्शनवाले गृहस्थ आहेत. परन्तु त्यांतील चांगला मनुष्य आणि विद्वान् आजपर्यंत कामावर कोठे ठेवला असें जाहलें नाही. शाळेंतील शिकलेले, कुलीन व विद्वान् यांचे विषयी तर सरकारने बहुत वेळ हुकूम पाठविले आहेत. परन्तु जिल्ह्यांतील साहेब लोक या सर्वांस एकीकडे ठेवितात. आणि आपले कृपेंतील एखादा मनुष्य त्याचें कुलशील चांगलें नसलें व अगदी कवडीचा माल असला, तरी त्यास ठेऊन "रजाचा गज" करितात व याप्रमाणे कुलहीन लोक इंग्रजांचे दरबारांत फार जमले आहेत. त्यामुळे ब्राम्हण लोकांची अब्रू कमतर दिसते, हें त्यांचें दुर्दैव म्हणावें. याची तजवीज कोणी मनांत आणीत नाहीत. साहेब लोक मनास येईल तसा दोष ठेवितात हें ठीक नाही. राजाने खराब लोक संन्निध केले तर कारभार चांगला कसा होईल? मागे कारभार अशा रीतीने चालत नव्हता व माधवराव पेशव्यांचे वेळचे किती एक गोष्टी ऐकण्यांत आहेत, त्यांजवरून दिसतें की ब्राम्हण लोक सगळे वाईट आहेत असें नाही. बाजीरावाचे कारकीर्दीत बहुतेक ब्राम्हणांस नीचत्व येऊन ते दुर्गुणी झाले हें खरें आहे. तत्रापि अद्याप न्यायनिष्ठुर व योग्य असेही पुष्कळ आहेत. परन्तु त्यांस परीक्षक मिळून जसें कवि म्हणतो काकः काकः पिकः पिकः असें करणारे भेटतील, तेव्हा व्यवस्था नीट होईल. साहेब लोक भाषा वगैरे शिकण्याची मेहनत करितात. तशी जर मनुष्य निवडून काढण्याची मेहनत घेतील, तर लोकांचा फार फायदा होईल. बहुतेक ठिकाणीं असें आहे की, एखादी जागा खाली झाली तर वेळेस जो उभा असेल त्यास ती देऊन आपली मेहनत चुकवितात. कारण जर बातमी फुटली तर कोणी शिफारशी आणतात व किती एक अर्जी पडतात. तेव्हा त्या वाचावयाची मेहनत कोण करितो? म्हणून तात्काळ अलत्याच एखाद्या शुभास ती जागा देतात. तेव्हा चांगले लोक कोठून मिळणार? कांही दिवस जागा खाली राहून किंवा परीक्षा घेऊन जितके उमेदवार जमतात, तितके जमूं देऊन त्यांची नीट चौकशी करून जागा द्यावी,

असें करीत नाहीत. आणि अन्याची सोडव काढितात. येणेंकरून लोकांची अब्रू जाते आणि ठेवणाराचे बुद्धीची प्रशंसाही होत नाही. याचा बंदोबस्त लवकर होईल आणि उगेच कारणाशिवाय ब्राह्मणाचे अमूल बुडवण कावणार नाहीत, अशी आशा आहे. इंग्रज लोक फार शोधक आहेत, म्हणून त्यांस हें अवघड नाही. कदाचित् ये विषयी सरकार लक्ष देईल तर बरें होईल. याजबाबत आणखी कांही सूचना पुढें लिहून पाठविण्यांत येतील.

---

पत्र नं० ९ ७ मे १८(५२)!

## नेटीव अमलदार

आपलें मागील पत्रीं 'एक हिंदु' या सहीचें पत्र छापलें होतें. त्यांत बहुत करून बोभाटाचा मजकूर लिहिला होता. तो सर्व तथ्य नसला, तरी कांही खरा आहे.

नेटीव लोकांमध्ये विद्वान् मुळीं थोडे, आणि जे वास्तविक विद्वान् व गुणी आहेत, त्यांची प्रतिष्ठा इंग्रज सरकारांत होते. एकादे वेळीं विरुद्ध गोष्ट झाली म्हणून तेंच प्रमाण धरूं नये. सामान्यतः वहिवाट असेल ती लिहिली पाहिजे हें एक, दुसरें असें आहे की, इंग्रजी शाळेंत वगैरे जे लोक अभ्यास करितात, त्यांत इंग्रजी लिहिणार असें नांव मिरवणारे पुष्कळ असतात. घरांत खुर्ची, मेज, पिसें + व बुकें आलीं म्हणजे आईबाप व शेजारी पाजारी सर्व त्यास इंग्रजी लिहिणार व शहाणा असें समजतात.

परन्तु वास्तविक पाहिलें तर त्यास वाचल्याचा अर्थही कळत नाही. आणि ग्रन्थावलोकन केलेलें नसतें. इतिहास, विद्या, शास्त्रें यांचा अभ्यास

नसतो. इंग्रजी विद्या समुद्रासारखी आहे. परन्तु दोन बुकें वाचतां आलीं व चार विरखुड्या × ओढतां आल्यां म्हणजे कानावर पागोटें, खिशांत रुमाल आणि हातांत सोटा असे वेश पुष्कळ घेतात. परंतु त्याने ते विद्वान् होत नाहीत. शाळेंत शिकलेले सर्व शहाणे आहेत असें नाही.

"सहस्रेषु च पंडितः" असें कवीने म्हटलें आहे. इंग्रज लोकांतील साधारण मनुष्य जरी असला, तरी हिंदु लोकांपेक्षा तो सहस्र गुणांनी श्रेष्ठ आहे. व तुम्हांस असेंही वाटूं देऊं नका की, विद्वान् नेटीव पुष्कळ जाहाले, तर त्यांस मोठ्या जागा मिळणार नाहीत. कारण की, विद्या शिकण्याचें बक्षीस विद्या हेंच आहे व ज्ञान हीच शक्ति. मोठे धुरंधर विद्वान् शे दोनशे होऊं द्या आणि मग मोठ्या चाकऱ्या मिळतील किंवा नाही पहा ! जर इंग्रज न देतील तर ते विद्वान् हर एक प्रयत्नें करून त्या मिळवतील. एकमत हीच शक्ति आहे. शहाणपण असेल, तर पैक्यास तोटा नाही. एक विद्वान् झाला असेल आणि त्यास मोठी प्रतिष्ठा मिळाली नसेल, तर आश्चर्य नाही. कारण की, अशी परीक्षा होत नाही. हें प्रयत्नाचें काम आहे. काळेंकरून याचा फायदा होतो. व इंग्रज लोकांस तरी इतबार ✻ आला पाहिजे, तेव्हा ते अधिकार देतील. आज नेटीव लोकांचा इतबार मोठा नाही. कारण की, शंभर नेटीव कामगारांस जर द्रिव्य दिलें, तर पांच पार पडतील कीं नाही न कळे. व परकी इंग्रज नेहमी ढेकणांसारखे त्यांस चिरडतात. व किती एकांचा फडशा झाला आहे. असें जरी आहे, तरी जे नेटीव कामगारांशीं सम्बन्ध ठेवितात त्यांस त्यांचीं कर्मे विदित आहेत.

नेटीव कामगार यांजमध्ये चांगला गुण कोणचा असतो, हें तरी मनांत आणा. ते बहुत करून अविद्वान्, ढोंगी व लबाड असतात. कोणी

---

+ पिसें– पिसांचा बोरुप्रमाणे उपयोग तेव्हा होत असे. (Quill-pens)

× विरखुड्या– ओरखड्या, रेघोट्या.

✻ इतबार– विश्वास ( रा. व्य. को. )

मागल्या अवस्था पाहून कांही दिवस मीट चाकतात, परन्तु मग त्यांचे मनांत असें येतें की, आता मला काय भय आहे ? मी आता श्रीमन्ती भोगावयास शिकलों. खर्च तरी कसा निभेल ? असा विचार करून पाहिल्याने भयाने व लज्जेने सन्याकडून पैका घ्यावयास आरंभ करितात. व मग एकदा सवय पडली म्हणजे अंगवळ्यास पडते. नंतर लिलाव सुरू करतात. म्हणजे जो अधिक बोलेल त्याचा फैसला होतो. अशा तर गोष्टी हमेशा पाहाण्यांत येतात. डौल करणारे हे लोक असे आहेत की, आपली योग्यता व थोरपणा कांही जाणत नाहीत. यांनी कचेरींतून घरीं जातांना रोज १५।२० शिपाई बरोबर नेत असावे आणि त्यांमध्ये आपण झुलत झुलत मोठे डौलाने चालावें. म्हणजे घरच्या बायका किंवा रांडा यांनी आपले यजमानास पाहून धन्य मानावें. अशाकरिता हे प्रयत्नाने शिपाई मिळवितात व पुढे चालवितात. असे कांही चमत्कारिक रिवाज या मूर्ख लोकांचे आहेत.

त्यांस असें वाटत नाही की, सरकारी चाकर हे विनाकारण मी आपल्या जवळ कशास ठेवावे ? हे जर आपले आपले कामावर जातील, तर किती एक लोकांचीं कामें आठ दिवसांनी व्हावयाचीं तीं उद्या होतील. आपण कैदी नाही तर आपणांभोवते इतके शिपाई कशास पाहिजेत ?

परंतु मला वाटतें की, पुढे जें होणार त्याचें तें चिन्ह दर्शवितात. तात्पर्य, सांप्रत नेटीव अमलदार आहेत हे मूर्ख आहेत. यांस इंग्रज चाकऱ्या देतात, एवढ्याही देण्याची योग्यता यांजमध्ये नाहीं, परन्तु इंग्रज मेहेरबानी करतात. मी एकदा खेड्यांत एका कुळंब्याचे तोंडाने ऐकिलें की, साहेबांचें राज्य चांगलें, साहेब न्याय इनसाफ चांगला करितो, पण ब्राम्हण लोक त्यास शिकवून आमचीं घरें बुडवितीत. आणि बहुतकरून सर्व रयतेची समजूत अशीच आहे, आणि ती खरी आहे. हे हलकट लोक फार प्रळय करितात, आणि त्यांस आशा फार; म्हणून जोंपर्यंत नेटीव लोक दुर्गुणी व लोभी आहेत, तोंपर्यंन्त त्यांचा पक्षपात कोणी धरावा ?

---

# हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याचा विचार.

मागील पत्रांत 'प्रवासी' या सहीचें पत्र छापलें,त्याचा अभिप्राय पहातां इंग्रजाचे राज्यांत प्रजेस सुख नाही असा आहे, सबब या विषयी आम्हांस कांही विचार सुचला आहे तो लिहितों. म्हणजे त्यावरून लोकांस न्याय करितां येईल.

ईश्वर सर्व गोष्टींचा नियंता आहे, व पृथ्वीवर आणि सर्व ब्रह्माण्डांत जा गोष्टी घडतात त्यांजवर त्याची सत्ता आहे. तसेंच ईश्वर सर्वज्ञ आहे. तो असा की, जसें जसें योजावयाचें तसें तो योजतो,त्याने क्षुधा केली आहे,तर अन्नही तो उत्पन्न करतो व सूक्ष्म आणि स्थूळ पदार्थांचें नियंतृत्व त्याजकडे आहे, म्हणून एक राज्य जातें व दुसरें होतें. अशा मोठाल्या घालमेली होतात, त्या भगवन्ताचे प्रेरणेशिवाय घडत नाहीत. तेव्हा हिंदु लोकांचें मूळचें राज्य मुसलमानांनी घेतलें. व यांजकडे चार पांचशे वर्षें राहून आता सर्व भरतखण्ड इंग्रजांचे अमलांत गेलें. या गोष्टी ईश्वराने चांगलेपणा-करिताच योजिल्या असें.मला वाटतें.

कारण ईश्वर स्वतः कोणांस शहाणपणा शिकवीत नाही. एक भिकारी होतो, दुसरा मातबर होतो, तद्वत् एका देशाची सुधारणा तो देश दुसऱ्या देशाचे अमलांत गेल्याशिवाय होत नाही. असें तर चराचर चालत आलें आहे. पूर्वी हिंदु लोक शहाणे होते. त्यांचें शहाणपण मिश्र× देशांत व यवन* देशांत गेलें. व ते देश रूमचे× अमलांत गेलें तेव्हा रूमचे लोक शहाणे झाले. रूम टोपकर लोकांचे अमलांत गेलें, तेव्हा त्यांचें शहाणपण टोपकर लोकांस आलें; परन्तु या घालमेलींत मूळचें हिंदूंचें शहाणपण

×मिश्र–मिसर, ईजिप्तचें जुनें नांव. *यवन देश– ग्रीस. ×रूम– रोम, इटली.

राहिलें नाहीं. हें खरें. परन्तु त्याची चकचाट दर एक ठिकाणीं होतां होतां सांप्रत इंग्रज लोक हिंदु लोकांपेक्षा शंभरपट शहाणे झाले आहेत व तें शहाणपण हिंदु लोकांस प्राप्त व्हावें एतदर्थी ईश्वराने हा मुलुख त्यांचे ताब्यांत दिला आहे, हें स्पष्ट दिसत आहे. तुम्ही विचार करून पहा की, इंग्रज लोकांमध्ये सांप्रत शहाणपण व शहाणे मनुष्य आहेत, त्यांचा शंभरावा हिस्सा तरी हिंदु लोकांत आहे काय ?

पहा की, इंग्रज लोक अखबारी+ वगैरे वाचतात, त्यांस आपले लोक असें म्हणतात की, यांत काय आहे ? हें व्यर्थ काम आहे? आताच्या चाली व रीति–प्रकरणीं कोणीं संभाषण केलें, तर ते म्हणतात की, 'छि:, या रिकाम्या कथा कशास काढतात ?' किती एक लोक विद्येचे व ज्ञानाचे परम शत्रु आहेत खरे ! असे मूर्ख लोकांमध्यें मला वाटतें की, असेंच परकी राज्य चांगलें. कारण की, विलायतेंत लोकसत्तात्मक राज्य आहे व इतर दुसरे टोपकर लोकांचे मुलखांत तसेच प्रकारचीं राज्यें आहेत. असलें राज्य जर हिंदुस्थानांत असलें, तर घटकाभर तरी चालेल काय ? तसलें राज्य जर येथे झालें व जर त्यांत ब्राम्हण लोकांचा हात शिरला, तर लागलीच लक्ष भोजनें व कोटि होम मात्र चालू करतील. परन्तु लोकांच्या हिताच्या गोष्टी किंवा ज्ञान व जगांत काय व्यवस्था आहेत, यांचा शोध लावण्याचा उद्योग करणार नाहीत. व यांचें एकमत राहणार नाहीं. ब्राम्हण म्हणतील की, हाडझाड कुळंबी हे कामांत कशास पाहिजेत, व कुळंबी म्हणतील की, हे बामण मावळेले पोळ, यांचा उपयोग काय ? परभु म्हणतील, सोनार कशास पाहिजेत; वाणी म्हणतील की, तेली कशास पाहिजेत, असा घोटाळा होईल की नाही ? हिंदु लोक हल्ली ज्या स्थितींत आहेत ती-प्रमाणे त्यांचे नाकांत वेसण घालून चालविणारा एक दांडगा राजा पाहिजे, यांस मोकळीक देऊन उपयोग नाही. जसे इस्पितळांतले रोगी आणि वेडे यांस स्वसत्ता दिली, तर काय उपयोग ? तद्वत् हे आपले लोक

+ अखबारी— वर्तमानपत्रें.

आहेत. यांस कांही तरी ठाऊक आहे काय ? गर्व मात्र यांचे अवळ आता राहिला आहे. यांची एकत्र ठिकाणीं नांदणूक क्षणभरही होणार नाही.

पाहा, पेशवे, शिंदे, होळकर, भोसले यांच्या आपसांत लढाया किती झाल्या ? वाकडें किती पडलें ? मारामाऱ्या आणि द्वेष किती झाले ? नाना फडणिसास कैदेंत बसविलें कीं नाही ? व शेवटीं राज्य बुडालें की नाही ? जर सर्व एकमत असतें, तर असें न होतें. पेशवे यांचें राज्य शंभर वर्षें होतें. त्या शंभर वर्षांत कोणती सुधारणा झाली आहे पहा ? आणि इंग्रजांनी शंभर वर्षेंच राज्य केलें; पण त्यांत किती सुधारणा झाली ? लोकांस किती शहाणपण आलें ? व पुढे किती येणार ? मागील लोक इंग्रजांचे राज्याचे फायदे जाणत नाहीत. ते म्हणतात की, आम्ही सर्वस्वी भिकार झालों, पैसा गेला, पेशवाईंत थोडे शहाणपणाने पैसा मिळत होता; परन्तु आता तो प्रसंग नाही. म्हणून फार शहाणपण पाहिजे. द्रव्याचें व भोजनाचें एकीकडे ठेवा. आणि फक्त शहाणपणाचाच विचार करा. शहाणपणाचे अंतीं सर्व आहे. आठ दिवस खाल्लें नंतर महिनाभर अजीर्ण झालें तें बरें, किंवा नित्य थोडें थोडें खावें, आणि अजीर्ण न होऊं द्यावें तें बरें ? तद्वत् पेशवाईंतील द्रव्य पुष्कळ अनुभविलें खरें, परन्तु त्याचा परिणाम मूर्खपणाचाच झाला. आता शंभर वर्षें सुख भोगिलें आणि तेव्हा कांही ज्ञानसंपादनाचा व आपलें राज्य नीट चालविण्याचा यत्न केला नाही. म्हणून आता ५०० वर्षें इंग्रजांचे अमलांत रहावें लागेल. आणि आता ५०० वर्षांत जें शहाणपण मिळवूं तें दोन हजार वर्षेंपर्यंत पुरेल. कधी राज्य दुसऱ्याचे हातीं जाऊं देणार नाही. तेव्हा याजवरून इंग्रजांचें राज्य पेशव्यांपेक्षा बरें.

कारण गीतेंत सांगितलें आहे की, जें परिणामीं चांगलें तेंच चांगलें. आदौ* थोडे दिवस चांगलें व पुढे फजिती, त्यास चांगलें म्हणूं नये. तेव्हा आपले लोक जेवणाचे व द्रव्याचे आशेने काय स्तुति करतील ती करोत.

---

* आदौ– आरंभीं; पहिल्याने.

परन्तु इंग्रजांचा अमल हा हंगाम बरा आहे. लोकणस्थ पूर्वी भिकारी होते. व पेशव्यांचे राज्यांत कोणी कांही सुख भोगिलें, परन्तु विचार केला नाही खालें मात्र, शेवटीं दुसऱ्याने तोंडांत मारून नेलें, तेव्हा डोळे उघडले.

तस्मात्, इंग्रजांचे अमलाचा परिणाम चांगला व लोक शहाणे होण्यास खुशी नाहीत, तरी ईश्वर जबरीने करवितो आहे. तुम्ही नको म्हणाल तरी तो ऐकणार नाही. ही त्याची दया मानावी. असा प्रसंग कोठून येणार! ईश्वर दयाळू आहे.

---

पत्र नं० १४ २८ मे १८४८

## राज्यसुधारणा

सांप्रत युरोप-खंडांतील बातमी पत्रें आलीं, त्यांत मुख्य वर्तमान असें आलें की, फरासिसांचे + मुलखांत राज्यसुधारणा झाली, त्यास फ्रेंच रिवोल्युशन× असें इंग्रजींत म्हणतात, व त्याचा अर्थ राज्य-सुधारणा असा होतो.

लोकांमध्ये दंगा, बंड, इत्यादि शब्देंकरून तें प्रकरण समजतात ही चूक आहे. कारण की, तें कांही बंड नव्हे. हिंदुस्थानांतील लोकांस सैर राज्याचे ताब्यांत रहाण्याची सवय आहे, व दुसरे रीतीचें राज्य ठाऊक

+ फरासिसांचे मुलखांत– फ्रान्समध्ये.

× रिवोल्यूशन– राजक्रांति. Revolution [ ही १८४८ च्या फेब्रुआरीची क्रांति. या वेळची (रिपब्लिक) लोकशाही राज्यव्यवस्था १८५१ डिसेंबरपर्यंत टिकली. (जून १८४८– डिसेंबर १८५१) ]

नाही. यास्तव राज्यसुधारणा याचा अर्थ त्यांस समजत नाही. याजकरिता त्याजविषयी मी थोडासा मजकूर लिहितों.

एशिया खंडांतील देशांत बहुधा एक राजा स्वैर असून अंमल करितो. त्याची रयत त्याचे गुलामाप्रमाणे व तिचा नाश नफा करण्याविषयी संपूर्ण मुखत्यारी स्व-इच्छ※ राजास असती. अशा राज्यांत बंदोबस्त कमी असल्यामुळे चार दुष्ट लोक जमा होतात, आणि गरीब रयतेस लुटण्याकरिता व आपले दुस्समान यांचा सूड घेण्याकरिता ते जागोजाग हल्ले करितात. त्याचें नांव बंड. या प्रकारचीं बंडें व तोतये हिंदुस्थानांत पुष्कळ झाले आहेत. मागे पेशवाईत भाऊसाहेबांचा● व यशोदाबाईचा तोतया आणि चतुरशिंग राजा, उमाजी रामोशी, राघु भाग्र्या, पेंढारी, शिंद्याच्या बाया व तेलणी* यांचे दंगे झाले, तीं बंडें म्हणावीं. कारण की, तो चोर व लबाड लोकांचा समुदाय व त्यांचा हेतु रयतेस सुख देण्याचा नव्हता. दरिद्राने ग्रासलेले किंवा कांही एक कारणामुळे चवताळलेले लोक उगेच जमून लोकांचे नाश करितात. मग अर्थात्च लोक त्यांचा द्वेष करून त्यांस मारितात, व फाशी देतात.

परन्तु राज्यसुधारणा हें या रीतीचें बंड नव्हे. व हिंदुस्थानासारख्या देशांत तें व्हावयाचेंही नाही. जा देशांत लोक शहाणे व ज्ञानी व एकमेकांचें सहोदर बंधूप्रमाणे हित पहाणारे असे आहेत, त्या देशांत मात्र अशी राज्यसुधारणा होते. सांप्रत टोपकर लोक शहाणे आहेत व त्यांच्यामध्ये किती एक हितावह व चांगल्या गोष्टी आहेत. त्या आपले लोकांस अद्याप माहीत नाहीत. आपले देशाचें हित करावें हा मुख्य धर्म, असें युरोपांत समजतात. आणि जर कांही अपाय किंवा वाईट वर्तणूक

※ स्व-इच्छ- स्वेच्छ = स्वेच्छाचारी. ● भाऊसाहेबांचा तोतया- सदाशिवराव भाऊंचा तोतया- त्याचें बंड. * तेलणीचे दंगे- वासोटा किल्ल्यावरील नाई तेलणीने केलेलें बंड. ही पंत प्रतिनिधींची रक्षा.

राजाकडून किंवा त्याचे प्रधानाकडून होईल तर लोक बरतर्फ करितात.

ही गोष्ट आपले इकडील लोकांस फार असंभव— व चमत्कारिक वाटेल. कारण की, इकडील लोकांस राजा म्हणजे विष्णूचा अवतार व प्रधान म्हणजे महादेव वाटतो. त्यांणी अन्याय केला तरी म्हणतात की—

"राजा हरति सर्वस्वं तत्र का परिदेवना"

असें आहे, तेव्हा या लोकांस सुधारणा माहीत नाही, परन्तु ज्यास ज्ञान संपादन करण्याची इच्छा असेल त्याणे इंग्लंड देशाचा वृत्तांत काढून पहावा. म्हणजे जानराजा म्हणून होता, त्याजकडून अन्याय झाले, याजमुळे सर्व रयतेने त्याजवर उठून त्याजपासून करार • करून घेतला. तो करार हल्लीपर्यंत चालू आहे हें समजेल. सर्व कायद्याचें मूळ तेंच आहे. पुढे राजा चार्लस▪ याणे पुनरपि अन्याय केले, तेव्हा त्यास रयतेने धरून आणून कैदेंत ठेविलें. आणि त्यास त्याचे वकिलाचा करारनामा दाखविला आणि मोठी न्यायसभा भरून तेथे त्याचा न्याय केला. तेव्हा राजानें अन्याय व लोकांचें अनहित केलें असें शाबीद झालें. नंतर त्यास शिरच्छेद करण्याची सजा झाली. तसाच राजा जेम्स× याणे जुलूम केल्यावरून त्यास पदच्युत करून परदेशास हाकून दिला. अशा गोष्टी तिकडे घडतात. त्या इकडे अनश्रुत आहेत.

जशी राजसुधारणा होते तशीच धर्मसुधारणाही होते. म्हणजे धर्माची व्यवस्था करून वाईट प्रकरणें बंद करितात. अशा गोष्टी हिंदुस्थानांतही घडल्या आहेत. जेव्हा जैनमत झालें होतें तेव्हा कुमारिल भटाने तें मोडून हिंदु धर्म स्थापिला, व किती एक शास्त्रार्थ रद्द करून

बरतर्फ– बडतर्फ– कामावरून काढणें. इंग्लंडचा राजा जॉन (स० ११९९ ते १२१६) •करार- 'मॅग्नाचार्टा'– लोकांच्या हक्कांची सनद, जॉनपासून इंग्रजांनी मिळविली (स० १२१५ जून) ▪राजा चार्लस (पहिला)–इंग्लंडचा राजा (१६२५-१६४९). × जेम्स (दुसरा)– इंग्लंडचा राजा (१६८५-१६८८)

नवे चालू केले. त्याचें नांव धर्मसुधारणा. परन्तु राज्यसुधारणा अद्यापि हिंदुस्थानचे इतिहासांत आढळलेली नाही. कोणी कदाचित् शिवाजी राजाच्या प्रकरणास राज्यसुधारणा म्हणतील व मलाही वाटतें की, तें राज्यसुधारणाच होय. कारण जरी केवळ राज्यसुधारणेच्या हेतूने शिवाजीने मोगलांशीं युद्ध करण्यास आरंभ केला नाही, तरी त्याचें स्वाभाविक कृत्य त्या स्थितीवर गेलें. व मराठ्यांचें व सर्व हिंदु लोकांचें राज्यसम्बन्धी महात्म सरासरी पांचशे वर्षेपर्यंत मुसलमानांनी बळकावलें होतें तें पुनरपि हिंदु लोकांचें हिंदु लोकांकडे शिवाजीचे कृत्यामुळे आलें. तस्मात् ती "रिवोल्युशन" म्हणावी. त्यानंतर मग शिवाजीचे पाठीमागे तसा सद्बुद्धिवान् पुरुष न झाल्यामुळे तें कार्य तसेंच राहिलें, व मुलूखही इंग्रजांचे हातीं गेला. तथापि शिवाजी राज्यसुधारक म्हणावयास योग्य आहे, यांत संशय नाही. असो.

आता फराशिसांचे मुलखांत असें झालें की, राजा रयतेस पीडा करूं लागला व विनाकारण खर्च करून रयतेकडून नाना प्रकारचे कर वगैरे बसवून पैका घेऊं लागला. तेव्हा पारीस म्हणून फ्रॅंचाची राजधानी आहे, व तेथे मोठमोठाले विद्वान् लोक आहेत. त्यांणी संपूर्ण रयतेस त्रास आला आहे, असें जाणून तेथे एक युद्धविद्या शिकविण्याची शाळा आहे, तेथील विद्यार्थी वगैरे लोक मिळवून राजवाड्यावर गेले व तेथे फौजफाटा होता त्यांस सांगितलें की, आम्ही राज्याची सुधारणा करावी व आपल्यास स्व-इच्छ राजापासून सुख होत नाही, यास्तव लोकसत्तात्मक राज्य करावें यासाठी झटतों. आमचा हेतु इतकाच की, सर्व लोकांस सुख व्हावें व ज्याचे त्याचे हक्क कायम रहावे; आम्ही लुटणारे नव्हत; व आम्हांस कांही नको. हें ऐकून ती फौज त्यांस वश झाली आणि त्यांचेबरोबर गेली. मग ते सर्व लुईस फिलीप राजास हस्तगत करणार तों तो स्त्रीसहित धाकाने पळून गेला. मग मागे शहरचे लोकांनी वाडा घेऊन सभा भरवली व असें ठरविलें की, आजपासून रयतेचें राज्य रयतेने करावं. व त्याप्रमाणे नऊशें

आसामी सभेत बसण्यास मुकरर केलें. आणि राजाचे असबाबास+ कांही हात लाविला नाही. राजाचे कोठींत जे मोहोर केलेले कागदे सापडले तेही ज्यांचे नांवावर होते त्यांजकडे पाठवून दिले. असें मर्यादेनें ते लोक चालले. हल्ली फ्रँचाचे राज्यांत लोक राज्य करतात, हें पाहून दुसरे टोप-कराचे मुलुख म्हणजे अमेरिका व सुइजरलंड× वगैरे यांणींहि आपले देशांत लोकांचें राज्य स्थापन केलें. फ्रँचाचे देशांत ज्या वेळेस राजास काढून टाकिलें तेव्हा फौजेमध्ये बोनापार्ट ＊ म्हणून एक नामांकित सरदार होता त्याणे जय पुष्कळ मिळविले व त्यास राज्याचा लोभ उत्पन्न होऊन त्याणे राज्य बळकावलें, तेव्हा इंग्रजांनी वेलसली साहेब म्हणजे ड्यूक वेलिंगटन यास पाठवून त्यास कैद करून टाकलें आणि पूर्वीचे राजाचा वंशज बसविला; परन्तु हल्ली फ्रँचांचे राज्यांत हात घालूं नये असा निश्चय इंग्रजांनी केला आहे; कारण संपूर्ण लोकांचा एकोपा ठरला की, राजा नसावा आणि प्रजा एकत्र होऊन राज्य चालवितात व इंग्रजांचीं स्पर्धाही करीत नाहीत. त्यापेक्षां आपल्यास बोलण्यास कांहीच अरूर नाही, असें इंग्रजांनी ठरविलें आहे व इंग्रजांचे कांही जिल्ह्यांत दंगे झाले आहेत; परन्तु ते मोठे नांहीत. किती एक मोडले, त्याचेंही कारण हेंच की, राजाकडून कांही जुलूम जास्ती होऊन लोक त्रासले असें पाहून पुनः त्यांचें सांत्वन करितात व वाईट कायदे व कर बंद करितात, म्हणजे बंदोबस्त होतो. असें त्यांणी अद्याप शहाणपणाने राज्य चालविलें आहे.

---

+असबाब– सामानसुमान. ×सुइजरलंड– स्वित्झर्लंड. ＊बोनापार्ट– नेपोलियन बोनापार्ट- फ्रान्सचा लोकप्रिय सेनानीः पुढे राजा झाला. (मृ० १८२१).

पत्र नं० २५

# राज्यसुधारणा

सांप्रत हिंदुस्थानांतील लोकांस अज्ञानदशा आहे, याजमुळे राजा कोण आहे व व्यवस्था कशी आहे, तें कळत नाही. ज्यास खावयास आहे, त्यांस आपल्यासारखे सर्व श्रीमंत आहेत, असें वाटतें पटवर्धन जहागीरदार यांचे प्रांतांत जे रहातात, त्यांस असें वाटतें की, पृथ्वीचे चक्रवर्ती राजे पटवर्धनच आहेत व ते चिरकाल नांदतील. शिंद्यांचे राज्यांत आहेत, त्यांसही असेंच वाटतें. जे पेशव्याचे अंमलांत पुण्यांत रहात होते, त्यांस असेंच वाटत होतें, आणि एक एक राज्य जात चाललें, त्याचा कोणास ठिकाण नाही. सर्व आपले ठिकाणीं धुंद आहेत.

इंग्रेज कोठून आले आहेत व ते आपल्यावर राज्य कोणत्या रीतीने करतात व त्यांचे मुलखांत राज्य कसें चालतें, हें कोणास ठाऊक नाही. लोक मूर्खपणांत राहून भिकारी होत चालले व अज्ञान-रोगाने ग्रस्त होऊन मरावयास टेकले. त्यांस औषधें कशाचीं ? स्वदेशीय राजधानींतील लोकांस आम्ही कांही म्हणत नाही; कारण त्यांची निद्रा कुंभकर्णासारखी आहे. जरी आम्ही त्यांचे कानाशीं नौबती वाजविल्या तरी ते जागृत होणार नाहीत; घोरत असतील व जेव्हा त्यांस कोणी येऊन लाथ मारील, तेव्हा ते जागे होतील. असो. परन्तु गतश्री+ जे लोक झाले आहेत, त्यांस सांप्रत-काळचे राज्यामुळे अडचणी किती आहेत, याची माहिती असेल. पुण्या-सारखीं वडतीं शहरें व तुच्छ मानलेली जात-ब्राम्हणासारखी, त्यांतील लोकांस माहिती असेल की, आपला देश निर्धन होत चालला आहे. याचा विचार करणें सर्वांस उचित आहे. आणि मुलखाचें दरिद्र काढावयाचा

---

+ गतश्री – नष्टवैभव; ज्यांचें वैभव नाहीसें झालें आहे ते.

उपाय करणें, तर आधी राज्य सुधारलें पाहिजे. उत्तम रीतीने राज्य चालावें, अशी कांही तरी युक्ति निघाली पाहिजे.

मी जाणतों की, लोक मूर्ख आहेत. याजमुळे त्यांस याचा विचार करण्यास शक्ति नाही, तत्रापि कांही उपाय मला सुचला आहे, तो मी लिहून प्रगट करितों. हल्ली हिंदुस्थानांत बहुतेक राज्य कंपनी–सरकाराकडे आहे व लोकांस राज्यांत कांही अखत्यार नाही. इंग्रजांचे स्वदेशीय राज्यांत पाहिलें तर तसें नाही. तेथील लोकांस राज्यांत हात घालण्याचा व कायदे करण्याचा अधिकार आहे. विलायतेंतील राजा जडजाचे× आज्ञेप्रमाणे आहे. जेव्हा लोकांची सभा म्हणजे पार्लिमेंट हे कायदे फर्मावितात, तेव्हा राजा त्याबरहुकूम वहिवाट करितो. दर वर्षास राजाचे खर्चास पैसा पाहिजे, तो लोकांस मागील सालचा हिशेब देऊन पुढे पैसा वसूल करण्याची परवानगी घेतल्यावर त्यांचे हुकमाप्रमाणे कर व ,भारे वसूल वसूल होतो. येणें करून जसें लोकांस पाहिजे तसें राज्य चालतें. एक राजा स्वइच्छेने राज्य करतो, त्यापेक्षा ही युक्ति बरी आहे व याप्रमाणे हिंदुस्थानांत राज्य चालेल, तर फार चांगलें होईल. जे सूज्ञ लोक असतील, त्यांस मोठे जाग्यावर व अधिकारावर नेमतां येईल, असें इकडे राज्य असावें.

सन १८३४ सालीं कंपनीची सनद २० वर्षांची बहाल झाली, त्या समयीं या गोष्टीचा विचार पडला होता. कित्ती एक विलायतेंतील दयाळू लोक यांनी सांगितलें की, इंग्रज लोकांचें राज्य ज्या रीतीने चालतें, त्याप्रमाणे हिंदु लोकांचें चालावें, तेव्हा कंपनी सरकारने अशी शाबिती @ केली की, हिंदु लोक मूर्ख आहेत, त्यांस पार्लमेंट म्हणजे काय हें ठाऊक नाही. याजमुळे तेथे असें राज्य बसविल्याने घमेला मात्र होईल आणि सर्व बेबन्द होईल. पार्लमेंटांत बसणारे लोक मोठे शहाणे पाहिजेत; त्यांचें

×जडज–जज; न्यायाधीश (Judge) @शाबिती केली–सिद्ध केलें; पटविलें.

मनांत लोकांचें हित नेहमी वागलें पाहिजे, तेव्हाच ती सभा नीट चालेल. त्याप्रमाणे पार्लमेंटांत बसावयास सर्व हिंदुस्थानांत एकही योग्य मनुष्य मिळावयाचा नाही, ही मोठी अडचण आहे. याजमुळे विलायतेंतील बादशहाने कंपनी–सरकारची सनद कबूल करून वीस वर्षेपर्यंत कमाविशी कायम केली.

तीं वीस वर्षें सन १८५४ नांत भरतात. तेव्हा अजून ६ वर्षांचा अवकाश आहे. इतक्यांत किती एक लोक शहाणे होतील व हल्ली किती एक शहाणे सापडतील; याजकरिता आजपासून सर्व गरिबांनी व श्रीमंतांनी एकत्र होऊन विलायतेंतील राणीसाहेबांस तपशील-वार एक अर्ज करावा की, हल्ली राज्यपद्धति आहे, तीपासून आमचा फायदा नाही व आमचे राज्यासम्बन्धी हक्क चालत नाहीत व हिंदु लोक जसे, तसेच इंग्रज लोक मनुष्यें आहेत. याजकरिता इनसाफ बरोबर होण्याकरिता सर्व इंग्रज व नेटीव लोक यांमध्ये सांप्रत मोठा भेद आहे, तो मोडून एकसारखे होण्याकरिता हिंदुस्थानचे देशांत पार्लमेंट ठेवावें व ही मोठी सभा मुंबईस भरावी. आणि तेथे दर एक शहरांतून व दरएक जिल्ह्यांतून दोन दोन असामी घेऊन त्या सर्वांस कौंसलांत बसवून गवरनराने त्यांत मुख्य असावें व जे लोक दर जिल्ह्यांतून आणावयाचे ते सर्व जातींतील सारखे असावे. दर जिल्ह्याचे माजिस्टेट साहेबांकडून दवंडी पिटवावी की, राज्याचा विचार चांगले रीतीने होण्याकरिता संपूर्ण लोकांनी विचार करून दोन शहाणे मुखत्यार नेमावे व त्याप्रमाणे नेमिलेले सर्व लोकांनी हजर व्हावें. हे लोक बोलणारे, चतुर व मुत्छद्‌गिरी केलेले असावे; कारण हे राज्याचे हिस्सेदार आहेत. केवळ शिरस्तेदार, मुनसफ व मामलेदार नव्हत व या लोकांत भट, गृहस्थ, शास्त्री, परभू, कुळंबी, मुसलमान, इंग्रज इत्यादि जे शहाणे दिसतील, ते नेमावे व त्यांनी राज्य चालवावें, म्हणजे लोकांचा फार फायदा होईल.

याप्रमाणे अर्जी करून, विलायतेस दहापांच असामी प्रयत्न करण्याकरिता नेमून, त्यांजबरोबर ती पाठवावी म्हणजे आपले लोकांचा कांही उदयकाळ होईल. नाही तर हे असेच किती एक वर्षेपर्यंत रहातील. याकरितां जे लोकांचें हित पहाणारे आहेत, त्यांनी हा बेत केला पाहिजे. म्हणजे दरिद्र वगैरे बोभाट लोक सांगतात, हे त्वरित दूर होतील. आणि इंग्रज लोक इकडील लोकांस मूर्ख असें समजतात, तेंही मत मोडेल आणि राज्याची उत्तम प्रकारची सुधारणा होऊन एके राजाचे अमलांत सुख काय व लोकसत्तात्मक राज्यांत सुख काय, हें सहज दृष्टोत्पत्तीस येईल. असें सरकार झाल्याने मग शिंद्याचें किंवा हैदराबादचें राज्य चांगलें कीं काय, हें त्वरित ध्यानांत येऊन चांगलें राज्य चालविण्याचे रीतीची माहितगिरी सर्व लोकांस होऊन बहुधा हें उदाहरण पाहून सर्व दुसरीं राज्येंही याचप्रमाणे होतील व येणेंकरून एका राजाचे ताब्यांत राहून त्याचा जुलूम सोसावयाची जी खोड हिंदु लोकांस लागली आहे, ती ते विसरून जातील. राज्य करण्यास गरीब व मातबर, नीच जातीचे व उंच जातीचे लोक समान मानावे, हें सर्वांस कळूं लागेल. अशा सभेंत जातीविषयी निवड नको, हें वर सांगितलेंच आहे. जे फार विद्वान् व चांगले चालीचे लोक आहेत, तेच नेमले पाहिजेत. मग त्यांची कोणतीही जात असो, परन्तु ब्राम्हणांस गर्विष्ठपणा फार आहे, याजकरिता ती जात फार थोडी असली पाहिजे.

सदाशिवराव भाऊ पेशवे हे स्वारीस गेले, तेव्हा लढाईचा विचार करण्याकरिता मराठे, मुसलमान व ब्राम्हण सरदार बसत; परन्तु ते इतरांस तुच्छ मानीत. शेवटीं त्यांचा गर्विष्ठपणाचा त्रास होऊन होळकर म्हणूं लागला की, या बामणाचा गर्व हरण झाला तर बरें होईल. शेवटीं अज्ञानेच सदाशिवराव भाऊंनी सर्व फौज बुडविली व आपणही बुडाले.

याचप्रमाणे नाना फडणीस यांचा स्वभाव सर्वांस माहीत असेलच.

त्यांनी आपले गार्विष्ठपणानेच इतर लोकांस तुच्छ मानिलें. यांचे पुराणांत वगैरे ब्राम्हण म्हणजे देव, असें म्हटलें आहे, त्या समजुतीवर ते जातात. त्यांस अद्याप इतर लोक व आपण सारखेच आहों, हें कळलें नाही. ईश्वरेच्छेने लवकरच कळेल.

---

पत्र नं० ३२ २२ आक्टोबर १८४८

## लाच

इंग्रज लोक हल्ली हिंदुस्थानांत राज्य करितात. हे सामान्यतः इकडील लोकांपेक्षा शहाणे, विद्वान्, ज्ञानी, माहितगार व निष्कपटी आहेत. परन्तु शेकडा पांच या सुमाराने त्यांत वाईटही असतात. तसेंच जे चांगले आहेत, ते तरी सर्व कामें करूं शकत नाहीत. कारण एकटा मनुष्य, त्यास दोन हात. तेव्हा त्याने कितीही काम केलें तरी तो थोडेंच करील आणि त्याचे पाठीस डोळे नसतात. याजमुळे त्याचे हाताखालचे लोक चांगले सज्जन असल्याखेरीज सर्व कामें चांगलीं चालणार नाहीत व इकडील लोक लबाड म्हणून जरी प्रसिद्ध आहेत, तरी ते इंग्रजांस राजकीय कारणास्तव आणि अडचणीमुळे पुष्कळ ठेवावे लागतात. या लोकांची वर्तणूक फार वाईट म्हणून लोकांचे फार नाश होतात, व दिवसानुदिवस त्यांवर भरंवसा कमी राहतो.

हिंदु लोक लाच खातात, याचा संशय नाही. कंपनी सरकारचे चाकरांत हजारांत लाच न खाणारा व ईश्वरास भिऊन चालणारा क्वचित् असतो. बाकी सर्व शिपायांपासून प्रिन्सिपाल सदर अमीनपर्यंत शपथेचा व्यभिचार करितात. याचें कारण असें आहे की, या लोकांस ज्ञान आणि धर्म नाही हें एक; आणि दुसरें इंग्रज लोकांस हिंदू लोकांची परीक्षा करितां येत नाही.

त्याजमुळे लोजरशाही कामावर यथायोग्य गुणाने योजना होत नाही. हिंदू लोक जरी मूर्ख आहेत, तरी त्यांत निवड केली, तर चांगले शहाणे व ईश्वरास भिणारे असे कांही कांही सांपडतील; परन्तु सरसकट नेमणुका करितात; याजमुळे वाईट लोक पुष्कळ अधिकारावर येतात. जर असा ठराव केला की, इंग्रजी विद्या शिकलेले लोकांस कामावर नेमावें, तर लांचाचा कांही बंदोबस्त होईल. मोठे शास्त्री जरी असले, तरी त्यांचाही उपयोग नाही, कारण मीं एका शास्त्र्यास प्रश्न केला की, 'लांच घ्यावा किंवा नाही?' त्याने सांगितलें की, 'लांच खाणें हा न्यायाधिशाचा धर्म आहे, परन्तु खरा असेल त्याजपासून घ्यावा, असें शास्त्र आहे.' तेव्हा हिंदू लोकांचे शास्त्राचा या गोष्टीस कांही प्रतिबंध नाही. फक्त कायदा मात्र प्रतिबंध करतो, परंतु कायदा चुकविण्याचें सोपें आहे. ज्या पुरुषाचे मनांत ईश्वराचो निर्भार नाही, त्यास कायदा दिला तरी तो लांच खाल्ल्यावाचून रहाणार नाही. तेव्हा हिंदू लोकांचें मनच फिरलें पाहिजे. ही गोष्ट वाईट, असें त्यांस पक्कें समजल्यावाचून लांचाचा प्रतिबंध होणार नाही.

जरी इंग्रजांनी भगीरथ प्रयत्न केला, तरी हे लोक लपून छपून लांच खातात, हें जगप्रसिद्ध आहे. आणि वास्तविक पाहिलें, तर जो मनुष्य मुनसफाचें काम करितो, तो वेतनाइतका खर्च टेकून पांच वर्षांत दहा हजार रुपये जवळ करितो. तसेंच शिरस्तेदार आपले सर्व वेतनाइतका किंबहुना जास्तीच खर्च करून सालांत पांच हजार रुपये जवळ करितात. तसाच नाझरही सालाचे पांच हजार रुपये मिळवतो. सामान्य कारकूनही दहा वर्षें काम करतो, तर तो दोन हजार रुपये जवळ करितो. तसेंच चपराशी पगाराचे दुप्पट मिळवितात. फौजदार व मामलेदारही याजप्रमाणे; जर बारीक शोध केला, तर ही सर्व बातमी लागते. आणि जरी जड्‌ज किंवा कलेक्टरसाहेब प्रमुख असतात, तरी त्यांचा इलाज चालत नाही. पहा! एक मनुष्याने हुकुमनामा बजावण्यास नेला, तर पहिल्याने शिरस्तेदाराचें आर्जव करावें लागतें. त्याशिवाय साहेब कांही करीत नाही. तेव्हा लोक त्यांची पूजा करून नंतर हुकुम घेतात, तो जर

करणारा कारकून याजवळ देतात. तेव्हा शिरस्तेदार व कारकून एका मताचेच सिद्ध साधक असतात. ते त्यास तसदी देत नाहीत की, अमक्याचें काम ज़रूर करावें. तेव्हा त्या कारकुनास चार आणे द्यावे, तेव्हा तो बार करून मालकाजवळ देतो. मग मालक नाझराकडे जातो. तेव्हा नाझर म्हणतो की, 'आता मजजवळ शिपाई नाही. जा, पाहिजे तर साहेबांस सांगा.'

तेव्हा सावकार तर एक वेळ खर्च करून साहेबाकडून आला असतां, तो पुनः जाईल, तर दाद लागणार नाही. आणि जर नाझरावर फिर्याद करील तर साहेब म्हणतो की, "अरे, अमलदारावर हा फिर्याद करितो ! त्याची शपथ घ्या आणि बसवून ठेवा." अशी त्याची तिकडे शोभा होते. तेव्हा कांही खर्च पडेल तो करावा हें ठीक, असें समजून नाझराची मूठ भरतो. नंतर सर्वांची पंचोपचार पूजा करून शेवटीं शिपाई जप्तीस मिळतो. तो मिळाला की, म्हणतो 'दादा, रामराम. आपणांकडे नेमणूक झाली, देवाने केलें. असें फूळ मिळालें म्हणजे आपल्यास काय कमी ?' आठचार आणे त्यास द्यावे, तेव्हा तो बरोबर काम करतो. नाही तर कुळाकडे जाऊन अगोदर बातमी लावून माल पळवितो. पुढे माल जप्त केला, तो लिलाव होईपर्यंत याचप्रमाणे खर्च पडतो. शेवटीं रुपये आले म्हणजे तरी लवकर पदरीं पडत नाहीत. नाझर म्हणतो, 'जाऊं द्या, या पहिल्या तारखेस.' तेव्हा उत्तरपूजा करावी लागते. शेवटीं पन्नास रुपयांचा दावा असला तर चाळीस रुपये खर्च होतो. मग त्या सावकाराने म्हणावें,'अरे, रुपये नाही आले तर नाही,बुडाले तर बुडाले; परन्तु कूळ पैसा देत नव्हतें, त्याची तर खोड मोडली ?' एवढा मात्र आनंद मानून बसतात.

तेव्हा या रीतीने रयतेची किती खराबी होईल बरें ? या प्रकारें इंग्रजांचा दरबारांत न्याय चालला आहे. छापी कागद, वकील, मुनसफ लूट करतात. हुकुमनामा झाला, तरी सदरीं लिहिल्याप्रमाणे व्यवस्था होते. कित्येक लोक असे आहेत की, शंभर रुपयांची फिर्याद करितात, तींत चारसें रुपये खर्च करितात. व शिवाय आर्जवें व नित्य खेपा. आपला रोजगार-

धंदा सोडून कज्जाचे पाठीस लागतात. याजमुळे बेजार झाले आहेत. असा अनर्थ सरकारी कामदार करितात. जा तऱ्हेने पैसा काढून आपला नफा करितात, रयतेची दया किंवा ईश्वराचें भय किंवा धर्माचा प्रतिबन्ध किंवा मनाची लज्जा किंवा परलोकाची काळजी किंवा अमू हे काही एक मनात आणीत नाहीत. तेव्हा व्यापार आणि व्यवहार व देणेंघेणें कसें नीट चालेल? इंग्रेज तर या गोष्टीस वाकब असे थोडेच आहेत? कांही कांही पुरते आहेत, परन्तु त्यांचा तरी उपाय चालत नाही.

यास एवढाच उपाय आहे की, चांगले लोक पाहून अधिकारावर ठेवावे. अधिकारावर ठेवणें याची फार चौकशी करून लोकांची निवड करावी व त्यांचे गुणाचा विचार करावा, आणि लाच न खाणारे आणि इंग्रजी जाणणारे आहेत व जे फार विद्वान् आणि विचारशील आहेत त्यांस ठेवावें, तरच त्याचा बंदोबस्त होईल. नाही तर कदापि होणार नाही. मोठा शहाणा साहेब असला, तरी तो काय करील? मराठी अर्जी असली तर ती वाचावयाला शिरस्तेदार पाहिजे; हुकुमनामा बजावण्यास नाझर पाहिजे. शिपाई कारकून पाहिजेत. अव्वल कज्जे फैसल करण्यास मुनसफ पाहिजेत. त्याशिवाय चालणार नाही. परन्तु त्यांची वाईट वर्तणूक असली तर साहेब काय करतील?

हल्ली लोकांस असें वाटतें की, इंग्रजांचा रोजगार करून पैशास भय नाही व बरकत नाही; म्हणजे उघड लाच घेतां येत नाही, परन्तु वास्तविक पाहिलें तर बरकत असेल कशी? "हपापाचा माल गपापा जातो," अशी म्हण आहे. हे लोक शपथ खाऊन पैसा मिळवितात. तो पैसा राहील कसा? त्यांनीच शिक्षा पावून तुरुंगांत शृंखला—बंधनांत असावें, ही त्यांची योग्यता असते, परन्तु कित्येक लोकांची ही अप्रतिष्ठा चुकते, हेंच त्यांचें पुण्य म्हणावें. त्यांचें कल्याण होईल कसें? जरी कोणी म्हणवितो की, मीं पन्नास वर्षें व चाळीस वर्षें व तीस वर्षें व वीस वर्षें चाकरी केली, माझी सरकारने प्रतिष्ठा वाढवावी; पण त्यांनी आपल्या मनांत विचार करून पाहिला तर समजेल की, कोणत्या धर्मानें आम्हीं चाकरी केली? सरकारास

फसविलें, रयतेस लुटलें, लबाड्या केल्या, त्यांत कोणाचें मीं चांगलें केलें ? जास शिक्षा होते, तो तुरुंगांत जातो. जे रहातात ते म्हणतात की, आमची योग्यता हीच आहे; परन्तु चालेल तितके दिवस करून घ्या. पुढे काय होईल तें पाहूं ? असेंही लोक म्हणतात; परन्तु त्यांची वास्तविक योग्यता पाहिली, तर जे लाचाकरिता तुरुंगांत आहेत, त्या कैदींची योग्यता आणि जे कोर्टांत मोठे अब्रूचे लोक म्हणून बसून न्याय करितात व अमलदारी करितात, त्यांची योग्यता यांत काय अंतर आहे ? जा दिवशीं सापडतील त्या दिवशीं यांचीही गति तीच होणार. याजमुळे सरकारी अमलदाराची योग्यताही लोकांत नसते. ते कामांवर असतात, याजमुळे चार लोकांस त्यांजवळ जाणें जरूर पडतें; परन्तु त्यांची योग्यता प्रसिद्ध असते.

जरी हिंदु लोक हुशार आहेत, तरी या दुर्गुणाने त्यांची माती झाली व अब्रू गेली. याची कोण लाज बाळगीत नाही. कामावरून गेलें म्हणजे त्यांचेकडे कोणी पहात देखील नाही. कारण की त्यांची योग्यता सर्वांस ठाऊक असते. जर पुरुषास खरी प्रतिष्ठा असली, तर ती त्याची चाकरी गेल्याने कमी होत नाही व द्रव्य आलें गेलें, तरी त्याने त्याची अब्रू कमी होत नाही. ती शाश्वत अब्रू; परन्तु हे लबाड लोक जी अब्रू मिळवितात,ती मुलाम्यासारखी. ही टिकावयाची नाही. जे लोक लाच देतात, ते तरी मूर्खच असतात. जर सर्वांनी कट केला की, सरकारचे अमलदारास लाच द्यावयाचा नाही,तर त्यांची खोड जाईल; पण असे चांगले कट करण्यापुरतें शहाणपण जर या लोकांत असतें, तर मग राज्य कां जातें बरें ?

हे लोक फार मूर्ख आहेत, याजमुळे असे प्रकार यांजमध्ये आहेत व इंग्रज तर पक्के लोक आहेत. ते म्हणतात की, आपआपल्यांत हे लोक लुटून खातील, तर आमचें काय गेलें ? आमची तितकी चांगलेपणाची प्रशंसा वाढेल. हेंही खरें की, साहेबलोकांस लोक चांगले म्हणतात व नेटीव कामगारास बहुधा वाईट म्हणतात; परन्तु आता सुधारलेले व सुशिक्षित लोक सरसावत चालले आहेत. ते इंग्रजांची बरोबरी करतील, यांत संशय नाही.

# इंग्रजी राज्यापासून लाभ

सांप्रत किती एक लोक असें म्हणतात की, इंग्रजांचें राज्य हिंदुस्थानांतून जाईल तर चांगलें, परन्तु आम्हांस वाटतें की, इंग्रजांचे राज्यापासून बहुत लाभ आहेत.

प्रथम लोकांचें मत असें आहे की, या सरकारांत कोणास बहुमानाची जागा मिळत नाही, हें तर सामान्यतः खरें आहे; परन्तु ही गोष्ट स्वाभाविक उत्पन्न जहाली आहे. परकी लोकांवर भरवसा कमी; परन्तु उभयतांचे तर्फे अधिक माहिती होईल तेव्हा विश्वास पटेल. व्यापाराचे बाबतींत इंग्रज लोक इकडील लोकांपेक्षा विशेष शहाणे आहेत, तेव्हा पदार्थ करून ते इकडे स्वस्त विकावयास आणितात. तेव्हा याचा शब्द त्यांजकडे नाही; परन्तु कांही दिवसांनी हेच लोक त्यांच्या विद्या घेऊन त्यांचेप्रमाणे माल उत्पन्न करतील व काचा, घड्याळें, सुऱ्या, कातऱ्या, कापडें वगैरे जिन्नस इकडे न होतील, असें नाही.

परन्तु प्रस्तुत लोक आळशी, याजमुळे देश भिकारी जाहला हें खरें. दुसरा उपाय असा की, जर या लोकांस परदेशांत जाण्याचा अटकाव नसता, तर आजपर्यंत यांणी किती एक देश व किती एक ठिकाणें पाहून तेथील ज्ञान, शहाणपण, रीति, कलाकौशल्य इत्यादि इकडे आणलें असतें, परन्तु लिहिणारे-वाचणारे जे ब्राह्मण त्यांची नजर दक्षणा, समाराधना, भोजनावळी यांजवर, कारण "ब्राह्मणो भोजनप्रियः" तेव्हा घरांत आळस, बाहेर मनाई. अशा दोहोंकडून यांस अडचणी, तेव्हा याचा दोष कोणावर बरें? बरें, मोठ्या मोठ्या जागा इकडील लोकांस आता नाहीत, असा अभिप्राय बहुत लोकांचा आहे. त्यास पहा बरें, इंग्रज लोक इकडे आले, त्यांचे देशचे

## दुनियेची रीत अशीच

हजारो लोक इकडे लढाईंत मेले. व इतके दुरून ते येथे आले, त्यांस लाभ कोणता असावा? जर त्यांणी आपले लोकांचें महत्व राखूं नये,तर मग त्यांस लाभ काय? कोणी कांही काम करतो, त्यांत लाभ पहातो. दुनयेची रीति अशीच आहे. जर हिंदु लोक शहाणे असून, धैर्य करून परकी देशांत राज्य संपादन करते, तर असेच करते किंवा याहून अधिक करते, याचा विचार करावा. म्हणजे इंग्रजांची वर्तणूक कशी आहे, हें ध्यानांत येईल.

जेव्हा मराठे लोक शिंदे, होळकर, परमुलखांत (म्हणजे त्यांचे समजुतीप्रमाणे परमुलुख परंतु वास्तविक पाहिलें, तर मुलूख एकच) गेले, तेव्हा त्यांची वर्तणूक कशी होती? किती गाव ते जाळीत होते? दरसाल ते खंडणी किती घेत होते? शहरें व सावकार किती लुटीत होते? या गोष्टीचें स्मरण ठेविलें, तर इंग्रज बरे आहेत असें लक्षांत येईल. हे लोक सुधारून मूर्खपणाचे शृंखळेपासून मुक्त व्हावे, याजकरिता त्यांचा उद्योग बहुत चालला आहे. आपली विद्या ते पसरीत आहेत. शिकणारास उत्तेजन देतात.

जे लोक इंग्रजांशीं संबंध ठेवितात त्यांस बहुधा ठाऊक असेल की, इंग्रज साधारणतः इकडील लोकांपेक्षा अधिक काम करणारे, मेहनती, शहाणे हुशार, खरे व प्रामाणिक आहेत. इकडील लोक त्याप्रमाणे नाहीत. शंभर इंग्रजांत पांच लबाड असतात; परन्तु १०० हिंदू लोकांत पांच प्रामाणिक असतात. तेव्हा याजकडे मोठे अधिकार दिले तर लोकांची स्थिति नीट रहाणार नाही. जे गुण राज्यकर्त्यांमध्ये असावे ते हिंदु लोकांमध्ये नाहीत. राज्याची पद्धति त्यांस ठाऊक नाही.आजपर्यन्त ब्राम्हण लोकांनी राज्य कधी केलें नाही. हा एवढाच १०० वर्षे पेशवाईंत काय तो दिवा लागला. तद्वत् मराठे यांनी कधी राज्य केलें नाही.

पूर्वी क्षत्रिय लोक राज्य करीत होते. ते तर आता नाहीत. तेव्हा राज्यकर्त्यांचीं शहाणपणें या लोकांस आल्याखेरीज कांही उपयोग नाही. हे लहान पदवीवर आहेत, हेंच बरें! कारण जेव्हा शिंदे व होळकर लक्ष्मीचे अंधःकारांत होते, तेव्हा त्यांनी ५०००० पेंढारी लुटायाचे कामावर ठेविले

होते. त्यांचे निर्मूळ इंग्रजांनी केलें. जे राज्य कारितात, तेच लुटारू लोकांस बाळगतात, हें कधीं कोणी ऐकलें होतें काय ? जे राजे चोरांचें रक्षण करितात आणि लुटारू लोकांस बाळगतात, त्यान्चें वर्णन काय करावें ? तद्वत् दक्षणेंत रामोशी व भिल्ल वगैरे वाटपाडे लोक होते. त्यांस राजेच सामील होते व लोकांस लूट करण्यास त्यांस परवानगी देत होते; परन्तु या राजांनी त्या लोकांस सुधारावयाचा यत्न कधींच केला नाही. ब्राम्हणलोक हे स्वहिततत्पर, गर्विष्ठ व कृत्रिमी आहेत, असें दिसतें; कारण ते लोक, नीच आहेत त्यांचे सुधारणेचा यत्न करीत नाहीत.

त्यांस असें वाटतें की, आम्हांस ईश्वराने थोर निर्माण केलें आणि दुसऱ्यांस ईश्वराने नीच निर्माण केलें आहे; परन्तु हें मत खोटं आहे; कारण ईश्वराने सर्व मनुष्यें सारखीं निर्माण केलीं आहेत. तेव्हा ईश्वरकृपेने किंवा काळगतीने जे थोरपणास चढतात, त्यांणी आपल्याहून जे नीच त्यांस सन्मार्गास लावण्याचा प्रयत्न करावा, हाच सद्धर्म आहे. परन्तु ब्राम्हणांचे समजुतीस हें विरुद्ध आहे. जर ब्राम्हणांनी कैकाडी, कामाठी, रामोशी इत्यादि लोक पाहिले, तर त्यांचा द्वेष करितात. हलालखोर पाहिला तर त्याची निंदा करितात; परन्तु त्यांस असें वाटत नाही की, प्रत्येक माणूस आपला आपणच हलालखोर आहे कीं नाही? जेव्हा जें काम जो मनुष्य आपलें आपण करतो. तेंच जो मनुष्य फार वेळ करतो, तर तेवढ्यांतच तो त्यापेक्षा नीच कसा ? वास्तविक विचार पाहिला तर हे अभिमान आहेत इतकेंच. वास्तविक पाहिलें तर कैकाडी लोक हे सुधारल्याच्या अंगीं ब्राह्मणांसारखे शहाणे होतील, हें खचित आहे. परन्तु त्यांस नीच मानून अगदी टाकावें, त्यांची दया करूं नये, हें योग्य नाही. त्यांस मनुष्य समजून, ब्राम्हण, आंधळा अथवा नीच जातीचा आंधळा असला, तरी धर्मास सारखाच आहे.

ब्राम्हण विद्येने थोर, तर त्याप्रमाणे जे ब्राम्हण वेद अर्थसहित पढतील, त्यांचा मान करणें योग्य आहे; परन्तु हे आतासारखे 'पोपटमट' कैकाड्यासारखेच ज्ञानशून्य आहेत, यांत कांही संशय नाहीं! इंग्रज लोकांनी हिंदु लोकांस

स्थितीवर आणण्याचा बहुत यत्न चालविला आहे व देशांत स्वस्थता केली. चोर, लुटारू नाहीसे केले. हे त्यांचे मोठे उपकार आहेत. किती काळ जरी ब्राम्हणीराज्य चालतें, तरी सतीबंदी होती ना, पेंढार मोडतें ना व बालहत्या बुडती ना. पहा बरें, पोरें बेलाशक मारीत होते. कोणी नवसाचीं पोरें टाकीत होते, कोणी मारून टाकीत होते. या प्रकारच्या चाली होत्या. कोणी स्त्रियांस जाळून टाकीत, कोणी जिवंत पुरीत. कोणी गळयांत दगड बांधून बुडवीत. हें सर्व मूर्खपण कधी तरी हिंदु लोकांचाने बंद करवलें असतें काय? नाही.

अद्यापि पुनर्विवाहाविषयी किती एक प्रयत्न करितात, परंतु पहा, कोणी त्याचा स्वीकार करीत नाही. जो तो भितो. ज्यांचा पोरी बुडतात त्यांचे जिवास लागतें; परंतु धैर्याने ही चाल बुडवून टाकण्यास कोणी उभे राहात नाहीत. तर पोरें मारल्याप्रमाणेच हें नव्हे काय? रानांत पोर सोडल्या- प्रमाणे पोरी सोडतात. त्यांस कोणी त्राता नाही. हें जर सरकार मनावर घेईल तरच सिद्धीस जाईल, नाही तर कांही उपाय दिसत नाही. किंवा हिंदु लोक तरी कालेंकरून शहाणे होतील तेव्हा होईल. अशा वगैरे बहुत कामांस इंग्रजांचें राज्य हितावह आहे.

---

पत्र नं० ४० २४ डिसेंबर १८४८

## लाचेचा गुन्हा

धर्मशास्त्रांत लाचेचा गुन्हा नाही. लोभिष्टपणा नसावा असें आहे; परन्तु ही गोष्ट लाचाचे गुन्ह्याविषयी नाही. त्या वचनाचें लाचेवर ओढून चंद्रबळ आणिलें तर न कळे.

पेशवाईंत रामशास्त्री न्यायाधीश होते व ते धर्मशास्त्राप्रमाणे वागत होते. त्यांचा आचार असा होता की, सरकारचें वेतनदेखील घ्यावयाचें नाहीं. कोणाचा विडा किंवा पाणीदेखील घ्यावयाचें नाहीं व धन संपादन मुळीच करावयाचें नाहीं. हा शास्त्राचा प्रतिबंध खरा, परन्तु सामान्यतः लोभ धरण्याविषयी मात्र जहाले, तथापि न्यायकर्त्यानें आपलें नेमलें वेतन घ्यावें. त्यांत द्रव्य अमकें तरी असावें आणि जे आपल्याकडे न्याय करण्यास येतात, त्यांजपासून त्यांचें कार्य आहे या कारणानें सत्पक्षाचें अथवा असत्पक्षाचें धन किंवा कांहीं मोलवान वस्तु घेऊं नये; घेतली असतां त्या कर्माचें नांव अमुक व त्यास शासन अमुक, असा निषेध शास्त्रांत कोठे स्पष्ट नाहीं. केवळ लोभनिषेधावरून ही गोष्ट स्पष्ट होत नाहीं. मला तर स्पष्ट वचन कोठे आढळलें नाहीं. इंग्रजी भाषेंत "ब्रैब", फारशी भाषेंत "रिषवत", त्याच अनुरोधानें लोभार्थी शब्द मूळचा हिंदुस्थानी असून, हल्लीं महाराष्ट्रभाषेंत "लांच" हा योजिला आहे. या दोषाचा अन्वर्थक शब्द संस्कृत भाषेंत नाहीं. मला वाटतें की, लांचाचा गुन्हा आणि त्यास शासन हा प्रकार प्रथमच या देशांत इंग्रजांनी चालू केला. याचे पूर्वी कधी प्रसिद्ध नव्हता.

यास्तव कवीनें म्हटलें आहे की—

रिक्तहस्तं न गन्तव्यं राजानं देवतां गुरुम् ॥

याजवरून लोकांमध्ये काय अभिप्राय आहे, हें समजतें. लोभाचा निषेध बहुत ठिकाणीं सापडेल; पण लांचेचा सापडणार नाहीं. जर कोणी दुसऱ्याचा न्याय वास्तविक करील आणि वास्तविक पक्षकारानें स्वइच्छेनें कांहीं न्यायकर्त्यास दिलें तर तें घ्यावें किंवा नाहीं, याचें उत्तर शास्त्रांत कोठें नाहीं. लोभाच्या वचनावरून इतकेंच होतें की, न्यायकर्त्याजवळ कांहीं असूं नये. त्याणें निर्वाहापुरतें घ्यावें. स्वतंत्र असावें. त्याचा संसार फकिराप्रमाणें असावा, असा शास्त्राचा हेतु दिसतो.

ब्राह्मणांनी न्याय करीत जावा, असें शास्त्रमत आहे आणि ब्राह्मणाजवळ द्रव्य कोणतेंही प्रकारें राहूं नये, त्यांणी द्रव्याचा धिक्कार करावा आणि भिक्षा

मागून रहावें, हें धर्मशास्त्रांत पुष्कळ सापडतील. जर ब्राम्हणानें कांही दान घेतलें, तर त्याणे अमुक प्रायश्चित्त करावें, असें आहे व श्राद्धास बसला, तर अमुक प्रायश्चित्त करावें असें आहे. याचें कारण दानानें व श्राद्धाचे दक्षणेने जें त्यास प्राप्त जहालें, ते पंधरा दिवस त्यास घरीं बसवून किंवा त्यास कांही दुसरा खर्च घालून तें सरवावयाचें आणि ब्राम्हणास पुनः कफल्लक करून ठेवावयाचें, हा हेतु शास्त्राचा आहे. एकास दान केलें असतां पुण्य व दुसऱ्यास दान घेतलें असतां पाप, असें शास्त्र सांगतें. याचा हेतु दुसरा कांही दिसत नाही.

धर्मशास्त्रांत न्याय करण्याचे मार्ग पुष्कळ आहेत आणि त्यांतील नेम किती एक चांगले आहेत खरे; परन्तु त्यांतील किती एक धर्म आहेत, ते पांच हजार, दहा हजार वर्षांमागील लोक जे होते त्यांसच योग्य. सांप्रत काळीं ते विलक्षण दिसतात. हिंदु लोकांची समजूत मुसलमानांचे समजुतीसारखी आहे की, धर्मशास्त्रांत जें कांही ज्ञान आहे, तें संपूर्ण आहे. मुसलमान लोक म्हणतात की, सर्व शास्त्राचें आणि विद्येचें मूळ किमयासुद्धा कुराणांत आहे, हें परंतु म्हणणें अविचाराचें आहे. मागील प्राचीन काळचे पदार्थांची स्तुति करण्याची चाल पडून गेली आहे, ही चूक आहे. सांप्रत काळीं राज्याच्या रीति लोकसत्तात्मक इत्यादिक ज्या निघाल्या आहेत, त्या धर्मशास्त्रांत सापडणार नाहीत. धर्मशास्त्राप्रमाणे राजा स्वच्छंदी आहे. तो म्हणेल ती पूर्व दिशा व करील तो विधि; परन्तु हें सांप्रत काळीं चालणार नाही व त्याचा कांही उपयोग नाही. हल्ली स्वतन्त्र राजे असल्यामुळे जागोजाग देशोदेशीं अनर्थ जहाले आहेत, ते मनांत आणावे.

आजच्या काळीं यथास्थित उत्तम राज्य अमेरिकेंतील युनाइटेड् स्टेट येथें आहे. त्याचेखाली विलायतेंतील मिश्र राज्य व त्याचे खाली इतर राज्यें. एशिया खंडांतील राज्यें तर फारच दुष्ट. तेथे लोकांस पीडा फार. यास्तव राज्यांत सुख होण्याकरिता लोकसत्तात्मक राज्य जरूर असलें पाहिजे. जा देशांत कायदे होतात, त्या देशांतील लोकांची संमति त्यांस असावी आणि कायद्याप्रमाणे

राज्य चालवण्यास लाचाचा बंदोबस्त मुख्यत्वेंकरून झाला पाहिजे. पूर्वीप्रमाणे आता धर्मशास्त्र चालवूं म्हटलें, तर चालणार नाही. ही गोष्ट अशक्य आहे. आता ब्राम्हण राज्यकारभारांत, शिपाईपणांत व व्यापारांत पडून सर्व धंदे करितात. इतक्यांस भिकारी करून कंदमुळे खाववास लावून तपश्चर्या करविणें, ही गोष्ट कोणी बरी असें म्हणणार नाही.

तेव्हा आता लोक आहेत त्यांचा प्रतिबंध सांप्रत काळीं कसा करावा, हा विचार केला पाहिजे. वास्तव पूर्वीचे ब्राम्हण कसेही असोत, तसें आता होऊं शकत नाही. आणि पूर्वीप्रमाणे करण्याविषयी जे आग्रह धरतील ते मूर्ख आहेत. ते वृद्धांस तरुण करण्यास इच्छितात. ते कालमान पहात नाहीत. जे कालमान पहातात आणि त्याप्रमाणे वर्तणूक करितात, तेच उत्तम शहाणे. म्हातारे लोक म्हणतात की, इंग्रज लोकांच्या विद्या पुष्कळ आहेत; पण आम्हांस त्यांचें काय करावयाचें आहे ? आमचा आजपर्यंत काळ गेला की नाही ? मागले पुरुष शहाणे होते कीं नाही ? परन्तु हें म्हणणें केवळ अज्ञानाचें. मागले कांही पुरुष मागले काळींचे अज्ञानी लोकांत शहाणे होते, म्हणून ते आता शहाणे आहेत असें नाही. परशुरामाने पृथ्वी निःक्षत्रिय केली; पण भीष्म असतांना कांही झालें नाही. तसें, जोंपर्यंत इंग्रजांसारखे शहाणे लोक इकडे येत नवते, त्याच काळीं हे लोक शहाणे, बुद्धिवान् व विद्वान् होते; कारण वरिष्ठांचा अभाव होता.

परन्तु आता नवीन युद्धादिकांच्या युक्ति इंग्रजांनी आणल्या आहेत. त्यापुढे कोणताही हिंदु राजा जय पावला नाही; कारण शहाण्यापाशीं वेडा टिकत नाही. हें केवळ प्रारब्ध नाही, पण शहाणपणच आहे; परंतु अज्ञानाने आपले लोक आपला पूर्वीचा थोरपणा राखण्याकरिता इंग्रज शहाणे व त्यांमध्ये विद्या विशेष हें कबूल करीत नाहीत. असो.

तात्पर्य लाचेचा गुन्हा शास्त्रांत कोठे नाही आणि याविषयी कोणी जाणता मनुष्य प्रमाण दाखवील, तर आम्ही स्वीकारावयास आळस करणार नाही.

पत्र नं० ४५ २८ जानेवारी १८४९

# हिंदुस्थानाच्या पराधीनतेचीं कारणें

इंग्रज लोकांनी हिंदुस्थानचें राज्य घेतलें, या गोष्टीविषयी लोकांस भूगूळ+ वाटतें आणि ब्राम्हण लोक म्हणतात की, त्यांची सद्दी आहे. ब्राम्हणांहून कुळंबी वगैरे लोक यांस तर राज्य कोण करितो, याची खबरच नाही. याविषयी लोकांस कांही वर्तमान कळलें असतां फार उपयोग जाणून मी संक्षेपेंकरून लिहितों.

प्रथम मला हिंदुस्थानचे लोकांचे स्थितीचें वर्णन केलें पाहिजे, म्हणजे त्याजवरून इंग्रज लोकांचे इकडे पाय रोवले कसे, याचीं कारणें स्पष्ट होतील. मला वाटतें की, हिंदु लोकांचें महात्म सृष्टि उत्पन्न जहालयापासून काय असेल तें असो; परन्तु पांडवांचे वेळेस हिंदु लोक मोठे ऐश्वर्यास आले आणि विद्या वगैरे त्यांनी फार चित्त लावून शोधून काढिल्या. मोठेमोठे विद्वान् व बुद्धिमान् म्हणजे व्यास, वाल्मीक हे कवि, नारदासारिखे गायनशास्त्री, कपिलासारिखे शास्त्रज्ञ, अर्जुनासारिखे युद्धकर्ते, धर्मासारिखे सत्यवक्ते इत्यादि प्रकारचे उत्तम लोक त्या काळीं होऊन गेले आणि असे विद्वान् विचारशील लोक ज्या देशांत असतील, त्या देशांत कांही न्यून पडेल हेंही अशक्य आहे; परन्तु त्या समयीं संपूर्ण जगांत ऐश्वर्यवान् प्रदेश एवढाच होता. याजमुळे हिंदु लोकांनी आपले देशचें व आपले भाषेचें व आपले विद्येचें पराकाष्ठेचें वर्णन केलें आणि हें कांही आश्चर्य नाही. सांप्रत इंग्रज लोक तसें करतात.

परन्तु हिंदु लोकांनी पृथ्वीचें स्वरूप त्या काळीं कसें आहे व देश कोणते कोठे आहेत, येविषयी विशेष शोध केला नाही आणि करण्याचें कारणही नव्हतें, कारण हे लोक स्वस्थ बसून आपले देशांत जें निष्पन्न

---

+ भूगूळ-!!

होईल, हें जाऊन स्वराज्य यथास्थित करीत होते. लोकही चांगले व राजे-ही चांगले होते. प्रजेस पीडा वगैरे कांही होत नव्हती. तेव्हां परदेशांत जाणें किंवा व्यापार करणें, समुद्रांतून नौकारूढ होणें हे विषय पाहण्याचा प्रसंग त्यांस नव्हता. येणेंकरून ते लोक जसें आईबापांचें मूल पुष्कळ असतें आणि घरांत मुलगा हें जाऊन वाढतो, त्यास दरवाजाबाहेर काय आहे, हें ठाऊक नसतें, तसे हे लोक अमोवाळ × वाढले. नंतर कालें-करून त्यांनी विद्या जास्त वाढविण्याची सोडून दिली; कारण की त्यांस आपले महत्वाचा आणि सुखाचा अनुभव फार झाला.

तेव्हां पांडवांपासून अलीकडे दोन हजार वर्षें सुमारें तरी त्यांणी विद्येवर चित्त बरेंच ठेविलें होतें, असें त्या वेळेस ज्योतिःशास्त्रावर व लीलावती वगैरे ग्रंथ झाले त्यावरून दिसतें व कांही पुराणें व महात्म्येंही पुढे लिहिलीं गेलीं आहेत. पुढे कालेंकरून संस्कृत भाषा सुटोन प्राकृत भाषा झाल्या, तेव्हां असा भ्रम पडला की, प्राकृत भाषण बोलावें आणि ज्यास विद्या पाहिजे, त्याणे संस्कृत पढून विद्या शिकाव्या; कारण की, प्राकृत भाषेत ग्रंथ नाहीत, हें एक कारण.

दुसरें असें की, जों जों प्राकृत भाषा वाढत गेली, तों तों संस्कृताचा अंधार झाला; विद्या जास्ती वाढविणें राहिलें आणि लोकांची अशी समजूत पडली की, ज्यांणी संस्कृतांत ग्रंथ लिहिले, ते देव होते आणि तसे ग्रंथ लिहिणें हें कांही मनुष्याचें काम नव्हे, हें दुसरें कारण. तिसरें कारण असें आहे की, ब्राम्हणांचीं कुळें कायम झालीं. येणेंकरून जो ब्राम्हण मूर्ख, विद्या शिकत नाही, त्यास असें भय राहिलें नाहीच की, मूर्खपणामुळे नीचत्व येईल. त्यास असें वाटूं लागलें की माझा जन्म ब्राम्हण कुळांत आहे, मग मी विद्या शिकलों काय, नाही काय? एकच आहे. माझा ब्राम्हणपणा कोणी नेत नाही. मला इतर लोक कुळामुळे पूज्य म्हणतील आणि माझें पायाचें तीर्थ घेतील, यांत संशय नाही.

× अमोवाळ— ? ?

चवथें कारण असें दिसतें की, देशांत राहणें वगैरे जे प्रतिबन्ध पूर्वीचे शास्त्रकारांनी केले, त्यांचे हेतु न जाणून त्यास धर्म म्हणूं लागले. पांचवें कारण असें दिसतें की, कलियुग निघालें आहे, याजमुळे लोकांचा नाश व दुर्गुणप्रवृत्ति व्हावी हा ईश्वरसंकेत आहे, असें भय शास्त्रकाराने लिहिलें आहे. तरी त्याचा हेतु न जाणून लोक तें यथातथ्य मानूं लागले. सहावें- प्रारब्धवाद म्हणून जें घडतें तें पूर्वीच ईश्वर लिहितो, तें कोणत्याही उद्योगाने फिरावयाचें नाही. सातवें- पूर्वीचे लोक ऋषि व देव होते, मनुष्य नवते. यास्तव जें वडील करीत आले, तेंच करावयाचें, नवीन मार्ग काढावयाचा नाही. आठवें कारण ज्या ज्या गोष्टी, चालीरीति लोकांमध्ये आहेत, त्या सर्व धर्मच. व्यवहार धर्म; ईश्वरभक्तीही धर्म; पागोटें, धोतर, अंगरखा घालावा, हें सर्व धर्मामध्ये मोडूं लागलें. ही समजूत विलक्षण लोकांची पडली.

या आठ कारणांचें नांव मी " हिंदुनाशाष्टक " ठेविलें आहे. या कारणांनी लोकांनी विद्या वगैरे सर्व सोडून देऊन स्वस्थ घरांत बसले आणि परकी लोक त्या काळीं अगदी मूर्ख अवस्थेंत होते, याजमुळे त्यांचा शोध किंवा वार्ता यांणी कांही काढली नाही आणि त्या सर्वांस एक म्लेंच्छ म्हणून नांव देऊन टाकलें. याप्रमाणे या देशांत वर्तणूक जहाली. हिंदु लोकांत कांही किंचित् जागृति व्यासापर्यंत होती. त्यापुढे जी दड झोप लागली, ती आजपर्यंत तशी आहे. ती अशी की, या लोकांमध्ये एकचित्त नाही. आपले देशांत कोण राज्य करतो, याची खबर नाही. जो कोणी राज्य करील तो विष्णूचा अवतार, ही एक मूर्खपणाची समजूत पडली. पिठोरा राजा हस्तिनापुरीं क्षत्रियवंशी शेवटचा जहाला. त्यास मुसलमानांनी मारून राज्य घेतलें. त्यास आठशे वर्षें जहालीं; परन्तु त्या गोष्टीचें वाईट कोणांस वाटलें नाही. शास्त्री, पंडित, भट हे मुसलमानांचेच आर्जवें करून पोट भरूं लागले. ब्राम्हण कारकूनपणा, शिलेदारी, सरदारी स्वीकारून चाकऱ्या करूं लागले. तेव्हा विद्येचा अन्धःकार फार माजला.

कारण की, ब्राम्हणांनी युक्तीने आपले स्वाधीन विद्या ठेविली व

दुसरांस शिकवूं नये, असा धर्म काढून दिल्हा. आणि आपण शूद्राचें कर्म अंगिकारिलें. तेव्हा मग विद्या कशाने राहिल ? विद्येबरोबर सर्व ऐश्वर्य गेलें व शूरत्व गेलें. देशाभिमान नाहीसा झाला. जशीं पुष्ट बकरीं व्याघ्रास सापडतात, तसे हे लोक मुसलमानांस सापडले. पूर्व काळीं यवनादिक मुसलमान म्हणजे यवन इकडे आले, असें ग्रंथांतरीं आहे; परन्तु ते इकडे राहिले नाहीत, हा त्यांचा मूर्खपणा होय. आलीकडे यवन लोक पहिल्या मूर्खपणांतून निघाले आणि हुशार झाले. त्यांनी आता केवळ स्वारी करून परत जावें, तसें केलें नाही व हस्तिनापूरच सिंहासनारूढ होऊन बसले.

परन्तु ब्राम्हण लोक हे आपले घरीं आले, म्हणजे सोवळें करितात व यवनांचा विटाळ झाला म्हणून म्हणतात. तथापि त्यांस राज्य करावयास त्यांणी हरकत केली नाही व किती एक लोक मुसलमानांवर इतके फिदा झाले की, राज्य करणें व शूरत्व करणें हें काम मुसलमानांचें होय, दुसरांस यावयाचें नाही, असें म्हणूं लागले; परन्तु त्या मूर्खांस असें समजत नाहीं की, आठशें वर्षांपूर्वी हिंदु राजे झालेले पांडव, राम, परशुराम, हे मुसलमान होते कीं काय ? आणि त्या मूर्खपणाचें बीज मनांत ठेऊन त्याच स्थितींत हिंदु लोक राहिले. त्यांस परदेशाची किंवा स्वदेशाची कांहीं-एक दिशेखील ठाऊक नाही. हिंदुस्थानचे लोकांस दक्षण ठाऊक नाही. दक्षणेंत 'नेपाल' ठाऊक नाही. कोणी म्हणतात ती पुण्यभूमि, कोणी म्हणतात ती राक्षसभूमि व त्या गोष्टीस शास्त्री मान डोलवितात. यांचा मूर्खपणा किती आहे ? त्यांस असें कांही वाटत नाही की, आपले देशांत हे यवन लोक आले ते कोठले, यांस इकडे वस्ती करूं द्यावी कशाकरिता व यांस हाकून देण्यास आम्हांस कांही शक्ति नाही कीं काय ?

सर्व हिंदु लोक निर्बळ व अपौरुष आहेत कीं काय ? परन्तु ही गोष्ट विसरले आणि सोवळें घरांत आलें. देश सोवळा राखावयाचा विसरले व जो तो आपला स्वार्थ पाहूं लागला. अशा अवस्थेत असतां मुसलमानांनी राज्य घेतलें. तें राज्य मुसलमान लोकांचे मूर्खपणाने बुडावयाची संधि आली, तों इंग्रजांचा प्रवेश झाला. त्यांणी तर हेच लोक चाकरीस ठेवून

याच लोकांच्या तोंडांत मारल्या; परन्तु हिंदु लोकांचा असा मूर्खपणा आहे की, इंग्रज आले कधी, कोठले, कोण, हें त्यांस अद्याप माहित नाही. येण्याचे वेळेस कोणते राजाने याचा विचार केला नाही. आता मात्र दक्षिणेंत इंग्रज ठाऊक जहाले. तसेंच आता कोणत्याही हिंदु लोकांच्या संस्थानांत जाऊन पहावें तरी हीच वृत्ति लोकांची आढळते. भट जेवणा-पुरती काळजी करितात आणि सरदार, गृहस्थ पैका मिळविण्यापुरती काळजी करतात आणि स्वस्थ बसतात. मग असें होईल हें काय आश्चर्य आहे ?

---

पत्र नं० ४६ ४ फेब्रुआरी १८४९

## इंग्लिश राज्याची आवश्यकता

मागील पत्राचा विषय आणखी लिहिण्याचा आहे तो असा की, इंग्रज लोक यांनी इकडे राज्य संपादन केलें, याचें कारण काय ?

याचा विचार करतां दिसतें की, हिंदु लोकांमध्ये मूर्खपणा वाढला, तो दूर होण्याकरिताच हे गुरु दूर देशांतून इकडे ईश्वराने पाठविले आहेत. पहा, हिंदु लोकांस हा मोठा लाभ आहे की, इंग्रज लोकांचें राज्यामुळे हिंदु लोकांस जागृति जहाली व पृथ्वीवर काय काय आहे, हें कळूं लागलें. ज्यास कोकणापासून पुण्यापर्यंत प्रदेश ठाऊक, त्यास पूर्वीचे लोक मोठा माहितगार असें म्हणत; पण आता बहुतांस इंग्रजांचा देश इंग्लंड व अमेरिका माहीत झाली. हें सर्व इंग्रजांमुळे झालें. ईश्वराने ही शहाणपणानेच योजना केली आहे. लोकांची झोप जाण्यास दुसरा इलाज नवता. सती जाणें, अकस्मात् येणें, पोरें मारणें, प्रयागास करवत घेणें, जगन्नाथास रथ उरावर घेणें व हिमालयांत स्वर्गास जाणें, इत्यादि अघोरी व

लज्जास्पद कार्यांमुळें ईश्वराचा क्षोभ अत्यंत जहाला. तेव्हां दुष्ट लोकांस ताळ्यावर आणण्यास ईश्वराने इंग्रज सरकारची योजना केली.

परन्तु त्यांनी न्यायाने राज्य मिळविलें किंवा कसें, याविषयी कोणास सन्देश वाटेल, म्हणून त्यांचें इकडे राज्य स्थापन जहालें, त्याचा इतिहास पाहिला, त्याजवरून माझें असें मत झालें आहे की, इंग्रजांनी यथान्याय वर्तणुकीने राज्य घेतलें आणि ईश्वराने त्यांस हें राज्य अशा प्रकाराने दिलें की, त्यांस कोणी दोष ठेवणार नाही. पहा, प्रथम हिंदुस्थानांत मुसलमान लोकांचा अम्मल होता व त्यांनी संपूर्ण देश व्याप्त केला होता. त्यांचें राज्य मोडावयाचे सन्धीस इंग्रज येथे आले; तेव्हां जागोजागचे नबाब व निजाम वगैरे हे आपले यजमानास सोडून आपले ठिकाणीं अम्मल हाती लागेल, तितका बळकावून बसले होते; तेव्हां इंग्रजांस ठीक संधि सापडली. आणि ते प्रथम इकडे आले, तेव्हां त्यांनी दुकानास जागा घेतली, ती मुसलमानांचे परवानगीवरून सुरतेस व कलकत्यास घेतली. पुढे तेथे ते व्यापार करून स्वस्थ होते; परन्तु त्यांस हे लोक चैन पडूं देईनात. इंग्रज लोकांचा मूळचा असा संकेत होता की, इकडे राज्य घेऊं नये, फक्त व्यापार मात्र करावा.

परन्तु हे लोक त्यांस राहूं देईनात. कधी त्यांचीं दुकानें लुटीत, कधी खंडणी मागत. तेव्हां ते तह करूं लागले; तरी ते तह सोडून वर्तणूक करूं लागले. इकडील देशचे लोकांत वचनाचा प्रमाणिकपणा, खरेपणा, शूरत्व कमी आणि द्रव्याचा लोभ फार. याजमुळे दौलत वाढवावी हा हेतु फार; परन्तु कशी वाढवावी तें व न्याय-मनसुबीचा बंदोबस्त ठेवून धारा कमी करून प्रजा सुखी ठेवण्याचें ज्ञान नाही. सन १७५७ साली १६० गोरे लोकांस कलकत्याचे नबाबाने कोठींत कोंडल्यामुळे ते ठार झाले. तेव्हां इंग्रेज लोकांस लढाई करणें प्राप्त जहाली आणि त्यास जयही मिळाला. तेव्हां आपल्या ठिकाणाचें रक्षण करण्याकरितां सभोंवताला मुलूख आपलेकडे घ्यावा लागला. 'एक वेळ मनुष्याचें तोंड दुधाने भाजलें, म्हणजे ताक फुंकतात,' तद्वत् इंग्रेज लोकांनी इकडील लोकांचा भरवसा सोडून दिला,

कारण त्यांचें त्यांस कांहीच प्रमाण वाटेना आणि दहावीस कोसपर्यंत त्यांस हद्द करून दिली की, इतक्याचे आंत तुम्ही येऊं नका. तत्रापि तोही करार मोडला. तेव्हा मुलूख हस्तगत करून राज्य घ्यावें लागलें.

याप्रमाणेच दक्षिणेची अवस्था झाली. बाजीराव स० १८०२ त पळून जाऊन आपले बापाचे स्नेही इंग्रज यांचे पाठीस पडला आणि त्याने त्यांची प्रार्थना केली की, होळकराने माझें शहर लुटिलें व शिंदे, होळकर, भोसले माझ्याशीं वितुष्ट करितात. तेव्हा पुनः गादीवर माझें स्थापन करणार समर्थ तुम्ही आहां. तेव्हा तह जहाला व मुलूख देण्याचा वगैरे करार जहाला. नंतर इंग्रजांनी त्यास मदत करून गादीवर बसविलें; परन्तु कराराप्रमाणे त्यांस मुलूख देईनात, तरी त्यांणी युद्धास आरम्भ केला नाही. पुढे १८१७ त विश्वासघात करून बाजीरावाने लढाई आरम्भली, तेव्हा तो शासनपात्र जहाला; आणि पेशवे यांचा अंमलही वाजवी नवता. त्यांनी सातारचे राजापासून बळकावलेला अधिकार होता व बाजीरावाचें कर्म चांगलें नवतें. भट व भडवे मात्र त्याची स्तुति करीत. दुसरे सर्व त्यास कंटाळून राहिले होते. व इंग्रजांस सर्व वश होते, तेव्हा इंग्रजांनी मुलूख घेतला.

असे रीतीने त्यांस मुलूख प्राप्त जहाला, तो त्यांनी घ्यावा किंवा न घ्यावा, असें कोणी विचारील तर त्याचें उत्तर असें आहे की, अलपिष्टन साहेब (मौंट स्टुअर्ट एलफिन्स्टन) यांस जें मानपत्र राजेवगैरेंनी दिलें, त्यांत स्पष्ट लिहिलें आहे की, तुम्ही राज्य घेतलें, हें बरें जहालें. राज्यांतील लोक मूर्ख. त्यांस शहाणे करणें जरूर आहे. अशा लोकांस सोडून देणें व पुनः बाजीरावासारख्या मूर्खांचे हातीं देणें, हें काम वाईट व अधर्म आहे. जसें आंधळयाला रस्त्यांत पावसांत सोडावें, तद्वत् होतें. वास्तव इंग्रजांनी दक्षण घेतली हें वाजवी व न्यायाप्रमाणे आहे. जर त्यांनी हा मुलूख लोक शहाणे होत तोंपर्यंत सोडला, तर ते गुन्हेगार होतील. परन्तु त्यांनी इकडील लोकांस त्वरित शहाणे करून, जसें मुलास वाढवावें व वाढलें म्हणजे सोडावें, तद्वत् करणें योग्य आहे.

इंग्रज सरकाराचा या देशांत मोठा धर्म हाच आहे की,

त्यांनी विद्या वाढवून या लोकांस शहाणे करावें आणि जेव्हा स्वदेशाचें राज्य करण्याचें व्यावहारिक ज्ञान यांस येईल आणि हे पृथ्वीवरची हकीकत सर्व जाणतील आणि दुर्गुण सोडतील, तेव्हा हें राज्य त्यांनी त्यांचे हवालीं करावें. परन्तु जर हल्ली या लोकांचे अधीन राज्य होईल, तर पहिल्यापेक्षा अनर्थ फार होतील, कारण की, आपले लोक फार भ्रष्ट आहेत व त्यांचीं अंतःकरणें फार मळीन. ते द्रव्याकरिता दुराचार करितात.

पहा की, कोणी अंमलदार या देशचा असला, म्हणजे तो फार कळकळाट करतो व आपला अधिकार प्रगट करण्याकरिता व लांच खाण्याकरिता छळितो, म्हणून रयत त्यास राजी नसते. इंग्रज लोकांवर रयत राजी असते, याचें हेंच कारण आहे. आपले लोक कधीही नीट वागत नाहीत व आपले लोकांचा आपसांत मत्सर, द्वेष इत्यादि फार असतो. तेव्हा असे मूर्ख लोकांचे हातीं राज्य असणें हें दुर्भाग्य आहे. स्वदेशीय राज्यें हल्ली आहेत, त्यांत काय गर्दी आहेत ती पहावी, म्हणजे बाजीरावाचें मूर्तिमंत राज्य डोळ्यांपुढे उभें रहातें. मक्ते-मामलेदार बंड करून रयत लुटतात. सभा येथे ती रांडा, गोंधळी, भट, आर्जवी, ढोंगी वगैरे बाळगून असतात. हेंच बाजीरावाने केलें व अद्याप मराठी राज्यांत हेंच आहे. पहा म्हणजे खातरी होईल. उजाडलें किंवा मावळलें याची त्यांस खबर नसते. फक्त जनावरां-प्रमाणे खाणें, निजणें एवढ्यापुरती त्यांस काळजी. तिसरी गोष्ट ते पहात नाहीत व सामान्यतः ब्राम्हण वगैरे हिंदु लोक यांची समजूत अशी आहे की, सर्व उद्योग व विद्या पोटाकरिता. दुसरा अर्थ कांहीं नाही. यामुळे लोकहिताचे उद्योग, विद्या, ज्ञान हीं वाढविण्याची मेहनत त्यांस होत नाही.

## इंग्लिश राज्यापासून फळ

सांप्रत हिंदु लोक एकत्र बसले, म्हणजे सहज गोष्टी निघतात की, हिंदुस्थानची पुढे गत कशी होईल ? लोक अगदी भिकारी होत चालले. व्यापार, धंदा, रोजगार हीं कामें नाहीशी झालीं. ब्राम्हणांस अन्न नाही. घरें ओसाड पडत चाललीं. माणसें स्वस्थ झालीं. पदार्थांच्या किंमती उतरल्या. पैसा नाहीसा झाला. इंग्रज लोक एका पाठीमागे एक आपलीं राज्य संस्थानें, जहागिरी, पेनशनें घेत चालले. कोणी शिपाई राहिला नाही व लोक दरिद्री झाले. तेव्हा पुढे या प्रजेची गत कशी होईल ? याप्रमाणे ब्राम्हणांचा हाहःकार ईश्वराचे कानांवर कधी जाईल ?

अशा तऱ्हेचे विस्मययुक्त प्रश्न करितात. त्यांत मग कोणी बहुत शहाणा, जुने काळचा असला म्हणजे तो म्हणतो, " अहो बाबा, मागे यादव कसे मेले ? रावणाने प्रळय थोडा केला होता का ? सर्व देव बंदीस घातले होते. नंतर रामाने वानरांकडून लंका घेतली कीं नाही ? पाण्यावर दगड तरले कीं नाही ? तसेंच इंग्रज कधी तरी बुडतील. धर्मसंस्थापना होईल. ब्राम्हण लोक सुखी होतील व इतर लोकही आपले वर्णाश्रमधर्में-करून वागूं लागतील. " अशा प्रकारचीं संभाषणें चार ब्राम्हण एकत्र बसले म्हणजे होतात.

आमचे ऐकण्यांत हें पुष्कळ आलें आहे. याविषयी आम्हांस काय वाटतें, तें लोकांस कळवावें म्हणून आम्ही आपलें मत लिहितों. मुख्य आमचे बोलण्याचा येथून आरंभ आहे की, जा गोष्टी ईश्वर घडून आणतो, त्या वाइटाकरिता नसतात. जरी त्या वाईट असा प्रथम मनुष्याचें ज्ञान थोडें म्हणून भास होतो, तरी शेवटीं त्याजपासून मोठा उपयोग असतो. ही गोष्ट खचित आहे. तेव्हा हिंदुस्थानचे लोक हे फार मूर्ख व धर्मकर्म

सोडून अनाचारास प्रवर्तले. ते असे की, सती जाण्याची चाल, मुलें मारावयाची चाल, तीन वर्णांची नीच स्थिति, ब्राम्हणाचें महात्म, विद्या क्षणिक, अतिशय गर्व, संपूर्ण देशचे लोक आम्हांपुढे तुच्छ व आम्ही श्रेष्ठ. तेव्हा हा भाव हिंदु लोकांचा मोडण्यास व त्यांस ताळ्यावर आणण्यास परदेशांतील सुधारलेले लोक यांची व त्यांची गाठ घालून देण्यापेक्षा उत्तम उपाय दुसरा कांही आहे, असें वाटत नाही. यास्तव ईश्वराने या देशांत इंग्रजांची प्रेरणा केली आहे.

आता हिंदु लोकांनी उघड पहावें की, आम्ही श्रेष्ठ कीं दुसऱ्या देशचे लोक श्रेष्ठ. ग्रंथावरून पहावें आणि लोकांचे तोंडून ऐकावें, त्यापेक्षा समक्ष अशी भेट झाली तर चांगलें कीं नाही ? याचा विचार पहावा. तेव्हा या साक्षात् शाहाणे लोकांची गाठ पडून, हिंदु लोकांच्या वाईट चाली बहुत सुटच्या व आणखीही किती एक सुटतील. आणि यांचीं मनें शुद्ध होऊन यांस राज्यकारभार, व्यापारधंदा कसा कसा करावा, हें ज्ञान येईल. देशसुधारणा क्षणांत होत नाही. तीस पुष्कळ विलंब लागतो. लहान मुलास हुशार होण्यास दहावीस वर्षें लागतात. मग देश चांगला होण्यास अर्थातच दोनशे-चारशे वर्षें लागतील. तोंपर्यंत या लोकांस दुःख आहे, परन्तु त्यास उपाय नाही. जशी शाळेमध्ये मुलांनी शिक्षा घेतली पाहिजे; तद्वत् हें आहे. यापासून उत्तम फळ पुढे होईल. या देशचे लोकांनी वर्णसंकर होईल व धर्म बुडेल, हें कांही भय बाळगूं नये. वर्णसंकर होत नाही व धर्म बुडत नाही; परन्तु मूर्खपणा मात्र बुडेल आणि धर्मांमध्ये अधर्म मिसळ झाला आहे, त्यास लोक धर्म म्हणतात, तें मात्र ज्ञानचक्षु आल्यावर जाईल.

वर्ण जे आहेत ते स्वाभाविक सृष्टींत आहेत; म्हणजे कोणतेही देशांत वर्ण नाहीत असें नाही. वर्ण म्हणजे इतकेंच की, चार प्रकारचे व्यापार. जसे ब्राम्हण हे धर्म रक्षणारे व विद्या वाढविणारे, क्षत्रिय शिपाईगिरी करणारे, वैश्य व्यापार करणारे आणि शूद्र शेत करणारे. हे धर्म सर्वत्र आहेत व ते जलप्रलय होईपर्यंत पृथ्वीवर रहातील; परन्तु लोकांच्या अज्ञाणी समजुती

म्हणजे ब्राम्हण विद्वान् चांगला असला तरी सिंधू नदी उतरून पलीकडे गेला म्हणजे किंवा त्याने कांदा खाल्ला म्हणजे त्याचें ब्राम्हण्य गेलें. हें कसें गेलें? म्हणून म्हणाल तर त्याचें उत्तर कोणास देतां येणार नाही. त्यास जी विद्या येते, ती तो विसरत नाही. त्याचा धर्म आहे, तो त्याणे सोडला नाही. त्याचें कांही नुकसान झालें नाही. मग कांदा खातांच ब्राम्हणपणा गेला कसा? केवळ मनाची ही कल्पना आहे. वास्तविक कांही नाही. या मूर्ख समजुती जातील आणि हल्ली जो वर्णसंकर आहे, म्हणजे वास्तविक ब्राम्हण नसतां ब्राम्हण म्हणवितात, व शूद्र असतां ब्राम्हण म्हणवितात व ब्राम्हण असतां ब्राम्हण म्हणत नाहीत. हा वर्णसंकर मात्र जाईल आणि व्यवस्थित होतील.

या लोकांच्या पायांतील शृंखला सुटतील. हे चहों देशांत जाऊन व्यापार करूं लागतील, विद्वान् होतील व आपले देशांत कापड वगैरे जिन्नस तयार करावयास शिकतील. तेव्हा सुखी होतील. लोक शहाणे झाले, म्हणजे हळूच इंग्रजांजवळ म्हणतील की, आम्हांस तुमच्या देशांत आहे तसें पार्लमेंट द्या. नंतर आपले लोक त्या-मध्ये बसूं लागले म्हणजे हळूच म्हणतील की, तुम्हासारखे आम्ही शहाणे आहों, मग आम्हास अधिकार कां नसावे? मग हिंदु लोकांचें बहुत मत असें पडलें, म्हणजे सरकारास देणें अगत्य आहे. इकडील लोक राज्याचे कारभार वगैरे चांगले करूं लागले, लाच खावयाचें सोडून दिलें, म्हणजे बहुतकरून मोठालीं कामें गवरनरींचींसुद्धा यांचे हातीं येतील. आणि मग अर्थातच इंग्रज फक्त व्यापार मात्र करून राहतील. म्हणजे जसे हिंदुस्थानांत प्रथम इंग्रज आले, त्या स्थितीवर येतील आणि आपले लोक पार्लमेंट व स्वराज्य भोगतील. राज्यकारभारांत व व्यापारांत त्यांस महत्त्व प्राप्त होईल आणि मग परदेशांशींदेखील व्यापार करतील.

असे हे लोक प्रबळ झाले, म्हणजे इंग्रजांस कांही दिवसपर्यंत आभारी मानतील; कारण की त्यांचे योगाने हे ज्ञानी झाले; परन्तु जा काळीं

इंग्रज गडबड करूं लागतील किंवा कांही नवीन कानू बसवा-वयाचा आग्रह करतील, त्या काळीं अमेरिकेंत झालें तसें होऊन हे लोक आपल्यास स्वतन्त्र करून घेतील आणि इंग्रजांस सांगतील की, तुम्ही आपले देशांस जावें. आता आमचें देशाचा कामकारभार आम्हांस चांगला करतां येतो. तुमचें गुरुत्व नको. तुम्ही पाहिजे तर व्यापारापुरतें इकडे येत जा. आमचे प्रजेचें जसें आम्ही रक्षण करितों, तद्वत् तुमचेंही करूं, परन्तु तुमचें वर्चस्व नको. याप्रमाणे या देशाची गति होईल आणि नवीन राज्यस्थिति चांगले रीतीची होईल. पहिलें अज्ञान अगदी नाहीसें होईल. यास दोनशे वर्षे तरी पाहिजेत. परन्तु असें होईल यांत संशय नाही. अशी मागले इतिहासावरून कल्पना होते. आणि हें सत्य आहे, अशी खातरजमा आहे.

---

पत्र नं० ६६ 1 जुलाई १८४९

## सरकारी कामदार

आपले लोकांमध्ये अशी चाक पडून गेली आहे की, त्यांणी उडवे असावें म्हणजे त्यांणी मनास येईल तितकें कर्ज करावें, सावधगिरी करूं नये. हें लक्षण सरदारांचें असें लोक समजतात.

दुसरें, सराफ लोक, हे सावध असतात. म्हणजे त्यांणी कवडीपासून मिळवावें. कधी गैरशिस्तपणें पैका वाऊं देऊं नये. कारकून यांणी ठकपणाने संसार करावा. हा शिरस्ता आहे. आणि सरकार हें लुटारू असावें व सरकारने पाहिजे तसें वागावें. खंडण्या घ्याव्या, लूट करावी, हा धर्म सरकारचा, असें लोक समजतात आणि तसेंच आचरण करितात. याजमुळे

पुष्कळ अनर्थ होतात.

गृहस्थ आहेत ते म्हणतात की, आमचा द्रव्य मिळविण्याचा धर्म; भट म्हणतात आमचा भीक मागण्याचा धर्म. भटाजवळ पन्नास हजार रुपये असले, तरी आणखी भीक मागतोच व गृहस्थास दोनशे रुपये महिना असला तरी तो लाच खातोच, चोऱ्या करितो आणि पैका मिळवितो. आपले लोकांपैकी कामगार सरकार चाकरीस आहेत, त्यांपैकी शेकडो या लाच खाण्याबद्दल वगैरे तुरुंगांत गेले; परन्तु अद्याप ते खोड टाकीत नाहीत. याचें कारण असें आहे की, त्यांस ती सवई पडून गेली आहे हें एक; दुसरें त्यास ईश्वराचें भय नाही, विद्या नाही व शहाणपण नाही; याजमुळे नीति समजत नाही; तिसरें कारण इंग्रज लोक जे विलायतेंतून इकडे येतात, ते शुद्ध टोणपे असतात, त्यांस कांही कळत नाही. मग शिरस्तेदारावर वगैरे भरवसा ठेवतात व शिरस्तेदार जें सांगेल त्याप्रमाणे करतात. याजमुळे शिरस्तेदार जड्जाचें काम स्वतः करीत असतो. म्हणून तो लाच खातो. चौथें पगार फार कमी. साहेब लोक मूर्ख असतात; परन्तु दोन हजार, तीन हजार रुपये वगैरे पगार खातात आणि त्यांचे हाताखालील कामगारास शेपन्नास रुपये दरमहा देतात आणि सर्व काम तो करितो, हेंही कारण आहे. पांचवें कारण असें आहे की, इंग्रज लोकांस या देशांतील लोक निवडतां येत नाहीत. लुच्चे, सोदे आणि भले हे एकसारखे या राज्यांत झाले आहेत.

ज्या लोकांची योग्यता पांच रुपये मिळविण्याची असल्ये, त्यांस १०० रुपये देतात. आणि ज्यांची पांचशे रुपयांची योग्यता त्यांस पांचदेखील देत नाहीत. सरासरी आंधळें दळतें आणि कुत्रें पीठ खातें, अशी वर्तणूक आहे. याजमुळे इकडचे लोक म्हणतात की, कसेंही केलें तरी इंग्रजांस निवाडा समजत नाही. निभेल तितके दिवस निभेल. मग खावयास तरी कशास कमी करावें ? जितके दिवस जातील, तितके जातील. पुढे पहातच आहोंत, अशी समजूत आहे. ब्राम्हण लोक राज्याचे व अधिकाराचे उपयोगी नाहीत, हें स्पष्टपणें आज दिसतें आहे. जेव्हा ब्राम्हणांच्याने

शेवटास त्यांच्या जागा व लहान लहान अधिकार नीट चालवत नाहीत, तेव्हां ते पुढे करणार काय? यांचे हातीं राज्य दिलें, तर हे दिवसास लुटतील, हें उघड आहे. कोणी म्हणतात, इंग्रज जे कामगार ठेवितात, ते अगदी लबाडाचे अर्क, असें आणून ठेवीत नाहीत; परंतु अज्ञानाने तसें घडतें. तथापि फळ एकच आहे. हे जर कुलीन लोकांस ठेवतील, तर असें कधी होणार नाही. याजकरितां विद्वान्, चांगले कुलीन, मोठ्या योग्यतेचे लोक ठेवावे. लुच्चोर, लबाड व हलके लोक जे आतां भरले आहेत, यांचे हातून वर्तणूक कशी चांगली होईल? परंतु असें साहेब लोकांच्या हातून घडणें कठीण.

कारण त्यांचें अज्ञान या देशाविषयी पुष्कळ आहे. अमुकदार कोण, कसा, हें त्यांस कळत नाही. सकट घोडे आणि बारा टक्के मानितात. मला वाटतें की, हे इंग्रज हल्लीं सरकारांतून नेमणूक होऊन जे इकडे येतात, त्यांचे तीन वर्ग आहेत. शंभर सिविलीयन असले, तर त्यांत पंचाण्णव असे असतात की, त्यांचें चित्त पैका मिळवून घरास जावें. ते दुसरें कांहीं पहात नाहीत, फक्त पिशवीवर नजर ठेवतात. व शिरस्तेदाराने कागद पुढे मांडले, म्हणजे सह्या करितात. अर्जी कोणीकडे पडो, तरी फैसल करितात, व इकडे तिकडे न पहातां घरीं जातात.

दुसरे दिवशीं पुन्हा तेंच काम. ते आपले दिवस मोजितात. या प्रमाणे उदास असतात. आणि शेकडा चार मध्यम प्रतीचे असतात, म्हणजे ते चित्त लावून काम करितात. हाताखालचे माणसांचें काम, त्यांची वर्तणूक व वहिवाट पहातात. विदुरनीतींत राजास विदुर सांगतो, राजाचा धर्म असा आहे की, बातमीदार ठेवून वर्तमान पहात जावें. तो नेम इकडील लोकांस फार लागू आहे. जास अधिकार करणें त्याणें आपल्या लोकांची वर्तणूक पहावी, म्हणजे त्यांस भय वाटतें; परंतु असें करणारे साहेब लोक शेकडा चार असतात. व शंभरांत एक उत्तम प्रतीचा असतो त्याचे मनांत आपण नीट काम करावें, हें तर काय, परंतु आपले जिल्ह्यांतील सर्व लोकांचें कल्याण असावें, अशी त्याची इच्छा असते. त्यांस वाटतें की, आम्ही या लोकांचा दरमहा खातों, या त्यांचा माल घेतों व हे लोक

अज्ञानांत फार आहेत. याजकरिता यांस सुधरावें व विद्यावृद्धि करावी अशी प्रजेची काळजी करणार क्वचित्, याप्रमाणे आहे. तेव्हा अशा उदासीन राजांचे हातून राज्य कसें चांगलें होईल ?

ते आपलें हिताकडे पहातात. लोक मेले तर मरेनात ? यांस काय त्यांचें सुतक यावयाचें आहे ? आपले लोक आतापासून सुधारले आणि जरा अक्कलहुशारींत आले व लाच खाणें वगैरे दोष टाकले म्हणजे खचित साहेब लोकांचे शंभरपट काम चांगलें करतील. यांस प्रथम भाषा चांगली कळेल. साहेब लोकांचें मुळी प्रथम तेंच व्यंग असतें व स्वदेशांतील लोक राज्य करण्यास योग्य होण्यास अवकाश आहे, तत्रापि जर विद्वान् लोकांस मोठाल्या जागा देऊं लागले, तर त्याच्या योगाने लवकर सुधारणा होईल. हल्ली जे कामगार आहेत, ते इंग्रजांपेक्षा स्वदेशाचें हित करण्यास उदास आहेत. यांजपासून देशाचें कल्याण काय होणार ?

आज जे लोक आहेत, त्यांस कांही कळत नाही. ज्ञान व विद्या हे विषय त्यांचे स्वप्नांतदेखील नाहीत. गर्विष्ठ ब्राम्हणांच्या समजुती त्यांचे मनांत आहेत. फक्त पैसा मिळविण्याकरिता साहेब लोकांचें आर्जव करून पोट भरितात. या लोकांच्याने काम कधी चांगलें होणार नाही. याजकरिता चांगले लोकांची योजना सरकारांतून करावी. आता सरकारचाकरीस लोक आहेत, हे फार हलक्या प्रतीचे, यांस कांही ज्ञान नाही. फक्त आर्जव करावें, इतकें त्यांस समजतें. व साहेब लोक किती एक स्तुतिप्रिय असतात, त्यांची आर्जवाने मर्जी खुषी होते, आणि ते त्यास मोठी जागा देतात. याप्रमाणे अवस्था आहे.

तात्पर्य कोणत्याही प्रकारें या लोकांची बरी गत नाही. सरकार या प्रकारचें व लोक या प्रकारचे, मग दरिद्र असलें तर नवल काय ? यास्तव या लोकांस माझी विनंती आहे की, तुम्ही जरी हलक्या कुळांतले असाल तरी तेंच तुम्ही विरीर् बाळगावें असें नाही. थोरपणा धरावा. तुमचे नशिबाने हे इंग्रज इकडे आले, म्हणून तुमच्यासारख्यांस जागा मिळतात. तर तुम्ही देशांतील लोकांची अब्रू राखा.

---

## स्वदेशप्रीति

या देशांतील शास्त्री, पंडित यांस व ज्यांस आपले धर्माचा अभिमान आहे व जे धर्म जाणतात, त्या सर्वांस माझे कांहीं प्रश्न आहेत त्यांचीं उत्तरें कोणी देतील तर मी त्यांचे आभार मानीन, आणि न देतील तर मी आपल्यास विजयी म्हणेन.

(१) पुराणें हीं काव्यें समजावीं किंवा वेदशास्त्राप्रमाणे त्यांस मानावें ?

(२) वेदांतील धर्म व पुराणांतील धर्म (देवता, आचार, कर्म इत्यादि) वेगळा आहे कीं नाही ?

(३) सांप्रत हिंदू धर्म बिघडला आहे कीं नाही ? व त्यास सुधारणें जरूर आहे कीं नाही ?

(४) आचार प्रमुख मानावा किंवा नीति प्रमुख मानावी ?

(५) हल्ली हिंदु लोकांवर जे प्रसंग आले आहेत, ते सर्वांस विदित आहेत. त्यांतून तरणोपाय होण्याकरितां उपाय करणें अवश्य आहे; परंतु त्या उपायास सांप्रतचे काळीं धर्म अगदीं बुडोन अज्ञान पसरलें आहे, हें विघ्न आहे किंवा नाही ?

(६) वेद, शास्त्रें, पुराणें यांचा सारांश ग्रंथ करून सर्व लोकांस तो धर्मपुस्तकाप्रमाणे देणें बरोबर आहे किंवा नाही ? किंवा प्रत्येकाने दहा उंट पोथ्या वाचाव्या, तेव्हा त्यांतील कांहीं धोरण कळणार, असेंच गूढ राहूं द्यावें ? अर्थ करणें बरें किंवा पाठ करणें बरें ?

(७) जातिधर्मास कूळ मुख्य किंवा वर्तणूक मुख्य ?

(८) पुराणांतील व तंत्रांतील धर्म कांहीं कांहीं नीतीस विपरीत आहेत. जसें शाक्त दारू पितात, जार कर्म करितात इत्यादि; आणि कांहीं

पृथ्वीस प्रतिकूळ आहे. म्हणजे ग्रहण भलतेच रीतीने वर्णन केलें आहे व पृथ्वीचें स्वरूप मनास येईल तसें कल्पनेने लिहिलेलें आहे. याजवर भरवसा ठेवावा व आंधळ्यासारखें होऊन जें उघड खरें दिसतें, तें खोटें म्हणावें, यांत परिणाम आहे कीं काय ?

( ९ ) सांप्रत लोकांमध्ये किती एक चाली मुळीच आधार नसतां पडल्या आहेत, म्हणजे लवकर लग्न करावयाचें इत्यादि. या मोडणें जरूर आहे कीं नाही ?

( १० ) वास्तविक धर्माचें तात्पर्य हल्ली कोणास कळत नाही. शास्त्री-पंडित हे लोभावर दृष्टि देवून लोकांस बरा वाटेल तो शास्त्रार्थ सांगतात. याजमुळे धर्म अगदी ग्लानीस आला आहे. याचा अभ्युदय करणें जरूर आहे कीं नाही ?

( ११ ) अशा मोठाल्या गोष्टी ईश्वराने कराव्या, असें म्हणून उगेच बसणें बरें किंवा उद्योग करावा त्यांत ईश्वर सहाय्य होतो, हें मानणें बरें ?

( १२ ) संस्कृत ग्रंथ आहेत, त्यांचें मराठी करून ज्ञान वाढविणें हें बरें किंवा ब्राम्हणांचे हक्क त्यांत कांही बुडत आहेत ?

इतके त्रयोदश (द्वादश ?) विध माझे प्रश्न आहेत. त्यांतील तारतम्य जाणून कोणीं उत्तर द्यावें व उत्तर देतेसमयीं जे कोणी शहाणे आहेत, त्यांस पुसावें.

किती एक लोक ज्यांचें अज्ञान दृढ आहे, ते या सर्व प्रश्नांचीं उत्तरें बाळकासारखीं तत्काळ देतील; कारण की ब्राम्हणांचा असा स्वभाव आहे कीं, जर त्यांचे समजुतीविरुद्ध कांही बोललें, तर ते अगदी वाईट, असें समजतात. कारण की, ते मुळी आपल्यास देव समजतात. त्याजमुळे गर्व होऊन आम्ही थोर, आम्ही करतों तें चांगलें, आम्हांस कोण नांव ठेवणार आहे ? अशा समजुतीने त्यांचे वादविवाद नाहीसे होऊन, लोक थंड झाले आहेत. एखादी गोष्ट चांगली किंवा वाईट, हें ठरविणें त्यांस कळत नाही. एक गोष्ट सांगतो व बाकीचे माना डोलवितात, विचार करीत नाहीत. हें अत्यंत गर्वाचें व मूर्खपणाचें लक्षण आहे. याजकरिता माझे प्रश्न साधारण

नाहीत, अपूर्व आहेत व असे आजपर्यंत कोणी केलेंही नसतील, म्हणून यांचीं उत्तरें देण्यास शास्त्री, पंडित, धर्मवेत्ते व इतर लोकहितेच्छु असतील, त्यांणी सर्व गोष्टींचा दूरवर विचार करून व सर्व कल्पना आणि तर्क ध्यानांत आणून उत्तरें दिलीं पाहिजेत. मी रागाचें किंवा चाढीचें उत्तर मागत नाहीं. विचाराचें व सत्याचें उत्तर मागतों.

याकरिता जे कोणी अज्ञानाचे दास नसतील, त्यांणी मन मोकळें करून भागवताचे वाक्याप्रमाणे "मनःपूतं समाचरेत्" खरें दिसेल तें बोलावें, लोकांची लाज धरूं नये. ज्यांणी स्वदेशाचेच हिताचे विचार केले आहेत व जे सर्व शास्त्रें जाणतात, व जे बहुश्रुत व देशोदेशींचे इतिहास जाणतात, त्यांसच हे प्रश्न सुलभ आतील, असें मला वाटतें. कारण जे लोक विचारी आहेत, त्यांचें मन अज्ञानाचें दास्यत्व किंवा कोणत्याही मताचा पक्षपात करीत नाही; वास्तविकपणाने व विचाराचे धोरणाने सुबुद्धि करून ते चालतात. यास्तव माझे देशचे लोक विविध जातींचे आणि मुख्यत्वेंकरून ब्राम्हणजातीचे ( कारण की ब्राम्हण हिंदु लोकांचे धर्माध्यक्ष आहेत), याजकरिता त्यांस माझी अशी प्रार्थना आहे की, माझे प्रश्नाचीं उत्तरें यावीं. व मी त्या गोष्टींचें 'होय' म्हणून प्रतिपादन करणार आहें. तेव्हा कोणाचा पक्ष सिद्ध होतो, हें पाहूं ! आणि सिद्ध झाल्यानंतीं सर्वांनी तसेंच आचरण करावें आणि स्वदेशाचे हितास झटावें, ही मुख्य धर्म सुधारणा आहे.

स्वदेशास जें हितावह तें करावें. जसें आपण मातोश्रीस बंधु मानतों व तिच्या पोटीं जे आले ते सर्व बंधुप्रीतीने वागतात. तद्वत् या जमिनवर जे आपण आहोंत, ते सर्व एकमेकांचे बंधु आहोंत. व हा देश आपणां सर्वांची मातोश्री आहे. याजकरिता कोणी सुखी व द्रव्यवान् असतील, त्यांणी बहुत लोक उपाशी मरतात व दरिद्री आहेत, त्यांचें रक्षण होण्याचा प्रयत्न करावा. आपण सर्वांनी आज दोन हजार वर्षेपर्यंत यथेच्छ सुखाने झोप घेतली व कांहीं उद्योग केला नाही. म्हणून आता तरी जागृत होऊन काय आहे, तें

पाहूं व बुद्धीचा उपयोग करूं.

मेल्यावर आपण एकमेकांस उपयोगी पडणार नाही. तेव्हा या जन्मांत ही संधि लोकांवर उपकार करण्याची आहे, ही सोडूं नये व आयुष्याचा व्यय दुसऱ्यांचे हिताकरिता करावा. तो व्यय सुखकारक आहे, आणि दुसऱ्यास सुखप्राप्ति करणें हें स्वता आपणांस लहान सौख्य नाही. तुम्ही जेव्हा निर्वेध बसाल तेव्हा तुम्ही चांगलें काम केलें असेल, त्यास आठवून केवळ सुख पावाल; परंतु वाईट काम केलें, तर कुत्र्याचे मरणानें मराल. याजकरिता मी इतका तुम्हांस विनवीत आहें.

---

पत्र नं० ७८ १४ आक्टोबर १८४९

## राज्याविषयी विचार

सांप्रत काळीं हिंदु लोक मूर्ख; त्यांस राज्यकारभार करतां येत नाही व आपलें राज्य सांभाळण्याची ताकद नाही. याजकरिता पहा त्यांस किती संकटें प्राप्त झालीं आहेत की, गवरनरापासून असिस्टंट कलेक्टरपर्यंत व कमांडर चीफपासून एनसाईन× व सोजीरपर्यंत दुसरे देशचे लोक भाड्यानें आणले आहेत. ते कसे म्हणाल तर त्यांनी लाखो रुपये पगार आम्हांपासून घ्यावा आणि स्वदेशास जावें. त्यांचीं घरेंदारें इकडेस कांही नाहीत. त्यांचे हातीं पैसा गेला तो इकडे अगदी यावयाचा नाही. अशा प्रकारचे लोक आम्हांस भाडेकरी आणून राज्यकारभार करावा लागतो.

हेच भाडेकरी जर इकडे राहतील आणि आम्हां लोकांमध्ये घरेंदारें

× एनसाईन– शिपाई.

नांदतील, तर एवढें दरिद्राचें कारण रहाणार नाही. पूर्वी मुसलमानांचें राज्य होतें, तरी मुसलमान जे आले ते इकडे राहिले. याजमुळे ते आमचेच देशचे झाले. आणि जसें स्वदेशांत सर्व श्रीमंत नसतात परंतु कांही लोक श्रीमंत असतात; तसें मुसलमान श्रीमंत लोक होते व त्यांचा परकी भाव गेला. तद्वत् इंग्रज लोक इकडे रहातील, तर ते आमचे देशचे होऊन त्यांत व आम्हांस कांही विशेष अंतर राहणार नाही.

परंतु सांप्रत काळीं कारण विपरीत झालें आहे. आता या देशचे लोक इंग्रजांइतके कायीक होऊन त्यांचेबरोबर शहाणपणास येण्यास युगें पाहिजेत; परंतु त्यास एक युक्ति आहे की, जर विलायत सरकाराशीं व कंपनी सरकाराशीं फूट झाली किंवा कांही तंटा झाला आणि इकडील गवरनर जनरल वगैरे येथील सर्व राज्य बळकावून राहिले व पुन्हा परत जाण्याचा इरादा ठेविला नाही, तर एकदम आमचे लोक शहाणे होतील आणि राज्याचे अधिकारांत इंग्रजांचे समागमें शिरतील व इंग्रजही आता जसे त्यांस दूर मानतात, तसे मानणार नाहीत. एक, दोन, तीन पिढ्या इंग्रजांच्या इकडे झाल्या, म्हणजे ते आमच्यांतील होतील किंवा फरांशीस वगैरे दुसरे राज्यांतील लोक यांणी हिंदुस्थानच्या व विलायतच्या दरम्यान समुद्राची वाट बंद केली, तर इकडचे इंग्रज इकडेच राहतील व मग त्यांस इकडची काळजी लागेल.

सांप्रत त्यांस इकडची काळजी नाही व इंग्रज लोक राज्य करतात; परंतु याजमुळे किती एक जास्ती खर्च वगैरे अडचणी अशा आहेत की, इंग्रजांकरता इंग्रजी व मराठी दप्तर बाळगावें लागतें; परंतु आणखी इंग्रजांस इकडील किती एक गोष्टी समजत नाहीत. तथापि ते लोक यांजपेक्षा हजारो पट शहाणे आहेत. याजमुळे अडचणी असूनही लोक त्यांस राजी आहेत व मराठे वगैरे लोक पुरते माहितगार असूनही लोक कबूल करीत नाहीत. कारण की, यांचें शहाणपण सर्व लोकांस बुडविण्याकरता उपयोगास येतें.

## वकिलांकरवीं कारभार

आमचे राजे असतात, ते किती मूर्ख असतात! यांचे उदाहरणास बाजीराव पेशवा व साताराचा राजा व दौलतराव शिंदे हीं उदाहरणें घ्या म्हणजे समजेल. साताराचा राजा जसें एखादें चित्र सजवून न्यावें तसा रेसिडेंटाकडे जातो, आणि घरांत पाहिजे तितकी दारू पिऊन मस्त होऊन रहातो. कांही न्यायकारभार करीत नाही. बसला असतां तेथून लोकांनी हात धरून उचललें पाहिजे. ही त्याची शक्ति. एक पत्र सरकारांतून आलें, तर त्याचा जाब लिहिणें तो माहीत नाही. राज्यांत खबर काय आहे, हें यास ठाऊक नाही. रयतेकरवीं विद्या करविणें हें त्यास ठाऊक नाही. फार रकशाला! राजे तर केवळ पशु असतात; परंतु थोर लोकांकडे पहा की, यांस किती ज्ञान असतें? दर एक थोर माणसास वकील पाहिजे. वकिला-शिवाय बोलतां येत नाही. व एखादें पत्र आलें, तर त्याचा जाब लिहून कामदारास दाखवीत फिरतात, आणि मनास येईल तसें यजमानास सांगतात.

बहुधा असें होतें की, वकीलच मालक होतो. आणि मोठे लोक दरता मूर्ख असून त्यांजला कांही समजत नाही, भऊतेंच कातात. आणि वकील लोक हे बहुधा तंटे उत्पन्न करणारे असतात. आणि यजमानास यांत गुंतवून मग आपलेशिवाय कांही होऊं नये, असें करितात. जें काम व्हावयाचें नाही, तें यजमानास सांगतात की, आम्ही करतों.आणि सरकारचा अमलदार यास लाच वगैरे देऊन याजकडून होईल असें म्हणतात. व मग यजमानास असें भासवितात की, त्या वकिलाचा प्रवेश फार, आमच्याने न होईल तें काम हा करील. सर्व कामदार यास अनुकूल आहेत. असें करून मग वकिलास जरूर पडतें की, कामदारावर त्याचें पोटिस्त,+ व यजमानास वेड लावण्यास कामदार अनुकूल आहेत. याजकरिता कामदारास कधी मेजवानी, कधी यजमानाशीं भेट करून देऊन, सर्व काळ कामदाराचें आर्जव करून त्यांस लाच देतात आणि यजमानास बुडवितात. त्यांचे घरांतून हजारो

---

+ पोटिस्त– अन्यायाने खाल्लेला पैसा (?)

रुपये काढले, तरी त्यांपैकी निम्मे आपण खातात आणि निम्मे कामदारास देतात. या प्रमाणे सर्व जहागिरदार व मोठाले लोक यांची हकीकत आहे.

कर्नाटक प्रांतांत जहागीरदार वगैरे आहेत. त्यांचीं तोंडें माणसांसारखीं आहेत, म्हणून मात्र त्यांस माणसें म्हणावीं. नाही तर ते केवळ जनावरेंच आहेत. त्यांचे मनास व जनावरांचे मनास कांही अंतर नाही हें सर्व इंग्रज लोकांस कळतें. व पोलिटिकल एजन्ट व रेसिडेंट हें सर्व जाणून आहेत परंतु ते सावध आहेत. याजकरिता त्यांस राखून ठेवतात. एकदम अन्यायानें बुडवीत नाहीत; परंतु त्यांची किंमत व योग्यता समजती. कित्ती एक सरदार असें समजतात की, कायद्यांत व कानून कांही नाही. एजंट करील तें होईल. यास्तव दरबारांत कधी बोलाविलें, तर मनास येईल तसें बोलतात व मनास येईल तें मागतात.

किती एक सरदार इतके मूर्ख आहेत की, ते साहेब लोकांस म्हणतात, तुम्ही देवांप्रमाणे आम्हांस आहां. तुम्ही जें कराल तें होईल; अशीं भाषणें ऐकून शहाणे लोक या बोलणारांची आपले मनांत किंमत करीत असतील, तें मनांत समजावें. अस्तु. या प्रकारचे आमचे लोक लहान व वडे आहेत. त्यांस न्याय, नीति व वाकबगिरी नाही. असें असून जो बेवकूब असतो, त्यास चांगला माणूस असें म्हणतात. ज्यांस कांही कळत नाही, त्यांस थोर, संभावित म्हणतात व जो अन्याय करितो, त्यास दयाळू म्हणतात. अशा नाना प्रकारचा वाकड्या समजुती आहेत. लोकांस अन्याय करून देतो, त्यास म्हणतात हा थोर व मिंडस्त आहे. जो सरकारचा पैसा लुटूं देतो किंवा रयतेकडून लाच घ्यावयास फुरसद देतो त्यास उदार म्हणतात. दुसऱ्याची लबाडी धरून देतो, त्यास लबाड म्हणतात व सरकार म्हणजे त्यांस असें वाटतें की, जसा समुद्र; त्यांतील कितीही पाणी खर्च केलें, तरी तें सरावयाचें नाही, तद्वत् सरकारचा पैसा सहज खर्चावा.

कोणी विरुद्ध म्हणाला, तर म्हणतात की, अरे, तुझ्या पदरचें काय गेलें ? सरकाराचा पदरचें जातें, सरकारास काय कमी ? सरकारचें खाऊं नये,

तर खावें कोणाचें ? सरकारास लुटूं नये, तर काय गरिबांस लुटावें ? या प्रकारचा पहिल्या काळचा समजुती आहेत. जा काळीं लोक बेकूब, श्रीमंत व राजे होते, तेव्हा ते आपल्या चाकरास पाहिजे तशी वर्तणूक करूं देत होते. त्या समयींची समजूत अद्यापि राहिली आहे; परंतु आता पहिले-प्रमाणे उदारत्व, न्याय व थोरपणा नाही. आताचा थोरपणा व उदारत्व फार शुद्ध आहे. चंदुलाल लोकांचीं घरें बुडवून धर्म करीत होता. असें असतां त्यास चांगला म्हणत होते. हे प्रकार लोकांनी सोडले पाहिजेत व सरकारविषयीचा वाकड्या समजुती सोडल्याशिवाय या लोकांस लायकी येणार नाही. सरकार यांचे हातीं आलें, तर मनास येईल तसा खर्च करतील. पैसा नाहीसा झाला, म्हणजे लोकांचीं घरें लुटतील. असे गैरशिस्त हे लोक आहेत. यांस कायदा, कानू व शहाणपणा नाही. याकरता राज्य करण्यास इंग्रज लोक जरूर झाले.

आताप्रमाणे कधी कोणी पूर्वी राज्य केलें नव्हतें. रामाचें राज्य चांगलें म्हणून कीर्ति आहे; परंतु हल्लींचे राज्यांत एक कमी आहे की, लोकांस रोजगार व श्रीमन्ती नाही; परन्तु शहाणपण नाही म्हणून या गोष्टी नाहीत. शहाणपण असेल व लोकांचे हातीं राज्य असेल, स्वदेशीय अम्मलदार असतील आणि त्यांजकडून जशी इंग्रजांकडून इकडे निष्पक्षपाताने वर्तणूक होते अशी होईल, तर इंग्रजांचे राज्याहून शंभरपट सुख होईल. आणि मग रामराज्यही मागे सरेल, यांत संशय नाही. परंतु असें होण्यास लोकांस समजूं लागलें पाहिजे. व कायदाकानू ठाऊक नाहीत म्हणून वकील लोक वगैरे फसवितात. तसे लोक नसून ज्याचा त्यास आपला प्रपंच सावधगिरीने करतां येतो. इतकें झाल्याअंतीं याच कायद्याने व याच नियमाने हे लोक राज्य बहुत उत्तम करतील. इंग्रज करतात; पण त्यांस परकीपणा आहे. व स्वदेशीय लोक रोजगार नाही याजमुळे एकंदर भिकारी झाले.

परंतु हें जर उत्तम झालें, जातिअभिमान सोडून सर्व लोकांचे

हितांस झटणारे झाले; सर्वांस विद्या करविण्याचा यत्न करूं लागले, ब्राम्हण श्रेष्ठ इत्यादि मूर्ख समजुती सोडून राज्य करूं लागले, महार, रामोशी, कैकाडी, कोमटीदेखील यांनी सुधारले, आणि मोठे कामाचा लायक झाले, तर ईश्वर कृपा करणार नाही, असें नाही.

---

पत्र नं० ८९ २० जानेवारी १८५०

## इंग्लिश सरकार

आमचे लोकांच्या रीति अगदी बदलल्याशिवाय या देशाचें हित होणार नाही व या लोकांस स्वता राज्य चालविण्याचें सामर्थ्य असल्याखेरीज इंग्रज लोक या देशांतून गेले तरी उपयोग होणार नाही. पुनः गर्दी होईल व बेबंदी, अंदाधुंदी, बाजीराई, होळकरी गर्दी, व पेंढारी अशा गोष्टी पुनरपि होतील, आणि कोणाचा जीव व घरदारही निर्भय राहाणार नाही. जो जबरदस्त त्याचे हातीं सर्व जाईल. व जो निर्बल असेल तो उपाशी मरेल. सर्व त्याचें हरण होईल.

यास्तव सूज्ञांनी इंग्रज जाण्याची इच्छा कदापि करूं नये. या प्रमाणे सरकार व या प्रमाणे चांगले सुधारलेले लोक हिंदु लोकांस सोबतीस कदापि मिळणार नाहीत. इंग्रजांचे गुण पाहून हे लोक कांही तरी शिकतील; परन्तु याचे दरम्यान इंग्रज लोक हिंदु लोकांस अगदी भिकारी करूं लागले, तरी इंग्रज सरकारशीं भांडून ज्या ज्या फायदेशीर तजविजी आहेत, त्या करीत जाव्या. असें मोठ्या चाकऱ्या

हिंदु लोकांस देत नाहीत व हिंदु लोकांशीं बहुत भेद ठेवतात. हें मोडण्याचा यत्न केला असतां प्राप्त होईल, आणि भेद मोडतील, हें साध्य आहे. परंतु अगदी इंग्रजांचें राज्य जाऊन हिंदूंचें होणें म्हटलें म्हणजे पुनरपि हिंदु लोकांस मूर्ख करणें आहे. अस्तु.

हें ईश्वरही करणार नाहींच. कारण की, अशा अघटित घटना होणें त्या माणसांच्या कृतीने होत नाहीत; ईश्वरसत्तेने होतात. जेव्हा हिंदु लोकांचा मूर्खपणा जाईल, तेव्हा ईश्वर इंग्रजांस या देशांतून जाण्याची आज्ञा करील. जेव्हा ज्वर जातो तेव्हाच मुखास रुची येते, असा प्रकृतीचा स्वभाव आहे. ही गोष्ट त्वरित सिद्धीस जाणार नाही. हिंदु लोक आज आंधळे आहेत, ते डोळस व्हावयास काय उपाय करावे? हें कळविणें योग्य आहे. असें जाणून हिंदु लोक जे आपले स्वदेशीय परमप्रिय होत, त्यांस मीं उपदेश करतों, हा त्यांनी लक्षांत आणावा. माझी निश्चयरूप खात्री आहे की, असे लोक झाल्याशिवाय हे लोक कदापि सुधारणार नाहीत.

हें कोणतें म्हणाल, तर प्रथम ज्ञान मिळविणें. तें ज्ञान कोणतें, वेदाचें ज्ञान नव्हे. स्वधर्मसम्बन्धी जीं पुस्तकें आहेत, त्यांतील सारांश व जो बोध साधुसंत इत्यादि लोकांनी सारासार विचार करून सांगितला आहे, त्यावरून ईश्वराची दृढ भक्ति व पवित्र अंतःकरणाने ध्यान करावें. हें ज्ञान प्रथम पाहिजे. हें या लोकांस नाही. कोणी ढोंगाने देवपूजेचीं भांडीं मांडून सकाळीं प्रहरभर पूजा करीत बसतो; परंतु देवाविषयी त्यास लेशभर ज्ञान असेल तर शपथ! अंतःकरण पवित्र नाही, नीति नाही. केवळ ढोंगी. गारुड्याचे जसे पेटारे असतात, तद्वत ते संबळया मांडून बसतात. तर असा प्रहर दोन प्रहर बसून वेळ घालविला, तर उपयोग काय? त्यांत ईश्वराची पूजाही झाली नाही, व उद्योगही झाला नाही. केवळ तो आयुष्याचा वेळ व्यर्थ गेला असें जाणावें.

हिंदु लोक हे धर्म म्हणून किती उपद्व्याप करितात, याचा ठिकाण नाही. कोणी जन्मापासून लुच्चा, लबाड, नित्य घरें बुडविणारा व खोटी

जपत करणारा असतो; परंतु तो सकाळीं उठून बागेंत जाऊन स्वहस्तानें तुळशी तोडून नेमानें आणतो, हा नेम कधी टळत नाही. तसे अग्निहोत्री हे नाना प्रकारच्या खटपटी करतात. विस्तव पेटवून त्याचें आराधनेंत वेळ घालवितात; परन्तु त्यांचे अंतःकरणाची शुद्धता नसते. व त्यास नीति नसते. त्यांचें आयुष्य केवळ कर्मठपणांत जातें. वास्तव त्यांच्याने दुसरा कांही उपयोग घडत नाही. यांस एक आणि दोन किती म्हणून पुसलें, तर तीन समजत नाहीत. व्यवहारांतील त्यांस गम्य नसतें. लोक त्यांस पवित्र समजतात आणि पैसा देतात; म्हणून त्यांचें रक्षण होतें. नाही तर ते कशाचे उपयोगी नाहीत. लोकांस उपयोगी त्यांच्याने कांही व्हावयाचें नाही.

असेच भट व शास्त्री हे तर महामूर्ख होत. गोंधळी बरे, पण शास्त्री अधिक मूर्ख. त्यांस लिहितां येत नाही, वाचतां येत नाही, व्यवहार कळत नाही वा हिशेब समजत नाही. कोणी पुसलें की, तुम्ही जन्मापासून केलें काय? तर ते म्हणतात की, कृष्णातीरीं अमक्याचें घरीं जेवणाची सोय होती, तेथे जेवीत होतों व आता बारा वर्षे अध्ययन करून तयार झालों आहें. कोणाशींही वाद करूं, पोथ्या सर्व पाठ आहेत. साठ हजार कौमुदी अवगत आहे. उपस्थिति+ चांगली आहे. याप्रमाणे हे एवढाले मोठे पंडित असतात; पण त्यांस यत्किंचित् ज्ञान नसतें. त्यांजकडे कांही कारभार सांगा आणि मग त्यांचा चमत्कार पहा की, ते किती भितील, किती गोष्टी लोकांस पुसतील! त्यांस लिहिणारा दुसरा पाहिजे. हिशेब करतां येत नाही, स्वतः बुद्धि नाही, शहाणपण नाही; कोणत्याही कामाच्या उपयोगी ते पडत नाहीत.

असें जन्मास आलें म्हणजे अज्ञान, तसेंच ज्ञान असून स्वतः उपजीविका मिळविण्याचें सामर्थ्य नाही. त्यांस कोणी असा श्रीमन्त पाहिजे की, नेहमी पांचशे रुपये घरीं पोचवील आणि शालजोड्या देईल. असो. असा मान करून कोणी त्यास जवळ ठेवलें, म्हणजे मग शास्त्रीबावा बहुत शोभतात.

---

+ उपस्थिति- परिचय; माहिती.

परंतु श्रीमंतांचा आसरा नसूं द्या, म्हणजे मग त्यांची काय अवस्था होईल ती पाहा. हे काय करतील? यांस कांही व्यवहारी विद्या येतच नाही. व्यापारधंदा कांही कळत नाही व कायदाकानू कांही माहीत नाही. असे गोळे असतात. अशा लोकांचें तुम्ही काय कराल?

बरें, लोकांस उपदेश करण्यास योग्य म्हणावें, तर तेंही नाही. त्यांचे हातून चांगला उपदेश व्हावयाचा नाही व धर्माची सुधारणा व्हावयाची नाही. केवळ ढकिरड्याचा ढीग आणि त्यांचें पढणें सारखें आहे. मला कोणी तरी दाखवावें की, शास्त्र्यांचा अमुक उपयोग आहे. कांही दिसत नाही. ज्या देशांत असे लोक मूर्खशिरोमणी आहेत, तेथे दरिद्र, कुनीति, अज्ञान, मूर्खपणा, हेच वृद्धिंगत होत जातील. व हल्लीचे गृहस्थ जे आहेत, ते बदलून दुसरे प्रकारचे झाले पाहिजेत. यांच्या आधारावर हे सर्व मूर्खपणा वाढवितात. सरकारचा आसरा आता नाही; परंतु रयतेचा खुशीचा आसरा अजून फार आहे. तो देऊं नये असें या गृहस्थांस कळलें पाहिजे.

कोणी गृहस्थ एका भटापासून एक चंडी म्हणवितो आणि त्यास रुपया देतो. कोणी गृहस्थ शास्त्र्यांचें बोलणें करवितो, व त्यांस शालजोडी देतो, व कोणी अग्निहोत्र्यास इनाम देतो. या प्रमाणे देऊन निरुपयोगी माणसें वृद्धिंगत करतात. हेंच देणें उपयोगास लागलें, तर किती फायदा होईल? द्रव्यवान् असेल त्याणे आपलें द्रव्य नदींत टाकलें, तरी तो व्ययच झाला व व्यापारांत ठेविलें किंवा धर्म केला, तरीही व्ययच झाला; परन्तु चांगलें कोणतें, याचा विचार करावा. एक लबाड कावळे बावा म्हणून उत्पन्न झाला. त्याने चार लुच्चे जमा करून ढोंग उभें केलें. तें मुळी पुण्यांत उभें केलें. त्याचें मूळ प्रसिद्ध आहे व त्या बावाचें दुराचरणही प्रसिद्ध आहे. तो चार मजूरदार उभे करून ढोलकीं, झांज, वीणा वाजवीत लोकांचीं कानटाळें बसवीत तो पुण्यांत ओरडत फिरे. याप्रमाणे तो लबाड ढोंगी सर्वांस ठाऊक असून त्यास पैका मिळाला. व लोक त्याचें आचरण न पहातां, व त्याने आपली स्त्री त्यागिली व आणखी किती एक लबाड्या केल्या, त्या मनांत

न जाणतां त्याचे माथ्यावर डोकीं ठेवितात, त्यास पैसा देतात व फुलें घालितात, हे तमाशे पुण्यांतील सर्व लोकांस माहीत आहेत. असें तमाशाचे फडावर लोक मिळतात, तसें या बाबाचे भोंवते तुळशीबागेंत लोक जमत आणि त्याची कोणी थट्टा करीत, परन्तु भजन करणारे शेकडो होते. म्हणून त्यांस द्रव्य मिळालें. तो बाबा बडोद्यास गेला व मुम्बईस गेला, परन्तु त्याने द्रव्यच मिळविलें. कोठे भिकारी झाला नाही. तस्मात् सर्व ठिकाणीं हिन्दु लोक सारखे मूर्ख आहेत.

म्हणून धर्म कोणास कळत नाही. ईश्वराचें भय कोणाचे मनांत नाही. परधर्म त्यांस वाईट वाटतो; परंतु एक चमत्कार पहा की, जो प्रथम स्वधर्म टाकून दुसरा धर्म घेतो, त्याची हेळणा फार होते. जो मूळचा परधर्मी किंवा दोनचार पिढ्यांचा आहे, त्याचा द्वेष लोक करीत नाहीत. याचें कारण की, लोकांस धर्माचा द्वेष येत नाही; परंतु चाल व जात मोडण्याचा येतो. धर्म कसा काय, हें ते जाणत नाहीत. रूढि जाणतात. व त्या रूढीविरुद्ध जे चालतात, त्यांचा द्वेष करितात. अस्तु. याप्रमाणे धर्मांविषयीं लोकांच्या समजुती आहेत. त्या जाऊन सर्वांस शहाणपण येऊन ते धर्मात्मे झाले पाहिजेत.

नीति, ज्ञान विस्तीर्णतेने लोकांमध्ये प्रसिद्ध झालें पाहिजे, व ढोंगी लोक नाहीसे झाले पाहिजेत. वरती उदाहरण एकच लिहिलें आहे, परंतु असे किती एक ढोंगी लोक या हिंदुस्थानांत फिरून गृहस्थांचा पैसा खात आहेत. त्यांचा उपयोग कांही नाही. हे लोक कमी होऊन, वास्तविक विद्वान् वाढून ते आपल्या ज्ञानाचा उपयोग लोकांस करतील व जे लोकांची नीति, धर्म व सदाचरण वृद्धि करण्याचा प्रयत्न करतील, त्यांस मात्र लोकांनी द्रव्य देऊन त्यांचें चालवावें.

असें न करतील, तर मग त्यांपेक्षा मजुरी करणारे बरे. ते आपल्या पोटास मिळवून खातात. परंतु असे लोक फुकट खावयास योग्य नाहीत. जे उगेच ढोंग माजवून बसतील आणि लोकांस सांगतील की, आम्ही देवा-

## विद्वानांनी विचार करावा

अवळ पारायण केलें, आम्हीं उपास केले, आम्हीं प्रदक्षिणा घातल्या, आम्हीं नवस केला, आम्हीं तपश्चर्या केली, आम्ही पंढरपुरीं रहातों, आम्ही आळंदीस रहातों, व आम्ही यात्रा करितों; तर या लोकांस देण्याचा संबंध काय ?

एकाने पंचविसावे वर्षी संन्यास घेतला आणि मग यात्रा करण्याकरिता पैसा मिळविला. मला वाटतें की, हा मूर्ख संन्यासी आहे. याला रोजगाराने पैसा मिळविण्याचा टाकून संन्यासी व्हावयास कोणीं सांगितलें? बरें, संन्यासी झाला, तर मग भीक मागीत कां फिरावें? तसेच यात्रेकरू, तसेच लग्न करण्याकरिता पैसा मागणारे, हे सर्व लोक बेकूब आहेत. हे सर्व उद्योग करून पोट भरतील तर चांगलें. व गृहस्थांनी असा विचार द्रव्यें-करून कदापि वृद्धिंगत करूं नये.

मला मोठा चमत्कार वाटतो की, एक मनुष्य येतो आणि म्हणतो, माझें लग्न व्हावयाचें आहे; मला दोनशे रुपयांचें साहित्य पाहिजे. ज्या मनुष्यास साहित्य नाही, तो लग्न करतो कशास? तसेच बैरागी शंभर असामींचा मेळा घेऊन फिरतात. ते सगळे जर चाकरी ठेविले, तर एक रिजमिंट चांगलें भरेल, असे ज्वान, बळकट असतात. आणि म्हणतात की, आम्ही यात्रा करीत फिरतों व त्यांस लोक पैसा देतात. पण हीं ढोंगें मोडून सर्व लोकांस शुद्धीवर आणलें पाहिजे. तसेंच विद्वान जे लोक आहेत, त्यांणी स्वदेशाचे व्यवहार, रोजगार व द्रव्य यांची वृद्धि कशाने होईल ? जगांत वर्तमान काय चाललें आहे ? लोकांची दशा काय झाली आहे ? याचा विचार केला पाहिजे. केवळ व्याकरण पढून जन्म घालवून उपयोग नाही. ही रीत मोडेल, तेव्हा या देशाची सुधारणा होईल, हें सत्य आहे.

# इंग्रज सरकार

इंग्रज सरकार या देशांत आहेत, याविषयी लोक उघड नाही, तरी मनांतले मनांत कुरकुर पुष्कळ करितात व मुख्यत्वेंकरून भट, पंडित, शास्त्री हे तर फार हेराण आहेत; परंतु माझें मत असें आहे की, या देशास हेंच सरकार ठीक आहे.

प्रथम असें पहा की, मागलें सरकार किती वाईट व मूर्ख होतें. जिकडे तिकडे जुलूम होत होता. हें हल्ली जे इंग्रज सरकारचे पदरीं मराठे अमलदार आहेत, त्यांची वर्तणूक कशी आहे, हें पाहिलें म्हणजे ध्यानांत येतें. याच प्रकारचे मागे सर्व लोक होते. त्यांनी देशाची सुधारणा व विद्यावृद्धि कांहीच केली नाही. फक्त भट, वैदिक या मूर्ख लोकांचें पोषण करून राखिलें. तसेच पेंढारी, रामोशी, काटक, डाकवदे, ठक, चोर इत्यादिकांस राखिलें आणि देशांत लूटसांड पुष्कळ करीत.

होळकर स्वतः श्रीमंतांचा चाकर असतां त्याने पुणें लुटिलें, व लोकांचे हाल केले, अशा सरकारास कोण चांगलें म्हणेल? जो बळकट असेल, तो मात्र पोटभर खाई. पाहिजे त्याने शेतभात, गावघर लुटावें; दादफिर्याद कोठे लागत नव्हती. हल्ली हैदराबाद, ग्वाल्हेर येथे वर्तमान काय आहे, तें पहा, म्हणजे मागील राजाचें सर्व लक्षांत येईल.

तेव्हा मागील राज्य अगदी वाईट होतें, हें सिद्ध आहे. याशिवाय हल्ली आमचे लोकांस राज्य मिळालें, तर तीच अवस्था करतील. तेव्हा हेंही उपयोगी नाही. बरें, दुसरे देशचे लोक मोगल, फरासीस वगैरे आले, तरी तेही वाईट लोक आहेत. यास्तव इंग्रज हेच सुधारलेले चांगले लोक आहेत. यांचें राज्य या देशांत आहे, हेंच चांगलें. व ईश्वराने हे आम्हांस चांगले राजे दिले आहेत, हें उचित दिसतें. याहून चांगले राजे आम्हांस कदापि

मिळणार नाहीत. याशिवाय हे सरकार लोकांची सुधारणा करण्याकरितां अत्यंत मेहनत करीत आहे. त्यांस विद्या शिकवितें. तीही कशा रीतीने शिकवितें की, लोकांस तर जुलूम वाटूं नये.

त्यांचीं देवस्थानें वगैरे सर्व कायम पहिल्याप्रमाणे ठेवून त्यांची मर्जी राखून, त्यांस वाईट न वाटतां शिकविण्याची तजवीज चालविली आहे. इतक्या युक्तिप्रयुक्तीने कदापि कोणी राजा या लोकांस शहाणा करणारा होणार नाही. इंग्रज लोक अत्यंत सुधारलेले म्हणून या रीतीने त्यांनी विद्यावृद्धीचें व लोकसुधारणेचें व त्यांच्या जुन्या मूर्ख समजुती जाण्याचें काम चालविलें आहे. इतकी तजवीज कोण करील? आतां येऊनजाऊन इतकेच म्हणतात की, अद्यापि ते लोकांस मोठ्या चाकऱ्या देत नाहीत; परंतु मोठी चाकरी देण्यास लायक लोक अद्यापि झाले नाहीत.

ज्या लोकांस लांच खावा हें पाप वाटत नाही, ज्यांस ब्राम्हणांपेक्षा कुळंब्याचा जय कमी व्हावा, असें वाटतें; त्यांस विद्यावृद्धि व्हावी, असें वाटत नाही, लोकांस कायदे कोणचे असावे, पहिलें शास्त्र कोणत्या योग्यतेचें व पुढें कायदे कोणत्या योग्यतेचे असावे, हें समजत नाही, व कायदा राज्यास असावा, हें अवश्य आहे किंवा नाही, हें राजास कळत नाही; व आपले जातीचा अभिमान धरावा हें वाटतें, व पक्षपात करावा हें वाटतें, व फौजेस कवाईत पाहिजे, हें वाटत नाही. सुधारणा काय पाहिजेत, हें माहीत नाही, व्यापारवृद्धि होण्याची रीति ठाऊक नाही; अशा लोकांस चाकरी कशी देतील? जा काळीं हे लोक सुधारतील, त्या वेळीं खचित त्यांस मोठ्या चाकऱ्या देतील.

या लोकांस सरकार म्हणजे लोकांचा कारभार करणारे आहेत, त्यांत अन्याय केले, तर सर्व लोकांचा घात होईल, हें त्यांस वाटत नाही; सरकारास लुटावें, सरकारचा पैसा खावा, सरकारचें काम जहालें तर जहालें, न जहालें तर न जहालें, असें त्यांस वाटतें; अशा लोकांस मोठी चाकरी काय उपयोगी? वास्तव हे लोक सुधारल्यावर सरकार त्यांस अधिकार देण्यास

कमी करणार नाहींत, हें लोकांनी पक्कें समजावें. याजकरितां सरकारचे कृपेस पात्र होण्याची इच्छा मात्र धरावी.

परंतु सांप्रत काळीं लोक अगदीं उलटें करीत आहेत. नाच नाचतात, कवाल्या करितात, विद्यावृद्धीस मदत करीत नाहींत, सर्व सरकारनें करावें, असें इच्छितात. व जर सरकार चांगलें करीत असेल तर वाईट समजतात, व सरकारास लोक सुधारण्याचे कामांत अगदीं मदत करीत नाहींत. सरकारानें आज जर असें म्हटलें कीं, अमुक अनुष्ठानाचा व अमुक देवस्थानाचा खर्च व्यर्थ होत आहे, तो मोडून अमुक विद्यावृद्धीचें काम करितों, तर लोकांस पसंत होणार नाहीं. दक्षणा पहिली मूर्खरीतीनें देत होते, तिचा कांहींच उपयोग नव्हता. तेच रुपये जर नीट खर्च केले, तर बहुत उपयोग होऊन लोक शहाणे होतील, परंतु असें जर केलें, तर लोक खुषी नाहींत.

लोकांस असें वाटतें कीं, पहिला मूर्खपणा कायम ठेवावा; आळशीपणाचे स्वभाव कायम ठेवावे, म्हणजे तें सरकार चांगलें; परंतु लोकांनी या दुर्बुद्धि सोडून देऊन सरकारास हरएक कामांत मदत करावी, हें योग्य. म्हणजे सरकारास आनंद होतो आणि त्यांचे हातून सुधारणा पुरतेपणीं होते. हल्लीं फार तर काय परंतु जेथें म्हणून सरकारी शाळा आहेत, तेथें लोकांच्या कमिट्या आहेत, परंतु त्या पंचांस पुसलें तर कधीं त्यांणीं शाळा पाहिली नाहीं, असें सांगतील व शाळा आहे किंवा नाहीं, याविषयीं संशयास्पद बोलतील. जे सुपरिंटेंडेंट येतात, त्यांस पंचांस शोधावें लागतें व बळेंच परीक्षेचे दिवशीं उभे करितात, ते मनापासून मेहनत करीत नाहींत.

कोणी जर सरकारी कामदार असला, तर त्यास सरकारी काम विशेष नसलें, तरी तेंच ओझें वाटतें व दुसरे काम करावयास कंटाळा येतो. जर कामदार तरुण असला, तर कचाटीचे कामांत, नाच-तमाशांत रात्रंदिवस काळ घालवितो, त्याच्यानें सरकारी काम देखील चित्त घालून करवत नाहीं. मग शिवाय काम होणार कोठून! व जर तो म्हातारा जुना कधीं असला, तर त्यास सरकारी काम आटपून घरीं जाऊन स्नानसंध्येस संध्या

काळीं व प्रहरभर सकाळीं गोष्टी सांगत देवतार्चन पुढे मांडून बसावें लागतें. त्यास सरकारी कामाशिवाय दुसरें काम पाहणें व शाळा पाहणें, हें तर असें वाटतें की, व्यर्थ काळ गेला. यांत धर्म नाही, पुण्य नाही, देवपूजाही नाही तेव्हा कशास करा?

देवपूजा प्रहरभर केली, म्हणजे चार भिक्षुक वगैरे मूर्ख येतात, ते म्हणतात की, 'वाहवा! दादासाहेब मोठे भक्तिवान् व पुण्यशील. दोन प्रहर स्नानसंध्येंत घालवितात व सरकारी काम संभाळून नित्य नेमाने हें चालवितात,' अशी स्तुति करितात. ती गोड लागून त्याला शाळा पहाण्याचें मोठें संकट पडतें.

या प्रमाणे लोकांचे उदासीन स्वभाव आहेत. विद्यावृद्धीविषयी व शिवाय किती एक दुसरें प्रकरणांत असेंच आहे. सरकारास मदत मिळत नाही. यास्तव सरकारचा उपाय नाही. तर हे स्वभाव लोकांनी सोडले पाहिजेत.

---

पत्र नं० ९८

## डौल व नेटिव राजे

आमचे लोकांची बुद्धि अद्यापि सुधारली नाही. याजमुळे त्यांस अद्यापि असें वाटत नाही की, आम्ही मूर्ख आहों.

इंग्रज वगैरे युरोपियन आपणांस केवळ मूर्ख म्हणतात व आम्हांस दुसऱ्यांपासून बुद्धि शिकोन घेतली पाहिजे. एखादा सरदार याचा डौल पाहिला, म्हणजे त्यास असें वाटतें की, वाहवा, हा मोठा सरदार, याचा डौल फार, हा थोर. परंतु त्याची योग्यता व गुण पहात नाहीत. फक्त त्याचें सोनें-रुपें पाहून त्यास चांगला म्हणतात. गाईकवाड यांचा डौल पाहून सर्व लोक म्हणतात की, पहा यांची नजांत लक्ष्मी, आणि इंग्रज हे भिकारी. यांस

स्वारी नको, चोपदार, हत्ती, उंट कांही नको. असें म्हणतात.

पण कोणी असें मनांत आणीत नाही की, या ढोलाचा कांही उपयोग नाही. इंग्रज लोक ढोलाची गरज ठेवीत नाहीत. फक्त कामाची गरज ठेवितात. बरें, निरुपयोगी ढोल लोकांस दाखवावयास बाळगीत नाहीत. दहाच माणसें बाळगतात; परंतु चांगलीं सर्व उपयोगी पडावीं, अशा रीतीचीं बाळगितात; परंतु आमचे राजे ढोली. त्यांस आम्ही थोर, हें स्वारी मोठी करून दाखवावयाचें असतें; परंतु पराक्रमहीन, गुणहीन, त्यांस कोणी पुसत नाही. गोंधळी व ते बरोबर. याजमुळे ते दहाचांच्या खर्चांत ५० माणसें बाळगतात; परंतु ते कांही उपयोगी पडावयाचे नाहीत. असें असतां ही देशांतील आळशी लोक त्यांस चांगलें म्हणतात. हें केवढें आश्चर्य आहे!

कोणास हा विचार कळत नाही की, हे गोंधळी, बऱ्हाडी, दिसतात चांगले; सोनें, रुपें, हिरे यांचे दागिने अंगावर घालून नटतात व सजतात, परंतु त्यांच्या तोंडांत कोणीं मारली, तर त्यांचा हातदेखील वर होत नाहीं. इतके अज्ञानी व अशक्त असतात. मग त्यांचा उपयोग काय? याजकरितां हा ढोल कांही उपयोगी नाही. राजाने जितका लोकांच्या रक्षणार्थ खर्च लागेल, तितकाच करावा. अधिक केला, तर तो दोषी व चोर होतो; परंतु ही गोष्ट राजे मनांत आणीत नाहीत. आणि राज्य हातीं लागतांच लोकांची गरज सोडून देतात आणि मनास येईल तसें द्रव्य उडवितात. त्यांस त्याची लाज वाटत नाही. याजकरितां ढोलाची प्रीति अगदी करूं नये, तर बरें.

फौज पाहिजे व उपयोगाच्या सर्व गोष्टी पाहिजेत. तसेंच आमचे लोक धर्म करणें, तोही उपयोग मनांत आणून करीत नाहीत, याजमुळे बहुत पैसा व्यर्थ जातो; परंतु लोक असे मूर्ख आहेत की, जो मनुष्य अशी पैशाची उडव करितो, त्यास चांगले म्हणतात व आळशी लोकांचें पोषण व निरुपयोगी व्यय पाहिला, म्हणजे त्यांस चांगलें म्हणतात. अशा गोष्टींस चांगल्या म्हणणारांत प्रमुख कसबिणी आणि भट आहेत. हे लोक बहुत लोकांस वेडे करितात. पैशाची उधळपट्टी जितकी होईल, तितकी त्यांस हितावह आहे, म्हणून उत्तेजन देऊन उधळपट्टी करवितात; मग त्यांत जरी मोठाले अनर्थ झाले,

तरी चिंता नाही; परंतु आपलें पोट भरलें, म्हणजे झालें. कदाचित् म्हणतात, त्याने इतका अन्याय केला; परंतु ब्राम्हणभक्त व ब्राम्हणाचे घरांत सर्व पैका घातला. तस्मात् तो पुण्यवान् प्राणी आहे.

याजमुळे जो आता लोकांमध्ये संभावितपणें वागतो, त्यास मुख्य गोष्ट ही करावी लागते की, भटांची मर्जी राखिली पाहिजे. भटांस देणें हें मोठें लौकिकाचें धोरण आहे. जरी कोणास असें वाटलें की, भटांस देणें निरुपयोगी आहे, तरी त्याचा उपाय नाही. ही लौकिकाची गोष्ट आहे. जर भटांस दिलें, तर लौकिक होतो. 'धर्मात्मा, धर्मात्मा' म्हणून भट उठवितात; नाही तर निंदा करतात. गाईकवाडास म्हणतात की, तेरा हजार रुपये इंग्रजी शाळेस दिले, ते भटास देते, तर बरें होतें. धर्म करावयाचा टाकून शाळेस पैसा कशास दिला? असें म्हणतात. तात्पर्य, शाळा घालणें, विद्या वाढविणें हें त्यांस धर्मकृत्य वाटत नाही. टोणपे भटांस लौकिकाकरिता देतात, त्यास धर्म म्हणतात.

याजमुळे असें सिद्ध होतें की, ब्राम्हण आपलें पोट भरावयाचें मात्र उद्योगांत असतात. कांही उपयोगी काम न करितां व विद्या न करितां फक्त शास्त्रीबुवा, मोठे थोर, असे म्हणून बसल्या जाग्यावर जो देईल तो धर्म, असें समजतात. शाळा घालणें हा धर्म त्यांस वाटतच नाही, हा केवढा चमत्कार आहे? प्रथम त्यांस असें वाटतें की, आम्हांस शिकावयाचें कांही राहिलेंच नाही. संहिता पाठ म्हणतों, आता विद्या शिकावयाची राहिली काय? असें वाटून त्याशिवाय विद्या शिकविण्यास कोणी पैसा देईल, तर त्यांस दुःख वाटतें. आणि व्यर्थ पैसा टाकला असें वाटतें.

परंतु या मूर्खांस असें कळत नाही की, पाठ म्हणणें व अक्षरें तीन-तीनवेळां उलटसुलट म्हणणें ही विद्या नव्हे, हा मूर्खपणा आहे. वास्तव असा मूर्खपणा वाढविणारे त्यांस द्रव्य देऊन पाठ म्हणणारे मात्र पढविले, असें होईल. नवीन विद्या काय शिकविली, नवीन इतिहास त्यांस काय कळला व लोकांतील दुर्गुण त्यांणी कोणता कमी केला, नवीन शोध त्यांणी काय

काढिले, हें पहावें. फक्त जेथे रहातील तेथे पुष्कळ भाडें करवितील; क्षीर व दक्षणा मिळवितील. एवढा मात्र या विद्वानांचा उपयोग आहे. हे विद्वान कसे, हें कोणी विचार करून पहात नाही.

जे फक्त पाठ म्हणणारे, अक्षरशत्रु, अर्थ कांही कळत नाही, व्यवहार प्रकरणीं बोलतां येत नाही, त्यांपासून रयतेचे विचार व लोकांस चांगल्या रीतिभाती व शहाणपण लावणें कसें होईल ! मूर्ख कुळंबी, शेतभात करणारे व भिकारी यांहूनही निरुपयोगी जड आहेत, त्यांस विद्वान म्हणतात. आणि असली विद्या पढावी, म्हणून इच्छितात, ही चूक आहे. आजपर्यंत ही विद्या वाहून लोकांची घरें बुडालीं. इंग्रज लोक इकडे येऊन आम्हांस शिकवूं लागले, आम्हांस शहाणपण नाहीसें झालें; आम्हांस कांही ठाऊक नाही, हे भटाचे विद्येचें परिणाम झाले. जर हे लोक खरी विद्या म्हणजे ज्ञानाचा शोध करावयाचा तो करिते, तर इंग्रज इकडे येण्याचे पूर्वी आम्हीच त्यांचे देशांत का गेलों नसतों ! परंतु यांचे देशची वार्तादेखील इकडे ठाऊक नाही. मग आणार कोठून ! वास्तविक विद्या काय, ती यांस कळत नाही व पुढे पाऊलही टाकीत नाहीत. आपसांत रडत बसतात; परंतु विचार कोणीच करीत नाहीत. कर्माचें आमंत्रण केलें, तर पांचशे लोक येऊन चार घटका येऊन बसतील; परंतु विचाराचे सभेस जमावयाचें असेल तर एकही येणार नाही व एकाच्यानेही भाषण व विचार सयुक्त होणार नाही.

असे हे लोक निर्बल व वेडे झाले. मग त्यांच्या तोंडांत प्रथम मुसलमानांनी मारली. नंतर इंग्रजांनी मारली, याचें आश्चर्य काय आहे ! त्यांच्याने आपलें रक्षण होईना, उगेच बसवेना, आपसांत भांडूं लागले. चोऱ्या, दरोडे घालूं लागले, रोज स्वतः दरोडे घालूं लागले, तेव्हा त्यांचें पारिपत्य करण्याकरिता इंग्रज यांची योजना ईश्वराकडून या देशांत झाली, हें सर्वोत्कृष्ट आहे. लोकांनी असें जाणावें की, हे लोक आम्हांस उत्तम गुण व चांगल्या नीति व विचार व विद्या देऊन जातील, यांत संशय नाही.

---

# २ विद्यावर्धन

'विद्या शिकण्याचा हक्क सर्वांचा आहे,' (७७) अशी घोषणा करून लोकहितवादींनी 'जुन्या पंडितांस' बजाविलें आहे की, विद्येच्या प्रसारामुळे देशांतले मूर्ख लोक नाहीसे झाले, म्हणजे मग तुम्ही अगदी सपशेल फसाल ! जुनी संस्कृत विद्या शिकण्याचें निष्कारण स्तोम त्या वेळीं माजलें होतें व अर्थशून्य पाठान्तरालाच विद्वत्ता म्हणण्याचा प्रघात पडला होता. विद्या कोणाला सांगूं नये, पढवूं नये, फक्त लोकाश्रयावर वा राजाश्रयावर स्वस्थ 'चरत' रहावें, असा विद्वानांचा परिपाठ होता. त्या सर्व प्रकारांमुळे वैतागून लोकहितवादींनी लिहिलें की, "संस्कृत विद्या निरुपयोगी" आहे. तिजमुळे "नाना प्रकारचे कुतर्क उत्पन्न" होतात. " संसारावरील चित्त उडवून आळशी करणारी " ती आहे. ( ८४ ) कारण असल्या विद्येमुळे तत्कालीन 'विद्वान्' कसे आळशी व ऐतखाऊ होते, हें त्यांनी प्रत्यक्ष अनुभविलें होतें. इंग्रजी विद्येपुढे आणि इंग्रज विद्वानांपुढे आमचे पंडित अगदी फिके पडत. त्यांची स्थिति हास्यास्पद होती. म्हणून " मनुष्यास लाकडें तोडण्याचें कसब शिकविलें तर बरें- परंतु हें व्याकरण नको " ( ८६ ) असें त्यांनी प्रतिपादिलें. " केवळ सडकेवर माती वहाण्याची मजुरी व स्तोत्रपाठ सारखाच आहे, " ( ६९ ) असें त्यांना पटलें होतें.

निरर्थक संस्कृत पठन केल्याने प्रगति कांही साधत नाही. उलट देशाबद्दलचा विचारदेखील तसल्या पाठान्तरी विद्येने विद्वानांनाही सुचत नाही, म्हणून ही जुनी विद्या नको. " देशाचें हित व देशांत द्रव्य कसें येईल, याविषयी तर " आमच्या या विद्वानांस " धुळाक्षर शिकविलें पाहिजे, " ( १०१ ) असें त्यांना म्हणावें लागलें. यांत अत्युक्ति नव्हती. त्या वेळच्या शास्त्रीपंडितांचें एकंदर आचरणच असें होतें की, कोणासही त्यांचा व त्यांच्या त्या विद्वत्तेचा (?) तिरस्कार आला असता. यासंबंधी भरपूर पुरावा इतउत्तरच्या पत्रांत आढळतो. " शास्त्री-

पंडितांखेरीज दुसरे कोणी पुढारी" ( ८६ ) मिळाल्याविना आमची प्रगति होणार नाही, असें लोकहितवादींना वाटे, तें सकारणच होय.

जुनें तें सर्वच वाईट, असें मानण्याकडे त्यांची प्रवृत्ति नव्हती. "विद्या पहिल्यासारखी असती तर अशी अवस्था न होती" ( ११ ) असें ते म्हणतात. पूर्वीची शोधक बुद्धि आता आणखी तल्लख केली पाहिजे. पूर्वींच्या शोधांत आपण नवी भर घातली पाहिजे, असा तर त्यांचा आग्रह आहे. आमची प्रगति कशी स्थगित झाली आहे, याचें लोकहितवादींनी वर्णन मार्मिक केलें आहे. "जसा तांब्या पूर्वी करीत होते, तसाच आता करतात; पोथी जशी पूर्वी लिहीत, तशीच आता लिहितात. ...... ज्या वस्तऱ्याने आता हजामत करतात, तोच... हजार वर्षांमागे होता. जसें आज धोतर नेसतों, तसेंच ... हजार वर्षांपूर्वी नेसत होतें." ( ८२ ) "जें जातें व्यासाच्या वेळेस होतें तेंच आता आहे. जो नांगर पांडवांचे वेळीं होता, तोच आता आहे." (१०१)

ही परिस्थिति बदलण्यास नवे ग्रंथ झाले पाहिजेत; नव्या विद्या शिकल्या व शिकविल्या पाहिजेत. इंग्रजीचें ज्ञान वाढलें पाहिजे. "ग्रंथ छापणारे यांस पैसा द्यावा, हें सर्वांपेक्षा उत्तम; या देशांत अति उत्कृष्ट धर्म हाच आहे." ( ९२ ) "जशीं बुकें तसे पंतोजी तयार झाले पाहिजेत." ( ९७ ) प्रवास करून त्याबद्दल पुस्तकें लिहा; इंग्रजी ग्रंथांत वाचाल ती माहिती इतरांस सांगा; राज्य करण्याची पद्धत चांगली कोणती, तें चौकशी करून ठरवा; इतर देशांत काय चाललें आहे, तें पहा; शहाणपण मिळवा, असा एकसारखा कळकळीचा टाहो लोकहितवादी फोडीत आहेत, असें वाटतें.

जुन्या पंडितांवर व त्यांच्या घोकंपट्टीवर लोकहितवादींचा विशेष कटाक्ष असला, तरी तो निरर्थक नव्हे. त्या वेळीं ब्राम्हणी दंभाचा अतिरेक झाला असून, अज्ञानालाच विद्वत्ता म्हणण्याचा प्रघात पडला होता. म्हणून लोकहितवादींना इतक्या स्पष्ट व कडकपणें टीका करावी लागली. खरी विद्या कोणती व ती कशी संपादावी, याबद्दल त्यांनी व्यक्त केलेले विचार आजच्या घटकेसही उपयुक्त वाटतात.

# २ विद्यावर्धन


३ पुण्यांत लायब्ररीची स्थापना
३१ इंग्रजी विद्या
३३ अर्थशून्य ब्राम्हणविद्या
५० स्वराज्यांतील विद्वान
६३ अर्थावाचून पाठ करणें
६९ संस्कृत आणि इंग्रजी विद्या
७७ पाठ करण्याची चाल
८१ प्राचीन ग्रंथांचे अर्थ
८१ प्राचीन ग्रंथांचें महत्त्व
८४ संस्कृत विद्या
८६ सांप्रतचे पंडितांचें ज्ञान
९३ नवीन ग्रंथांची आवश्यकता
९७ सुशिक्षा व पंतोजी ……
१०१ संस्कृत विद्या
१०३ पंडितांची योग्यता


---

# पुण्यांत लायब्ररीची स्थापना

पुणें येथील पुस्तकगृहाविषयी वर्तमान आपल्यास लिहितों.

पुण्यासारखे शहरांत विद्याशाळा वगैरे बऱ्याच आहेत; परंतु ग्रंथ वाचण्याची जागा अद्याप लोकांस माहीत नवती व तिचा उपयोग कोणा नेटिव लोकांस माहीत नवता; परंतु सांप्रतचे गवरनरसाहेब सर जार्ज क्लार्क यांणी लोकांचे सुधारणेकडे लक्ष देऊन जड्ज साहेब हेनरी मौन् यास सुचविलें की, पुण्यांत लायब्ररी स्थापण्याचा बेत करावा. त्याजवरून त्यांनी तारीख २८ जानेवारी, साल मजकुरीं सर्व लोकांची सभा जमवून त्यांस हा मजकूर निवेदन केला. तेव्हा बुधवारचे वाड्यांतील इंग्रजी शाळेंतील अभ्यासी लोकही पुष्कळ हजीर होते, त्या सर्वांनी अनुमोदन दिलें, व अदालतीकडील चाकरमंडळी व सरदार लोक यांणीही बरें आहे, असें म्हटलें. पुण्यांतील किती एक आळशी लोकांस लायब्ररी काय, हें माहीत नाही. याच कारणामुळे सरदार लोकांनी व कामदार लोकांनी उदारपणाने पैसा दिला नाही. तथापि अजमासें दीड हजार रुपये जमले आहेत.

सभेपैकी दहा असामी कमेटींत नेमून लायब्ररीचे कायदे ठरविल्यानंतर पुनरपि तारीख ४ थी फेब्रुवारीस दुसरी सभा भरली. त्या वेळेस कमिटीपैकी एके गृहस्थाने विद्येचे उपयोगाविषयी महाराष्ट्रभाषेंत एक निबंध केला होता, तो वाचून दाखविला. पुण्यांतील बहुत गृहस्थांस सांप्रत काळीं विद्या आणि ज्ञान काय आहे, याविषयी समजूत नाही. व ते आज बहुत वर्षे स्वस्थ घरीं बसून इंग्रज सरकारची देणगी खात आहेत. याजमुळे अशा कामांत ते झटून पडत नाहीत. व त्यांस कितीही समजून सांगितलें, तरी त्यांच्या जा जुन्या व पोकळ समजुती आहेत, त्याच ते खऱ्या धरतात. व त्या बदलण्यास बहुत दिवस पाहिजेत. याच कारणाने दुसरे सभेंत

आणखी जास्त पैसा जमला नाही; परंतु असें ठरविलें की, लायब्ररीचें काम पहाण्यास एक धाकटी कमिटी असावी. व तिचीं नांवें त्याच वेळेस लिहिलीं आणि लायब्ररीवर एक असामी नेमून बुधवारचे वाड्यांत कलेक्टरसाहेब यांणी कृपा करून जागा दिली आहे, त्या ठिकाणीं तारीख ७ वी फेब्रुवारी-पासून लायब्ररी सुरू झाली.

अद्याप गृहस्थांपैकी कोणी ग्रन्थ वाचावयास व ज्ञान संपादन करा-वयास येत नाहीत. शाळेतील विद्वान मंडळी, ज्ञानेच्छु व विद्याभ्यासी मात्र येतात. सरदार लोक येत नाहीत. त्याविषयी मला असें वाटतें की, आम्ही थोर, चार शिपाई, घोडे, अबदागीर बरोबर घेतल्याशिवाय बाहेर कधी पडत नाही. तेव्हा या लायब्ररींत मुलांसारखें शिकण्यास जावयाची त्यांस लज्जा वाटत असेल; परंतु अज्ञानामुळे आणि अनश्रुतपणामुळे त्यांची अशी अवस्था जहाली. तथापि तिचा परिहारोपाय ते ग्रहण करीत नाहीत, हें आश्चर्य आहे. ज्यांस अन्नवस्त्र मिळतें, ते म्हणतात की, आम्हांस विद्येची काय गरज आहे व ज्यांस मिळत नाहीं ते पोटापाठीमागे लागतात. तात्पर्य, अक्कल वाढविण्याचें काम कोणाच्याने होत नाही. असो. या अडचणी कांही दिवसांनी दूर होतील व ज्ञानाचें संपादन नेटिव लोकांत चालू होईल.

सांप्रत काळीं तर आपले शास्त्रांत व देशांत काय आहे व इंग्रज लोक हे कोठून येऊन राज्य करितात, व यांची व्यवस्था काय आहे, हें कोणास माहीत आहे का? म्हणून विचारलें, तर नाही म्हणून बहुतेक शपथ करतील; तेव्हा कोणाचे अमलांत आपण आहों, हें ज्यांस कळत नाही, त्यांचें अज्ञान काय वर्णावें? परंतु हें दूर होण्याचें साधन गवरनरसाहेबांनी लायब्ररी चालू केली, याबद्दल त्यांची कीर्ति बहुत काळपर्यंत राहील आणि आज नेटिव लोक तिचा लाभ समजत नाहीत, तरी पुढे कधी काळीं समजून स्तुति करतील व पुणें येथे मेहरबान ग्रॅनसाहेब अड्ज होते, त्यांणी या कामास फार आश्रय दिला, त्यांचे योगाने हें काम सिद्धीस गेलें, असें लोक आठवितील, अशी आशा आहे.

## द्रव्य हें विद्येचें सार ?

गवरनरसाहेब यांणी हिंदु लोकांचें अज्ञान दूर होण्याचा उपाय पुण्यांतच केला असें नाही; परंतु नगरासही केला आहे. व इतर ठिकाणीं जागोजागचे रेसिडेंट वगैरे अधिकारी यांस तसेंच करण्याविषयी हुकूम पाठविले आहेत. गवरनरसाहेबांचे प्राइव्हेट सेक्रेटरी कपतान फ्रेंच यांणी ही प्रवृत्ति चालू करविली, याबद्दल त्यांचेही मोठे उपकार समजले पाहिजेत. परंतु मला फार दुःख वाटतें की, आपले लोक ज्ञान संपादन करणें, हें लहान मुलांचें काम असें समजतात, आणि शिकत नाहीत. आता जे असें म्हणणारे आहेत, ते कांही जाणतात, असें असतें, तर मी क्षमा केली असती; परंतु ते केवळ अडाणीवरचे किंवा सांबापुढचे असून, विद्येस असें तुच्छ मानितात व थोडें खावयास मिळूं लागलें, म्हणजे आपली अप्रतिष्ठा होईल, असें समजून वाचणें व अभ्यास करणें सोडून देतात, याबद्दल वाईट वाटून त्यांचा फार राग येतो.

दुसरें, ज्यांजवळ द्रव्य आहे, ते मदांध; त्यांस असें वाटतें की, आम्हांमारखे कोणीच नाहींत. विद्या काय आहे? विद्येचें सार जें द्रव्य तें आम्हांजवळ आहे, असें त्यांस वाटतें व ते आपणास सूर्यचंद्राइतके उंच समजतात. ही खोडी नेटिव लोक लवकर टाकतील, तर बरें आहे; पूर्वी यांची हीच खोडी होती; परंतु ती बाहेर ब्यंगोमी × सारखी दिसत नव्हती. कारण पुण्यांत पेशव्यांचें राज्य होतें व त्यामुळे कित्येक प्रतिष्ठेने पैका मिळवीत होते, म्हणून त्यांचें ज्ञान व अज्ञान आजपर्यंत दिसलें नाही.

परंतु आता तो समय नाही. आता बाहेर काय आहे, हें समजून आपली नीट अवस्था कशाने होईल, हें पहाण्याची वेळ आहे. म्हणून नेटिव लोक आता आळस व गर्व न करतील, तर फार चांगलें होईल. असो. हली लायब्रींत ३०० बुकें आहेत व अखबारा चार आहेत. बरेंच चाललें आहे व पुढे सुधारेल, अशी आशा आहे.

---

× ब्यंगोमी– !!

# इंग्रजी विद्या

पुणें शहरांत प्रथम १८३२ सालीं इंग्रजी शाळा घातली, तेव्हां लोकांची अशी समजूत होती की, इंग्रजांचा स्पर्श झाला, तर स्नान करावें व इंग्रजांची भाषा शिकली, तर ब्राम्हणपणा जातो. यामुळे त्या समई रॉबर्टसन साहेब कलेक्टर यांनी आजेंयाने गृहस्थांचीं मुलें थोडीशीं जमविली. नंतर कांही दिवसांनी पुष्कळ लोकांच्या समजुती बदलल्या आणि खुषीनें मुलें पाठवूं लागले; परंतु पहिल्या समजुतीचे ब्राम्हण अद्यापि बहुत आहेत. त्यांच्याने लोकांस इंग्रजी शिकण्यापासून तर बंद करवत नाही; परंतु आपल्या मंडळींत ते असें बोलतात की, जे इंग्रजी शिकले आहेत, ते नास्तिक, निर्दय, अधर्मी, अमर्याद आहेत. परंतु त्यांची योग्यता पाहिली, तर ते केवळ मूर्खांचे शिरोमणि आहेत. जरी त्यांस लिहितां वाचतां येतें, तरी ते पंडित नाहीत. त्यांची समजूत इतकी क्षुद्र आहे की, लिहिणें आणि वाचणें ही तमाम विद्या, यापुढें त्यांस कांही कळत नाही. तथापि त्यांस वाटतें की, आम्ही सर्वज्ञ आहों.

आता असे गर्विष्ठ मूर्ख लोक आहेत, त्यांना उत्तर देणें योग्य नाही. कारण की, शुद्ध वेड्यांशीं वाद करणें निष्फळ आहे. जरी माझें म्हणणें असें नाही की, केवळ इंग्रजी लिहितात आणि बोलतात ते विद्वान्, असें मी म्हणत नाहीं. कारण की जे कुलकर्णी असतात ते लिहितात. त्यांस पंडित कोणी म्हणावें ? तसेंच जे केवळ 'रायटर'च आहेत, त्यांस विद्वान् म्हणणें अयोग्य आहे; परंतु ज्यांनी विद्येचें रहस्य जाणलें आहे व बहुश्रुत आहेत, त्यांचा मात्र पक्ष आम्हीं घेतों. आणि आम्हांस ठाऊक आहे की, एक इंग्रजींतील विद्वान् आणि शंभर संस्कृतांतील पंडीत आणि एक लक्ष कारकून व दोन लक्ष भट हे सारखे कदाचित् होणार नाहीत. भटांचें वर्णन पूर्वी आम्ही केलें आहे. हल्ली कारकुनांचें थोडेंसें करितों.

## मोठे प्रतीचे मजूरदार

ब्राम्हण लोक कारकुनीचा धंदा फार करितात, आणि गृहस्थ म्हणविताात. परंतु वास्तविक पाहिलें, तर त्यांस कळतें काय ? संध्येचीं अक्षरें साळुंखीसारखीं किंवा राघूसारखीं पाठ करितात. मोडीचें लिहितात, वाचतात. साधारण कामकाज कारकुनीचें करतां येतें. परंतु हे मोठे प्रतीचे मजूरदार. जसे सुतार, न्हावी, धोबी तसेच ब्राम्हण कारकून; यांत त्यांचा विद्वानपणा कांहीच नाही. हजारो कारकून आहेत; परंतु एकाने एक ग्रंथ तरी जन्मादारभ्य रचला आहे ? शहाणपणाची गोष्ट बोलण्यास एक क्षण घालविला आहे ? असे शुंभ जे आहेत, त्यांची योग्यता किती ? जाने चार शास्त्रें अध्ययन केलीं आहेत, त्यांचीदेखील योग्यता इंग्रजींतील पंडितांशीं बरोबर नाही. कारण की, मुळी आधी संस्कृत भाषेंत ग्रंथ आहेत किती ? ग्रंथांचे संख्येवरून विद्येची तुलना होते, हा नेम आहे. सर्व पुस्तकें जर जमा केलीं, तर फार झालें तर एक कोठडी भरेल. तेव्हा तितकीं जाने वाचलीं किंवा अवलोकन केलीं, त्याचें शहाणपण सारखें कसें होईल ? जितकें बीज तितकें पीक. जाने पायलीभर दाणे पेरलें आणि जाने खंडीभर पेरलें, त्याचें उत्पन्न सारखें कसें होईल ?

इंग्रजीमध्ये तर कोट्यवधी ग्रंथ आहेत. त्यांत अनेक विद्या आहेत. तितक्या संस्कृतांत नाहीत. चौदा विद्या आणि चौसष्ट कला इतकी संख्या जेव्हा हिंदु लोक फार शहाणे व पराक्रमी व विद्येवर लक्ष देणारे होते व जेव्हा व्यास–वाल्मीकि होते, तेव्हा इतकी गणना झाली आहे; परंतु इंग्रजींत एक हजार विद्या आहेत. प्रत्येक विद्येवर हजारोच ग्रंथ आहेत. संस्कृतांत कांही विद्या इतक्या सूक्ष्म आहेत की, एक विद्येवर एक ग्रंथ जसा युद्धविद्येवर धनुर्वेद. दुसरा ग्रंथ नाही व धनुर्वेदही नाहीसा झाला. कोणी वाचीन म्हणेल, तर मिळावयाचा नाही. आणि इंग्रजींत जसे म्हटलें तसे आहेत.

याचें कारण संस्कृतांतील विद्येचे चाहाणारे ब्राम्हण होऊन गेल्यास दोन तीन हजार वर्षें झालीं. तेव्हापासून ब्राम्हण मूर्ख झाले. विद्या म्हणजे काय, हें देखील विसरले. त्या शब्दाचा अर्थही त्यांस कळत नाही आणि जसे हिंदु लोक व्यासाचे वेळीं विद्याप्रवीण होते, तद्वत् इंग्रज आता आहेत.

त्यांचें चित्त विद्येवर फार व ते ज्ञानी बहुत झाले. व त्यांचे ग्रंथ फार उपयोगी आहेत. हिंदु लोकांचे ग्रंथ मेंढणावळीचे आहेत. तर इंग्रजी पंडित तो संस्कृतांतील पंडिताशीं सारखा कसा होईल! अशी लेंड्या पंडितांची मति, लेंड्या कारकून आणि भट हे काय पदार्थ! हे तर कसपटें दिसतात. जो इंग्रजींतील पंडित आहे, त्यास किती विद्येचें ज्ञान असतें! त्याची समजूत केवढी विस्तीर्ण! आणि त्याचा विद्वानपणा केवढा! त्याची योग्यता लोक समजत नाहीत. त्यास दूषण लावितात. इंग्रजींतील विद्वानांची अशी योग्यता आहे की, त्यास कोणताही विषय सांगा, त्याविषयी तो ग्रंथ लिहूं शकेल. कोणत्याही विषयावर बोलूं शकेल. जें जें या पृथ्वींत आणि आकाशांत आहे, तें सर्व त्यास ठाकठीक दिसतें आणि चंद्र फिरतो, याचें आश्चर्य त्यास वाटत नाही. दगड वरती उडविला, म्हणजे खाली पडतो, याचेंदेखील कारण त्यास माहीत आहे. तात्पर्य त्यास कोणत्याही विषयी आश्चर्य वाटत नाही.

कारकून हे भटाचे पंक्तीचे आहेत. मूळ हिंदू लोकांमध्ये विद्येचें मान इतकें कमी आहे की, त्यांस विद्या म्हणजे काय, हें अश्रुत आहे. जर कोणाची विद्या वर्णन करणें झाल्यास म्हणतात की, अमका केवढा शहाणा! पत्र लिहितो! मजकूर जुळून लिहितो. अक्षर चांगलें सुंदर. आता हें कांहीं विद्वानाचें वर्णन झालें नाही. विद्वान् म्हणजे काय, ज्याची बुद्धि विशाल, ज्यानें नवीन ग्रंथ ऋषींसारखे लिहावे, ते विद्वान्. हल्ली गृहस्थास यांतील कांहीं ज्ञान नाही. त्यांस धर्म म्हणजे काय, याचा अर्थ पांच हजार कारकून गोळा केले आणि पुसला तर सांगूं शकणार नाहीत व संध्या कशाकरिता करितात, हेंही कोणास ठाऊक नाही. असे अंधारांत जे लोक आहेत, त्यांस विद्येचें मूल काय ठाऊक! इंग्रजी विद्वान् पूर्वी हिंदुस्थानांत एक असता, तर राज्य न जातें. हे भट कारकून असे मूर्ख जमा झाले, म्हणूनच हें राज्य बुडालें. जर विद्या पहिल्यासारखी असती, तर हिंदु लोकांची अशी अवस्था न होती; परंतु हीं जनावरें पाहिजे तेथे दोरीने बांधावीं अशीं गरीब, म्हणून असें झालें. पुढे जरी हिंदू लोकांचें कल्याण झालें, तर इंग्रजी पंडितांचे हातून

होईल, यांत संशय नाही.

कारकून व भट हे क्षीण झाले म्हणजे व इंग्रजी विद्या वृद्धिंगत झाली म्हणजे हिंदू लोक पूर्वस्थितीवर येण्यास उशीर नाही. हल्लीचे गृहस्थ व इंग्रजी शिकणारे विद्वान् यांचें वैमनस्य असण्याचें कारण असें आहे की, त्यांचीं यांचीं मतें मिळत नाहीत. कारकुनास असें वाटतें की, अंगरखा घालणें व गंध लावणें व पाणीचा ओढा घालणें, हाच आमचा धर्म. तसें इंग्रजी विद्वानास वाटत नाही. कारण की, हे ज्ञानी आहेत. तेव्हा त्यांचीं मतें वास्तविक आहेत. ते म्हणतील डावे हाताने गरिबास पैसा दिला, तरी सारखाच, उजवे हाताने दिला तरी सारखाच; परंतु कारकुनास वाटतें की, जा हल्ली चाली आहेत, तोच धर्म. चाली व रीति आणि धर्म यांचा भेद त्यास कळत नाही. चालीस व रीतीस व धर्मास सारखेंच मानतात; कारण ते अक्षरशत्रु आहेत. व चालीविरुद्ध कोणी बोलेल, तर त्यास नास्तिक म्हणतात. नास्तिक म्हणजे काय, हेंही त्यास कळत नाही; परंतु ऐकीव शब्द माहीत आहेत. तसेंच निर्दय म्हणण्याचें कारण असें आहे की, गरिबास व विद्वानास धर्म करावा, तें आडून दुसऱ्यास देणें यास धर्म समजतात. शहाणे आहेत ते तसें करीत नाहीत. म्हणून त्यांस असें वाटतें की, हे निर्दय आहेत. जो विद्वान् आहे, तो गरिबास धर्म करितो; परंतु ब्राम्हण, कारकून व भट यांचा अशा समजुती आहेत की, दांडग्या व मूर्ख भटास धर्म करावा. अधर्मी म्हणतात की, याचें कारण असें आहे की, धर्म म्हणजे काय, हें यांस ठाऊक नाही, म्हणून असें म्हणतात.

वास्तविक पाहिलें, तर इंग्रजी विद्वानाप्रमाणे मला धर्मिष्ट कोणीच दिसत नाही. तो अनुभवेंकरून व ज्ञानेंकरून ईश्वराचें प्रतिपादन करितो. सर्वत्र तो आहे, असें त्यांस वाटतें. त्यास सर्वत्र ईश्वर दिसतो. ते त्याचे भजनांत तत्पर असतात, व जें कर्म करितात, तें सर्व ईश्वरार्पण करितात. व त्याची स्तुति करून कायावाचामनेंकरून ईश्वरास भजतात. कारण की, इंग्रजींत ईश्वराविषयी अनेक ग्रंथ आहेत. व इतर देशांतील जें सर्व ईश्वरी

ज्ञान आहे, तें सर्व इंग्रजींत आहे, व त्या ग्रंथांचे तर्जुमे त्या भाषेंत आहेत. त्यामुळे शंभरपट जास्ती ज्ञान इंग्रजींत आहे. आणि अमर्याद म्हणण्याचें कारण असें आहे की, हिंदू लोकांची त्यांत कारकून व भट यांची मुख्यत्वें-करून अशी चाल आहे की, गुलामगिरी करावी. लबाडी करावी. तोंडदेखलें बोलावें. खुशामत करावी. दुसऱ्यास बुडवावें. ठगाच या—असा इत्यादि फसविण्याकरितां मानपान करितात, आणि त्यास मर्यादा असें म्हणतात. परन्तु ही मर्यादा नव्हे. वास्तविक ज्ञानी आहेत, ते लबाडीचा व्यवहार करणार नाहींत, व गुलामाप्रमाणे कोणाची मर्यादा करणार नाहींत. ते खरेपणानेच चालणारे, त्यांस हें कपट कशास पाहिजे ?

कारकून हे बहुधा भडवेपणांत असतात. जसा वरिष्ठ असेल व बोलेल तसें बोलावें. कोणीकडून तरी आपलें पोट भरावें. लाज राहूं न राहूं ! ईश्वराचें नांव तर त्यांचे मनांत मुळींच नाहीं. ईश्वर आहे याची खात्री असेल, तर त्याचें भय मानतील. बहुधा हिंदु लोकांमध्ये मर्यादा हा गुण नाहींच. कपटाशिवाय कोणाची कोणी मर्यादा करीत नाहींत. एखादा मोठे कामावर असला, म्हणजे त्यास पुष्कळ लोक चांगले म्हणतात. मेजवान्या करितात, परंतु तें सर्व मायावी. मनापासून नाहीं, परंतु जे विद्वान् आहेत, त्यांचा स्नेह, मर्यादा आणि मायाही अशी नसते. ते निष्कपटाने, निर्मळ अंतःकरणाने वागणारे असतात. यामुळे लोकांस अमर्यादा वाटते. त्यांची अशी समजूत आहे की, कोणी लबाडलुच्चा असला, तर त्याचा मान करावा, त्यास थोर म्हणावें; परंतु विद्वान् हें कसें करील ? तसल्या चोरास तर काय मारणार, म्हणून अमर्याद म्हणतात; परंतु तसें नाहीं. आपण गर्दभ असलें, तरी मोठ्यास ओळखावें, हें चांगलें.

तात्पर्य, पुण्यांतील व बाहेर ठिकाणचा ब्राम्हणाचा मूढपणाचा समजुती लवकर जातील, तर बरें होईल. सारांश, इंग्रजी विद्वान् यांचा पक्ष आम्हीं सिद्ध केला आहे. आणि तो वास्तविक आहे. परंतु ब्राम्हणाचा मूर्ख समजुती, याजमुळे ते भलतेंच समजतात.

# अर्थशून्य ब्राम्हणविद्या

आपले लोकांत ज्ञानशून्यता जहाली आहे. तिचें प्रबळ कारण असें आहे की, लोक अर्थाखेरीज विद्या शिकतात. ब्राम्हण लोक वेद पाठ करितात, परंतु अर्थशत्रु असतात. तसेंच गृहस्थ सहस्रनामें, स्तोत्रें, इत्यादि म्हणणारे पुष्कळ आहेत; परंतु अर्थाविषयी शून्य. येणें करून फक्त तोंडाची मात्र मजुरी करितात. आणि मनाचा कांही उपयोग करीत नाहीत.

कोठे कीर्तन व पुराण असलें म्हणजे लोक जातात; परंतु कोणी मौज पहावयास जातो, कोणी उगाच दिवे पहावयास जातो, कोणी तंबाखू खात बसतो, कोणी अवाच्य भाषणें बोलत बसतो; परंतु देवालय पवित्र जागा हें कोणाचे लक्षांतच नसतें. तसेंच भट वेदपाठास जमले, म्हणजे याचप्रमाणे अवस्था होते. व स्वतः म्हणणारे तेही आपलें लक्ष देवाकडे लावीत नाहीत. तंबाखू व भांग ओढीत असतात. तसेंच लोक पूजा व संध्या करतात; परंतु पुष्कळ गृहस्थांचे येथेही मीं असें पाहिलें आहे की, पूजेची खटपट रुप्याचे देव्हारे शोभेकरिता मांडतात. व ढोंगाकरिता रुद्राक्षमाळा व सोंगाकरिता भस्म लावितात, परंतु मनांत तर कांही एक नाही, आणि संपूर्ण दरबार कारभार तो रिकामा वेळ समजून करितात. तेव्हा सांप्रत काळचे लोकांमध्ये वास्तविक देवाचें भजन नाही. अक्षरें मात्र पाठ म्हणतात, परंतु अक्षरांनी कांही उपयोग आहे काय ? नुसतें पाठ म्हणण्याने पुण्य आहे, असें समजतात. हेंच सर्व धर्म बुडावयास, व अज्ञानास मूळ झालें आहे. ब्राम्हण मोठा दशग्रंथी म्हणवितो, परंतु त्यास एका शब्दाचा अर्थ समजत नाही. ज्योतिष, छंद व व्याकरणाचें सूत्र इत्यादि पाठ म्हणतो. आता यासारखा मूर्खपणा कोठे आहे ? व्याकरण, अष्टाध्यायी पाठ म्हणून त्याचा कांही उपयोग नाही. जर समजलें तर मात्र त्याचा उपयोग. तें न होतां फक्त पाठ म्हणतात, आणि

# अर्थशून्य ब्राह्मणविद्या

आम्ही विद्वान् ब्राह्मण म्हणवितात. त्यांची विद्या कोठे आहे ! जर मनुष्य अर्थ समजणार नाही आणि शब्दांची ध्वनि मात्र करील, तर म्हैस रेकली तद्वत् मनुष्याने आक्रोश केला, इतकेंच झालें. मनुष्याच्या भाषणाचा गौरव काय तो अर्थावर आहे. तो अर्थ समजला नाही तर पशु, पक्षी ध्वनि करतात, तसाच तो मनुष्य ओरडतो. परंतु ज्ञानाने बोलत नाही.

सांप्रतचे ब्राह्मण विद्येविषयी केवळ जनावरें आहेत, त्यांस अर्थज्ञान नाही. येणेंकरून धर्मावरील भाव व आस्तिक बुद्धि भ्रष्ट झाली. आणि वेद, शास्त्र, पुराणें हीं परव्याचा किंवा कमाणाचें गाणें यासारखीं झालीं. देवाचे प्रार्थनेस बसलें, म्हणजे जी मर्यादा, निष्ठा व मनाची तत्परता असावी ती नाही; कारण की, हे सर्व गुण ध्वनीपासून येत नाहीत. अर्थज्ञानापासून येतात. व देवाचें माहात्म्य हृदयांत वागलें, म्हणजे सहजच तशी वर्तणूक होते. ज्या शब्दांनी ईश्वराचें वर्णन झालें, ते शब्द जर आपणास कळले, तर मात्र त्यासारखी वर्तणूक उत्पन्न होईल. आणि ते शब्द जर अर्थविरहित ऐकले, तर तसें होणार नाही. ब्राह्मणांचीं पठणीं आमचे कानीं पडतात. त्यांचा अर्थ म्हणणारास कळत नाही व ऐकणारास कळत नाही. उभयतां शंख आणि एक मान डोलवितो व वाः वाः म्हणतो आणि भटांना शाबासकी देतो. जे पाठ म्हणतात आणि अर्थ जाणत नाहीत, त्यांसारखे मूर्ख व व्यर्थ आयुष्य घालविणारे पृथ्वीत थोडेच असतील. मागील युगांत असे वेडे ब्राह्मण नव्हते. ते सार्थ म्हणत होते. सार्थ म्हणण्याची पद्धति ज्या दिवसापासून बुडाली, तोच दुर्भाग्याचा फेरा या लोकांस बसत आला. कारण की याजमुळे ब्राह्मणांचें तेज गेलें, ते मूर्ख झाले व त्यांजपासून गृहस्थ वगैरेच कर्म कामलें. जो उठला तो पाठ म्हणतो. 'अरे मूर्खा, पाठ म्हणून फळ काय?' असें सांगणारा कोणीच नाहीसा झाला.

मला वाटतें की, पहिले ब्राह्मण ज्ञानी होते. परंतु पुढे काही काळाने त्यांची प्रजा ही मूर्ख झाली. पूर्वी सर्व ब्राह्मण पोथीवरून म्हणत असत. आणि पोथीशिवाय म्हणूं नये, असें शास्त्र आहे. पुढे ईर्षेने म्हणता म्हणता

पोथिशिवाय किरकोळ अनुष्ठानें करूं लागले. नंतर कोणी त्यांजवर चढ करून सर्व वेद पाठ म्हणूं लागल. मग भट वेगळे व श्रौतकर्म चालविणारे ब्राम्हण वेगळे, असे दोन पर्याय झाले; परंतु दोघेही अर्थशून्य. संस्कृत भाषेत पाठ म्हणतात. नमस्कार करावा, विष्णुस्मरण करावें, तांब्यांत पाणी ओता, हे देखील शब्द मंत्रांत मोडतात. ब्राम्हण संस्कार पाठ करितात. हा मूर्खपण्या पाहून चमत्कार वाटतो की, अर्थ जाऊन हें ज्ञानशून्य म्हणणें आलें कसें? आणि हें लोकांस इतकें प्रिय झालें कसें?

अर्थ म्हणजे शब्दामध्ये जसा जीव. तो जर नाही तर ते शब्द प्रेतवत् आहेत. छत्तीस अक्षरांवर हजारों भाषा आणि हजारों शास्त्रें झालीं आहेत. म्हणून अक्षरांची मातबरी नाही; परंतु भटमंडळी हें मनांत आणीत नाहीत. त्यांनी आता विरखडें ठेवावी, आणि पाठ म्हणावयाचा गर्व सोडून द्यावा व चौसष्टी उलटण्यांत कांही अर्थ नाही, हें खचित जाणावें. पोथी घेणें यांत लज्जा नाही; परंतु सार्थ वेद म्हणावा. एणेंकरून फार चांगलें आहे. मनाची सुधारणा होईल, तें करावें. स्मृतिची सुधारणा हें पोपटाचें कर्म. तशींच सहस्रनामें, स्तोत्रें व पूजा हीं सार्थ म्हणावीं. उगीच मजुरी करूं नये. म्हणजे त्यातील अर्थ कळून त्याप्रमाणे वागणूक होईल. बाहेरचें ढोंग दाखवून उपयोग काय? देवपूजा कंठाळभर मांडली आणि मनांत कांही नाही, तर ती व्यर्थ आहे.

# स्वराजांतील विद्वान

हिंदु लोकांचे राजधानींत कांही विद्या वाढविण्याचा प्रयत्न होत नाही. पेशव्यांचें राज्य दक्षिणेंत होतें, परंतु कांही विद्यावृद्धि झाली नाही. व विद्यावृद्धि करणें, हा सरकाराचा धर्म आहे, असें एकहील लोक मानीत नाहीत.

जेथे जेथे हिंदु लोकांच्या व मुसलमान लोकांच्या राजधान्या आहेत, तेथे शास्त्री, पंडित, वैदिक, गवई इत्यादि विद्वानांचा समुच्चय असतो, परंतु त्यांच्या विद्येचा लोकांमध्ये कांही उपयोग होण्यासारखी तजवीज होत नाही. कशी म्हणाल, तर शास्त्री फार शास्त्रपारंगत विद्वान् असला, म्हणजे राजाने त्यास गाव व वर्षासनें द्यावीं, आणि मग शास्त्रीबावांची गाठ्हेलीक पडायची मुष्किल. सर्व दिवस घरांत बसून असावयाचें आणि सरकारचें वेतन खाऊन स्नान, संध्या, देवपूजा करावयाची. तीत सकाळपासून दोन प्रहरपावेतों सोवळें व दुपारून निद्रा आणि संध्याकाळीं क्षणभर बाहेर पडले तर पडले. वर्षासहामासीं जेव्हा कचेरींत बोलावणें येईल, तेव्हा मात्र त्यांची विद्या बाहेर पडावयाची; पण तीही नेमलेल्या लोकांतच. तेथे भलत्याचा प्रवेश व्हावयाचा नाही. असें करून त्यांनी आपलें आयुष्य घालविलें.

तसेंच वैद्यबावा. मोठे कीर्तिमान पण गरिबाचे घरीं औषध द्यावयास जावयाचे नाहीत व त्यांची गाठ पडावयाची नाही. त्यांत घूतचिन्हें वगैरे पाहून वार, तिथि इत्यादि सुलक्षणें मिळतील, तेव्हा वैद्याची पुडी सुटावयाची. तोंपर्यंत रोगी मरून जाईल; परंतु वैद्य बाहेर पडणार नाही. त्यास असें वाटतें की, मला सरकारांतून पैसा मिळतो, तितक्यापुरतें मी राजास मात्र औषध देईन. इतरांस काय म्हणून देऊं ? इत्यादि गर्वाच्या समजुती व निर्दयपणा त्यांचे अंगीं आहे. तसाच गवई मोठा प्रख्यात जो आहे, तो

राजाचे येथे पांचशे रुपये दर महा खात असतो; परंतु कधी प्राण गेला, तरी तो लोकांस शिकवावयाचा नाही. दोन शेर भांग ओढून घरीं बसलेला असेल. आणि राजाचें बलावणें येईल, तेव्हा मात्र त्याकडे जाईल. नाही तर तो कोणाजवळ कधी आपला गुण दाखवील, असें होत नाही. व त्यास असें वाटतें की, गरीब लोकांपुढे मी काय गाऊं? माझी योग्यता केवढी? मी महान् थोर व हे भिकारी. यांचा हिशेब काय? असें त्यांस वाटतें; परंतु विद्वानांचे अंगीं इतके दुर्गुण लागण्याचें कारण, जे त्यांस खावयास देतात, ते होत. जर करता राजांनी त्यांस मार्गास लाविलें, तर ते लागतील; परंतु राजे त्यांस बळेंच मूर्ख व गर्विष्ठ करितात.

जो कोणी विद्वान् आहे, त्यास राजाने सांगावें की, तुम्हांस दोनशे रुपये ( किंवा किती त्याची योग्यता असेल तो ) दर महा पावत जाईल; परंतु घरीं आळसांत बसून पावावयाचा नाही, कांहीं शिष्य मिळवा, त्यांस तयार करा, नवीन ग्रंथ लिहा; व जांस संस्कृत भाषा येत नाहीं, त्यांसही शास्त्राचें मर्म समजावें, यास्तव संस्कृत ग्रंथांचीं प्राकृत भाषांतरें करून लोकांस ज्ञानी करा, तरच तुम्हांस पगार मिळेल. असें जर सांगतील तर विद्यावृद्धि होईल. तेवढ्याच खर्चांत लोकांचा फायदा होईल, ज्ञान वाढेल, जे विद्वान आहेत, त्यांचे गुण सर्वांचे दृष्टीस पडतील व त्यांचे हातून शिष्य तयार होतील. व येणें करून विद्वानांस गर्व रहाणार नाही. व हल्लीं असे विद्वान आहेत, तितक्यांस कांही तरी लांछन असतें, तसें असणार नाही.

परंतु ही गोष्ट राजे वगैरे अमीर लोक आहेत, त्यांस कळत नाही विद्वानांचें पोषण करावयाचे इच्छेने लाखो रुपये ते खर्च करितात; परंतु ते मातींत टाकितात. जो विद्वान् व थोर असेल, त्यास पुष्कळ पैसा देऊन राजाने आश्रित करावें; परंतु त्यास ताकीद असावी की, जे कोणी येतील, त्यांस फुकट शिकवीत जावें, औषध देत जावें. त्यास खर्च लागेल तो आम्ही देऊं. आणखी त्याजकडे कांही कारखाना सांगावा की, जेणेंकरून गरिबांचें

हित होईल आणि विद्वानांचा सर्वांस उपयोग होईल, परंतु हिंदुस्थानांतील राजे बहुधा मूर्ख आहेत. व राजा हा शब्द नेहमी म्हणींत मूर्ख या अर्थावर योजिलेला आहे. याचें कारण असें की, राजे बहुधा मूर्ख असतात. रयते-पासून वसूल करून पैसा घेतात, त्याचा त्यांस बरोबर व्यय करतां येत नाही. त्यांस असें वाटतें की, उत्तम माणसें आमच्या मात्र उपयोगी पडावीं. इतर लोकांस त्यांचा कांही फायदा नसावा; परंतु राजाने किंवा त्याचा पिता किंवा प्रपितामहाने द्रव्य आणिलें नसतें. जें राजाजवळ द्रव्य, तें रयतेपासून सर्व घेतलेलें असतें. याजकारितां त्या द्रव्याचा उपयोग असे दांडगाईने न करावा. परंतु हें मर्म राजे विसरतात आणि विद्वानही विसरतात.

राजाचे आश्रयाने विद्वान जे असतात, ते राजमूर्ख होतात आणि विद्या बळेंच लपवितात. त्यांस ती बाहेर काढावयाची लाज वाटते. मग इतिहासांत कथा आहे की, शिकंदर बादशहास जो गुरु होता, त्यास त्याची अशी प्रार्थना होती की, जी विद्या त्यास सांगितली, ती त्याने लोकांत प्रगट करूं नये, कारण की, तेणेंकरून राजाचा अपमान होईल. म्हणून त्याचे गुरूने आपलीं पुस्तकें चोरून ठेविलीं आणि प्रगट केलीं नाहींत. अशा समजुती इकडील लोकांच्या आहेत.

आतां प्रत्यक्ष पहा की, जे विद्वान आहेत, त्यांणी विद्या उघड करावी, असें पाहिलें, म्हणजे त्यांचे अंगाची लाही होत्ये. कोणी शास्त्र्यास दाखवा की, हा धर्मशास्त्राचा मराठींत तर्जुमा केला आहे. म्हणजे तात्काळ तो म्हणेल की, अरेरे ! विद्वानांचा थोरपणा गेला ! इंग्रजांनी हे ग्रंथ प्रगट केले, आतां शास्त्री व उपाध्ये कशास पाहिजेत ! असें त्यांस वाटतें.

याप्रमाणे गवई लोक यांस म्हणावें की, आपली थोडी विद्या आमच्यास शिकवा. म्हणजे त्याचें घर बुडालें. कोणी म्हणतो, अरे, गुरूचे आर्जव करावें, तेव्हां विद्या प्राप्त होते ! विद्या फुकटची नाही. इतका विद्वानांस गर्व आणण्यास व विद्या बुडविण्यास कारण राजे आहेत. त्यांस

विद्वानांस कोणत्या रीतीने आश्रित करावें, हें समजत नाही. सर्व मूर्खपणा करितात. त्याचा परिणाम असा जहाला आहे की, जे प्राचीन ग्रंथ आहेत, त्यांजवर लोक भरवसा ठेवतात, नवीन कल्पना सर्व राहिल्या.

जीं औषधें पांच हजार वर्षांचे पाठीमागे लिहून ठेवलीं आहेत, तींच आज घ्यावयाचीं. याचें कारण कोणीं पुसलें, तर शास्त्रांत आहे, म्हणून सांगतात. तशी गायनकलाही बुडाली. राग म्हणजे काय, हेंही कोणांस समजत नाही, आणि नवीन राग कोणी करीत नाहीत. जे एकदा ग्रंथांत मागील काळीं ऋषींनी शोध करून ठरविले आहेत, तितकेच. त्यांजवर कांही एक नाही. सर्व विद्येचा ओघ अटकावला आहे. कोणी विचार करीत नाहीत. कांही झालें म्हणजे ही गोष्ट वाजवी किंवा अयोग्य, असें कोणी म्हणत नाही; परंतु शास्त्रांत आहे इतकेंच म्हणतात आणि विचार वाढवीत नाहीत. अस्तु.

हा काळ लवकरच क्षीण होत चालला आहे. लोक शुद्धीवर येतील, तेव्हा याचा विचार बरोबर करतील. सांप्रतकालीं ते मूर्ख आहेत. याजकरितां त्यांस एखादी गोष्ट सांगितली, तर तिचा अर्थही करतां येत नाही. मग वर्तणूक दूरच आहे.

---

पत्र नं० ६३ ता० १० जून १८४९

# अर्थावाचून पाठ करणें

मला वाटतें की, ब्राम्हण लोकांनी आता अर्थावर चित्त द्यावें. केवळ पाठ म्हणणें यांत कांही फळ नाही. पाठ म्हणावें, अशी आज्ञा शास्त्रांत आहे, तिचा अर्थ तसा घेऊं नये. तें दळीच लोकांची भक्ति बसण्या-

करितां लिहिलें आहे. त्यांत कांही उपयोग किंवा वास्तविकपणा नाही. हें त्यांनी मनांत आणावें. ब्राम्हण लोक मूर्ख, म्हणून अर्थाचा अनर्थ करितात. खरा अर्थ समजत नाहीत. जें लिहिलें आहे, तसेंच सर्व केल्यावाचून अडतेंच समजतात. याजमुळे शेकडो गृहस्थ रोज गीता, विष्णुसहस्त्रनाम वाचतात. हा मूर्खपणा आहे की नाही बरें! मला वाटतें की, असें फक्त पाठ करणारे यांस कांही कळत नाही. आणि ब्राम्हण लोक सरासरी कामावर नेमके, तर मग त्यांचे ऐश्वर्यानुरूप स्नानसंध्या वाढते. ती कोणती म्हणाल, तर एकादष्णी म्हणजे पाणी देवावर ओतावें, तुळशीचीं झाडें लावावीं, तुळशी-सहस्त्रनामें इत्यादिक पूजा वाढवून वेळ खर्च करावा व अज्ञान वाढवावें. कोणाचे मनांत ईश्वराविषयी कांही नसतें. जितके ब्राम्हण हल्ली आहेत, तितक्यांस जर देव कसा आहे, वगैरे ईश्वराविषयी कोणीं एक प्रश्न विचारला, तर त्यांच्याने उत्तर देववणार नाही. व मनुष्याचा धर्म काय, हेंही त्यांस कळत नाही. वास्तविक पाहिलें, तर गृहस्थ व भट हे उभयतां जितका वेळ ज्ञान मिळावयास पाहिजे, त्याचे घोपट खर्च करितात; पण उपड्या घागरीवर पाणी होतें. त्यांचें आयुष्य व्यर्थ होऊन त्यांस स्वतां व दुसरांस उपयोग होत नाहीं. अर्थाचे अनर्थ बोलत बसतात. ब्राम्हण लोक पूर्वी सर्व जातींमध्ये प्रमुख होते खरे, परंतु आता तर मला नीच वाटतात. कारण की, हलके जातीचे लोक, कांही सांगितलें तर ऐकतात व त्यांचीं अंतःकरणें चांगली गोष्ट ग्रहण करण्यास पात्र असतात, परंतु ब्राम्हणांस गर्व फार. त्यांतील प्रत्येकास असें वाटतें की, थोर सर्व काय ते आपण, सर्वांनी आपली पूजा करावी. याजमुळे त्यांस कांही सांगितलें, तर ते ऐकत नाहीत, पिसाळलेले आहेत. एका अंगाने दरिद्र व दुसऱ्या अंगाने त्यांचा गर्व, अभिमान व अज्ञान येणेंकरून ते पूर्ण झाले. त्यांस असें वाटतें की, ब्राम्हणांच्या महत्वाच्या गोष्टी पुराणांत लिहिल्या आहेत, त्या अक्षरशः खऱ्या आहेत. आणखी असें समजतात की, शेवटीं ब्राम्हणाचा जन्म होतो. नंतर वेथे संन्यास घेऊन मोक्षास जातो.

## हें सर्व कवीचें लाघव

परंतु हें लिहिणें आम्ही किमपि ऐकत नाही. हें फक्त ब्राम्हणांचें महत्वाकरिता लिहिलें आहे. ब्राम्हण हे मोक्षास पात्र व इतर लोक नाहींत, असें म्हणण्यास ब्राम्हणांमध्ये आता कोणता गुण आहे ? संन्यासी चोऱ्या करितात, ब्राम्हण भडवेपणा, दरवडे इत्यादिक अपराधास अनुसरले आहेत. त्यांस मोक्ष कसा होईल ? हें मत केवळ खोटें आहे. अन्य जातीचे अनेक साधु झाले, ते दुर्गतीस गेले, असें कोण म्हणेल ? जुने काळचे लोकांस दुसरे देशचे लोकांचें वर्तमान कांही ठाऊक नव्हतें, म्हणून इतकें ब्राम्हणांचें महत्व लिहिलें आहे. इंग्रज लोक हेही असेंच मत बाळगतात. ते म्हणतात की, ख्रिस्तीयनाखेरीज कोणी मुक्तीस जात नाही. म्हणजे सर्व हिंदु नरकास पात्र आहेत, असेंच मुसलमान म्हणतात.

तस्मात् हा सर्व घोटाळा आहे. यांत कांही हशिल नाही. जाचें तो आपलें वर्णन करितो. याप्रमाणे ब्राम्हणांचें थोरपण आहे; परंतु तें खेरीज करून ब्राम्हण लोक असे मूर्ख आहेत की, त्यांस अर्थदेखील करतां येत नाही. पुराणें म्हणजे केवळ काव्यें आहेत. त्यांत कोठे लिहिलें आहे की, गंगा यमुनेप्रत बोलते, समुद्र यमुनेस म्हणाला, चंद्र रात्रीस म्हणाला, सूर्य अग्नीस म्हणाला, अशीं पुष्कळ वाक्यें आहेत. त्यांचा अर्थ हल्लीचे पुराणिक प्रत्यक्ष गंगा व यमुना देवता आहे, तीच बोलली असा करितात, आणि त्यांस आताचे लोक खरें मानतात. लोकही असें समजत नाहींत की, नद्या प्रत्यक्ष जड पदार्थ; त्यांस कवीने सजीव मानून लाघव केलें आहे. तसाच चंद्र रात्रीशीं कसा बोलेल ? त्यास कांही तोंड किंवा जीव आहे काय ? परंतु खरें मानितात. जड पदार्थांचें कवीने सजीव वर्णन केलें असलें म्हणजे झालें. त्यांस वाटतें की, या देवताच आहेत. तसाच सूर्याचा रथ लक्ष योजनें चालतो, असें म्हणतात. तेंही कवीचें लाघव आहे. त्याचा अर्थ पुराणिक सांगतात तसा घ्यावयाचा नाही; परंतु पुराणिक लोकांस फार वेड लावितात. व लोकही मूर्ख होऊन सर्व निर्जीव पदार्थांस जिवंत मानून कोणी उमऱ्याची पूजा, कोणी ताकमेढीची पूजा, कोणी दरवाजाची, कोणी मुसळाची, कोणी

जात्याची, कोणी दिव्याची, अशा पूजा करितात. यांत किती मूर्खपणा आहे ? मुलांचे बारादिवसाचे दिवशीं ताकमेढीची पूजा, दसऱ्याचे दिवशीं न्हावी धोकटीची पूजा करतात, त्यास नैवेद्य दाखवितात. बरें, न्हाव्याची धोकटी किंवा ताकमेढ नैवेद्य खाईल काय? धोकटींत कसली देवता आहे ? व ताक-मेढ एक वाकलेले लाकडाचा तुकडा, त्यांत देवता कोणती आहे ? कशामध्ये हे चमत्कार दृष्टीस पडतात. उपाध्या मूर्ख, तो हजार ठिकाणीं पूजा मांडतो. मडक्याची पूजा, घागरीची पूजा, आणि यज्ञांत हें सर्व संस्कृत भाषेने करतात, म्हणून त्याचा अर्थ कोणास कळत नाही. परंतु जांत पाहिलें, तर शुद्ध वेड आहे.

मी गर्भाधानाचा विचार थोडासा वाचून पाहिला आहे. त्यावरून मला वाटतें की, त्यांतील प्रकरणीं भटासमोर निर्लज्जपणाने जीं कर्में करावयास सांगितलीं आहेत, तीं जर मराठी भाषेत बोलतील तर यजमान उपाध्यास जोडे मारून हाकून देईल व म्हणेल की, माझ्या बायकोची इतकी फजिती चौघांमध्ये करावयास मीं काय तुमचें केलें आहे ? असें त्यांत आहे. नाना प्रकारचीं वचनें, आणि येथे हात लावा, तेथे हात लावा इत्यादि. तें मला बोलण्यास लाज वाटली. या प्रकारचे संस्कार करणारे वेडे होते, यांत संशय नाही. आणि लोकांनी कसें ग्रहण केलें असेल तें असो. जर या गोष्टी उघड्या होतील, तर खचित रद्द होतील. भटांनी अर्थ करावयाचें सोडिलें, त्यांमुळे इतकें अज्ञान वाढलें आहे. नीति, ज्ञान तें कांही पहात नाहीत. फक्त पोथ्या घोकून पाठ करीत बसतात. आणि त्यांत सर्व धर्म आहे, असें समजतात. यामुळे नीति बुडाली, धर्म बुडाला व अज्ञान मात्र शिल्लक राहिलें आहे आणि तें ब्राम्हणांचे हाडास भिनलें आहे.

# संस्कृत आणि इंग्रजी विद्या

लोकांमध्ये अशी समजूत आहे की, शहाणपण हें अंगस्वभावानें येतें. परन्तु ही जरी थोडीशी खरी गोष्ट आहे; तत्रापि सर्व शहाणपण अंगस्वभावांत असतें, असें नाही.

शहाणपण पुष्कळ मिळवावें लागतें. लोकांमध्ये समजूत अशी आहे व ज्ञान मिळणें हें संसारकृत्य आहे; याजकरिता किती एक जण इंग्रजी शिकतात. त्यांस लोक पुसतात की, तुम्हांस रोजगार लागला. आता विद्या शिकतां कशाला ? शहाणपण व ज्ञान म्हणजे काय, याचा अर्थच त्यांस कळत नाही. मनुष्याने ग्रंथ वाचले पाहिजेत; पुष्कळ विद्या व भाषा शिकल्या पाहिजेत, म्हणजे बहुत गोष्टी कानावर पडून माहितगारी होते; केवळ संस्कृत वाचूनच होणार नाही. मला निश्चयेंकरून वाटतें की, ज्यास शहाणपण व ज्ञान मिळवावयाचें असेल, त्याने इंग्रजी भाषा किंवा त्या भाषेतील ग्रंथांचे तर्जुमे तरी वाचावे, म्हणजे त्यांस पुष्कळ गोष्टी कळतील.

आता इंग्रजी विद्या फार सुधारली आहे. याजमुळे त्यांतील भूगोलावर एक ग्रंथ पडलेला आणि जितके संस्कृत किंवा इतर भाषेंत ग्रंथ आहेत, ते सर्व जमा केले, तर त्या एकाची बरोबरी व्हावयाची नाही, असें आहे; कारण इंग्रज लोकांनी विद्या फार सुधारल्या. याजमुळे त्या शुद्ध आहेत. आणि पूर्वीच्या काळीं शोध कमी होते. याजमुळे विद्या अर्धवट झाल्या, तितक्याच राहिल्या आहेत. केवळ संस्कृतानेच मनुष्य शहाणा व ज्ञानी होईल, असें नाही. शास्त्रें इत्यादिक पडले आहेत, त्यांच्या बहुत वाकड्या समजुती आहेत. व हें एक संस्कृताचें धोरण आहे. आमच्या बहुधा पहाण्यांत आहे की, संस्कृत पडलेले अशिष्ट, मताभिमानी, अर्थाचे अनर्थ करणारे आणि वाकड्या रीतीने भलतेच दृष्टान्त देऊन विचार करणारे असे असतात.

## संस्कृत आणि इंग्रजी विद्या

जुन्या काळच्या विचाराच्या रीति अलीकडे अगदी काढून टाकल्या आहेत व सुमार्गाने विचार करण्याच्या पद्धति व नेम कायम शास्त्रें केलीं आहेत. तीं इंग्रजींत आहेत; पण तीं संस्कृतापेक्षा हजारपट चांगलीं आहेत, हें मी निष्पक्षपाताने सांगतों.

आता आमचा स्वधर्म संस्कृतांत आहे, याजकरिता त्याचें ज्ञान असणें जरूर आहे. परन्तु तितक्यापुरतेंच संस्कृत शिकावें. त्यांतील शास्त्रें पाहणें किंवा त्याजवर फार विश्वास ठेवणें, उपयोगी नाही. बुद्धीस विपर्यास येतो. त्यापेक्षा एखादा इंग्रजी ग्रंथाचा तर्जुमा पाहून विचार केला, तर कार्य होईल, व तें संस्कृतद्वारा पांचपट आयुष्य खर्च करून होणार नाही. शहाणपण ही फार दुर्लभ वस्तु आहे. बहुत वाचलें पाहिजे, बहुत गोष्टींचा विचार केला पाहिजे, व बहुत ऐकलें पाहिजे.

आलीकडेस माझ्या पाहण्यांत कांही पोरें आलीं आहेत. त्यांतील कित्ती एकांस इंग्रजी जरा वाचतां लिहितां येऊन पोट भरूं लागलें, म्हणजे त्यांस वाटतें की, आम्ही परिपूर्ण झालों. तसेंच संस्कृत पढलेले पुष्कळ आहेत. त्यांच्या तर विलक्षण समजुती असतात. मुख्य त्यांचे मनाची अशी स्थिति असते की, जा जा मूर्खपणाच्या समजुती म्हणजे प्रारब्धावर विश्वास व ज्योतिषावरून दैव पाहणें व मंत्रांचें सामर्थ्य वगैरे त्यांस खरें वाटतें. हा सर्व मूर्खपणा संस्कृत विद्येंत भरला आहे. जो पढतो त्यास त्या पिशाच्चाप्रमाणे लागतात. याजकरिता ही मोठी सावधगिरी ठेवली पाहिजे.

आजचे काळीं इंग्रजांसारखे शहाणे, पराक्रमी, ऐश्वर्यवान व विद्वान कोठे नाहीत. व त्यांच्या विद्या हिंदूंस अश्रुत आहेत. याजकरिता सर्वांनी त्यांतील ज्ञान घ्यावें व त्याचा धिःकार करूं नये. आम्ही ब्राह्मण सर्वांहून श्रेष्ठ, आम्ही भूदेव, या म्लेंच्छांनी आम्हांपुढे काय शेखी मिरवावयाची आहे ! व यांचा पदार्थ काय ! आमचें नशीब अनुकूल होईल, तेव्हा आम्हांस विद्या लागणार नाही. जें चिंतूं तें मिळेल, ही समजूत विसरावी. असें

ागे कधी झालें नाही व पुढेही होणार नाही. पुराणांतल्या गोष्टी पुराणांत ाव्या. भलतेच अर्थ मूर्ख पुराणिक असतात ते करितात, व भलतीच ामजूत पाडितात.

याजकरिता सांप्रत इंग्रजींत जा जा विद्या भूगोल, खगोल, राज्य-ीति इत्यादिक आहेत, त्यांचा विचार करावा व त्यांतील समजुती करून ाव्यात, म्हणजे तुम्हांस फार संतोष होईल. असें केल्याशिवाय लोकांस ोणतेंही कार्य नीट करतां येणार नाही. सरकाराने लोकांस मोठीं कामें देलीं, तर ते अनर्थ व जुलूम करतील, लाच खातील, ढील करतील व ोकांचे कल्याणार्थ झटावयाचे नाहीत. याचें प्रत्यंतर सांप्रत जे लोक ोजगारावर आहेत, त्यांजकडे पाहिलें म्हणजे मिळेल.

तात्पर्य, जांस ईश्वराचें भय नाही व विद्या काय हें जांणी ऐकलेंही ाही, त्यांस नीति येईल कोठून ? व शहाणपणही कसें येईल ? बहुत लोक ण्या झाल्यावर स्तोत्र पाठ करितात, परन्तु केवळ सडकेवर माती ाहाण्याची मजुरी आणि स्तोत्रपाठ सारखाच आहे; कारण की यांत अर्थ नाही. पाठ करण्याने पुण्य होतें, असें समजून व्यर्थ आयुष्य कशास घालवितात ?

पत्र नं० ७७ — २० सप्टेंबर १८४९

## पाठ करण्याची चाल

श्रीमंत आणि विद्वान् या दोन लोकांचा हातून लोकांचे व देशाचे सुधारणेकरिता प्रयत्न व्हावयाचे. या दोघांशिवाय कोणी करणार

नाही. एक श्रीकडून वकचात् आणि दुसरे ज्ञानेकडून वकवात्.

परंतु आमचे देशांत ह्या दोघांची अवस्था पाहून मला फार खेद होतो. पूर्वींचे श्रीमंत आणि विद्वान् असे नव्हते, असें मागील पुस्तकें पहातां समजतें. त्या काळीं त्यांनी चांगलीं व उत्तम प्रकारचीं पुस्तकें लिहिलीं असें नाहीं; परंतु त्या लोकांचा जिकडे बुद्धिप्रवाह होता, तिकडे त्यांनीं लिहिण्यास कमी केलें नाहीं. पूर्वी ग्रंथ मोठाले झाले आहेत. याजवरून विद्येस उत्तेजन आणि बक्षिसी मोठी मिळत असेलसें दिसत आहे.

संस्कृतांत ग्रंथ बहुत आहेत. पहा की, एकट्या व्यास कवीनें अठरा पुराणें व अठरा उपपुराणें, शिवाय सूत्रें लिहिलीं. तेव्हा हजारो व लक्षावधी श्लोकांचें एक पुराण अशीं किती एक लिहिलीं. तेव्हा एवढें काव्य करण्यास त्यानें केवढी मेहनत केली असेल ! आणि किती एक वर्षे घालविलीं असतील ! तसेंच अलीकडे व्याकरणावर व धर्मशास्त्रावर निर्णयसिंधु, मनोरमा, कौमुदी इत्यादिक मोठाले ग्रंथ ज्या पंडितांनी लिहिले, ते पंडित आताचासारखे असते, तर न लिहिते, हें उघड आहे व आता विद्येची मांदी होत आहे. हेंच अनुमान करें की, प्राचीन राजे हे विद्वानांस मोठा आश्रय देत होते, म्हणून ते आपला जन्म त्यांत घालवून योग्यता मिळविण्याकरिता श्रम करीत होते. असो.

तो काळ आज पाहिजे होता व इंग्रज लोकांची विद्या त्यांत यावयाची होती. म्हणजे फारच चमत्कार होऊन त्या विद्येची कदर सर्व लोकांनी केली असती; परंतु जें गेलें तें येत नाहीं. यास्तव सांप्रत आहे, त्याजविषयींच आपण नजर पुरवावी हें बरें. हल्लीं श्रीमंत लोक व विद्वान लोक विद्येचे शत्रु झालेले आहेत व विद्येशीं अपरिचित होऊन भलत्याच कामास विद्या म्हणतात आणि वेद पाठ करणारे मूर्ख भट यांस विद्वान असें समजतात. इतका अंधार या देशांत झाला आहे. सांप्रत काळीं फक्त वेद पाठ करितात आणि तो उलटासुलटा म्हणतात. क्रमपाठी तीन तीन वेळा तेंच अक्षर म्हणतात; परंतु या कर्मास विद्या कोण म्हणेल ? यापेक्षा रस्त्यावर मजुरी

करतात ते लोक बरे.

पण भट फार अमंगळ व अनर्थास विद्या म्हणतात. अहो, विद्या या शब्दाचा अर्थ तरी काय होतो, तो पहा! पाठ म्हणणें ही विद्या केली कोणीं? यांत फळ काय? हा मूर्खपणा उत्पन्न कसा झाला असेल तो असो! परंतु एवढा मूर्खपणा कधी कोणत्याही देशांत झाला नसेल. लोक असें समजतात की, श्राद्ध, पक्ष, हव्य, कव्य, श्रावणी, लग्न, मुंज, संस्कार इत्यादि कर्मांत भट पाहिजेत; परंतु भट जर विद्वान होतील व हें पाठ म्हणणें सोडून देतील, तर त्यांच्याने श्राद्धें होणार नाहीत काय? पाठ म्हणणारे मूर्ख, यांस धर्मादाय करावा. ते वेद म्हणतात आणि जाग्रणें करतात; परंतु जसे गुजराथी लोकांत मजूरदारांकरवून शोक करवितात, तद्वत हे भट मजूरदार अक्षरें मात्र म्हणतात यांचें अंतःकरणास कांही भेद होत नाही. परकी ढोंग करून रडतात, तें रडणें कोणी मायेचें म्हणेल काय? तद्वत् पाठ म्हणतात, यास कोणी देवांची स्तुति करतात, असें म्हणावें कीं काय?

परंतु किती एक लोक मूर्ख असे आहेत की, फक्त वेदपाठास पैसा देतात व म्हणणारास आणि ऐकणारास कांही समजलें नाही तरी धन्य मानून धर्म झाला असें समजतात. असो. याप्रमाणे भट आहेत. आणि शास्त्री, पंडित पाहिले, तर हे भटांपेक्षा मूर्ख व गर्विष्ठ असतात; परंतु यांस कांही समजतें खरें, समजत नाही असें नाही. तथापि त्यांच्या वाकड्या समजुती व अज्ञान जें प्राचीन काळचे संस्कृत ग्रंथांत भरलें आहे, तें त्यांचे मनांत घेऊन त्यांचा दृढ निश्चय असा झाला असतो की, यापलीकडे विद्या नाही. सर्व जातीचे लोक ब्राम्हणांहून कमी व त्यांच्या भूगोलाविषयी अनर्थकारक समजुती असतात व त्यांचा इतका दृढ निश्चय असतो की, ते खरी गोष्ट ऐकत देखील नाहीत. व त्यांस आणखी विद्या पुष्कळ आहे म्हटलें, तर खोटें वाटतें. मागील सर्व ग्रंथकर्ते देव होते; म्हणून आता ग्रंथ करणें प्रशस्त नाही, असें त्यांस वाटतें.

नवीन रीति व नवीन विद्या पढणें यांचे ते शत्रु असतात. पहा की,

पांच हजार वर्षांमागे जी रीति, आणि जे ग्रंथ संस्कृत पद्यवचाचे असतील तेच चालू आहेत. त्यांची सुधारणा त्यांजला नको. व व्याकरण, तर्क आणि ब्राह्मणपण हीं त्यांस कमी असतात व प्राकृत भाषा त्यांस तुच्छ वाटून प्राकृतांत हे कांहीं कधीं लेखणी उचलीत नाहीत. पोथ्यांचीं वेष्टणें प्राचीन काळाप्रमाणेच आहेत, तीं आवडतात. प्राकृत भाषा सर्व लोकांची आहे, याजकरितां प्राकृत ग्रंथ असल्यापासून उपयोग नाहीं, हें मनांत आणीत नाहींत व शूद्र व इंग्रज वाचतील, हें त्यांस भय असतें. व्याकरण हें कोणी वाचूं नये, वेद कोणी नीच जातीनें वाचूं नयेत, असें वचन आहे, त्याजवर सर्व चालतात. भारतही वाचूं नये म्हणतात; कारण की, "भारतः पंचमो वेदः" अशीं नाना प्रकारचीं कुत्सित वाक्यें बोलून विद्येची दुर्दशा करितात.

आणखी एक शास्त्री लोकांस सांगा की, कैकाडी वगैरे नीच जातीचे लोक आहेत, त्यांस चांगले लोक करण्याकरितां अमुक एक तजवीज चालवावी, म्हणजे त्यांचा मान वाढेल. आणि ते म्हणतील की, जें तुम्हांस वाटतें असेल, तें ब्राह्मणांस द्या, यांत मोक्ष आहे. नीचास धर्म करणें अशास्त्र आहे. त्यांस ईश्वरानें नीच जातींत जन्म दिला. त्यांनी त्यांतच रहावें असें सांगून कधीं चांगले कामास मदत करावयाचे नाहींत व ब्राह्मणांचा मान वाढवतील. इंग्रजी राज्य झालें, हें एक ब्राह्मणांचें महत्व नाहींसें होण्यास मूळ झालें आहे, यांत संशय नाहीं. ब्राह्मणांनी बहुत वर्षेंपर्यंत थोरपणा व अधिकार भोगिला. ब्राह्मणांच्या मंत्रानें शुद्धि व वचनानें शुद्धि होत होती, तेंच लोक खरें मानीत होते; परन्तु तो काळ आतां गेला. बरें झालें की, लोक आतां पाहूं लागले.

ब्राह्मण व आपण कोण, यांत अंतर काय ? ब्राह्मणांस वीस हात आहेत कीं काय ? किंवा आपल्यास कांहीं कमी आहेत काय ? असा समज ब्राह्मणांनी आपल्या मूर्ख समजुती सोडून द्याव्या आणि सर्व लोकांस सारखें मानून विद्या शिकण्याचा सर्वांचा हक्क आहे, हें कबूल करावें. उगेच भांडूं नये. अस्तु. याप्रमाणें विद्वानांची अवस्था

झाली. दुसरे श्रीमंत जर पाहिले, तर शुद्ध पशुप्रमाणे आहेत. पहा, मोठमोठाले लोक किती मूर्ख आहेत, व त्यांस द्रव्य मिळालें म्हणजे असा अभिमान होतो की, मी आपले बापाचें श्राद्ध मोठें करीन, हजारो रुपये उडवीन व मुलाचें लग्न मोठें करीन. याप्रमाणे पैसा श्रीमंत लोक उधळतात. मग त्यांचें पाऊल कसें पुढे पडेल ?

वर्षश्राद्धास लाखो रुपये खर्च केलेले लोक आहेत. तशींच कार्येंही करतात. व अहिल्याबाईने सोळा कोट रुपये धर्मादाय केला, तो कोठे आहे ? तो जर इतका पैसा शहाणपणाने सार्थकीं लावला असता, तर लोक किती शहाणे झाले असते ? व किती आबादानी झाली असती ? या धर्मकृत्याने मूर्खपणा वृद्धिंगत झाला, आळस वाढला, मृत्यु चार दिवसांनी यावयाचा असतो. परन्तु कुपथ्य केलें तर दुसरेच दिवशीं येतो. तस्मात् या धर्मकृत्याने सर्वांस वेड लावून मूर्ख केलें व श्रीमंत दीनवाणे होऊन रोगी व अविद्वान झाले आणि उद्या बुडाले असते, ते आजच बुडून गेले. अद्यापि लोकांस काय तजवीज करावी, हें समजत नाही. पहिल्याच मार्गाने ते चालत आहेत. ईश्वर जरी प्रतिकूल झाला, तरी अजून हट्ट करतात; परन्तु ईश्वरेच्छा प्रमाण.

---

पत्र नं० ८१ 11 नवंबर १८४९

## प्राचीन ग्रंथांचे अर्थ

पुण्यांतील तारीख २२ आक्टोबरचे 'ज्ञानप्रकाश'पत्रांत 'यथार्थवादी' यांनी एक पत्र प्रसिद्ध केलें आहे. त्यांत त्यांनी इकडील पत्रांचे

उत्तर देण्याचा अनुक्रम चालविला आहे. त्यांत ज्या ज्या गोष्टी उत्तर लिहिण्यासारख्या आहेत, त्या खाली कलमवार लिहितों.

(१) प्रथम 'यथार्थवादी' आपले पत्राचे प्रस्तावनेंत लिहितात की, ब्राम्हणजातीचे सर्व लोक मूर्ख नाहीत, किती एक सुज्ञ आहेत. या मतास आम्ही कबूल आहों. व आम्ही कधी असें लिहिलें नाही की, सर्व मूर्ख आहेत; परन्तु कोठे सर्व असा शब्द योजला असेल, तरी त्याचा अर्थ हाच की, बहुतकरून शंभरांत किंवा हजारांत एकदोन कचित् शहाणे असले, तत्रापि इतरांस बोध करूं नये, असें होत नाही. ज्यास बोध करावयाचा असतो, त्याने बहुत जण मूर्ख पाहिले, म्हणजे त्यांस सर्व असें म्हणावें लागतें. हा एक भाषणाचा अलंकार आहे. तत्रापि एक सुज्ञ असला, म्हणजे बहुत लोकांचे दुर्गुण असतील, ते एक सुज्ञ त्यांमध्ये आहे, म्हणून झाकावें असा अर्थ यथार्थवादीचा नसेल, असें वाटतें.

(२) 'यथार्थवादी' एक वाक्याचा आम्हीं संग्रह केला, म्हणून त्या विषयी तक्रार करितात; परन्तु आम्ही पंडितांसारखे चुकवाचुकव करणारे नव्हों, हें त्यांणी समजावें. एक वाक्याचे दोन अर्थ तर काय, परन्तु जितके पंडित असतील तितके विलक्षणपणें अर्थांचे अनर्थ करून दाखवतील व त्यांत सद्विचार लक्षांत न ठेवतां मनास येईल तशीं पदें पाहून सरासरी मिळवून देतील; परन्तु ही रीति योग्य नाही; कारण जो वाक्य लिहितो त्याचा हेतु असा नसतो. एकच अर्थाविषयी तो बोध करितो. पंडितांचे विलक्षण अर्थ उपयोगी नाहीत, आणि ते आम्ही मानीत नाहीं; कारण की, आम्ही लोकांशीं बोलतों, तेव्हा सरळ अर्थ असेल तोच दाखवावा. जेव्हा आम्हांस पंडितांशीं व्याकरण, काव्य, अलंकार यांसम्बन्धी बोलावयाचें असेल, तेव्हा त्याचे अर्थ अमुक होतात, याविषयी वाद करूं.

तूर्त आमचा हा प्रसंग नाही. असें एकाने एकास मूर्ख असें दुरुत्तर केलें आणि तो पुरुष फौजदाराकडे फिर्याद घेऊन गेला, तर फौजदाराने मूर्ख या शब्दाचा कपटी अर्थ किंवा पदें फिरवून किती अर्थ निघतात, तें पहावें

ांग्य नाही ज्या अर्थाने तो शब्द लोकांत प्रसिद्ध आहे, आणि ज्या अर्थाने ो शब्द उच्चारला, तोच अर्थ मनांत आणून शिक्षा करावी. यास्तव लोकहितवादी ' याने संस्कृत वाक्याचा सरळ व प्रसिद्ध आहे, तोच अर्थ ला. ब्राम्हण लोकांमध्यें कचित् सुज्ञ आहेत, असें आम्ही समजतों, व यथार्थवादी' त्यांतीलच एक सुज्ञ आहेत असें आम्ही समजतों; परन्तु रीतीचा ाद सोडून त्यांनी पंडिताच्या कोळ्या घेऊन वाकडे रस्त्यांत शिरूं नये.

(३) रे कलमांत ते लिहितात की, ब्राम्हण जन्मांत मात्र मोक्ष ाहे, व ब्राम्हण या शब्दाचा अर्थ फिरून लिहितात, त्यासही सदहूं कलम ागू आहे. 'यथार्थवादी'ने हें पहावें की, सांप्रत गुण, कर्म, स्वभाव ंकरून युक्त असे ब्राम्हण किती आहेत ? आणि जर बहुतांमध्ये हें नाही, र त्यांस पूर्वापार जें महत्व दिलें आहे, तें भोगण्यास ते योग्य आहेत कीं ाय ?

(४) 'यथार्थवादी ' यांचें म्हणणें की, पुराणांतील बाष्कळ कथा ल्पभेदाने समजाव्या, व विषयपर वचनें ज्ञानपर आहेत; परन्तु हें ओढून- ाणून जबरदस्तीने, सरळ अर्थ सोडून उलटा अर्थ करणें प्रशस्त नाही. त्यादी असंभाव्य कथा कल्पांतरीची म्हणून मानिली, तर त्याच अध्यायांत विधिनिषेध येतात, तेही कल्पांतरींचे असें मानिले पाहिजे. आणि याप्रमाणे र्व उडविलें म्हणजे या कल्पांतील कोणते विधि याचा मुळीच ठिकाण ाहीसा होईल. त्याचप्रमाणे भागवतांतील विषयपर कथा असतां ज्ञानपर ाविल्या, तर कथेचा बोध फिरेल आणि संजोग बिघडेल. यास्तव या ोळ्या व्यर्थ आहेत. जे उघड अर्थ दिसतात, ते खरे, असें सर्व प्रामाणिक सूज्ञ कबूल करतील.

(५) पुराणांत पुष्कळ म्हणी चांगल्या आहेत, हें आम्ही जाणतों; रन्तु सर्व निर्बाध आहेत, असें प्रतिपादन करणें 'यथार्थवादी'स योग्य नाही, सें वाटतें. यास्तव त्यांनी विचार करून याविषयीचा जबाब वास्तविक- ाने द्यावा.

---

# प्राचीन ग्रंथांचें महत्त्व

सांप्रत हिंदुस्थानांतील लोकांचे जे नियम, शास्त्र व समजुती आहेत, त्यांचा गुण असा आहे की, या लोकांचें पाऊल पुढे पडूं नये. विद्या होऊं नये व कलाकसबें वाढूं नयेत. या प्रकारचें सर्वांचें तात्पर्य आहे,

आणि यामुळे आजपर्यंत तीन हजार वर्षांत असेंच झालें आहे. जे सूज्ञ असतील त्यांणी विचार करून पहावा की, प्राचीन काळीं म्हणजे तीन हजार वर्षांचे पूर्वी मोठे मोठे ऋषिवर्य विचारशील होते. त्यांनी रानांत बसून ग्रंथ लिहिले. आकाशांत नक्षत्रें पाहून त्यांचे नियम लक्षांत आणिले; रानांतील औषधि शोधून त्यांचे गुण लक्षांत आणले; आणि त्याविषयी शेकडो ग्रंथ लिहिले. तसेंच त्यांणी भाषेसंबंधी विचार करून व्याकरण लिहिलें. स्वयंपाक कसा करतात तेंदेखील लक्षांत आणून नळपाक × व भीमपाक + लिहिला. या प्रकारें नाना प्रकारचे ग्रंथ पूर्वी नवीन बुद्धिबळाने उत्पन्न झाले. तथापि भूगोलविद्या वगैरे यांत त्यांनी बहुत चुका केल्या, असतु.

शोध जे करतात ते चुकतें म्हणून त्यांत त्यांचा अपराध नाही. त्याप्रमाणे शास्त्र लिहिणारे यांनी पाहिजे तशीं न्यायमीमांसा इत्यादि मतें वेगळालीं लिहिलीं. त्यानंतर या लोकांस पुढे अवदशेचा पाया येणार म्हणून अशी समजूत पडली की, पहिले ऋषि ज्यांणी हे ग्रंथ लिहिले, ते सर्व देवअवतारच होते. व त्यांणी केलें तसें मनुष्यजातीच्याने होणार नाही. व आपला धर्म इतकाच की, पूर्वीच्यांनी जें करून ठेवलें, तितकें मात्र शिकावें; त्याजवर कांहीं नवीन कल्पना काढूं नये. काढली तर देवांचा अपमान होतो;

× नळपाक– सात्त्विक पदार्थ.

+ भीमपाक– तामस, तिखट पदार्थ.

व जें काय पाहिजे, तें त्यांत सर्व आहे. अशी समजूत पडून लोक अगदी मूर्ख झाले.

अशी समजूत कां पडावी, याचीं कारणें शोधिलीं असतां अशीं सांपडतात की, पहिले पांडवांचे अखेरीपर्यंत ब्राम्हण आपले धर्माचे ठायीं रत होते, विद्येविषयी मेहनत करीत होते व उद्योगी होते. आणि दुसरे जातीचे लोक जो विद्वान् असेल, त्यास मात्र द्रव्य देत होते. पुढे ब्राम्हणांची विद्या वाढली, ते ग्रहणें सांगूं लागले, हिशेब करूं लागले, ज्योतिष-भविष्यें सांगूं लागले, यामुळे लोक त्यास देवासारखे मानूं लागले. आणि त्या वेळेस राज्य चांगलें होतें व खावयास पुष्कळ होतें, यामुळे ब्राम्हण-लोकांस पुष्कळ मिळत होतें. पुढें कांही राजे बाजीरावासारखे मनास येईल तसें ब्राम्हणांस द्रव्य देऊं लागले, योग्यता पहावयाची सोडली, व ब्राम्हणांचे पायाचें तीर्थ घेऊन त्यांस अगदी ईश्वर मानूं लागले.

तेव्हा ब्राम्हणांनी अशी तजवीज केली, हीच समजूत लोकांची रहावी व ब्राम्हणांचा अधिकार कधींही मोडूं नये, अशीं पुराणें व महात्में लिहिलीं. त्यांत येऊन जाऊन गोष्टी, अमुक राजाने अमुक क्षेत्रीं ब्राम्हणांस अशीं तशीं दानें केलीं आणि तो स्वर्गास गेला; म्हणून ब्राम्हणांस अमुक द्यावें, सहस्रभोजन घालावें, त्यांच्या मुखांत पडलें म्हणजे देवास पोंचतें. ब्राम्हण काय ते मुख्य; सर्वांनी त्यांस मानावें; हींच मतें पुढे प्रबळ झालीं; आणि ब्राम्हण वंशपरंपरेचे झाले. लोक म्हणूं लागले की, मूर्ख जरी असला, तरी ब्राम्हण जातीचा व ब्राम्हणांचे पोटचा, तस्मात् त्यास धर्म करावा. परन्तु पाहिलें असें होतें की, मूर्ख ब्राम्हणांची गणना शूद्रांत होती; व उत्तम शूद्र ब्राम्हणांत येत होता. तें जाऊन सर्व ब्राम्हण वंशाचा मान वाढला. तेव्हा अर्थातच ब्राम्हणांनी पाहिलें की, आम्हांस मृत्युलोकचें देवत्व आलें, आता विद्या कशास करावी? नवीन कल्पना कशास काढाव्या? प्राचीन काळचे देव होते, त्यांचे वंशिक आम्ही, इतकेंच म्हणावें म्हणजे पुरें. या-प्रमाणे ते येत करून गावांत बेऊन राहूं लागले, सुख भोगूं लागले व फक्त

ग्रंथ पाठ करूं लागले.

तथापि लोक ही गोष्ट मनांत न आणतां त्यांस विद्वान मानूं लागले; शास्त्री, पंडित व भट हे याप्रमाणे विद्या पाठ करण्यांत वेळ घालवूं लागले; कोणी व्याकरणी जो होता, तो इतकेंच करूं लागला की, अष्टाध्यायी सूत्र पाठ म्हणावें व त्याची टीकाही पाठ करावी. हीच रीति चांगली असें वाटूं लागलें. जे नवीन ग्रंथ क्वचित् कोणी करणारे झाले, त्यांस तरी असें वाटतें की, प्राचीन काळच्या ग्रंथांच्या आधाराने ग्रंथ केले तर चांगलें. प्राचीन काळच्या ग्रन्थांतीलच गोष्टी कायम ठेवाव्या. नवीन सर्व गोष्टी अपवित्र व पहिल्या सर्व गोष्टी पवित्र व ग्रंथही पवित्र; याप्रमाणे समजूत पडून कोणी विचार करीतनासे झाले.

यामुळे लोक होते तसे राहिले व नुसते पंडितच राहिले, असें नाही; सर्व कसबी लोक, लोहार, सुतार, सोनार वगैरेसुद्धां आपले बापाचे कसबांत मात्र हात घालतात आणि त्यांचेइतकीच विद्या शिकतात. यामुळे नवीन कल्पना वगैरे कांही होत नाहीत. जी रीति पूर्वी तीन हजार वर्षांमागे होती, तीच आहे. जसा तांब्या पूर्वी करीत होते, तसाच आता करितात. पोथी जशी पूर्वी लिहीत होते, तशीच आता लिहितात. नवीन युक्ति वगैरे कांही नाही. यामुळे छापणें, यंत्रें करणें, तारवें बांधणें वगैरे अनेक विद्या आहेत. त्यांचें ज्ञान या लोकांस नाही. त्यांणी कांही अधिक कल्पना चालविली नाही. जी पूर्वी बुद्धि चालली, तितकीच चालून स्थिर झाली. पूर्वीच्याइतकेंच वैद्यशास्त्र, तितकेंच गणित, तितकाच भूगोल, तितकाच खगोल याप्रमाणे सर्व तितकेंच राहिलें, पुढे चाललें नाही. मला वाटतें फार तर काय, ज्या वस्तऱ्यानें हल्ली हजामत करतात, तोच वस्तरा पूर्वी चारपांच हजार वर्षांमागे होता. जसें आज धोतर नेसतों, तेंच धोतर पांच हजार वर्षांपूर्वी नेसत होते. नवीन कायदा किंवा राज्यरीति व बंदोबस्त कांही एक नाही. सांप्रत फार तर काय, परन्तु प्राचीन काळाविरुद्ध कांही गोष्ट

मोकळें तर त्यास अधर्म म्हणतात. ज्या रस्त्याने मागे लोक गेले, त्याच रस्त्याने पुढे जावें, अशी रीति पडून तीस धर्म असें म्हणतात. त्यांत कांहीं नवीन कल्पना नको.

यास्तव ही समजूत मोडून सर्व लोकांस अशी इच्छा उत्पन्न झाली पाहिजे की, आम्ही आणखी शोध करूं, पूर्वीचे लोकांनी शोध केला, तो पक्का नाही. त्यांतील चुका सर्व काढून आपलीं शास्त्रें शुद्ध करावीं हें चांगलें. मूर्खपणाने त्यासच चांगलें म्हणून त्याचेंच प्रतिपादन करावें हें नीट नाही; परन्तु हें सांप्रतचे लोकांचे मनांत येत नाही आणि प्राचीन काळचे लोकांचे शोधापेक्षा आपणांस आणखी पुष्कळ शोध लागावयाचा आहे तो लावूं, अशी इच्छा उत्पन्न झाली, म्हणजे शास्त्री, पंडित, भट जे आता निरुपयोगी आहेत, तेच पुढे उपयोगी होतील; परन्तु ही मूर्खपणाची दृढ समजूत लोकांची सोडविण्याची युक्ति व प्रयत्न काय करावा, याचा विचार मोठा अवघड आहे, तथापि तो सर्वांनी केला पाहिजे.

सांप्रत ब्राम्हण लोक भ्रमांत आहेत. याजकरिता त्यांची समजूत पाडणें फार अवघड आहे; परन्तु कालेंकरून पुढची प्रजा जी आहे, तिजमध्ये ज्ञानवृद्धि अधिक होत आहे, त्या योगाने कांही समजूत सुटून मोकळें मन करून विचार करतील आणि विचारास प्रतिबंध आहेत, ते मानणार नाहीत. याप्रमाणे हे लोक सुधारल्यावाचून सुखी होण्याचा रस्ता मला दिसत नाही, तेथपर्यंत हे अधिक अधिक भिकारी होतील आणि द्रव्यहीन होतील. हे पुष्कळ मूर्खपणाचे कामास द्रव्य लावतात.

आमचे श्रीमंत लोक वगैरे अद्याप पुष्कळ आहेत; परन्तु त्यांचें या कामांत चित्त नाही. ते येथून उठून काशीस जातात आणि शेकडो रुपये धर्मास बरोबर नेतात व देवळें बांधतात; परंतु त्या रुपयांनी जर एखादें कापड किंवा कापूस किंवा काच करण्याचीं यंत्रें आणून

कारखाना घातला, तर हजारो माणसांचा रोजगार उत्पन्न होऊन खावयास मिळेल आणि सुख होईल. मंवर काशीयात्रेपेक्षा वे रुपये सार्थकी गेले, असें म्हणावें कीं नाही ? परंतु हें लोकांस कळत नाही, मनास येईल तसे खर्च करितात. यात्रा वगैरे कराव्या, परन्तु जिवंत लोकांस खुसी करण्याचें टाकून यात्रा कराव्या, हें उचित नाही व याने कांही हित होत नाही. फक्त मूर्खपणा, आळस व अनुपयोगीपणा मात्र वाढतो. वास्तव ही गोष्ट सर्वांनी मनांत आणून लोकांचे हिताचे धोरणास लागावें. हें चांगलें, आजपर्यंत मागील वहिवाट होती, म्हणून जरी यथोचित आहे, तरी या काळास हें लागू नाही. आजपर्यंत जरी कसेंही झालें, तरी त्याचा उपयोग नाही. काळ पाहून कालमानाने व्यवहार चालवावा, हें उत्तम आहे। परंतु या विचारावर लोक येतील, तो किती एक काळ पाहिजे व भट भिक्षुक वगैरे यांस विचार व विद्या काय आहे, याचा अर्थ कळणें हें अवघड काम आहे. व प्राकृत भाषा सुधारून त्या भाषेंत ग्रंथ बहुत होऊन सर्व लोकांस कळले पाहिजेत.

यास्तव जे लोक या देशाचें कल्याण इच्छिणारे असतील, त्यांनी लोकांची सदरील समजूत दूर करण्याची मेहनत केली पाहिजे व विद्यांस चहाण्या केल्या पाहिजेत, म्हणजे लोक ज्ञानचक्षूने पाहूं लागतील.

---

पत्र नं० ८४ | १ डिसेंबर १८४९

## संस्कृत विद्या

संस्कृत विद्या मोठी महत्त्व आहे, व तिचा उपयोग मोठा आहे, असें लोकांस वाटतें, यामुळे शास्त्री, पंडित वगैरे संस्कृतचे विद्वान यांस लोक मानतात. व वैदिक हे जरी ग्रंथ नुसते पाठ करितात, तरी नियम

पक्ष ते ग्रंथांचें रक्षण तरी करतात. म्हणून त्यांस लोक मानतात.

परन्तु संस्कृत विद्येचें तात्पर्य पाहिलें तर त्यांत व्यावहारिक उपयोग कांहीच नाही. संस्कृत भाषा फार प्राचीन आहे, आणि देव म्हणजे जुने हिंदु त्यांची ती भाषा आहे. व तिजला बहुतांनी शोधून संस्कार देऊन सुधारली आहे, म्हणून तीस संस्कृत म्हणतात, हें खरें; परंतु तिजमध्ये जें ज्ञान वाढलें, तें कोणाचेही उपयोगी नसोन तिचा विद्यार्थी केवळ भट होईल किंवा विलक्षण तऱ्हेचा मनुष्य होईल. याचें कारण त्यांतील ग्रंथांत फारसें ज्ञान मुळीच नाही. जें आहे तें केवळ जुन्या काळचें. त्याचा आता उपयोग कांहीही नाही.

प्रथम या भाषेंतील ग्रंथांचें अनुक्रमाने निवेदन करूं. प्रथम वेदांतील मंत्रसंहिता आहेत. त्यांत पाहिलें तर अग्नि, मित्र, वरुण यांच्या प्रार्थनेचीं सूक्तें म्हणजे प्रबंध आहेत. ते नाना प्रकारचे छंदांनी रचले आहेत. पुढे ब्राम्हणें म्हणून बखरीसारखे ग्रंथ आहेत. त्यांत या मंत्रांचा उपयोग कसा करावा, या मंत्राने जनावरें मारून यज्ञ कसे करावे, कोणता मंत्र म्हटला तर काय फळ होतें, हें सांगितलें आहे. या ग्रंथाचे आधारानें ब्राम्हण हे मोठे योग्यतेस पावले. किती एक काळपर्यंत त्यांचे आशीर्वाद, त्यांचे शाप, त्यांचीं अनुष्ठानें हीं मोठीं सामर्थ्यवान आहेत, असें लोकांत प्रसिद्ध झालें होतें. याजमुळे ब्राम्हण हे हल्ली जसे पंचाक्षरी, औसर अंगास आणणारे, देवाचे साक्षात्कारी, मंत्री, जादूगार, करामती करणारे, अवलिया वगैरे ढोंगी लोक यांस लोक मानतात व भितात, त्याप्रमाणे सर्व लोक ब्राम्हणास भीत आहेत.

राजे राज्य घेण्याकरिता, निपुत्रिक पुत्र होण्याकरिता, गरीब धनप्राप्तीकरिता, रोगनाशनार्थ, शत्रुनाशनार्थ ब्राम्हणांस बोलावून त्यास अनुष्ठानें, जप, तप, मंत्रसाधनें करावयास सांगत. लोकांस असें वाटत होतें की, ब्राम्हणांचे हातीं सर्व आहे. व वेदांचे मंत्रांत सामर्थ्य आहे. देवांपेक्षा ब्राम्हणांचे मंत्र जबरदस्त. ब्राम्हण हाक मारतील, तेव्हा देव हात जोडून येतात; राक्षस मंत्रांनी पळतात, व पर्जन्य पडतो, रोग जातात, मोठीं मोठीं अरिष्टें शमन पावतात. ही समजूत अद्यापि लोकांमध्ये आहे.

परंतु ब्राम्हणांनी पूर्वीचें तापसस्वरूप व जटा, व्याघ्रांबरें, दाढ्या, भस्म, दर्भ, वनवास इत्यादि भयंकर प्रकारें सोडल्यामुळे त्यांचें तेज कमी झालें. लोकांस असें वाटूं लागलें की, हे आपल्यासारखेच आहेत; परंतु पहिले हे मोठे उग्र होते. आताही असे उग्र कोणी आहेत, त्यास अद्यापी लोक भितात. याप्रमाणे हें जादूप्रकरण मावळलें. पुढे तो काळ जाऊन शास्त्रें उत्पन्न झालीं. त्यांत वेदान्त मत निघालें. त्याणे हें पूर्वीचें ढोंग सर्व खोटें असें ठरविलें. अनेक देवांचीं अनुष्ठानें खोटीं, असें प्रसिद्ध केलें. एकच परमेश्वर व त्याचें मनन करणें हेंच श्रेयस्कर, असें सांगितलें.

त्याजवर बौद्ध मत झालें, त्याणे तर वेदाचा अगदींच उपहास केला. व त्यांतील उग्र म्हणजे हिंसा, यज्ञ, याग इत्यादिक कर्मांची निर्भर्त्सना करून दया-धर्मांची प्रसिद्धि केली. त्यानंतर तें मत रद्द होऊन पुनः ब्राम्हण-मत उभारलें. तें पूर्वीप्रमाणे तर कोठून होईल? त्यास अवधी फार लागला; म्हणून थोडेसें उभें राहिलें. त्याची भर भवानी गेली. नंतर पुराणें म्हणून ग्रंथ झाले. त्यांत कांही वेदान्त, कांही भक्ति, कांही वैदिक कर्में, कांही नवीन देवता, नवीन व्रतें दानें वगैरे लिहिलीं. या पुराणकर्त्यांचा हेतु असा होता की, सर्व वाद सोडून कोणी कोणत्याही मताने वागला, तरी चिंता नाही. वास्तव सर्व मतांचा संग्रह त्यांणी केला.

त्यानंतर कांही काळ गेल्यावर निबंधग्रंथ झाले. त्याने पूर्वीचे सर्वच ग्रंथ ईश्वरी असें मानून, सर्व ओझें डोकीवर घेतलें. तेव्हा आता संस्कृत शिकणाऱ्यांचे हातीं कोणतें ज्ञान येतें, हें पाहिलें पाहिजे. तर हा बिचारा या ज्ञानाने तीनचार हजार वर्षांचा जुना होतो, त्याचा दृष्टीचे कालांत [illegible]पणा येतो. कसा म्हणाल तर त्यास म्हटलें की, लंकेंत कोळंबो शहर आहे, तर हा म्हणतो की, लंका कोणास सापडावयाची नाही. विष्णू सभोवतें सुदर्शन फिरत आहे. त्यास विचारलें की, तापी नदीचा उगम कोठे आहे? तर तो म्हणतो की, ती यमाची बहीण असें पुराणांत लिहिलेंच आहे. याप्रमाणे पुराणें वाचून त्याचे मनांत अनेक कल्पित कादंबऱ्या भरून,

त्यास हल्ली सृष्टि आहे, त्याहून वेगळी दिसत. संक्रान्त हें सूर्याचें राशिक्रमण हें तो जाणतच नाही. एक म्हणतो ती रेड्यावर बसून दक्षिणेंत जाते आहे. आणि ती दीडशे कोस लांब आहे. आणि तिच्या पाठीमागे एक दुसरी बाई किंकरान्त आहे. तेव्हा या मनुष्यास असें वाटतें की, अलौकिक ज्ञान जें कोणास ठाऊक नाही, तें मला या पुराणामुळे ठाऊक झालें आहे. या अभिमानांत तो असतो. वास्तविक पाहिलें, तर त्याचें ज्ञान एक कपर्दिकेच्या किंमतीचे नसोन त्यांचे व इतर लोकांच्या नाशास कारण झालें.

त्यानंतर दुसरा भाग म्हणजे मंत्रशास्त्र. हें जर त्याणे पाहिलें, तर नाना प्रकारचीं अनुष्ठानें, नरसिंह, शरभ, वेताळ, योगेश्वरी इत्यादि देवता, व त्यांस बोलावण्याची रीत व त्यांस प्रसन्न करण्याचे जप, त्यांस माहीत होतात. आणि तो आपले अंगीं असा ताठा आणितो की, मी काय तो मोठा, मजमध्ये मोठें सामर्थ्य आहे. मी पाहिजे त्यास पुत्र देईन, दौलत देईन, शत्रु मारीन; पण त्याचे हातीं कांही नसतें. हा स्वप्नासारखा भ्रमांत असतो. ते ग्रंथ वाचून त्यास भ्रम पडतो. करावयास जातो, तों त्यांत कांही नाही! बरें, आणखी संस्कृतविद्येच्या दुसऱ्या भागांत जाऊं. जर तिचा अभ्यासी याज्ञिक झाला, तर त्यास असें वाटतें की, मला अमुक शास्त्र म्हणतां येतें, अमुक शास्त्र म्हणतां येतें, पशु मारावे कसे, त्यांचीं अंगें कशीं काढावीं, हा खाटिकपणा येतो. यज्ञाचे मंडप कसे घालावे, त्यांचे मागेपुढे मंत्र कसे ओरडून म्हणावे, हें ठाऊक आहे. त्याचे प्रमाणास हा ग्रंथ, तो ग्रंथ, प्रत्यक्ष श्रुति, स्मृति असा तो काढून दाखवितो व यज्ञ करणारास थेट स्वर्गांत नेऊन पोचविणारा तो मीच, असें मानतो.

बरें, आता संस्कृताचे चौथे भागांत जाऊं. कोणी धर्मशास्त्र पढला, तर त्यास शंभर ग्रंथ श्राद्धाबद्दल, पन्नास ग्रंथ शौचनिर्णयाबद्दल, पंचवीस ग्रंथ संस्काराबद्दल, असे अनेक निरुपयोगी विषयांविषयी वादविवाद पाहून, त्यांत तो आपणास मोठा धन्य मानितो. श्राद्धास पदार्थ किती असावे-नसावे, कोणते भट किती असावे, दक्षणा किती असावी, तीथ कोणती,

काळ कोणता, तीळ किंवा तांदूळ असावे, दर्भ किंवा दूर्वा, होम पाकचा ठेवावा कीं टवाणा, कोणत्या दिशेस बसावें, आधी देवास की आधी पितरांस पंच काढावें, ही सर्व कवाईत त्यास पाठ होते. आणि त्यांतील वाद त्यास ठाऊक होतात. त्याविषयी बोलण्यास तो मोठा उत्सुक होतो, त्याची त्यास मोठी हौस येते. कोठे वाद असले, तर तेथे आपली तो शेंडी मिरवितो. आणि दोनचार आणे मिळवून घरास आणितो.

बरें, संस्कृतविद्येच्या पांचवे भागांत आपण शिरूं. विद्यार्थी न्याय, व्याकरणमीमांसा पढला, तर मग हें जग दिसतें हें खरें किंवा खोटें, याचीच भ्रांति त्यास पडून त्याविषयी तो वाद घालीत बसतो. कोणी म्हणतो, दहा पदार्थांनी सृष्टि घडली, तर कोणी म्हणतो चोवीस, कोणी म्हणतो सात, कोणी म्हणतो, मी आणि ईश्वर एकच जातीचे, मध्ये माया मात्र आहे. कोणी म्हणतो सुखदुःख हें मनांतही आणूं नये, आळसांत बसावें. प्रारब्धीं आहे, तें घडतच आहे. या मानसिक कल्पनेच्या जाळांत तो सापडून वेडा होतो. बरें, सहावें भागांत पाहूं. जर तो ज्योतिष शिकला, तर म्हणूं लागतो, अमुक ग्रह आला तो पीडा करील. मंगळास अमुक दान पाहिजे. शनि सूर्याचा मुलगा, परन्तु मोठा द्वाड ग्रह, त्याचा जप केला असतां शांति होते. त्याचे डोकीवर तेल ओतावें किंवा ब्राह्मणास कोळंब द्यावें, परंतु हें मोठें कम दान आहे. कोणी घेणार नाही, प्रश्न सांगतो, पुढलें भविष्य, आयुष्य, रोग, शत्रुसंप्रदायाविषयी, नाना प्रकारचे भ्रम काढितो.

याप्रमाणे कोणतेही भागांत जरी पाहिलें, तरी संस्कृतविद्या निरुपयोगी व नाना प्रकारचे कुतर्क उत्पन्न करणारी, व संसारा-वरील चित्त उडवून आळशी करणारी, व निरुपयोगी कर्में करणारी आहे. सांप्रत काळीं जें ज्ञान पाहिजे, तें त्यांत मुळीच नाही. सांप्रत काळचे देश, तेथील राज्यें व फौजा व व्यापार इत्यादिकांची माहिती, यंत्रांची उत्पत्ति, कायदेकानू कसे असावे, गैरचाली कोणत्या आहेत, टाकाव्या कोणत्या, ठेवाव्या कोणत्या, हें त्यांस माहीत नसतें. दोनचार

हजार वर्षांपाठीमागे पिकलेलें वेड वगैरे समजुती व वाकडे तर्क हेच आता काढून त्यांची वाटाघाट करीत आयुष्य घालवितात. जोंपर्यंत बाहेरचे देशांतील वर्तमान लोकांस ठाऊक नव्हतें, तोंपर्यंत याच ज्ञानाचा थोरपणा होता व हें ज्ञान ज्यापाशीं होतें, त्यास थोर मानून त्याचे पायाचें तीर्थ घ्यावें, येथपर्यंत मजल आली.

परंतु आता बाहेरचें ज्ञान या देशांत शिरलें. त्याचे पुढे हें जुनें ज्ञान वाहून गेलें. त्याची तुच्छता अगदी स्पष्ट झाली. पाठीमागून हें पोकळ ढोंग चालत आलें, त्याचा पोकळपणा उघडकीस येऊन त्या ढोंगावर पोट भरणारे यांचें माहात्म्य कमी झालें. तर आता ज्यांस थोरपणा पाहिजे असेल, त्यांणी सांप्रत काळचे ज्ञानाची संपदा मिळवण्याचा प्रयत्न करावा. ज्या ज्ञानाने आपल्यावर इतर लोकांनी सरशी केली, तें ज्ञान आपण धिःकारूं नये; कारण की, त्याचा आपणांस अनुभवच आला आहे. याजकरिता सावधगिरीचें लक्षण हेंच की, काळास ओळखून त्याप्रमाणे चालावें. असें न केलें तर फार फजीत होऊन दुर्दशा झाली आहे, त्यापेक्षा अधिक होण्याचा संभव आहे. पूर्वी जुन्या काळचे ब्राह्मण म्हणजे ऋषि वगैरे यांनी अपुरीं कामें ठेविलीं, तीं आपण पुरीं करावीं. त्यांनी वैद्यकत्व पूर्णत्वास आणलें नाही. तर आता आपण अनेक देशच्या कल्पना एके ठाईं करून, नवे शोध करून तें सुधारावें, म्हणजे खरा थोरपणा मिळेल व लोकांचें हित होईल. असें न होईल, तर लोक वैद्यास सोडून नवे डॉक्टर व नवीं इस्पितळें यांचा आश्रय करतील; आणि पुराण वैद्य बिचारे उपाशी मरतील. याचप्रमाणे सर्व विद्येचें आहे.

पत्र नं० ८६

# सांप्रतचे पंडितांचें ज्ञान

सांप्रत काळचे पंडितांचें ज्ञान असें असतें की, त्याचा जिवास शरिरास, प्रपंचास कांहीच उपयोग पडत नाही. केवळ वादविवादच करण्यास व लोकांस तमाशा दाखविण्यास मात्र उपयोगी आहे.

वास्तव मला हे पंडित, बहुरूपी, लौगाडी व चित्रकथी यांहून बरे दिसत नाहीत. बारा-पंधरा वर्षेपर्यंत व्याकरण किंवा न्याय यांचें अध्ययन करितात. म्हणजे त्यांस पंडितपणा प्राप्त होतो. परंतु त्यांची विद्या अशी असते की, एकाने म्हणावें या शब्दाचे अंतीं 'व' असावा; दुसऱ्याने म्हणावें 'वा' असावा. याजविषयीचा वाद शेकडो प्रमाणें दाखवून सर्व दिवसभर करितात. शेवटी निश्चय एकाचाही होत नाही. तसेंच नैय्यायिक हेही भांडतात. एक म्हणतो ईश्वर आणि जीव एक आहे. दुसरा म्हणतो, दोन्ही विभक्त आहेत. तिसरा म्हणतो, ईश्वर गुणी आहे. चवथा म्हणतो निराकार आहे. याप्रमाणे रिकामा वाद घालण्यांत जन्म घालवितात आणि त्यांस त्या वादांतील सत्य काय आहे, हें समजण्याची इच्छा नसते. परंतु परस्परांपेक्षा श्रेष्ठ कोण होतो, हें पहाण्याकरिता भांडतात आणि मग त्या वादांत सत्यानेच भाषण करतात, असें नाही. मनास येईल तशी कल्पना, कपट, युक्ति, मूर्खपणा इत्यादि योजून सरासरी फार घोटाळे करतात. त्यांस कोणी म्हणतात, असे निर्फळ वाद घालण्याच्या ज्या ज्या विद्या हे शास्त्री शिकतात, त्यांपासून इहलोकीं व परलोकीं हित नाही. आपले जिवाचेंही कल्याण नाही व दुसऱ्याचे जिवाचेंही नाही.

एक व्याकरण म्हणावयास बारा-चवदा वर्षे लागतात. त्याचें कारण हेंच आहे की, त्या प्रकरणीं वाद करण्यास शिकतात; ग्रंथ पाठ करितात व प्रतिष्ठेकरिता वाद करितात. हे सर्व शास्त्री, पंडित या प्रकारचे आहेत.

त्यांस व्यावहारिक ज्ञान नाही. त्यांस मोडीचें लिहिणेंदेखील येत नाही व कोणतेंही काम करावयाचे हे उपयोगी नाहीत. बरें, इतकें असून यांची वर्तणूक पाहिली तर फारच वाईट. सामान्यतः हे गोंधळी, भाट, यांप्रमाणेच व्याजस्तुति करून गृहस्थांस भुलवून पैका काढणारे लोक आहेत. प्रातःकाळीं उठलें, म्हणजे यांचा प्रथम उद्योग हाच आहे की, गृहस्थांचे घरीं जाऊन त्यांची स्तुति करावी. त्यांमध्ये त्यांचें जसें वर्णन पाहिजे तसें करून दोन पैसे निघाले, म्हणजे त्यांचें कार्य झालें. पैशाकरिता महापातकी असला तरी त्यास शुद्ध म्हणतील; महानीच असला, तरी त्यास सन्मान देतील. पापाने द्रव्य मिळविलें तरी, त्यांस दिलें म्हणजे तो सद्व्यय झाला, अशी समजूत करून आणखी तसेंच मिळीव, म्हणून सांगतील.

याचे उदाहरणास फार लांब जावयास नको. बाजीराव पेशव्याने पुण्यांत ब्राम्हणांचे मनोरथांप्रमाणे दानें केलीं व बहुत शास्त्री, पंडित जवळ बाळगिले; परंतु त्यांणी त्यास सत्कर्मास किंवा आपलें राज्य रक्षिण्यास किंवा नीतीने चालण्यास समजूत दिली नाही. जें त्याणे केलें, त्याजविषयी त्याची स्तुतीच करीत गेले. व महाराज सर्वत्र विजयी होतील, असे आशीर्वाद देत गेले. आपण ब्राम्हण परभु, आपलें तेज सर्वांहून अधिक, आपलेकडून एक शिपाई गेला तर सर्वांचा पराजय होईल, याप्रमाणे बोलून, त्यांजकडून राज्यकारभार सोडून देववून त्यास पंडितांचे आर्जव करणारा असा मूर्ख केला व शेवटीं आपण आणि तो, असे दोघेही भीक मागत गेले. यास्तव हे पंडित जरी पुष्कळ पढलेले असले, तरी ते मूर्ख समजावे; कारण की, लोकहितकारक ज्ञान त्यांस नाही. त्यांचें ज्ञान भाटांचे व तमासगिरांचे बोलण्याप्रमाणे आहे. त्यापासून मोक्ष व्हावयाचा नाही व इहलोकीं सुखोत्पत्तीही व्हावयाची नाही.

सारांश, हल्लीचे पंडित हे महामूर्ख असें मी म्हणतों. हे नाना प्रकारचे अर्थ फिरवितात, नाना प्रकारचे असत्य सिद्धान्त करतात आणि क्षणांत मुक्तीचा मार्ग, क्षणांत नरकांत जाण्याचा मार्ग दाखवितात. यास मुख्य

ह्या गोष्टी त्यांचें ज्ञान नसतें. मनुष्य जन्मला कशाकरितां ? त्याचें साध्य काय ? व आपलें कर्तव्य काय ? याचा विचार त्यांचे मनांत क्षणभरही वसत नाही. द्रव्याचा व मानाचा लोभ धरून हे असतात. यांचा आश्रय जो कोणी करील, त्यास वेड लागेल, यांत संशय नाही व त्यांची बुद्धि स्थिर नाही.

अमुक सत्य, अमुक असत्य, हेंही त्यांस भासत नाही. सत्याचा व असत्याचा भाव यांस समजत नाही. धर्माचा, अधर्माचा भेद त्यांस ठाऊक नाही. जो पाहिजे तो शास्त्रार्थ काढून देतील; जें पाहिजे तें प्रायश्चित्त देतील. फक्त पैसा मिळाला म्हणजे झालें. अशा पंडितांचा संग्रह करून कोणास काय फायदा होणार आहे ? राजास होणार नाही व प्रजेलाही होणार नाही. व ज्या प्रजेचे पुढारी असले लोक विनाकारण आपणास विद्वान म्हणवितात, त्या प्रजेचा सर्वस्वी नाश होईल. याप्रमाणे हिंदु लोकांची व्यवस्था झाली आहे. या लोकांस शास्त्रीपंडितांखेरीज दुसरे कोणी पुढारी मिळतील, तेव्हा या लोकांमध्ये व्यवस्था चांगली होईल. व शास्त्री, पंडित पुष्कळ असावे, अशी जे इच्छा धरतात, ते महामूर्ख समजावे. या लोकांपासून या देशाचें किमपि हित होणार नाही; अधिक मूर्खपणा मात्र वाढेल व भ्रांति वृद्धिंगत होईल. आणि ती भ्रांति मनांत शिरेल, त्यांचा प्राण गेल्यावाचून निघणार नाही. वास्तव हे शास्त्री, पंडित अगदी निरुपयोगी आहेत, हा सिद्धान्त होतो.

ही विद्या कांही उपयोगी नाही. जर असें नसेल, तर मला कोणी उत्तर द्यावें की, व्याकरणाचें पंधरा वर्षें अध्ययन केलें, त्यापासून अमुक उपयोग होतो. असें मला दाखवून द्यावें, म्हणजे मी वास्तविक म्हणेन; परंतु मीं शोध केला आहे, त्यावरून मला तर वाटतें की, मनुष्यांस लाकडें तोडावयाचें कसब शिकविलें तर बरें; परंतु हें व्याकरण नको. यांत कांहीच अर्थ नाही. केवळ मूर्ख होण्याची विद्या आहे. आणि इतकेंही असून ज्याचा त्यास असा गर्व असतो की, मी केवढा विद्वान्, माझ्या-सारखा विद्वान त्रैलोक्यांत नाही. पाहिला तर तो सर्वांहून मूर्ख असतो!

याप्रमाणेच ज्ञान, मीमांसा, अलंकार, या शास्त्रांची व्यवस्था आहे. केवळ असत्य सिद्धान्तांचें प्रतिपादन करून, विलक्षण कुतर्क करून भलतेच अविचार लोकांत स्थापन करितात. आणि वास्तविक पाहिलें तर ब्राम्हणां-मध्ये चार रोजगार आहेत. सराफ, भट, पंडित व हरदास. या सर्वांपेक्षा पंडित हे महामूर्ख होत. सराफ, भट, हरदास हे बरे. हे यत्किंचित् पढलेले असतात. याजमुळे हे दुराग्रही नसतात व यांस अभिमान नसतो. सांगितली गोष्ट ऐकतात, व त्यांचें लक्ष व्यावहारिक मार्गांवर ( × × ) असतें. याज-करिता कांही सुधारण्याचा रस्ता यांस आहे. परन्तु हे ( वि निजे ? ) आहेत, म्हणून पंडित यांची समजूत फार दृढ होती की, आमचें मत खरें आहे, व इतर सर्व मूर्ख आहेत. याजकरिता यांचा दुराग्रह फार होतो, तो हे सोडीत नाहीत. अतिशय आग्रह धरितात. याजमुळे हे लोक अगदीच उपयोगी नाहीत.

हिंदु लोक यांचें महान् दुर्भाग्य म्हणून हे पंडित व शास्त्री या लोकां-चे पुढारी झाले व यांस लोक समजतात की, हे धर्मरक्षक आहेत; परंतु हे अधर्मवृद्धि करणारे होत. व हे सोनार, परभु, ब्राम्हण वगैरे यांचा यत्किंचित् निमित्ताने वाद लावून दोहोंकडून पैसा खाणार व खोटी मतें आणि नाना प्रकारचीं खोटीं कर्मे प्रसिद्ध करून भोळया लोकांस ठकविणार; यास्तव त्यांस आवडतही नाही की, आपलीं शास्त्रें बहुत लोकांस ठाऊक व्हावीं; कारण तेणेंकरून आपली उघडीक होते, व दगाबाजी व लबाड्या बाहेर पडतात. हें त्यांस फार भय आहे. जोंपर्यंत आच्छादित आहे, तोंपर्यंत यांच्या प्रति-ष्ठेचें आयुष्य आहे. मग किरकोळ लोक यांस पुसतील की, तुम्ही आम्हांस सांगतां; परंतु ही सर्व लबाडी आहे. तुम्ही लबाडीवरच पोट भरतां, तस्मात् आम्ही तुमचा त्याग करतों. अशी अवस्था होईल, यांत संशय नाही.

हा मूर्खपणा बहुत काळपर्यंत (नि × × ×) कारण की, गौप्य होतें. आजपर्यंत महान् प्रयत्नाने ( × × × × ) झाकून चालविलें; परंतु आता चालणार नाही. ( × × × × × ) काकडे एखादी पंचाईत न्या, तर ते कागला ( × × × × × × ) तील. बरें तीच पंचाईत चार पंडितांकडे न्या,

म्हणजे अतोनात वाद करतील आणि नाना प्रकारच्या मसलती काढून असत्यप्रतिपादन करतील, अशी त्यांची अवस्था आहे. त्यांची मनें बिघडून जातात आणि भ्रांति उत्पन्न होऊन त्यांस विवेचन करतां येत नाही. खोट्यास स्थापन करण्याकरितां प्रमाणें दाखवितील आणि त्याचा पक्ष धरून भांडत बसतील. याचा अनुभव, कोणीही विचार करून, त्यांची वर्तणूक पाहिली, तर लक्षांत येईल.

जेथे बहुत पंडित, तेथे मूर्खपणा वाढून अहंकार होतो, अधर्मप्रवृत्ति होते व इतर लोकांवर दया करणें, हें त्यांजपासून घडत नाही. त्यांची समजूत अशी आहे की, सर्वांनी दुःख भोगिलें, तर चिंता नाही; परंतु आम्ही मात्र सुखी असावें. तदनुसार उदाहरण पहा: सावी बांधे मराने वा वा गृहस्थांनी अन्नछत्रें घातलीं, तेथे शूद्र गेला, तर त्यास अन्न मिळत नाही आणि ब्राह्मण श्रीमंत झाला, तरी त्यास जेवावयास बोलावितात! असाच चमत्कार आहे.

अस्तु सर्व लोकांस ज्ञानप्राप्ति होईल, तेव्हा हे सर्व पंडितांचे गुण बाहेर पडतील.

---

पत्र नं० १३

## नवीन ग्रंथांची आवश्यकता

आमचे लोकांस विचार अगदी नाही. विद्या वाढवणें व बुद्धि वाढवणें हें तर त्यांस माहीत नाही. सांप्रत सुधारलेले लोक विद्यावृद्धि करण्याकरितां पुष्कळ झटत आहेत; परंतु हें इतर लोकांचे मनांत ठसत नाही. मराठी भाषेंत ग्रंथ अनेक छापिले आहेत;

आणखीही बरोबर छापत आहेत. वर्तमानपत्रांत अनेक तऱ्हेचे मजकूर व माहितगारी लिहून छापतात, परंतु त्याचा कोणी वाचणारा नाही. जे आहेत ते गरीब आहेत. श्रीमंत व थोर जुन्या काळचे. यांस असें वाटतें की, हा कागद व्यर्थ खर्च कशाकरिता करतात ? व यांत उपयोग काय ?

परंतु त्यांचे लक्षांत असें येत नाही की, आम्ही केवळ मूर्ख आहों व आम्हांस कांही समजत नाही. पहा की, या लोकांस आमचा देश कोठे आहे व आणखी देश कोठे आहेत व तेथे कोण आहेत, व या देशांत सुधारणा काय पाहिजेत, व जर कोणी करूं लागला, तर त्यांस अनुकूल व्हावें, हें समजत नाही. नाना प्रकारच्या विद्या आहेत, त्यांपासून लाभ बहुत आहेत. समुद्रांत नावा चालविण्याची विद्या आमच्या लोकांत कोठे आहे ? रसायणशास्त्र व त्यापासून लाभ होतात, हें कोठे माहीत आहे ? यंत्रज्ञान कोठ समजतें ? निदान चांगलें कोणतें व वाईट कोणतें, याचा देखील भेद समजत नाही. जर कोणी चांगल्या कामास आरंभ केला, तर त्यास वाईट म्हणतात. कोणी वाईटास केला, तर त्यास चांगलें म्हणतात. असे विलक्षण लोक आहेत.

कोणी उपयोगी ग्रंथ केला, तर तो कोणी घेत नाहीत. व त्यांत काय आहे, हें देखील पहात नाहीत. त्यांस असें कळत नाही की, ज्या मनुष्यानें ग्रंथ लिहिला, त्याचा कांही तरी हेतु असेल, व त्यांस असें वाटत असेल की, लोकांस ज्ञान नाही तेव्हा तें या ग्रंथाच्या द्वारें त्यांस मिळावें; परंतु लोक ही गोष्ट समजत नाहीत. ग्रंथांत कांही असो, कोणी कांही म्हणो, ते जुन्या रीतीने सर्व गोष्टी घडाव्या असें पहातात. त्यांस अद्यापि इतकें देखील समजत नाही की, आमचे लोकांस कांही कळत नाही. त्यांस बहुत ग्रंथ झाले असतां उपयोग होईल, व देशांतील लोक शहाणे होतील.

त्यांची समजूत अशी आहे की, संक्रांत आली तर चार आणे खर्चून, एक तांब्याची तबकडी घेऊन, आंत तीळ घालून दक्षणेसहित एखाद्या मूर्ख ब्राम्हणाच्या हातीं देतील. आजि आम्ही धर्म केला, धन्य झालों, असें म्हण-

तील, परंतु हेच चार आणे देऊन अमुक एक नवीन ग्रंथ झाला आहे, तो घेणार नाहीत. बरें, तिळपात्र दिलें, त्यांत दोन आणे ब्राह्मणाच्या पदरीं पडतात व दोन आणे तांबटास मिळतात, तद्वत् चार आण्यांचें एक पुस्तक घेतलें तर दोन आणे कागदाबद्दल आतील व दोन आणे मजुरीबद्दल ब्राह्मणास मिळतील. तेव्हा हाही त्यांचे रीतीप्रमाणे धर्मच झाला.

वामनद्वादशीचें व्रत करितात; त्यास बारा लहान पोरें मुंज झालेली आणून त्यांस दोनतीन रुपयांचा विषय देतात, परंतु तो विषय असा असतो की, त्याचा उपयोग कांही पडत नाही. परंतु लोकांस असें वाटतें की, हें पुराणांत सांगितलें आहे, त्याप्रमाणे आहे. म्हणून हेंच पुण्य, परंतु त्या रुपयांचीं पुस्तकें आणून मुलांस दिली किंवा त्या रुपयांत ब्राह्मणाचे मुलास एखादी विद्या शिकविली, शाळेत आठचार आणे देऊन त्यास पाठविलें, तर त्यास फायदा होईल. सोन्याच्या प्रतिमा करून ऊस, मडकें यांत पूजा करून घाव्या, त्यापेक्षा ग्रंथ दिले तर मुलें जन्मपर्यंत वाचतील, शहाणीं होतील, आणि उपयोग फार पडेल.

तसेंच लोक मरतेसमयीं तुला करितात. त्यांत पांचचार हजार रुपये भरतात व मग ते मनास येईल तसे उडवितात; त्यास कांही अनुक्रम नसतो. त्या पांच हजार रुपयांचें कांही तरी चिरकाल रहाण्याजोगें काम केलें, तर किती लोक शहाणे होतील ! लोक असें म्हणतात की, पुष्कळ ग्रंथ लिहितात परंतु पैसा कोणापाशीं आहे ! विकत घ्यावे कोणी ! आणि इकडे तर असा अनिवार्य खर्च करितात. आणि जें उपयोगी तें करीत नाहीत.

आता वृद्ध लोक जे आहेत, ते तर सुधरतील, हें घडतच नाही. कारण की, जो मनुष्य पंचवीस वर्षांवर झाला, त्याची समजूत लहानपणीं जी पडते, तीच त्याची कायम होते व त्यास असें वाटतें की, मी शहाणा, मला शिकवितात काय ! बाप शहाणपणावर मी पैसा मिळविला, संसार केला, आता जरी दरिद्र आलें, तरी मी वेडा आहें हें त्याला कदापि वाटत नाही. वास्तव त्याची सुधारणा व्हावयाची नाही. म्हणून

आणखीही वरचेवर छापत आहेत. वर्तमानपत्रांत अनेक तऱ्हेचे मजकूर व माहितगारी लिहून छापतात; परंतु त्यांचा कोणी वाचणारा नाही. जे आहेत ते गरीब आहेत. श्रीमंत व थोर जुन्या काळचे. यांस असें वाटतें की, हा कागद् व्यर्थ खर्च कशाकरितां करतात ? व यांत उपयोग काय ?

परंतु त्यांचे लक्षांत असें येत नाही की, आम्ही केवळ मूर्ख आहों व आम्हांस कांही समजत नाही. पहा की, या लोकांस आमचा देश कोठे आहे व आणखी देश कोठे आहेत व तेथे कोण आहेत, व या देशांत सुधारणा काय पाहिजेत, व जर कोणी करूं लागला, तर त्यांस अनुकूल व्हावें, हें समजत नाही. नाना प्रकारच्या विद्या आहेत, त्यांपासून लाभ बहुत आहेत. समुद्रांत नावा चालविण्याची विद्या आमच्या लोकांत कोठे आहे ? रसायणशास्त्र व त्यापासून लाभ होतात, हें कोठे माहीत आहे ? यंत्रज्ञान कोठ समजतें ? निदान चांगलें कोणतें व वाईट कोणतें, याचा देखील भेद समजत नाही. जर कोणी चांगल्या कामास आरंभ केला, तर त्यास वाईट म्हणतात. कोणी वाईटास केला, तर त्यास चांगलें म्हणतात. असे विलक्षण लोक आहेत.

कोणी उपयोगी ग्रंथ केला, तर तो कोणी घेत नाहीत. व त्यांत काय आहे, हें देखील पहात नाहीत. त्यांस असें कळत नाही की, ज्या मनुष्यानें ग्रंथ लिहिला, त्याचा कांही तरी हेतु असेल, व त्यांस असें वाटत असेल की, लोकांस ज्ञान नाही तेव्हा तें या ग्रंथाच्या द्वारें त्यांस मिळावें; परंतु लोक ही गोष्ट समजत नाहीत. ग्रंथांत कांही असो, कोणी कांही म्हणो, ते जुन्या रीतीने सर्व गोष्टी घडाव्या असें पहातात. त्यांस अद्यापि इतकें देखील समजत नाही की, आमचे लोकांस कांही कळत नाही. त्यांस बहुत ग्रंथ झाले असतां उपयोग होईल, व देशांतील लोक शहाणे होतील.

त्यांची समजूत अशी आहे की, संक्रांत आली तर चार आणे खर्चून, एक तांब्याची तबकडी घेऊन, आंत तीळ घालून दक्षणेसहित एखाद्या मूर्ख ब्राम्हणाच्या हातीं देतील. आणि आम्ही धर्म केला, धन्य झालों, असें म्हण-

करण्याच्यास बाप नाही. ग्रंथ करून त्यास विकत घेणारे मिळविणें म्हणजे मोठा प्रयत्न पडतो हुकमाने व भिडेने हे लोकांचे गळीं बांधावे लागतात. त्यांजबद्दल किंमत देणें म्हणजे लोकांस असें वाटतें की, हा पैसा व्यर्थ आहे. यांत पुण्य नाही व धर्महीं नाही. वैदिक ब्राह्मणाचे घरीं आत नाही, हा धर्म कसाचा ? हें व्रत नाही, दान नाही. तेव्हा ग्रंथ घेण्यास पैसा कशाचा द्यावा ? याप्रमाणे हे लोक दुर्भाग्य आहेत. यांचा काळ विपरीत, म्हणून यांस अशी दुर्बुद्धि झाली आहे, हें तर उघड आहे.

परंतु लोक असें समजतील तर बरें-ग्रंथ छापणारे यांस पैसा द्यावा हें सर्वांपेक्षा उत्तम आहे. व या देशांत तर अति उत्कृष्ट हाच धर्म आहे. हें मूर्खांस शहाणे करण्याचें काम आहे, म्हणून हाच धर्म सर्वांहून श्रेष्ठ आहे. अशी समजूत यांची पडेल तर त्वरित लोक सुधारतील, यांत संशय नाही. व असें झाल्यावाचून ग्रंथही पुष्कळ होणार नाहीत; परंतु ईश्वरी इच्छा प्रमाण.

---

पत्र नं० १७

## सुशिक्षा व पंतोजी आणि संस्कृत व इंग्रजी भाषा

आमचे लोकांस सांप्रत काळीं ही मोठी कुदशा प्राप्त झाली आहे. त्यांचे मनांत सुधारणा येत नाही. त्यांस पूर्वीच्या चाली ज्या आहेत त्या तशा रहाव्या हें फार चांगलें वाटतें, व बाजीरावासारखा धनी भटांची समृद्धि करण्याकरिता यावा असें वाटतें.

परन्तु त्यांस अजून असा बोध झाला नाही की, या मागील चालीं

पैकी बहुतेक चाळी वाईट आहेत; येणेंकरून लोक बुडाले. त्यांस कांही कळत नाही. साधारण गोष्टीविषयींदेखील त्यांचें अज्ञान जात नाही. त्यांस मुळी शिक्षा नाही व सुसंगत नाही. ज्या संगतींत माणूस असतें, तसें तयार होतें; परंतु आमचे लोकांस खरी गोष्ट सांगणारेदेखील जवळ नसतात. घरांत भट असतो, तो पोरांस अगदी मूर्ख करितो. मूर्खपणाच्या गोष्टी लहानपणीं मनांत आल्या, म्हणजे त्या जात नाहीत. याजकरितां लोकांनी प्रथम सुशिक्षा लागावी, याजकरितां चांगला बेत केला पाहिजे.

सरकारी शाळा आहेत, त्यादेखील अजून चांगल्या झाल्या नाहीत; कारण पंतोजी जुनेच आहेत, ते भटांहून शहाणे नाहीत. याजकरितां मुख्य पंतोजी चांगले सुधारलेले व ज्ञानी पाहिजेत, तेव्हां सरकारच्या शाळा दुरस्त चालतील. हल्ली जुने पंतोजी आहेत, ते केवळ अज्ञानाच्या राशी आहेत. त्यांपासून कदापि लाभ होणार नाही. याजकरितां मुख्य पंतोजी व ग्रंथ हे तयार झाले पाहिजेत. ज्यांकडे विद्यावृद्धीचें काम आहे, त्यांणी म्हणजे बोर्ड ऑफ एजुकेशन यांणी मराठी पंतोजी तयार होण्याची एक शाळा केली पाहिजे. व चांगले ग्रंथ तयार करण्याकरितां तर्जुमे करणाऱ्यांची एक मंडळी बसविली पाहिजे.

आता पहा की, केवळ पगाराकरितां पंतोजी बुकें उघडितात; परंतु त्यांस पुसलें की, पृथ्वीची छाया पडून ग्रहण होतें कीं काय? तर म्हणतात, 'छिः! हें आपलें उगाच इंग्रजांचें मत आहे. हें आम्ही पोटाकरितां शिकवितों. दुसरा कांही रोजगार नाही; मग करावें काय?' ही अवस्था पंतोजींची आहे. मग मुलें तरबेज कशीं होतील? या जुन्या पंतोजींच्या हातीं रसायनविद्या दिली तर काय उपयोग? त्यांस त्यांतील एक अक्षरदेखील समजत नाही; म्हणून पोरांकडून परीक्षेस हजरी देण्याकरितां उत्तरें पाठ करून मात्र ठेवितात, परंतु स्वतां समजून देण्याचें ज्ञान नाही. नवीन निबंध करण्याचें ज्ञान नाही, व बुकांतील गोष्टी समजून देण्यास कळत नाही.

नवें बुक छापून आलें, म्हणजे म्हणतात की, 'आली ही पीडा, यांत

काय आहे ? ' असा कंटाळा करून पोरांस शिकवणारे जे लोक त्यांच्या हातून ज्ञान कसें मिळेल ? व्यर्थ पोरांना मात्र मेहनत पडते. वास्तव जशी पुस्तकें तयार होतात, तसे पंतोजी तयार झाले पाहिजेत. हें प्रथम काम आहे. ज्यांचें मन मुळापासून संस्कृत भाषेंतील ग्रंथ वाचून विपरीत ज्ञानाने भरलें आहे, ते लोक तर अगदीच उपयोगी नाहीत. त्यांचे हातून कारण अनर्थ होईल. एकदा या विपरीत ज्ञानाची प्रथम समजूत झाली, म्हणजे मन बिघडून जातें, तें मग ताळ्यावर येणें कठीण पडतें. वास्तव त्यापेक्षा अडाणी मनुष्य बरा.

वास्तव प्रथम जो इंग्रजी शिकलेला विद्यार्थी असेल, तोच पंतोजीचे उपयोगी पडेल. असे तयार होण्याकरिता एक नवीन शाळा व त्यावर यथायोग्य शिकविणारे पाहिजेत, तेव्हा असे लोक तयार होतील. जे संस्कृताचा अभिमान धरतात ते अगदी अज्ञानांत आहेत. ते सुधारणेस हरकत मात्र करतील. दुसरी गोष्ट त्यांच्याने व्हावयाची नाही. वास्तव असे पंतोजी तयार करून जुने असतील त्यांस पेनशिनें देऊन मुक्त करावें, हें बरें. संस्कृत. आजच्या काळीं कांही उपयोगी नाही व त्यांतील ग्रंथही उपयोगी नाहीत. तेणेंकरून लोक अधिक मूर्ख होतील. संस्कृताची योग्यता इतकीच आहे की, ती भाषा सुधारलेली आहे. याजकरिता पंतोजीस ती यावी, हें चांगलें.

परंतु भाषा येऊन अज्ञानवृद्धि झाली, तर उपयोग काय ? याजकरिता हें न होईल तितकें बरें. भाषा चांगली न आली, आणि मन साफ असून समजूत चांगली असली, तर ती पतकरेल. व त्याचा उपयोग अधिक पडेल. चांगल्या समजुतीने भाषादेखील सुधारेल; परंतु मुली एकदा संस्कृताच्या झऱ्याचें पाणी जो प्याला, त्याची भ्रांति जन्मभर नष्ट वर्षे शिकविलें, तरी उपयोग नाही, हें निश्चित आहे. याविषयी कोणी भ्रांतीच धरूं नये. सुधार-लेल्या संस्कृत भाषेचा मात्र उपयोग पडावा इतकें करावें, अधिक नको. त्यांतील ज्ञान अगदी उपयोगी नाही. ती भाषा प्रथम मुलांस शिकवावी, त्या भाषेंतील ग्रंथांप्रमाणे त्याचें मन होतें.

याकरिता फार सुधारलेली इंग्रजी भाषा किंवा तींतील ग्रंथ शिकलेला माणूस ठेवून, त्याचे हातून इंग्रजी ग्रंथांचें ज्ञान मुलांस शिकवून, तसे पंतोजी तयार करावे, म्हणजे फार उपयोग होईल. संस्कृताने आधी अनर्थ केला आहे. व याने आणखी अधिक अनर्थ होईल, हें पक्कें मनांत वागवावें आणि खोटा अभिमान धरूं नये. संस्कृत भाषेंतील ग्रंथ व इंग्रजी भाषेंतील ग्रंथ यांची तुलना करून पहावी, म्हणजे संस्कृताचा अभिमान जाईल.

---

पत्र नं० १०१

## संस्कृत विद्या

पुण्यांतील 'कल्याणोन्नायक मंडळीं'त कोण लोक आहेत, व त्यांचें ज्ञान कसें आहे, हें मला आजपर्यंत ऐकून ठाऊक होतें. व मला फार आशा होती की, हे लोक आपली योग्यता जाणून आपलें उत्कृष्ट ज्ञान बाहेर काढणार नाहीत; परंतु आपली फजिती करून घेण्यास तेच प्रथम प्रवर्तले, यास्तव त्यांस उत्तर दिलें पाहिजे. नाही तर ते असें समजतील की, पृथ्वी निःक्षत्री झाली. आणि जरी त्यांचें लिहिणें उघड वेडेपणाचें आहे, तथापि सुज्ञ जनांनी त्याचा धिःकार करूं नये.

(१) 'कल्याणोन्नायक मंडळीं'तील सभासद संस्कृत विद्येचा पक्ष घेतात; परंतु हा पक्ष व्यर्थ आहे. कारण की, संस्कृतांत फार विद्या आहे, असें सांगून लोकांस पंडित प्राचीन काळीं फसवीत होते; परंतु आजचा काळ असा आहे की, संस्कृताची उघडीक होऊन पंडितांचें सर्व ज्ञान बाहेर पडलें आहे. असें असतां हे सभासद बापडे सर्व पाठशाळेंतील पंडित आहेत,

परंतु त्यांस वास्तविक ज्ञान कांहीं नाहीं. संस्कृत भाषेंतील खुळें यांचे मनांत भरलीं आहेत. तीं झाडून टेवतील तर फार बरें होईल.

(२) संस्कृताचा इतकाच उपयोग आहे की, लोकांमध्ये भ्रांति उत्पन्न व्हावी. व जों जों मनुष्य त्यांत प्रवीण होतो, तों तों अज्ञानसमुद्रांत खोल खोल जात असतो; असें असून कोणी म्हणेल, पाठशाळा सरकारनें कशास चालविली आहे? तर शाळेपासून जें फळ आतां दृष्टीस पडूं लागलें आहे, तें येईल, असें पूर्वी वाटलें नव्हतें. तेव्हां असें वाटत होतें की, कोणीकडून तरी विद्येची गोडी या लोकांस लागेल, नंतर लोकांस जी विद्या म्हणून वाटते, त्यांतच अनुपान करून चांगली विद्या शिकवावी. अशा बुद्धीनें हें बीज घातलें. त्यास दक्षिणादिकेंकरून जलसिंचन केलें. परंतु या वृक्षास इच्छिलें फळ आलें नाहीं. उलटें आणखी अज्ञान वाढलें. असो. साधारण संस्कृता-विषयीं बोलण्याचा प्रसंग आहे; यांत इतर गोष्ट नको.

(३) संस्कृतांत चांगली विद्या नाहीं व उपयुक्त ज्ञान नाहीं, हें सर्व विद्वानांनीं ठरविलें आहे. परंतु सभासदांची खातरजमा करण्याकरितां लिहिणें जरूर आहे. प्रथम संस्कृतांत इतिहास नाहीं. मागाहून राज्यें कशीं झालीं? व तीं बुडालीं कोणत्या कारणानें, राज्यें किती होतीं? मुसलमान आले कधीं? त्यांचे पूर्वी राज्य कोणी केलें? येविषयीं पंडितांचें ज्ञान व नांगरहाक्याचें ज्ञान सारखें आहे. कलियुगास पांच हजार वर्षें सरासरी होत आलीं. त्याचा इतिहास आहे कोठें? याचें उत्तर पंडित काय देतील?

दुसरें, संस्कृतांत भूगोल नाहीं. पंडितांस पुसा की, रूम कोठें आहे? व अरबस्थान कोठें आहे? व हिंदुस्थानची हद्द कशी व लोक किती? व लांबीरुंदी किती? तर तो हातच जोडील, आणि ठाऊक नाहीं म्हणेल. पंडितांचें ज्ञान इतकेंच की, मेरु भूमीच्या मध्यें आहे. लक्ष योजनें उंच आहे. सिद्धपूर आहे. स्वर्गाची वाट हिमालयावर आहे. गंगा ही देवता जिवंत आहे, तशीच यमुनाही आहे. हें त्यांचें भूगोल-

संबंधी ज्ञान आहे.

तिसरें, संस्कृतांत यंत्रज्ञान नाहीं. आजपर्यंत कालिदासासारिखे पंडित झाले, मग या 'कल्याणोन्नायक' गरिबाची कथा काय? परंतु कोणीं पंडिताने यंत्र कधी केलें आहे? यंत्राची सुधारणा केली आहे? जें जातें व्यासाचे वेळेस होतें, तेंच आता आहे. जो नांगर पांडवांचे राज्यांत होता, तोच आता आहे. पंडितांनी कोणता ग्रंथ यंत्रावर विचार करून लिहिला आहे? पंडितांनी कधी ग्रंथ छापले आहेत? कागद करितात, त्यापेक्षा चांगले करण्याची युक्ति लोकांस दाखविली आहे? कर्नाटकांत ताडपत्रावर रामराज्यापासून लिहीत आले, तसेच आजपर्यंत लिहितात.

कोणत्या दशग्रंथी ब्राम्हणाने व कोणत्या षट्शास्त्री पंडिताने यंत्राविषयी विचार केला आहे? फार झालें तर शिल्पाविषयी एक जुनें पुस्तक काढतील आणि म्हणतील की, हें पहा आमचें यंत्रज्ञान. आंत पाहिलें तर दुसरें कांही नसतें. परंतु मंगळवारीं घर बांधूं नये, बुधवारीं मोरी ठकूं नये, त्रिकोण आला तर जागा टाकावी, जेथे समभाग येईल, तेथे घर बांधावें, रोहिणी नक्षत्रावर लाकडें तोडावीं, हेंच ज्ञान त्यांत सापडेल. त्या ज्ञानाप्रमाणे त्यांनी लोकांस वेड लावून दिलें आहे. व जो तो मुहूर्त पहातां पहातां श्रमतो. मुलाम बायको कशी का असेना, परंतु मुहूर्त चांगला पाहिजे. हें अज्ञान लोकांत पंडितांनी पसरून दिलें आहे.

चवथें, राज्यप्रकरणीं ज्ञान पाहिलें तर मनास येईल तसें राज्य करावें. या नियमावाचून कोणता नियम त्यांस ठाऊक आहे? लोकांमध्ये बंदोबस्त व उद्योग कसा होतो व त्याची वृद्धि, उत्पत्ति व नाश कोणत्या कारणाने होतात व फौजेचे नियम कसे असावे, येविषयी ज्ञान कोणत्या पंडितास आहे? हें ज्ञान नाही म्हणून पंडित उद्योग करावयास प्रतिकूल आहेत. व विचार करावयासही प्रतिकूल आहेत. व देशाचें हित व देशांत द्रव्य कसें येईल, याविषयी तर त्यांस धुळाक्षर शिकविलें पाहिजे.

कोणत्या पंडिताने राज्याविषयी ग्रंथ लिहिला आहे? व राज्य करण्याची युक्ति अमुक चांगली, असें दाखविलें आहे? फक्त पंडितांनी इतकेंच लिहिलें आहे की, जे जे राजे झाले, त्यांची खुशामत करून त्यांस आकाशांत नेलें आहे.

या गोष्टीची प्रचीत पहावयास दूर नको. बाजीराव याने पुण्यांत शास्त्र्यांचा एक मोठा कळप बाळगिला होता; परन्तु त्याने कोणतें कल्याण केलें? द्वादशीचें ब्राम्हणभोजन वाढविलें. *कोणतेंही पाप केलें, तरं पैका घेऊन निर्मळ म्हणून सांगत होते. " सर्वत्र विजयी भव " म्हणून आशीर्वाद देत होते. त्यांणी कांठाळें बम्लें. रोज पांचचार स्नानें घालीत होते. एवढीच गोष्ट त्यांणी केली. धर्म सांगितला नाही, राज्यव्यवहार सांगितला नाही, विद्या सांगितली नाही, लोकांस लुटून त्यांस शालजोड्या वाव्या, म्हणजे खंडीभर आशीर्वाद व दोन लाख कोट्या करून वाद करीत होते.

पांचवी गोष्ट, परदेशांत प्रवास करून, तेथील खबर लोकांत प्रसिद्ध केली पाहिजे, तर लोकांचें ज्ञान वाढतें. याविषयी लक्षावधि ग्रन्थ इंग्रजींत आहेत. त्यांपैकी एखादा तरी त्यासारखा संस्कृतांत आहे कीं काय? पंडितांस फार झालें तर शे-पन्नास कोसांतील प्रवास घडला असतो. बाकी त्यांच्या डोळ्यांपुढे अंधःकार असतो. पृथ्वीविषयी व समुद्राविषयी हे पंडित लोक बोलत असले, म्हणजे जसे कूपतळांतील लोक बडबडतात, त्याप्रमाणे त्यांचें ज्ञान नजरेस येतें.

सहावें, पदार्थज्ञानही बरोबर संस्कृतांत नाहीं. भलत्याचा गुण भलताच व भलतीच उत्पत्ति सांगितली आहे. सोनें जंबुनद आहे, म्हणून सांगितलें, तें कोठे आहे? पंडितांनी त्याची आंगठी कधी केली आहे काय? तसेंच सिंह, शार्दूल, शरभ या जनावरांचीं वर्णनें मनास येईल तशीं केलीं आहेत; परन्तु तीं पंडितांस खरीं वाटून, खरा शोध करण्यासदेखील ते प्रतिकूळ आहेत. याप्रमाणेच ज्योतिष, वैद्यक, रसायन या सर्व ज्ञानाची व्यवस्था आहे. फक्त संस्कृतांत शब्दशास्त्र मात्र आहे. म्हणजे

व्याकरण, अलंकार, न्याय इत्यादि.

परन्तु जें इंग्रजी भाषेंत ज्ञान व विद्या आहे त्यांतका या भाषेंत एक गुंजदेखील अंश नाही. आणि या शब्दज्ञानाचा उपयोग कोणता की, पंडित सभेंत असून बडबड करतात. त्यापासून लोकांस कांही उपयोग नाही, धर्म नाही, अर्थ नाही. हा वितंडवाद. परन्तु पंडितांस हीच मोठी विद्या वाटते व तिजवर ते भिरवितात. परन्तु त्यांस असें वाटत नाही की, आमचें ज्ञान निरुपयुक्त व पोकळ आहे, व याजवर लोकांस आता फसवूं नये. लोकांस आपले कल्याणाकरिता उपयुक्त ज्ञान मिळवूं द्यावें, असें वाटत नाही. बुडत्याबरोबर काठावरच्यानेही आंत पडावें, असा त्यांचा बेत आहे.

परन्तु हा वेडेपणा सोडून द्यावा व पुनर्विवाहादि विषयांवर मूर्खांसारखे बरळूं नये. पंडितांनी या हिंदु लोकांचें आजपर्यंत इतकें खाऊन त्यांचें कल्याण काय केलें? राहू चंद्रास खातो, ब्राम्हणास दिलें म्हणजे पुण्य, ब्राम्हण हेंच देव, हेंच त्यास सांगून आपल्यासारखें मूर्ख केलें.

---

पत्र नं० १०३

## पंडितांची योग्यता

जांस समजत नाही, त्याचे उगेंच बसावें, हें बरें; बोलूं नये, म्हणजे शहाणपणाचा ठाव लागत नाही; असें आहे.

परंतु तो मार्ग सोडून 'कल्याणोत्पादक मंडळी'ने आपलें ज्ञान प्रसिद्ध करावयास इच्छा केली, हें पाहून मला फार आश्चर्य वाटतें. यांचें ज्ञान कोणाचे उपयोगी नांही. लोकांचें कल्याण हे कसलें करितात? त्यांस

प्रथमच प्रश्न उलगडत नाही. हे पुसतात की, सुधारणा म्हणजे काय ? यांस आपली सुधारणा झाली पाहिजे, हेंच कळत नाही. आम्ही सर्वज्ञ व भूदेव व आमच्या पोथ्यांत सर्व ज्ञान आहे, व आम्हांस काय आणखी कर्तव्य आहे ? असें वाटतें. हे अजून पहिल्याच धड्यांत आहेत !

ज्या गोष्टींचे सिद्धांत सर्वतोमुखीं झाले आहे, त्याचें निवारण हे करितात. हे शास्त्री, पंडित व भट हे मूर्ख असतां विद्वान म्हणून हिंदुस्थानांत मोडतात. यामुळे देशाची फार बुडणूक झाली. इतर लोक यांणी अज्ञानांत बळेंच ठेविले आहेत. दक्षणा दोन पैसे मिळवायची असली, म्हणजे हे कावळ्यासारखे जमतात व पैशाकरिता सर्व दिवस घालवितील, परंतु उद्योग करावयाचे नाहीत.

पुण्यांत दक्षणा ग्रंथकर्त्यांस द्यावी म्हणून कोणीं इंग्रजी शाळेंतील लोकांनी सरकारास लिहिलें, त्याजबद्दल पाठशाळेंतील पंडितांस अत्यंत क्रोध येऊन त्यांनी एकत्र जमून सभा केली; परंतु एणेंकरून कांही फळ झालें नाही. सरकारानें उत्तम बेत मान्यच केला. या पंडितांनी गवगवा करून कांही उपयोग झाला नाही. त्यांची अप्रतिष्ठा होऊन गेली; व सरकारानें जें करावयाचें तें केलें. या पंडितांनी आपला मूर्खपणा मात्र जगांत प्रसिद्ध केला. हे सुधारणेचे महा वैरी आहेत. असे हे गुण यांचे प्रसिद्ध झाल्यामुळे सरकारांतून पाठशाळा हें दुर्गुणांचें माहेरघर व मूर्खपणाचें बीज मोडून टाकावें, असा बेत झाला आहे. तेव्हा पंडितांची योग्यता किती आहे, हें यावरून पहा.

हे बायांस मात्र फशिवतात. व्रतें, उपवास, प्रायश्चित्तें वगैरे पोट भरावयाचे मार्ग तेवढे ठेवण्याचा प्रयत्न यांचा आहे. दुसरें यांस कांही नको. हे विद्येचे भुकेले नाहीत. ग्रंथ वाढविण्यास उत्सुक नाहीत. देशकंटक आहेत. लोकांचे सुधारणेविषयी व हिताविषयी प्रयत्न करावयास अनुकूल नाहीत. राज्य कसें चाललें आहे ? व लोक बरे अवस्थेंत कशानें येतील ? नवीन कायदे काय पाहिजेत ? याचा विचार करीत नाहीत. सोटपणाची

गोष्ट, खराब चाल, स्वहित, सोदेगिरी; सुधारणुकीची बंदी, व आपसांत कलह लावून प्रामण्यें करून चार पैसे मिळवावयाचे, असीं कुत्सित कर्मे करण्यास हे पंडित कसे सुटतात की, जशा मोहळाच्या माशाच मधावर बसतात.

यांणी लोकहिताचा प्रयत्न केला, असें कोणास आजपर्यंत स्मरण नाही. त्यांनी आपले पोटावर व शालजोड्यांवर नजर देऊन सर्व देश खराब केला! जोंपर्यंत कांही मूर्ख लोक देशांत आहेत व ते मानतात, तोंपर्यंत यांचीं प्रामण्यें चालतील व कांही दिवसांनी हे जुने लोक गेले, म्हणजे पंडित उताणे पडतील; परंतु या गोष्टीस दहावीस वर्षें आणखी पाहिजेत. म्हणजे आम्हीच या पंडितांचा तमाशा पाहूं. तथापि प्रथम पाठशाळेचा विध्वंस झाला पाहिजे म्हणजे; एक पुरंदरचें बंड मोडलें.

---

# ३ आचार धर्म

पेशवाईचा अस्त होण्याचे सुमारास ब्राम्हणवर्गाचा ऱ्हास किती झाला होता व अव्वल इंग्रजी अमदानींतही तो कसा वाढत गेला, याची इथें ' लोकहितवादीं 'च्या या ६ पत्रांवरून दिसून येतात. " आता कुळंबी धर्मात्मे निघतील– ब्राम्हण निघणार नाहीत " (११). ही त्यांची भविष्यवाणी जोतिबा फुले व त्यांनी स्थापिलेला सत्यशोधक समाज यांच्या योगाने खरी ठरली आहे. ज्ञानसंपादनाचे बाबतींत किंवा एकंदर आचाराचे संबंधीही ब्राम्हणांनी अधोगतीची कोणती पायरी गाठली होती, हें पाहिलें, म्हणजे ( ३६,५८ ) लोकहितवादींची टीका गैर वाटत नाही. इतक्या स्पष्ट व झणझणीत अंजनाशिवाय अज्ञानी व ढोंगी मंडळींचे डोळे उघडले नसते. धर्माचा बाजार मांडणारांना वठणीवर आणण्यास दुसरा उपायच नव्हता. " ज्यांचें कर्म लोकांचा मूर्खपणा दूर करावयाचें तेच " तो मूर्खपणा वाढविण्याचा पद्धतशीर प्रयत्न करतात, ( ७४ ) म्हणून ब्राम्हण अधिक शिक्षेस पात्र आहेत, असें लोकहितवादींनी प्रतिपादिलें, तें चूक कसें म्हणावें ? सांप्रतच्या अवनतीचें व जनतेंतील अज्ञानाचें कारण त्यांनी असें सांगितलें की, " मेहनती कुळंबी वगैरे लोकांपासून... पिळून द्रव्य घेऊन... तें आळशी भटांस दिलें... कोट्यवधि रुपये याप्रमाणे खर्च झाले... " ( ७४ ). यांत असत्यप्रतिपादन कोठे आहे !

ईश्वरासंबंधी मानवांचें कर्तव्य काय, त्याची भक्ति माणसांनी कशी करावी आणि प्रचलित भक्तिमार्ग व देव–धर्म यासंबंधीच्या ( वेडगळ ) समजुती कां सोडल्या पाहिजेत, याविषयी लोकहितवादींनी केलेला युक्तिवाद रास्त आहे. ईश्वर न मानण्यापर्यंत त्यांची मजल गेलेली नाही. ते एकेश्वरी पंथीय आहेत. बाह्योपाधींचा धर्म व धार्मिक आचार त्यांना मुळीच पसंत नाही. नीतिप्रधान आचाराला मात्र ते महत्त्व देतात. सदाचारावर त्यांचा भर आहे. ढोंगी वागणुकीचा त्यांना मनापासून तिटकारा आहे. दयाशील वृत्ति हें त्यांच्या वागणुकीचें मुख्य

स्वरूप आहे. परंपरागत अज्ञानी चालीरीतींचा त्यांना तिटकारा असून, उपयुक्तता-वादाकडे त्यांचा विचार अधिक झुकलेला दिसतो. म्हणून ते म्हणतात— " चार ब्राम्हण लावून अभिषेक करावा, त्यापेक्षा चार मजुरदार लावून रस्ता नीट करावा, हें चांगलें. " (३६).

---

# ३ आचार धर्म

११ ब्राम्हणांचे आचार
२८ विधिनिषेधरूप धर्माचें मूळ
३६ स्नानसंध्या
३७ देवपूजा
५८ आचार
७४ देवळें व नेमधर्म

## ब्राम्हणांचे आचार

पूर्वी ब्राम्हण लोकांचा काय पवित्रपणा व धर्मनिष्ठपणा असेल, तो असो; परंतु हल्ली तर तो आम्हांस कांही दिसत नाही.

थोडे दिवसांमागे एक दिवस पुण्यांतून रात्रीस जात असतांना पाहिलें, तों रामजीचें देऊळ आहे, तेथे बहुत लोक जमा झाले होते आणि बहुत कलावंतिणी येऊन बसल्या होत्या. तेव्हा शोध लाविला तों असें समजलें की, त्या देवळांत दर साल एक मनुष्य ब्राम्हण जातीचा आहे, तो प्रयत्नें-करून नाच, गाणें इत्यादि समारंभ करून देवाचा उत्साह करितो. हें ऐकून मला असा चमत्कार वाटला की, देवाचें देऊळ ही पवित्र जागा, त्या ठिकाणीं असा भ्रष्टाकार जे करितात, ते स्वधर्माप्रमाणे चालतात, असें कसें म्हणावें ? हिंदुस्थान प्रांताची + खबर ऐकली आहे की, तिकडे देवळांत कसबिणीस येऊं देत नाहीत, व जेथे गरती स्त्रिया बसतात, तेथे रांडांस बसूं देत नाहीत; परंतु पुण्यांत हा बंद कांहीच नाही. कुलीन स्त्रिया आणि कसबिणी एके जागीं मिळतात. आणि देऊळ म्हणजे भजन, पूजन, चिंतन यांची जागा, तेथे पवित्र अंतःकरणाने देवाचें सान्निध्य व्हावें, आराधन व्हावें, पश्चात्ताप व्हावा व पापबुद्धि जावी, म्हणून देऊळ बांधतात. आणि वास्तवच सहस्र घरें बांधिलीं आणि एक देऊळ बांधिलें, याचें पुण्य सारखें, असें शास्त्र म्हणतें. त्याचें कारण हेंच की, भगवंताचे सेवेकरितां तें स्थान. तेथे लोकांनी जाऊन परलोकसाधनाचा विचार करावा, म्हणून त्यांचें माहात्म्य अधिक. जर तेथे तमाशे, नाच, लावण्या म्हणावयाच्या असल्या, तर देऊळ बांधणें आणि गावची चावडी बांधली सारखेंच आहे.

---

+ हिंदुस्थान प्रांत – उत्तर हिंदुस्थान

परंतु एका चांगल्या उद्देशाने देऊळ बांधितात, आणि त्याचा उपयोग असा भलता होतो, हें केवळें लोकांचें निर्लज्जपण आणि अज्ञान आहे? ब्राम्हण जे आपले वर्तणुकीने लोकांस नीति लावणारे, ते प्रमुखत्वेंकरून अशा कर्मांत पडतात. पुण्यांत किती एक ठिकाणीं आणखी असें पाहिलें आहे की, कसबिणींच्या घरांत देवळें स्थापिलीं आहेत. आणि तेथे ब्राम्हण जाऊन अभिषेक, पूजा वगैरे करितात. जा घरांत पाऊल ठेवलें, तर ब्राम्हण पतित व्हावयाचे, त्या ठिकाणीं धर्माची शोभा आणि त्यास उत्तेजन आणणारीं देवालयें तीं बांधलीं जातात, आणि तेथे ब्राम्हण जपानुष्ठानें करितात; तेव्हा हें कर्म कसें? अद्यापि पुण्यांत किती एक धर्मनिष्ठ ब्राम्हण आहेत, ते अशा देवळास देऊळ असें मानीत नाहीत आणि तेथे जातही नाहीत.

एका गृहस्थाने एका कसबिणीचा पैका वहिवाटीस घेऊन ती मेल्यावर देऊळ बांधलें व त्या ठिकाणीं एक पुराणिक मोठा वक्ता आहे, त्यास आणावयाकरिता तो गृहस्थ प्रयत्न करीत होता; परंतु त्याने कबूल केलें नाही. मागे श्रीशंकराचार्यस्वामी येथे आले होते, तेव्हा एक गृहस्थ बहिष्कृत आहे, त्याने अशी मसलत केली की, स्वामींचे चरण आपले घरांत लागून अन्न, जल प्राशन झालें म्हणजे, ते ब्राम्हणांचे गुरु, तेणेंकरून आपण सहज ब्राम्हणांत आल्याप्रमाणे होईल. असें मनांत आणून त्याने स्वामींस कांही पैका देण्याचें कबूल करून आपले घरीं आणलें, परंतु तीच मेजवानी त्यांची शेवटची झाली. म्हणजे कोणी एक मनुष्याने त्या जेवणास जाण्याचें निंद्य कर्म स्वामींनी केलें, असें तपशीलवार लिहून, त्याचे दरवाजास एक जाहीरनामा लाविला. असा सर्व लोकांचा आवेश जाणून स्वामींनी त्याच दिवशीं कूच केला. जर कांही दिवस अधिक राहिले असते, तर स्वामींनी लोकांची धर्मविचक्षणा करण्याचें एकीकडे राहून त्यांचेच वर्तणुकीची विचक्षणा, आमचे शहरांत पूर्वापार धर्मसभेची जागा आहे, तेथे झाली असती; परन्तु ही गोष्ट चुकली, हें बरें झालें.

तात्पर्य, ब्राम्हणांनी लोभ फार अंगिकारिला. आता ब्राम्हणांचा

संतोष किंमतीने विकत घ्यावयाचा आहे. दुसरें कांही करावयास नको. जें म्हटलें तें कर्म ब्राम्हण करतील व आळसामध्ये आपलें पोषण व्हावें, अशी तजवीज काढतील. त्यांस जेवावयास व दक्षणा मिळाली, म्हणजे झालें. धर्म, अधर्म, अनुशासन, यांचा विचार ते करीत नाहीत. मला वाटतें की, आता कांही कुळंबी धर्मांतमे निघतील; परन्तु ब्राम्हण निघणार नाहीत. सर्व जातींपेक्षा ते नीचपणास उतरले आहेत. त्यांच्यामध्ये आता गर्वमात्र शेष राहिला आहे. ज्ञान, न्याय, नीति व गुण कांही नाही. किती एक ब्राम्हण हल्ली तुकाराम व ज्ञानेश्वरपंथी × झालें आहेत, व गळयांत माळा घालून व वीणा घेऊन रस्त्यावर नाचतात. ज्यांस वैराग्य साधन करावयाचें, ते असें करतील काय ? दररोज नवीन संत होतात व मग पैका जमवयार त्यांचीं भांडणें लागतात. किती एक शिष्य त्यांस सोडून जातात, व बावांना शिव्या देतात. व बावांचीं कर्में पाहिलीं, तर उच्चार करवत नाही. कोणी व्यभिचारी, कोणी चोर, कोणी लबाड असे आहेत; सारांश ते साधु नव्हत, परंतु भोंदू आहेत. ते द्रव्याचा लोभाकरिता जेथे पुष्कळ लोक जमतात तेथे कथा, भजन करितात. व लोक जमत नाहीसे झाले, म्हणजे चालते होतात, असें लोकांना ठकवीत फिरतात. आणि आपण कांही उद्योग न करतां भीक मागून यथास्थित पोट भरितात. व लोक तरी किती आंधळे आहेत पहा ! असे लबाड ठगांस साधु म्हणून कबूल करितात. साधूने कसें राहावें येविषयी तुकारामाचा अभंग असा आहे–

"हरिभक्त जे म्हणवीती, हीना दीना का मागतीं ।
देखुनी सभेचा समुदाय, दावी भक्तीचा हा भाव ।
कथेमध्ये हालवी ढोंग, संत नव्हे तो बेसंग ।
पाहुनि स्त्रियांचा तो मेळा, काढि सुस्वर तो गळा ।
तुका म्हणे नव्हे योग, पोटासाठी केलें ढोंग ॥१॥

× तुकाराम व ज्ञानेश्वर पंथ – वारकरी संप्रदाय

जेथे कीर्तन करावें, तेथे अन्न न सेवावें।
तट्टु बैलाशीं हो दाणा, तेथे मागूं नये जाणा।
बुका लावूं नये भाळा, गळा घालूं नये माळा।
तुका म्हणे तोचि संत, बाकी सगळे ते हो जंत ॥२॥"

याप्रमाणे असून वेदशास्त्र सोडून तुकारामपंथ धरितात. मग त्या-सारखें तरी कां आचरण करीत नाहींत ? त्यांचें चित्त सर्व काळ लोकांस लुटण्याकडे असतें. त्यांस आणखी उद्योग कांही नाहींत. गंध म्होरकी दार, मुद्रा चक्रीदार व शेंड्या घेरेदार राखाव्या व ढोंग माजवावें; यांत फळ काय होणार ? असे खोटे साधु इतर ढोंगी लोकांपेक्षा शासनास अधिक पात्र आहेत, असें मला वाटतें.

---

पत्र नं० २८ — ३ सप्टेंबर १८४८

## विधिनिषेधरूप धर्माचें मूळ

धर्मशास्त्राचें व नीतिशास्त्राचें मूळ काय आहे, याचा विचार करतां दिसतें की, प्रथमतः ईश्वराने पृथ्वी निर्माण केली व सर्व सृष्टीतील पदार्थ सूर्य, चंद्र इत्यादि केले आणि नंतर मनुष्य उत्पन्न केला. तेव्हा प्रथम जो मनुष्य होता, तो सुखी असेल; कारण त्याचें कुटुंब एकटेंच. सर्व सृष्टीचा धनी तोच. नद्या, जमीन, झाडें या सर्वांचा अधिकारी तो एकच. तेव्हा तो पाहिजे तेथे रहात असेल. जेथे पाहिजे तेथें बसत असेल, पाहिजे तेथे पेरीत असेल. त्या काळीं त्यास कोणी मुजाईम नव्हता. याजमुळे तो अर्थात् सुखी असेल.

असें कांही दिवस चालल्यानंतर त्याचें कुटुंब वाढलें आणि एका

घरांत रहात होते, तेच लोक फार होऊन त्यांचा गाव झाला. तेव्हां एकानें जमीन लागवडीस आणली. ती चांगली पाहून त्याचे भावांस लोभ उत्पन्न झाला; कारण लोभ, क्रोध, मोह हे मनुष्याचे मनांत आहेतच; परंतु त्यांस प्रसंग आल्याशिवाय ते दृष्टोत्पत्तीस येत नाहीत. सांप्रत हीं मनुष्यें किती एक चोर व किती एक लबाड असे गुप्त रूपानें आहेत. जे चोर आहेत ते श्रीमंत असले म्हणजे त्यांस चोरी करावयाचें अगत्य असत नाही, हें पुष्कळांचे पहाण्यांत आहे. एका मनुष्यानें स्त्री केली म्हणजे तिचा स्वभाव भिन्न असल्यामुळें तिचा भ्रतार वारंवार क्रोधाविष्ट होतो आणि तिचें व त्याचें पटत नाहीं. पुढें ती स्त्री मेली म्हणजे दुसरी करतो. आणि ती सहनशील व नम्र असली म्हणजे तिचा भ्रतार पहिल्यानें भांडत होता, तोच सुखानें ती-अवळ राहातो. याचें कारण काय की, क्रोध येण्याचें कारण कमी होतें. आणि असेंच जर सर्व मनुष्यास जसें पाहिजे तसें प्राप्त होईल, तर कोणी कोणास उपद्रव करणार नाही.

परंतु ईश्वरी संकेत असा आहे की, जसजसे पदार्थ मनुष्यास पाहिजेत, तसतसे त्यानें ते निर्माण केले पाहिजेत. ते जर फुकट मिळतील तर कोणी दुराचरण करणार नाहीं. परंतु या लोकीं भ्रांति व अज्ञान फार आहे. तेणें-करून ईश्वरानें मनुष्यास जे पदार्थ उद्योगानें शोधून काढण्यास सांगितले आहेत, त्यांतून किती एक सापडावयाचे आहेत, त्यांचा अन्त नाहीं. परंतु जर सर्व सापडतील तर सर्व लोक सुखी होतील; परंतु असा काळ कधी येईल हें तर्कानेंही समजणें अशक्य आहे. वास्तव मनुष्यमात्राचा धर्म असा असावा की, हे पदार्थ शोधण्याचा उद्योग सर्वदा करावा. कवीनें म्हटलें आहे की—

अनर्थमक्षरं नास्ति नास्तिमूलमनौषधम् ।
अयोग्यः पुरुषो नास्ति योजकस्तत्र दुर्लभः ॥

असा सर्वज्ञ मनुष्य कोठे आहे की, योगायोग्य आपून विचार करील आणि असा वैद्य कोठे आहे की, जास सर्व वनस्पतींचा निर्णय कळेल, आणि

असा शब्दाचा अर्थ जाणणारा कोठे आहे की, प्रत्येक शब्दाचा अर्थ कोणत्या भाषेंत, कसा होतो हें समजेल ? ही गोष्ट घडत नाही; तत्रापि मनुष्याने असा उद्योग करावा की, जितकें समजेल तितकें शिकत जावें. असें करतां करतां मरणानंतर तरी ईश्वर सर्व आपला खजिना त्यास दाखवील व मग त्यास अत्यंत सुख होईल. आणि सर्वज्ञ मनुष्य झाला, तर मग त्याचे हातून कांही विपरीत घडावयाचें नाही. आणि इतकाच भेद स्वर्गास व मृत्युलोकास आहे. येथे भ्रांति आहे म्हणून दुःख आणि तेथे भ्रांति नाही व ज्ञान आहे, म्हणून सुख. असो.

परंतु ईश्वरी संकेताने झालें तें कोणाचाने फिरवत नाही. याजकरिता ईश्वराने अक्कल दिली आहे. त्या अकलेचा जोराने मनुष्याने एकामेकांचा बुद्धिबळें करून ज्ञानाचा पाठलाग करावा. म्हणजे त्याचे पोटीं सुख आहे, ही गोष्ट सिद्ध आहे. परंतु पूर्वी सांगितलें की, मनुष्यास प्रसंग आल्याखेरीज त्याचे गुण दृष्टीस पडत नाहीत आणि प्रसंग दैववशात् कोणास मिळतात व कोणास मिळत नाहीत. तेव्हा जगाचे आरंभीं जेव्हा लोकांची वृद्धि होत चालली होती, तेव्हा हे प्रसंग वाढत चालले. एकाची संपत्ति पाहून दुसऱ्यास लोभ झाला व त्याने ती दिली नाही, म्हणजे त्यास राग यावा. एकाने एक जमिनीचा तुकडा घेतला व तो नीट केला. त्याजवर दुसरा उगाच दावा करूं लागला, म्हणजे त्या उभयतांचें भांडण व्हावें. तसेंच एक सुंदर स्त्री झाली, तिचें एकाने परिग्रहण केलें व तिचावर दुसऱ्याने नजर ठेवली. तेव्हा एक म्हणूं लागला की, ही माझी स्त्री, हिचें मी परिपालन केलें आणि आता हिला हा कोण नेणार ? तेव्हा अर्थातच कज्या झाला. अशाच स्थितींत कांही काळपर्यंत लोक समाईक होते.

पाहिजे ती जमीन घ्यावी. पाहिजे त्याने स्त्री घ्यावी. धर्म मुळी कांही नसेल. आणि असण्याची त्या काळीं गरज नव्हती. कारण जोंपर्यंत दुसऱ्यास दुःख होत नाही, तोंपर्यंत पाप नाही. आणि स्वर्गास इच्छित पदार्थ प्राप्त आहेत. तेथे कोणी माझी अप्सरा म्हणत नाही, पाहिजे तेथे रहातात व

पाहिजे त्याचा स्वच्छंद उपभोग करितात; परंतु अज्ञान आणि भ्रांति मृत्युलोकांत फार. येथे चालेना व लोकांत कलह फार उत्पन्न होऊं लागले.

तेव्हा जे लोक होते, त्यांतील जो प्रमुख बळवान होता, त्याने नेम करून दिले की, जी जमीन ज्याने घेतली, तीच त्याने वहिवाटावी. दुसऱ्याची घेऊं नये. तसेंच ज्याणे जी स्त्री वरिली ती त्याची झाली. तिजवर कोणी दावा करील, तर त्यास शासन होईल. तसें स्त्री ज्याणे वरिली, त्याने परस्त्रीचा लोभ करूं नये. कारण तेणेंकरून त्याचे स्त्रीस दुःख होतें. आणि असें ठरलें की, ज्याने स्त्री केली, त्याने तिचें पालन करावें आणि तिला पुत्र होतील ते त्यांचे वारीस समजावे. असे परस्परांचें दुःख टाळण्याकरिता अनेक नियम केले.

तेव्हा लोकांत पद्धति पडली आणि जो बळकट होता, तोच त्यांचा राजा झाला. त्याचे आज्ञेंत इतर लोक राहूं लागले; परंतु पहिल्याने लोक भाषा बोलूं लागले, त्या वेळेसच ते अक्षरें लिहूं लागले नसतील; कारण भाषेचा मागील हें प्रकरण आहे. पहिल्याने लोक एकमेकास निरोप सांगून पाठवीत असतील. व जेव्हा लोक दूर दूर गेले आणि दोन कोश वस्ती होती, ती पन्नास कोश झाली, तेव्हा सांगून पाठविणें अवघड पडूं लागलें, तेव्हा मग लोकांनी लेखनविद्या काढली असेल; परंतु लेखनविद्या निघण्यापूर्वी बहुत काळ गेला असेल. आणि लेखनाचे पूर्वी हें शास्त्र व राजाने सांगितलेले नियम साधारण भाषेंत व कविता प्रबंधांत स्मरण रहाण्याकरिता पाठ करून ठेवीत असतील आणि जागोजाग नाना प्रकारचे नियम चालत असतील.

असें होतांना कांही दिवस गुदरल्यावर मागील नियम रद्द करून दुसरे राजे झाले. त्यांनी दुसरे त्यांस जे नीट दिसले ते नियम केले असतील. असें होतां होतां बहुत नियम झाल्यानंतर जाति झाल्या असतील. पहिला धंदा शेतकीखेरीज दुसरा नसेल. कारण पिकविणें व खाणें हें मनुष्यास मुख्य कर्म जगण्याकरतां जरूर पाहिजे. हें जर लोक न करतील, तर जीव जगणार

नाहीत व पिकवावया उद्योग हाच ईश्वराने लोकांस लावून दिला असेल; कारण त्यापुढचा धंदा दुसरा कोणताही नाही. परंतु पुढे असें झालें की, दोनशे चारशे लोक शेत करणार झाले, तेव्हा चारशे नांगर तयार करणें, हें एका मनुष्याचें काम झालें. तेव्हा सुतारकाम जाचें त्याने घरोघर करावें, त्यांत सुख नाही, याजकरिता एकाने तें पत्करिलें. मग तो लोकांपासून चरितार्थास दाणे घेऊन नांगर पुरवावे, असें काम करूं लागला, तेव्हा तो सुतार झाला.

पुढे इतकीं पुष्कळ लाकडें रानांतून तोडून आणावयास व नांगर करावयास त्यास फावेना, म्हणून दुसरा एक मनुष्य लाकडवाला झाला. तसेंच इतके लोक घरें बांधून राहूं लागले, तेव्हा गवंडी झाला, व नेम व शास्त्रार्थ पुष्कळ झाले. तेव्हा ते पढून इतर लोकांस सांगावयास ज़रूर पडली, तेव्हा ब्राम्हण झाले. त्यांनी सर्व नेम व धर्म शिकून लोकांचे दाण्यावर उपजीविका करावी, असें ठरलें. कोणी कज्या करील, तर त्याने ब्राम्हणास पुसावें व त्याने शास्त्रार्थ सांगावा असें झालें. असें होतां होतां लोक देशोदेशीं राहिले, तेव्हा एका देशांत लोक चांगले सुखी आहेत, असें पाहून दुसरे देशांतले लोक गरीब होते ते इकडे येऊन त्यास लुटावयास त्यांनी अरंभ केला. तेव्हा या देशांतील लोक किती एक क्षत्रिय झाले. म्हणजे त्यांनी सर्व दुसरे उद्योग सोडून शिपाईगिरी पत्करली आणि कबूल केलें की, सर्व लोकांचें आम्ही परराष्ट्रापासून पालन करूं. कोणास उपद्रव लागूं देणार नाही. आम्हांस घरीं खावयांस द्यावें. तें लोकांनी कबूल केलें. पुढे जो शेतकरी त्याने दाणे घेऊन बाजारांत जावें ही गैरसोय पडूं लागली. तेव्हा एकाने व्यापार आरंभिला. म्हणजे तो दाणे घेऊन इतरांस देऊं लागला व अशाच व्यापारावर आपलें पोट भरूं लागला.

असे एकामेकांचे सोईकरिता ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार वर्ण प्राचीन काळीं उत्पन्न झाले; तेव्हा प्रत्येक लबाडी करूं लागले. म्हणून प्रत्येक वर्णाने कसें वागावें, याचा निबंध होण्याकरिता कोणी शास्त्र लिहिलें, त्याजवरून त्याचा बंदोबस्त करूं लागले; परंतु शास्त्रासही लोक मानीनात.

तेव्हा राजास नेमणें जरूर झालें. आणि राजाचानेही कारभार नीट चालेना, म्हणून राजाने कसे चालावें इत्यादिसंबंधी राजनीति झाली. व क्रमाक्रमानें राजाचे अमलदार, मंत्री, प्रधान आणि सैन्य हे त्याचे ताब्यांत लोकांचे सुखाकरिता आले.

पुढे दाणे घरोघर पोचवावयाची अडचण पडूं लागली, म्हणून सुवर्ण व रुपें या धातु बहुत मेहनतीने तयार होतात, त्यांचे तुकडे करून तें द्रव्य चालू लागलें. तेणेंकरून अशी सोय झाली की, ज्या ठिकाणीं आपल्यास कांही खरेदी करावयाचें असेल, तेथे ते तुकडे घेऊन गेलें म्हणजे त्याचे बदला जो पाहिजे तो जिन्नस मिळावा. घरोघर गाड्यावर घालून दाणे नेणें जरूर नाही. पुढे हे सोन्याचे तुकडे लोक खोटे करून वापरूं लागले, तेव्हा राजाने बरनी शिक्का करावा असें ठरलें, तेव्हा रुपये व मोहरा चालू झाल्या. याप्रमाणे धर्मशास्त्राचें व नीतिशास्त्राचें मूळ आहे.

ईश्वराने विचार दिला आहे, तेणेंकरून जें वाईट दिसलें, तें सर्वसंमतीने काढून टाकलें व जें चांगलें होतें, तें ग्रहण केलें. शास्त्र लोकांचे सुखाकरिता केलें आहे. शास्त्राचा मुख्य हेतु हाच आहे की, लोकांमध्ये व्यवस्था व्हावी. ज्याचें त्यास मिळावें. कोणाची जबरी कोणावर होऊं नये. मालकी कायम राहावी. प्रजेने नीट वागावें. राजाने प्रजेचे सुखावर नजर देऊन वसूल घ्यावा. ज्यास्ती घेऊं नये. व खर्च बेताने करावा. कारण लोकांचे मेहनतीचा पैसा घेऊन राजाने आपले सुखाकरिता व हिताकरिता व हामडौलाकरिता निरर्थक शिपाई व अमलदार वगैरे यांजकडे खर्च करणें उचित नाही; व अयोग्य मनुष्यास कामावर न ठेवणें हाही राजाचा मुख्य धर्म होय, तर धर्म म्हणजे जे नियम लोकांकरिता केले आहेत, ते व जी आपली योग्यता त्या योग्यतेप्रमाणे व्यापार करणें म्हणजे ब्राम्हण असल्यास विद्या व शूद्र असल्यास कृषिकर्म करणें हाच धर्म आहे. याप्रमाणे बरोबर चालून प्रतारणा न करणें व कोणास दुःख न देणें हा मुख्यार्थ आहे. आणि धर्मांचें मूळ व शास्त्राचें मूळ विचाराने हेंच कळतें.

# स्नान-संध्या

वास्तविक धर्म सोडून व ईश्वराची भक्ति मोडून हिंदु लोक विलक्षण मार्गास लागले आहेत. ते असे की, किती एक लोक स्नान-संध्यादि कर्मं करितात. त्यांस वाटतें की, मोक्षाचें साधन हेंच आहे. प्रातःकाळीं उठून स्नानसंध्या करावयास बसून, डोकीस रुद्राक्षांचा माळा घालून, भस्म-लेपन करून, ढोंग करून, चार घटका बसावें म्हणजे त्यांत ईश्वराची भक्ति झाली. मग सर्व दिवस वाईट कर्मे व असत्य भाषणें करून, लोकांचा माना मुरगाळल्या, तरी चिंता नाही; परंतु आम्हांस असें वाटतें की, हे स्नानसंध्या करणारे आपलें आयुष्य व्यर्थ घालवितात, त्यांत कांही ईश्वरप्राप्ति नाही. ते बकध्यानी, मूर्ख व ढोंगी आहेत. असें म्हटलें आहे की—

यं मां सेवेत सततं न नित्यं नियमान्बुधः।
यं मान्यतस्त्व कुर्वाणो नियमान् केवलान् भजन् ॥
(मनु० अध्याय ४, श्लोक २०४)

परोपकाराय पुण्याय पापाय परपीडनम्। (व्यास)

या वचनेंकरून असें ठरतें की, नीति आणि सदाचरण हें लोकांचें कल्याण करण्यामध्ये आहे. याशिवाय पुण्य नाही. केवळ जे कर्मांचें भजन करितात, ते ढोंगी आहेत. नीतीपर वर्तणूक असावी, हें प्रथम कर्म होय. नंतर कर्मांची खटपट केली सारखी, न केली सारखी. याशिवाय कबीर म्हणतात, "मन चंगा तो काथोटमें गंगा."

याप्रमाणेच कलियुगीं साधु झाले त्यांचें मत आहे. तस्मात् ढोंग करणारास पुण्यवान् जाणतात, हे खोटें आहे. एका फारशी ग्रंथांत पहाण्यांत आलें आहे की, एका अन्यायी राजाने एका पुण्यपुरुषास विचारलें की, 'मी

ईश्वराचें भजन कोणत्या रीतीने करावें ?' तेव्हा त्या साधूस त्याची वर्तणूक ठाऊक होती, म्हणून त्याने उत्तर केलें की, 'ईश्वराचें भजन तुला उत्तम हेंच आहे की, तूं सर्व दिवसभर आणि रात्रीं निजत जा.' तेव्हा राजाने पुसलें 'असें कां ?' तेव्हा त्याने उत्तर दिलें की, 'याचें कारण ईश्वराचें मुख्य भजन करणें म्हणजे त्याने जे जीव उत्पन्न केले, त्यांतील ज्ञानी जीव जो मनुष्य त्याचें कल्याण करावें. आणि ही गोष्ट तुला निद्रा लागल्याखेरीज होणार नाही; कारण तुझ्या जागृतीने कितीएक मेले जातील व अन्याय होतील. याजकरिता दुष्टांस झोप हीच ईश्वरभक्ति आहे.' तेव्हा तो राजा त्या साधूस शरण गेला व त्याने जुलूम सोडून दिला.

या दृष्टांतावरून असें ठरतें की, कर्मांची खटपट करण्यामध्ये ईश्वरभजन नाही. ईश्वराचे भयाने वर्तणूक केली, म्हणजे तीच भक्ति आणि तेंच पूजन. तथापि जो अशी खटपट व ढोंग करितो, त्यास लोक पुण्यवान् म्हणतात, हें आश्चर्य आहे. अमका गृहस्थ त्याचें कर्म इतर कसेंही असो, परंतु प्रातःकाळीं उठल्यापासून प्रहरभर स्नानसंध्या करण्याचा त्याचा नेम मोठा सदृढ आहे. असो. त्याने पूर्वजन्मीं असेंच केलें, त्याचें फळ या जन्मीं त्यास आलें आहे. या जन्मीं स्नानसंध्या करतो, त्याचें फळ त्यास पुढले जन्मीं येईल, असें म्हणतात आणि त्याचे वाईट कामांवर पडदा घालितात, हा मूर्खपणा आहे. ज्याचें कर्म वाईट असतें आणि ज्याणे जन्मभर दगडावर पाणी ओतलें आणि झाडांचीं फुलें तोडून रास केली, तरी देव त्याजवर कृपा करील काय? नाही. सद्धर्माची मुख्य खूण हीच की, मनुष्याचे कल्याणाकडे लक्ष असावें. परंतु मनुष्याचें कल्याण करणें म्हणजे लुच्चे, सोदे यांचें रक्षण करणें किंवा फुकट जेवणारे लोक यांची पंगत माजविणें नव्हे. पात्रापात्र पाहून अज्ञान जे आहेत, त्यांस शहाणे करण्याची योजना करणें. जे रोगी आहेत, त्यांस औषधपाणी करणें, जे दरिद्री व पीडित आहेत, त्यांस सुख देणें, आईबापांचा प्रतिपाळ व मान करणें हीच नीति व हेंच पुण्य. जो देवावर एकही फूल घालीत नाही, परंतु वर्तणुकीने पवित्र व नीतिमान

आहे, आणि परक्याचें दुःख जाणतो तो चांगला. जो लाख तुळशी रोज वहातो व आईबापाचा वा भावाचा शत्रु, इंद्रियभ्रष्ट व लोकांचे उपयोगी किमपि पडावयाचा नाही, तो चांगला नव्हे. नामदेव म्हणतो—

जग चालले उफराटें, कोण जाणे खरें खोटें ।
जित्या तुळशी बेला तोडा, पूजा निर्जीव दगडा ।
मुष्टी धरुनि मेंढा मारा, ब्राम्हण म्हणती यज्ञ करा ।
नामा म्हणे सर्व खोटें भजन चाललें उफराटें ।

याप्रमाणे साधूचीं भाषणें आहेत. याजवरून उनाड ब्राम्हणांस राग येईल; कारण की येणेंकरून त्यांची फी बुडते. जर कोणी अभिषेक करील किंवा तुळशी वाहील, तर त्यांस पैसा मिळेल. किती एक लोक आपले भजनाची मजुरी ब्राम्हणांस सांगतात. ती अशी की, ब्राम्हणांनी उपास करावा व ५।१० दक्षणा द्यावी. हे नफे ब्राम्हणांचे बुडतील, याजकरिता सदरील मत खरें ७।८ तरी ब्राम्हणांचा व भट मंडळींचा असा अभिप्राय पडतो की, डामडौल केले पाहिजेत; कारण त्याशिवाय त्यांचा निर्वाह नाही; परंतु खरी गोष्ट आहे ती त्यांणी कबूल करावी आणि लोकांचें अज्ञान दूर व्हावें, हेंच चांगलें. बहुधा जे ढोंगी स्नानसंध्या करणार असतात, ते तर फारच लबाड असतात, असें बहुधा पहाण्यांत आहे. त्यांस असें वाटतें की, आम्ही ईश्वराची भक्ति फार केली. आता कांही केलें, तरी चिंता नाही; परंतु हें बातळ आहे. अशा करण्याने ईश्वरप्राप्ति नाही. सत्कर्मांने मात्र ईश्वर मिळतो.

किती एक लोक असे आहेत की, हातांत माळ घेऊन रोज लाख वेळ रामराम म्हणतात. असें करण्यास त्यांस त्यांच्या गुरूंनी सांगितलें असतें; परंतु अशी बडबड घशास कोरड पडेपर्यंत जरी केली, तरी त्यापासून फळ कांहीही होणार नाही. जर लबाडी सोडली, तर मात्र फळ होईल. मग देवाचें नांव घ्या किंवा नको. जर आपण ईश्वराचे प्राणी आहोंत, तर त्याचें भजन आपण असें केलें पाहिजे की, जेणेंकरून त्याची प्रीति आपणांवर होईल. जा गृहस्थाचें आपणांस साधन करावयाचें असतें, त्याचें नांव जर

घेत बसलों, तर कांही उपयोग आहे काय ? तर त्यास कृपा येईल, असें केलें पाहिजे. त्यास प्रिय आचरणाने त्याची प्रीति संपादन करावी. जर त्याचे घरीं तगाद्यास बसलें आणि म्हटलें की, अमकें दे तर जाईन, तर तो मूर्खपणाचा निर्धार होईल. उत्तम पक्ष हाच की, मनुष्याने मनुष्याचें कल्याण करावें. देवाचें भय धरून नीतीने चालावें, म्हणजे ईश्वर प्रसन्न होतो. त्याचे जे प्राणी त्यास उपद्रव केला आणि देवाचें नांव घेतलें व त्यावर खंडीभर पाला घातला, तर त्यांत पुण्य कशाचें ? यास्तव लोकांनी जर कोणास चांगलें-वाईट म्हणावयाचें असेल, तर त्याच्या स्नानसंध्येकडे पाहूं नये, त्याचे वर्तणुकीकडे पहावें. कारण स्नानसंध्या हें केवळ पोकळ आचरण आहे. त्यांत कांही उपयोग नाही. खरें पुण्य तें वेगळें आहे. याज-करिता पुष्कळ अनुष्ठानें केलीं, तरी त्यांत जीव नाही. ब्राम्हणांकडून मजुरी केली, तरी सारखेंच. त्यापेक्षा मजुरांची मजुरी बरी. चार ब्राम्हण लावून अभिषेक करावा, त्यांपेक्षा चार मजूरदार लावून रस्ता नीट करावा, हें चांगलें; कारण ती लोकहिताची मजुरी आहे. यास्तव स्नान-संध्या करण्यांत कांही पुण्य नाही.

---

पत्र नं० ३७ ३ डिसेंबर १८४८

## देवपूजा

शास्त्रामध्ये सर्व धर्मप्रकरणीं बहुत मार्ग लिहिले आहेत. कोणी म्हणतात, शिवास भजावें, जीव तोच शिव आहे. व कोणी म्हणतात शिव अधिक आणि कोणी म्हणतात विष्णु; इत्यादि अनेक मतें आहेत. तसेंच अग्निसेवा, यज्ञ इत्यादिक श्रौत मार्ग आहेत. कोणी सूर्यो-

पासक, कोणी शाक्त व फार अमंगळ आहेत. त्यांची पूजा सर्वांहून मूर्ख-पणाची आहे. ती केवळ मूर्ख व अविचारी असतील, ते मात्र स्वीकारतील. असे हे अनेक मार्ग आहेत.

परंतु माझे मतें सर्व मार्गांतील एक मार्ग खरा आहे; तो कोणता म्हणाल तर ऐका. मी त्यास शास्त्रांतून प्रमाणही काढून देईन. तो असा की, ईश्वर कांही मनुष्यास दृष्ट नाही, त्याचें अस्तित्व सृष्टीकडे पाहिल्याने मात्र समजतें. याप्रमाणे सर्व लोकही कबूल करितात. तेव्हा देवाचें भजन करणें योग्य व तो सर्वांहून वरिष्ठ आहे; परंतु त्याचें भजन करावें कसें, हें कळलें पाहिजे. ईश्वरास जर आम्हीं फुलें अर्पण केलीं, तर पहा बरें, त्याने पृथ्वी निर्माण केली, तेव्हा त्यास कांही कमी आहे काय? तसेंच त्यास नैवेद्य दाखवावा, तर तो उपाशी आहे काय? त्यास कोणताही उपचार करावयास मनुष्य योग्य नाहीत. कारण तो परिपूर्ण आहे. याविषयी पूर्वीचे ऋषींचें मत असेंच आहे.

परंतु लोक सामान्यतः मूर्ख आहेत. त्यांस वास्तविक ईश्वर कळत नाही. याजकरिता ते त्यास बरेंच स्वरूप देऊन सगुण करून ठेवितात. त्याचें वर्णन असें करितात की, त्याचे हातांत शंख, चक्र, गदा, पद्म आहे. म्हणजे त्याचा अर्थ इतकाच की, तो लोकांस शासन करणार आहे. चक्रें करून त्याचा अनादिपणा व अनंतपणा प्रगट होतो. ईश्वराचीं स्वरूपें अनेक प्रकारचीं वर्णन करितात. मूर्ख लोकांस ईश्वर कळण्याकरिता हीं वर्णनें केलीं; परंतु सार इतकेंच की, ईश्वर एकच आहे. त्यास ब्राम्हणही नाकबूल नाहीत; परंतु त्या एक ईश्वराचें मनुष्याने मनन करावें. त्याचा विचार केला असतां परमात्मा जो भगवान्, त्यास मनुष्यांनी मूर्खपणाने भजावें हेंही अयोग्य आहे. व देवास लहान मानून मूर्ति करितात. याची निंदा गीतेंत दोन ठिकाणीं केली आहे, ते श्लोक—

अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धयः।
परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम्॥ (अध्याय ७, श्लोक २४)

या प्रकारें करून ईश्वरास मूर्त मानणें हें मूर्खत्व आहे. ईश्वर अमूर्त हें त्याचे कृत्यावरून समजतें; कारण की, त्याणे केलेली सृष्टि तीदेखील मापतां येत नाहीं. तेव्हा तिचे कर्त्यास परमित जाणणें हा केवढा अपमान आहे ? वास्तव ईश्वराचें वर्णन आणि भजन करावें, इतकेंच त्यास पुरे. हृदयीं त्याचें चिंतन करावें, हेंच त्याचे थोरपणास योग्य आहे. आणि इतर उपचार नैवेद्यादिक त्यास करूं नयेत; मनुष्यास करावेत. कांही देणें असल्यास देवास देऊं नये, कारण देव उणा व उपवा नाही. याजकरता मनुष्यास दिलें, तर देवास दिल्याहून अधिक आहे. ईश्वराचें दर्शन होत नाही. तेव्हा त्याचें ध्यान मनेंकरून करावें. जें कांही कृत्य आणि उपचार करावयाचे ते पात्रापात्र पाहून मनुष्याचे ठायीं करावे हें उत्तम. आणि दयाधर्मास पात्र मनुष्य आहे। ईश्वर नाही. ईश्वर वर्णनास मात्र योग्य. जें कांही अर्पण करावयाचें आहे, तें मनुष्यास करावें, देवास नको. तो सर्वत्र पूर्ण आहे.

दगडास भजन आणि नैवेद्य कशास पाहिजे ? त्यापेक्षा ब्राम्हणास बरा; कारण तो प्रत्यक्ष खाणारा आहे. ईश्वराचें व्यक्त स्वरूप ही सृष्टि आहे. तेव्हा या व्यक्त स्वरूपाचे ठायीं काय तें अर्पण करावें. दगड हा कांही ईश्वराचें प्रत्यक्ष स्वरूप नाही. दगडापेक्षा जिवंत पदार्थ बरा; त्यास क्षुधा आहे व तृष्णा आहे. त्यांस सोडून दगडापुढे अन्न ठेवावें, यांत काय फळ ? एखादा गरीब अंधःकारांत बसला आहे, दरिद्राने पीडित आहे, ज्यास पैसा मिळत नाही, त्यांस पैशाचें तेल आणून देऊन, उजेडांत बसविलें तर बरें, किंवा तें सोडून त्यास अंधारांतच ठेऊन, देवळांतील मूर्तीजवळ पैशाचा कापूर नेऊन जाळावा हें बरें ? कोणत्याने ईश्वर तृप्त होईल ? ईश्वराने जे पदार्थ सजीव निर्माण केले आहेत, त्यांचें रक्षण करावें, तें सोडून देवळांतील दिवे लावावे, तर काय फळ ?

मला वाटतें की, या गोष्टीचा ईश्वरासही क्षोभ येईल; कारण विचारेंकरून असें कळतें की, ईश्वराची इच्छा मनुष्याने मनुष्यास सांभाळावें. केवळ देवाची पूजा करावी, त्याचा उपयोग काय ? जी गावची रयत आहे,

तिने पाटलाकडे जाऊन त्याचे आज्ञेंत वागावें किंवा गवरनरसाहेबापुढे जाऊन रहावें ? गवरनर त्याविषयी काय करूं शकेल ? तद्वत् मनुष्याने चांगला मार्ग सोडून गरिबास उपयोगी पडावयाचें सोडून कापूर देवळांत जाळला, तर उपयोग काय ? या मूर्खपणाने किती एक पैका व्यर्थ खर्च करितात व त्यास धर्म म्हणतात. आणि त्यापासून लोकांचा कांही उपयोग घडत नाही.

असे किती एक लोक व्यर्थ द्रव्य टाकतात; त्यांस जर सांगावयास गेलें, तर त्यांचे डोकींत लहानपणापासून वेड भरलेलें असतें, म्हणून ते ऐकणार नाहीत, आणि विचारही करणार नाहीत. असे दृढ मूर्ख ते आहेत. यास्तव त्यांचे अंतःकरणांत बोध व्हावा, म्हणून हें पत्र मीं लिहिलें आहे. वास्तविक धर्म कोणता आहे, तें त्यांणी समजावें, हें उत्तम आहे.

---

पत्र नं० ५८ २९ एप्रिल १८४९

## आ चा र

हिंदु लोकांमध्ये सांप्रत आचार फार माजला आहे. म्हणजे किरकोळ निरर्थक कर्में, आणि ढोंग फार होऊन, त्यांतील बीजरूप जी नीति ती भ्रष्ट झाली आहे.

ब्राम्हणांचा घरांत जाऊन पाहिलें, म्हणजे आचार किती असतात, ते लक्षांत येतात. म्हणजे सोवळें ओवळें हें एकच प्रथम; नंतर पुरुषांचें सोवळें, बायकांचें सोवळें. कित्येक ठिकाणीं देशस्थ ब्राम्हणांचे हातचें म्हणून कोंकणस्थांच्या बायका जेवीत नाहीत. पिठास पाणी लागलें, म्हणजे ओवळें-झालें, खरकटें, शिळें व उष्टें यांविषयी हजारो नेम आहेत. जेवतांना

खावणाराचा स्पर्श झाला, तर पुनः आंघोळ केली पाहिजे; उष्टें-विटाळ म्हणजे आंचवण्याचापूर्वी कोणास स्पर्श न करणें; दाणे भाजले म्हणजे ओवळ्यांनी खाण्यास चिंता नाही; परंतु हिरवे दाणे खाऊं नये, आणि त्यांस पाणी लागलें, म्हणजे विटाळ झाला. जेवून उठला, म्हणजे पुनः अन्न खाऊं नये व प्रोक्षण केल्याच्या पूर्वी खाऊं नये. व जेथे जेवलें तेथे शेणपाणी लावल्याखेरीज दुसरा जेवावयास बसत नाही. अन्नास जो हात लागला, तो तसाच अंगास लागला, तर अंग धुतलें पाहिजे. मुकटा, धावळ, रेशमी कापडें सोवळीं, कापूस ओवळा, म्हणजे धुतल्याशिवाय तो घेऊन जेवीत नाहीत.

परंतु वास्तविक विचार केला, तर रेशीम करण्यांत बहुत हिंसा होते. असें असून तें पवित्र व कापूस झाडाचें फूल, तें ओवळें, हें कसें असेल? याचा ठराव किंमतीमुळे पूर्वी शास्त्रकर्त्यांनी केला किंवा कसें? त्याचा ठिकाण लागत नाही. पीतांबर पन्नास वर्षे धूत नाहीत, परंतु धोत्रें रोज धुतात आणि धोब्याजवळ दिलीं, तर तीं सर्वदा ओवळीं होतात. तेव्हा हे सर्व चमत्कारिक नियम आमच्ये ब्राह्मणांचा तीस घटका जातात, त्याचा उपयोग पाहिला, तर काही नाही; परंतु लोक म्हणतात की, जितकें आस होईल, तितकें त्याने करावें. म्हणून जे भटभिक्षुक आहेत, ते ढोंग दाख-विण्याकरिता फारच करितात. व शंकराचार्यांचे वंशातील शिष्य, जे आता संस्थानी आहेत, त्यांचे येथे पाहिलें, तर आचार इतका आहे की, तो पहाण्यानेदेखील कंटाळा येतो. मग त्याचा त्रास कोण सोशील?

पन्नास ठिकाणीं पाणी शिंपतात. दोनशे ठिकाणीं हात धुतात. तीनशे ठिकाणीं पाय व आगोआग नेत्रस्पर्श, आणि आगोआग मार्जन आणि देव-पूजा व सोवळें मनस्वी करतात. सकाळपासून संध्याकाळपर्यंत असें ढोंग करितात आणि कोणी जेवावयास वगैरे बोलाविलें, तर मग फारच कांच-कचक करितात, म्हणजे लोकांस वाटावें की, पुण्यवान् प्राणी आहे. मना-ची स्थिति पाहिली, तर ज्ञानशून्य. एवढा आचार ब्राह्मणांनी लटपटीचा अंगिकारला आहे.

परंतु हा चौघांत चालवावयाचा नव्हे. याची खात्री ज्या ठिकाणीं मोठा समुदाय होतो, तेथें पहावें. चिंचवडचें ब्राम्हणभोजन, निगडीचा उत्साह, तसेंच मोठमोठे ठिकाणीं जेथे पुष्कळ लोक जमतात किंवा प्रवासास निघतात, तेव्हा आचार निभत नाही. कारण की, उष्ट्यावर, खरकट्यावर पाय देत चालतात. एकमेकास विटाळ होतो. शेण लावल्याचा शास्त्रार्थ करितात; परंतु उष्ट्या अन्नावर दुसरीं पानें मांडतात आणि लोक त्यावर जेवितात व त्यास म्हणतात हा देवाचा प्रसाद, येथे कांही चिंता नाही. घरीं मात्र अनाचार करूं नये. याजमुळे ब्राम्हण लोक हे फार नालायक आहेत. यांस गावास जाणें, लढाईस जाणें, समुद्रांत प्रवास करणें इत्यादिकांचा त्रास. कारण की, त्यांस प्रथम भय, दुसरें कांही नसतें, पण मी जेऊं कसा? माझें सोवळें ओवळें कसें चालेल? मला भांडीं कोण देईल? माझें शिजवील कोण? इत्यादि काळजा त्यांस पडतात. याजकरिता ब्राम्हण लोक बहुधा घरीं राहणारे लोक व चोरट्यासारखे आपले घरीं दडून रहाणारे. त्यांस कधी फार करून बाहेर पडावयाची वेळ आली म्हणजे त्यांचा प्राणांत होतो; परंतु अशा घातकारक चाली सोडून द्यावयास काय अवघड?

ब्राम्हण लोकांनी सर्व जातींस मूर्ख ठरविलें आणि आपण शहाणे झाले; परंतु आपण तरी पराक्रम केला असें नाही. आपल्याभोवती रिकामे घोक पुष्कळ उत्पन्न करून ठेवले आहेत. येणेंकरून ते सर्व लोकांस घेऊन आपण बुडाले, असें झालें आहे. जर इतर लोकांस लिहिण्याची व शास्त्र वाचण्याची परवानगी असून, ते विद्वान् असते, तर स्वताच पराक्रम केला असता; कारण की इतर जातीस आचाराचा अडचणी नाहीत; परंतु ब्राम्हणांनी सर्वांचा नाश करून आपण बुडाले. आता इतर जातींचे लोक शहाणे होऊन पराक्रम करीत तों फार दिवस पाहिजेत. नाही तर आजपर्यंत इतर जातींचे हिंदु लोकांनी विलायतेस जाऊन पृथ्वी कशी आहे, याचें वगैरे ज्ञान मिळविलें असते. मग ब्राम्हण याच देशांत आपले घरोघर रहाते, तरी त्यांची कांही फिकीर नव्हती. अस्तु.

## संस्कार मायभाषेतूनच चालावे

सांप्रत ब्राम्हण लोकांनी याचा विचार करावा. आपण पराक्रमी व प्रवास करण्यास व लढाईस वगैरे योग्य होण्यास आपल्यास कोणत्या चाली सोडव्या पाहिजेत, आणि त्या सोडाव्या हें उत्तम, हें एक. आणि दुसरें ब्राम्हण लोकांमध्ये नित्याचा आचार तसाच नैमित्तिक आहे. तोही रद्द करण्याजोगा आहे. म्हणजे पोर जन्मास आलें त्या घटकेपासून भटांचें अनुष्ठान व पूजा व सोवळें-ओवळें सुरू होतें. कोणी म्हणतो अन्नप्राशनसंस्कार, कोणी म्हणतो दगडसंस्कार, कोणी म्हणतो षष्ठीसंस्कार, त्यांची पूजा आणि व्यवधानें फार आहेत. तसेंच, लग्न हेंही हिंदु लोकांमध्ये मूर्खपणानें होतें. लग्नाचे संकल्प, प्रतिज्ञा वगैरे सर्व भट संस्कृत भाषेत आपण पाठ करितो, आणि बडबड करितो. त्यांतील शब्द कोणास समजत नाहीत. त्याचा उपयोग काय? हे सर्व संस्कार लग्नेंसुद्धा मराठी भाषेंत वगैरे उतरून त्याप्रमाणे करावे. हें गुह्य कशाकरिता पाहिजे? परंतु हें लोकांस कळत नाही.

घरांत लहान मुलगा किंवा मुलगी असली, म्हणजे तिला आचार शिकविण्यास प्रारंभ होतो. नीति वगैरे वास्तविक सदाचार शिकवीत नाहीत. पोरीस वाती लावाव्या, निरांजनें लावून तूप आळावें, तीळतांदूळ वहावें, नाना प्रकारचीं मूर्खपणाचीं व्रतें करावीं आणि त्याबाबदचा काहण्या तिजला शिकवितात. आणि तो दृढ भाव करितात. तसेंच, पुरुषाला सोवळें-ओवळें हें ब्राम्हणाच्या घरीं श्रम करून मुलास शिकवितात; परंतु मोठी गोष्ट म्हणजे नीति शिकवावयाची ती रहाते. याजमुळे परिणाम असा झाला आहे की, नीति म्हणजे काय? हें कोणास ठाऊक नाही. ते अगदी विसरले. आता आचारावरून चांगलावाईट मनुष्य जाणतात. व असें बहुत ठिकाणीं आढळत आहे की, जी स्त्री शिंदळ, लबाड असते, ती तुळशीस प्रदक्षिणा घालण्यांत, वाती आळण्यांत प्रमुख असते. नदीतलें पाणी दहाचीस घागरी देवावर ओततात, इत्यादि नेम शिंदळ स्त्रिया भक्तीने करितात आणि शिंदळकी वाईट, हें त्यांस स्वप्नांतही माहीत नसतें. तसेंच पुरुषांत जे चोर, कापखाऊ,

लोकांचा माना मोडून पोट भरतात, इंद्रियभ्रष्ट; पण त्यांचे सोवळें ओवळें सर्वांहून अधिक; जेवतांना बोलत नाही, पूजा करतांना बोलत नाही, हे असे नेम ते निष्ठेने करितात; पुष्कळ पैसा खर्च करून तुळशी-फुलांचा संहार करितात; परंतु आमची वर्तणूक वाईट हें त्यांचा स्वप्नीं नसतें व लोकही म्हणत नाही की, तो आचार कसला करतो? वर्तणुकेने फार वाईट आहे. याविषयी लोकही आंधळे झाले आहेत. तेही सोवळ्यावर व देवपूजेवर न्याय करितात, नीति आणि सदाचरण यांविषयी लोक अगदी आंधळे झाले आहेत.

---

पत्र नं० ७४ ९ सप्टेंबर १८४९

## देवळें व नेमधर्म

हिंदु लोकांमध्ये द्रव्याची व्यवस्था चांगली होत नाही. लोक मूर्ख आहेत. याजमुळे किती एक प्रकारें ते खर्च करितात. त्यांत कांही फायदा होत नाही. द्रव्य व्यापारांत असावें, किंवा धर्माकडे तरी लागावें. या लोकांस द्रव्याचा व्यय करतां येत नाही. लक्षावधी रुपये खर्च करून देवळें बांधितात आणि त्यांत मोठें धर्मकृत्य केलें, असें समजतात; परंतु बहुधा हें धर्मकृत्य केलें, असें होत नाही.

आज पुण्यांत शेकडो देवळें व हजारो मारुतीचे जन्माचे दिवशीं कोणतेही रस्त्यास मारुतीचा उत्साह नाही, असें बहुधा होत नाही व किती एक देवळें पडून गेलीं आहेत. कित्येक अनावस्थेंत आहेत. किती एक देवळें कसबिणींकडे भाड्याने आहेत व कित्येक देवळांचा दुर्लौकिक होऊन वाईट नांवें पडलीं आहेत. भांग्या मारुती, खुन्या मुरलीधर, छिनाल बालाजी, मोदीचा * गणपति, इत्यादि नांवें पडलीं आहेत. येणेंकरून असें समजतें

* 'मोदी' उपनांवाच्या पारशावरून हें नांव आलें; त्यांत वाईट काय झालें?

की, हिंदु लोकांत देवांची, देवळांची मर्यादा नाही. बरें, इतकीं देवळें असतां आणखी बांधावयाची काय गरज? परंतु मूढ लोक अद्यापि आणखी आणखी बांधितात. कोणी आपल्या घरीं बांधतो व कोणी वेगळी जागा घेऊन बांधतो व म्हणतो की, हें मोठें धर्मकृत्य आहे.

पुण्यांत आणखीं देवळें बांधणारासारखें आणखी कोणी या जगांत मूर्ख दिसत नाहीत. लाखो रुपये जे अशा मूर्खपणाने खर्च करितात, ते अगदी ज्ञानशून्य व अविचारी म्हणावे; परंतु या लोकांचा वेडेपणा घालविण्याचा प्रयत्न भट व शास्त्री आणि पंडित करीत नाहीत. ते उलटे असें करणारास आऊन सांगतात की, अमके पुराणांत असें लिहिलें आहे की, देऊळ बांधल्या-शिवाय जन्माचें सार्थक होत नाही, व मागे आहिल्याबाईने नर्मदातीरीं अशीचशें देवळें रांगेने बांधलीं. केवढी ती बाई धन्य होय! असें सांगून त्या मूर्खांस फारच चढी देतात. ज्यांचें कर्म लोकांचा मूर्खपणा दूर करावयाचें, तेच त्यास वृद्धिकर्ते होतात. याचें कारण असें आहे की, ब्राम्हण लोकांची उपजीविका या कामावर आहे. म्हणून ते असा मूर्खपणा वाढवून दोन पैसे आपणांस मिळावे, असा बेत अल्पमती करितात. त्यांस केवळ नफ्याची बुद्धि आहे, म्हणून ते या अज्ञानाचे सांप्रत पोशिंदे आहेत. आणि ते प्रयत्नपूर्वक अज्ञान वाढवितात व संपूर्ण देशांतील लोक विचारहीन आहेत. याजकरिता त्यांस कळत नाही. हे जें सांगतात, त्यांजवर भरवसा ठेवितात. आणि प्रहाणी जातीचे लोक वगैरे यांस ब्राम्हण व भट फार फसवितात. वास्तविक धर्म त्यांस कळत नाही.

वास्तविक धर्मांत कांही तरी दया आणि शांति या गुणांचें निदर्शन झालें पाहिजे व ती दयाही भलभलत्यावर उपयोगी नाही. जे सुशील, उपयोगी व लोकांची सेवा करितात, त्यांजवरच असावी. याखेरीज व्यय करणें मूर्खपणा आहे. अहिल्याबाईने धर्म केला, तो पैसा यथान्वय उत्तम प्रकारें झाला असता, तर फायदा होता; परंतु तिचा धर्म असा होता की, काशीहून पाणी आणून दक्षिणेंत स्नान नित्य करावें; एक ब्राम्हणाकडून

नित्य काशीस जातों, असें म्हणावें आणि दुसऱ्याकरवी जाऊं नये, असें म्हणावें. व त्यांत महान् पुण्य मानून पैका द्यावा. आता असा धर्म जेथे होतो, तेथे लोक किती आळशी होतील व किती मूर्ख असतील? मेहेनती कुळंबी वगैरे लोकांपासून त्यांचें शरीर पिळून, द्रव्य घेऊन, ते आपले आळशी भटांस दिलें म्हणजे केवढा राज्यांत जुलूम होईल! परंतु असें झालें आहे आणि कोट्यावधी रुपये याप्रमाणे खर्च झाले आहेत. हेंच सांप्रतचा मूर्खपणाचें कारण होय!

निकामी भटांस पोषणार्थ पैका देतात आणि त्यांत लोकांस पुण्य वाटतें. याजमुळे ब्राम्हण भ्रष्ट होतात. दुसरें कांही करीत नाहीत; परंतु ज्या गृहस्थाचे घरीं भट असतो, त्याचा प्रयत्न एवढाच असतो की, भटास पैका द्यावयाचा वाटा नाना प्रकाराने यजमानास सुचवाव्या. संक्रांत आली, म्हणजे त्यांस सांगावें की, तिळपात्रें द्यावीं, म्हणजे पुढे फार फळ आहे. दशाहार आला, म्हणजे वायनें देववावीं. आणि त्यांत पाहिलें, एकही पदार्थ उपयोगाचा नसतो. वीतभर सूप; बोटांत जावयाच्या नाहीत अशा दोन बांगड्या; कोणत्याही कामाचा उपयोगी पडावयाचा नाही, असा एक करंडा आणि चार पैसे, त्या मूर्ख गृहस्थास नाना प्रकारें गोष्टी त्याकडून सांगून देववितात; आणि चार पैसे मिळाले, एवढाच लाभ मानून इतर जिनसा टाकून देतात. याप्रमाणे वर्षांत किती वेळ करतात, याचा ठिकाण नाही. व ब्राम्हणांस पुण्यकाळ किंवा व्रताचा दिवस सापडणार नाही असा कोणताही दिवस वर्षांत नाही. त्याविषयी पुराणांत तयारी आहेच. असा व्यर्थ खर्च गृहस्थांकडून करवितात आणि मग त्यास जी प्राप्ति होते, तिजवर हा खर्च व त्याचा जरूरीचा खर्च जातो. मग चांगले कामास खर्च करावयास त्यांस सामर्थ्य कोठून राहणार? भट सर्व गिळून जातो. आणि मूर्ख यजमान असला, म्हणजे भटाचें व त्याचें फारच जमतें.

यजमान वारंवार भटास पुसतो, हें कर्म चांगलें सांग झालें ना? भट म्हणतो, "सांग सामर्थ्याप्रमाणे झालें; परंतु आणखी चार आणे जास्ती खर्च

करतां, तर बरें होतें उदककुंभावर दक्षणा फारच थोडी पडली." मग भोळसर यजमान असला, म्हणजे त्यास तेंच खरें वाटतें आणि भटाचे सांगितल्यावरून चालतो. मुख्यत्वेंकरून बायका फारच मूर्ख व अज्ञान असतात. याजमुळे या देशांतील स्त्रियांस भट फार फसवितात.

काय काय चमत्कार आहेत, ते लिहितांना पुरणार नाहीत. एखादी विधवा स्त्री झाली, म्हणजे तिच्याजवळ दोन पैसे असले, तर ते हरण करण्यास भट कारण होतात. तिला सांगतात की, बाई तुमचा नवरा मेला; आतां मुलें कोणाचीं, आणि बाळें कोणाचीं ? तुम्ही आपले जन्माचें सार्थक करून घ्या. या जन्मीं वैधव्य प्राप्त झालें, असें पुढे तरी होऊं नये, म्हणून कांही यत्न करा. हा पवित्र वैशाख आहे; किंवा कार्तिक आहे; अगर चातुर्मास्य आहे. पुष्कळ नेमधर्म व देवब्राम्हण यांजकडे व्यय करीत जा; म्हणजे ईश्वर संतुष्ट होईल. देवाचें तोंड ब्राम्हण आहेत. त्यांस मिळालें म्हणजे देवास पोचलें. आणि पहा, देवळांत इतके लोक पैसा देतात; परंतु देव घेत नाही. ब्राम्हण घेतात. कां की, देवाचें तोंड ब्राम्हणच. अशा गोष्टी सांगून त्यांकडून दोन पैसे असतील, ते बाहेर काढवितात व स्त्रियांस मूर्खपणामुळे कित्येक गोष्टी ज्या उपहासास कारण, त्या खऱ्या वाटतात. मग बाई नेम धरते की, रोज नित्य दान किंवा नित्य गोप्रदान करावयाचें आणि भटजीबावास द्यावयाचें. असे भटजीबावा स्वस्थ बसून कांही उद्योग न करतां खातात. याप्रमाणे धर्माची व्यवस्था होती. याजमुळे किती एक हजार गरीब लोक उपाशी मरतात; पण त्यांची दया कोणास येत नाही; आणि हे निरुद्योगी भट अज्ञान व आळस यांचे चौकीदार ! सर्व धन खातात.

याप्रमाणे वेडळ बोधण्याचा मूर्खपणा आहे. याजकरितां हल्ली जे गृहस्थ असें म्हणतात की, घरीं भट नित्य पंक्तीस असल्यासारखेरीज अन्न घेऊं नये, त्यांनी विचार करावा आणि भटासारखें पशु होऊं नये.

---

# ४ पारमार्थिक

धर्म म्हणून म्हणतात, त्याचें खरें स्वरूप काय असावें आणि प्रत्यक्ष आचरणांत त्याचा पगडा कितपत असावा, हें लोकहितवादींनी सविस्तर सांगितलें आहे (६४). हेंच पत्र या संग्रहांतील मुख्य म्हणतां येतें. नवा धर्म स्थापन करणाराची त्यांची भूमिका त्यांत स्पष्ट दिसते. आपलें नवें धर्मशास्त्र " ऋषींच्या शास्त्रापेक्षा " चांगलें होईल, असा त्यांना दृढ आत्मविश्वास वाटतो. शास्त्रांतील कायदे वरचेवर जरूर फिरले पाहिजेत, असें त्यांचें आद्यतत्त्व असल्याने प्रगतिप्रियतेचे ते पुढारी ठरतात. " जें विचारास येत नाही, तें मत मात्र मान्य करूं नये," (२९) असें बजावून ते म्हणतात, " मन हेंच मोठें शास्त्र आहे. लिहिलेलीं शास्त्रें सर्व याचे खालीं आहेत ( ५३ ). "

त्यांचे काळीं धर्माच्या नांवाखाली अनाचार माजला होता. बायाबापड्यांच्या अडाणीपणाचा फायदा घेणारे ब्राम्हण धर्माचा व धार्मिक भावनांचा शुद्ध व्यापार करीत होते. त्यांजवर लोकहितवादींनी निर्भीडपणें टीका केलेली आढळते. (१०७). ब्राम्हणांची धर्माची व्याख्या स्वज्ञातीचा तात्पुरता फायदा साधणें ही असल्याने लोकहितवादी विचारतात, ब्राम्हणभोजनाऐवजी विद्यादान करण्याची मसलत हे ब्राम्हण कधी तरी देतील काय! याचें उत्तरही त्यांनीच दिलें आहे, "दगडास घाम येईल, सूर्य पश्चिमेस उगवेल," (१०७) पण हे ब्राम्हण शाळेसाठी वा ग्रंथासाठी द्रव्य देण्याचा सल्ला कुणाला सांगणार नाहीत.

अशा प्रकारें विचारांना पटेल तेंच करण्याचा कळकळीचा उपदेश या पत्रांत आहे. धार्मिक रूढ भावना अज्ञानजन्य असल्याने त्या समूळ नष्ट करण्याचें धाडस त्यांनी केलें. ब्राम्हणांची धर्मकर्माबाबत मिरासदारी होती, तिचा विध्वंस करण्यास ते प्रवृत्त झाले. " विद्या व ज्ञान संपादन करण्यास सर्व सारखे अशी मोकळीक " ( ६४ ) त्यांनी ठेविली, आणि " वैराग्यास कांही आधार नाही, तेणेकरून ईश्वर-

प्राप्तीही नाही; किंबहुना ईश्वरक्षोभ मात्र होईल," (२६) अशी धमकी देऊन त्यांनी 'कर्मयोगरहस्य' स. १८४८ मध्ये महाराष्ट्रीय जनतेस सांगितलें. त्यांच्या या बाबतींतील उदार मतांचें सार सोळा कलमी नवधर्मांत (६४) आलें आहे. आणि तो धर्म लोकप्रिय करण्याची त्याची प्रचारकी तयारीदेखील त्या पत्रांत व्यक्त झाली आहे. आजमितीसही इतका व्यापक धर्म आचरणारे फार थोडे आढळतील.

---

# ४ पारमार्थिक

२६ वैराग्य
२७ नाना पंथ
२९ बुद्धीनें ईश्वर किती कळतो ...
५३ मन हेंच ईश्वरी शास्त्र
६४ धर्मसुधारणा
८३ भक्ति, कर्म आणि ज्ञान
१०७ खरा धर्म करण्याची आवश्यकता

---

# वैराग्य

मनुष्यमात्राने आपले परलोकाचा विचार करावा, हें सर्व गोष्टींहून उत्तम आहे; असें असतां किती एक सांसारिक जन लौकिक विचार मात्र करितात, एक क्षणभरदेखील ईश्वराचें स्मरण करीत नाहीत. याहून मोठें आश्चर्य काय आहे? मनुष्यास ईश्वराने बुद्धि दिली आहे, तिचा उपयोग इतकाच की, इतर सर्व जनावरांपेक्षा हें जनावर श्रेष्ठत्व पावून आपले कर्त्याचे उपकार जाणून त्याची कीर्ति आणि दया वर्णन करील; परंतु हा सन्मार्ग सोडून किती एक गैर रस्त्याने जात आहेत. आणि क्षणभंगुर देहाचे पोषणाकडे सर्व लक्ष देऊन आपलें जें महत्कल्याण, तें करून घेत नाहीत.

पहा, कित्येक मेहनतीचे कामांत पडले आहेत. किती एक चाबूकस्वार, + किती एक कारकून, कित्येक मजूर, किती एक शास्त्री व कित्येक वैदिक आहेत. कित्येक सूर्योदयादारभ्य नाचतात आणि संत म्हणवितात, परंतु हे सर्व देवास जाणत नाहीत. केवळ पोटाकरिता उद्योग संपादून असतात. याचा दाखला असा आहे की, गोसावीबोवास जर बिदागी कमी पोचली, तर त्यास राग येतो. पुराणिकास तांदूळ मिळाले नाहीत, तर त्यास संताप येतो. भटास दक्षणा मिळाली नाही, तर तो रागावतो. असेच बहुतेक लोक आहेत. तेव्हा कोणी धर्मसंबंधी किंवा प्रपंचासंबंधी द्रव्याचे आशेवाचून काम करीत नाहीत, हें स्पष्ट आहे. यास्तव यांपैकी कोणी साधूचे अभिधान पावण्यास योग्य नाहीत.

मला असें वाटतें की, संसार आणि परमार्थ हीं दोन कामें पृथक् आहेत. त्यांची मिसळ करूं नये. परंतु किती एक लोक फक्त संसाराकरिता कांही कामें करितात आणि तीं देवाकरिता केलीं,

+ चाबुकस्वार – अश्वशिक्षक.

असें म्हणतात. मला एक साधु असा ठाऊक आहे की, त्याची पूजा व भजन किंचित् होतें; तथापि त्याजकडे लोक फार येऊं लागले, तेव्हा त्याची पूजा वाढली. म्हणजे दांभिकपणाने तो चार घटिका अधिक बसूं लागला. व तेच लोक कमी होतांच पुनः मूळचेप्रमाणे झाला. हा केवढा नीचपणा आहे !

देवाने सर्वदा माझें भजन करा, म्हणून मनुष्यांवर ओझें घातलें नाही. तो इतकेंच भजन मागतो की, जें आपलें आणि आपले कुटुंबाचें व इतर जनाचें काम आहे, तें सर्व चांगले रीतीने करून नंतर जी वेळ सापडेल, ती क्षणभर असो अगर घटकाभर असो, स्नानसंध्येंत किंवा प्रार्थनेंत आणि नामस्मरणांत घालवा. म्हणजे त्यांतच अनंत वर्षें तपश्चर्या केल्याचें पुण्य आहे. संपूर्ण जग ईश्वराने निर्माण केलें आहे. व त्याची व्यवस्था होण्याकरिता सूर्य-चंद्र, रात्र-दिवस, प्रत्येक जिवाचा भक्ष, रोगास औषध व मनुष्यास विचार आणि थोरपणा इतकीं दिलीं आहेत. त्याचें कारण असें आहे की, ज्या ज्या ठिकाणीं जें जें व्हावयाचें, तें यथास्थित होऊन मनुष्यांनीं सर्वदा ईश्वराचे उपकार, शहाणपण, नेम व रचना यांची आश्चर्यकारक स्तुति करून रमत असावें. सूर्य उगवला असतां निद्रा करावी, किंवा रोग झाला असतां औषध घेऊं नये, अगर मनुष्य झाला असतां विचार टाकून देऊन जनावरांसारखें फिरावें, असें विचारास योग्य दिसत नाही. यास्तव उत्तम हेंच की, मनुष्याने आपलें कर्म करावें.

श्रीकृष्णाने गीतेचा ठाईं हाच अभिप्राय अर्जुनास सांगितला आहे. अर्जुन विषाद पावून वैराग्य घेत होता. तेव्हा कृष्णाने त्याची समजूत केली की, 'अरे षंढा, तूं भितऱ्यासारखा वैराग्य काय घेतोस? जें आपलें कर्तव्य आहे, तें कधीही टाकूं नको. त्याचें आचरण कर. आणि सुखदुःख मात्र मानूं नको. वैराग्य हें मूर्खपण आहे. आशा व दुःख जें लाभालाभापासून होतें, तें मात्र सोडावें. परंतु संसारीं जें आपलें कर्म लोकांत प्रगट होऊन चालत आलें आहे, तें टाकूं नये.' या उपदेशावरून जन्माचें सार्थक कसें

होईल, याचें उत्तर सहज निघत आहे. आपण काय करितों, वस्त्रप्रावर्णे नेसतों, खातों, पितों व कुटुंबाचें पोषण करतों. हें सर्व व्यर्थ आहे, येणे-करून ईश्वरप्रीति होत नाही, असें जे म्हणतात, त्यांचें मत ईश्वरी वचनास विरुद्ध व विचारासही विपरीत आहे. कारण पृथ्वीवर अनेक मनुष्यें निर्माण झालीं आहेत, अनेक देश आहेत, त्यांत आपण एक मनुष्य आहों. तेव्हा या जगत्समुदायांत आपल्यास अनेक प्रकारचे संबंध प्राप्त झाले आहेत. त्यांचा त्याग करणें ठीक नाही. व हा केवळ भित्रेपणाच होय. जास संसार चाल-वावयास धैर्य नाही, तो पुढे काय करणार ? संसार म्हणजे यत्किंचित् गोष्ट आहे व या आयुष्यांत थोड्याचा विचार जास होत नाही, त्यास अगम्य ईश्वराचा विचार कसा समजेल ? ज्या देशांत ईश्वराने आपणांस घातलें आहे, त्या देशांत आपली योग्यता व बुद्धि येणेंकरून आपण काय करावें, याचा विचार करावा आणि योग्य असेल, तें करावें.

वैराग्यापेक्षा संसार सुयुक्त रीतीने चालविला असतां बरा. कारण जर ईश्वराचे मनांत आपल्यास रानटी व अविचारी करण्याचें असतें, तर त्याने वाघाचा किंवा दुसऱ्या कांही रानवट जनावराच्या जन्मास घालून डोंगरांत रहाणारें केलें असतें.

परंतु आपेक्षा मनुष्याचे जन्मास घातलें आहे, त्यापेक्षा असें दिसतें की, आपण विवाह करावा, स्त्री करावी, व स्त्री असली, तर तिने भ्रतार करावा. प्रजा होईल, तिचें संरक्षण करावें. अतिगरीब यांचें पोषण करावें. मनुष्यासारखें वागावें. विचाराने चालावें. जें उत्तम आहे, तें करावें. इतर लोकांस उपकारांनी मैत्र करावें. जें आपले हातून यथाशक्ति होईल, तें कल्याण करावें. लोकांचें व आपलें कुटुंबाचें हित करावें. सदाचरणाने वागावें. अनीतीने वागूं नये. नम्रता धरावी. राग, लोभ, मूर्खपणा करूं नये. विना-कारण कोणाला उपद्रव करूं नये. प्रपंचसंबंधी नाना प्रकारचीं दुःखें व सुखें आलीं, तर तेणेंकरून प्रमाद किंवा ग्लानि होऊं देऊं नये. अशा रीतीने वागून यथासाध्य सुख अनुभवावें. अशा मनुष्यास आम्हांस

वाटतें की, वैराग्यापेक्षा अधिक श्रेय आहे.

वैराग्य हें मूर्खपण आणि ईश्वराने जें दिलें व जाकरिता मनुष्य-देह केला, त्यास टाकून जनावराप्रमाणे रानांत फिरणें आहे; कारण जें कर्म आपणांस सांगितलें आहे, तें न केलें तर आपले जन्माचें सार्थक होत नाही. जन्माचें सार्थक म्हणजे जाकरिता जन्म घेतला, त्याचे सर्व अर्थ म्हणजे हेतु परिपूर्ण करणें. आता प्रथम हेतु हाच की, ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें या सर्वांचें यथास्थित व्यापार करणें व शास्त्रयुक्त चालणें व आश्रमाप्रमाणे व वर्णाप्रमाणे वागणूक करणें. थंडी लागूं नये, म्हणून ईश्वराने कापूस निर्माण केला आहे. आणि आम्ही जर कापूस आपले शेतांत पिकवून, त्याचें वस्त्र करून, त्यास अनुभविलें, तर आम्ही कांही पातक केलें, असें होईल काय? इतकें खरें आहे की, चोरी करून दुसऱ्याचा कापूस आणूं नये व लोभाने कोणाचें वस्त्र हरण करूं नये; कारण जसा आपला जीव तसा दुसऱ्याचा आहे. जशी तुम्हास तुमचे मालाची चोरी आवडत नाही, तशी दुसऱ्यास आवडत नाही. दुसऱ्यास काय आवडत नाही. हें आपल्या-वरून ओळखावें आणि त्याचा त्याग करावा. जें कांही दुःखकारक असेल, तें करूं नये. जमिनीची चाकरी करून जें मिळेल, तें खाण्यास आपल्यास सर्वोपरी अधिकार आहे, आणि त्यांत दोषही नाही. यांत जे दोष मानतात, ते आपल्या विचाराचा उपयोग करीत नाहीत; म्हणून त्यांस मूर्खपणाने 'जर तुम्हांस मी पाहिजे असेन, तर तुम्ही सर्व सोडा' अशी ईश्वराची आज्ञा आहे, असें वाटतें.

जा नवऱ्याने आपले स्त्रीस दागिने दिले आहेत, तो नवरा तिला असें म्हणणार की नाही, 'जर तुला माझी आवड असेल, तर आपले हातांतील बांगड्यादेखील फोडून टाक.' शहाणा नवरा असें म्हणेल काय? नाही. तिला जे दागिने आपण दिले, ते घालतांना पाहून तो फार सन्तोष पावेल. कारण दागिने देण्याचें कारण तेंच होतें. तद्वत् मनुष्यास आपले कर्माचे व नीतीचे ठाईं निष्ठा पाहून ईश्वर आनंद पावेल, यांत संशय नाही. त्याने जी

पदवी आपल्यास दिली आहे, तिचा त्याग करण्याचा हेतु काय ? ईश्वर असा कृपणा आपण निर्माण केलेल्या प्राण्याजवळ करणार नाही, कारण असें जर असतें, तर मनुष्यास इतकी जास्ती अक्कल त्याने कशास दिली असती ? सर्व सारखेंच केलें असतें. परंतु त्याचा हेतु हाच की, त्या अकलेचा उपयोग कसा करतो, आणि जीं जीं कर्मे मीं त्याचा वृत्तीवरून व बुद्धी-वरून त्यास सुचविलीं आहेत, तीं तीं तो यथास्थित करतो कीं नाही ? हेंच ईश्वर पहात असेल, असें अनुमान सिद्ध आहे.

वैराग्यास कांहीं आधार नाही. आणि तेणेंकरून ईश्वरप्राप्ति-ही नाही, किंबहुना ईश्वरक्षोभ मात्र होईल, असें दिसतें. याप्रमाणे बुद्धीकरून परलोकसंबंधी जो विचार झाला आहे, तो लिहिला आहे.

---

पत्र नं० २७ २७ आगस्ट १८४८

## ना ना पं थ

सांप्रत हिंदुस्थानांत अनेक मतांचे व जातींचे लोक आहेत. त्यांतील कांहींचा इतिहास लिहितों.

हिंदु लोकांस तर आपले देशांतील वर्तमानाची खबर नाही, परंतु बाहे-रील पुष्कळ लोक येथे येऊन राहिले आहेत. प्राचीन काळीं हिंदु लोक आता आहेत, तसे नव्हते. ते परदेशांत जात-येत होते. अलीकडे मात्र त्यांचें असें झालें की, असा एकादा घाव घेतां घेतां थकून पुराणप्रसिद्ध मुचकुंदा+प्रमाणे

+ मुचकुंद– मांधाता–बिंदुमती यांचा कनिष्ठ पुत्र. कार्तिकस्वामींच्या पूर्वी देवांचा सेनानी. 'झोप मोडणाराकडे पाहतांच तो जळून खाक व्हावा' असा वर त्याने देवाकडून मिळविला. शेकडो वर्षांनी कालयवनाने त्याची झोप मोडली, तेव्हा तो जळाला. कलियुग सुरू होईपर्यंत मुचकुंद गाढ निजला होता.

निद्रा करितो, तसें या लोकाचें झालें आहे. बहुत काळपर्यंत सर्व देशाहून हिंदुस्थान प्रमुख आणि पराक्रमी, असा मान पावून हल्ली निद्रिस्त झालें. आता या दीर्घ निद्रेंतून तें दुसरे कोणतेही उपायेंकरून जागृत झालें नाही, तरी दरिद्रांजने करून तरी जागृत होतील, यांत संशय नाही.

(१) एक हजार वर्षांचा पूर्वी क्रिस्तियन धर्म युरोपखंडांत वृद्धिंगत झाला. व बहुत लोक तो धर्म अंगिकारून देशोदेशीं गेले. तेव्हा किती एक किरिस्ताव हिंदुस्थानांतही मलबारदेशीं आले व त्यांनी आपले धर्मांत किती एक लोक आणले. ते अद्यापि मलबारांत आहेत. त्यांचें नांव सेंट थॉमी किरिस्ताव. त्यांची चाल व वर्तणूक बहुतकरून हिंदूप्रमाणेच आहे. म्हणजे त्यांमध्ये ब्राम्हण, शूद्र अशा जाती आहेत व परस्पर लग्नें होत नाहीत. धर्म मात्र हिंदूंचा नाही. पुढे पोर्तुगीस लोक इकडे येऊन त्यांनी गोव्यांत ठाणें बसविलें. त्यानंतर त्यांनी गरीबगुरीब लोकांस जबरीने व द्रव्याने आपले धर्मांत आणिलें. व ते बहुतकरून युरोपियन लोकांप्रमाणे वागतात. असे किरिस्तावाचे दोन इतिहास आहेत.

(२) आर्बस्तानांत महमदी धर्म चालू होऊन मुसलमान झाले, तेव्हा किती एक बादशहाही मुसलमान झाले, आणि आपले रयतेस मुसलमान होण्याकरिता इजा देऊं लागले. त्या काळीं इराण देशांत जरदुस्ताचा अग्नि-पूजेचा धर्म चालत होता. येथील बादशहा मुसलमान होऊन रयतेस उपद्रव करूं लागला, तेव्हा तेथील जे धर्मतत्पर लोक होते, ते जहाजांत बसून हिंदुस्थानांत सुरतेस आले. तेथील राजा हा समुदाय पाहून भयभीत झाला व पुढे त्याने त्याजपासून तरवार धरणार नाही, म्हणून करार लिहून घेऊन आपले प्रांतांत राहूं दिलें. त्यास सरासरी आठनउशे वर्षें झालीं. ते पारशी लोक हल्ली आपली पहिली भाषा सोडून गुजराथी भाषा बोलून इकडील लोकांप्रमाणे रहातात. व त्यांनी किती एक इकडील चालीही धरल्या आहेत. त्यांचें धर्मपुस्तक जेंद अवस्था हें मात्र मूळचे भाषेंत आहे.

(३) जेव्हा मुसलमानी धर्म चालू झाला, तेव्हा त्या धर्मांतील

पुष्कळ लोक इकडे येऊन धर्म शिकवूं लागले. त्यांत एक मौलवी आर्बस्ता-नांतून गुजरार्थेत आला, व आपली जाति व धर्म छपावून एका स्वामीजवळ शिष्यांत राहिला. व तेथें त्याने हिंदु धर्माचा अभ्यास केला. आणि मग त्या स्वामीस बोध करण्यास आरंभ केला. व आपला धर्म प्रतिपादन केला. तेव्हा स्वामीने तो धर्म खरा समजून आपले शिष्यासहित स्वीकारला. ते लोक बोहारी झाले. या गोष्टीस पांचशे वर्षे झालीं. गुजराथी भाषेंत बोहारी या शब्दाचा अर्थ व्यापारी असा आहे. हे मूळचे गुजराथेंतील हिंदूच होते. पुढे बाटून मुसलमान झाले.

( ४ ) हिंदुस्थानात पूर्वी एकही मुसलमान नव्हता, परंतु मुसलमानानी स्वारी करून हा मुलूख काबीज केल्यावर ते लोक हा देश चांगला पाहून इकडून गेले नाहीत. येथेच आपल्या सैन्यासहित राहिले. ते लोक हल्ली सर्व हिंदुस्थानांत इकडील लोकांत मिसळले आहेत. रोहिले व पठाण हैद्राबादेस राहिले, व लखनौ आणि दिल्ली या ठिकाणीं मोगल राहिले.

( ५ ) कोळी, गोंडवनांतील गोंड व भिल्ल हे लोक बाहेरील देशांतून इकडे आले नाहीत. हे या देशाचे मूळचे मिराशी आहेत, असें दिसतें, कारण संस्कृत भाषेचा यांचे भाषेंत लेशही नाही. व हिंदु धर्मांची गोष्ट त्यांस कांहीच मान्य नाही. त्या लोकांस सांप्रत जे आपणांस हिंदु लोक म्हणवितात त्यांनी जिंकलें आहे. पूर्वी हिंदु लोक हे पंजाबाकडून आले व त्यांनी उत्तरेस अंमल बसविला, आणि देशाचें नांव पुण्यभूमि असें ठेविलें. महाराष्ट्र व कर्नाटक हे देश हिंदुस्थानचे राजाकडे बहुत काळ नवते. तेथील लोकांस ते मडसी, राक्षस व रावणाचे सेवक असें म्हणत होते. पुढे हिंदु लोकांनी जिंकीत जिंकीत सर्व देश जिंकिला. तेव्हा हे मूळचे लोक डोंगरांत व रानांत जाऊन राहिले. ते अद्यापि तेथेच राहतात. असें या लोकांचें मूळ आहे.

आता किती एक स्वदेशीय लोक असून, ते नाना प्रकारचे पंथांस लागले आहेत. त्याविषयी थोडासा इतिहास लिहितों. तेणेंकरून हिंदु धर्म प्रमुख

असतां, त्यापासून दुसरे पंथ कसकसे निघाले आहेत, त्यांची गोष्ट समजेल.

(१) हिंदु लोकांचे येण्यापूर्वी हिंदुस्थानांत कोणता धर्म असेल तो असो. हल्ली जे या देशांत रहाणारे लोक, यांचा मुख्य धर्म वेदशास्त्राचे आधारें करून आहे व त्यांशीं विपरीत एक बुद्ध धर्म म्हणून आहे. गयेस एक पंडित झाला. त्याने हा धर्म स्थापिला आहे. तो पंडितच बौद्ध अवतार. त्याचें ठिकाण अद्यापि गयेस आहे. त्याचा धर्म वेदांशीं विरुद्ध आहे, यास्तव ब्राम्हणांनी महाप्रयत्न करून तो बुडविला. तत्रापि बंगाल्याचे पलीकडे व ब्रम्हदेशांत तो अद्यापि चालत आहे. लंकेंतही तोच धर्म चालतो, पण त्यांत कांही कांही फरक आहेत. तथापि मूळ एकच.

(२) त्यानंतर दुसरा जैन पंथ. हा सर्व देशांत आहे, व याचे धर्माधिकारी स्वामी जागोजाग आहेत. हें मत कांही वर्षांपूर्वी फार चाललें होतें; परंतु कुमारिल भटाने बहुतकरून तें मोडिलें व त्या मताचे लोकांनी ग्रंथ केले होते, तेही बुडविले. एक अमरकोश मात्र ठेविला आहे. जैनांचें मत असें आहे की, ही सृष्टि अविनाश आहे. यज्ञ व श्राद्धादि करणें जरूर नाही. अद्यापि त्यांचें मत जागोजाग चालत आहे.

(३) नानक व गुरुगोविंद हे पंजाबचे मुलुखांत झाले. त्यांनी आपण स्वतः ग्रंथ लिहून एक नवीन धर्म चालू केला. त्यांत जैनमताचे लोक, मुसलमान व हिंदु या जातीचे लोक आहेत. त्यांचें नांव शीख म्हणजे शिष्यार्थी शब्द आहे. नानक याचे जन्मास दोनशेपन्नास वर्षें झालीं. तो पहिल्याने हिंदु होता. नंतर मुसलमान होऊन मक्केस गेला. व संन्याशी बहिरागी यांचे मेळ्यांत फिरला. नंतर त्याने आपणांस ईश्वराची अशी आज्ञा झाल्याचें प्रगट केलें की, यवन व हिंदु हे मूर्खपणाने उगीच भांडतात. ईश्वर एकच आहे. त्यास सर्वांनी भजावें व परस्परकलह मोडून उत्तम धर्म लोकांस शिकवावा. याप्रमाणे त्याने ग्रंथ लिहून लोकांस आपले धर्मांत आणलें. या धर्माचे दोहोंही धर्मांशीं विरुद्ध नाही. पुढे दिल्लीचे बादशहा औरंगजेब वगैरे झाले. त्यांनी त्या लोकांस उपद्रव दिला, याजमुळे त्या

लोकांनी जमून आपले संरक्षणाकरिता मुलूख बळकाविला, व अलीकडे रणजितसिंग वगैरे यांनी पुष्कळ मुलुख मिळविला आहे आणि स्वतंत्र राज्य केलें आहे. असें शीख लोकांचें मूळ आहे. आता त्या धर्मांत कोणीही जातो. त्यास निषेध नाही.

( ४ ) हिंदुस्थानांत कबीर म्हणून एक कवि व साधु झाला होता. त्याचे पंथांत वागणारे लोकही पुष्कळ आहेत. त्यास कबीरपंथी म्हणतात कबीराचें मतही असेंच होतें की, मुसलमान व हिंदु हे आपसांत धर्माचे विरुद्ध भावाने व्यर्थ भांडतात. मुख्य धर्म हाच की, कोणाचें वाईट करूं नये व परमेश्वराची भक्ति करावी. लोकांस उपद्रव करितात ते धर्म बुडवितात.

( ५ ) शंकराचार्य स्वामीपासून संन्याशी व गोसावी मत झालें. शंकराचार्य हे मुख्यत्वेंकरून वेदान्तशास्त्राचे प्रतिपादक होते. वास्तव त्यांनी कलियुगांत शास्त्राप्रमाणे संन्यास निषिद्ध असतांही चालू केला. व त्यांचे फार शिष्य होते, त्यांनी शूद्रासदेखील संन्यास देऊन गोसावी केलें. संसार सोडला पाहिजे, हा त्यांचा मुख्य अभिप्राय आहे; परंतु हल्लीचे गोसावी वेदान्ताप्रमाणे किती चालतात, हें लोकांस ठाऊकच आहे.

( ६ ) मध्व स्वामींनी कर्नाटकांत वैष्णव मत स्थापिलें. तसेंच वल्लभाचार्य म्हणून एक गुजराथेंत होता, त्याने वैष्णवमतच परंतु एक वेगळ्या तऱ्हेचें काढिलें. सांप्रत वैष्णवांचा व शैवांचा बहुत विपर्यास आहे. कर्नाटक-प्रांतीं असे वैष्णव आहेत की, ते शैवाचे पंक्तीसदेखील जेवीत नाहीत. परंतु शैव आपल्यास स्मार्त म्हणवितात आणि वैष्णवास पाखांडी म्हणतात. वैष्णव अद्वैत-वेदांतास मानीत नाहीत.

( ७ ) महाराष्ट्र देशांत एक रामदासस्वामींचा पंथ आहे. परंतु त्याचें कोणाशीं विरुद्ध नाही. तसेंच तुकाराम, ज्ञानेश्वर हे साधु झाले. त्यांचें मत बहुतकरून शूद्र लोकांत चालू आहे. व किती एक ब्राम्हणही त्यांत आहेत; परंतु विद्वान् ब्राम्हण बहुधा त्यांत नसतात. यांचेंही मत साधूपणाचें आहे. यांचें शत्रुत्व कोणाशीं नाही. हें मत हल्ली दोनशे वर्षांपासून चालू आहे.

यांचें मुख्य मत असें आहे की, नीतीचें आचरण, सारासार विचार आणि कीर्तन करावें.

(८) बंगालांत एक चैतन्य म्हणून मनुष्य होता. त्याचें मत बहिरागी लोक धरितात. व चैतन्याचे मताचे लोक सांप्रत पुष्कळ आहेत, ते गोसावी यांसारखेच आहेत.

(९) तंत्र-शास्त्राचे आधाराने चालणारें एक शाक्त मत आहे. यांतील लोक फार दुष्ट आहेत. हे बंगाल्यांत पुष्कळ आहेत. व हल्ली महाराष्ट्र देशांत यांचा पर्यकाळ पुष्कळ झाला आहे. यामल इत्यादि ग्रंथ आहेत. त्यांत रुधिराध्याय म्हणून आहे. त्यांत सत्तीस भक्ष कसकशाचा घ्यावा, हें लिहिलें आहे. तें जर कोणी वाचून पाहिलें, तर तो आश्चर्य करील व त्याचा लिहिणारा खाटिकाहूनही निर्दय आणि लोकांस मूर्ख करणारा होता, असें म्हणेल. वारुणीप्राशनाचा त्यास किमपि निषेध नाही, व 'अंगपूजा' म्हणजे स्त्रीचें आराधन त्यांत श्रेष्ठ धरिलें आहे. याहून ईश्वरास क्रोधकारक दुसरें काय असावें ? हें मत कोणी खरें मानणार नाही. मनुष्याचे बुद्धीस इतकी कालिमा येऊन ते ईश्वरास सोडून तंत्रांत लिहिलेल्या मार्गास लागले. आणि इतक्या निर्लज्जपणास व ईश्वरास क्षोभकारक अशा वर्तणुकीस लागले, हें पाहून दुःख वाटतें. अस्तु.

असें हे पृथक् पृथक् धर्म आहेत, व याशिवाय आणखीही किती एक आहेत, परंतु हिंदुस्थानांत जगन्नाथास व गिरीस सर्व जातीचे लोक सर्व धर्मविचार सोडून खातात व पितात. गिरीस देवळांत मात्र असें चालतें, आणि जगन्नाथांत सर्व गावांत याप्रमाणे वर्णसंकर करितात. जगन्नाथाचें मूळ असें आहे की, श्रीकृष्णांनी देह ठेविल्यानंतर तो देह जगन्नाथास आणिला. व मूर्ति करून त्यांत त्या देहांतील अस्थी भरल्या आणि त्या मूर्तीस देवळांत ठेविलें. कोणी म्हणतात की, प्राचीन हिंदु राजे यांनी ही मूर्ति बसविली आहे. असो. याचें मूळ काय असेल तें असो, परंतु जातीचा विचार त्या ठिकाणीं नाही, हें जगप्रसिद्ध आहे.

---

पत्र नं० २९ १० सप्टेंबर १८४८

## बुद्धीने ईश्वर किती कळतो त्याविषयी

ईश्वराने मनुष्यास ज्ञान दिलें आहे. तेणें करून मनुष्याची व जनावराची स्थिति वेगळी दिसते. कारण जनावरें व मनुष्यें एकदम उत्पन्न झालीं असतां जनावरें आहेत तशीं आहेत. कोणी जनावर असें नाही की, तें पहिल्याने रानांत रहात होतें व आता त्याने गाव वसविला आहे किंवा कापड विकूं लागलें आहे. परंतु मनुष्य मात्र दर रोज अधिक शहाणें होत आहे. आणि मनुष्याचा मोठेपणा सर्व अकलेवर आहे. जर विचार नसता तर पहिल्याने जो मनुष्य झाला, त्याचप्रमाणे अजूनपर्यंत लोक असते. परंतु तसें नाही.

पूर्वी पाण्याने काळ मोजीत होते. आता घड्याळें झालीं. प्राचीन काळीं निरोप पाठवित होते, आता लिहूं लागले. नाना प्रकारची शास्त्रें लिहिलीं, पत्रें पाठविण्यास पहिलीं मुजरद माणसें पाठवीत होते. आता डाक बसली. आणि डाकेचाही उशीर समजून वाफेची गाडी ही सुलभ रीति काढली. अशीं मनुष्यें दिवसें दिवस आपले सुखाची वृद्धि करीत आहेत. हा स्वभाव मनुष्याचा आहे, इतर जनावराचा नाही. याचें कारण त्यांस वाचा नाही, हेंच बहुतकरून असावें. किंवा त्यांचें मन मनुष्याहून वेगळे रीतीचें असेल. मनुष्य बरेंवाईट याचा विचार करणारें जनावर आहे, इतकेंच या जनावराचें लक्षण अधिक आहे. बाकी धर्म इतर जनावरांहून यामध्ये अधिक नाहीत. मरण, जन्म, भक्षण सर्व इतर जीव जंतुप्रमाणे आहे; तेव्हा मनुष्याचे ठाईं अक्कल एवढीमात्र अधिक दिसते. हें देणें ईश्वराचें आहे. येणेकरूनच हें जनावर आपल्या उत्पन्नकर्त्यास जाणतें आणि सृष्टीकडेस पाहून विचार केला तर ईश्वर आहे, हे जाणण्यास अवघड नाही.

कारण मनुष्याचे ज्ञानास साधनें दोन आहेत. एक इंद्रिय आणि दुसरें मन. इंद्रियाचे धर्म शब्द, रूप, रस, गंध, स्पर्श यांही करून जड किंवा

अजड याचें ज्ञान होतें. जड म्हणजे पृथ्वी इत्यादिक. यांचें ज्ञान नेत्रांनी होतें; परंतु वायु हा दृष्टीस पडत नाही. कारण तो फार पातळ आहे. यास्तव त्याचें ज्ञान स्पर्शेकरून समजतें. तसेंच उजेडाचें ज्ञान पाहून होतें. कारण त्यास धरावयास शरीर नाही; परंतु रूप आहे. तसेंच एक विण्याची तार वाजविली, तिचा जोराने वायूचा भंग होतो आणि नाद उत्पन्न होतो. तो नेत्रास व शरिरास समजत नाही. कारण त्यास रूप नाही व जडत्व नाही. तेव्हा त्याचें ज्ञान कर्णेकरून होतें. अशीं पांच ज्ञानेंद्रियें आहेत. मला वाटतें की, हीं पांच इंद्रियें आपल्यास आहेत, म्हणून पांच विषयांचें ज्ञान होतें; परंतु आणखी कित्येक इंद्रियें जर असतीं तर दुसरे कित्येक विषयांचें ज्ञान झालें असतें; कारण जितकीं इंद्रियें तितकेंच ज्ञान.

जो बहिरा किंवा अंधळा आहे, त्याला चार विषयांचें ज्ञान मात्र होतें. रूपाचें किंवा नादाचें ज्ञान होत नाही. कदाचित् एक सहावें इंद्रिय मस्तकास किंवा आणखी कोठे असतें तर कोणत्या पदार्थाचें किती वजन आहे, हें किंवा दुसरें कांही पाहिल्याने व त्याचे चलनाने कळलें असतें. असे कित्येक चमत्कार या सृष्टींत आच्छादित असतील; परंतु पंचेंद्रिय मनुष्यास ते ठाऊक नाहीत. असो, तेव्हा हे पांच विषय पांच इंद्रियेंकरून कळतात, हें उघड दिसतें.

या पांच इंद्रियांचा राजा मन आहे. त्याचा विषय काय, याचा विचार केला असतां असें दिसतें की, अनुमान करणें हें त्याचा विषय आहे. जसें, आपण व्याघ्राची वाणी ऐकिली म्हणजे कानांनी शब्दांचा मात्र ग्रह झाला. परंतु हा शब्द कोणाचा याची कल्पना मन करते. आणि मागील गोष्टी जा पाहिलेल्या आहेत, त्या एकत्र करून तर्क करते की, हा व्याघ्राचा शब्द आहे. हा तर्क चालविणें, मनाचा व्यापार आहे. परंतु हा मनाचा तर्क चालण्यास कांहीतरी दरम्यान पदार्थ पाहिजे, तेणेंकरून तर्क चालतो. जर मध्ये कांही पदार्थ नसेल तर मनाचा व्यापार बंद होतो. कारण मन जरी विशाल व अति शीघ्रगति आहे, तथापि तें देहामध्ये कैदेंत आहे. मनुष्याने देह टाकल्यावर त्याचे मनास जसा व्यासंग असेल आणि कर्मांचा

अभ्यास असेल तशी गति होईल. पिशाच्य इत्यादिक होतात, हे तरी पाप कर्में करून आपलें मनास दूषित करितात.

देह हा मनास आणि जिवास तुरुंग आहे. स्थूलाचे कारणाने त्याचा शक्ति आसडल्या आहेत. मनावाचून इंद्रियांचे विषय ग्रहण होत नाहीत. व इंद्रियावाचून मनाचे विषय ग्रहण होत नाहीत. जेव्हा इंद्रियें पदार्थ पहातात तेव्हा पुढे मनाचा तर्क चालतो. ईश्वर आहे किंवा नाही, याचा सिद्धांत करण्यास मन उपयोगी पडते. या अद्भुत जगताकडे पाहिलें म्हणजे तर्क चालू लागतो. परंतु तर्केंद्रियांचे पाठीमागून चालतो. इंद्रियें जेथपर्यंत जातात त्याचे पलिकडे मनाची उडी पडते. जेव्हा मनुष्य सृष्टि पहातो तेव्हा त्याचे दृष्टीस एक शेत पडलें, अशी कल्पना केली, तर रंग-रूप इंद्रियांनी व्यक्त झाली. आणि मनाने इतकें सुचविलें की, इतका क्रम कर्त्यांविना झाला नाही. तेव्हा शोध केला तों एक मनुष्य सापडला. त्यास पुसलें की, हें शेत कसें झालें? त्याने सांगितलें, बी पेरलें होतें; त्याजमुळे झालें. तेव्हा आम्हीं बीं पेरून पाहिलें, तों बीं पेरलें असतां उगवतें, हा नेम सृष्टीचा आहे, हें संयोगाचें फळ आहे, असें कळलें.

पण एक कल्पना राहिली की, मृत्तिका आणि बीज या जड पदार्थांचा योग झाला असतां उगवण्याचें कारण काय? यांस उगवितो कोण? जर त्यास कर्ता नाही, तर बीं, पाणी आणि मृत्तिका एकत्र रहावीं, त्यास अंकुर फुटूं नये, असें आहे. हे तिन्ही पदार्थ स्वस्थ का राहूं नयेत? जर त्यास काही चौथें कारण नाही, तर त्यांनी स्वस्थ असावें. जर सृष्टीस कर्ता कोणी नसता, तर हे पदार्थ न उगवते. असें एक घड्याळ आहे; त्याचे आंतील सर्व भाग वेगळाले काढून एका भांड्यात ठेविले, तर त्यांचा संयोग करणारा असल्यासेरीज त्याचें घड्याळ व्हावयाचें नाही. असें हें जगाचें महान् घड्याळ कर्त्यांवाचून शून्य शरिरासारखें नासलेंकुजलें असतें. परंतु तसें नाही. त्याचा क्रम आणि जीवजंतूंच्या आयुष्याच्या मर्यादा इत्यादि कर्त्यास सुचवितात आणि प्रत्येक पदार्थ पाहिला म्हणजे ईश्वराची मूर्ति

दिसते, आणि त्याची युक्ती आणि पराक्रम विदित होतात. आणि हे व्यक्त पदार्थ पाहून त्याचें कारण तोच ईश्वर आहे, असें दिसतें.

परन्तु ईश्वर हा निष्कारण आहे; कारण तो अव्यक्त आहे. जर व्यक्त होऊन त्याचें स्वरूप कळलें, तर त्याजविषयी आम्ही कल्पना करूं; परंतु ईश्वर प्रत्यक्ष दिसत नाही. ज्ञानेंकरून मात्र गम्य आहे. तेव्हा त्याचे कारणाचा तर्क होत नाही. कारण पदार्थ व्यक्त असल्यावाचून तर्क व बुद्धि चालत नाही. जसा एक चितारी आहे, त्याने कलम हातांत घेतलें आणि तो चित्र काढूं लागणार; तेव्हा त्याचे मनांत आलें की, मी आता चित्र काढीन; परंतु तें कसें येईल आणि त्यानंतर त्याजहून आणखी चांगलें येईल कीं नाही ? ही जर कोणी कल्पना करूं लागला तर चालणार नाही. कारण एक चित्रापर्यंत तर्क त्या कलमावरून आणि चितारी याजवरून चालेल की, हा संयोग झाला आहे, म्हणजे येथे रंग आहे, शाई आहे. त्यापेक्षा चित्र काढणार, हें तर्कास आलें व रंग चांगले व कलमें चांगलीं, याजवरून उत्तम चित्र काढायाचा हेतु आहे असें समजलों; परंतु जर कोणी म्हणेल की, पहिल्याने चित्र काढील त्याच्याहून दुसरें चांगलें येईल कीं नाही. ? तर कोणाचा तर्क चालेल काय ? जेव्हा पहिलें चित्र पाहिलें, तेव्हा त्या व्यक्त पदार्थावरून दुसऱ्याचा तर्क होईल. परंतु अव्यक्त पदार्थाविषयी तर्क करण्यास मनास शक्ति नाही. यास्तव ईश्वराचें कारण नाही, असें झालें.

मनुष्यास तो अनादि आहे. आता त्याची शक्ती पाहिली, तर हा सर्व जगाचा कारखाना त्याचा आहे. तेव्हा सूर्य, चंद्र, पृथ्वी, पाणी, विस्तव इतक्यांचा कर्ता तो आणि जागोजाग त्याची युक्ति पहाता मनुष्याच्या मनास शक्ति आहे का त्याबाहेर ईश्वराची शक्ति आहे ? कारण मनुष्याच्याने मोजवणावर नाही.

जेव्हा ईश्वर आहे, हें कळलें व तो पराक्रमी आहे इतकें ज्ञान अल्पमती मनुष्यास झालें, त्याजवरून त्याचें पूजन आणि भजन इत्यादि निघालें.

धर्ममार्ग निघाला. त्याचें भय उत्पन्न झालें. परंतु ईश्वर आहे, आणि तो महान् पराक्रमी आहे. त्याचे शक्तीस दुसरें कांही तुल्य नाही, असें मात्र कळतें; या पलिकडे कांही कळत नाही. जे कोणी भयाकरिता व लोकांस नीतीनें वागण्याकरिता सांगतात की एकवीस नरक आहेत. ते सर्व भयाकरिता आहेत. तथापि खोटें म्हणवत नाही. जें जें ईश्वरास म्हणावें तें त्यास योग्य दिसतें. कोणी म्हणेल की, ईश्वर असें करितो, तर तें खरें म्हटलें पाहिजे. कारण की, तो अत्यंत पराक्रमी व अनादि आहे. तेव्हा त्याचं महात्म्य तसेंच आहे. परंतु जें विचारास येत नाही, तें मात्र मत मान्य करूं नये. नाही तर ईश्वरास सर्व शोभतें. मग कोणाची जिव्हा व कोणाची बुद्धी ही कशीही वदो, परंतु चांगलें मात्र असावें.

आणि ईश्वराचे अगम्य बुद्धीपासून सर्व धर्म उत्पन्न झाले; याहून जाजती ईश्वराचें कांही एक कळत नाही. वेदांत व शास्त्रांत दोन शब्दांनी ईश्वराचें वर्णन केलें आहे. 'तत् सत्' या शब्देंकरून सृष्टीहून वेगळा असें दर्शविलें. म्हणून दूरदर्शित सर्वनाम घातलें आणि दुसरा शब्द "सत्" आहे. म्हणजे अस्तित्व वाच्यभाव. हें वर्णन बरोबर, खरें आणि विचारयुक्त आहे. याजवरून हजारो पुराणिक, कोणी म्हणतो नारायण क्षीरसागरांत होता, कोणी म्हणतो वैकुंठांत होता, अशीं नाना प्रकारचीं वर्णनें आहेत. तीं खरीं आहेत आणि खोटीं आहेत. कारण ईश्वर सर्वत्रच आहे. परंतु या सर्वांहून त्या दोन शब्दांनी जसें ईश्वराचें सत्यस्वरूप वर्णन झालें, तसें कोठे ही नाही. बाकींचीं वर्णनें ओवीं सनें भडाणी आहेत त्यांस उपयोगी. परंतु वास्तविक तें आहे, म्हणजे सृष्टीहून महत्कारण वेगळें आहे, इतकें जाणतो. कसें आहे ? काय आहे ? याचें वर्णन पुराणांत सांगितलें आहे की, ब्रम्हदेव प्रथम पुरुष निर्माण झाला आणि विचार करूं लागला तों गडप झालें. तेव्हा तें आहे. ही श्रुति म्हटली. येणेंकरून तात्पर्यार्थ सांगितला.

मला वाटतें की, ब्रम्हदेव म्हणजे विचार, हा ईश्वराचा शोध करतां करतां घोटाळ्यांत पडला आणि ईश्वर तर सर्वत्र आहे. एक गोष्ट आहे की, नानक

शीख लोकांचा गुरु, हा एके दिवशीं पश्चिमेस पाय करून निजला होता, तों फकीर लोक तेथे आले. त्यांनी पुसलें की "अरे, पश्चिमेस ईश्वराचें स्थान मक्का आहे. तिकडे तूं पाय कां ठेवितोस?" त्यानें उत्तर दिलें की, "मी हिंदू नाही व मुसलमानही नाही. मी विचाराचे धर्मानें चालतो. तुम्हांस जिकडे देव नाही असें दिसत असेल तिकडे माझे पाय उचलून ठेवा. तुमचा शास्त्रार्थ मला समजत नाही." असें बोलतांच ते फकीर विरस झाले आणि नानकाचा धर्म कबूल करते झाले.

---

पत्र नं० ५३ २५ मार्च १८४९

## मन हेंच ईश्वरी शास्त्र

ईश्वरानें जे प्राणी निर्माण केले, त्यामध्ये उत्तम प्राणी मनुष्यें आहेत कारण की, त्यांस ज्ञान बुद्धि दिली आहे. तेव्हा मनुष्यानें या जन्मामध्ये वर्तणूक कशी करावी, याचा नेम कांही ईश्वरानें त्यांचे स्वभावांतच दिला आहे, किंवा नाही, याचा विचार करतां असें दिसतें की, मनुष्याचें मन हेंच त्यांचा नियम आहे. यास प्रमाण भागवतांतही असें आहे की "मनः-पूतं समाचरेत्" जें मनास पवित्र वाटेल, त्याप्रमाणे आचरण करावें हेंच ठीक.

मला वाटतें की, जसें सरकारांतून एखादे कामगारास नेमतात आणि सरकारचे हुकूम कसे चालावे याविषयीं लेख पाठवितात, त्याप्रमाणे तो ताकीद देतो, तद्वत् मनुष्यास मन हें ईश्वरानें दिलें आहे. हा सर्वांचे चित्तास अनुभव आहे. आणि जी वाईट गोष्ट ती मनास वाईट वाटते, व चांगली ती मनास चांगली वाटते. गैर माहितही असला तरी चांगल्यास चांगला म्हणतो, व वाईटास वाईट म्हणतो. याचा अनुभव मूर्ख मनुष्या-

सही आहे. तेव्हा मन हाच मनुष्याचे वर्तणुकीचा ईश्वरी नेम आहे. अशीं भारती गदापर्वांत कथा आहे की, दुर्योधनाने पांडवांचीं बाळकें मारिलीं, परंतु हें ऐकून ऐकणारे म्हणतात की, 'अरेरे! तो काय दुष्ट होता! चांडाळ होता.' याप्रमाणे मनाची ध्वनि निघते. वास्तविक पाहिलें तर त्या गोष्टीस व ऐकणारास कांही संबंध नसतो. परंतु वाईटाचा निषेध व चांगल्याचा अंगीकार, हे मनाचे धर्म आहेत. व ही ईश्वराचीच प्रेरणा आहे.

बरें, असें आहे तर मग मनुष्य याविरुद्ध कां चालतात ? कोणी म्हणतो की, आमचे बापांनी व वडिलांनी केलें आहे, तसेंच आम्ही करूं. कोणी म्हणतो की, आमचे देशाची चाल आहे. कोणी म्हणतात की, आमचे गावांतील चाल अशीच आहे. याप्रमाणे मनुष्यें मूर्ख होऊन, वास्तविक मार्ग सोडून वाकडीं चालू लागलीं. तसेंच मन इतकें भ्रष्ट झालें की, दुसऱ्याचा प्राण घेणें, हेंही त्यास बरें वाटतें.

कितीएक लोक असे निष्ठुर आहेत की, सती जाणें चांगलें म्हणतात ! परन्तु वाईट गोष्टीस चांगलें जे म्हणतात, त्यांचें मन साक्षी असतें. ते मनापासून म्हणत नाहीत. दुसरे कांही कारणाने म्हणतात. कोणी शास्त्राचे ओढीवर जातात. कोणी रूढीवर जातात. आणि त्यांस ही गोष्ट वाईट, असें मनांत येतें, तरी मनाची ध्वनि दाबून दुष्ट बुद्धिप्रेरित भाषण करितात, हें मोठें आश्चर्य आहे. मला वाटतें की, जे साधु झाले व शास्त्रकार झाले त्यांणी मन शुद्ध करण्याकरितां पुष्कळ ग्रंथ लिहिले व पुष्कळ शिकविलें आणि नेमही पुष्कळ केले. परंतु ती गोष्ट साधली नाही. लोकांचें मन वाकडेंतिकडें जातें. जर लोकांनी वास्तविक सत्य स्वरूप मनांत विचार केला, तर त्यांस कितीएक गोष्टी जा लोकांमध्ये चांगल्या म्हणून चालतात त्या वाईट असें समजेल. परंतु हिंदु लोक अजून आपल्या ठिकाणीं विचार करूं लागले नाहीत. व मन हेंच मोठें शास्त्र आहे. व लिहिलेलीं शास्त्रें सर्व याचे खालीं आहेत, असें त्यास वाटत नाही.

हल्लीं वाईट चाली चालतात. त्यांतील एक, दोन मी वर्णन करितों.

प्रथम मला दुसरी कोणतीही चाल इतकी वाईट वाटत नाही की, जितकी हल्लीची लग्नाची चाल वाईट आहे. हिंदु लोकामध्ये पहावें तर कोणी ऐंशी वर्षांचा पुरुष रस्त्याने चालला आहे किंवा कामावर आहे, असें कोठे आढळत नाही. याचें कारण काय ? बहुत लोक असे पहाण्यांत येतात की, स्वतः क्षयरोगी व पंचवीस वर्षे झालीं नाहीत तों पांचचार रोगिष्ट पोरें उत्पन्न झालीं आहेत. स्त्रीस वार्धक्य-दशा प्राप्त होऊन पुरुषाचे केस पिकलेले, अंगांत शक्ति नाही, कोठे बाहेर जाण्यास सामर्थ्य नाही, असें आढळतात. मग परमुलखांत कशाने जाणें होणार ? शिपाईगिरी वगैरे राहिलें. परन्तु पोटास मिळवून खाण्याची देखील पंचाईत. असे पुरुष दरिद्री बहुत आढळतात. मुख्यत्वेंकरून श्रीमंत लोक तर अगदीच नालायक होत चालले आहेत.

याचें मुख्य कारण मला लहानपणांचें लग्नासारखें दुसरें कोणतेंही दिसत नाही. लग्नाने मनुष्य स्वर्गास जातो, म्हणून शास्त्र आहे. परंतु त्याचा हेतु जाणत नाहीत. आणि मला असें पुष्कळ आढळलें की, स्वता भिकारी, अन्नाची पंचाईत, रोगी, अशक्त, परंतु वीस वर्षे झालीं नाहीत तों स्वता किंवा त्याचे आईबाप लग्नाचे मोठे काळजींत पडतात. आणि लोकांजवळ भीक मागतात. आणि लोकही त्यांस "त्यांचें लग्न पाहिजे कशास ? त्यांची प्रकृति नीट झाली आणि रोजगार-धंदा करूं लागले व संसार करण्याचें ज्ञान व स्त्रीस खावयास घालावयाचें सामर्थ्य आलें म्हणजे लग्न करा" असें म्हणत नाहीत. परंतु उलटें असें म्हणतात की, आम्हणाचें लग्न होत आहे, त्यास साहित्य केलें तर पुण्य आहे; असें म्हणून पैका देतात. आणि अशा मुलग्यास मुलगी कोण देतो ? म्हणून मुलीच्या बापास लाच देऊन त्याची पोरगी याचे गळयांत बांधतात. मग लग्न झालें की, दोघांनी झोळया घ्याव्या आणि दारोदार भीक मागत फिरावें. आणि विद्या वगैरे सर्व बुडवून त्याने स्त्रीचा काळजींत पडावें. अशी अवस्था होऊन तो लवकर मरतो. मग विधवा स्त्री झाली, म्हणजे तिचे हाल या लोकांमध्ये कसे आहेत, हें सर्वांस

माहीतच आहे.

लोक डोळेझाक करून आपले पोरांचीं व पोरींचीं त्वरित लग्नें करितात. येणेंकरून दोघांचें दुःख वाढतें; व बापास लहानपणीं पोरें व सुना चांगल्या दिसतात, परंतु त्यांचे पाठीमागे त्यांचे हाल कुत्रा खात नाही. याचा विचार हे लोक करीत नाहीत व लग्नाची घाई करितात. येणेंकरून अल्पजीवी, अशक्त, पराक्रमहीन व मूर्ख झाले आहेत. पंधरावीस वर्षांचा मुलगा झाला नाही, तों लोक म्हणतात की, लग्न कां झालें नाही ? आणि त्यास आईबाप असले तर त्यांचा प्राण जाऊं लागतो. त्या वेळेस सांगतात की, कसेंही करा, पण याचें लग्न करा. या मूर्खपणास काय म्हणावें ?

याविषयी व स्त्रियांस विद्या शिकवण्याविषयी लोकांनी जरूर विचार करावा. स्त्रिया वाईट म्हणून पुष्कळ लोक म्हणतात. कोणी म्हणतात की, "स्त्रीबुद्धिः प्रलयं गतः" परंतु यासारखे शतमूर्ख पृथ्वींत नाहीत. जसे पुरुष तशाच बायका स्वभावाने व बुद्धीने आहेत. परंतु ईश्वराने त्या घरचे कामास योजिल्या आहेत. व पुरुषास बाहेरचे कामास, व रोजगारास वगैरे निर्माण केलें आहे. परंतु शहाणपण सारखेंच आहे. जे लोक स्त्रियांस वाईट म्हणतात, त्यांणी पक्कें समजावें की, ही मूर्खपणाची समजूत आहे. आणि प्रायशः असें आहे की, जी स्त्री वाईट, तिचा नवरा वाईट असतो. आणि नवरा चांगला असला तर त्याची स्त्री कदापि वाईट असावयाची नाही.

स्त्रियांस शहाण्या करणें जरूर आहे. व लग्नाकरिता जे धर्म करितात त्यांणी विचार करावा. धर्म मागणारे भटांत फार थोडे योग्य व गरीब असतात. कोणी म्हणतो की, मी गणपतीचे देवळांत चातुर्मास्य अनुष्ठान करितों, त्याची समाप्ति करण्याकरिता मला पैका द्या. तेव्हा असे लोकांस धर्म करणें हा मूर्खपणा वाढविणें आहे.

---

पत्र नं० ६४ १७ जून १८४९

# धर्म सुधारणा

कालमहात्म्येंकरून हिंदु धर्माची सुधारणा करणें जरूर आहे. त्याशिवाय या लोकांचा परिणाम लागणार नाही. चार लोक ज्यांचे मनांत स्वदेशाचें कल्याण आहे, त्यांणी एकत्र होऊन धर्मसुधारणा करावयास आरंभ करावा, हें मला बरें वाटतें. व असें करण्यांत एक मोठा लाभ आहे. तो हा की, सरकार अनुकूल आहे. तेव्हा चार टोणपे शास्त्री, पंडित यांस कशास आपण भ्यावें? यांचे हातून फार झालें, तर त्यांचे विपरीत जे करतील त्यांस जातीबाहेर ठेवण्याचें होणार; तर जात म्हणजे काय? जो समुदायामध्ये लोक पुष्कळ जमतात, ती जात होते व एकटा असला म्हणजे तो बहिष्कृत होतो. पहिल्याने शीख लोक झाले, तेव्हा ते बहिष्कृत होते; व पुढे पुष्कळ झाले तसी तीच स्वतंत्र एक जात झाली.

त्याचप्रमाणे पहिल्याने किरिस्ताव धर्म सुरू झाला. तेव्हा पूर्वीचे धर्माचे जे पंडित होते त्यांणी कांही दिवस त्यांस भ्रष्ट म्हणून ठरविलें व पुढे ते पुष्कळ जमले तेव्हा जे भ्रष्ट म्हणत होते तेच उलटे भ्रष्ट झाले. इंग्रजांनी किरिस्ताव धर्म घेतला तेव्हापासून पुढे तो धर्म पुष्कळ भ्रष्ट झाला. याजकरिता त्यांतील कोणी एका पंडिताने धर्मसुधारणा केली, तेव्हा त्यास लोकांनी पुष्कळ वाईट म्हटलें; परंतु चार लोक एक जागीं जमले व लग्न-सोयरीक आपसांत होईल इतका समुदाय असला म्हणजे कोणी या शास्त्री लोकांस पुसत नाही व असें करण्यास आधार आहे. शंकराचार्यांनी किती एक शास्त्रमतें रद्द केलीं; किती एक चालू केलीं. असें कालेंकरून शास्त्रास चालन पाहिजे. ईश्वरसंबंधी धर्म आहे तो मात्र अचल आहे. परंतु शास्त्रांतील कायदे जरूर वरचेवर फिरले पाहिजेत. यास्तव स्वदेशाचे हितकर्ते यांणी इतका विचार करावा की, आपले पक्षांत पुष्कळ लोक येतील कीं नाही?

मला वाटतें की, या गोष्टीची काळजी नको. धर्मसुधारणा प्रसिद्धपणें चालू केल्यास बहुत लोक आपल्यास येऊन मिळतील. पुष्कळ लोकांच्या मनांत आहे. परंतु संधि नाही, यास उपाय नाही. मुख्य धर्मसुधारण्याचीं कलमें अशीं आहेत.

(प्रथम) सर्वांनी ईश्वराचें भजन अंतःकरणापासून करीत जावें. व (दुसरें) जसा आपला जीव तसा दुसऱ्याचा जीव मानावा. (तिसरें) मुंज, लग्न, प्रेतक्रिया हे तीन संस्कार ठेऊन बाकीचे सर्व रद्द करावे. (चवथें) जें कर्म करणें तें स्वभाषेंत अर्थ समजेल असें करावें. भजन, पूजन, संस्कार सर्व जाले त्यांचे भाषेंत करावे. संस्कृत भाषा पाहिजे ते शिकतील; परंतु ज्यांस येत नाही त्यांणी संस्कृत भाषेंत कोणतें कर्म करणें जरूर नाही. (पांचवें) प्रत्येकास आपले विचाराप्रमाणे आचार करण्याची व बोलण्या-लिहिण्याची मोकळीक असावी. त्यास प्रतिबंध असूं नये.

(सहावें) स्त्रीपुरुषांचे अधिकार धर्मसंबंधी कामांत व संसारांत एक सारखे असावे. येणेंकरून पुनर्विवाह व मोठेपणीं लग्न झालें. (सातवें) आचारापेक्षा नीति प्रमुख असावी. आचाराचें महत्त्व हल्ली आहे तसें असूं नये. आता किती एक बायका लबाड असतात; परंतु पिंपळाच्या प्रदक्षिणा अंतरीत नाहीत, हें कांही उपयोगी नाही. (आठवें) अर्थाशिवाय कांही एक म्हणूं नये. (नववें) मनुष्यमात्रास तुच्छ मानूं नये. जाति-अभिमान नसावा. सर्वांशीं सारखें दयापूर्वक वर्तावें: सर्वांचें कल्याण करावें. (दहावें) स्वदेशाची प्रीति व त्याचें कल्याण विशेषें करून मनांत बाळगावें. (अकरावें) ज्यास जो पाहिजे तो त्याणे रोजगार करावा. (बारावें) गुणेंकरून व योग्यतेकरून जातिभेद मानावा. कुळेंकरून मानूं नये. (तेरावें) सरकाराहून प्रजेचे अधिकार अधिक असावे, म्हणजे जे जे रयतेच्या हिताचे कायदे आहेत, ते सरकारशीं भांडून घेत जावे. (चवदावें) राजाने जे नियम केले असतील, ते व जे ईश्वरी बुद्धिसूचित नेम आहेत ते मानावे.

(पंधरावें) विद्यावृद्धीकरिता सर्वांनी मेहनत करावी. दुःखितास सुख, रोग्यास औषध, मूर्खास ज्ञान, व दरिद्र्यास द्रव्य शक्त्यनुसार देण्यास अंतर करूं नये. (सोळावें) शेवटचें कलम असें आहे की, सत्याने सर्वांनी चालावें. सत्याचे विरुद्ध वर्तणूक करूं नये. विश्वमध्ये जा जा सत्य गोष्टी आहेत, त्यांचा शोध करण्यास आळस करूं नये. आणि सापडतील त्या सर्व प्रसिद्ध कराव्या. व विद्या व ज्ञान संपादन करण्यास सर्व सारखे, अशी मोकळीक असावी.

या दर एक कलमाविषयी एक ग्रंथ उदाहरणेंसहित करावा, असें माझे मनांत फार आहे. व इतक्या गोष्टी मीं लिहिल्या आहेत, त्यांस कांहीं शास्त्र व हिंदुधर्म प्रतिकूल नाही. सर्व हिंदु धर्मांतीलच आहे; परंतु त्याचा शोध मात्र केला पाहिजे. एके ठिकाणीं सापडणार नाही. परंतु चहोकडून मिळविलें म्हणजे सापडेल.

जसा गीतेंत एक ईश्वर आहे; इतर देवता भजूं नयेत, अशीं स्पष्ट वाक्यें पुष्कळ आहेत; तीं घ्यावीं. जरी तीं पुराणांस विरुद्ध असतील तरी पुराणें सोडावीं. जें चांगलें तें घ्यावें. जातीविषयी वेदांचें मत घ्यावें. कारण की, संस्कृत भाषेंत अनंत ग्रंथ आहेत. जा जा ऋषींच्या जसें जसें मनांत आलें तसें त्यांणी लिहिलें आहे. तेव्हा त्यांत एकच पुस्तक आपल्या उपयोगी सापडणार नाही. परन्तु सर्वांचें ऐक्य केलें तर करतां येईल. याप्रमाणे एक ग्रंथ करून त्यांत शुद्ध नीति प्रतिपादन करावी. आणि हिंदु लोकांचें विशेष नांव ठेवावें. आणि त्यांणी कसें वागावें त्याचे नियम त्यांत ल्याहावे. आणि तेंच पुस्तक आपलें शास्त्र समजून त्याप्रमाणे चालावें.

खचित एकट्या ऋषीने आपल्या अकलेने लिहिलेले शास्त्रापेक्षा चार मतें पाहून जें शास्त्र आपण तयार करूं, तें सर्वांपेक्षा उत्तम होईल, यांत संशय नाही. शे–दोनशे लोकांनी याप्रमाणे नांव धारण करून वेगळी फळी पाडावी. मग आपलेमध्ये हा धर्म चांगला असें पाहून पुष्कळ लोक येतील. जा मुलीचा नवरा मरेल ती एकाद्या सोया-

बरोबर जाते, त्यापेक्षा आपले धर्मांत येऊन एकाद्याशीं लग्न करणार नाही काय ? हजारो करतील. हिंदु धर्मांत सांप्रत ज्या ज्यांस अडचणी पडतील ते सर्व तोटा करून या शुद्ध धर्मांत मिळतील. मग आपली मण्डळी प्रबळ झाली म्हणजे जें पाहिजे तें कार्य करतां येईल.

सांप्रत एकमेकांचे विरोध व विभक्तपणें फार आहेत. कोंकणस्थ देशस्थाशीं सोयरीक करीत नाहीत. या अडचणी मोडून लोक गंगाजळ-निर्मळ होतील आणि त्यांचें एक मत व एक धर्म होईल. आणि जें पाहिजे तें करतां येईल. असें केल्यावाचून सांप्रतकाळीं हिंदुधर्म भ्रष्ट झाला, त्याचे हातून आम्ही सुटणार नाही. हा धर्म सुधारला पाहिजे. माझें सुधरण्याचें तात्पर्य असें नाही की, सर्वांनी एकजात व्हावें. कारण की हल्ली नीच जातीचे लोक मोठेपणांत आले नाहीत, याजकरिता त्यांची सोयरीक कोणी अर्थात च करणार नाही. ज्यास पांच रुपये महिना आहे, तो आपले योग्यतेचा गृहस्थ पाहील. केवळ गावाबाहेरचा महाराशीं अथवा भिकाऱ्याशीं लग्न करणार नाही, हें उघड आहे.

परंतु माझा हेतु इतकाच की, विरोध मोडावे आणि लोकांनी परस्पर ममतेने वागावें. व जसे जसे कालंकरून हे अज्ञानपाश सुटतील तसे तसे सोडवावे. परंतु या कार्यास आरंभ करावा म्हणजे बरें पडेल. बहुत लोक वाट पहातात. ब्राम्हण महाराची निंदा करतात त्यास शिवत नाहीत. व इंग्रजांजवळ प्रीतीने बसतात. हें पाहून मला आश्चर्य वाटतें. शास्त्राप्रमाणे पाहिलें असतां महार बरे; परंतु इंग्रजांचे मंडळींत ब्राम्हण असूं नयेत. तथापि हे ब्राम्हण मूर्ख. त्यांस समजत नाही; म्हणून मीं हा उपाय योजिला आहे.

पत्र नं० ८३ २५ नोव्हेंबर १८४९

# भक्ति, कर्म आणि ज्ञान

हिंदु लोकांचा धर्म वास्तविक विचाराने पाहिला तर फक्त इतकाच आहे की, परमेश्वर जो एक, त्याचें भजन करावें; आणि त्यावर भाव बसण्याकरिता कांही तरी मध्यस्थासारखें दगडाची मूर्ति, गुरु किंवा नदी कांही तरी घेऊन त्याचे आश्रयाने भक्ति दृढ करावी. आणि भाव पक्का ठरला म्हणजे त्या मध्यस्थाचीही गरज नाही व कोणत्याही कर्माची गरज नाही. आणि वेदशास्त्र यांच्याही आज्ञा त्यास मानावयास नकोत.

जे पुरुष संसारांत आहेत, त्यास मात्र वेदशास्त्र शासन करतें; परंतु परमार्थावर लक्ष देऊन जे संसार सोडितात त्यांस त्यांचें शासन नको, ही गोष्ट सर्व कबूल करितात. जरी ते म्हणतात की, शास्त्र ईश्वरापासून निर्माण झालें, तत्रापि ते असें म्हणतात की, व्यवहार नीट चालण्याकरिता मात्र तें केलें. मोक्षाचें साधन शास्त्र नाही. तसेंच ज्ञान म्हणजे मनुष्याने सारासार विचार पाहून परमेश्वराशीं ऐक्यता पावून रहावें, म्हणजे त्यास शास्त्राची गरज नाही. यावरून ज्ञान हें सर्व कर्ममार्गांहून व शास्त्रांहून अधिक आहे, व ज्ञान हें फक्त मनुष्याचे अकलेपासून फळ आहे, तेव्हा अक्कल हीच मोक्षाचें साधन आहे, आणि अकलेपासून जो ज्ञानधर्म उत्पन्न झाला, त्याणे मोक्षाचें साधन होतें.

व्यवहार व संसार यथास्थित होण्याकरिता पूर्वापार अनुभवावरून किंवा मनुष्यांनी व्यवस्था लक्षांत आणून जे नियम ठरविले तें शास्त्र; व यज्ञ, पूजा इत्यादि जे धर्म आहेत तेही त्याप्रमाणे होत. तें कांही ज्ञान नाही. मग मनुष्यांनी केलें असतां अथवा शुद्ध समुदाय–मताने झालें असतां सर्वांनी मानावें म्हणून ईश्वरप्रणित असें ठरवून ग्रंथांची योग्यता वाढविली. ज्ञानावाचून मोक्ष नाही, व सर्व प्राण्यांमध्ये धन्य वसिष्ठ व

ऋषभदेव, हेदेखील ज्ञानी होऊनच मुक्ति पावतात; परंतु प्रजेस व्यवहार समजण्याकरिता नियम बांधले की, दारू पिऊं नये, सोनें चोरूं नये. या गोष्टी सर्वांस अनुभवावरून वाईट वाटून हे नियम ठरविले असतील, हें उघड आहे. किंवा ईश्वराने सांगितलें किंवा प्रेरणा केली, असें म्हटलें तरी शोभेल. धर्म म्हणजे व्यवहार, व ज्ञान म्हणजे मोक्षाचें साधन.

एका राजाची गोष्ट आहे की, त्याने आपली स्त्री एकास अर्पण केली. त्याविषयी दुसऱ्याने पुसलें की, तुझ्या मनांत कांही राग आला होता कीं नाही ? त्याने सांगितलें की, नाहीं. तेव्हा त्यास पाप लागलें नाही. याप्रमाणे ज्या व्यवहारामध्ये महान् पातकाच्या गोष्टी, त्याही ज्ञानी यांचे ठायीं निर्दोष होतात. कारण की, त्यांचे ठायीं मनांस विकृति नाही. मन शुद्ध असलें म्हणजे त्यास धर्माचा प्रतिबंध नाही. मनास विकृति असल्यास त्याने धर्माप्रमाणे वागलें पाहिजे असें आहे.

तात्पर्य इतकेंच की, हिंदु धर्मांत कोणतेंही मत नाही असें नाही. भजन करण्याचे मार्ग दुष्ट तंत्रापासून तों संन्यासापर्यंत आहेत. नाना प्रकारचे देवाचें भजन करणें हें सर्व आहे. संस्कृत भाषेंत कोणताही शब्द असला तरी अर्थ करितात; व कोणतेही भाषेंतील शब्द असो, अक्षरें असलीं म्हणजे अर्थ करितात, तद्वत् हिंदुशास्त्र आहे. त्यांत कांही व्यंग नाही. जें मत म्हटलें तें आणि जो शास्त्रार्थ पाहिजे तो त्यांत आहे. परंतु सर्वांचें तात्पर्य काढलें तर इतकें निघतें की, या धर्मामध्ये मुख्य तीन मार्ग आहेत, ते असे, एक ज्ञानमार्ग, दुसरा भक्तिमार्ग, तिसरा कर्ममार्ग. यांचा इतिहास खाली संक्षेपाने लिहितों.

(१) ज्ञानमार्ग– यास आधार उपनिषदें, कांही पुराणें व प्राकृत ज्ञानेश्वरी, दासबोध यासारिखे ग्रंथ आहेत, व त्यांचे आचरणारे तूर्त वैरागी किंवा विरागी किंवा संन्यासी व परमहंस गोसावी इत्यादि लोक आहेत. ज्ञानमार्ग्यांनी संसार बाह्यात्कारी नव्हे, परंतु अंतर्यामापासून सोडिला पाहिजे. कदाचित् संसारांत असले, तर अलिप्त असलें पाहिजे.

वांछना, इच्छा व आशा नसाव्या, व ईश्वर व मी एकच आहें, असें म्हणून ईश्वराचे एकत्रपणाचे चिंतनांत असावें. भोग नसावा, कर्म नसावें, शरिराची, मिळकतीची काळजी, खबरदारी नसावी. अद्वैत-मत सोडावें; पूजन व पूज्यभाव सोडावा; परंतु मायागुणाने व्याकुळ होऊन आपणांस देही मानलें होतें, परंतु ही माझी भ्रांति गेली, असें कल्पून त्यांत रहावें म्हणजे मरणान्तीं सायुज्य पद प्राप्त होतें. म्हणजे जशी कल्पना तशीच सिद्धि होते. या मतास अनुसरणारे श्रीशंकराचार्य व ज्ञानेश्वर हे कलियुगीं, व पूर्वी श्रीकृष्ण, जनकराजा, शुकस्वामी इत्यादि झाले आहेत.

(२) भक्तिमार्ग– यास आधारी शांडिल्याची स्मृति आहे, व यास भक्ति-शास्त्र असें नांव आहे. तसें भागवत व गीता इत्यादिक आधार आहेत व त्या मार्गाचे प्राचीन काळीं आचरणारे प्रल्हाद, उद्धव, हनुमान इत्यादिक; यांणी भक्ति केली व अलीकडे तुकाराम, नामदेव हे सर्व साधु याच मार्गांतील होते. या मार्गांत असें आहे की, द्वैतमत धरावें. मी वेगळा, ईश्वर वेगळा, असें मानावें. मी सेवक, तो यजमान, असें जाणावें आणि भक्ति करावी, क्षमा मागावी, समीपता मरणानंतर इच्छावी; प्राणी वेगळा, ईश्वर वेगळा, असें समजावें. किरकोळ शास्त्रांतील कर्में कांही करूं नयेत. फक्त सगुण देवावर भक्ति ठेवून असावें; जेथे कर्म करावयाचें तेथे त्याचीच उपासना करावी. व ही भक्ति एका परमेश्वराची असावी किंवा त्याचा अवतार किंवा तत्प्रतिमा मूर्ति असून त्या मार्गाने भगवंताचें सेवन करावें. हा मार्ग बहुत लोकांस आवडतो. व वैष्णव यांचें मत हेंच आहे. विशिष्टाद्वैत, रामानुज, राघवाचार्य वगैरे यांचें हेंच मत आहे. ते म्हणतात की, माया ईश्वरकृपेवाचून दूर व्हावयाची नाही. याजकरिता सेवक-भावाने भजावें हेंच उत्तम. परंतु वेदान्ती म्हणजे ज्ञानमार्गी यांचे हिशेबाने भक्तिमार्ग खालची पायरी आहे.

(३) कर्ममार्ग – त्यास आधार स्मृति, श्रुति व पुराणें आहेत. पूर्वी व सिष्ठ वगैरे ऋषि जांणी यज्ञ, याग, तप, अग्निहोत्रें वगैरे केलीं, ते सर्व कर्ममार्गी होते. व जे व्यवहारांत गृहस्थ आहेत, लग्नें करतात व घरांत

रहातात, ते सर्व कर्ममार्गी होते. कर्ममार्गांत एका देवाची भक्ति नाही. व ज्ञानही नाही. याजकरिता ही कनिष्ठ पायरी पण प्रथमची आहे. यामध्ये पंच तत्त्वांचें भजन आहे, व स्नान, संध्यादिक कर्में, व्यवहार इत्यादिक आहेत. त्यामध्ये ईश्वराचें विशेष ज्ञान नाही. अनेक देवता आहेत, त्यांस संतुष्ट करून स्वर्ग इच्छा करावी, इतकेंच यांत आहे. व इंद्रिय दमन वगैरे करावें. यांत कांही कर्ममार्गी ऋषीदेखील मोठे रागीट असत, व शाप देत. हें प्रकरण मांत्रिक आहे.

एकूण हे तीन मार्ग प्रसिद्ध आहेत. सर्व हिंदु लोक या तिहींतील एका मार्गांत बहुधा असतात. आमचें मत असें आहे की, तिन्ही मार्गांमध्ये चांगल्या गोष्टी आहेत. त्या घेऊन जे शहाणे असतील त्यांणी परमेश्वराची भक्ति करावी. जगांत दया करावी, यांत सर्व आलें. ज्ञानमार्ग व कर्ममार्ग यांत घोटाळा दिसतो.

---

पत्र नं० १०७

## खरा धर्म करण्याची आवश्यकता

'कल्याणोन्नायक मंडळी'ने आपलें शहाणपण दाखविण्याकरिता दोन विषय पुढे काढले. (एक) संस्कृत भाषेंतील ग्रंथ सर्वोत्तम व त्यांत सर्वोपयोगी ज्ञान आहे. (दुसरा) पुनर्विवाह करूं नये व विधवा बायकांनी मीठ सोडून वगैरे जेवीत जावें व उपासतापास करून रहावें. पुनर्विवाह करून उपयोग नाही. दोन विषयांचीं उत्तरें समर्पक झालीं असतां त्याजकडून कांही उत्तर आलें नाही.

तेव्हा मी या पंडितांची प्रार्थना करून त्यांस सांगतों की, लोकांचें हित तुमच्याने होणार नाही. व तुम्हांकडून सुधारणा करविण्यास जे म्हणतात, ते भ्रांतींत आहेत. कारण लोकांचें हित इच्छिणें हें तुमचें वतनवृत्तीस विरुद्ध आहे. लोक जितके मूर्खपणांत असतील व बायका जितक्या वेड्या असतील तितकें तुमचें पीक अधिक. असें असतां तुम्हांकडून हित होईल कसें?

अग्नि घर विझवावयास जाईल काय ? व मांजर उंदिरास सोडून देईल काय? या गोष्टी घडणार नाहीत. तुम्ही पुराणिक, भट व पंडित या सर्वांचे हित लोकांचे मूर्खपणांत आहे. लोक खरा धर्म करूं लागले तर तुमची उपजीविका कशी चालेल? बायकांचीं व्रतें, सहस्रभोजनें, दांपत्य पूजनें, चातुर्मासाचे नेम, दक्षिणा, शांति, भूयश्री, × संपूर्णे+ हीं जाहलीं तर तुमचें पोट भरणार.शाळांत, पुस्तकालयांत तुम्हास काय भाग आहे बरें ?

लोक शहाणे झाल्याअंतीं असें होईल की, शाळा, ग्रंथ व विद्या वाढतील; गरीब, अंधळे, लंगडे यांस खावयाची सोय होईल, व रोगी यांस औषध देण्याची सोय होईल. असें करण्यास तुम्ही धर्म म्हणाल काय ? चांगल्या रीतीने कोणी धर्म करावयास इच्छील तर आम्ही त्यास सांगूं की, 'अरे बाबा, हा धर्म नव्हे. जेणेकरून गरीब, आंधळे, पांगळे अन्नास मिळतील व धष्टपुष्ट आहेत ते उद्योगास लागतील आणि लोक विद्वान् होतील असा धर्म करा.' असें तुमच्याने लोकांस सांगवेल काय? ही गोष्ट कदापि घडणार नाही. तुम्ही असेंच सांगाल की, "अरे, शाळा कशास? यांस पैसा देऊं नयें. देऊन काय पुण्य आहे ! ब्राम्हणांचे मुखीं घातलें तर पुण्य आहे. पुस्तकें कशास ? यांतील ज्ञान काय उपयोगी आहे ? ब्राम्हण बोलावून त्यास दानें करावीं. गुप्तदान केलें म्हणजे पुढले जन्मीं मिळतें. केळीचें दान सुवर्णसहित केलें म्हणजे पुत्र होतो. एक गोप्रदान केलें तर अनंत कोटी पापें जातात. देवास अलंकार करून द्यावे. ब्राम्हणांस सुवर्णाचे दागिने करून वाटावे. यांत पुण्य आहे. ब्राम्हणांस भोजन दिलें म्हणजे राज्य चिरकाल चालतें. जरीमरी उठत नाही. शत्रूंचा नाश होतो. रोगपरिहार होतात." असें तुम्ही सांगाल, तर तुमचें पोट भरेल.

तुम्हांस एखाद्या वेड्या बाईने पुसलें की, मी जेवतांना बोलत नव्हतें, हा माझा नेम होता व त्याचें संपूर्ण काय करावें ? तर तुम्ही काय सांगाल?

× भूयश्री– भूयसी– समारंभाच्या किंवा व्रताच्या समाप्तीच्या वेळीं द्यावयाची दक्षिणा:        + संपूर्ण– उद्यापनसांगता.

"अगे बाई, वामनव्रत काय उपयोगी आहे? त्या काळीं ही युक्ति कांही तरी ब्राम्हणांस धर्म व्हावा म्हणून सांगितली. परंतु आता इतकेंच की, चार मुलांस २५ रुपयांचे ग्रंथ घेऊन वाचावयास द्या म्हणजे त्यांत मोठा धर्म झाला." असें तुमच्या तोंडाने कधी तरी येईल? दगडास घाम येईल, सूर्य पश्चिमेस उगवेल, परंतु तुम्ही हें कधी सांगणार नाही.

तुमच्या देखत एखादा लबाड उठून मी सांबबावा म्हणून साधूचा वेष धरून मुंबई, बडोदें असे ठिकाणीं लोकांस फसवून पैसा आणतो आणि तुमचे देखत रांडा बाळगून असतो. त्याचे हजारो लोक पाया पडतात, आणि धर्म करतात; व अशा लबाडास पोशितात. परंतु यांस कशास पैसा देता? हा लबाड धर्मास योग्य नाही, असें तुमच्याने म्हणवेल? कदापि म्हणवत नाही. तुम्ही असें म्हणाल की, ब्राम्हणजातीचा आहे, तस्मात् त्यास धर्म सर्वांनी करावा; पुण्यच लागेल. व तो देवाचें नांव घेतो, याजमुळे त्याचीं सर्व पापें जळून गेलीं. त्याचे पायावर डोकीं ठेवावयास चिंता नाही. असें सर्व तुम्ही म्हणाल. तुम्हास ठाऊक आहे की, जर यास असें नांव ठेवावें आणि लोकांस जागृत करावें, तर आम्ही या सांबबुवाहून अधिक चांगलें नाही. जे त्याचे गुण तेच आमचे, असा तुमचा कट आहे. याजवर कोणी हल्ला करील तो करो.

अज्ञानबुद्धीस आपले हिताकरिता झटतो आणि जितकें जितकें ज्ञान वाढेल त्यास नास्तिकपणा असें नांव देतो. मूर्खास आस्तिक, भाविक, धर्मिष्ट असें म्हणणें तुम्हास जरूर आहे. जर तुम्ही 'कल्याणोत्पादक' असाल तर खरा धर्म कोणता, तो आपलें स्वहित सोडून सांगावा. पुराणिकाने पुराण कसें सांगावें, हरदासाने कथा कशी करावी, ती त्यांस सांगा. एक म्हणतो, विष्णूस तुळशी वाहिल्या म्हणजे हजार जन्मांचें पाप जातें. त्यामुळे जो लबाड श्रोता आहे तो म्हणतो की, पुराणिकबावाने हें चांगलें सांगितलें. मी पाप करीत जाईन, आणि तुळशी वहात जाईन. त्यास वास्तविक नीति आणि धर्म सांगून ही रिकामी खटपट त्यांजकडून टाकवा. परंतु हें तुमचें काम नव्हे, असें आम्हास वाटतें.

---

# ५ अनिष्ट चाली

मराठ्यांचें राज्य जाऊन इंग्रजी राजवट कायम झाली, त्या वेळीं आमचा समाज कसा खालावलेला होता, त्याचें चित्र या १४ पत्रांत स्पष्ट दिसून येतें. समाजांत माजलेला हा गोंधळ व ही अव्यवस्थाच एकंदर अवनतीचें मुख्य कारण होय. राज्य गेलें म्हणून समाज खालावला, असें दाखविण्याचा प्रयत्न कित्येक जण करतात; पण वस्तुतः समाजाची अधोगति इतकी झाली, म्हणूनच हातचें स्वराज्य टिकलें नाही–टिकवितां आलें नाही; हा सिद्धान्त आहे. नीतीच्या कल्पना व जीवित मूल्यें वारंवार बदलत असतात खरीं; परंतु लोकहितवादींनी वर्णिलेल्या वस्तुस्थितींत शाश्वतचें निंद्य व तिरस्करणीय ठरलेलें आचरण आढळतें; आणि त्या वेळच्या लोकांना जीविताची खरीखुरी कल्पनाच नसल्याने त्याचीं कांही मूल्यें ठरलेलीं असतात, ही जाणिवही नसावी, असें वाटतें. त्या काळांतील समाजांतील आचार विचार-विचार असा त्यांना नव्हताच–विचाराचा अभाव मात्र होता– पाहून कमालीचा तिटकारा येतो आणि आमचे पूर्वज इतक्या हीन पदास पोचले होते, हें कळून वाईट वाटतें.

शिमग्याचा दुराचार, शाक्तमार्ग, डोळे करण्याची चाल, मद्यपान, निरुद्योगीपणाच्या चाली, इत्यादिकांबद्दल लिहितांना लोकहितवादींचें अंतःकरण तिळ तिळ तुटत असावें, असें तीं पत्रें वाचतांच वाटतें. शाक्तमार्गाचें अत्यंत किळसवाणें वर्णन वाचल्यावर जुन्या एका शिक्षेची आठवण होते आणि तिला सर्वस्वी लायक अशी मंडळी हीच होत, अशी खात्री पटते. ' शंभर हाणून एक मोजावा ' अशी जी शिक्षा-पद्धत आपण ऐकतों, ती भर चवाठ्यावर शाक्तपंथीयांना दिली तरी ती सौम्य ठरेल. या पत्रांत त्यांचें खरें स्वरूप व्यक्त झालें नाही—

नव्हे, तसें करतांही आलें नसतें. पण ' आगम-प्रकाश ' म्हणून लोकहितवादीं-नी जो वेगळा ग्रंथ लिहिला,त्यांत त्यांचीं सर्व बिंगें व गुपितें उघड केलीं आहेत. समाजाची सर्व बाजूंनी अधोगति कशी होत होती, यांचें यथार्थ वर्णन या १४ पत्रांत सापडतें. हा अनाचार किंवा ही नैतिक अवनति पुष्कळांना दिसली नाही; आपलें कांही चुकतें आहे, असें त्यांना वाटलें नाही, अशांपैकी अग्रगण्य म्हणजे आमचे मराठी भाषेचे स्वयंमन्य शिवाजी-निबंधमालाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर होत. पण लोकहितवादी हे मात्र खरे द्रष्टे, यांत शंका नाही. त्यांनी समाजाचें रोगनिदान अचूक केलें—( रोग झाला आहे, हें आधीं ' वळखलें ' ) त्यावर योग्य तो उपायही सुचविला आणि तसें करतांना कुणाची सुद्धा भीड धरली नाही; लोकनिंदेची काडीइतकी परवा केली नाही, हें अधिक होय.

अवनतीच्या खड्ड्यांत पडलेल्या तत्कालीन समाजाचें चित्र काढण्यांत लोकहितवादींनी अत्युक्ति मुळीच केलेली दिसत नाही. ह. ना. आपट्यांच्या सामाजिक कादंबऱ्यांत त्या वेळचें समाजचित्र आलें आहे, त्यावरून हेंच अनुमान निघतें. लोकमान्यांनी चिपळूणकरांच्या वेळची समाजस्थिति सांगतांना एकंदर अनैतिक आचरणाचा उल्लेख सूचक रीतीने केला आहे. अवनतीकडून उन्नतीकडे जावयाचें म्हणजे बराच दीर्घकालीन प्रवास होय. तेव्हा हा समाजाची अधोगति बरींच वर्षे टिकली, यांत आश्चर्य नाहीं. विसाव्या शतकाच्या आरंभीं ' भारत-सेवक-समाजा ' ची स्थापना करतांना ना० गोपाळ कृष्ण गोखले यांनी सार्वजनिक जीवनाच्या शुद्धीवर भर दिला, तो निष्कारण नव्हे. गोखले म्हणत की– " Public life must be spiritualised-" या आदेशाचें महत्त्व ही समाजस्थिति लक्षांत आली, म्हणजेच नीट समजेल.

---

# ५ अनिष्ट चाली

४ शिमग्याचा दुराचार
६ शाक्त मार्ग
८ जुन्या समजुती
१३ वाईट चालींचे प्रकार
१८ आर्जवीपणा व डौलीपणा
२४ नशिबावर हवाला
३४ वेळेचा व्यर्थ खर्च
४२ डौले करण्याची चाल
४३ निरुद्योगीपणाच्या चाली
७३ धर्मव्यवहारासंबंधी खोट्या समजुती
७६ मद्यपान
८० कमती कशाची ?
८७ एकत्र रहाण्याची चाल
९१ दानधर्म करणें

# शिमग्याचा दुराचार

लोकांत वाईट गोष्टींचा परिचार त्वरित पडतो. व चांगले गोष्टींचें ग्रहण होण्यास बहुत उशीर लागतो. हा एक साधारण नियम आहे. व दुसरा एक नियम असा आहे की, जी एकादी चाल कांही कारणावरून एक वेळ पडते तीच पुढे कांही काळाने अंधपरंपरा चालू लागते. तसेंच हें होळीचें माहात्म्य आम्हांस दिसतें. हल्ली हे पांच दिवस होळीचे आहेत, हे प्रत्येक ठिकाणीं लोक अधर्माने क्रमीत आहेत. व त्यांत मूर्ख आणि उनाड लोकच आहेत असें नाही. बहुत संभावित, शहाणे व थोर लोक अंशतः त्यांत मिसळून आपला अपमान करिताहेत. तेव्हा त्यांस संभावित हें नांव शोभतें काय? नाही; सगळे सारखेच योग्यतेचे असें म्हटलें पाहिजे.

परन्तु हा दोष त्यांजकडेस आहे असेंच केवळ नाही. हा संगतिदोष लहानपणापासून आसमंतात् भागीं हीं दुष्कृत्यें पाहिल्याने प्राप्त होतो. आणि एकदा निर्लज्जपणाच्या भावना मनांत ठसल्या म्हणजे त्या जात नाहीत. उलट्या हृतक्या सुरू होतात की, आम्ही आता लिहितों आहों, हें किती थोड्यांस आवडेल आणि किती बहुतांस आवडणार नाही, हें आमच्याने सांगवत नाही; परन्तु जर त्यांनी विचार केला तर त्यांस आम्ही म्हणतों, हें खरें वाटेल, यांत संशय नाही. वाचणाराने असें म्हणूं नये की, माझा बाप, माझा आजा, माझे शेजारी, हे सर्व असें कर्म प्राचीन काळापासून करीत आले व मीही लहानपणापासून त्यांतच वाढलों, तेव्हा त्यांचे विरुद्ध जें हें भाषण तें उपयोगी काय? तर आमची त्यांस अशी प्रार्थना आहे की, तुम्हांस ईश्वराने विचारशक्ति दिली आहे. तेणेंकरून सारासार पहा. यद्यपि शास्त्राचा आधार थोडासा असेल तरी शास्त्रांत आणखी बहुत सत्कर्मे लिहिलीं आहेत तीं सर्व तुम्ही करतां काय? आणि जर करीत

नाही, तर मग भ्रष्टपणास मात्र शास्त्राचा आधार तुम्ही कशाकरिता धरतां! सार कोणतें व असार कोणतें, हें पहाणें तुम्हांकडे आहे.

ईश्वराने तुम्हांस जिव्हा दिली आहे. तिचे योगाने कुत्सित, बीभत्स व निंदायुक्त भाषणें करितां आणि लज्जास्पद मूर्खपणाचे स्वर काढितां, हा थोरपणा काय? आम्ही तर याला मनुष्यपणाही म्हणणार नाही. मग थोरपणा म्हणूं कोठून? रानांत जनावरें फिरतात त्यासारखे हे लोक फिरतात. त्यांस लज्जा कशी वाटत नाही? बापाचें श्राद्ध किंवा कपिलाषष्ठीचा पुण्यकाळ आला तर आनंदाने गरिबांस त्यांच्याने दोन पैसे धर्म करवत नाही आणि शिमग्यांत दुष्ट स्त्रियांचे पोषणाकरिता उल्हासाने हे द्रव्य देतात. तेव्हा साजिंदे व भडवे हे त्यांचें पूर्वजन्मींचे ऋणी असतील असें वाटतें. जितकें देऊळ पवित्र तितकेंच हें व्यभिचारगृह अपवित्र; असें असून त्यांत पापाचा साठा करितात, हें नरकाचें साधन करितात कीं नाही बरें?

आमचें हें पुणें शहर मोडलें आहे, तत्रापि आपल्या लग्नाच्या स्त्रिया व सख्ख्या आया यांस पोटास घालावयाची किती एकांस भ्रांति असली, तरी त्यांनी कर्ज काढून कसबिणीचा हातांत दोन रुपये दिले नाहीत तर त्यांस असें वाटतें की, आमची मंडळी (ज्यांचे सोबतींत फिरतों ती) आम्हांस हसेल. ही लज्जा बाळगून हरेक प्रकारें करून चार रुपये ते मिळवितात. आणि त्यांचा पातकांत व्यय करितात. जे भले मनुष्य असतात, त्यांसही ते पिशाच्चरूप स्नेही नरकांत ओढितात. आणि आपल्यास शाबास मानून असें समजतात की, यंदाचा शिमगा चांगला केला. आम्ही धन्य आहों. चोरांचे मंडळींत जो चोरी शिताफीने करितो, त्यास इतर चोर वाहवा म्हणतात, तशीच ही अवस्था आहे.

याप्रमाणे पुणें शहरांत आमचे पाहण्यांत पुष्कळ आहे. पुणें द्रव्याने हलकें आहे खरें, परंतु दुष्कर्मांत तेथील लोक द्रव्यवान् शहरापेक्षा अधिक आहेत. व बहुत लोक आपले सामर्थ्याची पराकाष्ठा करून रांडांचे ताफे बाळगण्याचा खर्च जीवादारभ्य करितात. त्यांत लहान मुलें पाहून

त्यांची मला फार करुणा येते. कारण की, हे भ्रष्ट झालेले लोक आपलें उदाहरण त्यांस देऊन त्यांसही आपले शाळेंत विद्वान् करितात. नंतर ते वाढल्यावर कसे होतील, याचें लक्षण सहज ध्यानांत येईल. मला वाटतें की, पांच दिवस हे लोक नर्कवास करितात. कारण की, त्यांचे कानीं, मुखीं, मनीं व चित्तीं पातकाशिवाय दुसरें कांहीही नसते. 'कुरीयर' नामक इंग्रजी पत्रांत असें लिहिलें आहे की, सरकाराने हा सण बंद करण्याचा बेत करावा. तो असा की, दरबारांत या सणाबद्दल सुट्यां आहेत त्या बंद कराव्या व पुण्यांत रात्रींच्या तोफा बंद करतात त्या करूं नयेत. व माजिस्त्रेट साहेब यांणी कोणी दांडगाई किंवा वाईट भाषण अगर दंगा करील त्यास मोठें शासन करावें.

हे सर्व बेत सरकारने केले तर चांगले आहेत. लोकांस वाईट मार्गांतून काढल्यासारखें होईल. परंतु सरकार प्रस्तुत असें करीलसें दिसत नाही. कारण सरकार स्वतंत्र नाही. त्यांस विलायतेहून अधिकाऱ्यांचीं पत्रें वारंवार येतात की, हिंदु लोकांचे रिवाजास व चालींस व धर्मास अगदी अटकाव करूं नये. आमचे लोकांचें माहात्म्य इकडे कांही नाही, तरी विलायतेस मोठें आहे असें दिसतें. व ही मसलतीची व राज्यकारणी गोष्ट आहे. इंग्रजांस असें वाटतें की, जर आपण लोकांचे चालीविरुद्ध कांही केलें, तर हिंदुस्थानचें राज्य आपलें बुडेल. व लोक आपल्यास हाकून देतील. यास्तव ते जपून चालतात. अशी त्यांची मसलत आहे.

परंतु तें कसेंही असो, दुसऱ्यांनी करूं नको म्हटल्यावर मग करूं नये, हें शहाणपण नव्हे. चांगली गोष्ट असेल ती स्वयमेव अंगीकारावी. होळी अगदी बंद झाली तर फार चांगलें आहे. व या दुराचारास शास्त्राची आज्ञा आहे, असें आम्हांस वाटत नाही. येविषयी आमचें मत खरें आहे किंवा नाहीं, हें कोणी विद्वान् मनुष्य आम्हांस लिहून उत्तरीं कळवितील तर आम्ही फार खुशी आहों. परंतु तें कसेंही असो. होळीचा मूर्खपणा इतका उघड आहे की, त्याविषयी लिहिणें हें

सुधाश्रम आहेत. परंतु लोकांस मूर्खपणा फार, याजमुळे त्यांचे ध्यानांत घेत नाही. व दुसरें असें आहे की, मूर्ख लोक यांचे हातीं द्रव्य व अधिकार फार आहेत. याजमुळे त्यांचें उत्तेजन दुष्कर्मांस फार आहे. म्हणून ते सुधारणा करण्यास तुच्छ मानतात. परंतु आम्हांस धीर पुष्कळ आहे.

---

पत्र नं० ६ — २३ एप्रिल १८४८

## शाक्त मार्ग

हिंदु धर्मांत बहुत पंथ आहेत. मला वाटतें की, सरासरी शंभर एक असावे. असेच दुसरे धर्मांतही आहेत; परंतु या पंथांपैकी एक दुर्घट पंथ तंत्राचा आहे. म्हणजे रुद्र, यामल व योनीनील तंत्र वगैरे ग्रंथ आहेत. त्यांत शक्ति उपासना करण्यांचा मार्ग लिहिला आहे. तो बंगाल देशांत व गौड व उडीसा (ओरिसा) प्रांतांत पूर्वीपासून चालतो. तेथील लोक शक्ति-उपासना तंत्राधाराने करितात, म्हणून या देशांत ते लोक मंत्री व सामर्थ्यवान् आहेत, अशा गप्पा फार आहेत.

त्यांचें खरेंपण किंवा खोटेंपण काय असेल तें असो. त्याचा विचार मी सांप्रत करीत नाही. परंतु मला बहुत खेद होतो की, तो पंथ अलीकडे दक्षिणेंत पुणें इत्यादि ठिकाणीं बहुत चालू लागला आहे. त्याचें कारण पाहिलें असतां लक्ष्मी प्राप्त व्हावी, पुत्रकामना इत्यादिक वासना तृप्त व्हाव्या, म्हणून उपासना करितात, असें शाक्त सांगतात; परंतु मला वाटतें की, तें कांही नाही; त्यांची मद्य मांस खाण्याची व्यसनेंच प्रमुख आहेत, तीं पुरतीं होण्याकरिता निमित्त करून किती एक निर्लज्जपणानें आपले घरीं दारूचे कारखाने करून मद्य तयार करितात, व किती एक विकत घेतात व ते जरी गुप्तपणाने असें करितात तरी त्यांचे श्रीमुखाची दुर्गंधी जेथे बसतील तेथे प्रगट होऊन हे शाक्त आहेत, असें सर्वांस

समजतें व कित्ती एक मस्त होऊन घरीं व रस्त्यांत सापडतात. या गोष्टी प्रसिद्ध आहेत. परंतु त्यांच्या प्रतिबंधाचा उपाय कोणी लोक समजून करीत नाहीत. किंबहुना त्याजवर झाकण घालून जो तो म्हणतो की, हें अपेश डोकीवर कोणीं घ्यावें ? हें कलियुग आहे. मी तुम्हांस थोडासा या प्रकरणाचा इतिहास कळविलों. तो मीं श्रमेंकरून समजून घेतला आहे. वास्तव हा दुष्ट पंथ सुटण्याकरिता प्रगट व्हावा.

या पंथांतील लोक आहेत त्यांस वाममार्गी किंवा वामाचारी असें म्हणतात आणि शाक्त हेंही नांव त्यांचें प्रसिद्ध आहे. प्रथमतः जास मद्यमांस खावें अशी बुद्धि होते, तो जे दुसरे वाममार्गी आहेत त्यांचे भजनास लागतो. नंतर ते एक दिवस बहुधा अमावास्या किंवा अंधारी रात्र अशी योजतात आणि त्या दिवशीं त्या उमेदवारास आपले धर्मांत घेण्याचा संस्कार करितात. तो असा की, त्या दिवशीं मध्यरात्रीस आठ असामी वाममार्गी आणि आठ स्त्रिया एक एक वेगळाले जातीची असावी, म्हणजे विधवा, ब्राम्हणी, परटीण, न्हावीण, कळवांतीण, गौळीण, कोष्टीण, सोनारीण, ब्राम्हणी सुवासिण एकूण आठ, त्या गुरूच्या घरीं मिळोन येतात; आणि तेथे स्थंडिल घालून आठ कलश मद्याचे व मांस असें मांडतात. अग्नि पेटवितात आणि त्याजवळ काली म्हणजे देवीची मूर्ति मांडितात. नंतर प्रत्येक पुरुष प्रत्येक स्त्रीचे शेजारी बसतो आणि पूजा करितात. नंतर प्रतिज्ञा करवितात की, 'मी आजपासून जातिनिषेध मानणार नाही व मद्यांस भक्षीन व स्त्री स्वकीय किंवा परकीय यांचे ठायीं निषेध किंवा व्यभिचार मानणार नाही, मला सर्व सारखें आहे. येणेंकरून मला भगवती मेल्यावर मोक्षास नेवो. आणि या जन्मीं सुखसंपदा देवो,' असी प्रार्थना व प्रतिज्ञा करतात.

नंतर पूजा संपूर्ण झाली म्हणजे तंत्र-शास्त्रांतील कांही उपदेश करितात. आणि नित्य पूजेचा मार्ग सांगतात. यानंतर तो वामाचारी दीक्षित झाला. मग त्याचे पुनरपि अंधेरी रात्रीस पूजेचा बेत केला म्हणजे तसा स्त्रिया जमवून ते सोबती जमवून बसावें; आणि स्त्रियांस ते भैरवी म्हणतात

व आपल्यास भैरव म्हणतात व दारूस सिद्ध म्हणतात; अशीं विलक्षण नांवें घेऊन कोणी नग्न होऊन नग्न स्त्रियांची पूजा करितात आणि तिचे ठायीं देवीचें स्थापन करतात. किती एक व्यभिचार करितात आणि किती एक महार किंवा मांग यांचे हातचें जेवतात. शिवरात्रीस व एकादशीस-देखील अशीं कर्में करितात आणि त्यांचे आणखी पुष्कळ विधी आहेत. कोणी आपले कपाळी कुंकू लाऊन तांत्रिक टिळकाची खूण बाळगतात. कोणाची खूण तोंडाची घाण असल्ये; मग ते आपल्या मंडळींत आपल्यास मोठे सामर्थ्यवान् म्हणवितात. कोणी म्हणतात आम्ही ज्यांस शाप देऊं त्यांस मारूं; कोणी म्हणतात की, आम्हांस देवी दिसते; कोणी म्हणतात की, आम्ही जें चिंतूं तें कार्य करूं. अशीं अनेक प्रकारचीं कर्में ते आपल्या अंगीं भासवितात, परंतु वागवीत नाहीत; तेणेंकरून लोकांत निंदेस मात्र पात्र होतात.

असे भ्रष्टाचार हल्ली ब्राम्हण लोकांत चालू लागले आहेत. त्यांनी वैदिक मार्ग, अग्निहोत्र, ज्ञानप्राप्ति, वेदपारायण, पुराण-मार्ग, शालिग्राम-पूजा, इत्यादिक धरून स्वस्थपणांने भगवन्ताचें भजन करावयाचें, तें सोडून या नरकवासरूप पंथांत पडून राहिले आहेत. मला तर वाटतें की, याचें साधन नरक मात्र आहे. असे जे दुष्ट लोक नीति भ्रष्ट करतात, त्यांस ईश्वर शासन केल्याशिवाय रहाणार नाही. पेशव्यांचे राज्यांत ब्राम्हण धर्माचा कांहीसा बंद होता, कारण की ते नियंते होते; परंतु हल्ली तर ब्राम्हण अति-शूद्रापेक्षाही वाईट कर्में करितात. त्यांस कोणी शासन करणार नाहीसा झाला आहे. जे चार गरीब आहेत ते भितात की, कोणी अब्रूची अर्जी कोर्टांत करील; मग हुकूमनामा होईल. हे कष्ट कोणीं भोगावे ? परंतु मला वाटतें की, अद्यापि वाममार्गी ब्राम्हण फार नाहीत. दक्षिणमार्गी जर सगळे जमले, तर त्यांस ताळ्यावर आणावयास उशीर नाही. किती एक लोकांनी जेवावयास जाणें सोडलें व किती एक घरांत बसतात, कोणाच्या घरीं जात नाहीत, असे त्रासले आहेत. परंतु कोणामध्ये असा धीर होत्य

नाही की, सर्वांस बोलावून याचा निबंध करून बंदोबस्त करावा आणि मूळचे पवित्र स्थितीवर ब्राम्हण धर्म आणावा, म्हणजे शुद्ध ज्ञान-मार्ग, शास्त्रविचार, परमेश्वराचें आराधन करणें, इत्यादिक मार्ग स्थापावे आणि मंत्रतंत्र व जारणमारण इत्यादिक गोष्टी किमयासारख्या अशक्य, परंतु अज्ञाणी लोकांस भुलवण्याकरिता ब्राम्हण लोक प्रतिष्ठा दाखवून दुष्ट कर्मे करितात. ही एकदम बंद होतील तर चांगलें आहे.

पूर्वी इराण देशांत असा एक मजदाद (मेहदी?) नामक खोटा पैगंबर होऊन व्यभिचार नाही, असें मत चालू करीत होता. परंतु नशरिवान् राजानें त्यास फाशी दिलें, तेव्हा तें मत आटपलें. तसें या दुष्ट वाममार्गी लोकांस मोठें शासन झालें पाहिजे. व यांचीं घरें व रात्रींच्या बैठका यांचा पत्ता लावून नीतीचें रक्षण करावें हें चांगलें. नाही तर काय होईल तें ईश्वर जाणे. मनुष्याची कल्पना चालत नाही. आणखी याविषयी पुढे मजकूर लिहूं. ×

---

पत्र नं० ८ ७ मे १८६२ (?) [४८]

## जुन्या समजुती

आमचे लोकांच्या पुष्कळ मूर्खपणाच्या समजुती आहेत व इतकी ज्ञानाची प्रवृत्ति झाली आहे, तरी लोकांचा वेडेपणा अद्यापि दूर झाला नाही. माझे आढळण्यांत ज्या समजुती आल्या आहेत, त्यांची आपले पत्रद्वारें एक यादी प्रसिद्ध करून असें इच्छितों की, कोणी समजदार

---

× या काळीं पुण्यांत शाक्त मार्ग फार लोकांनी घेतला होता. त्यास लक्षून हें पत्र आहे हा मार्ग पुढे कृष्णभट गोखले यांनी खटपट करून मोडला.

मनुष्य असेल, त्याणे त्याविषयी प्रतिपादन किंवा निषेध करावा. मला वाटतें की, या समजुती मूर्खपणाच्या आहेत, किंवा शहाणपणाच्या आहेत, याचा निश्चय झाला म्हणजे संशय जाईल.

(१) ब्राम्हणाशिवाय अन्य वर्णांने विद्या करूं नये. संस्कृत विद्या एकीकडेच आहे. परंतु एकादा मराठा किंवा इतर जातीचा कारकून ब्राम्हणांनी पाहिला म्हणजे त्यांचे अंगाचे तिळपापड होतात, हें काय ?

(२) ज्ञान व विद्या वाढवूं नये. कारण शहाणे व वेडे एका दराने विकतील, असें भय बाळगतात.

(३) जरी कोणी अपराध करूनही ब्राम्हणांचीं घरें भरलीं, तरी त्यास पुण्यवान् असें जाणतात. याचें उदाहरण बाजीराव पेशवे यांचे अपराध कोणी मनांत आणीत नाहीत. व ब्राम्हण-प्रजा त्यास योग्य मानितात.

(४) देव ब्राम्हणांकरिता कशींही कर्में केलीं तरी चिंता नाही. यास उदाहरणें, कबीराने साधूस जेवण देण्याकरिता चोरी केली, इत्यादि.

(५) जा यंत्राने बहुत लोकांचें काम थोडे माणसांचे हातून करितात, तें चालू करूं नये. म्हणजे डाक, छापखाना, टंकसाळ हे कारखाने लोकांचें पोटिस्त बुडविणारे म्हणून त्यांचा द्वेष करितात.

(६) सरकार करील तें करील. सत्तेपुढे शहाणपण नाही.

(७) सर्व गोष्टी नशिबाने घडतात. शहाणपण व उद्योग यांचा उपयोग नाही.

(८) सर्व सुख द्रव्यापासून आहे. त्यापलीकडे सुख नाही व सर्व गुणांचेंही अधिष्ठान तेंच आहे.

(९) विद्या पोट भरावयाकरिता शिकावी व ती श्रीमंतांही शिकणें जरूर नाही.

(१०) देशाचार, वृद्धाचार, शिष्टाचार, इत्यादिक जुन्या चालींविरुद्ध आचरण करूं नये. मागील चाल चालत आली ती चालवावी. याविषयी आग्रह धरितात.

(११) वाईट गोष्ट असेल आणि ती चार लोकांचें पोट भरण्याचें साधन असेल तर मोडूं नये.

(१२) घर सोडून बाहेर जात नाहीत व मुलांस वगैरे घरीं बाळगण्याविषयी फार उत्कंठा धरितात.

(१३) मुलें, नातवंडें झालीं म्हणजे जन्माचें सार्थक झालें, असें वडिलांस वाटतें. यास्तव मुलांचीं लवकर लग्नें करितात.

(१४) इंग्रजांचे राज्यांत पैशास बरकत नाही. पाऊस कमी व जरीमरी फार म्हणतात. व याचें कारण देवताक्षोभ झाला आहे व इंग्रजांचे कायदे व रीति वाईट आहेत म्हणून समजतात.

(१५) ब्राम्हणाने अपराध केला तरी त्यास शासन करूं नये व त्याचे सर्वस्वी चालविण्यांत महापुण्य आहे, असें मानतात.

(१६) धष्टपुष्ट ब्राम्हणास केला तरी तो धर्म; परन्तु आंधळ्या कुळंब्यास किंवा लंगड्या महारास दिलें तर तो धर्म नव्हे.

(१७) पाहिल्या लढाया व दंगे वगैरे होते, तेव्हा शिपायांचें पोट भरत होतें. आता जिकडे पहावें तिकडे सामसूम झालें आहे, हें वाईट, असें कित्येकांस वाटतें. कुळंबी माजले व ब्राम्हण त्यांचेबरोबर झाले, हें वाईट वाटतें.

(१८) उद्योग न करावा, हें थोरपणाचें चिन्ह व थोरांनी वेडे, भोळसर असावें; व द्रव्याचा उपयोग इतकाच की, चार लोकांचें चालवावें. स्वस्थ खावें व निजण्यांत व स्नानसंध्येंत आयुष्य घालवावें, हाच थोरपणा असें समजतात.

(१९) संस्कृत विद्येखेरीज बाकीच्या विद्या व भाषा नरकाचें साधन आहेत.

(२०) स्नान-संध्येचा डामडौल करील, तो धर्मशील आणि पुण्यवान्; मग त्याची वर्तणूक कशीही असो.

(२१) स्त्रियांना विद्या शिकवूं नये; कारण व्यभिचार अधिक वाढेल.

(२२) थोडा पराक्रम व थोडीसी ब्राम्हणावर भक्ति केली की, ईश्वराचा अवतार म्हणोन त्याची लोकांत प्रसिद्धी होते. जसें शिवाजी भवानीचा अवतार, माधवराव पेशवे विष्णूचा अवतार, इत्यादि.

(२३) मुलगा झाला तर संतोष, मुलीचा संतोष नाही, अशी रूढि आहे.

(२४) स्त्रियांचा पुनर्विवाह करूं नये. कारण की, जिच्या प्रारब्धीं सुख असेल तिचा नवरा मरणार नाही. जी अभागी तिचा मरतो.

(२५) नवसाने देव पावतो. व मनुष्याचे सुखदुःखावर नवग्रहाचा अमल चालतो; म्हणून त्यांचे नांवाने ब्राम्हणास दानें वगैरे केलीं म्हणजे पीडा दूर होते. तसेंच दुःशकुन मानणें इत्यादि.

(२६) स्वार्थ पहावा. लोकांची काळजी करूं नये. या अर्थाची म्हण आहे की, 'लष्कराच्या भाकऱ्या कोण भाजतो?' राजाचीं लेकरें काय खातात, त्याची चौकशी कशास? या समजुतींत हिंदु लोक सांप्रत परदेशांतील व स्वदेशांतील वर्तमानास गैर माहीत. पलीकडचे घरीं काय होतें, त्याची काळजी शेजारी करीत नाही.

(२७) आपल्या पाठीमागे कसें होईल, याची काळजी करूं नये. 'आपण मेला जग बुडाला' इत्यादि म्हणी आहेत.

(२८) पुष्कळ पैसा उधळला म्हणजे लोकांत कीर्ति होते. मग तो पैसा कोठूनही येवो.

(२९) यत्किंचित् कारणाकरितां खळवाद करितात; आणि भिकारी होतात. पण त्यांस सोडीत नाहीत.

(३०) परक्याजवळ हात जोडून रहातात; पण आपले स्वकीयांशीं लढाई करितात; अशी चाल आपले लोकांची आहे. आपसांत प्राण देऊन भांडतात; पण परक्याच्या लाथा सोसून नम्र रहातात.

एकूण तीस प्रश्न मीं घातले आहेत. हे ज्यास अमान्य असतील, त्याणे लिहून कळविल्यास मला फार संतोष होईल. परन्तु या समयीं

मूर्खपणाच्या समजुती इतक्या दृढ आहेत की, त्यांस असें वाटेल की, काय हे प्रश्न ! यांचीं उत्तरें काय द्यावयाचीं आहेत ? पण तसें नव्हे. या गोष्टी मोठ्या आहेत व लोकांच्या गैर समजुती जाव्या व त्यांणी सुख व्हावें अशी इच्छा ज्यास असेल त्यासच हें पत्र आहे. इतर जे लक्ष्मीचे बंधु आहेत, त्यांचा हिशेब व गणना आमचे मनांत मुळीच नाही. ते बोलले सारखे, न बोलले सारखे.

---

पत्र नं० १३

## वाईट चालींचे प्रकार

आपले लोकांच्या मूर्खपणाच्या समजुती चालतात. त्यांपैकी ३० प्रसिद्ध झाल्या, त्यांची पुरवणी आणखी खाली लिहिली आहे, ती प्रसिद्ध व्हावी—

(३१) स्त्रियांनी केला तो व्यभिचार; पुरुषाचा व्यभिचार करण्याचा पुरुषधर्म आहे, असें समजतात.

(३२) सोदा तो शहाणा.

(३३) साळसपणाने व खरेपणाने द्रव्य मिळत नाही.

(३४) ज्याची सद्दी त्याचें राज्य, ज्यास काळ अनुकूळ त्यास सर्व भाळतात. मुलींचा व जनावराचा पायगुण चांगला वाईट असतो, असें समजतात.

(३५) महार हिंदु आहेत व आपले देवाची पूजा करितात व धर्म मानतात, तरी ते म्लेंच्छापेक्षा नीच कसे ?

(३६) कार्यापुरती मैत्री व कारणापुरते आर्जव; तसाच रोगापुरता वैद्य.

(३७) संसार सोडल्यावाचून ईश्वरप्राप्ति नाही.

(३८) स्त्रियांचा पुनर्विवाह केला तर धर्म बुडेल व ब्राम्हणांची अब्रू जाईल.

(३९) बैरागी वगैरे लोक घरेंदारें, रोजगारधंदा सोडून फिरतात, त्यांस खाण्यास दिलें तर पुण्य आहे.

(४०) अब्रू गुणावर नाही, परंतु द्रव्यावर व मोठे कामावर आहे. बहुधा कोणाचें द्रव्य किंवा काम अपराधाखेरीज गेलें, तर अब्रू गेली म्हणतात. हें कसें ?

याचा विचार करून जे उत्तर देतील, त्यांचे आम्ही उपकार मानूं. खरें असेल त्याचा स्वीकार व लबाड असेल त्याचा अनादर करावा, इतकीच आशा आहे.

---

पत्र नं० १८

## आर्जवीपणा व डौलीपणा

सांप्रत काळीं दोन दुर्गुण हिंदु लोकांत फार उत्पन्न झाले आहेत. एकाचें नांव दिवाळखोरी व दुसऱ्याचें नांव गुलामगिरी; अशीं आम्ही त्यांस नांवें ठेवितों. याहून दुसरे शब्द आम्हांस सुचत नाहीत ! जे या दुर्गुणानुगामी आहेत त्यांनी कीर्ति किंवा धन संपादन केलें, असें लोकांस वाटून त्यांचा आचार अधिकाधिक वृद्धिंगत होत चालला आहे.

आम्हांस मोठा चमत्कार वाटतो की, जा पुरुषास एक महिन्याचे वीस रुपये मिळत आहेत त्याने थोरांचे नादीं लागून तीस रुपयांचा खर्च करावा, यांत त्यास काय कीर्ति आहे ? परंतु असें करणाराचे मनांत येतें की, "साखरेचा खाणार, त्याला देव देणार," अशी म्हण लोकांत चालत आली आहे. परंतु मला तिचा खरेपणा कांही वाटत नाही. गरिबाचे मनांत येतें की, मी थोरासारखा वागुन त्यांचे मंडळींत मिरवेन; आणि तेणेंकरून

आम्हां मान्यता वाटेल. परंतु अशा डौलाने योग्यता चढत नाही, इतकेंच होतें की, तोंडावर कोणी मूर्ख म्हणत नाहीत. निष्पक्षपाती असेल, तो तोंडावरही म्हणतो. बाकी सामान्यतः पाठीमागे म्हणतात.

आता बहुत लोक असेही पहाण्यांत येतात की, पांच रुपये महिन्याची मिळकत आणि पंधरा रुपयांचें त्यांच्या डोकीस पागोटें. एक म्हण आहे की, "मिजाज बादशहाची आणि अवलाद भडभुंजांची" अशी ते बहिवाट करितात आणि पैसा नाहीसा झाला म्हणजे कांही कामकाज वगैरे असेल तर लांच वगैरे घेऊन किंवा कोणास फसवून, बाता मारून, लबाड्या करून चार रुपये उपटतात. त्याजवर पोट भरावें व तें नाही तर बापआई यांजवळ कांही संपदा असली तर घरांत उचकाउचक करावी; व तेंही नाही तर शेवटीं बाहेर चोऱ्या कराव्या; मग अब्रू जाईल ती जाईल; राहील ती राहील.

परंतु त्यांचे लक्षांत असें वागत नाही की, वस्त्रप्रावरण, डौल आणि ढोंग यांत थोरपणा कांही नाही. आपले मिळकतीप्रमाणें आपण खर्च करावा. थोरांचे गुण घ्यावे. पण त्यांचा खर्च आपल्यास काय होय? थोरांनी विहिरींत उडी टाकली तर आपण कशास टाकावी? हें त्यांस कळत नाही. ते थोरांची बरोबरी करण्यास जातात व थोरांनी एके ठिकाणीं पांच रुपये खर्च केला, तर आपणही करितात. आणि असें मनांत आणितात की, यांचे बरोबरीने खर्च केला, आता आम्हांस यांची योग्यता आली, असें लोक समजतील. परंतु जाणणारे आहेत, ते आपल्या मनांत यास मूर्ख म्हणून समजून उगेच बसतात. इतकें हें दिवाळखोरीचें वर्णन झालें.

आता गुलामगिरी हा तर दुर्गुण सर्व हिंदु लोकांचा आहे, असें मला वाटतें. यांतून एकही मुक्त नाही. याजवर किती एक मूर्ख आपल्यास गोष्टी सांगणारे आर्जवी इत्यादि दुर्लौकिकाचे हुद्यावर मुकरर करितात. आणि त्यांचा बहुधा मतलब असा असतो की, थोरांस दुर्गुण व नाना प्रकारच्या खोडी लावाव्या आणि अखेरीस त्यास बुडवावें. जोंपर्यंत त्यांजवळ अर्थ

आहे, तोंपर्यंत त्यांस भुलवून पैसा घ्यावा व त्यांजकडे कामकाज असलें तर त्यांजवळ लोकांची मध्यस्थी करून लाच देववावी व आपणही कांही खावी व नेहमी स्तुति करावी व ते जें म्हणतील त्यास रुकार द्यावा. नेहमी बरोबर फिरावें. असे लोक बहुत झाले आहेत व बहुधा द्रव्याचीं ठिकाणें अशा लोकांनीच वेष्टिलीं आहेत.

त्यांतच भटभिक्षुक यांस मानलें पाहिजे, कारण ते फारच आर्जवी लोक आहेत. ते कांही धर्मरक्षक नव्हत. परंतु त्यांचा व्यापार इतकाच की, यजमानाने चोरी व लबाड्या इत्यादि गुन्हे करून द्रव्य आणिलें तरी चिंता नाही, भटास खावयास घातलें म्हणजे झालें. इतकाच त्यांचा हेतु. आणि द्रव्यवानाने कसेंही कर्म केलें तरी त्यास शास्त्रार्थ काढून द्यावा; असे लबाड लोक बहुत धर्म म्हणून बाळगतात. परंतु ते उभयलोकीं अकल्याणकारक आहेत. कोणताही श्रीमंत पहा, त्याचे घरीं पंक्तिबारगीर फार असतात. परंतु त्यांची निवड केली तर शेकडा दोनचार उपयोगी निघतील. बाकी सर्व गुलामगिरी करणारे होत; असें विचारी आहेत त्यांचे मनांत येईल. अस्तु.

ही चाल या लोकांत बहुत आहे. आणि जे केवळ गरीब आहेत, ज्यांस खावयास नाही, तेच असें करितात असें नाही. ज्यांस स्वार्थ आहे त्यांसही ही निर्लज्जपणाची गुलामगिरी करावी असें वाटतें. आणि आपल्याहून थोर म्हटलेले असतात, त्यांचें ते आर्जव करितात ? बहुत स्तुति करितात आणि आपले घरून त्यांचे घरीं जाऊन पायमळणी करितात. तेणेंकरून त्यांस असें वाटतें की, आम्ही त्याच्यासारखे होऊं आणि आमची प्रतिष्ठा अधिक होईल. परन्तु लोक त्यांस मूर्ख मात्र म्हणतात. आणखी कांही होत नाही. पहिला थोरपणा आणि स्वतंत्रपणा असतो, तोही जातो.

आम्हीं किती एक लोक असे पाहिले आहेत की, जोंपर्यंत शिरस्तेदारी, नाझरी किंवा असा दुसरा कोणता मोठा हुद्दा कोणा माणसाकडे आहे तोंपर्यंत त्याजकडे हरवक्त लोक येतात. व मेजवान्यांचीं बोलावणीं येतात.

असें कोणी म्हणेल की, यांचा व त्यांचा परमस्नेह हरएक प्रकारें " जीवश्च कंठश्च " आहे; परंतु त्याजकडील काम गेलें म्हणजे तो जर मरावयास भूमीवर काढला असेल तर तो जिवंत आहे काय, असा समाचारही घेत नाहीत. व पूर्वी ज्यांचे बंधु असें म्हणवीत होते, त्यांचा मुलगा भीक मागूं लागला तरी त्यास एक दिवसदेखील बोलावीत नाहीत. कामावरून दूर झाला म्हणजे बोलावण्याचे यादींतून त्याचें नांव निघतें. असे ते स्नेही. या प्रकारें करून आर्जवी लोक वेष घेऊन लोकांस बुडवितात. त्यांचा सर्व काळ हाच उद्योग. हे लोक " असतील शितें तर मिळतील भुतें " याप्रमाणे आहेत आणि इतकेंही करून नफा काय ? पोट मात्र भरतें आणि मेले तर पाठीमागे व जिवंत असतांना दुष्कीर्ति लोकांत होते. असें आयुष्य घालविण्यापेक्षा गरीब राहून मेहनत करावी व स्वतंत्रपणाने भाकर मिळाली तर ती आगंतुकीपेक्षा बरी. परंतु हा स्वतन्त्रपणाचा लाभ कोणास कळत नाही. मुळापासून हिंदुस्थानांत एकतन्त्री राज्य. याजमुळे लोक इतकी गुलामगिरी करावयास शिकले. दुसरें कारण दिसत नाही.

नाना फडणीस याची गोष्ट सांगतात की, मराठे लोकांत नाना फडणीस शहाणा प्रधान होता. तो बाजीराव आल्यावर बरतर्फ झाला व त्यास कांही कामकाजही नाहीसें झालें. तेव्हा कोणी त्याचे मित्राने सुचविलें की, आता तुमचा वृद्धापकाळ झाला, व बाजीरावाचें तुमचें नीट नाही, त्यापेक्षा सरकारांस विनंती करून कांही पोटापुरती नेमणूक करून घेऊन काशीस जावयाचा बेत करावा. त्यांजवर त्यांनी उत्तर दिलें की, स्वामींची सेवा मरणपर्यंत करावयाची; आपले कामावर मरावें, असें सांगितलें आणि त्याप्रमाणे केलें. तात्पर्य, मराठे लोकांची चाल याप्रमाणे आहे की, जन्मपर्यंत चाकरी करावी, चाकरीसारखें दुसरें सुख मानीत नाहीत. हाही गुलामपणाच आहे.

चाकरी हें निंद्यकर्म होय. हें कामापुरतें करावें आणि सामर्थ्यानुसार लवकर सोडावें. परंतु जे लबाड लोक आहेत ते नेहमी नीटपणें चाकरी

करीत नाहीत. यास्तव बहुत दिवस ते चाकरी करतात. सरकारी चाकरी हें लोकांचें धर्माप्रमाणेच काम आहे. व हें नीट करण्याहून दुसरा सद्धर्म कोणता नाही. असें मनांत न आणितां ते असें समजतात की, सरकार चाकरी चांगली मिळाली म्हणजे आपणास भूमींतील द्रव्य सापडलें, मग पाहिजे तसें करावें, लोकांस बुडवावें आणि आपलें घर भरावें. द्रव्य मिळविण्याचा हाच हंगाम आहे, असें जाणून त्याप्रमाणे ते जुलमाची वहिवाट करितात. म्हणूनच अशीं लबाडी करावयाचें ठिकाण सोडून त्यांच्याने जावचत नाही. इतकाच नेटीव लोकांचे स्वभावाचा अर्थ दिसतो आणि जो शोधून पाहील त्यास असेंच वाटेल की, हे लोक फार अप्रामाणिक व लोकांस बुडविण्यांविषयीं धुरंधर आहेत. यांची म्हण अशी आहे की, " सरकारचें खाऊं नये तर कोणाचें खावें ! "

जर मनुष्यास स्वस्थतेचें सुख व व्यापार-शेतकी वगैरे धंदे यांतील थोरपणा समजेल तर ते चाकरी तुच्छ मानतील, परंतु तें कळत नाही. याजमुळे अशी दुराशा धरून लोक दुष्टपणा करितात. याजमुळे आपले लोक आपल्या राज्यास मुकले आहेत. कारण स्वदेशीय राजाचा जुलूम लोकांस सोसवत नाही. इंग्रज व परकी दुसरे बरे वाटतात. अस्तु. नेटीव लोकांनी आपला लुटारूपणाचा स्वभाव व गुलामगिरी आणि दिवाळखोरी हीं सोडून स्वदेशीय लोकांचे हिताविषयी विचार केला पाहिजे. गुलामगिरीपासून दिवाळखोरी होते. जर मनुष्य आपला स्वतन्त्रपणा राखील. तर त्यास दुसऱ्यासारखें करण्याची जरूर नाही. गुलामगिरी आणि दिवाळखोरीपासून लुटारूपणा वगैरे अनर्थ होतात.

---

पत्र नं० २४ ३० जुले १८४८

## नशिबवर हवाला

जे सोंगट्या व बुदबळें खेळतात त्यांस माहीत असेल की, सोंगट्याचे खेळांत कांहीं बुद्धि नाही. फाशास दान पडेल त्याप्रमाणे जय किंवा

अपजय होतो. खेळणार मोठा बुद्धिमान असला तरी त्याचे बुद्धीचा कांही उपयोग नाही. फाशाचे स्वाधीन तो असतो. तसें बुद्धबळाचे खेळांत नाही. त्यांत बुद्धीचा उपयोग आहे. जो शहाणा असेल, तो जिंकील, असा निश्चय करतां येतो. सोंगट्यांत कोणाचा निश्चय होत नाही.

तद्वत् जा देशांत लोक शहाणे व राज्य शहाणपणाचे चाललेलें असतें तेथे शहाणपणा वाढेल, असा निश्चय आहे. क्वचित् न होईल तर ती गोष्ट खेरीज आहे. अस्तु. बहुधा नियम असा आहे की, जे लोक शहाणे आहेत ते उद्योगवादी असतात. व मूर्ख आहेत ते प्रारब्धवादी असतात. कारण उद्योगाने सिद्धि होते, हें ते जाणत नाहीत. हिंदु लोक जेव्हा तेव्हा नशीब व प्रारब्ध म्हणतात. आणि हें वास्तविक पाहिलें तर खरेंच आहे. कारण लोक मूर्ख असले म्हणजे तेथे शहाण्याचे अशी उमेद धरूं नये की, त्याची अब्रू वाढेल. व वेश्याने असें म्हणूं नये की, मी नेहमी वेश्याचे योग्यतेनेच राहीन. एका पुरुषास दोन स्त्रिया असल्या म्हणजे त्या स्त्रिया आपल्या गुणांनी त्याचें अंतःकरण हरण करितात. परन्तु तो जर वेडा असेल तर गुणी जी असेल तिजवर प्रीति करीलच याचा नेम नाही. तो आपलें अंतःकरण मूर्ख बायकोकडूनही वश करून घेईल. सांप्रत काळीं हैदराबाद मुसलमानांची राजधानी आहे व पुणें ही ब्राम्हणांची राजधानी होती. परन्तु दोहो ठिकाणीं असे होतें की, कोणाची चहा होईल आणि कोणाला लोक चांगलें म्हणतील याचा नेम नाही. चांगल्यावाईटाची परीक्षा नाही. ज्याचें प्रारब्ध उघडेल त्याची अब्रू एकदम वाढेल. तेव्हा कोण कोणास लुटतील व कोण कोणाची अब्रू घेतील, याचा भरवसा नाही. शहाणपणा व वेडेपणा याचा कांही उपयोग नसे. फक्त नशिबावर हवाला.

बाजीराव पुण्यांत होता, त्या वेळीं अशी अवस्था होती की, जे आज भाकऱ्या भाजीत होते, ते उद्या पालखींत बसले. आणि आज पालखींत होते ते उद्या भिकेस लागले. तसेच ब्राम्हण व भट यांस दानधर्म करण्यास तो कर्णाचा अवतार होता. परन्तु सत्पात्राचा विचार नाही. म्हणून जावें

नशीब उघडें त्यास मिळत होतें. तस्मात् अशा अनियमित राज्यांत रहाणें मोठें दुर्भाग्य होय. व यावरून असें दिसतें की, मुख्य नशीब म्हणण्यास कारण हेंच आहे. जर व्यवस्था सारखी होईल व योग्यतेनुरूप प्रतिष्ठा वाढेल तर नेम झाला. मग कोणी प्रारब्ध म्हणणार नाही. जोंपर्यंत राज्य बेबंद आहे तोंपर्यंत नशीब हा शब्द लोक उच्चारतील. कारण त्यास त्याचा दाखला प्रत्यक्ष येतो की, शहाण्याचा वेडा आणि वेड्याचा शहाणा घटकेंत होतो. यास्तव असें होऊं नये म्हणून कायदे व शास्त्र असलें पाहिजे. मनुष्याचा धर्म हाच आहे की, जोपर्यंत आपली अक्कल चालेल तोपर्यंत त्याने चांगलें होण्याचा मार्ग स्थापन करावा. उद्योग सोडूं नये. उद्योगाने फळ येत नाही, असें होण्यास कारण मनुष्यच आहेत. राजा चांगला असेल तर वाईट कोण, चांगला कोण, याची निवड होईल.

वर्तमानपत्रें असावीं, याचें कारण हेंच आहे की, सरकारांनी किंवा कोणीही अन्याय केला तर तो प्रगट होतो व येणेंकरून त्याचा कांही बंदोबस्त होतो. ज्याची चूक त्यास कळली म्हणजे तो दुसऱ्याने ती करीत नाही. याजकरिता लोकांचें मत प्रगट व्हावें, हा उत्तम मार्ग आहे. ज्यास थोरपणा मिळतो त्यास असें वाटत नाही की, मी कमी शहाणा आहें. त्यास सगळा शहाणा मी व अर्धे शहाणें बाकीचें सर्व जग आहे, असें वाटतें. याजमुळे लोकांची स्तुति तो पसंत करतो. यास्तव वर्तमानपत्र असलें म्हणजे तसें न होतां मोठी सुधारणा होते. तात्पर्य, नशिबाचें कारण लोकच आहेत. व ही घालमेल त्यांचे मूर्खपणामुळे होते. गहूं आणि जोंधळे सारखे विकूं लागले म्हणजे अर्थातच लोक नशीब म्हणूं लागतात. आणि यापासून आळस उत्पन्न होतो व उमेद खचते. व कोणी योग्यता मिळविण्याची काळजी ठेवीत नाही. त्यास असें वाटतें की, मीं व्यर्थ इतकी विद्या केली व शहाणपण शिकलों. येथे सकट घोडे बारा टक्के आहेत. त्यापेक्षा कोणी कांही शिकूं नये व विद्या करूं नये, असें मनांत येतें. आणि मग यत्नाची अशी प्रवृत्ति पडते की, कोणाचें आर्जव, कोणाची गुलामगिरी

करावी, म्हणजे कांही पोटाची सोय होईल. वास्तविक थोरपणा मिळवाव-याचा जो यत्न, तो सोडून नीच कर्मास निर्वाहाकरिता लोक लागतात. याप्रमाणे हा सर्व अनर्थ लोकांचे अज्ञानामुळे किंवा राजाचे मूर्खपणाने होतो, याचा निश्चय होत नाही.

तथापि आमचा अभिप्राय असा आहे की, याचें कारण लोकांचें अज्ञानच आहे. जर लोक शहाणे असतील तर प्रायशः राज्य वाईट होणार नाही, हा नेम आहे. कारण जे लोक शहाणे आहेत, तेच राज्यावर बसतात, हा निश्चय आहे. कसेही लोक मूर्ख असोत परन्तु जे राज्यावर बसतात ते त्या बेत्यांतील शहाणे असतात. पहिल्याने जो राज्य मिळवितो तो शहाणा व मग त्याचे वंशांत मूर्ख निपजतात आणि राजवंशांतील म्हणून लोक त्यास मानितात; हा त्यांचा मूर्खपणा आहे. प्रथम राज्य संपादन होणें तें त्या राष्ट्रांतील जे शहाणे असतात त्यांसच होतें. संपादकांस कांही तरी विशेष शहाणपण असल्याशिवाय राज्य मिळावयाचें नाही. लोक शहाणे असतील तर बहुतेक अनर्थ टळतील.

परन्तु हिंदुस्थानांतील लोक अगदी गयाळी आहेत. त्यांस कांही कळत नाही. अद्याप हे झोपेंत आहेत. वास्तविक पाहिलें तर या लोकां-मध्ये गुणावरून किंवा विद्येवरून कोणाची योग्यता व मान्यता नसते. जो अमलावर आहे किंवा मोठ्या द्रव्याचे मालकीवर आहे, त्यास लोक शहाणा समजतात. कवीने वास्तविकच म्हटलें आहे की, 'सर्वे गुणाः काञ्चनमाश्रयन्ते !' हें उदाहरण या लोकांस बरोबर लागू आहे. जर मोठे विद्वान असले आणि गरीब असले तर त्यांस कोणी विद्वान म्हणत नाही. अधम असला तरी चिंता नाही, त्याजवळ द्रव्य असलें किंवा अधिकार असला म्हणजे त्याएवढा मोठा कोणी नाही. व त्याची प्रशंसा लोक करितात. असा संप्रदाय आहे. या इतक्या अज्ञानास कारण पाहिलें तर मला एक असें दिसतें की, संस्कृत भाषेंत जे ग्रंथ आहेत ते सर्वांस कळत नाहीत. आता संस्कृत भाषेंत पाहिजे तें सर्व आहे असें नाहीच, पण आहे

तितकें कळतें तरी लोक शहाणे असते.

संस्कृत भाषेंत ग्रंथ थोडे, भूगोल आणि इतिहास हे मुळीच माहीत. पुराणांत किती एक ठिकाणीं असें लिहिलें आहे की, हिमालयाचे पलीकडेस किती एक देश आहेत. तिथे अमुक अमुक लोक आहेत. याज-वरून तेव्हाचे लोक आताचे सारखे कैदेंत नव्हते असें समजतें. जरी या ग्रंथांस बहुत दिवस झाले व त्यांत लिहिलें आहे त्याशीं आता किती एक गोष्टी मिळत नाहीत, तत्रापि ही गोष्ट खरी आहे की, त्या वेळेस हिंदु लोक सर्वत्र जाऊन विद्या वाढवीत होते. विद्या म्हणजे स्वदेशांत व जें इतर देशांत आहे तें सर्व आपल्यास कळावें, याचेंच नांव विद्या. अलीकडे किती एक मूर्खपणाचे समजुतीमुळें लोक कैदेंत आहेत. म्हणजे त्यांचा पायांत बिड्या आहेत. त्यांस इकडचें इकडे हलवत नाही. जागच्या जागीं मरती आणि होतात बिड्या तोडावयाजोग्या असूनही ते स्वस्थ दुःख भोगितात, हें आश्चर्य आहे.

तात्पर्य, बहुत दिवस एखादी गोष्ट चालली, म्हणजे ती सोडवत नाही. विचार असला तरी अंध होतात. आपली सुधारणा कोणते रीतीने होईल, याचा विचार करीत नाहीत. त्यांत एकमेकांचे द्वेष व मत्सर फार; याजमुळे कोणी कोणास पुसत नाही. व अशी स्थिति जोपर्यंत आहे, तो-पर्यंत यांचें कल्याण होणें दिसत नाही. जोपर्यंत उत्तर देशचे लोक इकडे येत नव्हते, तोपर्यंत हें चाललें. आता हें चालणार नाही.

---

पत्र नं० ३४ १२ नोवेंबर १८४८

## वेळेचा व्यर्थ खर्च

आपले लोक वेळेची किंमत समजत नाहीत. वास्तविक म्हटलें तर मनुष्यास ईश्वरीदत्त आयुष्य हेंच धन आहे. जे या धनाचा अविचाराने व्यय करितात, ते उपाशी मरतात आणि जे विचाराने व्यय करितात, ते स्वच्छपणाने सुख भोगितात.

## बोलण्याचा विषय जेवण

सांप्रत हिंदु लोकांस अशी खोड आहे की, वेळ व्यर्थ घालवावा. आमचे पहाण्यांत असे लोक आले आहेत की, आपले घरून उठून लोकांचे घरीं जावें आणि त्यांचा व आपला वेळ गोष्टींत घालवावा. त्यांचें रिकामे गोष्टीवर सर्व ध्यान असतें. जेवणदेखील ते विसरून गोष्टी सांगत बसतात. बरें, गोष्टी सांगतात त्या तरी उपयोगी, विचाराच्या व ज्ञानवृद्धि व्हावी अशा प्रकारच्या असाव्या, तर तेंही नाही. मनुष्य उत्तम प्रकारचें भाषण करील तर त्यास व श्रोत्यास ज्ञान होईल. परंतु हिंदु लोकांमध्ये जे गोष्टी सांगणारे आहेत त्यांचा वेळ शहाणपणाचे गोष्टींत जात नाहीं. व्यर्थ मूर्खपणाच्या गोष्टींत जातो, त्याचा कांही उपयोग नाही. बहुधा भट लोकांच्या जेवणाच्या गोष्टी. हें आम्ही फार खाल्लें, थोडें खाल्लें, यजमानाने असें वाढलें, इत्यादि मूर्खपणाच्या आणि अधाशीपणाच्या गोष्टी सांगत बसतात. त्यांचा मुख्य विषय बोलण्याचा काय तो जेवण हा असतो.

त्याचप्रमाणे कुळंबी लोक व मराठे सरदार वगैरे आपल्या बढाईच्या गोष्टी सांगतात. काम कांही करीत नाहीत. त्याचप्रमाणे गृहस्थ लोकांत कोणी निद्रेने, कोणी दुर्व्यसनाने काळ काढितात. खाणें, पिणें, लग्नें याहून दुसरा सुखाचा अनुभव कांही त्यांस नसतो. माझे पहाण्यांत लक्षावधी लोक आले आहेत. त्यांस पुसलें तर ते म्हणतात, 'आम्ही कांही करीत नाही. सरकारांतून इनाम आहे, तेवढ्यावर निर्वाह करून घरीं सुखरूप असतों.' त्यांचे आयुष्याचा हिशेब जर त्यांस पुसला तर जन्मापासून मरणापर्यंत त्यांचे आयुष्यांत अशी एकही अशी गोष्ट सांपडावयाची नाही की, ती कागदावर लिहिण्यास योग्य व ऐकण्यास योग्य. अशा रीतीने ते काळ घालवितात. भटही असेच असतात. जर त्यांस म्हटलें की, तुम्ही काय करीत असतां, तर ते म्हणतील की, स्नानसंध्या करून गंगातीरीं स्वस्थ असतों. मोगलांकडून इनाम आहे, तितक्यावर चरितार्थ चालतो. तसेंच मराठे लोकांस पुसलें तरी ते म्हणतात की, साताऱ्च्या राजाचे पदरीं असतों, काम कांही नाही; पंक्तीचें ताट, मानकऱ्यांमध्ये असामी व महाराजां-

बरोबर फिरावें. असे लोक मोठ्यामोठ्या राजधानीस आढळतात.

जेथे हिंदु लोकांचें राज्य आहे, तेथे सर्वत्र न्यायाचा अंधःकार असतो; एवढेंच नाही, परंतु विद्येचा व विचाराचाही असतो. बाहेर होतें काय व जातें काय, याचा कांही एक विचार नसतो. जाचें त्याचें ज्ञान आपलेपुरतें व आपले घरापुरतें असतें. त्यांस दुसरें कांही ठाऊक नसतें. कोणी म्हणतील की, थोर लोकांच्या पदरीं भिक्षुक, भट, शास्त्री, पंडित असतात. परन्तु ते लोक निरुपयोगी असतात. शास्त्री जे आहेत, त्यांस मागील हजारो वर्षांचे ग्रंथ उलटतांनाच पुरें होतें, कारण संस्कृत भाषेचे कुलपांत ते असतात. तेव्हा प्रथम तें कुलूप उघडावयास म्हणजे भाषा शिकण्यास पांच दहा वर्षें लागतात. मग पुढे कांही ज्ञान व्हावें, तो लोक 'शास्त्रीबोवा' असें म्हणूं लागतात. मग अंगावर शालजोडी घेऊन मिरवतांनाच पुरेसें होतें. मग विद्या कशाची ? अलीकडे पांच हजार वर्षांत झालें काय, याचा पत्ता कोणास नाहीच. शास्त्री, पुराणिक द्वापारयुगापर्यंत गोष्टी सांगूं शकतात. परन्तु पुढे अलीकडील अनेक देशचें वर्तमान, व नवीन कला व विद्या वगैरे उत्पन्न झाल्या आहेत याविषयी त्यांस खबर नसते. जे संस्कृतांत देश लिहिलेच नाहीत ते आता आहेत. त्यांचें वर्तमान त्यांस ठाऊक नाही.

हल्लींचे सरकारची व्यवस्था ठाऊक असल्यास उपयोग अधिक पडेल. परन्तु हें ते समजत नाहीत. तस्मात् शास्त्री यांचें ज्ञान अपुरें आहे. जसे घरांत पन्नास असामी वृद्ध, जांस जाग्यावरून उठवत नाही असे आहेत, तर त्या लोकांचा उपयोग काय ? कांही तरुण त्यामध्ये असतील तरच त्यांचा निभाव लागेल. आणि अलीकडील इतिहास व विद्या जाणून मग प्राचीन राजांचे इतिहास ठाऊक असले तर चांगलेंच आहे. परन्तु अलीकडील सोडून मागील राजांच्या कथा जन्मपर्यंत वाचल्या तरी उपयोग काय ? मागील युगांत मनुष्यें ताडभर उंच होतीं व दहा हजार वर्षें जगत होतीं आणि सोन्याची भूमी होती, अशा गोष्टी खऱ्या असोत-नसोत, परन्तु त्यांचा मुळीच कांही उपयोग नाही, यांत संशय नाही. भागवताचीं

## डोकीवरचे केसही मोजले !

हजार पारायणें केलीं व रामायण नित्य वाचलें, तरी हिंदुस्थानांत इंग्रज कसे आले, हें समजणार नाही. तसें जन्मपर्यंत जुन्या गोष्टी सांगितल्या आणि सांप्रतचे विचार केले नाहीत तर त्यांचा उपयोग काय ?

परन्तु हे शास्त्री व भट व संपूर्ण हिंदु लोक अजून मागल्या गोष्टींचे भरांत आहेत. त्यांस अजून सांप्रतचे कांही सुचत नाही. याजमुळे कित्येक लोक पोरासारखे बोलतात की, विलायत बेट लहान, दोनचार कोसांचें आहे. कोणी म्हणतो टोपकर हे पाण्यांतले रहाणारे ! कोणी म्हणतो, रूमशामचें राज्य मोठें. कोणी म्हणतो, सात लाख घोडे तेथे आहेत. कोणी म्हणतो, पंधरा लाख पायदळ तेथे आहे. कोणी म्हणतो, कंपनी सरकार बायको आहे. अशा नाना प्रकारच्या गैर माहितीच्या गोष्टी सांगतात. इंग्रजांस राज्य करूं लागल्यास दोनशे वर्षें झालीं आणि या लोकांचा डोकीवरचे केशदेखील त्यांनी मोजले. परन्तु या लोकांस त्यांचे डोळेही ठाऊक नाहीत, हा केवढा चमत्कार ! भट लोक हे तर या पृथ्वीवर जन्मास आले व न आले सारखेच आहेत. यांचा कांहीच उपयोग नाही. अन्नास मात्र खर्च, लोकांस उपद्रव, भीक मागणें व्यर्थ वेळ घालविणें, हीच त्यांची वृत्ति. कोणी कांही करील, तर यांचा कर त्यावर आहेच. यांचा कांहीच उपयोग लोकांस नाही. परन्तु यांचा सन्मान ठेवणारे गृहस्थ पुष्कळ आहेत. येणें करून द्रव्याचा व्यर्थ व्यय होऊन विद्याशून्य लोकांचा प्रतिपाळ होतो आणि मूर्खपणा वाढतो. या लोकांस कांही तरी काम शिकवलें तर बरें.

ब्राम्हण लोक शिंपी वगैरे यांचा रोजगार करतील तर अन्नाने पोट भरतील. भिक्षुकी करावी आणि निर्लज्जपणाने दुसऱ्याचे दारीं उभें रहावें, त्यापेक्षा धंदा करून वेळ आणि आपली शक्ति उपयोगास लावून पोटें भरावीं तें बरें नाही काय ? हे लोक जर आपले आयुष्याची किंमत करतील आणि व्यर्थ दिवस घालविणार नाहीत, तर यांचें फार कल्याण होईल.

---

# डोले करण्याची चाल

सांप्रत हिंदु लोक धर्माभिमानरहित भ्रष्ट झाले आहेत. हें त्यांचे कृतीवरून समजतें. पहा, जातीचे हिंदु लोक असून मुसलमानाचा धर्म आचरतात. हल्ली पुण्यांत मुसलमानांचे डोले दहा पांचच होतात आणि हिंदु लोकांचे शंभर होतात. व हे लोक जसे बापाचे श्राद्धाची व काशीयात्रेची काळजी व तयारी करितात, तसा उद्योग करून डोले करितात. हें हिंदु धर्मास मोठें लांच्छन नाही काय ?

जे हिंदु धर्मास जाणत असतील व खरे पंडित असतील त्यास हा दुराचार पाहून लाज वाटावी; परंतु तेही डोलेशाक करितात, हा केवढा अंधळेपणा आहे ! अज्ञान फार झाल्यामुळे मुसलमानांपुढे बसून त्यांचा संस्कार आपले देहास करून घेऊन फकीर होतात. यांत व ख्रिस्ती धर्माचा बापतिस्मा घेण्यांत कांही अंतर नाही. एक मुसलमान होतो, दुसरा इंग्रज होतो. दोघांचा संस्कार सारखा आहे. परंतु याजविषयी लोकांस अगदी शरम नाही. ते कर्ज काढून ताबूद करितात व अडाणी लोक त्यास नवस करितात. तसेच ब्राम्हण लोकही कांही कांही भ्रष्ट झाले आहेत, असें माझ्या ऐकण्यांत आहे. ब्राम्हणांच्या बायका ताबूद निघतात त्या दिवशीं नवसाच्या घागरी ताबुदाचे पुढे ओततात. देवावर अभिषेक करावयाचा सोडून अशीं कर्मे करितात, तेव्हा ईश्वराचा क्षोभ या लोकावर कसा होणार नाही ? व्हावा हेंच योग्य. हे लोक अज्ञानाने जनावरांपेक्षाहीसुद्धा मूर्ख झाले. हिंदु धर्म बुडोन गेला. आता धर्म म्हणून कोणी जाणत नाही. लग्नें, मुंजी या चाली पडल्या म्हणून करितात. त्यांत धर्म कांहीच समजत नाहीत. मुसलमानांची चाल संपूर्ण हिंदु लोकांनी घेतली आहे. जर या देशांत कोणी विद्वान असते तर आजपर्यंत यांचा प्रतिबंध करण्यास यत्न करिते.

पण पेशवे व त्यांचे पदरचे मोठमोठे शास्त्री असून त्यांणीदेखील हा विचार केला नाही. हिंदु लोक मुसलमान होत, त्यांस मदत मात्र करीत गेले, परंतु त्याची बंदी करावी, हें त्यास योग्य होतें. जांस हिंदुस्थानांत धर्मस्थापना करावयाची असेल त्यांणी शंकराचार्यांसारखे सर्व हिंदुस्थानांत धर्म सांगत फिरलें पाहिजे, तेव्हा हें सावूर करण्याचें काम बंद होईल; नाहीं तर मोठा हा अधर्म आहे. यावरून हिंदु लोकांचीं चित्तें समजतात.

चालीस विरुद्ध कांही केलें तर मात्र वाईट म्हणतात. अधर्म म्हणजे काय, याचें त्यास ज्ञान नाही व धर्म याचा अर्थही कळत नाही.. घरांत चाल चालत आली असते त्याप्रमाणे आंघोळ करितात, भस्म लावतात, फुलें आणून पूजा करितात. पण त्यांचा अर्थ त्यांस कळत नाही. डोले करतात, ते मुसलमानांचें अन्न एके ठिकाणीं बसून खातात. त्यांस कोणतें प्रायश्चित्त असावें ? हिंदु धर्माशीं विरुद्ध मुसलमान व खिस्तीयन लोक सारखेच आहेत. आणि खिस्तीयन कोणी झाला तर सर्व लोक त्याविषयी आश्चर्य करितात. परंतु हे हजारो लोक मुसलमान होतात, याविषयी ते स्तुतीच करितात. त्यापेक्षा जी गोष्ट फार प्रघातांत पडली ती नीट दिसते आणि जिचा प्रघात पडला नाही, ती वाईट दिसते. तात्पर्य खरें-खोटे, वाईट-बरें, कोणी पहात नाहीत, चालीवर जातात.

हिंदु लोकांमध्यें दुसरा एक दुर्गुण असा आहे की, त्यांस डौल आणि इतमाम फार आवडतो. जर इंग्रज लोक ताबुतासारखा कांही धर्म काढून पुष्कळ पैसा खर्च करतील तर बहुत हिंदु लोक त्यांचे धर्मांत जातील. परंतु शुष्काशुष्की कार्य होत नाही. हिंदु लोक जा ठिकाणीं डौल असेल त्यास चांगले व थोर म्हणतील व ती गोष्ट करतील. याचें कारण जांचे ठायीं अज्ञान फार, ते डौलाने फसले जातात. जर खरें खरें सांगितलें तर त्यांची आवड बसत नाही. पहा की, मुसलमान लोक हिंदुस्थानांत परदेशाहून येऊन येथे त्यांणी वास्तव्य केलें व धर्म चालू केला व हिंदु लोकांना ती मौज वाटली म्हणून हिंदु लोकही नवस करितात, व त्यांस देव

मानतात. जर या डोल्यांमध्ये तमाशा आणि डौल नसता तर कोणी हिंदु लोक त्यांस न स्वीकारते, यांत संशय नाही.

हिंदु लोकांचीं मनें फार हलकीं आहेत. त्यांस राजाही तसाच पाहिजे. राजाजवळ डौल असला म्हणजे त्याने अन्याय केले तरी चिंता नाही. पहा, बाजीरावाचें वर्णन भट व भडवे पुष्कळ करितात. कोणी म्हणतात की, दोन्हीं काळ ते वेळेवर संध्या करीत होते, ब्राम्हणभोजन घालीत होते, श्रीमंत असें होतें, तसें होतें. पण वास्तविक त्यांचे गुण कसे होते, तें कांही कोणी बोलत नाही; कारण त्यांच्या संपत्तीने हे लोक भुलले होते आणि या लोकांमध्ये द्रव्य हीच अब्रू आहे. अब्रू आणि द्रव्य हीं निराळीं नाहीत.

सर्वे गुणाः काञ्चनमाश्रयन्ते।

या श्लोकेंकरून कवीने लोकांचे मूर्ख समजुतीचें वर्णन केलें आहें आणि याप्रमाणे प्रत्यक्षच आहे. इंग्रज लोकांनी हिंदु लोकांस नांवें दिलें आहे की, "सेमी बार्बेर्स" म्हणजे "अर्धे रानटी." तसे हे लोकं आहेत खरें. हे पूर्ण रानटी म्हणावे तर नागवेउघडे फिरत नाहीतं. एवढेंच कमी आहे.

परंतु या लोकांस ज्ञान अगदी नाही आणि भोळसर फार. जो लाथ मारावयास योग्य, त्याचे हे पाया पडतील आणि त्याने थोडासा डौल घातला तर त्यास महाराज म्हणतील आणि भुलतील. असे हे लोक विलक्षण आहेत. वरवर भाषण करावयाची त्यांस फार खोड आहे. कोणते-ही गोष्टीचा त्यांस अभिप्राय पुसला, तरी त्यांस उत्तर देतां येत नाही व त्यांस कांहीच कळत नाही. खाणेंपिणें यांचें मात्र त्यांस ज्ञान आहे. परंतु तें ज्ञान जनावरांसही स्वभावेंकरून असतें. मनुष्यास मुख्य सुशिक्षा व नीति यांचीं मूळ तत्वें माहीत पाहिजेत, परंतु ब्राम्हणांस हें कांहीच नसतें. पूर्वी ब्राम्हण अर्थज्ञ होते, धर्माचा विचार करीत होते, ग्रंथ लिहीत होते. पढवीत होते व धर्मांत वाईट असेल तें सुधारीत होते. असें मागील

ग्रंथांचे परंपरेवरून दिसतें.

हल्ली लहान मुलांस ब्राम्हण लोक मुंज झाली म्हणजे भटाचे स्वाधीन करितात. तो त्यांस चार वेदांचीं अक्षरें पाठ करावितो. परंतु त्यांचें ज्ञान गुरूस व शिष्यास कांहीच नसतें. विद्या या शब्देंकरून ज्ञानाचा अर्थ होतो. आमच्ये ज्ञान नाही, तीं अक्षरें वाळल्या झाडाप्रमाणे आहेत. याजकरिता ज्ञान असलें पाहिजे. परंतु ब्राम्हण लोक अज्ञानी फार आहेत. हें भटांचें काम झालें. नंतर पंतोजी यांचें काम असें आहे की, त्याणे लिहावयास व वाचावयास शिकवावें. आणि वेताळ-पंचविशी आणि शुकबाहात्तरी ही वरवर वाचवावी. या दोनही बखरी मूर्खपणाच्या माहेर आहेत. त्यांपासून नीति येणार नाही. अशी शिक्षा असल्यावर कोण मूर्ख होणार नाही?

वास्तव मला वाटतें की, शास्त्री, पंडित व जे कोणी शहाणे असतील ते असोत, परंतु बहुतकरून पढतमूर्ख फार आहेत. जे लोक-हितेच्छु असतील त्यांणी शास्त्राधारें एक ग्रंथ करावा की, जेणेंकरून सर्व आपले ब्राम्हणांस धर्माचें ज्ञान सुलभ रीतीने होईल. आणि हा ग्रंथ चालते भाषेंत असावा, आणि मुंज झाली म्हणजे संध्या वगैरे कर्मानुष्ठान करावयाचें त्याचे अर्थही त्यांत असावे. आणि जें जें ब्राम्हण लोक करितात त्याचें तात्पर्य त्यांत असावें. तसला ग्रंथ मुंज होताक्षणीं मुलांस पढवावा म्हणजे त्यास आपला धर्म काय हें तरी कळेल, व एणेंकरून धर्माचा उद्धार होईल. सार्थ ग्रंथ पढविल्यावाचून कांही उपयोग नाही. मुंजींत बहुल्यावर मुलास बसवून उपदेश केला, तर त्यास आणि डोल्यांत फकीर व्हायचे समयीं मुसलमान कलमा पढतो तो उपदेश करून घेणारास फळ सारखेंच आहे. याचा किंवा त्याचा अर्थ त्यास ठाऊक नाही. बापाने मुंज केली आणि पुढे फकिराने फकीर केले, तात्पर्य एकच. एकास वाईट म्हणणें व दुसऱ्यास चांगलें म्हणणें, हें ज्ञान झाल्यावाचून होत नाही.

जेव्हा एकाचा अर्थ कळेल आणि हें चांगलें असें वाटेल, तेव्हा दुसरें वाईट म्हणेल. नाही तर म्हणणार नाही. सांप्रत हिंदु लोकांस आपला धर्म

अमूक व अमूक गोष्ट चांगली आहे, हें समजत नाही. जें ओघास येईल तें चांगलें म्हणतात व जसा प्रसंग येईल तसें करितात. धर्म नाही, कर्म नाही, चांगलें काय व सत्य काय याची ओळख नाही व ज्ञानही नाही. याजपासून हे सर्व अनर्थ झाले आहेत.

---

पत्र नं० ४३ १४ जानेवारी १८४९

## निरुद्योगीपणाच्या चाली

जा काळी लोकांस कांही उद्योग नव्हता, पीक फार येत होतें व खावयास लोक कमी होते, त्या काळीं वेळ जाण्याच्या किती एक युक्ति काढल्या आहेत. जसे आता इंग्रज लोक सक्त मजुरीची शिक्षा देतात, याचें कारण असें आहे की, जे आळशी लोक असतात, ते चोऱ्या करून उपजीवन करितात, त्यांस मेहनत करण्याची सवय लागावी, म्हणून अशी शिक्षा देतात.

तद्वत् हिंदु शास्त्रांत किती एक कलमें आहेत, त्यांचा उपयोग पाहिला असतां कांही एक नाही व त्यांत नीति किंवा विद्याही नाही. फक्त कालमात्र जावा, अशीं कामें त्यांत कित्येक आहेत. तीं कोणतीं तें ऐका. पुराणांत असें आहे की, एक एक तांदूळ निवडावा आणि लक्ष तांदूळ मोजून देवावर घालावे. माझे पहाण्यांत कित्येक धर्मशील अशा स्त्रिया आल्या आहेत की, त्यांनी चातुर्मासांत चार महिने आपले डोळयांत रक्त उतरून घेऊन पांच लाख तांदूळ आणि गहू मोजले व त्यांचा पुड्या बांधून मोठ्या प्रयत्नाने त्या देवास वाहिल्या. किती एक स्त्रिया अशा आहेत की, पांच वर्षपर्यंत वाती करतात, रुद्रवाती, दगडवाती, धोंडेवाती, अशा प्रकारचा कापसाचा वाती सगळा दिवस त्यांत घालून तयार करतात. आणि एका दिवशीं त्याजवर

दहा रुपयांचें तूप घालून देवळांत जाऊन त्या जाळतात. यापलीकडे कांही मूर्खपणा राहिला नाही. त्यांस पुसलें तर म्हणतात की, उपाध्येबावांनी असें करावयास सांगितलें आहे. व यामध्ये फार पुण्य आहे !

अहाहा ! काय हें पुण्य ! इतकीं वर्षे जर उपयोगी विद्या वगैरे शिकण्यांत खर्च केलीं तर केवढा लाभ होईल ? व केवढी योग्यता होईल ? परन्तु पुराणिक देवळांत बसून ऐकणारास फार वेड लावतात की, मीं एक स्त्री पाहिली, तिचा नेम तर फारच विलक्षण होता. तिने गाईस दाणे घालावे आणि तिचे शेणांत जे दाणे पडतील तें शेण घेऊन गोमूत्रांत धुवावे, आणि ते दाणे निवडून दळून त्याची भाकरी करून खावी. याप्रमाणे चार महिने तिने शेणांतील दाण्यांवर उपजीविका केली. कधी पसाभर व कधी चार पैसे भार सापडत, तितकेच खाऊन ती राही. आणि भटजीबावा तिचें व्रत मोठें व ती मोठी पुण्यवान् बायको म्हणून स्तुति करीत. आणखी अशींच कित्येक व्रतें आहेत. त्यांचा अर्थ पाहिला तर दुसरा कांही नाही. परन्तु बायकांचा वेळ जात नाही, तो सुलभपणाने जावा आणि त्यांस कांही उद्योग, सुख सापडावें, म्हणून या युक्ति केल्या आहेत.

परन्तु भोळसर लोक हेतु जाणत नाहीत. दुसरें असें आहे की, कार्तिक मासीं लोक दीपदान करितात व करंडाफण्याचीं वायनें देतात. हा धर्म अगदी उलटा आहे. कारण, दोन पैशांचें टिवलें, त्यांत दमडीचें तूप घालून ब्राम्हणास देतात. त्यापासून जो दान घेतो त्याला कांही उपयोग नाही. आणि निरुपयोगी पदार्थ करण्यांत कारागराचा वेळ मात्र जातो. तसेच भटाचे करंड्या फण्या करतात, यांत काय अर्थ आहे ? ते जिन्नस कोणाचेही उपयोगी नाहीत. व्यर्थ पैसा जातो. दान घेणारास त्याचा उपयोग नाही व लोकांसही नाही आणि देणाराचें मात्र नुकसान. तेव्हा असलीं मूर्खपणाचीं दानें हे लोक कशाकरिता करितात ? दान करण्याचा हेतु न जाणून शास्त्रांत लिहिलें आहे की, दीपदान करावें, म्हणून करितात. परन्तु शास्त्रकाराचा हेतु जाणून दान करीत नाहीत. मला वाटतें एक समई

गरिबास दिली आणि टिवळीं पन्नास वर्षे दिलीं तरी फळ सारखेंच आहे. परन्तु लोक मूर्खपणाने जावयाचे गोष्टीसारखें शास्त्र चालवितात.

एक जावई घरून निघून सासऱ्याचे घरीं जाऊं लागला. तेव्हा त्याचे बापाने त्यास सांगितलें की, सासरा कांही गोष्टी पुसेल तर कांहीस होय म्हणावें, व कांहीस नाही म्हणावें. जावयाने तेवढीच गोष्ट ध्यानांत ठेवली आणि हेतु सोडून व आपली बुद्धि चालविण्याची सोडून दिली. पुढे सासऱ्याची गाठ पडली, तेव्हा प्रथम प्रश्न त्याने केला की, " केव्हा आताच आला ? " त्याने "होय" म्हटलें. दुसरा प्रश्न " व्याह्याची प्रकृति बरी आहे ? " त्याने " नाही " म्हणून उत्तर दिलें. तेव्हा सासऱ्याने पुसलें " अहो, फार प्रकृति बिघडली आहे काय ? " जावयाने उत्तर दिलें की, "होय." " आम्ही भेटीस गेलों तर भेट होईल कीं नाही ? " त्याने "नाही" म्हणून जबाब दिला. तेव्हा व्याही घाबरा झाला आणि जावयास घेऊन व्याह्याचे घरीं आला, तों तो यथास्थित आहे. मग चौकशी केली तों जावयाने असें सांगण्याचें कारण समजलें.

जसा हा मूर्ख जावई सांगितल्या शब्दाप्रमाणे वागला आणि बुद्धि चालविली नाही, विचार केला नाही, तसे हिंदु लोक सांगितल्या शब्दाचे आहेत. त्यांस हेतु समजणें हें ठाऊक नाही. याप्रमाणेच पाठ करणारे लोक आहेत. कोणी गीता पाठ करितो, कोणी विष्णुसहस्रनामाचा पाठ करितो, कोणी सप्तशती वाचतो, कोणी वेद पाठ करितो. परन्तु त्यांचा अर्थ त्यांस समजत नाही. पाठ करणारे लोक भारवाहक व वेडे आहेत. पण लोक तें अगदी विसरले आणि पाठ करणाऱ्या लोकांचें फार दंभ वाढलें. मला वाटतें की, एक अष्टकच संहिता सार्थ म्हणेल व शास्त्र जाणेल तर तो घनपाठ्यापेक्षा श्रेष्ठ. परन्तु पाठ करणारे हे अगदी मूर्ख आणि मुख्य हिंदु लोक या स्थितीवर येण्याचें कारण व विद्या बुडण्याचें कारण मला हेंच दिसतें की, लोक नुसते पाठ करण्यावर फार प्रीति करूं लागले. त्रेणेंकरून अर्थ सुटतांच अनर्थ झाला. पाठ करावें म्हणून

कोठे कोठे वचनें सापडतील. परन्तु तीं वचनें जावयाचे बापाने सांगितलेले ओंधाप्रमाणे आहेत. तो हेतु सांडला असतां कांही उपयोग नाही.

यास्तव लोकांनी या चाली सोडून शास्त्र आणि शास्त्राचे हेतु जाणावे, हेंच उत्तम. नाही तर आणखी विद्येचा संहार होऊन लोक अति नीच अवस्थेला पावतील. यास्तव जे जे लोक विद्येचे मित्र असतील त्यांनी सार्थ शिकण्याची पद्धति सुरू करावी म्हणजे विद्येचा व ज्ञानाचा उद्धार होईल. आणि ज्या पुष्कळ मूर्खपणाच्या चाली आहेत त्या पोकळ आहेत, असें समजून लोक टाकतील. अशा चालींतून लोकांस मुक्त करावें, हाच ब्राम्हणाचा मुख्य धर्म. परन्तु, ब्राम्हण पोटार्थी व परस्वाधीन झाले. याजमुळे धर्म सुधारणेस त्यांस तोंड राहिलें नाही व ते ताटाखालचीं मांजरें झाले.

विद्या पुढे व्हावी, अशी ज्याची इच्छा असेल, त्यांणी यास झटावें कारण दोन हजार वर्षांत हिंदुस्थानांत विद्येचें शून्य झालें आहे. आणि फार फार वाईट चाली लोकांत पडल्या. त्यांचा उपमर्द झाला पाहिजे. आणि विद्येचा विचार करणें हिंदु लोकांमध्ये नाहीसें झालें, याजमुळे त्यास क्षीण-पणा फार आला, रांडपणा फार आला, शूरत्वहीन झाले, अभिमानरहित झाले, व विचारशून्य व मूर्ख झाले. मागे काय होतें, पुढे काय होईल, येविषयींचा तर्क बुडाला. आज आठशे वर्षांपासून हिंदु लोकांच्याने स्वराज्य रक्षवलें नाही. आठशे वर्षांत मुसलमान, इंग्रज वगैरे पाळीपाळीने येऊन येथे राज्य करितात. व आपलेच लोकांचें सैन्य ठेवून आपलेच लोकांस मारतात. याचें कारण "ज्ञानशून्यता."

आपले लोकांस राज्यकुशलता असती तर मुसलमान हिंदुस्थानांत शिरून हस्तिनापूर व अयोध्या, येथे नबाब, बादशहा कशास स्थापन झाले असते? तसेंच किस्येक अनर्थपात मुसलमान लोकांनी केले ते झाले नसते. परंतु हिंदु लोक अज्ञानांत बुडाले, याजमुळे त्यांचे घरचें त्यांस पहावयाची शक्ति नाहीशी झाली. हें राजेरजवाडे आहेत, त्यांचेकडे पाहिलें म्हणजे समजतें. त्यांत मुख्य तर ब्राम्हण हे पडतमूर्ख झाले आहेत. त्यांणी सर्व लोकांचा विद्या बुडविल्या आणि आपलीही हानि केली.

पत्र नं० ७३ — २ सप्टेंबर १८४९

## धर्मव्यवहारासंबंधी खोट्या समजुती

सांप्रत हिंदु लोकांमध्ये जा वेड्या समजुती आहेत त्यांचें मूळ बहुत करून हेंच आहे की, पुराणें वगैरे जे ग्रंथ आहेत त्यांत जें लिहिलें आहे त्याचा अर्थ यथास्थित व वास्तविक रीतीने कोणी समजत नाहीत व कवीचा भाव जाणत नाहीत. अर्थाचा अनर्थ करितात. याचीं उदाहरणें—

लंका सोन्याची म्हणून वर्णन केलें आहे, परन्तु त्याचा अर्थ इतकाच की, तेथील लोक द्रव्यवान् होते. केवळ तेथील भूमि व घरेंदारें सोन्याचीं होती हा अर्थ नव्हे. परंतु लोक अज्ञानी असल्यामुळे सोन्याचीच लंका होती असें समजतात व त्यांस सहाय्यभूत अलीकडील कांहीं किरकोळ कवि जे झाले, त्यांणीही खरा अर्थ काढावयाचा सोडून ते लोकांचे मताचें पोषण करीत गेले. त्याजमुळे अडाणी लोकांच्या समजुती दृढ झाल्या. अमृतराव, मोरोपन्त हेही आपले कवितेमध्ये लंका सोन्याची होती, असें वर्णन करितात. त्यापेक्षा हेंच खरें, असें लोक म्हणतात. कोठे पुराणांत असें लिहिलें आहे की, कलियुगांत भूमि मृत्तिकारूप आहे, तशी पूर्वी नव्हती. मागे कृतयुगीं सुवर्णाची भूमि व त्रेतायुगीं रुप्याची भूमि व द्वापारांत ताम्रभूमि होती; परन्तु याचा अर्थ इतकाच घ्यावयाचा की, त्या त्या काळीं कवींच्या मतें लोक त्या मानाने सुखी व धनवान होते. केवळ सोन्याचीच भूमि होती, असें नव्हे. सारासार विचार पहावा, तो पहात नाहीत आणि पुराणिकही वेड लावण्याजोगे अर्थ करून सांगतात. त्याजमुळे खरेखुरेच लोक वेडे झाले आहेत.

शास्त्रांत पाहिलें तर ठीक आहे. व त्याचे हेतु व त्या वेळची व्यवस्था व काळ पाहून निर्णय केला पाहिजे. तेव्हा ब्राम्हण हे रानांत रहात होते. त्या समयीं त्यांस जोडे घाले असें लिहिलें आहे, तें ठीक आहे; कारण की

## ब्राम्हण आळसाचे सागर !

सर्व काम सोडून विद्या करण्याकरिता रानांत ते जाऊन बसतात, त्यांचें चाळविणें अवश्य आहे. आणि असे ब्राम्हण होते त्या काळीं इच्छाभोजन, गृहदान, वर्षभर दाणापाणी व अर्घ्यपादप्रक्षालन हें सर्व ठीक होतें. कारण की, ब्राम्हणांमध्ये कोणास अन्न मिळत नव्हतें, तेव्हा शहरचे व्यापारी, उदमी व राज्यकर्ते यांणी जर त्यांस न द्यावें, तर त्यांचें कसें चालेल ? परंतु ते ब्राम्हण कसे होते की, व्यासासारिखे, जांणी अठरा अठरा पुराणें लिहिलीं. केवढा त्यांचा उद्योग म्हणावा ? किती एक ग्रंथ केले ! वेदाचा शोध लावून ते एकत्र जमाविले ! शाळा घातल्या ! व ज्ञानवृद्धि केली ! असो. ती ज्ञानवृद्धि बरी कीं वाईट, परंतु त्या काळीं बरी होती. कारण त्या काळीं लोक अगदी मूर्ख होते. म्हणून नाना प्रकारचे धर्म कोणीकडून ब्राम्हणांचें चालावें आणि विद्यावृद्धि सदोदित व्हावी, ही तजवीज त्यांणी केली.

परंतु जेव्हा ब्राम्हणांस समजलें की, आम्हांस द्यावें हा धर्म सर्व लोकांस कळला; आणि त्याचा हेतु सर्व लोक विसरले, हें पाहून ते रानांतून उठोन गावांत आले. व पोथ्या बांधून ठेवूं लागले. व वेद पाठ करूं लागले. अर्थ टाकला व पशूसारखे झाले. परन्तु आता लोकांनी पहावें की, अशा ब्राम्हण लोकांस पैसा देण्यास योग्य नाही. हे आळसाचे सागर आणि अज्ञानाचे रक्षक झाले. कारण अज्ञान टाकून त्यांचा परिणाम नाही. जर अज्ञान मोडावें तर त्यांचा पैका बुडतो. व ते उपाशी मरतात. व त्यांस सरकारची उपजीविका कांही नाही. याजमुळे त्यांस हें मूर्खपण रक्षण करणें जरूर झालें. परन्तु लोकांचे डोळे उघडून वास्तविक दान कोणतें तें समजतील, तेव्हा भटांचा थोरपणा सहज मोडेल. परंतु बहुत लोक अद्यापि भटांचे नादीं लागले आहेत. व पाठ म्हणण्याकडे द्रव्य जातें तें व्यर्थ जातें, त्याचा उपयोग होत नाही, याजकरिता विचार करून पहावा. व शास्त्रांत जरी कांही लिहिलें असलें तरी त्याचा हेतु व शास्त्र करणाराचा मानस जाणावा म्हणजे ठीक होतें. केवळ शब्द घेऊं नये, म्हणजे उघड सर्व दिसूं लागेल व लोक ताळ्यावर येतील.

## धर्मव्यवहारासंबंधी खोट्या समजुती

कोणती मूर्खपणाची गोष्ट असो, परंतु त्यांत दोन पैसे जर भटास मिळण्याचे असतील तर त्यास अनुकूल होण्यास भट आळस करीत नाहीत. व गृहस्थ बोलून चालून मूर्ख म्हणवितात. वास्तविकच आहे की, त्यास कांही समजत नाही. व वाचतांदेखील येत नाही. मग विचार करावयाचें दूरच आहे. याजकरिता भट हे अगदी नाहींसे झाले पाहिजेत. व गृहस्थांनी व इतर जातींचे लोकांनी भटांचा नाद सोडून द्यावा. परंतु त्यांस ज्ञान आल्याखेरीज हें होणार नाही. त्यास कांही काळ पाहिजे.

मोठी अविचारी म्हटली म्हणजे सांप्रत भट मण्डळी आहे. त्यांस कांही ठाऊक नसलें तरी ते होय म्हणतात. व इंग्रज लोकांचें राज्य लंकेत आहे असें म्हटलें तर खोटें म्हणतात. व पुराणांतील उदाहरणें दाखवून समाधान करितात. आपला गर्व सोडीत नाहीत. आपल्यास पूर्वीच्या विश्वामित्र-जमदग्नीच्या तुळणा देतात. याजमुळे अनाडी लोक फारच भितात. आणि भटांचा आशीर्वाद हें मोठें उत्तम नाणें समजतात व त्यास मोल देऊन तें खरेदी करतात. जर कोणी मेला तर जसे गयावळ यांणी 'सरक भयो'+ म्हटल्याखेरीज मुक्ति होत नाही अशी समजूत आहे, तद्वत् भटांचेंही माहात्म्य आहे.

भट जेवल्याखेरीज कोणतीही गोष्ट पुरती होत नाही. जन्म, मरण, लग्न इत्यादि सर्वांस भट पाहिजेत. व ते नसतील तर अडाणी म्हणतात की, अमका मेला पण भटांच्या तोंडांत घास पडला नाही. असें समजून प्रयत्न करून खर्च करितात. म्हणून हीं मोठालीं श्राद्धें व गयावर्जनें होतात. परंतु लोकांस असें वाटत नाही की, जो मेला त्याणे जें कर्म बरेंवाईट केलें असेल, त्याप्रमाणे त्यास ईश्वर फळ देईल. मग त्यास गयेचें माहात्म्य काय ! गयेस मोक्ष होतो तर तेथे गेल्याने तरी सुटका नाही. तेथील गयावळ यांणी मोक्षाची परवानगी दिली पाहिजे. आणि मनुष्यास तें खरेंच वाटतें. म्हणून गयावळाचा सन्तोष करावयाकरिता हजारों रुपये देतात, व तेही लुटून

+ सरक भयो = स्वरग भयो – स्वर्गास गेला.

घेण्यास कमी करीत नाहीत.

परंतु कोणी असें समजत नाही की, एक माणसाचे म्हटल्याने दुसरे माणसास मुक्ति कशी होईल ? व हे कोण ? त्यांची आमची गति एक ! मग त्यांचे तोंडचें म्हटल्याने काय होतें ? परंतु हा सर्व मूर्खपणा आहे. भटांनी सर्वांस मोह घातला आहे व अज्ञानपाशाने बांधलें आहे. ते ज्ञान आल्यावाचून सुटणार नाहीत.

---

पत्र नं ७६ २३ सप्टेंबर १८४९

## मद्य पान

अलीकडे इंग्रजी राज्य झाल्यापासून लोकांस सद्गुण लागावयाचे, तें एकीकडे राहून, महान् भयंकर व त्वरित वृद्धि पावणारा असा एक दुर्गुण लोकांमध्ये प्रगट झाला आहे. तो कोणता म्हणाल तर दारू पिणें. पहा की, पूर्वीचे राज्यांत दारू कोणी पीत नव्हतें व उत्पन्नही कोणी करीत नव्हते. ब्राम्हण व मराठे राज्य करणारे. तेव्हा ते दारू उत्पन्न करणारास नीच मानीत आणि कोणी आपलीं झाडें त्यांजला दारू करण्यास दिलीं तर त्यांस बहिष्कृत करीत. आणि कोंकणांत अशी चाल होती की, दारू करणारा हातांत दारू घेऊन जर अंगावरून गेला, तर दर्शनदोषास्तव स्नान करीत. आणि दारू प्यालेला ब्राम्हण कधी आढळत नव्हता. जर कदाचित् कधी कोणी पाहिला तर लोक त्यास निंद्य मानून कधीही जातींत घेत नव्हते व ज्या गावांत तो रहात असे, तेथे त्याचे हाल फार होत असत. त्याचें लग्नकार्य व्हावयाचें नाही व कोणी त्याजकडे जेवावयास जात नव्हते. असा त्याचा धिःकार करीत असत. व जर कोणी अतिशूद्रादिकाकरिता दुकान घातलें तर एकीकडे छपवून चोरून घाली. परंतु तेथे कोणी बहुतकरून जात नव्हता. व भाविक लोक त्या रस्त्याने जात येत नव्हते व सरकार

अशा व्यापाऱ्यांपासून उत्पन्नाची आशा कधी करीत नव्हते. म्हणून लोकांस मना करतां येत होते.

परंतु हल्लीचे सरकारची फार विपरीत वर्तणूक आहे. सप्टेंबरचे दहावे तारखेचे पुण्याचे "ज्ञानप्रकाशांत" सरकाराविषयी एक कलम लिहिलें आहे व त्यांस दृष्टांत तेल्याचा दिला आहे, तो खरा दिसतो. पहा की, सरकार लोकांच्या स्थितीकडे किमपि पहात नाही. द्रव्याची आशा धरून दुर्गुणावर उत्पन्न करितात आणि प्रसिद्धपणें दुर्गुण वाढूं देतात. जर त्यांनी उत्पन्न सोडलें, तर त्यांस मनाई करण्यास तोंड होईल, व जर उत्पन्न करतील तर त्यांस दुर्गुण बंद करण्यास तोंड नाही. कारण की, एका हाताने दारूची विक्रीचिठी देतील, आणि दुसरे हाताने लोकांस पिऊं देऊं नका, म्हणून सांगतील, हें नांदणार नाही. यास्तव त्यांणी उत्पन्न सोडून दिलें पाहिजे; म्हणजे त्यांचा दाब बसेल आणि मनाईकरिता कायदे करतां येतील. याप्रमाणे विलायतेंतही कायदे झाले आहेत. मग या देशांत सरकारने असें करण्याचा हेतु कोणता?

अद्याप हा दुर्गुण लोकांमध्ये विस्तीर्ण व दृढ झाला नाही, तोंपर्यंत सहज मोडतां येईल. नाही तर जर सरकारने अशीच वर्तणूक आणखी कित्येक वर्षांपर्यंत चालविली, तर अवघड पडेल. यास्तव हें त्वरित झालें पाहिजे. मद्यपान करणें, हें फार वाईट कर्म आहे. येणेंकरून द्रव्य, शक्ति, बुद्धि हीं नाशाप्रत पावतात. ज्या गावीं दारूचीं दुकानें आहेत तेथील लोक किती खराब झाले असतात. व विलायतेंतही असेंच आहे. ज्या ठिकाणीं दारूचीं दुकानें आहेत त्याचे शेजारीं रहाणारे लोकांस दुर्गुण लागून ते सर्वस्व घालवून बसतात आणि भिकारपण येतें. त्यांचीं पोरेंबाळें उपाशी मरतात. व जें मेहनत करून मिळवितात तें पुरेनासें होतें. कारण या दुर्गुणास व्यर्थ पैसा बहुत खर्च करावा लागतो. यास्तव सर्व पैसा इकडे जातो. आणि करमत नाहीसें होतें. अखेरीस दारू पिणाराची बुद्धि मंद होती, आळस वाढतो, काम होत नाही आणि सर्व प्रकारें त्याची हानि होते. याप्रमाणे

किती एक लोक हल्ली होत चालले आहेत.

सामान्यतः लक्षांत आणा की, इंग्रज लोक उद्योगी मोठे आहेत; परंतु त्यांची बुद्धि हिंदु लोकांइतकी नाही. त्यांस बारीक गोष्टी व अवघड गोष्टी यांची समजूत होत नाही, हें जे इकडे इंग्रज लोक कामावर येतात, त्यांचे वर्तणुकीवरून समजतें. आणि हिंदु लोक ब्राम्हण वगैरे यांची बुद्धि बहुत जलद व समज चांगला. परंतु आळसानें व्यर्थ गेला. व सुशिक्षा नाही, येणेंकरून चांगली बुद्धि वाईट कामाकडे लावतात. परंतु तसे इंग्रज लोक नाहीत. त्यांस लहानपणापासून शिक्षा चांगली असते. याजकरितां ते विद्ये-मध्ये निपुण असतात व उद्योगाने परिपूर्ण असतात.

तथापि ही गोष्ट खचित आहे की, इंग्रज लोकांचे बुद्धीस मंदपणा असतो. याचें कारण दुसरें कांही नाही. दारू वगैरे मादक पदार्थ भक्षण करितात, येणेंकरून त्यांचे बुद्धीस जरा येते. आणि जेव्हा एखादा मुकद्दमा सोपा असतो व त्यांत कांही तकार नाही असते, तेव्हा तो त्यांस समजतो. परंतु जो मुकद्दमा तकारीचा असतो व ज्यांत बहुत घोटाळा असतो, तो किती जरी समजाविला, तरी समजत नाहीत. मग न समजतांच हुकूम देतात, हें आम्ही नित्य पहातों व असेंच सर्व ठिकाणीं आहे. इंग्रज लोक बारीक कज्जे व तकारी सर्व बरोबर समजणारे क्वचित आहेत. आणि असले तरी त्यांस बुद्धि नीट ठेवावी लागते. फार श्रम होत नाहीत. दरम्यान हवा बदलून आराम विश्रांती घेतात, तेव्हा पुनः बुद्धि ताळयावर येते आणि त्यांस कामकाज सुचतें.

परंतु हें आमच्या लोकांस नको. हे पन्नास वर्षें सारखें काम करीत असले तरी त्यास बुद्धि ताळयावर आणावी लागत नाही. व नाना फडणीस वगैरे मेहनती लोक होते ते एक दिवस ही कामाखेरीज बसले नाहीत. याचें कारण हेंच की, आमचें अन्न निर्मळ आणि इंग्रज लोकांचें अन्न बुद्धि मंद करणारें जड आहे. परंतु त्यांचे देशची हवा शीतळ आहे. याजमुळे ते उद्योगी असतात. आमचे देशांत हवा उष्ण. येणेंकरून लोक आळशी आहेत.

ते जर मद्यमांस खाऊं लागले, तर फारच आळशी होतील.

दारूसारखा दुष्ट पदार्थ दुसरा नाही. व या पदार्थाचें व्यसन मोठें बलाढ्य आहे. एकदा लागलें, तर सुटत नाही. व सर्वस्वीं गेलें आणि सर्वांचा नाश झाला, तरी कांही सुचत नाही. हें व्यसन मोठें घातकी आहे. यास्तव शासन नेमून याजपासून लोक परावृत्त केले पाहिजेत. परंतु हें दारू पिणारांचेच राज्यांत होईल काय ? अस्तु. व्हावें हें चांगलें. ते आपण स्वतः दारू पितात. परंतु टाकतील तर त्यांसही चांगलें आहे. आमचे लोकांस हें व्यसन न लागावें इतकें तरी त्यांनीं केलें पाहिजे. जरी आज ते उत्पन्नावर व लोभावर दृष्टि देत असतील, तरी हें करणें सरकारास योग्य नाही. कारण आज थोडें उत्पन्न होईल. परंतु लोक जर भिकारी झाले आणि दरिद्री होऊन कांही उपयोगी नाहीत असे झाले, तर मग सरकार त्यांजपासून काय घेईल? सरकाराची मातोश्री लोक आहेत. त्यास त्यांजला रोगी, आळशी, अशक्त करून मग त्यांचे पोरांचें पोषण कसें होईल ? याजकरिता या बाबदचें उत्पन्न सरकारनें अगदी सोडून मनाई करावी म्हणजे लोक जगतील. नाही तर या सरकाराखाली जी रयत आहे, तीस हें व्यसन कधी सुटावयाचें नाही व इंग्रज लोक या देशांतून गेले तरी इकडे या लोकांत हें व्यसन राहून त्यांचे पाय इकडे लागले होते, हें स्मरण इतिहासांतच राहील असें नाही; परंतु प्रत्यक्ष लोकांचे स्थितींत राहील. याजकरिता हा बदलौकिक करणारे उत्पन्नाची बाब सोडून देतील, तर चांगलें होईल.

ही गोष्ट आमचे मूर्ख लोक आहेत त्यांस ठाऊक नाही. व त्यांनी दारू पिण्यापासून अनर्थ काय आहेत, तें पाहिलें नाही. परंतु हें जर कांही दिवस चाललें, तर लवकरच पहातील. सांप्रत लोक हौसेने दारू पितात व तिचे गुण वर्णितात; ते असे की, ही बळ आणणारी आहे. कोणी म्हणतात की, ही रोगनाशक आहे. कोणी म्हणतात की, यज्ञांतदेखील सुरापान आहे. कोणी म्हणतात तंत्रशास्त्रप्रमाणे ही शुद्ध आहे. याप्रमाणे म्हणून

हल्लीचे पंडित, शास्त्री व गृहस्थ पुण्यांत व इतर ठिकाणीं निर्लज्जपणाने दारू पितात. शूद्रादिक पितात हें सोडून द्या. परंतु प्रत्यक्ष ब्राम्हण व शास्त्री-देखील शाक्त होऊन कुकर्म करतात. दारू व मांस खावयास मिळावें, म्हणून शाक्त होतात आणि पूजेचें निमित्त करून मनास वाटेल तितकी दारू पितात.

ब्राम्हण लोकांचें मुख्य शहर पुणें आहे. तेथे ब्राम्हांस पक्केपणीं समजलें आहे की, शास्त्री, पंडित व गृहस्थ मिळून पांचशे असामी दारू पिणारे आहेत. त्यांतील किती एक मस्त होऊन रस्त्यावर पडतात. किती एक चोरून आपले घरीं यंत्रें ठेऊन दारू काढतात. व गूळ किंवा सांवूळ कुजवून भट्टया घरीं लावतात आणि लाल तांबडे डोळे करून, कपाळीं तांबडा शेंदूर किंवा कुंकवाचे टिपके लावून प्रसिद्धपणाने फिरतात. व तोंडास घाण येतच असते; तसेंच तोंड धरून लोकांत येतात. परंतु कोणी त्यांस बहिष्कृत करीत नाहीत. याजवरून ब्राम्हण लोक अतिशूद्राचे योग्यतेबरोबर आले आहेत किंवा नाहीत, तें पहावें. जे ब्राम्हण अशीं कर्में करतात, ते ब्राम्हण म्हणावे कीं काय ?

ब्राम्हण लोकांची नीति बुडाली; व त्यांस चांगलें कोणतें व वाईट कोणतें हें कळत नाही, व चांगल्याचा प्रयत्न करून त्याची स्थापना करावयाची हें त्यांस ज्ञान नाही. यास उदाहरण, बाजीराव राज्यावर होता तेव्हा जे त्याचे अंकित होते, त्यांच्या स्त्रिया त्याने भ्रष्ट करून नाना प्रकारची कुनीति केली. परंतु त्यास प्रतिकार कोणाच्याने करवला नाही. पुण्यांत शास्त्री व पंडित त्या वेळेस बहुत होते, परंतु साखरभात खाऊन 'वाहावा' म्हणत गेले. याप्रमाणे त्या मूर्ख, चांडाळ, दुष्ट व अतिशूद्राहूनही नीच प्रभूस राज्यावर भटांनी व गृहस्थांनी रक्षण केला. त्याचे परिणाम आज सर्वांस त्यांतून बहुधा ब्राम्हणांस प्राप्त झाले आहेत.

त्यावेळेस तो अधिकारी होता, म्हणून कोणाचा उपाय चालला नाही, असें जर म्हणतील, तर हल्ली जे शाक्त पुण्यांत आहेत, हे कांही अधिकारी नाहीत. कोणी द्रव्यवान आहेत खरे, पण त्यांचें पारिपत्य बाकीचे सर्व ब्राम्हण

मिळून कां करीत नाहीत ? हा माझा प्रश्न सर्वांस आहे. जे दारू पीत नाहीत, त्यांनी हा विचार करावा. दारू पिणारे प्रसिद्ध आहेत व सर्वांस ठाऊक आहेत. व पिणारे आहेत त्यांचें तोंडच साक्ष देईल. ते फार नाहीत. त्यांचे पंक्तीस जेवणें, त्यांचे घरीं जाणें, सोयरगत करणें हें का चालू देतात ? एकदम त्यांस बहिष्कार घालीत नाहीत. परन्तु हतवीर्य हे ब्राम्हण, यांस ज्ञान नाही, शक्ति नाही, नीति कोणती, अनीति कोणती हें जाणत नाहीत. आणि निर्लज्जपणाने दारू पिणारांचा सहवास करतात. कोणी भिक्षुक म्हणून करतात, कोणी चाकर म्हणून, कोणी स्नेही म्हणून, कोणी मित्र म्हणून, कोणी मूर्ख म्हणून करितात.

जर त्यांस जातीचें भय किंवा बहुत लोक नीतिमान आहेत; त्यांजपासून भय प्राप्त होईल, तर या सर्वांमध्ये आपण निंद्य आहों, असें वाटेल. स्वस्थपणाने दारू पितात, त्यांचे तोंडाची घाण सर्व लोक घेत फिरतात. हें धर्मशास्त्रास केवढें विपरीत आहे ? तंत्रशास्त्र व शाक्तमत हें नरकाचें द्वार आहे व या मताचे लोक नरकांत जातील, यांत संशय नाही. व या मताचा पोथ्या कोणी केल्या असतील त्या असोत; परन्तु ते उत्तम पुरुष नव्हते; व त्या सर्व पोथ्या उकिरड्यवर टाकण्याचा लायक आहेत; यास्तव ये विषयीं लोकांनी सावध व्हावें.

---

पत्र नं० ८० ४ नोव्हेंबर १८४९

## कमती कशाची ?

आमचे लोकांची अद्याप अशी खात्री झाली नाही की, आम्ही मूर्ख आहों, आम्हांस विद्या नाही, आम्हांस ज्ञान नाही, आम्हांस कांही कळत नाही, आम्ही गुणाने रिकामे झालों, आपल्या समजुती फार वाकड्या आहेत.

आम्हांस स्वदेशाची, पृथ्वीची, व्यापाराची, व कलाकौशल्याची माहितगारी नाही, आम्हांस सावधपणा नाही; आमच्या समजुती प्राचीन काळचे ग्रंथांचे आधाराने जा पडल्या आहेत, त्या उपयोगी नाहीत; पुराणें वगैरे पोथ्यांत वेड लागावयाच्या गोष्टी पुष्कळ आहेत, त्यांपासून भलतींच मतें उत्पन्न झालीं. आमच्या रीति व चाली वाईट आहेत, आमच्या स्त्रिया अज्ञान आहेत. जोंपर्यंत आम्ही आपल्या देशांत बायकांस शहाण्या करणार नाही, तोंपर्यंत आम्ही मूर्ख राहूं. कारण की, बायकांचे हातीं प्रथम मुलास रीतभात लावणें आहे. तेथेच जर बिबा पडला, तर पुढे सुधारत नाही. लहानपणीं जी बुद्धि ती शेवटपर्यंत रहाते. याजकरिता बायका शहाण्या पाहिजेत. म्हणजे मुलेंही नीट होतात. आणि नवऱ्यास वगैरे स्वकीयांस सुख होतें. आणि आळशी सोड्या सोडल्या पाहिजेत.

भट वगैरे मूर्ख लोकांस फारसा आधार देऊं नये. भट हे जरी अज्ञान आणि मूर्ख आहेत, तरी त्यांस एकदम अन्न घालूं नये; असें मी इच्छीत नाही. परन्तु त्यांस त्यांचें अज्ञान माहीत करावें. भटाची उत्पत्ति मोडावी, वाचण्याकडे लक्ष द्यावें, विद्येचें मूळ वाचणें आहे, याचा विचार करावा. गर्विष्ठपणाने ब्राम्हण लोक बहुधा फुगलेले असतात, तसे असूं नयेत. या सर्व गोष्टी जरी खऱ्या आहेत, तरी अद्याप हिंदु लोकांत या गोष्टी खऱ्या म्हणणारे व मानणारे थोडेच आहेत. व मागील म्हाताऱ्यांमध्ये तर अगदीच मिळणार नाहीत. ते सर्व अगदीच मूर्ख, व त्यांस सुधारणें हें अगदीच उपयोगी नाही. ते मेल्याशिवाय त्यांची हरकत दूर व्हावयाची नाही.

परंतु जे पुढे होतकरू लोक आहेत त्यांणी मनांत आणावें की, वृद्ध व म्हातारे यांच्या समजुती आपण घेऊं नयेत. आपण विद्येचे शोधास लागून खरें कोणतें व खोटें कोणतें तें काढावें; पृथ्वीचा शोध करावा; राज्याचा शोध करावा. तें सोडून ब्राम्हण लोक वगैरे असे आळशी आहेत की, ते विपरीत व विलक्षण गोष्टी सांगत बसतात. कोणी रूमच्या, कोणी चीराज्याच्या, कोणी रावणाचे तपश्चर्येच्या, कोणी कृष्णाच्या, कोणी कुंभ–

निशुंभ दैत्यांच्या गोष्टी सांगतात. पण अशा गोष्टींपासून काय फायदा होणार आहे ?

जा कल्याणाच्या गोष्टी आहेत, त्या पाहून नंतर हीं पुराणें वाचून टाकिलीं तर चिंता नाही. परंतु सर्व काळ त्यांत काय आहे ? खोट्या गोष्टी म्हणजे चवदा रत्नें व सात समुद्र असें मानणें, हा केवळ मूर्खपणा आहे. मूर्खपणांत दिवस घालवून परिणाम काय ? या गोष्टी इसापनीतींतील गोष्टीप्रमाणे समजून, वाचल्या तर वाचल्या, नाही तर नाही. मुख्य व वास्तविक जें ज्ञान त्याचा शोध करून तें शिकलें पाहिजे. पंचम स्कंधांतील भूगोल काढून काय उपयोग ? पुराणिकास तांदूळ मिळतात, म्हणून तो काढतो. परंतु आता या चुका पुरे झाल्या. या चुकांनी लोकांस भ्रांति पडून लोक पृथ्वीचें खरें वर्णन ऐकत नाहीत, इतकी दृढ भ्रांति पडली आहे.

याजकरिता या भ्रांतींतून काढण्यास प्रयत्न करावा. व खरी पृथ्वी कशी आहे हें पहावें, व देशांतर करावें; बखरी लिहून आणून त्या छापून लोकांत प्रसिद्ध कराव्या. म्हणजे पाहून आलेल्यांचें वर्तमान लोक खरें मानून पुराणांत खोटें लिहिलें आहे, असें समजतील. या प्रकारचा यत्न श्रीमंत लोकांनी करून या लोकांस अज्ञानांधःकारांतून काढलें पाहिजे. आपले लोक केवळ मूर्ख झाले आहेत; राज्यरीति व धर्मनीति, व कर्मनीति हीं कांहीच समजत नाहीत. भट, पंडित व ब्राम्हण हे त्यांचे पदरीं मूर्ख-शिरोमणी असतात; ते नाना प्रकारचे वेडेचार समजावितात. फक्त पुराणांवर भरवसा ठेवून खरें मानतात, याजकरिता प्रत्यक्ष शोध पहावा.

या लोकांनी असें केल्याशिवाय, व ब्राम्हणांचा नाद सोडल्याशिवाय यांस धडगती लागणार नाही. श्राद्ध केलें म्हणजे बाप तृप्त होतो म्हणून मनापासून खपतात. व बायकांस तर असें वाटतें की, ब्राम्हण जेवतात हे प्रत्यक्ष पितरच आहेत. वृषोत्सर्ग केला म्हणजे मोक्ष होतो. उसाची नाव केली म्हणजे जो मरतो त्याचे ती उपयोगी पडते. या प्रकारचीं ब्राम्हणांचीं फायद्याचीं कर्में आहेत. ब्राम्हणांनी जें लिहून ठेविलें आहे त्यांत एकही

खरे नाही. हा सर्व कबाड नाद आहे. यज्ञयागदेखील ब्राम्हणानीच निर्माण केले आहेत. अज्ञाणी मनुष्य असला आणि त्याचे पिंडास कावळा शिवला नाही तर त्याचे मनास केवढी खवखव वाटते, आणि किती दुःखी होतो? याप्रमाणे मूर्खपण भरलें आहे.

पहा, जर ब्राम्हणांनी असा नेम केला की, जितकें पोथींत लिहिलें आहे तितकें तसेंच आचरण करावयाचें, तर त्या ब्राम्हणांची वर्तणूक कशी होईल की, सर्व दिवस त्यांस उद्योग व खटपट पुरवेल. दर्भ व समिधा तोडून आणाव्या आणि होम करावे. तर्पण, दगड, धोंडे नाना प्रकारच्या खटपटी संध्याकाळपर्यंत करतां करतां त्यांचा जीव थकून तो शेवटीं निजतो. याप्रमाणे जन्म घालविणारे ब्राम्हणांत अद्यापि आहेत. ते ओवळे होत नाहीत, आणि असले ब्राम्हण चांगले, म्हणून त्यांस लोक समजतात.

परंतु मी तर त्यांस मूर्ख समजतों. त्यांचे जन्माचा उपयोग काय झाला? आणि त्यांणी सार्थक काय केलें? या खटपटींपासून फायदा ईश्वरही देईल, असें वाटत नाही. दया, धर्म, लोकहित व क्षमा केली, तर मात्र सार्थक होईल. नाही तर तांदूळ शिजविले आणि भात करून तो जाळला, व दोन घटका मेहनत करून दर्भाची दोरी केली, व ती जाळून होम केला, आणि समिधा जाळून यज्ञ केला, तर फायदा कोणत्याही लोकीं होणार नाही. मला वाटतें की, ही खटपट सर्व ब्राम्हणांनी आपले महत्वाकरिता व लोकांस सोंगढोंग दिसण्याकरिता लिहिली आहे, किंवा मूर्खपणाने एकाने केली त्याजवर आणखी दोन गोष्टी चढवून दुसऱ्याने लिहिल्या, असें वाढत वाढत आजपर्यंत आलें, व त्यास मोडणारा कोणी मिळाला नाही.

क्षत्रीय वगैरे राजे होते, ते ब्राम्हणांस थोर मानीत, म्हणून ब्राम्हण पाहिजे तसें लिहीत गेले. परंतु त्याजमुळे त्यांचा व लोकांचाही नाश झाला; आणि मूर्खपणा वाढला व विद्या वादवावयाची राहिली. या लोकांनी जास्ती वाद करूं नये, म्हणून प्रयत्न करून ग्रंथ लिहिले. खोटें असलें तरी विचार

केल्याशिवाय भाव ठेवावा म्हणजे धर्म, असा मूर्खपणा सांगतात. परन्तु यांतून लवकर सुटतील, तर बरें होईल.

---

पत्र नंबर ८७ ६ जानेवारी १८५०

## एकत्र रहाण्याची चाल

आमचे लोकांमध्ये अशी चाल आहे की, कुटुंबाचे माणसांतील सर्वांनी एकत्र रहावें, यापासून लाभ किंवा विभक्त राहिल्यापासून लाभ याचा विचार केला, तर असें नजरेस येतें की, एकत्र रहाण्याची चाल बहुत काळापासून चालत आली आहे, व लोकांमध्ये तिची प्रतिष्ठा अधिक मानितात. दोघे बंधु पाहिले तर त्यांस प्रथम हा प्रश्न विचारतात की, विभक्त किंवा एकत्र आहां? एकत्र म्हटलें म्हणजे ते भले माणूस आहेत, असें समजतात.

परंतु उद्योगवृद्धि होण्यास विभक्त रहाण्याची चाल चांगली आहे. ती कशी म्हणाल, तर ऐका. एक बंधू रोजगारावर असला म्हणजे त्याचे इतर बंधु, पुतणे, चुलते, मामा, उभय पक्षांचे लोक त्याचे आसमंतात येऊन रहातात. व जरी त्यांस सामर्थ्य असलें, तरी याचे घरीं जेवतात; काळ व्यर्थ घालवितात व उद्योग कांही करीत नाहीत. बळें मूर्ख होतात व निर्लज्जपणानें अन्न खातात. यास्तव इतके लोक रिकामे बसून खाणारे निरुपयोगी असतात.

सामान्यतः श्रीमंताचे घरीं पाहिलें, तर पन्नास पानें पंक्तीस असतात. त्यांत बहुतकरून चाकर एकदोन व बाकी सर्व आप्तसंबंधी असतात. ते कांही उद्योग करीत नाहीत. घरचा एकटा जो मिळविता असतो, त्यासही त्यामध्ये थोरपणा वाटतो की, मी सर्व कुटुंबाचा स्वामी आहे. माझे घरीं सर्व

माझे कुळांतील जेवतात. मी कुटुंबवत्सल आहे आणि लोकही त्याचें वर्णन अधिक करतात. त्यास म्हणतात कीं, 'अहो अमका गृहस्थ केवढा कुटुंबी आहे! त्यास कुळदीपक म्हणावें, पहा की, ज्याचे पंक्तीस पन्नास पानें होतात.' व सरकारांत अर्जी करणें झाल्यास ही मोठी सबब लिहितात की, आम्ही कुटुंबवत्सल आहों, आमचें सरकारने चालवावें; व प्राचीन काळच्या सनदा पाहिल्या तर त्यांत हेच शब्द असतात की, "अमके भटजी, यांचें कुटुंब मोठें व यांचे कुटुंबाचें चालवल्यास श्रेयस्कर आहे, असें जाणून कुटुंबाचे योगक्षेमार्थ अमुक गाव दिला आहे." याजवरून कुटुंबाचें एकाने चालवावें व सर्वांनी उगीच बसावें, हा धर्म परंपरागत चालत आला आहे.

परंतु यापासून फार अनर्थ होतात; व आळसाची प्रवृत्ति फार होते. मागले काळीं कसें निभलें असेल तें असो; पण आम्हांस हें तर विलग व अवघड दिसतें. एकट्याने मिळवावें आणि सर्वांनी खावें आणि तो मरेल त्या दिवशीं सर्वांनी वर हात करून जावें किंवा भीक मागावी, हें अगदी वाईट आहे; आणि असे बहुत लोक भट वगैरे आढळतात. त्यांस जर प्रश्न केला की, 'तुम्ही इतके दिवस काय केलें?' तर ते उत्तर देतात की, 'काय करावें? अमका गृहस्थ दैवशाली होता, सर्व कुटुंबाचा योगक्षेम तो करीत असे, त्याचे घरीं आज पन्नास वर्षें सुखेंकरून भोजन केलें, आता तो मेला, तेव्हापासून कोठे उभें रहावयास थारा नाही. शंभर मनुष्यांचें अन्न गेलें. त्याचे पदरीं बहुत लोक असत व बहुतांचें तो चालवी. आता आम्हांस कांही आधार नाही.' अशी चाल या लोकांची पडली आहे.

प्रत्येक श्रीमंताचे पाठीमागे निरुपयोगी लोक शेकडों असतात व त्यांत जहागिरदार वगैरे असले, तर त्यांजवर जशा मोहोळांवर माशा बसतात त्याप्रमाणे आळशी लोक बसतात. किती एक आप्त म्हणून असतात, किती एक बायकोचे भाऊ म्हणून असतात, किती एक भट, पंडित, शास्त्री यांस पंक्तीस घेऊन जेवलें म्हणजे पुण्य आहे, म्हणून हे बाळगलेले असतात. किती एक आश्रित असतात, त्यांणीं स्तुती करावी. म्हणजे महाराजांनी

म्हटलें की, "आज सूर्य पश्चिमेस उगवला." तर त्यांणी "होय" म्हणावें आणि काय ? (सुप्रयुक्त) भाषण केलें तरी, "महान् बुद्धिवान् बरें," अशी स्तुति करावी. याप्रमाणे हे लोक दुसऱ्यास वेडे करतात. असे किती एक निरुपयोगी लोक असतात.

याप्रमाणे प्रत्येक श्रीमंताचे घरीं वहिवाट असती. यांचे विरुद्ध कोणी बोलले, तर त्यांस ते म्हणतात की, 'तो त्यांच्या अन्नावर उठला.' परंतु या वाकड्या समजुती टाकून ज्याणे त्याणे उद्योग करावा, हें बरें. स्वउद्योगाने घोंगडी मिळवली तर ती लोकांच्या शालजोडीस मागे सारते. यास्तव श्रीमंतांनीही आपले पदरचे व कुटुंबाचे लोकांस शहाणे व उद्योगी करावें हें चांगलें. केवळ आपण मेलों तर बाकीच्यानी भिक्षा मागावी, अशी तजवीज आपले थोरपणाकरितां करून ठेवावी, हा थोरपणा नव्हे, हा मूर्खपणा आहे. व पदरच्या लोकांनीहीं मनांत आणावें कीं, हें चांगलें नाहीं. अस्तु.

एकत्र कुटुंबाचा असा परिणाम होतो. आता यापासून कांही लाभही आहेत. एक भाऊ अशक्त किंवा विपत्तींत असला, तर त्याचीं उघडीक पडत नाही. कार्यप्रयोजन जसें एकाचें, तसेंच दुसऱ्याचें होतें, व सांभाळ होतो. परंतु हें केवळ एकत्र राहिल्याने होतें असें नाही. विभक्त असल्यानेही हें होईल. उभयता भावांचें सौजन्य असलें म्हणजे एकमेकास विपत्ति-अनुपपत्ति-काळीं सहाय्य करतील. एकत्र असले म्हणजेच करितात असें नाही. यास्तव विभक्त असलें म्हणजे बरें. परन्तु विभक्त असून बंधुधर्म सोडूं नये. आमचे लोकांत बहुधा विभक्त असलें म्हणजे अत्यंत वैर असतें आणि वैर पडल्याशिवाय विभक्तपणा येत नाही, हें चांगलें नाही. तर विभक्त राहून एकमेकांनी सुहृद्‌भावाने रहावें व उद्योग केल्यावाचून राहूं नये, इतकेंच तात्पर्य आहे.

सांप्रत काळीं जो श्रीमंताचे घरीं परिवार असतो तो केवळ मूर्खपणास कारण आहे. आम्ही स्वतः एका श्रीमंताचे घरीं पाहिलें की, त्यांचें वय

सरासरी पंचवीस वर्षांचें होतें. त्यास जहागिर मोठी आहे. त्याचे पदरीं रोज पन्नास पानें होत होतीं. त्यांत बहुतकरून आप्तमंडळी व किती एक भट, शास्त्री, पंडित, कथेकरी व पुराणिक होते व वैद्यही होते. त्यांत वैद्य हे उपयोगी आहेत, त्यांची गोष्ट खेरीज; परंतु बाकीचे लोक केवळ आजंदी आणि यजमान जरी अक्षरशत्रु आणि मूर्खशिरोमणि होता, तरी प्रत्येक जण त्याची अतोनात स्तुति करीत होते. कोणी पंडित म्हणे, 'या पुरुषाची बुद्धि केवढी विशाळ आहे. कोणताही विषय काढिला, तरी त्यांत समजूत आहेच.' कोणी आप्त होते ते म्हणत की, 'हा मोठा या कुळांत दैवशाळी आहे. आमचे सर्वांचें आयुष्य यास होऊं. आज पन्नास-शंभर मनुष्यें याचे पदरीं आहेत. शेकडो मनुष्यें मरोत, परंतु त्यांचा पालनवाला न मरो.' अशा अनेक गोष्टींनी त्यास मूर्ख करून ठेवितात.

या गृहस्थाची अवस्था पाहून मला फार आश्चर्य वाटलें. आणि त्यांत आणखी एक चमत्कार पाहिला की, इतक्यांत किती एक जण त्यास पुनर्विवाह करण्याची मसलत देत आणि सांगत की, दुसरी बायको करावी, कारण पुत्र नाही. म्हणजे सरासरी त्यास पुरतीं पंचवीस वर्षें नव्हतीं, तों पुत्राची काळजी; व पुत्राकरिता अनुष्ठानें करीत दहा ब्राम्हण बसले होते. आणि लग्न पुनः करावयाची तयारी करणें हा केवढा मूर्खपणा आहे! अस्तु.

याप्रमाणे आमचे लोकांमध्ये प्रत्येक श्रीमंताचे घरीं हीच अवस्था आहे. व राजे वगैरे यांचे घरीं तर याहून अधिक असतें. सर्वत्र पहा की, कोठे कोणी राजा शहाणा आहे असें नाही व त्याचे पदरीं प्रधान इत्यादि असतात तेही मूर्ख. ते त्यांस विद्या शिकवीत नाहीत. व जुन्या काळच्या पुराणांतील मतें बाळगणारे व आपले ठिकाणीं विद्वान म्हणविणारे पंडित यांस पुसलें तर त्यांस विद्या माहीत नसते. जसे विक्षिप्त असतात, त्याप्रमाणे त्यांचें बोलणें. कोणी म्हणतो, पृथ्वी कमलपत्रासारखी आहे. कोणी म्हणतो, यवन हे पूर्वींपासून आहेत; परंतु त्यांस कांही देश नाही. समुद्रांत कोठे लहान जागा आहे, तेथे त्यांचा वास आहे. पृथ्वीचा अंत हिमालयाजवळ आहे. व

पृथ्वीभोवती सात बेटें आहेत. समुद्र दह्याचे व दुधाचे आहेत. इत्यादिक मूर्ख मतें शिकवून श्रीमन्तांस निरुपयोगी करतात व त्यांचे हातून लोकांस कांही एक उपयोग होत नाही; व हीं पुराणांतील मतें खोटीं आहेत, अशी खात्री लोकांची झाल्यावाचून त्यांची बुद्धि शाश्वत स्थिति पावणार नाही.

जा काळीं हीं पुराणांतील मतें व शास्त्रीपंडितांचीं मतें कल्पित कादंबरीच्या खोट्या व पोरकट गोष्टींसारखीं आहेत अशी खात्री होईल, त्या काळीं या लोकांची भ्रांति जाईल, आणि हे ताळ्यावर येतील.

---

पत्र-नं. ९१ १० मार्च १८५०

## दान-धर्म करणें

सांप्रत काळींच आमचे लोक मतिभ्रष्ट फार झाले आहेत, असें नाही. हे मुळापासून असेच आहेत; परंतु आता त्यांचा मूर्खपणा व मतिभ्रष्टपणा विशेष प्रगट मात्र झाला आहे.

पूर्वी हे लोक स्वसत्तेंत होते व आता ते परसत्तेंत गेले आहेत. पूर्वी त्यांस परदेशचे लोक भेटले नव्हते. व विशेष विद्वान् व विशेष युक्तिवान् अशा लोकांशीं त्यांची गाठ पडली नव्हती, म्हणून या देशचा मूर्खपणा विशेष उघड झाला नव्हता. जरी हे मूर्ख होते, तरी यांस हसावयास दुसरा कोणी नव्हता. एकाने ग्रहणांत चंद्रास राहू खातो असें म्हटलें तर दुसरा म्हणत असे कीं, त्याचेभोवतें लोकालोक पर्वत आहेत. यास्तव मूर्खपणा आपसांत झाकून जात होता.

पहिले काळचे राजेदेखील असे मूर्ख होते की, त्यांणी सनदा देऊन इनाम गाव करून दिले आहेत; परंतु त्याविषयीं असें त्यांचे मनांत येत नव्हतें की, या ब्राम्हणांचें चालवावें कशाकरिता? हा करितो काय? आळसांत वय घालविण्याने राजास अभीष्ट व कल्याण कसें होईल? हें

किमपि मनांत आणीत नव्हते. याप्रमाणे अन्नछत्रें, दक्षिणा व खिचडी वगैरे नाना प्रकारचीं धर्मकृत्यें करीत.

परंतु त्यांचा हेतु इतकाच की, ब्राम्हणांचें चालवावें. यामुळे ब्राम्हणांनी विद्या करणें सोडून दिलें. फुकट मिळाल्यावर श्रम कोण करितो? जुने ग्रंथ पाहून निर्वाह करूं लागले. जुनें ज्योतिष, जुनें वैद्यक, जुनें धर्मशास्त्र, हेंच संपूर्ण आहे, असें त्यांस वाटूं लागलें. राजांनी तीच प्रवृत्ति घातली, आणि ब्राम्हणांस आळशी केलें. जेवणापलीकडे त्यांस कर्तव्य राहिलेंच नाही. ब्राम्हणांचे हातून विद्यावृद्धि व्हावी व लोकांची सुधारणा व्हावी व जो वतन खातो, त्याचे हातून काम व्हावें, हें कोणाचे लक्ष्यांतच नाहीसें झालें. त्यांस सुखी ठेवावें आणि त्यांणी आशीर्वाद द्यावा, म्हणजे त्यांत सर्व आहे, असें समजूं लागले. व अद्यापि बहुतकरून अडाणी लोक हेंच समजतात. आणि या प्रकारचा धर्म करितात. उद्योगवृद्धि होण्याचा धर्म करीत नाहीत.

कोणी असा नाही की, शाळेकरिता किंवा तारवांत बसून, किंवा देशांतरास जाऊन नाना प्रकारचे पदार्थांचा व लोकांचा शोध करण्याकरिता, किंवा ग्रंथ करण्याकरिता, किंवा अमुक एक वस्त्र करण्याची वगैरे रीत आहे, ही सुधारण्याकरिता रुपये खर्च केले आहेत. असा एकही पुरुष आढळत नाही; परंतु ब्राम्हणांचीं लक्षभोजनें व सहस्रभोजनें, तशीच दक्षिणा, तशीच यात्रा, इत्यादिकांत पैसा उधळलेले लोक गावोगाव आहेत. वास्तविक पाहिलें, तर जन्मापासून भट हे धर्माचें खातात; पण करितात काय ? याचा हिशेब जर कोणीं पुसला, तर उत्तर नाही. पूर्वी अहिल्याबाईसारखीं धर्मकृत्यें करणारी झाली, तरी तिणें धर्म केला तो व्यर्थ गेला. तिणे आपले ज्ञानाप्रमाणे उत्तम केलें आणि तिला जें चांगलें वाटत होतें व तिच्या देशांत जे मोठे शहाणे होते, त्यांचे अनुमत पडावयाजोगें तिणें सर्व केलें. जें तिला ठाऊक नाही, तें होईल कोठून ? असो.

आम्ही तिला शब्द लावीत नाही. परंतु आजपासून पुढे धर्म करावयाचा तो असाच करावा कीं काय ? एवढें आम्हांस तात्पर्य कळविलें पाहिजे. हें लोक समजावयास लागतील तर बरें, व जितकें लवकर समजतील तितकें चांगलें. जो तो धर्म करण्याची इच्छा बाळगितो व हिंदु लोकांप्रमाणे धर्मावर दुसरे लोकांचें चित्त नाही. यास्तव विशेषेंकरून आम्हांस त्यांचे लक्ष्यांत ही गोष्ट आणून दिली पाहिजे की, ते ज्या गोष्टीस धर्म म्हणतात, तो धर्म खरा आहे कीं नाही ? अशा प्रकारचा दानधर्म केल्यास ईश्वराजवळ पसंत पडेल कीं काय ?

आम्हांस वाटतें की, मूर्खपणाचा धर्म कदापि भगवंतास मान्य होणार नाही. धर्मांच्या रीति दोन आहेत. एक गरिबास त्याचे शरिराचे रक्षणार्थ व सुखाकरिता धर्म द्यावा. दुसरा, ज्ञानवृद्धि होण्याकरिता व लोकांस बोध होऊन मन सुधारण्याकरिता धर्म द्यावा. या दोन प्रकारांतून कोणत्या प्रकारांत हिंदूंचा धर्म आहे बरें ? कोणी म्हणतील की, भटास आम्ही जेवावयास घातलें, तर त्यांचे शरिरास सुख होतें. म्हणून हा पहिल्या प्रकारचा धर्म झाला; परंतु तसें नाही. पहिल्या प्रकारच्या धर्मास पात्र कोण, याचा विचार केला पाहिजे. शरिराचें पोषणाकरिता धर्म करणें याजवर गरीब व व्यंग यांवाचून कोणाचा दावा नाही. व त्यांमध्ये जाति, नियम वगैरे कांही अडचण असूं नये. व दुसरे प्रकारचा धर्म जो आहे, तो विद्वानांस मात्र करावा व त्यांस कोणतेही प्रकारची काळजी न ठेवितां त्यांणी लोकांस ज्ञान सांगावें व लोकांस शहाणे करावें. या प्रकारचे पंतोजी वगैरे धर्माध्यक्ष व उपदेशक वगैरे सर्व यास पात्र आहेत.

तेव्हा असा धर्म करण्यास भट व पंडित हे पात्र आहेत कीं काय ? यांस पहिल्या प्रकारचा धर्म करावा, तर हे आंधळे, लंगडे, पांगळे नाहीत. व दुसऱ्या प्रकारचा धर्म करावा, तर यांची योग्यता दुसऱ्यांस शहाणे करण्याची नाही. व यांस कांही स्वतः समजत नाही; हे दुसऱ्यास कसे शिकवितील ? यांस धर्म कळतच नाही. सोदे, लबाड, भडवे, आर्जवी,

कुटाळ असतात, त्यांच्याहूनही यांची वर्तणूक बरी नसते, हें सर्वांस प्रसिद्ध आहे. भट हे गृहस्थांचे घरीं सर्व वाईट कामें करितातच. तसेच शास्त्री, पंडित आहेत. यांच्या वर्तणुकी बाजीरावाने वाईट कर्म करून उघड केल्या. तेव्हा यांस धर्म केल्याने हा धर्म कोणत्या प्रकारचा होईल ?

अलीकडे एकाने काशीयात्रेस जातांना लाख रुपयांचे जिन्नस, पवित्रकें, नथा वगैरे सुवासिनींस व भटांस वाटावयाकरिता खरेदी करून बरोबर नेलें, व याप्रमाणे सर्व धनवान् करतात, व लाखो रुपये विष्णुपदावर × घालतात; व गयावळांस देतात, परंतु हा धर्म होतो कीं काय ? आळसाची मात्र वृद्धि होत्ये. यापासून फळ काय होतें, तें मला समजत नाही. जन्मापासून असे मूर्ख व अज्ञानाने अंधळे लोकांपासून पैसा काढून त्याजवर निर्वाह, कांही एक काम न करतां, करणारे हे भट व शास्त्री यांस आणखीं पैका दिला, तरी त्यांच्या पूर्वीच्या खोडी जातील काय ? त्यांनी काम करावें, उद्योग, प्रयत्न व लोकांची सुधारणा करावी, हें जरूर आहे. हें कदापि समजणार नाहीत. इंग्रजी राज्यांत असा धर्म बहुत श्रीमंत लोक कमी झाल्यामुळे बंद जहाला; यास्तव इंग्रज लोकांस ब्राम्हण लोक वाईट म्हणतात; त्यांस दुसरें कांही समजत नाही.

स्वसत्ता गेली व स्वराज्य गेलें. हें आपले देशांतील सर्व लोकांस अनिष्ट आहे, इत्यादि स्वदेशाभिमानाच्या गोष्टी त्यांस ठाऊक नाहीत. त्यांस जेवायास मिळालें, म्हणजे कोणीही राज्य करीत असले, तरी चिंता नाही; त्याची स्तुति करतील; असे हे ब्राम्हण स्वार्थतत्पर आहेत. स्वदेशाचे इतर जातींचे लोकांविषयी त्यांचे मनांत कांही येत नाही. फक्त आपलें जेवण व मान कमी जहाला, एवढ्याचेंच त्यांस दुःख आहे. व बाजीरावाने इतकें वाईट केलें, तरी त्यास ते अद्याप चांगला म्हणतात, त्याची स्तुति करतात व त्यास धर्मप्रभु म्हणतात. तस्मात् या ब्राम्हणांच्या समजुती किती बदलल्या पाहिजेत ! अस्तु.

× गयेंत 'विष्णुपद' आहे. तेथे श्राद्ध केलें म्हणजे कृत्यकृत्यता वाटते.

## दान-धर्म करणें

आमची सर्व लोकांस विनंती आहे की, आपली प्रतिष्ठा या मान-रूपी भटांमध्ये मिरविण्याकरिता त्यांस कदापि धर्म करूं नये. जो धर्म कराल, त्यास सत्पात्र आहे, असें पूर्वी लक्ष्यांत आणा. एक अगदी भिकारी, दरिद्री, लंगडा, पांगळा, रोगादिक प्रारब्धाचे योगाने भिकारी झालेला आणि जर त्याचा कांही उपाय चालत नाही, तर त्यास आसरा द्या. आणि दुसरे, जे पुस्तकें लिहितील व लोकांस शहाणे करण्यास मेहनत करतील व जे वर्तमानपत्रें व ग्रंथ इत्यादि उपयोगी वस्तु छापून प्रगट करतील, त्यांस तुम्ही मोठे विद्वान् व लोकांचे हितकर्ते समजून त्यांस सत्पात्र जाणून धर्म करा; व त्यांचे ग्रंथ घेऊन लोकांमध्ये वाटा व हींच वायनें समजा; तींच संक्रातीचीं तिळपात्रें, श्रावणीचीं दीपदानें, माघस्नानाचीं संपूर्णें, चातुर्मासाचीं संपूर्णें, व तुळशी आणि लाखोल्या त्याच समजा. ज्ञानवृद्धींत पुण्य आहे, असें माना.

लाखो लोक अज्ञानी स्थितींत आहेत, त्यांस कांहीही कळत नाही. त्यांस ज्ञानी करण्यापेक्षा दुसरा योग्य धर्म कोणता ? यास्तव मरतेसमयीं देऊळ बांधावयास सांगूं नका; पण नवे छापखाने व नवी पुस्तकें करण्यास सांगा. देवळें पुष्कळ आहेत, तितकीं पुरेत, हें समजा.

# ९ ब्राम्हणांचा दांभिकपणा

ब्राम्हण-ब्राम्हणेतरवाद माजण्यास काय कारणें होतीं, तीं या १२ पत्रांवरून सहज कळतील. समाजांतील एक घटक कुठलीच समाज-सेवा न करतां नुसता आयतोबा होऊं पहातो, परोपजीवी (parasite) म्हणून राहूं इच्छितो, तेव्हा त्याजाविरुद्ध इतर घटकांनी बंड उभारलें तर काय चुकलें ? ब्राम्हणेतरांची ( सत्यशोधकी ) चळवळ कां निघाली व कांही काळ तिचा इतका जोर कां होता, तें लोकहितवादींच्या पत्रांवरून समजतें.

" एकीकडे भटांनी धर्म व दुसरीकडे गृहस्थांनी रोजगार अशा दोन्ही बाजू धरून इतर लोकांस आंत येऊं देऊं नये, अशी शक्कल केली होती. " (२०) तिचा प्रयोग फार काळ चालणें शक्य नव्हतें. बरें, ' भट ' तरी कसे ? तर समाजाला निरनिराळीं वेडें लावून देऊन, बायकांना फसवून, त्यांच्याकडून निर-निराळया मार्गांनी द्रव्य उकळणारे–फुकट खाणारे–कांहीही उपयोगी काम न करणारे. त्यांची स्पष्ट शब्दांत कानउघाडणी लोकहितवादींनी केली आहे; कारण ब्राम्हण ' फुकट खाण्याची इच्छा ' करितात, ' तशी फुकट खाण्यायोग्य लोकांची चाकरी कोणती करितात ( २८ ), याचा मुळीच विचार करीत नाहीत. ' पढा-वयाचा त्याचा व्यापार आहे ' ( २० ). ' उपास, पूजा व धर्मकृत्यें ते मजुरीने करतात व पुण्य विकत देतात, हा मोठा विलक्षण चमत्कार आहे ' ( ७५ ). त्यांनी अनेक ' धर्मग्रंथ ' रूढ केले; ' लोकांचें सुख व ज्ञान वाढवावयाची त्यांत एकदेखील गोष्ट नाही. मूर्खपणा वाढवावयाच्या गोष्टी आहेत ' ( ६१ ). शिवाय ते इतके दुबळे व सत्त्वहीन आहेत की, ' एकास लाथ मारली, तर दुसरा कां म्हणावयाचा नाही ' ( ४८ ). लोकांची दिशाभूल करून त्यांनी ' पैशाशिवाय

## ब्राम्हणांचा दांभिकपणा

ईश्वरप्राप्ति होत नाही, हें मत लोकांमध्ये चालू केलें ' (७१). भटांनी सत्ताधाऱ्यांना व इतरांनाही वाटेल त्या मार्गाने द्रव्य मिळविण्यास प्रोत्साहन दिलें, त्यांच्या अन्याय्य कृत्यांवर पांघरूण घालून त्यांची स्तुति केली. त्यांना सन्मार्गावर आणण्याचा तिळमात्र प्रयत्न केला नाही, वगैरे आरोप, अनेक दाखले देऊन, लोकहितवादींनी ब्राम्हणांवर केले आहेत. त्यांत विपर्यास अथवा अत्युक्ति नसून केवळ सत्यकथन आहे आणि तावत्कालपर्यंत तितकें स्पष्ट कुणी बोललें नव्हतें; म्हणून तें कटुतर वाटतें. परंतु आत्मनिरीक्षण, समाजहिताची स्पष्ट कल्पना, विषमतेचा तिटकारा, अन्यायाची चीड आणि ज्ञानप्राप्तीसाठी तळमळ, इत्यादि लोकहितवादींच्या गुणांची प्रचीति या पत्रांत उत्कटतेने येते. वेदान्ताचा अर्थ नीट न समजतां ऐहिक बाबतींत उदास रहाणाऱ्यांना त्यांनी मोठ्या खुबीने सवाल टाकला की, ' लोक व जग हें सर्व खोटें आहे, असें म्हटलें, तरी इतके प्राणी सुखदुःखांत, अज्ञानांत व मूर्खपणांत आहेत, ते सुटले काय ?...तुम्ही जग जरी मिथ्या मानलें, तरी आम्ही सर्वांनी असें मानलें नाही. याजकरिता आम्हांकरिता तुम्ही झटून आमचें कल्याण करा, म्हणजे तुमचा वेदान्त खरा ' ( ९६ ).

अव्वल इंग्रजीतील व पेशवाईच्या अखेरीससुद्धा ब्राम्हण–समाजस्थितीची कल्पना या पत्रांवरून चांगली येते; आणि अजूनही ' भटांनी लावून दिलेलें वेड ' समाजांतून पुरेतपणीं गेलें नाही, याबद्दल खेद होतो.

## ६ ब्राम्हणांचा दांभिकपणा


५ कन्याहत्या...ब्राम्हण लोकांचें अज्ञान

१७ ब्राम्हणांचें अज्ञान

२० ब्राम्हणांचें महत्त्व

२१ गृहस्थ आणि भिक्षुक यांचा भेद

४८ ब्राम्हण लोकांचा स्वभाव

५५ पुराणांतलि ज्ञान

५९ लोकांची समजूत व पुराणादिकांचें सौरस्य

६१ भटांनी लावून दिलेलें वेड

६२ ब्राम्हणांची शिक्षणपद्धति

७१ भटांचा विद्येचा निरुपयोग

७२ ब्राम्हणांचें ईश्वरी ज्ञान

७५ ब्राम्हणांचा लोभ

९६ ब्राम्हणांचे पुढारीपणापासून अनहित व वेदान्त

पत्र नं० ५

## कन्याहत्या– गवरनरसाहेबांची बदली, व ब्राम्हण लोकांचें अज्ञान

हिंदुस्थानांतील बाईट चाली बहुतेक बंद होत चालल्या आहेत इंग्रजांचे अमलांतील मुलखांत हत्या व खून, हिंदु लोक धर्म जाणून हमेश करीत होते, तें त्यांणी बंद केलें.

तथापि अद्याप गुप्तरूपेंकरून गुजराथेंत कन्याहत्या झाऊज लोक करतात. तेथील बंदोबस्त करण्याकरिता बडोद्याचे रेसिडेंट व पूर्वीचे गवरनर डंकिनसाहेब वगैरे यांणी बहुत मेहेनत केली, तेव्हा कांही मनाई झाली, तथापि अद्यापि पोरें मारतात. त्याचें कारण असें आहे की, रजपूत लोकांचे राज्य एके कन्येचे हातून जाईल, असें त्यांस कोणीं ब्राह्मणाने भविष्य सांगितलें आहे. जसें कंसास नारदाने सांगितलें होतें, तसें हें आहे. वास्तव ते मुली ठेवीत नाहीत. हा मूर्खपणाचा परिचार बंद व्हावा, म्हणून पेशजीप्रमाणे हल्लीचे सालीं इंग्रजी व गुजराथी भाषेंत २ ग्रंथ करावे व जो चांगले करील, त्यास १०० व ४०० रुपये बक्षीस मिळतील, म्हणून सरकारने जाहीरनामा लाविला आहे.

आनरबल क्लार्कसाहेब गवरनर जाऊन त्यांचे कामावर लॉर्ड फॉकलंड गवरनर येणार म्हणून वर्तमान ऐकिलें आहे. त्या लॉर्डास हिंदुस्थान-प्रकरणीं माहिती नाही म्हणून ऐकण्यांत आहे; परंतु तो कुलीन, थोर व विलियम फोर्थ-माजी राजा-याचा जावई आहे, असें म्हणतात. हल्लीच्या गवरनरास गुणावरून नेमिलें होतें. व त्यांनी थोडके दिवसांत सत्कीर्ति चांगली संपादन केली. आता हे जातात, येणेंकरून लोकांस जें सुख होतें, तितकें पुढे होणार नाही, असें दिसतें.

हिंदु लोक हे आजकालपर्यंत गाढ निद्रेंत आहेत. ती आभ्यास

बहुत ग्रंथ व बहुत ज्ञान पसरलें पाहिजे, व असें होण्यास बहुत काळ पाहिजे. व त्यास मुख्य अडचण अशी आहे की, सांप्रत काळचे द्रव्यवान् ब्राम्हण लोक हे यास आडवे येतात; म्हणून हे लोक जाऊन नवी प्रजा होईल तोंपर्यंत हिंदु लोकांची सुधारणा होईल, असें दिसत नाही. इतर जातींचे लोक तर सांगितलेलें ज्ञान ग्रहण करावयास सिद्ध आहेत; परंतु ब्राम्हण लोक तसे नाहीत. पूर्वीपासून त्यांची समजूत अशी पडलेली आहे की, आम्ही पृथ्वीवर देव आहों; व देवही आमचे हातीं आहेत, व आमचे आशीर्वादाने व शापाने पाहिजे तसें होईल; व पृथ्वीवर लोक आमच्याइतके शहाणे कोणी नाहीत व आमच्या देशाशिवाय पृथ्वीवर कांही देश नाहीत, इंग्रज लोक हे समुद्रांतील बेटांतील माकडांसारखीं मनुष्यें इकडे आलीं आहेत; व रामासारखा विजयी अवतार होईल, तेव्हा त्यांचें सैन्य त्यांस घालवील; व कंपनी सरकार ही कोणी एक स्त्री आहे; इत्यादि वेडगळपणाच्या समजुती बहुतेक ब्राम्हणांच्या आहेत. व जों जों ब्राम्हण लोक श्रीमंत होतात, तों तों ज्ञान कमी होतें. जे मोठाले सरदार व जहागिरदार आहेत, त्यांस पृथ्वीवर काय होतें, याची खबर नाही. झोपेंत, निशेंत व स्त्रियांच्या संगतींत ते निमग्न असतात; परंतु येणेंकरून काय उपयोग ?

बाजीराव पेशव्यांचे शाळेंतील शिष्य बहुत जहाले आहेत, त्यांस अतिशय गरिबी आल्याशिवाय भ्रांति जाईल, असें दिसत नाही. जशीं नवज्वरास बहुत लंघनें पाहिजेत, तसें हें आहे. विद्येचा उपयोग पोटास मिळवावयाचा इतकें मात्र लोक समजतात; पण ते मनांत असें आणीत नाहीत की, मागून इतके ग्रंथ व व्यासांनी अठरा पुराणें लिहिलीं हें काय ? यांस वेतन कोणीं ठरविलें होतें ? विद्यावृद्धीची चाल ब्राम्हणांनी सोडली, म्हणून त्यांची अशी अवस्था झाली आहे. पुढले पत्रीं आणखी कांही ये-विषयी लिहून पाठवूं.

---

पत्र नं० १७ ११ जून १८४८

## ब्राम्हणांचें अज्ञान

या देशाचे लोकांचें असें मत आहे की, ईश्वराने सृष्टींत स्त्रिया थोड्या आणि पुरुष फार निर्माण केले आहेत. व याचें उदाहरण ते असें दाखवितात की, किती एक पुरुष लग्न झाल्याखेरीज असतात आणि स्त्रिया लग्न झाल्याखेरीज असत नाहीत.

याजवरून बहुत पुरुषांस स्त्रिया मिळत नाहीत, असें अनुमान ते करितात, परंतु मला वाटतें की, हा मूर्खपणा आहे, कारण स्त्रियांस एकदा विवाह करण्याचा व पुरुषांस दोन तीन वेळ विवाह करण्याचा अधिकार आहे. यास्तव स्त्रिया तिकडे जास्त जातात आणि इकडे कमती येतात. जर-करिता स्त्रियांस पुनरपि लग्न करण्याचा अधिकार मिळेल, तर पुरुषांस कधी कमती येणार नाही. व स्त्रीपुरुष सृष्टींत समसमान आहेत, तेव्हा पुरुष लग्नाशिवाय रहावे व स्त्रिया न रहाव्या, याचें कांही कारण दिसत नाही; परंतु मनुष्याच्या रीतींत व नियमांत व वर्तणुकींत याचें कारण आहे: म्हणजे ब्राम्हण लोकांनी हा मोठा अनर्थ मांडला आहे की, स्त्रियांस पुनः लग्न करूं देत नाहीत ! ही गोष्ट त्यास इतकी बरी वाटते की, त्याविषयी जर कोणी भाषण केलें, तर त्यांस मनापासून वाईट वाटतें व अतिशय दुःख होतें. ते म्हणतात की, येणेंकरून आमचा पूर्वापार धर्म वसिष्ठापासून चालत आला, त्यास अपाय होईल. व सर्व लौकिक बुडेल आणि आपण सारे या पापामुळे नरकांत जाऊं, असें मोठमोठे विद्वान् आहेत, त्यांचे देखील मनांत येतें. व जे गृहस्थ, भट वगैरे अडाणी लोक आहेत, ते तर लौकिकावाचून दुसरी गोष्ट जाणतच नाहीत.

परंतु मला वाटतें की, ही समजूत अगदी खोटी आहे. पुनर्विवाहा-पासून धर्मास, कर्मास व लौकिकास अपाय नाही. सर्व चांगलें आहे.

मनांत जें मिथ्या तें खरें वाटतें, ईश्वरास भजावें हा मात्र धर्म आहे. लग्न इत्यादि रीतिभातींशीं धर्माचा कांही संबंध नाही. पूर्वी देवरोत्पत्ति × होती ऋषी मांस खात होते व इतर जातीचे लोक ब्राम्हण होत असत, असें वाल्मिक व व्यास यांचे उदाहरणांवरून समजतें व असें दिसतें की, त्या वेळचे ब्राम्हण ज्ञानी होते. आताचे सारखे मूढ नव्हते व आमचे जातीने आमचे शास्त्राचे बाहेर चालू नये, असें म्हणत नव्हते. सारासार विचार पहात होते व जर कांही एक अनर्थ वाटला, तर तो बंद करून दुसरी रीति स्थापित होते. असें अनेक स्मृती आहेत त्या पाहिल्यावरून वाटतें. दर एक स्मृतिरूप ग्रंथांत वेगळालीं मतें आहेत. याजवरून असें दिसतें की, प्रत्येक स्मृतिकार एकेक राजाचा आश्रित असेल व त्याने आपआपले राजास लागू पडतील तसतसे कायदे केले. याजवरून ते शहाणे होते, असें दिसतें.

एका गृहस्थाने एक बाग केला. तेथे झाडें लावीत; तीं मेलीं तर तो पुनः दुसरीं झाडें लावी. तेणेंकरून त्याचा बाग चांगला रहात होता. हा दृष्टान्त ब्राम्हणांचे शास्त्रांस लावूं. यांच्या शास्त्रांच्या बागेंत पूर्वी झाडें लाविलीं, तीं वाळून गेलीं, तरी लोक त्या झाडांशीं बांधून घेऊन हित-अनहितावर हल्ली कांही लक्ष्य देत नाहीत. सरासरी लक्ष्य देण्याचा विचार शंकराचार्यांपर्यंत चालला; परंतु अलीकडे सुमारे दोन हजार वर्षांत लोक आंधळे झाले व विचार करीत नाहीत व ब्राम्हण पूर्वी पोथीपुस्तक पहाणारे व रानांत रहाणारे, तें जाऊन आताचें ब्राम्हण मजूरदार व घरंदाज झाले; घर ते, कोण श्रीमंत आहेत? फुकट जेवावयास कोण घालील? आणि दक्षणा कोण वाटील? अशी वाट पहातात. त्यांची योग्यता पाहिली, तर दोन ओळी पाठ म्हणतात इतकीच; परंतु अर्थाचे नांवाने शून्य! तेव्हा त्यांस विद्वान् म्हणावें किंवा नाही, याचा संशय येतो.

× दिरापासून संतति करून घेणें.

कारण त्यास अर्थपरिज्ञान नाही, नुस्तीं अक्षरें वाचून पाठ म्हणतात, त्यांचे ते शब्द, जशी जनावरांची ध्वनि तद्वत् आहेत. कारण जनावरांची आणि मनुष्याची ध्वनि सारखीच आहे. मनुष्यांमध्ये जाजती इतकेंच आहे की, ते जी ध्वनि करितात, तिचा अर्थ करून समजतात व दुसऱ्यास कळवितात. हें मनुष्याचें विशेष लक्षण आहे; तें लक्षण अलीकडील ब्राम्हणांचे ठायीं आढळत नाही. तेव्हा हे आपणांस बुद्धि, विचार, ज्ञान, शक्ति, मन, चित्त इतकीं असून तीं बंद करून पोटें भरण्याकरिता मात्र पाठ करितात. तेव्हा त्यांस विद्वान् कोण म्हणेल ? व ब्राम्हणांचीं मतें बहुधा नीट असत नाहीत. त्यांचें चित्त जेवणावर व पैशावर असतें. मूर्ख लोकांत प्रतिष्ठा मिरवावी व फुकट पोट भरावें, म्हणून ते चार अक्षरें पाठ करितात; परंतु त्यांस ज्ञानी आणि विचारी कोण म्हणेल ? ते भारवाहक असे आहेत. मग त्यांची वर्तणूक तरी चांगली कोठून असणार ? अलीकडे पुण्यांत एक दशग्रंथी विद्वान ब्राम्हण सदरी लिहिले प्रकारचा होता; त्यास माजिस्ट्रेटाकडून चोरीबद्दल एक वर्षाची शिक्षा झाली. याजवरून या सर्व गोष्टी मनांत आल्या, त्या कळविल्या आहेत.

मला वाटतें की, बहुत वैदिक व शास्त्री हे वाकड्या समजुतीचे लोक आहेत. व हिंदुस्थानचे विद्येचा स्वभाव असा दिसतो की, त्यांतील विद्वान् बहुधा मोठा मूर्ख आणि भलतेच समजुतीचा असतो. मनुष्याहून पृथक् बुद्धि त्यास येती, भलतीं मतें वगैरे त्यास फार भासतात. याचें काय कारण असेल तें असो, त्याचा पुढे विचार करूं.

इंग्रज लोकांनी जगांतील बहुत गोष्टींचा शोध केला आहे व त्यांचे खालोखाल मुसलमान लोक आहेत, कारण फारशी भागवत, भारत व व वैदिक ग्रंथ अकबर बादशाह वगैरे यांचे हुकुमावरून ब्राम्हणांचा धर्म प्रसिद्ध होण्याकरिता लिहिले आहेत, तेव्हा इंग्रजांचे खालीं शोधक व उद्योगी हे लोक दिसतात. ब्राम्हण लोक व मराठे लोक यांणी शंभर दीडशे वर्षे राज्य केलें; परंतु असें कांही केलें नाही व त्या काळीं

इंग्रज व मुसलमान हे लोक हिंदुस्थानांत होते, परंतु त्यांजविषयी कोणी शोध किंवा पुस्तक केलें नाही. यावरून हिंदु लोक निद्रिस्थ आहेत, असें दिसतें. यांचें शहाणपण, अक्कल, विद्या व कला बाहेर गेली व बाहेरची आणावयास यांस संकट पडलें, हा केवढा चमत्कार!

पेशवाईंत ब्राम्हण लोकांनी फक्त जेवणाचे पदार्थ नवे काय काय होतील व रेशमी व भरगच्ची पोषाख अंगावर कुर्त्ती झोकावयाजोगे काय काय तयार होतील, यांचा विचार करण्यांत मात्र वेळ घालविला. कांही विद्येपासून हित, मनाची सुधारणा व राज्याचा बंदोबस्त केला नाही, हें उघड आहे. जे हिंदुस्थानांत पहिले प्रतीचे ब्राम्हण त्यांजवाचून दुसरे कोणी वाचूं नये, असे नेम आहेत. त्या ब्राम्हणांचा मूर्खपणा हा आहे. तेव्हा इतर जातीची व्यवस्था सहजच समजेल. तस्मात् हे लोक मूर्खपणांत आहेत, हाच निश्चय खरा व त्यांस जागृत करण्याकरिता इंग्रजांस पाठविण्याची योजना ईश्वराने केली आहे, हाही निश्चय खरा. आणि त्याप्रमाणे हा बेत सिद्धीस जाऊन हे लोक ज्ञानी, शहाणे व सावध होऊन सुखी व्हावे, हीच आता आशा आहे.

---

पत्र नं० २०                    ९ जुलई १८४८

## ब्राम्हणांचें महत्त्व

मला एक संशय आहे की, हल्लीचे काळीं कोणी वास्तविक ब्राम्हण आहेत किंवा नाहीत. मझ्या मताने म्हणाल तर कोणीही नाहीत, असें मला वाटतें. आताचे ब्राम्हण जसे इतर रोजगारी व मजूरदार लोक, तसेच आहेत. पढावयाचा त्यांचा व्यापार आहे; परन्तु त्यांस अर्थज्ञान पाहिजे तें नाही. ते आपल्यास असें म्हणवितात की—

देवाधीनं जगत्सर्वं मंत्राधीनं च दैवतम्।
ते मंत्रा ब्राह्मणाधीनं ब्राह्मणो मम दैवतम्॥ १॥

अर्थ— देवाचे स्वाधीन सर्व जग आहे, व देव मंत्राचे स्वाधीन आहेत; पण ते मंत्र ब्राम्हणांचे स्वाधीन; म्हणून ब्राम्हण हें माझें स्वताचें दैवत आहे, असें खुद्द परमेश्वर म्हणतो.

आता याजवरून ब्राम्हण हे देवापेक्षाही जास्ती आहेत, असें झालें; परंतु असलें मत मूर्खांशिवाय कोणी ऐकेल काय? जेव्हा लोक अनाडी होते, तेव्हा ब्राम्हणांनी आपला शक पराकाष्ठेचा चालविला. इतर लोक ज्ञानी होतील आणि त्यांचा नफा व फुकट जेवण बुडेल, याजकरिता त्यांणी असा नेम केला की, दुसरे जातीने शिकूं नये. जें काय वाचणें तें ब्राम्हणांचे तोंडून इतर लोकांनी ऐकावें. येणेंकरून पुराणिकाचे तांबूल, भटांची दक्षणा, श्राद्धाची क्षीर व लग्नाच्या पोळया ब्राम्हणांनी आपल्याकडे पुष्कळ पिकवल्या. व त्याप्रमाणे हें आजपर्यंत निभावलें, परन्तु आता निभणें मला दिसत नाही; कारण आता चारी जातींचे लोक हुशार झाले आहेत. आणि जें ब्राम्हणांनी आपल्या नफ्याकरिता ठरविलेलें होतें, तें अलीकडे मोडलें आहे.

विद्येचा सर्वांस सारखा उपयोग होत आहे. व विद्याही चौपट वाढली आणि कृत्रिमपणाचा थोरपणा बुडत चालला. विद्या झाकलेली होती, तोंपर्यंत तिचा मोठा बाऊ वाटत होता; पण आता उघड झाली, तेव्हा सर्व न्यायच होईल. मला वाटतें की, ब्राम्हणासारखा गर्विष्ठ पृथ्वीवर दुसरा कोणी नसेल; कारण त्यांनी जरी आपला धर्म व कर्म सर्व सोडलें, किती एक लबाड लुच्चे आहेत. किती एक मूर्ख आहेत. किती एक भडवेपणाचे रोजगार करितात, किती एक रांडांचे मागे तबले वाजवितात, असे असे निर्लज्ज झाले आहेत. तरी त्यांस असें वाटतें की, आम्ही इतकें केलें, तरी उत्तम कुळंब्यापेक्षा आम्ही चांगले व श्रेष्ठ आहों. यास प्रमाण—

दुःशीलोऽपि द्विजः पूज्यो न च शूद्रो जितेन्द्रियः
दुःशीलापि दुहेद्गावो न खरीं शीलवर्तिनीम् ॥ १ ॥

अर्थ— चांगल्या शीलाचा नसला तरी ब्राम्हण पूज्य आहे. मोठा जितेंद्रिय झाला, तरी शूद्र पूज्य नाही. यास उदाहरण, गाय लाथाळ असली, तरी तीच दुधास योग्य, गाढवी गरीब असली तरी ती योग्य नाही.

मला ब्राम्हणांचे व इतर लोकांमध्ये भिन्नपणा कांहीच दिसत नाही. ब्राम्हण मरतात, जन्मतात व हातपाय त्यांस इतरासारखेच असतात. मग इतरांपेक्षा त्यांचे मध्ये काय फरक आहे ? व ब्राम्हणाला गर्व कशाकरिता असावा ? त्यांचा मुख्य गुण काय ती विद्या; तिचें तर त्यांचेमध्ये शून्य पडून कांळ झालें आहे. तेव्हा आता कोणी कांही पाठ करील, तर त्याला तेवढ्यावरून थोर म्हणावें काय ? त्यांचा उपयोग काय ? बैलाच्या पाठीवर साखरेच्या गोण्या घातल्या तर त्याला जसा त्याचा उपयोग नाही, तद्वत् ब्राम्हणांनी पुष्कळ पाठ केलें, पण अर्थ ठाऊक नाही व ज्ञान नाही, तर कांही उपयोग नाही. आणि कोणी जेवावयास किंवा वसंतपूजेस बोलावलें, म्हणजे एका हातांत तंबाकु व दुसरे हातांत चुना आणि तोंडांत वेदपठण, हें तरी उत्तम आहे काय ? तेव्हा असे भ्रष्ट झाले ते ब्राम्हण म्हणावे किंवा त्यांस दुसरें कांही म्हणावें ?

वास्तविक म्हटलें तर इतर जातीचे मनुष्यास जातीचा गर्व नसतो व आपले हलके जातीचे समजुतीमुळे तो नम्रपणानें वागतो. आणि ब्राम्हण मूळचा भिकारी असला, तरी मी हिऱ्याचे जातीचा आहे, असें समजून जरी कोळसा असला तरी गर्वी असतो व मी सर्वांहून थोर, अशी त्याची समजूत असती. तशांत त्यास पैसा मिळाला किंवा कांही सोय झाली म्हणजे तर त्याएवढा गर्विष्ठ कोणी नाही. मग तो कोणास मोजीत नाही. आपला मीपणा मिरवितो.

आता वास्तविक पाहिलें तर कोणत्याही युगांत ब्राम्हणास राज्यावर किंवा अधिकारावर कोणीं बसविलें होतें असें नाही. जे विद्वान ब्राम्हण

असतील, त्यांचा राजाने सन्मान करून त्यांस संग्रहास बाळगावें, असें आहे; परन्तु अधिकाराचे उपयोगी ते नाहीत, हें तर स्पष्ट आहे. ब्राम्हणाकडे राज्य असेल तर इतर जातींचा काय परिणाम होईल ? व ब्राम्हण किती माजोरीपणा करतील ? मला वाटतें की, स्वभावेंकरून किंवा विद्येचे जोराने जे निर्मळ असतील, ज्यांणी आपला गर्व टाकला असेल व आपण आणि इतर जातींचे लोक सारखे आहेत, असें ज्यांस वाटेल, त्यांस मात्र अधिकारावर ठेवावें. इतर ब्राम्हणांस ठेवूं नये. कारण इतर जातींपेक्षा महत्वाचे गैरसमजुतीमुळे ते वाईट आहेत; पण हल्ली बहुधा सर्व रोजगार ब्राम्हणांनी बळकाविले आहेत. म्हणजे एकीकडे भटांनी धर्म व दुसरीकडे गृहस्थांनी रोजगार अशा दोन्ही बाजू धरून इतर लोकांस आंत येऊं देऊं नये, अशी शक्कल केली होती.

परन्तु ईश्वरास हें कसें आवडेल ? त्याणे जी उत्तम योजना करावयाची ती केली. वास्तव आता सर्व जातींचे अधिकारी होतात, हें ठीक आहे. कारण ब्राम्हणांचा गर्व व आळसता फार. तेव्हा इतर जात त्यापेक्षा बरी. तसेंच ब्राम्हणांचा स्वार्थ पहाण्याचा स्वभाव इतका आहे की, त्यांस आपला नफा मात्र दिसतो. दुसरें कांही दिसत नाही. पहा की, शिंदे, होळकर, गायकवाड, या सर्वांस पेशव्यांबरोबर राज्यें मिळालीं. त्यांचीं तीं अद्यापि कायम आहेत, व पेशव्यांचेंच बुडालें, याचीं कारणें काय ? तर यांस जीं कारणें आहेत, तीं अशीं—

(१) ब्राम्हण कोणाचें ऐकावयाचे नाहीत. (२) ब्राम्हणांस गर्व फार, यामुळे ते सर्वांस तुच्छ मानतात व म्हणतात की, आमचेपेक्षा शहाणा कोण आहे ? (३) देव-ब्राम्हण यांचें जवळ जवळ नातें आहे. तेव्हा देव आपलें रक्षण करील, असें म्हणून ब्राम्हण भलतेंच करितात. (४) ब्राम्हणांकडून इतर वर्णांचा द्वेष होतो. (५) ब्राम्हणांस रयत राजी होत नाही. (६) ब्राम्हणांची स्नानसंध्या माजली, म्हणजे राजकीय काम व पराक्रम होत नाही. (७) ब्राम्हणांस अडचणी फार, त्यामुळे प्रवासांत

हे निभत नाहीत. (८) ब्राम्हणांस सोवळेंओवळें फार. (९) ब्राम्हण आपल्या लोकांशीं द्वेष करितात व परक्याचे गुलाम होतात. (१०) ब्राम्हण स्वार्थ फार पहातात आणि लोकांस त्रास आणतात. (११) यांस असें वाटतें की, आम्ही ब्राम्हण आहों. आम्हांस कोणी कांही दिलें तरी त्याचा धर्म झाला, म्हणून ते लोकांस नागवितात.

---

पत्र नं० २१ १६ जुलई १८४८

## गृहस्थ आणि भिक्षुक यांचा भेद

मागील अंकांत एक पत्र आहे, त्यांत ब्राम्हणांचे शापापासून नाश होतो व ब्राम्हण स्वधर्माप्रमाणे चालतात, असें वर्णन केलें आहे. त्याचें उत्तर लिहितों तें असें—

जर ब्राम्हण लोक आपल्या धर्माप्रमाणे चालावयाचा उद्योग करीत आहेत, तर मग मुळी ब्राम्हण-वर्णाच्या दोन जाती, एक गृहस्थ व एक भट अशा बहुत दिवस चालू आहेत, याचें कारण काय ? ब्राम्हणांनी विद्याभ्यास करावा, हा धर्म सोडून ते गृहस्थ कसे झाले ? याचें कारण मला इतकेंच वाटतें की, ब्राम्हणवर्ण पहिला थोडा होता, तेव्हा लोकांस त्यांचें सहज पालन करतां येत होतें व पुष्कळ वाढला तेव्हा तितक्यांचें पालन कसें होईल ? बरें, इतके ब्राम्हण अधिक झाले, म्हणून कांही आंधळे, पांगळे, लंगडे, रोगी, वृद्ध, बाळ हे कमी झाले नाहीत व त्यांचें पोषणही केलें पाहिजे. तेव्हा हे वास्तविक गरीब लोक व शिवाय ब्राम्हण, इतक्यांचें पोषण लोकांच्याने होईना, याजमुळे ब्राम्हणांनी गृहस्थपणा धरून इतर जातींचे रोजगार म्हणजे क्षत्रियांची शिपाईगिरी, वैश्यांचा व्यापार व शूद्रांची चाकरी हीं सर्व पत्करलीं. व तेणेंकरून ब्राम्हणांचे

धर्मापासून पतन आपल्या आपण झालें. हें कांही नीच लोकांनी केलें, असें नाही.

हल्ली ब्राम्हण लोक तर धर्माप्रमाणे वागण्याचा उद्योग करीत नाहीत; परंतु त्यांचा मोठा उद्योग इतकाच आहे की, कोठे तरी उद्योगावाचून फुकट जेवण मिळावें, असें स्थळ पाहून तेथे शिरावें. धर्माविषयी आपणांस काय कळतें, याविषयी जर कोणीही ब्राम्हण आपले अंतःकरणांत विचार करून पाहील तर त्याचे सहज ध्यानांत येईल. ब्राम्हणांत फारसे विद्वान व नीतिवान आहेत, असें दिसत नाही. जसे इतर वर्णांचे लोक आहेत, त्याचप्रमाणे हेही आहेत. यांचे अंगीं कांही ज्ञानाचा थोरपणा नाही व भट तर बहुधा भोजनभाऊ आहेत. आणि गृहस्थ चाकरी व व्यापार करून पोट भरितात. तेव्हा धर्मप्रवर्तक ब्राम्हण आता कोठे आहेत ? कोठेच नाहीत. म्हणून हल्लीचे ब्राम्हणांस इतर जातीचे लोकांपेक्षा अधिक मान देणें योग्य नाही. जर कोणी देईल, तर तो अज्ञानी व आंधळा असावा, यांत संशय नाही. ब्राम्हणांची बुद्धि अशी आहे की, सर्व अधिकार व द्रव्य आपल्यास असावें व विद्येचा थोरपणा घालवून ते द्रव्याचा थोरपणा पाहूं लागले आहेत. आता जर कोणी शूद्र जातीचा कारकून झाला, तर सर्व ब्राम्हण लोक त्याजकडे डोळे वटारून पहातात. त्यांस असें वाटतें की, आमचा धर्म लिहिणें-पुसणें करावयाचा असून कुणबी आमचा वृत्तिच्छेद करितात.

सारांश, त्यांस धर्मांत थोरपणा आहे, तसाच सांसारिक थोरपणा असावा, म्हणजे आपण सर्वांहून मुख्य होऊन बसावें, असें वाटतें. आपण राजाप्रमाणे राहूं, सर्व रयत काम करील. आम्ही मांडीवर मांडी घालून खात जाऊं, पोटावर हात फिरवूं व यजमानाची स्तुति करूं, असें त्यांचें मनांत येतें; परंतु त्यांस असें वाटत नाही की, आपण फुकट खाण्याची इच्छा करितो, तशी फुकट खाण्यायोग्य लोकांची चाकरी कोणती करितो ? धर्म कोणास शिकवितो ? व कोणती विद्या वाढवितो ?

असा एखादा अमीर असतो, त्यास वाटतें की, गुलामांनी सर्व प्रकारें सेवा करावी; तद्वत् ब्राम्हणांस वाटतें की, आम्ही मोठे आहों. आमची सेवा सर्व लोकांनी करावी; आम्हांकरिता शेतें पिकवावीं, आम्हांकरिता घरें बांधावीं; अन्नछत्र घातलें, तरी तेथे फक्त आम्हां ब्राम्हणजातीस मात्र जेवावयास घालावें, इतर जातीस घालूं नये, असें त्यांस वाटतें.

ब्राम्हणांनी अन्नछत्रें घातलीं आहेत, तेथे कोणी ब्राम्हणाखेरीज दुसरा वर्ण जेवील काय ? जरी अत्यंत पीडित, रोगी, थकलेला व शूद्र येईल, तरी ते निर्दयपणाने त्यास नाही म्हणतील. आणि श्रीमंत, धट्टाकट्टा व मूर्खांचा राजा असा ब्राम्हण आला, तरी त्यास जेवावयास घालतील. तेव्हा हा धर्म कशाचा ? त्यांच्या दुष्ट स्वभावाने एकामेकांत वितुष्टें मात्र पडलीं आहेत. आणि प्रत्येक जातीचे लोक जसे वेगळाले देशाचे लोक जसे आपसांत भांडतात, तसे हे एक देशचे लोक असून, आपल्यांत वेगवेगळे देशचे शत्रूप्रमाणे भांडतात. येणेंकरून सर्वांचीं चित्तें फुटलीं आहेत व कोणामध्ये ऐक्य नाही. हा इतका या देशाचा फायदा ब्राम्हणांनी केला आहे.

ब्राम्हणांचा धर्म काय, हा प्रश्न जरी पांच हजार ब्राम्हणांचे सभेंत केला, तर त्याचें उत्तर कोणी एकही देणार नाही; परंतु दक्षणा सर्व मागतील. तेव्हा हे भट कशाचे ? जसे इतर जातींचे सुतार, न्हावी, माळी, तसेच हे मूर्ख राघूसारखे पढणारे, वेदविक्रयेंकरून पोट भरणारे व निर्लज्जपणाने भीक मागून काम न करितां खाणारे आहेत. हे लोकांस सांगत फिरतात की, ब्राम्हणांस द्यावें, म्हणजे मोठा धर्म आहे. कुळंब्यास कांही देऊं नये. कुळंबी जरी म्हातारा व आंधळा असला, तरी चिंता नाही. त्याणे मेहनत करावी, हाच त्याचा धर्म आहे. अहाहा ! काय हा आपलपोटेपणा ! ब्राम्हणांस ब्रम्हदेवाने फुकट खावें म्हणून सनद करून दिली आहे काय ? बाजीरावाने ब्राम्हणांस पुष्कळ खावयास दिलें. त्याचें ब्राम्हणांच्या आशीर्वादाने काय झालें ? अन्न मात्र व्यर्थ गेलें आणि त्याचा नाश व्हावयाचा तो झालाच; तर ब्राम्हणांनी

त्याचा विचार करावा. ब्राम्हणांचा आशीर्वादाने होणार काय ? जें ईश्वर इच्छील तें घडेल. ब्राम्हणांच्या ने कांही होणार नाही, हें मला पक्कें ठाऊक आहे. आणि आजपर्यंत ब्राम्हणांनी अज्ञानी लोकांस फसवून जें खाल्लें, तें आता सर्व उघडें व्हावयाची वेळ आली आहे.

---

पत्र नं० ४८ १८ फेब्रुवारी १८४९

## ब्राम्हण लोकांचा स्वभाव

हिंदु लोकांमध्ये निर्लज्जपणा हें एक त्यांच्या दुःखास मोठें कारण आहे. पहा, एक जण लाच खातो व त्यास सरकारांतून शासन होऊन त्याची धिंड काढितात, हें पाहून लोकांस दहशत पडावी; परन्तु तें कांही नाही. जे त्याचे कामावर बसतात, ते लागलीच लाच खाऊं लागतात. तसेंच इतर सर्व गोष्टींमध्ये दुर्गुणास लोक भीत नाहीत.

याचें कारण असें की, या लोकांमध्ये छापखाने व वर्तमानपत्रें वगैरे फार नाहीत, याजमुळे त्यांस निर्लज्जपणाचें भय वाटत नाही. छापखान्यामध्ये जितके अधिक ग्रंथ छापतात, तितकी लोकांची सुधारणा होती; कारण कोणीं कांही अपराध केला तर तो छापला जातो, आणि प्रसिद्धीस येतो; याजमुळे त्यास असें भय प्राप्त होतें की, माझी अपकीर्ति सर्व जगांत होईल; आणि माझे स्नेही, मित्र परदेशांत आहेत, त्यांसही कळेल. आणि माझे मागे ही लिहिलेली गोष्ट राहून अपकीर्ति मागे राहील. या भयाने लोक अपराध किंवा वाईट कामें करीत नाहीत. आणि जरी यद्यपि ज्याची अपकीर्ति छापणारांनी लिहिली, त्याणे स्वतः मूर्खपणाने वाईट कामें सोडलीं नाहीत, तथापि त्याची फजिती होऊन त्याचे वंशांतील पुढचे लोक आणि इतर लोक हे सावध होतात की, अमक्याने वाईट काम केलें, त्याची अपकीर्ति जहाली. तेव्हा आपण केलें

तर तसेंच होईल. त्यामुळे ते करीत नाहीत. एणेंकरून छापखाना हें लोकांस मोठें बंधारण आहे. तसेंच लोकही शहाणे होतात व त्यांस कोठे काय होतें, हें कळतें आणि सावध राहतात.

जर छापखाना व डाक हिंदुस्थानांत असती, तर परकी लोक हिंदुस्थानांत सुलभपणें आले, तसे आले नसते; परन्तु या लोकांचें दुर्भाग्य. तेणेंकरून छापखान्याचा फायदा त्यांस कळत नाही. व जे ब्राम्हण प्राचीन समजुतीचे अद्यापि पुष्कळ आहेत, त्यांस असें वाटतें की, छापखान्याचा काय उपयोग आहे ? बुकांत पैका घालून काय फळ ? पृथ्वीवरच्या बातम्या ठेवून आम्हांस काय करावयाचें आहे ? आपले घरांतलें आपण पहावें. आपल्यास मोठ्या गोष्टी कशास पाहिजेत ? अशा ते रांडगोष्टी सांगतात.

असे हे हिंदु लोक शिथिल आणि मूर्ख, म्हणून या दशेस आले. जर पेशव्यांचे अमलांत इंग्रज मोठे आहेत व त्यांची काय अवस्था आहे, हें लोकांस कळलें असतें, तर राज्य न घालवते; परन्तु पोटार्थी भट, त्यांनी गोड खाण्याशिवाय दुसरें कांही मनांत आणलेंच नाही. गोड खाण्यास मिळालें, म्हणजे सर्व ब्राम्हण एकत्र डोंगळ्यांप्रमाणे जमतात व मग त्यांचें अवधान फार लागतें. कोठे मुक्तद्वार किंवा ब्राम्हण-संतर्पण किंवा उत्साह आहे, अशी वार्ता आली की, ब्राम्हण मोठ्या हौसेने तेथे जमतात. दुसरी कांही राज्यकारभाराची किंवा ज्ञानवृद्धीसाठी सभा असेल, तर हालणार नाहीत. तात्पर्य, या जातीची नजर जेवण आणि दक्षणा याहून पलीकडे जात नाही व याहून दुसरा मोठा कारभार पृथ्वीवर आहे, असें या जातीस वाटत नाही.

एकास लाथ मारली तर दुसरा 'कां ' म्हणावयाचा नाही. इतके तर हे भित्रे, रांड्ये व निर्बल आहेत. यांचेमध्ये साहस, धैर्य, आणि खरेपणा हीं प्रायशः नाहीत. साहस म्हणजे मोठें कार्य डोकीवर घेणें. धैर्य म्हणजे आपल्यावर किंवा दुसऱ्यावर जुलूम कोणी करील, तर

न सोसणें. आणि खरेपणा म्हणजे लबाडीचे व्यापारांत न शिरणें. यांपैकी एकही गुण यांजमध्ये नाही. जनावरासारखे हे मूर्ख आहेत. जशा शेतांत पुष्कळ चिमण्या खावयास जमतात व त्यांस एक काठी उगारली, म्हणजे त्या भरकन उडून जातात, तसे हे ब्राम्हण लोक आहेत. यांची पंगत करावयास मात्र चांगली. परन्तु दुसरा कांही उपयोग नाही. आणि सांप्रत पहा की, पेशव्यांचें राज्य गेलें, हें वाईट जहालें, असें जे ब्राम्हण लोक म्हणतात, तें एवढ्याच कारणाने म्हणतात की, त्यांस खावयास मिळत नाही. ब्राम्हण लोक इतके दुर्बुद्धी आहेत की, त्यांस खावयास द्या व मग कांही करा, चिंता नाही. पोटास घालावें आणि पायपोस मारावे, त्यांस लज्जा वाटणार नाही. आणि त्यांची म्हण अशी आहे की, पोटावर मारूं नका, पाठीवर मारा, म्हणजे जेवावयास घाला व मग कांही करा. याप्रमाणे फक्त जेवणाची मात्र काळजी. पोटाचा विचार ब्राम्हण लोकांस पहिल्याने आहे; मग पाठीमागून सर्व. परन्तु बहुधा तेवढा बंदोबस्त असला, म्हणजे ते उजवे किंवा डावे बाजूस पहावयाचे नाहीत, हें आम्ही लिहिलेंच आहे.

याविषयी कोणास खोटें वाटेल तर त्याने स्वदेशीय राजधानींतील लोकांकडे पहावें आणि त्यांस पुसावें की, ' इंग्रज हिंदुस्थानांत कोठे कोठे राज्य करितात ? ' ते म्हणतील की ' छी ! इंग्रज कोठे आहेत ? आमचें संस्थानांत तो एक ताम्रमुखी मात्र असतो. ' याचप्रमाणे पेशवाईंत अवस्था होती. पुण्यांत वकील होता, तेवढी गोष्ट मात्र दरबारांतील वागणारे यांस माहीत. इतर लोकांस तेंही माहीत नवतें. कोणी सुखी असेल तर त्यांनी प्रवास करावा असें नाही. परन्तु ग्रंथद्वारे किंवा वर्तमानपत्रद्वारे त्यांस वर्तमान तरी माहीत असावें !

एखादे गावचे कुलकर्ण्यास पुसा की, कलेक्टर साहेब यांची नेमणूक कोण करितो, त्यांस पगार काय, आणि गवरनर साहेब कोण आहेत व कोठून आले ? तर त्याच्याने कांही सांगवणार नाही. जा शहरांमध्ये कांही

गोष्ट आहे तीच गोष्ट त्या शहरांत ठाऊक नसते. पुण्यामध्ये शाळा आहे, लायब्ररी आहे व छापखाना आहे. हीच गोष्ट पांचशे रुपये महिना पगार किंवा पेनशन खाणारास पुसा, म्हणजे ठाऊक नाही, असें तो म्हणेल. कारण की, हिंदु लोक शोध करण्यांत फार आळशी आहेत. कोणी कोणी शोध करणारे आहेत. परन्तु लोकांच्या वरच्या गोष्टी व चहाड्या एवढें मात्र ते मनास आणतात. दुसऱ्या उपयोगी गोष्टी कांही मनास आणीत नाहीत. व थोर आहेत ते जेवतात आणि निजतात. अशी त्यांची अवस्था आहे.

मागे सांगतात की, दिल्लीचे बादशहाने, मिरची तिखट आहे किंवा कसें, हें पुसलें होतें; व सूर्य हा पदार्थ काय आहे, हा प्रश्न पुसला होता. तद्वत् इल्लीही ऐकण्यांत आहे की, कर्नाटकांतील सरदारांपैकी एकाने पोलिटिकल एजंटास विचारलें की, तुम्हीं समुद्र पाहिला आहे किंवा नाही ?. व आणखी एक वेळ असा प्रश्न केला की, ' कृष्णातीरीं घाट आहे तो पाण्याने वहात कां नाही ? ' तेव्हा एक हुशार जवळ होता, त्याणे सांगितलें की, " महाराज, पाण्याने घाट वाहून जातो, परन्तु आमच्याजवळ हत्ती आहेत, त्यांजकडून पुनः ओढून आणून जाग्यावर ठेवतो. ' तेव्हा त्या मूर्खांची समजूत पडली. अशा किती एक अज्ञानपणाच्या गोष्टी ऐकण्यांत आहेत. त्यांचें वर्णन करून उपयोग काय ?. परन्तु असें आहे तरी जास खावयास मिळतें त्यास जरी फाशी द्यावयास काढलें तरी वाचणें किंवा ज्ञान शिकणें, ही गोष्ट त्याच्याने व्हावयाची नाही.

या लोकांच्या इतक्या समजुती आकुंचित जहाल्या आहेत की, ते वर्तमान काळचा विचार करितात, उद्याची काळजी करीत नाहीत. लाच खाल्ला म्हणून एकाची धिंड निघाली, काय चिंता आहे ? आपण मिळेल तोंपर्यंत पैसा खाऊं; जा दिवशीं काळ फिरेल त्या दिवशीं पहातच आहोंत. याप्रमाणे काळास दूषण देतात; पण आपण कर्मे कोणतीं करतों, याचा विचार करीत नाहीत. आणि इतके निर्लज्जपणास दुसरें कारण असें आहे की, लोक शहाणे नाहीत. कुळंबी ते अडाणी कुळंबी; व ब्राम्हण तर

शतपट मूर्ख आहेत. तेव्हा जो वाईट काम करतो, त्यास असें वाटत नाही की, मला हे लोक वाईट म्हणतील. आणि वास्तविक पाहिलें तर जे लोक वाईट कामें करितात, त्यांची निंदा पाठीमागे लोक पुष्कळ करितात; परन्तु भित्रे आहेत, त्यांजमुळे त्याचे तोंडावर होत नाही. व त्याचा त्याग करून सर्वांनी हलका मानणें व त्याचा लोकांत हरतऱ्हेने पाणउतारा करणें, हें धैर्य लोकांस नाही.

जी गोष्ट घडते ती सहज घडते; परंतु प्रयत्नपूर्वक कांही घडत नाही. वाईटास वाईट म्हणावें व शहाण्यास शहाणें म्हणावें, हें शहाणपण लोकांस नसल्यामुळे लोकही पाहिजे तशी वर्तणूक करितात. खोटें बोलणें व लबाडी करणें हें तर त्यांचे अंगीं पडलें आहे, त्याचा विधिनिषेध ते जाणतच नाहीत. लबाडी ही लज्जेची गोष्ट, ही लोकांमध्ये समजूत नाही; असे हे लोक मूर्ख आहेत. जर त्यांस कांही गोष्ट सांगितली तर तिचा अर्थ कळत नाही व न्याय करतां येत नाही, असे लोक अज्ञानांत आहेत.

---

पत्र नं० ५५ ८ मे १८४९

## पुराणांतील ज्ञान

हर एक कोणतेही गोष्टीचे गुणदोष पहावे लागतात. छापखान्याचे हुन्नरापासून किती एक गोष्टी चांगल्या व किती एक वाईट झाल्या आहेत. तसेंच दारूपासूनही झालें आहे. तसेंच तर कोणतें पुस्तक लिहिलें गेलें, म्हणजे त्यापासून कांही गोष्टी चांगल्या व कांही वाईट होत असतात. याचा विचार करून चांगली मात्र घ्यावी., हें वाचणाराकडे आहे.

यावरून मी विचार करितों की, व्यासांनी पुराणें लिहिलीं, त्यांचे गुणदोष काय आहेत? व त्यांपासून लोकांचा फायदा काय झाला?

ज्या काळीं हे ग्रंथ लिहिले, त्या काळीं हे ग्रंथ लिहिणारास असें वाटलें नसेल की, जसें आता लोक त्यास समजतात, तसें समजतील व लोक त्यांची पूजा करतील व घरोघर ते ग्रंथ होतील. त्या वेळीं छापखानाही नवता. याजमुळे हे ग्रंथ प्रसिद्ध व्हावयास बहुत काळ लागला. आज पांच हजार वर्षें झालीं, तरी किती एक पुराणें मिळत नाहीत; कारण त्यांच्या प्रती झाल्या नाहीत. एक प्रत करावयास एक वर्ष पाहिजे. त्याची प्रत दुसरी व्हावयास तसाच पुष्कळ काळ लागतो. अस्तु.

पुराणें हीं माझे मतें काव्यें आहेत. त्यांचा आधार बहुतकरून वास्तविक गोष्टींवरून धरला आहे; परंतु त्यांत कमें आणि बहूक्ति फार केली आहे. कोठे १० श्लोक देवाच्या स्तुतीचे लिहिले, म्हणजे लागलीच त्यांची फलश्रुति व त्यांचा न्यास, ध्यान, कवच, छंद, दगड, धोंडे असें पुष्कळ आणून जोडलें आहे. मुख्य पुराण करणारांची इतकीच बुद्धि होती की, रमणीय कथा आश्चर्य वाढावयाजोग्या लिहून, त्यांत भक्तिज्ञान जागोजाग मिळवून ग्रंथ सुलभ व मौजेचे करावे; परंतु त्या काळीं भूगोल, खगोल या विद्या पुरतेपणीं वृद्धिंगत झाल्या नवत्या. म्हणून भूगोलाविषयी त्यांत पुष्कळ चुका आहेत व पृथ्वीचीं वर्णनें मनास येतील, तशीं कवींनी केलीं आहेत. भारत–भागवत यांतील दृष्टांत लोक फार घेतात; परंतु संपूर्ण ठिकाणीं ते यथास्थित लागत नाहीत. कारण की, वास्तविक इतिहास जर असेल, तर त्याजपासून तर्क काढतां येतो. जसें रूमचें राज्य होतें, त्याचा इतिहास आहे. त्याजपासून तें राज्य कशाने गेलें व लोक शहाण्याचे वेडे कसे झाले व वेड्याचे शहाणे कसे झाले, हें कळतें व ते दृष्टांत आपणांस लागू करतां येतात.

परंतु पुराणांतील तसे लागू करतां येत नाहीत; कारण की, पुराणांतील सर्व गोष्टी प्रारब्धावर आणि देवाचे सामर्थ्यावर रचिल्या आहेत. जसा गजेंद्रास शाप होता म्हणून नक्र झाला; अहिल्येस वर होता, म्हणून उद्धरली. रावणास वानरांनी मारला. दुर्योधनास मारून भूभार कमी करावा,

म्हणून युद्ध केलें. हिरण्यकश्यपूस मारावयास खांबांतून देव निघाला. वामनाने पायाने बळीस पाताळीं घातला. या गोष्टी व अस्त्रयुद्ध, रथ-वाहन, धर्मयुद्ध, प्रतिज्ञा, शाप, वरदान, तात्काळ ईश्वराची प्राप्ति, या गोष्टींस आता लागू करणें यासारखा मूर्खपणा कोठे आहे ? कोणी म्हणतो 'पेशव्यांचें राज्य कसें बुडालें हो !' दुसरा उत्तर देतो, 'अहो, ते अवतारी, पुरुष होऊन गेले. जें होणार तें झालें. त्यास उपाय काय ? सद्दी फिरली म्हणजे क्षण लागत नाही. देव देणार त्याला देतो. त्याचे मनांत आलें, म्हणजे पाहिजे तसें घडतें.' या प्रकारच्या समजुती लोकांच्या आहेत.

वास्तविक इतिहास पहात नाहीत व कारण लक्ष्यांत आणीत नाहीत. कोणी म्हणतात प्रारब्ध; कोणी म्हणतात सद्दी; दुसरे म्हणतात ईश्वर करील तसें होईल; म्हणून उद्योग करण्याची गरज नाही. अशा समजुती या सर्व पुराणांतील आहेत. पुराणें यांस मूळ आहेत. तसेंच व्रत-माहात्म्यें व क्षेत्रमहात्म्यें, येणेंकरून पुष्कळ वाईट समजुती झाल्या आहेत. पुराणिक व्रत सांगत बसला, म्हणजे अडाणी बायका व चार मूर्ख पुरुष बसले असतात. त्यांस व जनावरांस कांही फरक नाही. यांजमुळे जें पुराणिक सांगतो, तें त्यांस खरें वाटतें. आणि पुराणिक म्हणतो, दोन हजार वाती करून देवापुढे जाळल्या असतां महापुण्य आहे; म्हणजे लागल्याच बायका घरीं येऊन नवऱ्यास तगादा करतात की, आमची तुपाची व कापसाची तयारी करावी. आम्हांस पुराणिक बावांनी सांगितलें की, कापूर, वाती व तूप जाळलें असतां फार पुण्य आहे. मग दोनचार रुपयांचा जिन्नस व दोन महिन्यांची मेहनत खरीखुरीच जाळतात. पुराणिक व भट यांचे सांगितल्यावरूनच बायका आपल्या नवऱ्याच्या प्रेताशीं जिवंत जाळून घेत, त्या दोनचार रुपयांचा जिन्नस जाळावयास कमी करतील काय ?

याचें कारण काय म्हणाल, तर अज्ञान फार. आम्ही जर आता कोणास सांगितलें की, तुमची बायको मेली, तिच्याशीं तुम्ही जाळून घ्यावें,

तर कोणी ऐकेल काय ? पुरुष कोणी ऐकणार नाहीत. कारण की, त्यांना बायकापेक्षा कांही तरी थोडेसें अधिक कळतें. परन्तु बायका अंधःकारांत. त्यांस जसें सांगितलें तसें वर्ततात. याजमुळे सती जाण्याचा पाठ पडला. जर बायका शहाण्या व त्यांस विद्या वगैरे शिकवावयाची चाल असती, तर जांणी त्यांस प्रथम सती जाण्यास सांगितलें त्यांच्या त्यांनी शेंड्या उपटून टाकल्या असत्या. अजूनही जर स्त्रियांस विद्या वगैरे शिकविल्या तर त्या आपला पुनर्विवाह करतील आणि शास्त्री वगैरे जे त्यांस आडवे येतील, त्यास पुसतील की, पुरुषांनी पाहिजे तितकीं, लग्नें करावी. मग स्त्रीने नवरा मेल्यावरही दुसरा नवरा कां करूं नये ? आणि आपणच शास्त्रार्थ देऊन चालू करतील.

परंतु असें होत नाही. कारण की, स्त्रियांस फार अज्ञानांत ठेविल्या आहेत. यास्तव जे पुराणिक सांगतो, तें त्यास खरें वाटतें. परंतु पुराणांत चुका काय आहेत याचा विचार करतां येत नाही व लाक्षणिक अर्थ काय आहे व बहूक्ति कोठे काय आहे हें कांहीच समजत नाही. परंतु हल्ली म्हणतात की, जांणी पुराणें केलीं ते देव होते. वास्तविक पाहिलें तर ते मनुष्यच होते. व त्यांसही वाटलें नसेल की, आणखी पांच हजार वर्षांनी आमची योग्यता देवासारखी होईल व आम्ही जें जें लिहिलें तें त्यांतील अर्थ मनांत न आणतां सर्वच खरें म्हणतील. हें त्यांसही ठाऊक नाही. हिंदु लोक खराखुरा इतिहास एखादे देशाचा वाचून व्यवस्था मनांत आणतील तर बरें होईल. म्हणजे त्यांस हें सर्व कळेल. पुराणें हीं केवळ कवीचीं काव्यें आहेत. जों जों संस्कृत भाषा बुडाली, तों तों त्यांचें स्तोम वाढत चाललें; नाही तर जसे तुकारामाचे अभंग,–दोहेरे वगैरे आहेत तद्वतच पुराणांची योग्यता असती. यास्तव पुराणांतील मतांमुळे लोक फार मूर्ख व सुस्त झाले आहेत, हें त्यांस अद्याप कळत नाही.

---

पत्र नं० ५९ ६ मे १८४९

## लोकांची समजूत व पुराणादिकांचें सौरस्य

हिंदु लोकांमध्ये स्वधर्माचा विचार कोणी करीत नाहीत. देवळांत अमर्यादा करितात.

पुणें येथे व इतर ठिकाणीं देवांचीं नांवें लोकांनी भांग्या मारुति, छिनाल बालाजी, लुन्या मुरलीधर, चिमण्या गणपति इत्यादि ठेविलीं आहेत. याजवरून असें वाटतें की, देवाचा मान करावा आणि देवास भीत जावें, हा भाव अगदी नाहीसा झाला. देवळें हीं पवित्र जागा; त्यांत अनाचार असूं नये, हें लोक अगदी जाणत नाहीत.

मला वाटतें की, इंग्रजांचा धर्म कसाहि असो, परंतु त्यांस देव आणि त्याचा मान करणें हें समजतें. पहा की, आठ दिवसांनी देवळांत ते जातात, परंतु भक्तीने व मर्यादेने भजन करून माघारे येतात. आणि हिंदु लोकांचे देवळांत पहा. कसबिणी बिराडास असतात; सोदे, लुच्चे, संध्याकाळीं तमाशे पहावयास वगैरे येऊन बसतात. त्यांचे मनांत देवळाचा मान अगदी नसतो. आणि जसे चावडीवर तमाशास लोक जमतात, किंवा चौथऱ्यांवर पानसुपारी खात बसतात, घरचा कारभाराचा गोष्टी सांगत बसतात; तद्वत् व्यवस्था आहे. पुण्यांत तुळशीबागेंत गेलें किंवा हिंदु लोकांचे कोणतेही जत्रेस गेलें, म्हणजे हेंच सर्व दृष्टीस पडतें. देवाकरिता भक्तीने येऊन मर्यादेने व पवित्रपणाने वागतात, असा शंभरांत एक मनुष्य असतो.

स्वधर्म म्हणजे काय,तो या लोकांस अवश्य सांगितला पाहिजे. कित्येक मूर्खांस असें वाटतें की, पुराणांत जितक्या गोष्टी लिहिल्या आहेत, तितक्या खऱ्या आहेत; परंतु व्यासांनी असेंच लिहिलें आहे की, स्त्री, शूद्र, वैश्य इत्यादि मूर्ख जनांकरिता पुराणें लिहिलीं आहेत. ज्ञानी यांस कर्मे व पुराणें यांची गरज नाही, ही गोष्ट खरी आहे.

कारण पुराणांत कित्येक गोष्टी केवळ मूर्खांचे शासनार्थच सांगितल्या आहेत. जसें वाती करून लावाव्या, याचा वास्तविक अर्थ इतकाच की, अंधेरांत उजेड करावा; परंतु ही सोपी गोष्ट सांगण्याकरिता पुराण लिहिणाराने नाना प्रकारचा गोष्टी लिहिल्या आहेत की, जसा एक उंदीर होता, त्याचें शेपूट एक बाई वाती करीत असतां वातीस लागून, त्याने वाती फिरून एक वात झाली. ती जेव्हा देवळांत जळाली, तेव्हा त्या उंदरास न्यावयास विमान आलें. त्याने पुसलें कां ? तेव्हा देवदूत म्हणाले की, तुझ्या पुच्छाचे धाग्याने एक वात झाली; ती आज देवळांत जळाली; त्याचें श्रेय तुला आलें. म्हणून हें विमान तुला आणलें आहे. याजकरिता वाती लावतील त्यांस मोक्ष होतो.

तसेंच वांग्याचे धुराने विमान पडल्याची कथा आहे. इत्यादि लक्षावधि कथा आहेत; परंतु त्यांचा खरा अर्थ सोडून लोकांनी त्या गोष्टीच खऱ्या मानिल्या आहेत. आणि बायका ऐंशी वर्षेंपर्यंत वाती करतात; आणि जाळितात. दुसरा कांही उद्योगच नाही. हा मूर्खपणा पुराणांचे गोष्टींनी शिरला. जर पुराणें करणारांनी खूळ लावावयाच्या गोष्टी न लिहितां साधेपणांने सांगितलें असतें की, गरिबांस धर्म करावा; अंधेर असेल तेथे दिवा लावावा; परंतु असें न सांगतां त्यांनी दर एक कलमास मोक्ष आणि स्वर्ग सांगितला आहे.

त्यास असें दिसतें की, या गोष्टी लिहिणारास पुढे लोक मूर्ख होतील व या गोष्टी सर्व खऱ्या म्हणतील, असें वाटलें नवतें; परंतु तशी गोष्ट झाली. आता पुराणिक बावांचा गोष्टी ऐकणार ज्ञानी पुरुष नाहीत; परंतु बायका व पुरुष खुळे, वेडे, अज्ञान, मूर्ख, जांस कांहीच समजत नाही, असे असतात आणि सर्व गोष्टी खऱ्या म्हणतात. येणेंकरून लोक मूर्ख झाले आहेत.

याजकरिता या सर्व पुराणांतील कोणी रहस्य काढून नवीन ग्रंथ लिहिला, तर फार हित होईल. उनाड गोष्टींनी लोकांस भ्रांतींत घालणें हें योग्य नाही. आणि वास्तविक पाहिलें तर धर्मशास्त्र, वैद्यशास्त्र व ज्योतिषशास्त्र हीं सर्व प्राचीन काळीं लिहिलीं गेलीं, आणि सांप्रत काळास फरक

पडला आहे. त्याजमुळे धर्मशास्त्रांत जे फेरफार करावयाचे ते केले पाहिजेत. जसें ज्योतिष काळेंकरून चाळावें लागतें, तेव्हा त्यास मेळ पडतो; आणि वैद्यक ही शास्त्रांत एक आहे आणि कृतींत वेगळेंच असतें. वैद्य चार रोगांचीं औषधें जाणतो; परंतु जर एका मनुष्यास चार रोग झाले, तर त्याने कल्पना बसवून योजना केली पाहिजे. आणि हजार औषधें एका रोगास लिहितात; परंतु वैद्याने प्रसंग पाहून दिलें पाहिजे.

तसेंच धर्मशास्त्रांत अनेक मतें आहेत व पुराणांत अनेक गोष्टी आहेत; परंतु लोकांची स्थिति पाहून व तारतम्य पाहून त्यांचें रहस्य जाणावें. केवळ अर्थाचा अनर्थ करूं नये; परंतु हे लोक शुद्धीवर नाहीत. अगदी भकले आहेत. त्यांस शिकवणार शंकराचार्य कोण ? ईश्वर करील तें करो, परंतु लोक फारच अज्ञान झाले. धर्म म्हणजे काय, विद्या म्हणजे काय, हें अगदीच जाणत नाहीत. मोडक्या घराचे कुजके वासे राहतात, तसे हिंदु धर्मशास्त्र व विद्या हे प्राचीन काळचे शब्द लोकांचे तोंडांत मात्र आहेत, परंतु अर्थ ठाऊक नाही. आणि लोकांनी कांही कांही विद्या फारच मूर्खपणास नेऊन पोचविल्या आहेत. त्या कोणत्या म्हणाल तर ऐका.

एक वैद्यकी. रसायनशास्त्र हें चांगलें शास्त्र आहे; परंतु त्यामध्ये या लोकांनी किमया काढली आहे. तसेंच ज्योतिषशास्त्र चांगलें, परंतु त्याजवरून भविष्यें पहाण्याची रीति व नियम काढले आहेत. ते अगदी खोटे. आकाशांतील जे तारे, त्यांचाने पृथ्वीवरचे मनुष्याचे नशिबाचा फेरफार कसा होईल ? शनि पाहिजे तिकडे गेला, व गुरु कोणत्याही राशीस आला, तरी मी पृथ्वीवर रहाणार, माझें तो काय करील ? व माझ्याशीं व त्याशीं संबंध काय ? परंतु प्राचीन काळचे भटांनी अज्ञाणी लोकांवर कर बसविण्याकरिता ही युक्ति केली आहे. तसेंच नीतिशास्त्र याचें पर्यवसान तप आणि योगशास्त्राकडे गेलें आहे; परंतु त्यांतही कांही अर्थ नाही. शास्त्रकारांनी नीति सांगण्याकरिता ही युक्ति केली आहे. म्हणजे पुरुषास

तीन वेळा स्नान वगैरे सांगितलें. येणेंकरून शास्त्रकाराचा हा हेतु की, त्या पुरुषाचा काळ त्या खटपटींत जाऊन त्याकडून कांही दुराचार घडूं नये.

ब्राम्हण चोरी करतील, म्हणून मुळीच द्रव्य बाळगूं नये, असें सांगितलें. संन्याशी स्त्रीशीं जातील, म्हणून त्यास सांगितलें की, तुम्ही घरीं राहूं नये व दूध वगैरे खाऊं नये. तात्पर्य, त्यांची नीति रक्षण होण्याकरिता इतक्या युक्ति सांगितल्या. तसेंच विधवा स्त्रियांचे हाल त्यानिमित्तच आहेत. परंतु नीति स्पष्ट करून सांगते, तर बरें होतें. ही इतकी बहूक्ति केली, त्याने लोक मूर्ख झाले. गायनविद्या आहेत. त्यांचा राग अमका चांगला आहे, असें म्हणावयाचें सोडून, या रागाने पाऊस पडतो, त्या रागाने दिवे लागतात, इत्यादि अतिशयोक्ति केली आहे. ती न समजतां लोक आता खरेंच म्हणतात, आणि म्हणतात की, तशी विद्या कोठेंच नाही. आणि मंत्रांचें सामर्थ्य गेलें; परंतु होतें कधी ? कधी नव्हतें. ही बहूक्ति आहे. याजवर भरवसा ठेवूं नये.

तसेंच, योगशास्त्राची अव्यवस्था आहे. मला असें वाटत नाही की मनुष्य योगाने हजार वर्षें वांचेल, किंवा प्राण ब्रह्मांडीं नेईल, आणि सुख-दुःखांचा त्याग करील. मग त्यास तोडला तरी सारखा, मारला तरी सारखा. अशा स्थितीचें वर्णन पुराणांत बहुत आहे; परंतु ही स्थिति पुराणांतील इतर गोष्टींसारखीच मला अमानुष व अशक्य दिसते. किंबहुना अतिशयोक्ति असेल. म्हणजे मनुष्याने सुखदुःखांविषयी शांति धरावी, म्हणजे चित्त स्थिर रहातें, हें स्पष्ट लिहिल्यावाचून बळेंच अवघड रीतीने लिहिलें असेल, हेंच अनुमान दिसतें.

जर योगशास्त्र खरें असतें, तर नाहींसें कां होतें ? लोक अवश्य योग करते. कारण तें मोठें सुख आहे; परंतु ही गोष्ट किमयाप्रमाणे व्यर्थ आहे. म्हणून या अशा वक्तयावर भरवसा ठेवूं नये. नीट अर्थ करीत जावा आणि विद्येचे खरे भाग मात्र घ्यावे आणि भविष्य ज्योतिष टाकून द्यावें. हिशेबाचें मात्र ज्योतिष घ्यावें, हें बरें. यथानीति वर्तणूक केली, म्हणजे त्यांत

मोक्ष आहे. हजार आचारांचा खटपटी केल्या, तरी त्यांत कांही नाही. आणि शास्त्राचा अर्थ युक्तीने घेतला पाहिजे. याविषयी वाक्य—

श्रुतिस्मृतिविरोधे तु युक्तिरेव बलीयसी।

या वाक्याने त्याचा निर्णय होतो. परंतु जा दिवशीं हिंदु लोक आपल्या बुद्धीचा उपयोग करूं लागतील, त्या दिवशीं त्यांस हा भेद समजेल.

---

पत्र नं० ६१ — २० मे १८४९

## भटांनी लावून दिलेलें वेड

हिंदु लोक हल्ली आहेत, त्यापेक्षा चांगले होण्यास त्यांनी बहुतेक आपलीं मूर्ख मतें सोडलीं पाहिजेत. प्रथम हीं मूर्ख मतें उत्पन्न कशीं झालीं म्हणाल, तर त्याचें कारण लिहितों.

प्राचीन काळीं हिंदु लोकांनी विद्या बहुत केल्या. पुढे असें झालें की, ब्राम्हण लोकांनी नवीन विद्या अधिक अधिक शोधावयाचा सोडून ते कार्यें करूं लागले आणि वेद पाठ करूं लागले; अर्थ सोडून दिला. आणि धर्मशास्त्रांत असें आहे की, आपला कुलाचार रक्षावा. त्याप्रमाणे जें मागे बापाने केलें तेंच मुलाने करावें, अशी समजूत पडली आणि जों जों हे मूर्ख होत चालले, तों तों मागले लोक त्यांस देवासारखे दिसूं लागले.

निरक्षर भट म्हणूं लागले की, व्यास अवतारी होता. व ज्यांनी गणिताचे ग्रंथ केले, ते देव होते. असें म्हणून मागले ग्रंथ मात्र वाचावे. पुढे कांही करूं नये, असें झालें. तेव्हा अज्ञान फार वाढलें व त्यास साधन मुख्य पुराणें आणि माहात्म्यें लिहावयाचीं, हाच कांही दिवसपर्यंत पंडितांचा रोजगार होता. तेव्हा त्यांनी मनास येईल तें लिहिलें. कोणी कावेरी माहात्म्य, कोणी

करवीर-माहात्म्य, कोणी शालिवाहन-चरित्र, कोणी नाशिक-माहात्म्य, कोणी अग्निपुराण, कोणी गणपतिपुराण अशीं लिहिलीं. प्रत्येकांत त्यांचा हेतु इतकाच होता की, एखाद्या देवाचें किंवा एखाद्या नदीचें वर्णन करून ईश्वर त्यांत आणून ठेऊन, ब्राम्हणांस पैसा मिळण्याची तजवीज पहावी.

तशींच व्रतमाहात्म्यें. कोणी म्हणाला सोमवारीं उपास करावा, कोणी म्हणाला मंगळवारीं; कोणी शनिवारीं. दर एकाची कथा व त्याची देवता, आणि त्याचप्रमाणे अमक्याने केलें आणि त्याचें अमुक कार्य झालें व तसें जो करील, त्याचें तसेंच होईल, म्हणून लिहिलें; पण हें सर्व कवींचें लाघव आणि ब्राम्हणांचें कार्य करावयाची तजवीज आहे, असें उघड दिसतें; व याचा खोटेपणा उघड दिसतो. वर्षांत तीनशे साठ दिवस व त्यांहून अधिक व्रतें आहेत. तसेंच दर एक पुराणांत दर एक देवाचें वर्णन, त्याचें नांव, अमके दैत्य त्याने मारले, तो ईश्वर; त्यास भजावें, इतरांस भजलें तर नरकाचें साधन, याप्रमाणे लागलाच शेरा, असें दर एकांत आहे. दर एकांत सृष्टिची उत्पत्ति, देवाचें चरित्र व भविष्यें याप्रमाणे सर्व तयारी केली आहे. तेव्हा कोणते देवास भजावें, कोणतीं व्रतें करावीं, किंवा तीनशें साठही दिवस व्रतें करावीं?

धर्मशास्त्र पाहिलें तर तो पर्याय कांही वेगळाच आहे. वेद पाहिला, तर त्यांत कांही वेगळेंच आहे. वेदांत अवतार आणि नाना प्रकारचा देवता आणि व्रतें हें कांही नाही. फक्त होमाशीं कारण आहे. याचा मेध, त्याचा मेध हें सर्व त्यांत आहे. तेव्हा वेदशास्त्र व पुराणें यांचा धर्म पाहिला, तर अगदी वेगवेगळा दिसतो. पुराणांत नित्य कर्म पाहिलें, तर सगळा एक दिवस करावयास पुरणार नाही, इतके धर्म त्यांत आहेत; पण त्यांत कांही नीति आहे, असेंही नाही. कासोटा असा घालावा, गंध असें लावावें, शौचास अमुक कोस जावें, तोंड असें धुवावें, हेंच फार आहे. याप्रमाणे नेम करणारांस काय वाटलें असेल, तें त्यांचें त्यांसच ठाऊक. बरें, असो.

याचा आजपर्यंत कोणींच विचार केला नाही. अलीकडे भट वगैरे

झाले, यांनी कांही ग्रंथ केले आहेत; पण ते त्यांहून अधिक. गोपीनाथ भट-जींनी अमुक भट्टी केली; गणेश भटांनी अमुक भट्टी केली. अशा शेकडो भट्ट्या केल्या आहेत; परंतु त्यांत आहे काय? संस्कृताचा अर्थ फार लोकांस कळत नाही, परंतु जर त्यांचा अर्थ कळावयाजोगा असतां, तर मला वाटतें की, लोक मागेच ते ग्रंथ समुद्रांत नेऊन टाकते; परंतु ते भ्रमांत आहेत. बरें, भरली मूठ सव्वा लक्षाची आहे. तेंच बरें. श्राद्ध करावयाची कल्पना लिहा-वयास पन्नास पत्रें लागलीं आहेत. तसेंच हर एक संस्काराचा रीति फार मूर्खपणाच्या आहेत.

लग्नाचा, उष्टावणाचा, देवपूजेचा पद्धति आणि कोणतें कर्म असें नाही की, त्याविषयी ग्रंथ नाही. शौच्यविधीवरदेखील एक ग्रंथ आहे. त्यांत मनुष्यांनी शौच कसा करावा, हेंच लिहिलें आहे. वास्तविक पहा बरें, याचा कांही उपयोग आहे काय? कशाला भट या संस्काराच्या कंठाळभर पोथ्या बाळगतात? यांत काय आहे? यांचा काय उपयोग? लोकांचें सुख व ज्ञान वाढवावयाची त्यांत एकदेखील गोष्ट नाही. मूर्खपणा वाढावयाच्या गोष्टी आहेत. त्या ग्रंथांनी वेड लावलें, एवढें मात्र झालें.

अज्ञान्यास अजरामर करण्याकरिता या पोथ्या लिहिल्या आहेत, असें मला वाटतें व त्यांची फजीती होऊं नये, म्हणून त्या गुप्त ठेवितात. कोणीं शोहूं नयेत, व कोणीं अकस्मात्‌च वाचूं नयेत म्हणतात, याचें कारण हेंच. जर त्यांत खरें ज्ञान असतें, तर कोणीही वाचलें तरी चिंता काय? परंतु ग्रंथ लिहिणारांची खात्री होती की, हें गुप्त ठेवलें, तर त्यांचें माहात्म्य राहील. हे भुसाचे लाडू आहेत, हें त्यांस माहीत होतें. या प्रमाणे हे भट वेडे झाले आहेत. मनुष्य कांही उद्योग करील किंवा विचार करील, तर त्यास या भटांचे संगतीने वेळ सापडावयाचा नाही.

हल्ली कर्नाटकांतील एक सरदार बाजकडे पाहिलें, म्हणजे समजतें की, त्याचा वेळ हातपाय धुण्यांत जातो. दिवसांतून दोनशे वेळ पाय धुतो.

पांचशे वेळ चूळ भरतो! यास हें काय वेड किंवा शहाणपण आहे?

तसेंच बाजीरावाकडे पहा. हा पुरुष मराठ्यांचे राज्यास बुडविण्यास कारण झाला. असें कां झालें, याविषयी विचार केला, तर इतकेंच दिसतें की, यास जन्मापासून नाना फडणिसानें कोपरगांवीं भटाचे शाळेंत ठेवला होता, म्हणून मोठेपणीं केवळ भटच निपजला. याचा राजकीय गुणाचे अंकुर जळून गेले. याप्रमाणे पूर्वीचे पेशवे भटांचे शाळेंत नवते. कोणी असें म्हणतात की, राज्यास अयोग्य व्हावा, म्हणून नाना फडणिसाने त्यास बुद्धया भट केला; परंतु तोच राज्यावर आला, हें देशाचें प्रारब्ध. अस्तु. त्यास वेड लागलें. त्याने राज्य केव्हा करावें, कारभार केव्हा करावा आणि हें नित्य कर्म केव्हा करावें, हें जाणलें नाही..

आणि या कर्मांचा फायदा काय? जोंपर्यंत निर्मळ वाटे, तोंपर्यंत कोणीही हात धुतोच आहे. त्यास अमुक वेळ हात धू, म्हणून सांगावयास कशास पाहिजे? परंतु इतक्या मूर्खपणाचा गोष्टीस ब्राम्हण मात्र मान देतात. आणि कोणी उपास, कोणी व्रतें, कोणी जप, कोणी अनुष्ठान, असें सगळा दिवसभर करितात. जाजवळ पैसा आहे, त्यास भट घेरतात, आणि हा उपदेश करितात; आणि पुराणिक बावास घेरतात व वेड लावतात. कोणी सांगतो आवळीचे झाडाखालीं जावें, पूजा करावी, कापुसाचा वाती जाळाव्या. त्याप्रमाणे अज्ञान बायका करितात. हें वेड त्यांस भट लावितात.

हें सर्व यांनी सोडून दिल्याखेरीज यांची बरी गत मला दिसत नाही. मग ईश्वराची इच्छा.

---

पत्र नं० ६२ ३ जून १८४९

## ब्राम्हणांची शिक्षणपद्धति

सांप्रत ब्राम्हण लोक हे कांही उपयोगी नाहीतसे झाले आहेत. याचें कारण त्यांस सरकारी काम सांगितलें, तर लाच खातात;

लोकांस उपद्रव करितात व आपले जातीचा अभिमान धरतात. येणेंकरून महार, चांभार इत्यादि जातींस त्यांचेपुढे येण्यास देखील योग्यता नाही, असें म्हणतात.

तस्मात् यांनी भिक्षा मागून वनांत रहावें, हेंच काम यांस चांगलें योजिलें होतें; परंतु तें सोडून या गृहस्थीपणांत, सरदारींत व कारकुनपणांत यांस कोणीं बोलावलें बरें ? यांचेवाचून अडलें होतें काय ? ते आपले संतोषाने दुसरे व्यापार करूं लागले. तेव्हा आता त्यांस हें योग्य आहे की, त्यांनी आपल्यास व दुसऱ्यास सारखें मानावें, हें खरें. ब्राम्हण लोक अनिवार झाले आहेत, व मूर्ख आहेत. याचें कारण त्यास सुशिक्षा नाही. ब्राम्हणाचा मुलगा सातआठ वर्षांचा झाला, म्हणजे त्याची मुंज करतात. नंतर भट व पंतोजी यांचे स्वाधीन होतो. आणि त्यांस ज्ञान, उपदेश किंवा कलाकौशल्य-विद्या हें कांही एक शिकवीत नाहीत, ईश्वराचें भय व आपला वास्तविक धर्म त्याचे मनांत कशाने येईल ?

श्रीमंताचें पोर असलें, तर त्यास भट वेद शिकवितात, व तो फक्त पाठ करवितात. मग तो मुलगा, जसा त्याचा गुरु टोणपा, तसा त्याचा शिष्य टोणपा होतो. बरें, ब्राम्हणास जा रीतीने वेद शिकवितात, त्याचा कांही तरी उपयोग आहे ? फक्त अक्षरें तोंडाने उरांत रक्त पडे तोंपर्यंत घोकून पाठ करितात. त्यापेक्षा दगड फोडावयाची मजुरी का सांगत नाहीत ? अक्षर मराठीं झालें, म्हणजे मुलगा शहाणा झाला. बाप म्हणतो माझा मुलगा रुद्र पाठ म्हणतो, पवमान पाठ म्हणतो, आणि भटाचा लोढ्या मूर्खपणाचा गोष्टी ऐकतो. तो असा दृढमूर्ख होतो की, त्याचे मनांत जें येतें, तें मोठें दृढ होतें; कदापि निघत नाही.

त्यास वाटतें पृथ्वी शेषावर आहे. ग्रहणांत राहू चंद्रास खातो. हिंदुस्थानाएवढीच पृथ्वी. पलीकडे गतीच नाही. ब्राम्हण सर्व जगांत श्रेष्ठ, भूदेव. जितक्या विद्या आहेत, त्या सर्व शास्त्रांत आणि पुराणांत आहेत. त्याखेरीज कांही नाही. वेदाचा अर्थ करूं नये. पुराण, शास्त्र ब्राम्हणांखेरीज

कोणी वाचूं नये. परदेशास गेलें, तर भ्रष्ट होतों. अशा नाना प्रकारचा समजुती त्यांचा पडून ते शतमूर्ख होतात.

अशीं थोर श्रीमंतांचीं मुलें पुण्यांत मला शेकडो आढळतात. व मोठाले वयोवृद्ध कित्येक आहेत, त्यांची तर संख्याच नाही. वर्तमानपत्रें व बुकें या द्वाराने ज्ञान मिळविणें, हें तर त्यांचे कुळाचे शत्रु. वाचणें व लिहिणें त्यांचे बापाचे वैरी, असे लोक आहेत. यांस ईश्वर कोणत्या रीतीने ताळ्यावर आणील तें आणो. ईश्वराने ब्राम्हणांचा गर्व हरण करावयास दरिद्रांजन योजिलें आहे. तरी त्यांचे डोळे अजून उघडत नाहीत. शास्त्रं, पुराणें घेऊन बसतात. पुराणांत मूर्खपणा भरला आहे व तीं फक्त ब्राम्हणांस लाभ होण्याकरिता केलीं आहेत. यास्तव मला वाटतें की, ब्राम्हणांची मुंज झाली, म्हणजे त्यांस विद्या पढवावी. कांहीं चांगले ग्रंथ नवीन पद्धतीचे करून त्यांत नीति व ईश्वराचा भजनाचा गोष्टी घालून व इतर भूगोल, खगोल इत्यादि वास्तविक आहेत, तशा गोष्टी लिहून ते ग्रंथ पढवीत जावे. म्हणजे मूर्खपणा जाऊन तो मुलगा चांगला तयार होईल. असे ग्रंथ कोणीं तरी केले पाहिजेत.

नाहीं तर हे लोक सांप्रत काळचा शिक्षेचे रीतीने फारच मूर्ख होतील. शास्त्री, पंडित आणि त्यांस होय होय म्हणणारे गृहस्थ, हे काय बोलतात तेंदेखील त्यांस कळत नाही. कोणी गोष्ट सांगतो की, सप्त समुद्र आहेत. कोणी म्हणतो मेरु मध्ये आहे. कोणी म्हणतो, सात समुद्र रथाचा चाकांनी पाडले. कोणी म्हणतो अगस्ति मुतला. यांचे तोंडास कोणी हात लाववा ? असें बोलणें ऐकून मला वाटतें की, हे इस्पितळांतले वेडे आहेत काय ? कोणी म्हणतो हे इंग्रज जलचर (पाण्यांतले रहाणारे) आहेत. कोणी म्हणतो, ते वानर आहेत. कोणी म्हणतो त्यांस रामाचा वर आहे. तेव्हा माझे मनांत येतें की, तुम्ही बोलतां हे डुकर आहां !

शेकडो लोक संभावित, सरकारचे चाकर, मोठे कामावर आहेत; पण त्यांस शपथ जर घातली की, तुम्ही आपले कामाशिवाय कधी कांहीं ग्रंथ

किंवा कांही वाचलें होतें काय ? तर ते गंगाजळ हातांत घेऊन सांगतील की, नाही. असे अक्षरशत्रु आहेत. या लोकांस वाचणें ठाऊक नाही. पाठ करणें ठाऊक आहे. 'प्रातःस्मरामि' पाठ करितात. देवपूजा पाठ करितात. भट तर दशग्रंथ पाठ करितात. व कित्येक मूर्ख 'जटापाठी' आहेत, म्हणजे मागेपुढे, उलटींसुलटीं अक्षरें पाठ करितात. याचा उपयोग काय ?

पण या ब्राम्हणांचा केवढा मान लोक करितात ! घनपाठी बुवांस शालजोडी द्या, रुपये द्या आणि मूर्खपणा वाढवा. कित्येक जुन्या ठशांचे लोक शोक करतात की, वेदविद्या बुडाली; पण महाराज, ही विद्या हवी कुणाला ? पाठ करावयाची मजुरी कशास ? अर्थसहित दोन अध्याय कां म्हणा ना ? त्यांतील ज्ञान समजून घ्या. म्हणजे दोन अध्याय अध्ययन घनपाठी टोणप्यापेक्षा बरें. पाठ करावयाची ही विद्या कोणत्याही देशांत नाही. एकएक अक्षर मागे-पुढे, उलटें-सुलटें पाठ केलें, म्हणजे कांही दूध निघतें कीं काय ? सार्थ वेद म्हणावा. मग तो किती कां होईना ! दशग्रंथी म्हणून मिरवतात कशाला ! हे तर मला बैल असे वाटतात. याजकरिता मी प्रार्थना करतों की, हा मूर्खपणा सोडून वाटेवर यावें.

---

पत्र नं० ७१ १२ आगष्ट १८४९

## भटांचा विद्येचा निरुपयोग

पूर्वी एका पत्रांत सांप्रत काळचे ब्राम्हणांचे स्थितीविषयी लिहिलें होतें. त्याचा जबाब पुण्यांतील 'ज्ञानप्रकाश' पत्रांत नंबर २२ यांत एका 'यथार्थवादी'ने दिला आहे.

त्यांत त्याणे आमचे सहा निबंध कबूल केले आहेत. (एक) ब्राम्हण अज्ञान; (दुसरा) अर्थ समजल्यावाचून ते जप वगैरे करितात, हें ठीक नाही;

( तिसरे ) देवाविषयी त्यांस कांही कळत नाही; ( चौथे ) मनुष्यांनी कसें वागावें हें समजत नाही; ( पांचवें ) हल्लीचे ब्राम्हण हे कनिष्ठ जातीपेक्षा चांगले नाहीत व ( सहावे ) ते गर्विष्ठ फार. या सहा निश्चयांचें त्याणे उत्तर दिलें आहे, परंतु त्याचें उत्तरांत कांही अर्थ दिसत नाही. याणे केवळ भटासारखें लिहिलें आहे. शेवटीं आपणच म्हणतो की, हल्लीचा मूर्खपणा ब्राम्हण सोडतील तर बरें होईल ! अस्तु.

याचा भाव पहिले उत्तरांत असा आहे की, मला सर्व ब्राम्हणांची हकिकत कशी समजली ? याचें प्रतिउत्तर असें आहे की, सर्व ब्राम्हणांची हकिकत समजावयास काय अवघड आहे ? ब्राम्हण अज्ञानी किती आहेत, याचें वर्णन मीं किती करावें ? भटांत व अति-शूद्रांत मला इतकेंच अंतर दिसतें की, एक बोलता राघू व एक न बोलता राघू, परंतु ज्ञान एकच. ब्राम्हण वेद वगैरे पाठ म्हणतात; परंतु अर्थज्ञतेविषयी उभयतांची योग्यता समान आहे. अतिशूद्र गरीब, ते आपला लहानपणा जाणतात; परंतु भट मूर्ख असून ज्ञानी समजतात व गर्व करितात, हा एक त्यांमध्ये दुर्गुण अधिक आहे. हें जाचे मनास ठसावयास हवें असेल, त्याणे वेदाच्या शाळेकडे पहावें. तेथें मुलें शिकतात काय? व देवाविषयी व आपले धर्माविषयी विचार करितात किंवा फक्त राघूसारखे पाठ करीत बसतात ?

भटांनी लोकांस किती वेडें लाविलीं आहेत ? व किती गैरसमजुती पाडल्या आहेत, त्याचा अंत नाही. ब्राम्हण भोजनादिक हा धर्म समजतात; परंतु निरुद्योगी माणूस भीक मागावयाचा व्यापार करितात आणि भिक्षेचा उपयोग कांही करीत नाहीत; विद्या वाढवीत नाहीत; अर्थेकरून अंतःकरण पवित्र करीत नाहीत; जिव्हेचा उपयोग मनास एकीकडे ठेवून करितात. त्यास धर्म केला असतां पुण्य कशाचें आहे ? जसें पात्रावर मिठापासून भातापर्यंत वाढलेलें असतें, त्याचप्रमाणे मनुष्यास मनापासून इंद्रियांपर्यंत ईश्वराने वाढून दिलें आहे. त्यांत मन हें उत्तम भाताप्रमाणे, त्याचा धिःकार करून लवणच जे भक्षितात, त्यांस किती मूर्ख म्हणावें ?

देशाचे हिताचे विचारांत ब्राम्हण आजपर्यंत कधी तरी पडले आहेत

काय ? पढावयाचें त्यांस सामर्थ्य तरी आहे ? व योग्यता आहे ? जर ऱ्या देशांत पार्लमेंट झालें आणि त्यांत सर्व जातींचे लोक पाठविले, तर त्यांमध्ये महारापेक्षा भट अधिक शहाणपणाने आपले देशाचे हितांविषयी बोलतील काय ? व कोणत्याही गावांत पहा की, गावचा कुळकरणी, जोशी हे ब्राम्हण असतात; याजमुळे त्यांजवर कपटाच्या व खोटे कागद-पत्रांच्या वगैरे फिर्यादी होतात व वास्तविक हे लोक रयतेस बुडवितात. व साक्षीही खरी देत नाहीत. याजमुळे ब्राम्हण कुळकरणी यांस शिक्षा होऊन ते तुरुंगांत बहुत पडतात. व गावचे महाराची साक्ष खरी समजतात, व ते अडाणी असून गावची चाकरीही नीट करितात; कुळकरण्यापेक्षा गावकऱ्यास कमी ठकवितात व दगाबाजीही कमी करतात. व हक्काची चाकरी करून हलाल खातात, तसें कुळकरणी करीत नाहीत.

याजवरून ब्राम्हणांची योग्यता समजती. मोठे शहरांत पहाल, तर तुम्हांस असें वाटेल की, इतके भट येथे आहेत, यांस खावयास मिळतें, त्याबद्दल हे कोणती चाकरी करितात ? असें जर मनांत आणिलें, तर तुम्ही काय म्हणाल ? मला तर एक मनुष्य दाखवा की, भटांनी शाळा घालून कोणी तयार केले किंवा कोणास विद्वान् केलें, किंवा ग्रंथ केले, किंवा ज्ञान सांगितलें किंवा लोक सुधारले किंवा मजुरी केली, असें कांहीतरी मला या भटांचें व भिक्षुकांचे खाण्याचे मोबदला त्यांचा उपयोग दाखवा ! चांभाराचा उपयोग मी तुम्हांस सांगतों व दर एक मनुष्याचे पायांत जोडे दाखवितों. तुम्ही आम्हांस भटांची निशाणी दाखवा. बाजीरावाकडून भटांनी व शास्त्री यांणी भलभलतेंच सांगून अनुचित कर्मे करविलीं. व मुलखास लुटून आपण केशरी भात जेवले. राजास नीति कांहीच सांगितली नाही. फक्त ब्राम्हणभोजनें घाल म्हणून सांगितलें. आणि कलियुगाचा कर्ण म्हणून त्याचें वर्णन केलें. आणि बिघडवून राज्याचा व त्याचे कुळाचा सत्यानास केला. याचें कारण हे भटच आहेत.

## भटांचा विद्येचा निरुपयोग

असे जे हे ब्राम्हण लोक, यांचे शहाणपणाचें प्रतिपादन 'यथार्थवादी' करितो. त्याणे कांही तरी नांवासारखी करणी करावी. त्याचे बोलण्यांत जर कांही वास्तविक भाग असला, तर मी कबूल करीन. माझे द्वेषी कोणी आहेत, असें नाही; परंतु मी जाचें अज्ञान त्यास कळविण्याकरिता झटत आहें, परंतु तें ग्रहण करण्यास ब्राम्हणांस इतकें अवघड पडलें आहे की, त्यांस बोध न होतां निन्दा वाटते. भट व शास्त्री हे अमुक कामास लावावयाचे उपयोगी आहेत, हें कोणी तरी सांगावें. यांस मरणाचे समयीं बोलावलें तर ईश्वराविषयी कांही न सांगतां द्रव्य हरण करतील. व ते असें म्हणतील की, कांही पैसा असला तर सर्व प्रायश्चित्त करा आणि आमचे हातावर उदक सोडून आम्हांस द्या, म्हणजे तुम्ही देवाजवळ जाल. अशी पैसा काढावयाची तजवीज सांगतील. श्रीमंताचे घरीं भट गेला, तर सर्व सांगेल आणि गरिबाचे घरीं गेला, तर त्याजजवळ पैसा नाही, असें पाहून त्याचे मनांत येईल की, हा भिकारी, यास मोक्षास नेण्यास पैशाशिवाय मी काय सांगूं? पैसा असता तर मग कांही तरी सांगितलें असतें. पैशाशिवाय ईश्वरप्राप्ति होत नाही. जे द्रव्यवान् तेच धर्म करून देवाजवळ जातात. हें मत ब्राम्हण लोकांमध्ये चालू आहे. त्याप्रमाणे भट गरिबाजवळ मुळीच जाणार नाहीत. श्रीमंतांजवळ पैसा काढावयाकरिता जमतात. अशी या भटांची वर्तणूक आहे.

भट एखाद्याचे घरीं त्याचा नातलग असला, म्हणजे यजमानाचे मनांत त्यास कांही तरी पोचवावें असें असतें. मग भट सांगूं लागतो की, चार महिने नित्य दान करावें, रोज देवापुढे पैसा ठेवावा. नैवेद्यास रोज साकर असली पाहिजे. असें सांगून तें सर्व आपण घेतो. याप्रमाणे यजमानापासून शेपन्नास रुपये मिळवून निर्वाह करितो. बरें, यांत कांही उपयोग किंवा धर्म झाला काय? प्रत्येक गृहस्थाचे घरीं भट म्हटला म्हणजे बहुधा बायकोचा भाऊ असतो. याप्रमाणे नातीं असतात. मग बायकोही आपल्या भावास पैसा पोचविण्याकरिता नवऱ्यास सांगते की, पुढे चातु-

-मास भाला आहे; दर व्यतिपातास गोप्रदानाबद्दल दोन रुपये देत जा. मग ते आपले भावास देवविते. याप्रमाणे किती एक लोक ठकले जातात; परंतु हा व्यय कांही चांगला झाला कीं काय? याप्रमाणे माझें उत्तर पहिल्या कलमाचें आहे.

आता दुसरे कलमाचा जबाब लिहिला आहे, त्याचें उत्तर. परमेश्वराचें स्मरण करितात, असें 'यथार्थवादी' म्हणतो; परंतु कोणता ब्राम्हण देवाचें स्मरण करतो ? जर कोणी मरण पावत असला किंवा श्राद्ध असलें, तर ब्राम्हणाचें स्मरण करण्याची रीति अशी आहे की, वेदाचे दोनचार वर्ग मोठ्याने म्हणतात; परंतु जो मरत असतो, त्यास किंवा जो म्हणतो, त्यास त्यांतील अर्थ कांही समजत नाही. ईश्वराचें स्मरण करण्यांत कांही तरी ईश्वराचा विचार झाला पाहिजे. जे २४ पाठ गीतेचे किंवा विष्णुसहस्रनामाचे ३०० पाठ करितात, किंवा कोटिलिंगें सकाळपासून सारा दिवस करितात, त्यांजकडून वास्तविक कांही भजन झालें कीं काय ? व त्यास ईश्वराजवळ गति मिळेल कीं काय ? व त्यांस आपण लहान, मनुष्याची शक्ति लहान असें वाटेल कीं काय ? आपण पापें बहुत करतों, हें आठवून ईश्वराची दया व क्षमा त्यांस मागतां आली कीं काय ? जे नित्य पाठ करितात आणि अर्थ समजत नाहीत, ते ईश्वराविषयी काय समजले? व त्यांचें अंत:करण व मन शुद्ध कसें झालें ? कपाळाशीं भट कटकट करितो, तेणें-करून त्यांचें अंत:करण बरें झालें काय ? व जे अर्थ समजत नाहीत, ते परमे-श्वराचे वचनावर भरंवसा ठेवून कसे चालतील ? जर मुनसफास कानडी गोष्ट येत आहे, तर त्याजपुढे मराठी कायदा ठेवला आणि त्याजवर जुलूम करून त्याजकडून पाठ करविला आणि त्यास कांही अर्थ त्यांतील समजला नाही, तर तो मुनसफ त्या कायद्याप्रमाणे फैसले करील काय ? तसेंच हे जप करणारे भट वगैरे लोक ईश्वरास आपले बडबडीने प्रसन्न करतील काय ? निंदा खरी असेल, तर तो बोध म्हणावा; निंदा म्हणूं नये, हें 'यथार्थहित-वादीचे' मनांत कां येत नाही ?

---

पत्र नं० ७२ २६ आगष्ट १८४९

# ब्राम्हणांचें ईश्वरी ज्ञान

मागील पत्रांतील अवशेष मजकूर राहिला आहे, तो संक्षेपेंकरून लिहितों.

ब्राम्हणांस ईश्वराविषयी बहुत कळतें, असें 'यथार्थवादी' म्हणतो. त्याचें उत्तर असें आहे की, अमुक बरें आणि अमुक वाईट, हें प्रथम ब्राम्हणांस कळत नाही. लक्ष ब्राम्हणांची सभा असली व त्यांस एक प्रश्न केला तर उत्तर देतां येणार नाही. फार कशास, कोणासही इतकाच प्रश्न करावा की, जर कांदा खाल्ला तर नीतीस वाईट आहे काय? त्याचें उत्तर ब्राम्हण काय करतील तें पहा! ईश्वराविषयी ब्राम्हणांचें एकमत नाही. कोणी तीन ईश्वर म्हणतात; कोणी बहुत ईश्वर म्हणतात, कोणी वेदास ईश्वर म्हणतात; कोणी २४ पदार्थांस ईश्वर म्हणतात; पुराणें तर सर्वांस ईश्वर म्हणतात व व्याकरणी अक्षरास ईश्वर म्हणतात. याप्रमाणे अनेक भेद आहेत. ब्राम्हणांस ईश्वराविषयी खरें ज्ञान जर असतें, तर जीं हल्ली त्यांमध्ये वेडे आहेत, तीं नसतीं.

कोणी म्हणतात, ध्यावें तसें ध्यावें; किती एक म्हणतात, कष्टीं फळ आणि तपी राज्य. म्हणजे तप केल्याविना ईश्वर फळ देत नाही. कोणी म्हणतात की, ईश्वरानेदेखील कृष्ण अवतारीं लबाड्या वगैरे केल्या, अशीं उदाहरणें दाखवितात. किती एक गोष्टी मी ब्राम्हणांचे तोंडून ऐकल्या आहेत. व त्या अगदी वास्तविक विचारेंकरून ईश्वराचे जे गुण दिसतात, त्यांस विरुद्ध आहेत. किती एक म्हणतात की, ब्राम्हणांचे मुखीं पडलें की, देवाचे मुखीं पडलें. किती एक म्हणतात—"ते मंत्रा ब्राम्हणाधीनं" तस्मात् "ब्राम्हणो मम दैवतम्." किती एक म्हणतात की, ईश्वराचें भजन ब्राम्हणांचें भजन केल्यापोटीं आहे. किती एक ईश्वराची सेवा म्हणजे उपास वगैरे ब्राम्हणांकडून करवितात. किती एक म्हणतात की, ज्याच्या पुण्याचा प्रताप आहे, त्याजपुढे

देवाचा उपाय नाही. कोणी म्हणतात की, जग हाच ईश्वर आहे. दुसरे म्हणतात की, आपला जीव हाच ईश्वर आहे. तिसरे म्हणतात की, विष्णु ईश्वर आहे. चौथे म्हणतात, विष्णूस आयुष्य आहे व शिव ईश्वर आहे. आणखी म्हणतात की, संन्यास घेतल्यावाचून ईश्वर मुक्ति देत नाही. इत्यादि ईश्वराविषयी वाद आहेत. याजवरून ब्राम्हणांस किती कळतें, हें उघड दिसतें.

भट तर अगदीच मूर्ख; परंतु शास्त्री, पंडित, पुराणिक नीति, ज्ञान व धर्म जाणत नाहीत. मोठें नीतिविरुद्ध कर्म असलें, तरी तें क्षुल्लक मानतात. आणि मोठें वाईट कर्म आहे, तें चांगलें म्हणतात. त्यांत कांही पाप नाही, असें मानतात.

पांचवे प्रश्नाचें उत्तर देण्याची जरूरी नाही; कारण यथार्थवादीच्याने उत्तर देववलें नाही. केवळ कांही ल्याहावें म्हणून लिहिलें आहे. सहावें, किती एक ब्राम्हण अतिशय गर्विष्ठ आहेत. मला खचित दिसतें की, इतर लोक सुधरतील आणि ब्राम्हण लोक मागे रहातील; कारण त्यांस उपदेश ठीक वाटत नाही. सर्वांस तुच्छ मानून ब्राम्हण आपणांस सर्वांहून श्रेष्ठ असें समजतात. जरी त्यांमध्ये कांही श्रेष्ठत्व नसलें, तरी श्रेष्ठत्व भोगावें असें वाटतें. पैसा प्राप्त झाला, म्हणजे बाजीरावाने गंगाधर शास्त्री याजला मारलें, त्याचा दोष मानणार नाहीत. ब्राम्हण म्हणतात की, द्रव्य खर्च केल्यास सर्व दोष दूर करून देऊं. याजमुळे ब्राम्हणांसारखे नीच लोक कोणीच नाहीत. ते सर्व गुन्हेगारांस द्रव्याने पावन करितात. प्रायश्चित्त आडेकऱ्याप्रमाणे होतें. असे जर दोष जातील, तर मग ईश्वराचा न्याय कोठे राहिला? परंतु साधारण ब्राम्हण ईश्वराचा न्याय जाणत नाहीत व दुष्ट कर्मांची भीति त्यांस वाटत नाही. ते म्हणतात की, काय चिंता? कामदाराने पैसा खाल्ला तरी तो ब्राम्हणाच्या घरीं पडला, असें म्हणून लुटतात. आणि त्यांचीं कर्में पाहिलीं तर अखंडस्नें घालितात. परंतु तेथे एकटे ब्राम्हणांस मात्र सोय असते. दुसरा कोणी येऊं देत नाहीत. इतका पक्षपात करितात.

तात्पर्य, ब्राम्हण लोक हल्ली दुसरा कांही व्यापार करीत नाहीत. गरीब, अज्ञानी लोकांस लुटून आपला निर्वाह करितात. तेली असला म्हणजे त्यास सांगतात, तूं आपल्या घाण्याची पूजा केलीस तर तेल फार निघेल. असें म्हणून त्याजपासून चार रुपये काढतात. कुंभारास म्हणतात आव्याची पूजा केली, म्हणजे विटा चांगल्या निघतात. आणि शेतकरी कुणब्यास म्हणतात की, तुझ्या दाण्याची रास करून तिची पूजा करावी. म्हणजे तुला बरकत येईल. याप्रमाणे लूट आणि कपट करितात. वास्तविक पाहिलें, तर कुळंबी, माळी वगैरे अडाणी व नीच जातीचे लोकांस खरा धर्म व खरी नीति सांगावी आणि ढोंग व अज्ञान काढून टाकावें, परंतु ते बळेंच त्यांस अज्ञानांत ठेवतात. आपला चरितार्थ नीट चालावा व लोकांनी आळशांस खावयास द्यावें, इतकाच त्याचा हेतु आहे. ब्राम्हणांचा पक्ष घेतला, परंतु त्या पक्षास बळ नाही. कर्नाटकांतील स्वामी व आचार्य हे दिवसास लूट करितात. व लोकांस ठकावितात. मुद्रा देत जातात आणि अज्ञानी लोक त्यांस मान्य करतात आणि आचार्यांचें व स्वामींचें ज्ञान पाहिलें, तर मुद्रेने मोक्षास नेणार व पैशाने स्वर्ग दाखविणार, हीं त्यांचीं मतें किती खोटीं आहेत, हें सहज समजतें.

---

पत्र नं० ७५ १६ सप्टेंबर १८४९

## ब्राम्हणांचा लोभ

ब्राम्हण लोक यांची अलीकडची बुद्धि कशी आहे, याचे उदाहरणार्थ मी तुम्हांस एक प्रमाण लिहून कळवितों.

पूर्वी होळकरांनी व बाजीरावाचे बंधु अमृतराव यांनी पुणें शहर लुटून लोकांस मारिलें व पीडिलें. त्यांत किती एक मुलें व बायादेखील ठार मेल्या व किती एक बायांनी जीव दिले. याप्रमाणे द्रव्य हरण केलें. लोकांस

राखेचे तोबरे दिले आणि कानांत आणि बेंबींत बंदुकीची दारू घालून उडविली. धुऱ्या दिल्या. तक्त्यांत माणसें पिळलीं. तवे तापवून त्यांजवर उभीं केलीं, व तेल कढवून पोरांच्यादेखील अंगावर शिंपलें. इतकें करण्याचा हेतु की, लोकांनी लवकर पैसा द्यावा. तेव्हा किती एक निर्धन होते, त्यांस असें केल्याने ते मरण पावले. असे नाना तऱ्हेचे अन्याय व निर्दयपणाची व्यवस्था जो राजा म्हणवीत होता, त्यानेच केली. आणि असें अन्यायाचें द्रव्य चार कोटी रुपये घेऊन अमृतराव काशीस पळून गेले.

तेव्हा तेथील ब्राम्हणांनी हा पुष्कळ द्रव्य घेऊन आला आहे, याचें हरण कसें होईल, याविषयी तजवीज योजिली. आणि त्यास जातींत न घेण्याचा मनोरथ दर्शविला. आणि त्यास कळविलें की, तुम्ही अन्यायाने द्रव्य आणलें आहे. याजकरिता तुमचे पंक्तीस भोजन कोणी करणार नाही. तेव्हा अमृतराव हा मूर्खांचा शिरोमणि होता; त्याने त्यांचें भय मानिलें. मग ब्राम्हणांनी सांगितलें की, हें तुम्ही जें द्रव्य आणिलें आहे, त्यापैकी निम्मे ब्राम्हणद्वारा धर्मादाय करावें, म्हणजे तुम्ही जातींत याल. तेव्हा त्यांचें बोलणें कबूल करून त्याने मोठा धर्मादाय ब्राम्हणभोजनें, अन्नछत्रें, यज्ञ व नाना प्रकारचीं दानें काशीस केलीं. मग ब्राम्हणांनी त्यास जातींत घेतलें, व त्याची स्तुति करूं लागले. आणि तो दुष्ट अमृतराव सर्व प्रकारें शुद्ध केला.

आता याविषयी विचार केला, तर ब्राम्हण हे किती नीच व दुष्टाचा प्रतिपाळ करणारे आहेत, हें सहज लक्ष्यांत येतें, कारण की जा दुष्टाने द्रव्य अन्यायाने मिळविलें, तो ब्राम्हणांस द्रव्य दिल्याने शुद्ध झाला कसा ? जर त्या ब्राम्हणांनी असें सांगितलें असतें की, हें द्रव्य ज्यांचें ज्यांचें आणलें आहे, त्यांस व्याजसुद्धा परत पाठवावें, आणि आम्हांस यांतील कांही एक नको, तर कांही प्रायश्चित्त मात्र होतें.

परंतु हे लोभिष्ट ब्राम्हण. यांस न्याय, दया नाही आणि धर्म नाही. केवळ आपल्या नफ्यावर दृष्टि ठेवून कितीही अन्यायाने कोणी द्रव्य मिळ-

विलें असलें, तरी त्याची स्तुति करतात. आणि जर कोणी न्यायाने द्रव्य मिळवून त्यांस दिलें नाहीं, तर त्याची खचित निंदा करण्यास चुकत नाहीत. म्हणतात की, अहो, या गृहस्थाकडे केवढा रोजगार? या कामावर दुसरा होता, तो केवढा खर्च करीत होता. धर्म किती? ब्राम्हणांचा सन्मान किती? किती वेळ इच्छाभोजनें? किती दक्षणा देत असे? तो पुरुष दैवशाली होता. त्याचे हातून ब्राम्हणांस पोचलें; परंतु हा हल्लीं जो मनुष्य आहे, त्यास कांहीं द्रव्य मिळवितां येत नाही. हा केवळ हाडकपाळी आहे. लग्न केलें, मुंज केली, पण कधी सभा किंवा दोन हजार ब्राम्हण घरीं जेवले, असें झालें नाहीं. व्यर्थ याचा जन्म आहे! मोठा अधार्मिक! असा त्याचा डांगोरा पिटीत फिरतात. याजमुळे सांप्रतचे गृहस्थ व कामदार यांस त्यांनी भ्रमांत घातलें आहे.

कामदारांस असें होतें की, मी अन्यायाने द्रव्य मिळवीन; परंतु यांचीं तोंडें बंद करीन तर बरें. नाही तर मी चौघांत चांगला दिसणार नाही. इतके दिवस दक्षिणेंत इंग्रजांचें राज्य आहे. त्यापैकी जे कामदार झाले, त्यांत बाबा भिडा, ठाण्यांचा प्रिन्सिपल सदर अमीन हा लाच खात नसे, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. परंतु सर्व ब्राम्हण त्याची निंदा करितात. त्याचे गुण पहात नाहींत. आणि तो जेवावयांस घालीत नव्हता, हा द्वेष करून त्याविषयीं वाईट बोलतात.

तस्मात् भट लोक जे आहेत, हे केवळ भाडेकरी; परंतु मजुरदारासारखे नव्हत. मजुरदार मजूरी करून उगेच रहातात; परंतु हे मजुरी करण्यांत लोकांची नीति बिघडवितात. आणि त्यांमध्ये अज्ञान वाढवून दुर्गुणवृद्धि मनापासून करितात. त्यांतील मुख्य समजुती अशा आहेत की, सर्व दानधर्म ब्राम्हणद्वारा. ब्राम्हणाखेरीज पैसा दिला, तर तो धर्म नव्हे. आणि भटांच्या युक्ति तरी किती आहेत? त्या अशा की, पिंपळाचा पार बांधावा, अशी आज्ञा शास्त्रांत आहे; परंतु पार कोणीं बांधला तर, ब्राम्हणाकडून मुंज करवावी लागते. म्हणजे पाराइतकें द्रव्य

त्यांस मिळतें. याप्रमाणे सर्व ठिकाणीं ब्राम्हण द्रव्यहरण करण्यांत हुशार.

घर बांधिलें तर ब्राम्हण पाहिजे. मंडप घातला तरीदेखील तो पाहिजे. लिहावयास आरंभ केला तर भट पाहिजे. सर्व प्रकरणांत लहानथोरांस भटाशिवाय होत नाही, अशी समजूत लोकांची पाहून त्यांस असे दृढ केले आहेत की, जर इतर जातीचा मनुष्य मरत असला, तर कोणा गृहस्थास दया येत नाही. पण भटांचीं सहस्रभोजनें करितात. कारण त्या गृहस्थास असें वाटतें की, यांत लोकांस व इतर कामांस भटांखेरीज जो पैसा जाईल तो व्यर्थ. त्याचें फळ ईश्वर देणार नाही. याजकरिता सांप्रतचे गृहस्थांची व्यवस्था अशी आहे की, ते पाहिजेत तशीं कर्मे करून द्रव्य मिळवितात. व त्याचे बहुधा दोन हिस्से करितात. एक घरांत रहातो व दुसरा भटांकडे जातो. याजमुळे आळस फार वाढला आहे आणि उपयोगीं कामें व व्यापार सर्व बंद झाला.

गृहस्थ पन्नास हजार रुपये मरतेवेळेस किंवा लग्नांत खर्च करील; परंतु एक पैसाही ज्ञानवृद्धीस, व्यापारास किंवा लोकसुखाकडेस उपयोग व्हावा, म्हणून खर्चणार नाही. तेव्हा अशी जा ठिकाणीं व्यवस्था आहे, तेथे लोक कसे सुधारतील ? ब्राम्हणांचा दुसरा एक चमत्कार आहे; तो असा की, उपास, पूजा व सर्व धर्मकृत्यें ते मजुरीने करतात. व पुण्य विकत देतात. हा एक मोठा विलक्षण चमत्कार आहे. दुसऱ्याबद्दल उपास करावा आणि त्यास पुण्य विकावें, याचा अर्थ काय ? जर कोणास ताप येत असला, तर तो भटास उपास करावयास सांगतो आणि भटापासून पुण्य विकत घेतो. म्हणजे आठचार आणे भट घेऊन यजमानास सांगतो की, तुमचें व्रत मोडलें नाही. तुम्ही उपास केल्याप्रमाणेच फळ आहे, अशी युक्ति करतात.

याशिवाय हजारो तऱ्हेने लोकांकडून पैसा काढतात. हिंदु लोकांची सुधारणा होण्यापूर्वी भटांनी विद्या जरूर शिकली पाहिजे, उद्योग केला पाहिजे. किंवा इतर लोकांनी भट हे बेवकूब आहेत, असें समजून त्यांचा

कुजलेले फळासारिखा त्याग करावा. आणि आपल्यास दान करणें तर चांगल्या रीतीने विद्यावृद्धीकडे करीत जावें. असें केल्यानंतर भट अर्थातच मोडतील आणि वास्तविक विद्वान पुढे सरतील. आजचा काळीं लोकांपाशी भटामुळे पैसा उरत नाही. याजमुळे ते बहुधा विद्यावृद्धीस प्रतिकूल आहेत.

सांप्रत दोन्ही पक्ष, भट व गृहस्थ व इतर जातींचे लोक हे सर्व सारखे मूर्ख आहेत. यांपैकी कोणी तरी शहाणा पाहिजे व कोणास तरी दुसऱ्यांशीं कसें वागावें, हें समजलें पाहिजे. सांप्रत भट व इतर लोक अज्ञानांधःकाराने भ्रमिष्ट होऊन चालले आहेत. यास्तव लोकांनी विचार करावा आणि याचा उपाय योजावा. भट विद्वान होतील आणि पाठ करणें सोडतील, तर चांगलें होईल.

---

पत्र नं० ९६

## ब्राम्हणांचे पुढारीपणापासून अनहित व वेदान्त

आमचे लोकांत ब्राम्हण पुढारी झाले, याजमुळे फार घात झाला. जर कुळंबी, क्षत्री इत्यादिक पुढारी असते, तर बरें होतें.

कारण ब्राम्हणांच्या हातापायांत बिड्या आहेत. त्यांस जर सांगितलें की, पृथ्वीवर बहुत देश हिमालयाचे पलीकडे आहेत, तर ते खोटे म्हणतात व उत्तर समुद्राचा अंत नाही, असें म्हणतात. बरें, या गोष्टींचा शोध करण्याकरिता आपण फिरावयास जाऊन स्वनेत्राने सर्व देश पाहून येत नाहीत. आमचे लोक इंग्रज लोकांच्या सर्व गोष्टी व भूगोलविद्या मिथ्या म्हणतात. तर स्वता पाहून येण्याकरिता पैसा खर्च करून फ्रान्स, पोर्तुगाल, चीन, विलायत, उत्तर समुद्र व लापलंड इत्यादिक देशांत फिरावयास ब्राम्हण पाठवून त्यांचे हातून लिहून बखरी आणून प्रसिद्ध कराव्या, म्हणजे लोकांची भ्रांति जाईल आणि लोकांवर उपकार होतील. परंतु ब्राम्हणांस परदेशांत जाण्याचा प्रतिबंध आहे. याजकरिता हें

व करून उगेच बसल्या जाग्यावर लंका बिभीषणाचें राज्य, दुधाचा समुद्र, सोन्याचीं जांभळें इत्यादि पुराणांतील मत खरें असेंच म्हणत असतात. याजमुळे इतर जातींचे लोक अधिक भ्रांतींत पडतात. जर हे दुसरे जातीचे लोक पुढारी असते, तर परदेशांत जाते व ब्राम्हण लोकांचे डोळे उघडते; परंतु तें आता घडत नाही. ब्राम्हण लोक प्रतिबंधांत पडले व त्यांच्यामुळे इतर जातीचे लोक सर्व प्रतिबंधांत पडून आंधळयासारखे घरच्या उम्बऱ्या-पर्यंत चाचपीत बसले आहेत, हें मोठें वाईट झालें.

आता ब्राम्हणांचे प्रतिबंध मोडून त्यांस बाहेर काढावयास व त्यांच्या जुन्या समजुती सर्व मोडावयास बहुत काल लागेल; परंतु त्यास कांही उपाय नाही. जे मराठे राजेवगैरे आहेत, ते ब्राम्हणाधीन आहेत. याजमुळे ते कांही उद्योग करील नाहीत व स्वता त्यांस लिहितांवाचतां येत नाही. त्यांस कांहीच खबर नाही. जवळचे ब्राम्हण असतात, त्यांस तर या सर्व गोष्टींचा कंटाळा आहे. याजकरिता ते आपलेबरोबर नावेंत सर्व लोकांस बसवून बुडत आहेत व त्यांस बाहेर काढावयास इंग्रज लोक यत्न करताहेत; परंतु हर्त आमचे लोकांची संख्या जास्ती आहे. याजमुळे इंग्रज लोकांचा उपाय चालत नाही.

हे वेडे लोक पाहून मला तर फारच दुःख वाटतें, व जे दयाळू आहेत, व जे लोकांचें हित इच्छिणारे आहेत, त्यांस असेंच दुःख वाटेल. जे भिकारी आहेत, ते कांही बरे आहेत. दरिद्राचे योगानें ते कांही तरी गोष्टी ऐकतात. परंतु श्रीमंत लोक व ब्राम्हण जातीचे मनुष्य हे तर फार अंदाधुंद आहेत. ब्राम्हणांस घरीं रहाण्यापुरती सोय झाली म्हणजे पुरें. तो आपल्या ठिकाणीं मस्त होऊन पुराणांतील गोष्टी वाचीत बसतो, किंवा वेदान्त काढतो, म्हणजे हें सर्व मिथ्या. या लोकांस सुख होऊन तरी उपयोग काय? व यांचे कल्याणास झटावें कशास? असें त्यास वाटतें. हें सर्व मिथ्या म्हणतो. कोणी "बालोन्मत्त पिशाच्चवत्" असें भागवतांत आहे, ती वृत्ति धारण करून वेड्यासारखे फिरतात आणि माझा जीव ईश्वरास मिळाला, व

मी जीवनमुक्त आहें, असें समजून शेवटीं संन्यास घेतात. म्हणजे देहाचें सार्थक झालें, असें त्यांस वाटतें. आणि दगडासारखे पडतात. सर्व आशा, रुचि बळेंच सोडितात आणि निरुपयोगी होतात. ही वेदान्त्यांची स्थिति.

कर्मठ आहेत ते अग्निहोत्र घेऊन बसतात, म्हणजे यज्ञयागांत सरासरी जन्म व्यर्थ जावा, अशी तजवीज करितात. लोक आंधळे आहेत, त्यांस डोळे द्यावे, ज्ञान शिकवावें, व सुखी होण्याचे मार्ग दाखवावे, हें मनांतदेखील आणीत नाहीत. असे मूर्ख असतात. भट, वैदिक, शास्त्री यांच्या बुद्धीचा प्रकाश तर सर्वांस दिसतच आहे. याप्रमाणे बहुतकरून ब्राम्हण लोक आळशी किंवा मूर्ख असतात, यांचीं चित्तें लोकांकडे नाहीत. वेदांती आहेत, त्यांस असें समजत नाही की, आम्ही लोकांस मिथ्या मानलें, तरी लोक मिथ्या झाले कीं काय? अवर्षणांत लोकांस धनधान्यसमृद्धि मानिली, तरी झाली कीं काय? मानल्याने मिथ्या होतात कसे? तुम्ही आपल्या मनांत कांही तरी समजूत केली आणि लोक व जग हें सर्व खोटें आहे, असें म्हटलें, तरी इतके प्राणी सुखदुःखांत, अज्ञानांत व मूर्खदशेंत आहेत ते सुटले कीं काय? मग मानल्याचा उपयोग काय? रोगी बहुत आहेत, त्यांस वैद्याने निरोगी मानलें, म्हणजे त्यांचा रोग जातो कीं काय?

तद्वत् हे मूर्ख वेदांती आहेत. त्यांस मी म्हणतों की, तुम्ही आपणांस कांही नको असें म्हणा, व सर्व आशा सोडून ईश्वरावर भार ठेवा, हें चांगलें; पण व्यर्थ आयुष्य घालवूं नका व ज्ञान, विद्या, सुख इत्यादिकांचे वृद्धीस झटा. तुम्ही सर्व जग जरी मिथ्या मानलें, तरी आम्ही सर्वांनी असें मानलें नाही. याजकरिता आम्हांकरिता तुम्ही झटून आमचें कल्याण करा, म्हणजे तुमचा वेदांत खरा आहे. असा विलक्षण व आळशी वेदांत उपयोगी काय?

तुम्ही निराश झालेत, तर तुम्ही आपल्याकरिता कांही करूं नका. तुम्ही निराश व आम्हीच ईश्वर असें मानणारे नाही, याजकरिता आमच्यावर दया करा. आमच्याकरिता जें तुम्हांस कर्तव्य तें करा. दगडासारखी वृत्ति करून तेंच सार्थक असें म्हणूं नका.

---

# ७ समाज-सुधार

इंग्रजांना देव मानलें आणि भटाभिक्षुकांना शिव्या दिल्या, म्हणून लोकहितवादींवर टीका करणारा एक प्रबल पक्ष त्यांचे कालींच उद्भवला. परंतु त्याने लोकहितवादींचीं इतर मतें मुद्दामच नजरेआड केलीं कीं काय कळत नाही. अतःपरचीं आठ पत्रेंच पहा ना ! हिंदुस्थानांतील वाढल्या दारिद्र्याचें त्यांत किती अचूक निदान आहे ! पत्र नं० ४४ मध्ये त्यांनी अगदी साध्या शब्दांत घरगुती दृष्टान्तांनी अर्थशास्त्रांतील गहन सिद्धान्त पटवून दिले आहेत. धनोत्पादक कमी होत चालले, आयतोबा वाढूं लागले, हें निरक्षर शेतकऱ्यांना, लहान मुलांना— सर्वांना कळेल अशा ' बालबोध ' रीतीने त्यांनी आपली परिस्थिति स्पष्ट करून सांगितली. प्रथम त्यांना तें ज्ञान झालें; नंतर त्यांनी आपल्या समाजाला भावी संकटापासून बचावण्यासाठी सावधगिरीचा इषारा दिला आणि पुढील कार्यक्रमाची एक रूपरेषाही आखली— असें त्रिविध कर्तव्य त्यांनी पार पाडलें. म्हणून त्यांच्याबद्दल आदर दुणावतो, त्यांनी केलेल्या कामगिरीचें चीज कसें करावें, हें कळत नाही; आणि आमच्यापैकीच कांही शिष्ट धेंडांनी त्यांचेवर निष्कारण आग पाखडून समाजाला रास्त वळण लावणारावरील जनतेचा विश्वास उडविला, म्हणून खेद होतो.

इंग्रजांनी तिन्ही वर्णांचे व्यवसाय काबीज केले. आता आमच्या बांधवांस 'शूद्रकी' तेवढी उरली, हें त्यांनी कळवळून सांगितलें. व्यापार हातचा बहुतेक गेला; परकी पेठांचें वर्चस्व आमच्या बाजारांत वाढूं लागलें; तेव्हा त्यांनी ' स्वदेशी व बहिष्कार ' या जोडगोळीचा मंत्र त्या वेळचे भाषेंत लोकांना शिकविला. इकडे उद्योगधंदे वाढवा, म्हणून ते कानीकपाळीं ओरडले. परदेशी जिनसा घेऊं नका, असा त्यांनी आग्रह धरला. आणि हें सर्व सन् १८४८-४९ मध्ये !! न्या० रानड्यांनी स्वदेशीवरील पहिलें व्याख्यान देण्यापूर्वी जवळजवळ दोन तपें

## समाज-सुधार

आधी !! आणि १९३०-३२ च्या कायदेभंगाच्या चळवळींत विलायती कापडावरील बहिष्कारापलीकडे आमची मजल गेली नव्हती. म्हणजे लोकहितवादींची शिकवण अकालीं व अस्थानीं होती, असें समजावें कीं काय ? परंतु एवढें खास की, लोकांनी तिचा स्वीकार केला नाही अथवा त्यांच्या पचनीं ती त्या वेळीं पडण्यासारखी नव्हती, म्हणून लोकहितवादींच्या दूरदृष्टीच्या निदानपद्धतींत दोष निघत नाही.

आमच्या सरदारांचें त्यांनी केलेलें वर्णन वाचून हसूं येतें ! त्यांत अतिशयोक्ति नाही. अजूनही तसले नमुने आढळतात. सरदारांना उपदेशाचे कडु शब्द सुनावण्यास लोकहितवादींनी कमी केलें नाही.

समाज-निरीक्षण करून तो सुधारण्याचे त्यांनी सुचविलेले मार्ग आजमितीसही रास्त वाटतील. ' हिंदु ' ' हिंदु ' म्हणून ते म्हणत असले, तरी आजच्या शब्दयोजनेंत त्यांचा अर्थ ' हिंदी ' असाच होतो, हें सूज्ञांना सांगणें न लगे. हीं आठही पत्रें त्या दृष्टीने वाचनीय व मननीय आहेत.

---

## ७ समाज सुधार


१९ हिंदु लोकांचा आळशी स्वभाव
२३ चार वर्णांची सांप्रतची स्थिति
३५ मानास व दानास पात्र
४४ हिंदु लोकांनी उद्योग करण्याची आवश्यकता
४९ सरदार लोक
५१ हिंदु लोकांची द्रव्योपयोगाविषयीं समजूत
५७ हिंदु लोकांचा व्यापार
६० हिंदु लोकांनी काय करावें ?


---

पत्र नं० १९ २ जुलई १८४८

# हिंदु लोकांचा आळशी स्वभाव

पूर्वी इंग्रज लोक रूमचे बादशहाचे अमलांत होते, त्या वेळेस हे फार दरिद्री व हल्ली हिंदु लोक दिसतात याहूनही मूर्ख होते. यांस राज्यनीति, कायदा, शास्त्र, नेमधर्म कांही चांगले नव्हते. व ते रूमचे लोक इंग्रजांचीं बेटें घेऊन जेव्हा तेथे राज्य करीत होते, तेव्हा गुलाम खरेदी करण्याची चाल होती; परंतु रूम शहरांत गुलाम विकावयास आणले म्हणजे लोकांनी पुसावें की, 'हा मुलगा कोणाचा आहे ?'.आणि जर विकणाराने सांगितलें की, हा इंग्रजांचे बेटांतील, तर घेणार म्हणत, 'अरे छीः ! फुकट दिला तरी नको.' कारण इंग्रज लोक जसे मूर्ख व कुबुद्ध आहेत, तसे कोणत्याही देशांतील लोक नाहीत. असे ते लोक म्हणत होते. अशा गोष्टी ग्रंथांतरीं वाचितों.

परंतु आता इंग्रज लोकांकडे पाहिलें, म्हणजे ईश्वराचा मोठा चमत्कारिक खेळ आहे, असें वाटतें. दोन हजार वर्षांपूर्वी इतक्या मूर्खपणाचे स्थितींत जे लोक होते, ते हल्ली केवढे शहाणपणाचे स्थितींत आहेत? व हिंदुस्थानांतील लोक दोन हजार वर्षांपूर्वी मोठे पराक्रमी होते, त्यांची अवस्था काय झाली आहे ? तेव्हा या दोन्ही गोष्टींचा शोध करणें अवश्य आहे. असें असून आपले लोक किती भ्रांतींत आहेत ? दिवसें दिवस आपले लोकांतील थोरपणा जात चालला आहे. शहाणपण पूर्वीच गेलें; नंतर द्रव्यही गेलें. म्हण आहे की 'आधी शहाणपण जातें, मग भोडवल जातें.' तसेंच या लोकांचें झालें आहे. अद्यापि या लोकांस कोण कोठे आहे, पृथ्वीवर रचना कशी आहे, किती प्रकारचे लोक आहेत व राष्ट्रें किती आहेत, याविषयी कांही कळत नाही. लिहिणें आणि वाचणें झालें म्हणजे मोठी विद्या झाली, असा सांप्रत काळचा वाद आहे; परंतु लिहिणें व वाचणें हें विद्येचें द्वार मात्र

आहे, विद्या नव्हे. विद्या पुढेच आहे. परन्तु लोकांच्या समजुती इतक्या आखुड झाल्या आहेत की, ते अंधेरांत गर्क आहेत.

इंग्रज लोक इकडे येऊन राज्य करितात व त्यांजकडे आमचे लोक तोंडांत बोटें घालून चमत्कारानें पहात राहतात. आणि खावयास मिळत नाही, म्हणून चरफडतात. ऐश्वर्य गेलें, असें त्यांस वाटतें; परंतु याचें कारण काय ? आपले देशाची अवस्था अशी कशाने झाली ? इंग्रज कोठून आले ? यांचें राज्य कसें आहे व आपण चांगलें होण्यास काय उपाय करावा ? या गोष्टींचा विचार कोणी करीत नाहीत. केवळ जनावरांप्रमाणे मारलें तर लागतें, परन्तु पुढे बुद्धि चालत नाही. तद्वत् हे लोक शुद्ध बैल व विचार-शून्य आहेत. गर्वाने आपले ब्राम्हण लोक जळतात व इतर लोकांस तर ज्ञानच नाही. व हें असें होणें, तरी ब्राम्हणांचेंच कपट आहे. तेव्हा आता इतकाच उपाय आहे की, यांणी आपले राजे इंग्रज यांचा शोध करावा. व त्यांचे देशांत जावयाचें नाही, वगैरे जा समजुती आहेत, त्या सोडाव्या, म्हणजे त्यांचें शहाणपण यांस येईल.

एक गोष्ट आठवली आहे, ती अशी— कोणी एक ब्राम्हण आताचे मूर्ख ब्राम्हणासारिखा होता. त्याचे घरांत एक चोर शिरून दागिने उचलून घेऊन चालला; तों ब्राम्हणाचे बायकोंने त्यास पाहून, नवऱ्यास हाक मारून सांगितलें की, ' चोरास धरा. ' तेव्हा तो म्हणूं लागला की, " मी ब्राम्हण आहें, व चोराची जात कोण आहे, याचा मला ठिकाण नाही. तेव्हा मी त्यास शिवूं कसा ? त्याणे कांही नेलें तरी चिंता नाही. " असें म्हणून त्या ब्राम्हणाने आपलें सर्वस्व गमावलें, व चोराने तें भाषण ऐकून सावध-गिरीने अधिक लाभ करून घेतला.

आता पहा, या भटाप्रमाणे आमचे लोकांची अवस्था आहे. परदेशचे लोक येऊन इकडे राज्य करितात. आणि हिंदु लोकांचे सारथी ब्राम्हण लोक, ते म्हणतात की, आमचा धर्म अरबांचे व इंग्रजांचे देशांत जावयाचा नाही; व त्याविषयी आम्ही कांही मनांत आणणार नाही. सारांश, ते अपवित्र असें

म्हणून परकी लोकांस मात्र स्वस्थपणें राज्य करावयास सापडतें व आमचा सर्व व्यापार त्यांचे हस्तगत झाला आहे. जर आपले लोक विलायतेंत जाऊन तेथील माहितगारी करून घेते, तर आता जसें इंग्रजांस भितात तसें न भिते. सामान्यतः इंग्रज लोक इकडे आले, म्हणजे स्वर्गाहून इंद्र खाली आल्याप्रमाणे लोकांस वाटून, त्यांजविषयी भय उत्पन्न होतें. असा हिंदु लोकांचा गरीब स्वभाव; यामुळे हे हतवीर्य झाले आहेत. यांच्यामध्ये सामर्थ्य नाही व मूर्खपणा फार वाढला आहे.

सगळे लोक आपले ठिकाणीं शहाणे म्हणवितात; परंतु यांस इंजिनियर इंग्रज पाहिजेत, प्रोफेसर इंग्रज पाहिजेत, डॉक्टर इंग्रजच पाहिजेत, जड्ज व बारिस्टर तेच पाहिजेत. सर्व कारखाने त्यांचेच हातीं. आम चे लोक त्यांचें दास्यत्व करण्यासदेखील योग्य नाहीत. हें काय ? पांचशे वर्षें मुसलमानांची गुलामगिरी केली व आता शंभर-दीडशे वर्षें इंग्रजांची गुलामगिरी करितात; परंतु अद्यापि आमचे लोकांस कांही ठाऊक झालें नाही. तथापि इंग्रजांनीं आपली विद्या इकडे प्रगट केली, हा त्यांचा मोठा उपकार आहे. व येणेंकरून लोक शहाणे होतील. हिंदु लोक इतके मूर्ख आहेत की, इराण, तुर्कस्तान व अरबस्तान येथून मुसलमान लोक हिंदुस्थानांत येऊन घरें बांधून राहिले, परन्तु हिंदु लोकांस त्यांचें कांही वर्तमान ठाऊक नाही व हिंदु दुसरे एखादे मुलखांत गेले आहेत, असें कधी आढळणार नाही. परमुलखाचे लोक येऊन हिंदु लोकांचे हातचें हिसकावून घेऊन खातात व मानेवर जोखड ठेऊन राज्य करितात, पण हें इतकें सर्व सहन करून आहेत. यांच्यामध्ये बळ, शूरत्व किंवा शक्ति कमी आहे असें नाही; पहिल्याने यांणी सर्व हिंदुस्थान जिंकलें होतें; परन्तु यांस राखावयाचें शहाणपण नाही, याजमुळे हे गमावून बसले.

शास्त्रांत अटक, गंडक व पापनाशी इतक्या नद्यांविषयी असें लिहिलें आहे की, पापनाशी नदीस स्पर्श करूं नये; गंडकींत चालू नये, व अटक नदी उतरून पलीकडे जाऊं नये. व याचा हेतु इतकाच दिसतो की, त्या

नद्या अवघड व जरा भयंकर आहेत. याजमुळे कोणी धीर करून त्यांत जाईल आणि मरेल, तर तें न व्हावें. यास्तव त्यांणी हे शास्त्रार्थ लिहिले; परंतु दुसरे मुलखांत जाऊं नये, असा त्याचा अर्थ नसेल असें वाटतें. आणि जर कदाचित् असला, तर ती शास्त्राज्ञा मानण्याची कांही जरूर नाही. जा वेळेस तें शास्त्र झालें, त्या वेळेस दुसरे लोक इकडे आले नवते. याजमुळे तें शास्त्र योग्य पण, आताचे अवस्थेंत तें मानून मूर्खांप्रमाणे उगेच बसणें, याचें कारण काय ?

जेव्हा हीं मतें मोडून हिंदु लोक परदेशांत जाण्यास सिद्ध होऊन मूर्खपणाचे कायद्यांतून खुले होतील, तेव्हाच त्यांचे हातून कांही पराक्रम होईल. युगपरत्वें करून शास्त्रही फिरलें, असें समजलें पाहिजे. आणि सर्व शास्त्रांचा मतलब हाच की, धर्म रक्षावा. सिंधु नदीपलीकडे जाऊं नये, हें कशाकरिता? धर्म रक्षावा आणि म्लेच्छांचा स्पर्श होऊं नये म्हणून; परन्तु म्लेंच्छच इकडे आले, तेव्हा आपण पलीकडे जाण्याचे कामीं शास्त्र एकीकडे ठेवलें, तरी चिंता नाही, असें मला वाटतें.

---

पत्र नं० २३

## चार वर्णांची सांप्रतची स्थिति

सांप्रत ब्राम्हण जे आहेत, ते नांवाचे आहेत. व ब्राम्हणपणा फक्त कुळांत आला आहे, गुणांत नाही, हें मागील पत्रांत बरेंच सिद्ध झालें.

आता दुसरा वर्ण क्षत्रिय. यांचें काम म्हटलें तर यांणी देशाचें रक्षण करावें. या वर्णाची जबाबदारी ब्राम्हणांहून कमी. ब्राम्हणांनी लोकांस शहाणे करावें आणि क्षत्रियांनी शिपाईगिरी करून स्वराष्ट्र रक्षावें व नीतीप्रमाणे राज्य करावें. विद्येकरिता त्यांनी ब्राम्हणांचा प्रतिपाळ करावा व व्यापार नीट चालून

सुबत्ता व्हावी, म्हणून वैश्यांचें रक्षण करावें. तसेंच शूद्रांचे भारे कमी करून ओझें हलकें करावें, असें तीन वर्णांस सुखेंकरून नांदवावें.

श्रीकृष्णांनी अर्जुनास गीतेंत बोध केला, तो असा आहे की, 'आपल्या धर्माप्रमाणे वर्तणूक कर. त्यांत मुक्त मोक्ष आहे. व इहलोकीं कीर्ति आहे.'

असें सांगून अर्जुन वैराग्य घेत होता, त्याला प्रपंचांत आणलें आणि त्याजकडून राज्य करविलें, व लढाई करविली. असा क्षत्रियांचा धर्म आहे.

हल्ली असा कोणी नाही. शूरत्व या मुलखांतून गेलें व परदेशचे लोक राज्य करितात. क्षत्रिय धर्माचा लवलेशदेखील राहिला नाही. ही गोष्ट कबूल करावयास अवघड नाही. हिंदुस्थानांत रजपूत आहेत, ते क्षत्रियच आहेत; पण जसे हल्लीचे ब्राम्हण आहेत, तसेच ते निस्तेज व हतवीर्य आहेत. यांस लुटावयाची बुद्धि मात्र राहिली आहे. लोकांचे कल्याणाची बुद्धि नाही. व दक्षिणेंत असें मत आहे की, क्षत्रिय वर्ण बुडाला. ही गोष्ट खरी आहे. जे क्षत्रिय आहेत, ते त्या कुळांतील असोत; परंतु ज्यापेक्षा ते आपल्या धर्मास अनुसरत नाहीत, त्यापेक्षा ते क्षत्रिय नव्हत. हल्ली कोणी क्षत्रिय असते, तर राज्य परकी लोकांचे हातीं का जातें ? व धर्मही बुडता ना ! तस्मात् ब्राम्हण व क्षत्रिय हे दोनही वर्ण नाहीत.

आता तिसरा वर्ण वैश्य. या वर्णांचे लोक अद्यापि तैलंगण देशांत कोमटीवगैरे आहेत; परंतु त्यांनी आपला धर्म सोडून दिला. व्यापार ते करते तर परकी लोक इकडे येऊन व्यापार करते ना ! परंतु असें झालें, त्यापेक्षा वैश्यवर्णही बुडाला. याप्रमाणे तीनही वर्णांचा अभाव झाला. आणि चवथा वर्ण शूद्र तेवढा मात्र बाकी राहिला आहे.

आता ब्राम्हण लोक बहुतकरून चाकरी करून पोट भरतात, व भट देव-पूजा पत्करितात; तरी ती गुरवकी झाली. तस्मात् वास्तविक ब्राम्हण कोणी नाहीत. सांप्रत जितके लोक हिंदुस्थानांत आहेत, तितक्यांचा एक वर्ण मला दिसतो की, हे सर्व शूद्र आहेत. इतर वर्णांचीं नांवें मात्र घेतात; परंतु त्यांचे गुण व कर्म नाही.

## चार वर्णांची सांप्रतची स्थिति

हिंदुस्थानांत तीनही वर्णांचें काम इंग्रज चालवितात. कसें म्हणाल, तर इंग्रज लोक शहाणे व विद्वान आहेत, तेव्हा ब्राम्हणांचें कर्म त्यांत आलें. दुसरें शिपाईगिरीचेंही कसब त्यांत आहे. हल्ली या देशांत इंग्रजांचें लष्कर बलवत्तर आहे. तेव्हा क्षत्रियांचें काम तेच चालवितात. व तिसरा वर्ण वैश्य. त्यांचा व्यापारही इंग्रजच करितात. इकडील देशचे लोकांकडे फारसा व्यापार राहिला नाही.

तेव्हा बाकी चवथा वर्ण शूद्र. त्यांनी शेतकी करावी व चाकरी करावी. त्याप्रमाणे हिंदुस्थानांतील सर्व लोक हल्ली वागतात. हे सर्व चाकर आणि शेतकरी आहेत. सर्व विद्येप्रकरणीं थोरपणा व सैन्याधीशत्व व व्यवहारप्रकरणीं ऐश्वर्य, हीं सर्व इंग्रजांकडे आहेत. आता जे ब्राम्हण म्हणवितात, ते उगेच व्यर्थ अभिमान बाळगितात. एकाचें नांव त्याजवळ बहुत द्रव्य असल्यामुळे नवलाख्या पडलें व पुढे त्याचे पणतु व नातू भिकारी झाले, तरी त्यांस नवलाखे म्हणत असत; परंतु त्यांस तें शोभेना. लोक थट्टा करूं लागले. तद्वत् ब्राम्हण लोक नीच व हीन झाल्यामुळे त्यांचा सर्वस्वी मान गेला. आता चार सरदार वगैरे आहेत; पण ते असे दिसतात की, जसे महामारीचा उपद्रव होऊन एका गावांत दहा मनुष्यें मरतात व चारपांच असामींचा वाखा होऊन ते मरणोन्मुख होऊन पडतात. कां तर क्षणाभराने ते मरावयाचेच. तद्वत् आताचे सरदार आहेत.

यावर कोणी लोक असा वाद करतील की, अजून शिंदे, होळकर, रास्ते व पटवर्धन आहेत; परन्तु उपयोग काय ? ते आहेत नाहीत सारखे. इंग्रजांनी आपले शहाणपणाने राज्य काबिज केलें आहे. त्यांचे पराक्रमापुढे हे सर्व लोक अडाणी दिसतात. हे परम आळशी लोक आहेत व अज्ञानेंकरून मदांध आहेत. याजमुळे मुलखांत काय होतें, हें त्यांस दिसत नाही. अद्यापि जांजवळ खाण्यापुरती सोय आहे, ते म्हणतात की, आमचे लेकींस व आमचे मुलांस कांही चिंता नाही. सर्व लोक भिकारी झाले तर झाले. असें म्हणून स्वस्थ बसतात. त्यांच्यामध्ये शहाणे इंग्रज अंमल करितात.

हे असे एक गुराखी असला, म्हणजे पन्नास गुरें हाकतो, त्याप्रमाणे आहेत. याचें कारण काय ? गुराख्याला शहाणपण असतें व गुरांस तें कांही नसतें. त्यांना जिकडे फिरविलें तिकडे फिरतात. आणि गुराखी शहाणा असतो, म्हणून सर्व गुरांची वागणूक त्याचे ध्यानांत असते. याजमुळे पन्नास गुरांचें वास्तविक बळ पाहिलें, तर एक मनुष्यापेक्षा शंभरपट जास्ती आहे. पण उपयोग काय ? तें आंगचें बळ, अकलेचें नव्हे.

आंगचें पन्नास मण बळ अकलेच्या पाव रतीस हात जोडून असतें. उदाहरण, हत्ती अंकुशाने आज्ञेंत असतो. जर त्यास शहाणपण असतें, तर तो महातास फेकून देण्यास उशीर न करता. सारांश, अक्कल ही सर्वांपेक्षा जास्त आहे. व ती मनुष्यास ईश्वराची देणगी आहे. कोणी लोक शहाणे व कोणी लोक वेडे असे पर्याय आहेत. हिंदु लोक इतर देशांचे लोकांपेक्षा इतके नीचपणास कां पावले आहेत ? याचा विचार केला तर कारणें सापडतील. परन्तु कित्येक लोक असें म्हणतात की, कारणें कशाची ? सर्व सद्दीचा आणि नशिबाचा खेळ आहे. तर त्यांस असें उत्तर आहे की, सद्दी आणि नशीब अंशतः खरें आहे. परन्तु सर्वांस तें लागू नाही. मी म्हणतों हल्ली इंग्रज एवढ्या पदवीस आले आहेत की, समुद्राचे व पृथ्वीचे मालक ते आहेत. व त्यांचा शहाणपणा वगैरे अधिक आहे. हा परिणाम कारणावाचून घडला नाही.

आता हीं कारणें कोणतीं याचा विचार करावा. तसेंच हिंदु मूर्ख झाले याचीं तरी कारणें आहेत. जसा शरिरांत रोग होतो याचें कारण काय ? हें त्या समयीं लक्षांत आलें असतें तर त्याचा उपाय केला असता. परन्तु रोगाने वेढल्यानंतर तरी विचार करावा. मग असें म्हणूं नये की, हें नशीबाने झालें. तसें म्हणणें हें अगदी वेडेपणाचें आहे.

मला वाटतें की, जाती, धर्म वेगळाले केले त्याजमुळे एकमेकांचे मनांत द्वेष वेऊन विभक्तपणा फार झाला. हें एक कारण असेल, किंवा ब्राम्हणांनी आपलें कर्म विद्या वाढवावयाचें असून सोडून दिलें आणि इतर

लोकांसही शिकवावयाचें बंद केलें. येणेंकरून कोठेच कांही नाहीसें झालें. हें एक कारण. आणखीही असें कारण आहे की, सांप्रत लोकांची समजूत वेडी झाली आहे. मागे वैद्यशास्त्र, ज्योतिष व कोश वगैरे जे कांही ग्रंथ झाले, ते करणारे देव व ऋषि होते. त्यांची शक्ति आता कोणास यावयाची नाही. असें म्हणून त्यांनी विद्या सर्व बंद पाडिली. व आलीकडे सरासरी १५०० किंवा २००० वर्षांत ग्रंथ कोठे झाले नाहीत. व या घालमेलींत संस्कृत भाषा तर अगदीच बुडाली.

आलीकडे कोणी कवींनी वगैरे ग्रंथ केले आहेत. परन्तु ते नवीन ग्रंथ नाहीत. ते ग्रंथ संस्कृत ग्रंथांचे तरजुमे आहेत. आणि कोणांस असें वाटत नाही की, आपण कल्पना वाढवून नवीन ग्रंथ करूं किंवा देश फिरून पृथ्वी कशी आहे तिचा शोध करूं. या लोकांची बुद्धि अगदी गेली आहे. आणि पूर्वीचे ग्रंथांत जितकें शहाणपण आहे तितकें पुष्कळ मानून ते राहिले आहेत. येणेंकरून आलीकडील दोन हजार वर्षांत नवीन युक्ती निघाल्या नाहीत व कोणी काढल्या तरी ग्रहण करीत नाहीत. पहिली चाल अशी होती की भांड्यास भोक पाडून त्याने दिवस, घटिका मोजित होते. आता आलीकडे घड्याळें निघालीं आहेत. येणेंकरून भांडें बाळगावयास नको. घड्याळ जवळ बाळगिलें म्हणजे सुलभपणाने दिवस वेळ कळतो, परन्तु अद्यापि जोशी वगैरे पाण्याचा उपयोग करितातच. कोणी घड्याळावर लग्न लाविलें असा नाही.

याजवरून असें दिसतें की एक गरीब ब्राम्हण होता तो पंचा नेसत असे. पुढे त्याचा मुलगा दौलतवान् झाला तथापि तो पंचाच नेसे; आणि सांगे की, आमचा बाप पंचा नेसत होता, त्याप्रमाणे आम्हीही नेसतों. आपला कुळाचार आहे तसें करावें हेंच बरें. लोकांनी त्यास पुष्कळ सांगितलें तेव्हा त्याणें रोज नेसावयाचा टाकून देऊन श्राद्धपक्षास नेसावयाचा बेत केला; परंतु मरेतोपर्यंत त्याने पंचाची खोड टाकली नाही. तसे हे हिंदु लोक दिसतात. यांची जी चाल मूळची आली आहे त्याप्रमाणे

करण्याची इच्छा त्यांस फार असते. त्यांत उपयोग असो नसो, मूर्खपणा असो अथवा शहाणपणा असो, परन्तु त्या वेळेस काळ कसा होता व आता कसा आहे, याचा सारासार विचार कोणीच करीत नाही. मागीळ चाल म्हणजे काय तो धर्म, असें समजतात. परंतु वास्तविक पाहिलें तर धर्माशीं आणि चालीशीं फार अंतर आहे.

---

पत्र नं० ३५ — १९ नोवेंबर १८४८

## मानास व दानास पात्र

एक मनुष्य दुसरे मनुष्याचा मान करतो, यास दोन कारणें आहेत. एक त्याचे आर्जव म्हणजे लाभदृष्टि व दुसरा कृतोपकार. आता इंग्रज लोकांस हिंदु लोक मानितात, आणि जांचें त्यांजवळ काम नाही तेदेखील त्यांस नरमतात. याचें कारण पाहूं गेलें तर मला वाटतें की, अज्ञानी जर दोन इंग्रज लहान मोठें पदवीचेही एका जागीं मिळाले तरी ते इतकें लवणभंजन+ करीत नाहीत. पण हिंदु म्हटला म्हणजे फारच करितो. एकादा साहेब आला म्हणजे रस्त्यांतील माणसें पैस× होतात. मामलेदार व मुनसफ यांचे घशास कोरड पडते व किती एक घरीं येऊन डोळे पांढरे करितात, अशाही गोष्टी ऐकण्यांत आहेत. याचें कारण काय? जर हिंदू लोक विलायतेस जाऊन त्यांचीं सर्व प्रकरणें ध्यानांत आणतील, तर मग मला वाटतें की, इतकें अज्ञान, मोह आणि अतिशय मान रहाणार नाही.

मागे एलफिन्स्टन साहेब वगैरे यांनी आपले ग्रंथांत असें लिहिलें आहे की, जोंपर्यंत हिंदू लोक आमचा मान देवाप्रमाणे अज्ञानाने करि-

---

+ लवणभंजन– पूज्यतेचें व नम्रतेचें पोकळ ढोंग.

× पैस होतात– पांगतात, वाट देतात.

तात, तोंपर्यंत आम्ही त्यांचे मुलखांत राहूं. पुढे राहणें कठीण आहे. जसें एकादें मोठें जनावर एकाद्याचे दृष्टीस पडलें म्हणजे चपापतात, तसें इंग्रज लोकांपुढे हिंदू लोकांचें होतें. त्यांचें स्थान, कर्म, रीत, व्यवहार कांही एक हे लोक जाणत नाहीत. याजमुळे इंग्रजांचा फार नफा आहे. या अवस्थेंत हिंदु लोक जितके दिवस रहातील तितके दिवस त्यांची येथे वस्ती होईल, हा नेम आहे. जोंपर्यंत जुने लोक आहेत, तोंपर्यंत ही व्यवस्था अशीच चालेल. पुढची उत्पत्ति ज्ञानांत श्रेष्ठ होईल, यांत संशय नाही.

पहा, इंग्रजांनी आपले शहाणपणाने या लोकांस किती घेरलें आहे! व्यवहार व राज्य सर्व त्यांचे हातीं गेलें आहे. याचें कारण अक्कल आहे. अक्कल कशापासून? तर विद्येची प्रसृती व विचार इंग्रजांमध्ये फार आहेत. हिंदु लोकांमध्ये एकही नाही. मोठा धर्म आणि दान करावयाचें झालें म्हणजे दोन हजार भटांस जेवण घालतात. कोणी पांच हजार खर्च लावून देऊळ बांधतात. कोणी मनास येईल तसा पैसा टाकतात. त्यास योजना नीट कळत नाही. आमचे लक्षांत एक गृहस्थ येतो. त्याने दोन लक्ष रुपये धर्मादायास काढले. त्यांपैकी देवळास पन्नास हजार गेले, पंचवीस हजार ब्राम्हणभोजन, दहा हजार खर्च देऊन लग्नें केलीं, असा व्यय केला. हें पाहून मला वाटतें की, मूर्खपणाची हिंदु लोकांपुढे हद्द झाली. हे दोन लाख रुपये जर नीट खर्च केले असते, तर किती उपयोगाचीं कामें झालीं असतीं बरें? किती दरिद्राचा ऱ्हास होता, किती ज्ञान व शहाणपण पढवायास येतें!

परंतु मातींत पैसा कितीही घातला तरी त्याचा कांही फायदा आहे काय? माणसें ही जिवंत माती. त्यांस कांही सुखाचा उपयोग व्हावा, तें टाकून मातीचा शोभेंत द्रव्य खर्च करून काय उपयोग? जर हिंदु लोकांस वास्तविक धर्म करावयाचा असेल तर इतकाच करावा की, जेणेंकरून लोकांचें अज्ञान दूर होईल. पुस्तकें व विद्या वाढतील व जेव्हा हे लोक आपले मूर्खपणाचा मार्गांतून सुटतील, तेव्हाच सुखवृद्धि होईल.

## यांत पुण्य कशाचें ?

कितीएक लोकांस हा चमत्कार वाटला आहे की, आम्ही शहाणेसुरते लोक आहों आणि आम्हांस 'लोकहितवादी' वेडे व मूर्ख म्हणतात, याचें कारण काय ? आम्ही त्यांस सांगतों की, जेव्हा आम्ही तुम्हांस ज्ञानी इंग्रजाशीं मिळवून पहातों तेव्हा खरेच वेडे व शहाणे लोकांमध्ये जितका फरक दिसतो तितका फरक तुम्हांमध्ये दिसतो. रोगापासून तुम्ही वेडे नाहीत, परंतु ज्ञानाचे तुळणेंत वेडेच आहांत. आयुष्याचा उपयोग कसा करावा ? आपला जन्म लोकांस कोणत्या प्रकाराने उपयोगी करावा ? आपण पृथ्वीवर होतों याची मागे स्मृति रहावी, याविषयी उपाय करावा, सारासार विचार करून ईश्वराचें भय बाळगावें व खरेपणा धरावा, हें कोणी पहात नाही.

धर्मात्मे लोक पुष्कळ आहेत व आम्हीं धर्म फार केला, असें ते म्हणतात. परंतु आंधळयास त्यांनी जेवावयास घातलें काय ? दीनगरिबांस वस्त्रें दिलीं काय ? अज्ञानास ज्ञानी केलें काय ? दुर्जनास सुजन केलें काय ? कोणता परोपकार आपले लोकांमध्ये त्यांनी केला ?

हल्ली इंग्रज लोक सर्व जिन्नस विलायतेंतून आणतात व इकडील व्यापारी, कोष्टी वगैरे उपाशी मरतात. तर त्या विद्या इकडे आणून लक्षावधी जिवांचें हित करण्याचा उद्योग कोणीं केला आहे काय ? नाही.

कोणी म्हणतो, मी कार्तिकमासीं निरांजनें दिलीं; कोणी म्हणतो, मीं वैशाखांत मडकी दिलीं, आवळे दिले. हा धर्म कशाचा ? हा मूर्खपणा आहे. भटांनी वेड लावावें आणि गृहस्थांनी त्याप्रमाणे नाचावें. यजमानास सांगावें की, उष्णकाळीं क्षीरभोजन करावें, म्हणजे यजमान पुण्य जाणून तसें करितो. पण वास्तविक यामध्ये पुण्य कशाचें ? आळशी लोक द्रव्य खाऊन जातात, आणि मालकास पुण्य पुण्य म्हणून ठकवितात, इतकेंच आहे. वास्तविक पुण्य हेंच की, यथायोग्य पात्र पाहून धर्म करावा. तान्हेला आहे त्यास पाणी द्यावें. कुंभ भरून ब्राम्हणास दिला व त्याने तो जातांना

टाकून दिला, कारण त्याचे घरीं हौद आहे व विहीर आहे. मग त्याला यजमानाचा कुंभांतील पाण्याचें काय करावयाचें आहे? अर्थातच तो तें मडकें ओतून टाकतो. तेव्हा हा धर्म कसा? परंतु हाच धर्म आहे, असें जें म्हणतात ते मूर्ख नव्हत काय?

---

पत्र नं० ४४ २१ जानेवारी १८४९

## हिंदु लोकांनी उद्योग करण्याची आवश्यकता

प्राचीन काळचे हिंदु लोक हे आपले देशांत स्वस्थ होते, परकी लोक या देशांत फार येत नव्हतें व प्रजा थोडी होती, हें प्राचीन काळचे इतिहासावरून कळतें. कारण दक्षिणभागीं हिंदुस्थानांत पहिली वस्ती थोडी व अरण्यें फार होतीं. हिंदुस्थानांत उत्तरभागीं मात्र लोक रहात होते व तेही फार थोडे असतील. हें याजवरून दिसतें की, त्या वेळचे राजांचा राजधान्या फार जवळ जवळ होत्या; म्हणजे अयोध्या, मथुरा, कानपुर, हस्तिनापुर इत्यादि; याजवरून त्या राजांचें राज्य संक्षेपित होतें, यांत संशय नाही. व लोकही विरळा असतील आणि पीकपाणी फार, यामुळे शिल्लक रहात असेल.

कारण जितके लोक खाणारे होते तितक्यांचे उद्योगाने जें पिकत होतें, तें फाजील रहात होतें. याजमुळे आळसाच्या प्रवृत्ति निघाल्या. आता तसें नाही. आता लोक फार वृद्धिंगत जहाले व त्यांस खावयास मिळत नाही; कारण सर्व उद्योग करीत नाहीत. जितके लोक उद्योग करितात तितक्यांचे उद्योगाचे उत्पन्नावर आळशी लोक फार जाले, त्यांचा निर्वाह होत नाही. तत्रापि उद्योग करण्याचें या लोकांस अजून समजत नाही.

मुख्यत्वेंकरून ब्राम्हण लोक उद्योगाचे शत्रूच आहेत. ते पहिल्या-

प्रमाणे पहातात; परंतु त्यांचे शापाचें ढोंग होतें, तें अगदी गेलें. त्यांस जेवावयास दिल्हें म्हणजे ईश्वर तृप्त जहाला; त्यांचें सुख तेंच देवाचें सुख; त्यांचा हात तोच देवाचा हात; हें ढोंग लोकांस कळून आलें. हे फुकट खाणारे असें लोक समजतात. परदेशचे लोक या देशांत आले, त्यांणी तर या ढोंगाची परिस्फुटता फारच केली. सर्व आळशी लोकांस पुरेल अशी सामग्रीही या देशांत नाही. जसें एका घरांत दहा मनुष्यांचें अन्न असतें, तेथे पंचवीस पाहुणे आले म्हणजे घरचा माणसांनी उपाशी रहावें तरच पाहुण्याचा कांही निर्वाह होईल. तशी या देशाची हल्ली स्थिति आहे. पहिल्याने मुसलमान लोक या देशांत आले. बाहेरचे लोक जे येतात ते कांही मेहनत करण्यास येत नाहीत; ते आयते खावयास येतात. तेव्हा हजारो मोगल लोक, नबाब, अमीर, सरदार हे या लोकांचे उद्योगावर खाऊं लागले. मग अर्थातच या लोकांस कमती पडूं लागली.

नंतर अलीकडे इंग्रज इकडे आले. तेही कांही इकडे शेतभात मळाटळा करण्यास आले नाहीत. ते इकडे श्रीमंत होऊन चार पैसे इकडून घेऊन घरीं जावें, यास्तव येतात. व ते शहाणे आहेत. तेव्हा ते गरीब; लोकांप्रमाणे कां खपतील बरें ? त्यांनी सुखाचा जागा, मोठालीं कामेंकाजें उपटलीं. हजारो इंग्रज लोक अमीरांप्रमाणे इकडे येऊन रहातात. व हजारों इंग्रज शिपाई इकडे येतात. इतक्या या लोकांचें पोषण हिंदु लोकांचे मेहनतीने जें उत्पन्न व्हावयाचें त्यांतच होतें. वास्तविक म्हटलें तर फार पाहुणे आले म्हणजे त्यांनी उपाशी रहावें. परन्तु हे साधारण पाहुणे नव्हत तर ते शूर, विद्वान, गुणी व जबरदस्त आहेत. तेव्हा आपले लोकांपुढे ठेविलेल्या पत्रावळी त्यांनी ओढल्या आणि हे लोक त्यांचे तोंडाकडे पहात बसले. याजमुळे या लोकांस पाऊस पडूनही दुर्भिक्ष आहे. कोणत्याही देशांत तेथील लोकांचा सुखेंकरून निर्वाह व्हावा, इतकें पीक होतें; परन्तु जर बाहेरचे लोक त्यांत पुष्कळ आले तर जमिनीने अन्न सर्वांस कोठून पिकवावें व पुरवावें ? याजमुळे हे लोक भिकारी झाले आहेत. अमीरपणा,

शिपाईगिरी, राज्यकारभार या लोकांकडे होता, तेव्हा कोणतेही प्रकारचें दुर्भिक्ष नव्हतें. कारण देशांत जें उत्पन्न होत होतें तें खाऊन ते स्वस्थ होते. ही गोष्ट स्पष्ट रीतीने कळण्याकरिता मी थोडा अजमास करून हिशेब लिहितों.

सरासरी हिंदुस्थानांत एकंदर पांच लक्ष कोस औरस चौरस आहेत. त्यापैकी अडीच लक्ष कोस रानें, डोंगर, नद्या, खडक, झाडें, घरें, शहरें इत्यादिकांमुळे नापीक आहेत. ते वजा देऊन बाकी अडीच लक्ष कोस चांगले पिकाचे आहेत. आणि एकंदर या देशांत माणसें दहा कोट आहेत. तितक्यांना अन्न पाहिजे. तेव्हा याची वाटणी बसविली तर दर एक कोसास चारशें माणसें पडलीं. त्यांत चारशें माणसांपैकी निम्मे स्त्रिया. बाकी दोनशां-पैकी शंभर माणसें उद्योगावाचून म्हणजे आजारी, वृद्ध, बाळें, आंधळे, वगैरे व्यंग व व्यापारी, अंमलदार, तमासगीर, श्रीमंत हे सरासरी शंभर. बाकी शंभर राहिले, ते काम करणारे. इतक्यांनी मेहनत करून चारशे लोकांचा निर्वाह करावा. तेव्हा शंभर माणसें एक कोस जमिनींत खपलीं तर चारशांचें पोट भरण्याइतकें उत्पन्न करतील, किंबहुना जास्ती करतील.

परंतु काळेंकरून लोकांमध्ये श्रीमन्ती वाढत चालली, तों आळशी लोक वाढत चालले. म्हणजे जो एकटा श्रीमंत आहे तो आपणच काम केल्याशिवाय खातो असें नाही. त्यास चाकर पाहिजेत, घोडे पाहिजेत, परीट धुवावयास पाहिजेत, शिंपी शिवावयास पाहिजेत, ऊन लागेल म्हणून अब्दागिरी पाहिजे. रस्ता दिसत नाही म्हणून मशालजी, चोबदार इत्यादि मिळून तो एकटा पंचवीस माणसें घेऊन बसला. आणखी जों जों श्रीमंती वाढली तों तों गाणार पाहिजेत, वाद्यें वाजविणारे पाहिजेत, देवपूजा करा-वयास भट पाहिजे व पंक्तीस दहा पानें पाहिजेत, हे अनर्थ झाले. तत्रापि सर्वांचा भार शंभर माणसांनी सोसला आणि सुखेंकरून राहिले. परन्तु आता काय झालें की, या लोकांचा ताटांत इंग्रज लोक, मुसलमान लोक आले, ते कांही बरोबर घेऊन आले नाहीत. आमच्यापैकी खावयास आले,

आणि तेही एकटे खाणारे नव्हत. एक एक असा श्रीमंत की, त्यांचे मागे पन्नास रिकामे माणूस; कोणी घोडा खाजविणारा, कोणी रथ हाकणारा, कोणी हिशेब लिहिणारा, कोणी कारकून, कोणी कपडे नेसविणारा, कोणी शिजविणारा, कोणी पोराला दूध पाजणारा, असे होते. कारण ते स्वता कांही काम करावयाचे नाहीत. याजमुळे हा समुदाय चारशांमध्ये येऊन पोचला. व आपले लोक जे श्रीमंत होते हे कांही आपली खोड टाकीत ना. ते श्रीमंती असावी अशी इच्छा करणार व इंग्रज तशीच इच्छा करणार. तेव्हा दोघांचा निर्वाह चालेना आणि आपले लोक भिकारी होत चालले.

ब्राम्हण म्हणतात की, आजपर्यंत आम्ही काम कधी केलें नाही व पुढे करणार नाही. स्त्रिया काम करावयाच्या नाहीत. तेव्हा इतक्या सर्वांचा निर्वाह कसा होईल ? याजमुळे जरूरी येऊन पडली की, आपले लोकांनी श्रीमन्ती सोडावी आणि ती सर्व इंग्रजांकडे यावी, तरच निर्वाह होईल. व कांही काळ असेंच चाललें तर आपले लोकांत एकही श्रीमंत वाचणार नाही. कारण श्रीमंती राहणें अवघड पडेल. इतक्यांचा निर्वाह होत नाही. याजमुळे हे लोक अर्थातच भिकारी झाले. त्यांत आणखी या देशांतील कामें व व्यापार इंग्रजांनी घेतले. जड्ज तेच, माजिस्ट्रेट तेच; वस्त्रें विकणारे तेच, माल आणणारे तेच; टंकसाळ चालणारे तेच; व शिपायी तेच. इतक्या लोकांचीं कामें पूर्वी आमचे लोकांमध्ये होतीं तेव्हा ठीक होतें. परन्तु तीं सर्व त्यांचे हातीं गेलीं, तेव्हा जा जा लोकांचीं कामें त्यांनी घेतलीं ते ते लोक रिकामे झाले आणि उपाशी मरूं लागले. यांत त्यांनी इतक्या सर्वांस अन्न कोठून पुरवावें ?

तेव्हा परिणाम असा होईल की, आपले लोक सगळे शेतभात करणारे होतील. आणि श्रीमन्त, सावकार व अमलदार इंग्रज होतील. जितकी मेहनत करून पिकवावयाचें काम, तितकें आपले लोकाकडे राहील. जितकें सुखाने खाऊन रहावयाचें काम, तितकें ते लोक बळकावतील. तेव्हा अर्थातच हे लोक भिकारी झाले. परन्तु इतकी मजल येऊन पोचली नाही.

कारण अद्याप कोठें कांहीं संस्थानें आहेत. व तीं जरी धुंदींत आहेत तरी द्रव्यवान आहेत. याजमुळे चार माणसांचा निभाव होतो व हिंदु. लोक चार सुखी आहेत, असें नजरेस पडतात. परंतु हें फार दिवस चालणार नाहीं. कारण जीं संस्थानें आहेत, तीं मृतप्राय होऊन राहिलीं आहेत. कोणामध्यें शहाणपण नाहीं. तीं एका पाठीमागून एक जाणार. अस्तु.

असा प्रसंग आला, तेव्हा आपले लोकांस सुखी होण्याची युक्ति कोणती म्हणाल, तर अशी आहे की, जितके इंग्रज लोकांचे व्यापार व रोजगार इकडे कमी होतील तितकें या लोकांस ज्यास्ती सुख आहे. याजकरितां या लोकांनी विद्या व ज्ञान यांचे प्राप्तीस झटावें व इंग्रजांप्रमाणे शहाणें व्हावें. आणि जे व्यापार ते करितात ते आपण करावे. कोणी म्हणतील की, त्यांस द्रव्य अनुकूळ आहे आणि या लोकांजवळ द्रव्याची अनुकूळता नाहीं, तर ही गोष्ट खरी; परन्तु त्याचा निर्णय आज लिहिणें जरूर नाहीं; जेव्हा सर्व लोक पुढे सरावे अशी इच्छा करतील व रानटीपणाचा समजुती सोडून देतील, तेव्हा अनुकूळता सहज होईल.

---

पत्र नं० ४९ २५ फेब्रुआरी १८४९

## सरदार लोक

दक्षिणेंतील सरदार लोक, याविषयी कोणास कांहीं मजकूर ठाऊक नसेल म्हणून मी त्यांचे अवस्थेचें व समजुतीचें थोडें वर्णन करतों.

पेशवाईंत हे सर्व जण बाजिरावास कंटाळून इंग्रजांकडे मिळाले. यांस अशी अशा होती की, पेशव्यांचे पदरीं राहून आम्हांस खावयास मिळतें, परंतु चाकरी करावी लागत्ये; तेव्हा आता इंग्रजांच्या पक्षास मिळालें म्हणजे खावयास फुकट मिळेल व आमची जहागीर वगैरे सरंजाम सर्व आम्हांकडे

चालतील; आणि घरीं बसून राहूं. हे ब्राम्हण लोक मटबुद्धि, यांस हा मोठा फायदा वाटला की, चाकरी केल्याशिवाय आम्हांस इंग्रज खावयास देतात, मग पेशव्यांची ताबेदारी कशास पाहिजे? हा विचार करून त्यांनी इंग्रजांचे बंदोबस्त कबूल केले व पुढे आता ते कायद्याप्रमाणे जप्त होऊं लागले, तेव्हा त्यांस असें वाटतें की, अरे, हें काय? आम्ही केलें काय? आणि झालें काय? त्यांचे मुखांत आता दुसरी गोष्ट नाही.

सरदार लोकांजवळ बसलें म्हणजे प्रथम पेनशनाची गोष्ट. आता जप्ती जहाली, कसें करावें? इंग्रजांचें राज्य फार वाईट. कारण आमचा सरंजाम गेला. कोणी म्हणतो माझें पेनशन गेलें! आम्हांस पाहिलें वाटत होतें की, पुस्त दर पुस्त+ चालवतील; परंतु आता कायदे फार वाईट निघाले. आता सरदार लोकांस दुसरी काळजी नाही. फक्त तेवढ्या गोष्टी बोलत असतात. कोणी आहेत त्यांस मुलें नाहीत. कोणी परघरांतील मुलें आणून दत्तक बसविलीं आहेत. किती एक बाजिरावाचे समयांतील आहेत; किती एक जुने आहेत. पण आता त्यांचे वारस आहेत, ते कांही शहाणे नाहीत व नेहमी अर्जा करितात की, दत्तकास आमचा सरंजाम चालवावा. आम्हांस दत्तक घेण्याची परवानगी असावी; आणि आमच्या गावचा फौजदारी आणि दिवाणी अमल आम्हांकडे असावा; आणि वसुलास आम्हांस मदत द्यावी. म्हणजे रयतेस बुडवून पैसा घेऊन खर्च पाहिजे कसा करूं; परंतु इतके सरदार आहेत यांपैकी एक जणास आणून पाहिलें की, हा गृहस्थ कोणत्या उपयोगी पडेल? तर मला वाटतें की, या पृथ्वीवर कोणतेंही काम त्याचेलायक सापडावयाचें नाही.

कारण की, पंचवीस वर्षांपासून त्याचे वृद्धापकाळास आरंभ होतो; आणि क्षयरोगाने ध्यास होऊन तो जिवंत मात्र राहिलेला असतो. किती एक इतके अशक्त आहेत की, त्यांस घोड्यावर बसून दहा पावलें जाववत नाही. किती एकांस चाळीसावे वर्षीं दुसरे लोक धरावयास लागतात.

---

पुस्त दर पुस्त– वंशपरंपरा.

स्वता लिहिणें पुसणें तर कोणासही येत नाही. सर्वांस वकील व कारभारी पाहिजेत. जांस वकील कारभारी नाहीत, त्यांणी दरबारांत जाण्याचे दिवशीं एकादा मजूरदार करून तरी बरोबर नेला पाहिजे. यजमानास बोलावयाचें माहीत नाही. मग कारकून याने यजमानास बरोबर नेऊन येथे बसा म्हणून सांगावें. यजमानास स्वता कांही ज्ञान नाही. मग कारकुनांनी त्या मूर्ख यजमानास जसा पिसें लाऊन कावळा करतात,तसा करून एजंटास भेटवावा; हे आमके म्हणून सांगावें; परंतु खासे पाहिले तर नंदी किंवा शुद्ध नर्मदेंतले बाण. लिहितां येत नाही, बोलतां येत नाही. वेड्यासारखे दिसतात. त्यांस दिवाणजींनी आपले पोटाकरता सजवून दरबारांत आणावें. महाराजांस उठा म्हणून देखील सांगितलें पाहिजे,तेव्हाच ते उठावयाचे, नाही तर उठावें केव्हा हेंही ठाऊक नाही. मग घरीं येऊन म्हणावें, 'वाहवा! आज दरबारांत गेलों होतों, फार श्रम झाले.' कारकुनाने पोटार्थाकरिता पुढे यावें आणि म्हणावें की, महाराज, आज साहेब फार खूष होता. आपल्यापाशी फार बोलला. इतकें कोणापाशी बोलत नाही.' मग यजमानांनी म्हणावें 'वा, आमचा दिवाणजी हुशार आहे' याप्रमाणे यांची अवस्था आहे.

सरकारास या लोकाशीं राजकारणार्थ सलूख राखण्याची जरूर आहे, म्हणून मात्र या लोकांचा मानपान ते करितात. नाही तर या लोकांसारखें अप्रयोजक कोणी नाहीत; यांचे हातून कोणतेंही काम व्हावयाचें नाही. घरांत व्यवस्था पाहिली तर दरबारापेक्षा अधिक. वाण्याची उचापत आणि सराफाचें कर्ज, त्यास व्याज शेकडा २५ रुपये. जें खत कारकून लिहून आणील त्याजवर सही करतात. एकादे दिवशीं मेले म्हणजे सर्व सरकारांत जप्त होतें व सावकार बुडतात.

याप्रमाणे हे कारकून लोक व दिवाणजी यजमानास फसवितात. त्यांचे वडिलांनी मिळविलें असतें, तें सर्व चोरांचे हातीं जातें. एके दिवशीं मेजवानी करावी, सरकारचे कामगारांस जेवावयास बोलवावें, आणि यजमानास सांगावें की, "महाराज, आपलें सर्व काम दरबारांत असतें, तेथे साहेब

लोकांस काय समजतें ? सर्व काम कामगारांचे हातीं; याजकरता त्यांचे आर्जव संपादन केले पाहिजेत." मग यजमानाने पुसावें की, 'ते आपल्या घरीं येतील काय ?'

'होय महाराज. मी प्रयत्न करितों. मी दरबारची मंडळी अशी वश ठेवली आहे की, आपले कृपेने आपले सेवकावर ते सर्व लोभ करितात.'

याप्रमाणे गोष्टी सांगून छमछमाट करावे.

'महाराज कामगार असें म्हणतात की, दोन हजार रुपये पाहिजेत !'

त्यांपैकी एक हजार आपले घरीं व एक हजार कामगारांचे घरीं टाकून सरासरीं यजमानास लुटून खातात. किती एक कामगार सरदारांचे येथे देव्हाऱ्यांतील देवाप्रमाणे पूजन करण्यास योग्य असतात. यजमानास कारकुनाने सांगितलें की, महाराज, आपण यांस साष्टांग नमस्कार घातला पाहिजे, म्हणजे यजमान उठले !

याप्रमाणे कामगार व कारकून हे लोक सरदारांस बुडवितात. त्यांचे घरंचे वाद वाढवितात. स्त्रियांचें व पुरुषांचेंही वितुष्ट पाडितात. म्हणजे आपलें पोट भरतें व पैसा उधळावयास सापडतो. यजमान मूर्ख, त्यास आई-पासून फितवितात, बापाशीं वितुष्ट करवितात व स्त्रियांसही बिघडवितात. याप्रमाणें दुर्गुणी करतात. आणि त्यांस वीस वर्षें झालीं नाहीत, तों रोगिष्ट व दुर्गुणी करून त्यांचे घरावर पन्नास जप्त्या एकामागून एक बसवून ठेवितात. मग यजमान भीतींत पडतो. यास असें वाटतें की, माझा कारभारी माहितगार आहे, त्यास सोडावें तर वाईट; अशा अडचणींत तो सापडला म्हणजे त्याची मालमिळकत खातात. मग जें काय नेमून देतील तें खावें आणि बसावें. याप्रमाणे सरदार लोकांची अव्यवस्था आहे. त्यांस उजाडल्या-मावळल्याची खबर नाही व योग्यता कांही नाही. व्यापाराच्या कामांत उपयोग नाही. विद्वान नाहीत. चाकरी करण्यास बळकट नाहीत. सरासरी जिवंत मात्र असतात.

परंतु असे हे लोक जे जिवंत रहातात, त्यांचें जिणें फार वाईट आणि

लज्जेचें आहे. मला वाटतें की, यांनी आता सरंजामाची आणि पेनशनाची आशा सोडावी. आपले सुधारणुकीकडे लागावें. शहाणपण शिकावें. मुलांस तयार करावें. त्यांचीं लवकर लग्नें करूं नयेत. त्यांस चांगलें हुशार करावें. दत्तक घेऊं नये. दत्तक घेण्याचें कारण, तो आपले श्राद्ध-पक्ष करील, हें लोकांस मुख्य वाटतें; पण हा मूर्खपणा आहे. जर अजून सरदार लोकांनी सावधगिरी केली तर ते माणसांत येतील. मराठी ग्रंथ वाचून शोध करावे. आजपर्यंत जाहलें तें जाहलें. आपला मूर्खपणा पदरीं घ्यावा. अजून तरी बंदोबस्त करून कारकुनास घालवावें. तंटे करूं नयेत. वाद सांगूं नये. म्हणजे कामगारांचे आर्जव नकोत, आणि अब्रूने रहावें; यांत शोभा आहे. नाही तर आणखी फजितीस कारण होईल.

---

पत्र नं० ५१ ११ मार्च १८४९

## हिंदु लोकांची द्रव्योपयोगाविषयींची समजूत

मागील पत्रांत विद्येचा उपयोग विद्वान लोक या देशांत करीत नाहीत, म्हणून लिहिलें आहे. व आता एक गोष्ट आम्हांस सुचली आहे की, द्रव्यवान् लोक द्रव्याचाही उपयोग करीत नाहीत. द्रव्य कोणत्या रीतीने वृद्धिंगत करावें, हें त्यांस अश्रुत आहे व द्रव्य वृद्धिंगत केलें असतां फार उपयोग होईल, हें त्यांस कळत नाही.

यास प्रमाण—प्रथम लग्न, मुंज वगैरेमध्ये समारंभांत हिंदु लोक पुष्कळ द्रव्य खर्च करितात. व भटांस खावयास घालून उधळितात. दुसरें प्रमाण—हे लोक द्रव्य असलें म्हणजे लागलेच दागिने करतात आणि घरांत साठवितात. त्यांस असें तर वाटत नसेल ना, की द्रव्य जसें आम्ही अन्यायाने मिळविलें तसें अन्यायाने खर्च करावें? किती एक लोक म्हणतात की,

जितका खर्च केला तितकी अधिक जमा होते. किती एक म्हणतात की, साखरेचा खाणार त्यास देव देणार ! किती एक म्हणतात की, नशिबीं असेल त्यास द्रव्य मिळेल. या प्रकारची किती एक मूर्खमतें चालू आहेत व त्यास भट वगैरे लोक साहकारी आहेत. ते म्हणतात की, द्रव्यवान् आहे तो पुण्यवान् आहे. द्रव्याने मोक्षास जातो. म्हणजे त्यांस सध्या खावयास मिळते.

बहुधा अन्यायानेच हिंदु लोकांमध्ये द्रव्य संपादन केलेलें असतें. कोणी स्वकष्टार्जित मेहनतीने मिळवीत नाहीत, म्हणून असा मूर्खपणाने व्यय करितात. जो मेहनतीने मिळवितो तो असें कधी करणार नाही. जे द्रव्यवान आहेत त्यांस व्यापार करण्याचें वगैरे ज्ञान नसतें व ते बहुधा मूर्ख असतात. म्हणून त्यांचें प्रथम कर्तव्य हें असतें की, दहा हजारांचा जडावाचा कण्ठा, पन्नास हजारांची पोची, छपन्न हजारांची आंगठी इत्यादि पदार्थ घेऊन घरांत ठेवावे. साधारण श्रीमंताकडे पहा की, त्याचे घरीं दागिने जितक्या किंमतीचे असतात तितका पैका त्याचा व्यापारांत किंवा कोणत्याही उद्योगाचे कामांत नसतो. जशा मुंग्या बिळांत धान्य साचवून ठेवितात, त्यांस पेरावयास समजत नाही, आणि तें धान्य सरलें म्हणजे पुनः शोधावयास जावें व कोणाचें सापडेल तें आणून पुनः साठवावें, पुनः खावें, असें त्या करितात, तद्वत् हिंदु लोक आहेत.

माझें म्हणणें या लोकांनी अलंकार अगदी टाकावेत असें नाही. परंतु आजवळ लाख रुपये आहेत त्याने फार झालें तर दहा पांच हजारपर्यंत भूषणें वगैरे जिन्नस बाळगावे व बाकीचा पैसा उपयोगास लावावा. परन्तु श्रीमन्त लोक जांजवळ द्रव्य आहे, ते पैसा रोख कांही बाळगीत नाहीत आणि उपयोग करीत नाहीत. म्हणतात की, रोख पैसा कशास पाहिजे ! सोनें घेऊन टाकलें म्हणजे घरांत राहील आणि द्रव्याच्या पायांत बिड्या पडतील, मग कोठे जाणार नाही. कालदेशवर्तमान आहे; आपलीं मुलेंमाणसें मोडून खातील, असें म्हणतात. परन्तु हे लोक किती

मूर्ख आहेत हें यांजवरून पहावें. यांस असें कळत नाही की, द्रव्य ही चालती वस्तु जितकी अधिक फिरेल तितकी चांगली. यास्तव व्यापार इत्यादि मोठीं कामें अंगीकारावीं व धर्म तरी यथायुक्त करावा.

परंतु तें कांही न करून द्रव्य घरांत बाळगतात, उराशीं धरून निजतात आणि मरते वेळेस काळजी करतात की, माझें इतकें धन आहे याची व्यवस्था कोण करील ? रात्र आली म्हणजे म्हणतात की, माझे घरावर आज दरवडा तर यावयाचा नाही ना ? अशी काळजी करितात. सोनें-रुपें घरांत ठेवतात; तें पाहून घरांतील चाकरमाणसें यांस लोभ सुटतो व लोक द्वेष करितात, चोऱ्या होतात. एकदा चोरी झाली म्हणजे सर्व द्रव्य घेऊन जातात. किती एकांचीं मुलें वाईट निघतात, तीं द्रव्य उधळून टाकतात, किती एकांच्या बायका लबाड निघून द्रव्याचा नाश करितात. जीं द्रव्याचीं गाठोडीं बांधून ठेवतात तीं थोडेच दिवसांत नाहीशीं होतात व अशा द्रव्यसंग्रहाने मुलें अवश्य वाईट निघतात. कारण की, त्यांस प्रथम शिक्षा ही लागते की, घरांतून बाहेर जाऊं नये; कारण, गेलें तर द्रव्य कोठे ठेवावें ? यास्तव रात्रंदिवस घरांत बसतात आणि त्यांतलें मोडून खातात.

वास्तविक पाहिलें तर मुलास बापाने पंचवीस वर्षांपर्यंत खावयाची बेगमी ठेवली आणि त्यास शहाणें केलें म्हणजे पुष्कळ जाहलें. जो बाप मुलास जन्मपर्यंत पुरेसें साचवून ठेवतो आणि त्यास विद्या वगैरे शिकवीत नाही, परंतु आळशी व निरुपयोगी मूर्ख करतो, तो त्याचे अनहितकर्ता आहे, व देशाचा लुटणारा आहे; कारण की, सर्वांचा पैसा हरण करून त्याणे आपले घरीं मूर्खांचें जीवन होण्याकरिता व लबाडी वृद्धिंगत होण्याकरिता ठेविला, असें होतें.

यास्तव जे बाप मुलास पुष्कळ द्रव्य ठेवितात, त्यांणी त्या द्रव्याचा उपयोग करतां यावा, अशीं मुलें चांगलीं करावीं. परंतु त्यांचे कपाळीं बहुधा मूर्ख पुत्र असावे असें असतें व असें करण्यास तेही कारण होतात. पैसा अशा रीतीने साचवून ठेवण्याची खोड या लोकांस

लागली आहे. याजकरिता बहुत लोकांस दुःख होतें. कारण ज्या रीतीने सुख-वृद्धि व्हावयाची ते मार्ग ज्यांचे हातांत असतात, तेच त्या मार्गांस बंद करतात आणि आपण मूर्ख होऊन द्रव्याचा व्यय मूर्खपणाने करतात. हा सांप्रदाय फार वाईट आहे. वास्तव ज्या ज्या जवळ द्रव्य आहे, त्यांणी त्यांणी चांगला विचार करावा की, याचा उपयोग कोणता करावा? आणि जेणेंकरून लोकांचें हित होईल व आपले द्रव्याची वृद्धि होईल असे उपाय करावे.

हिंदु लोकांत अनंत गोष्टी कमी आहेत व त्यांस अजून पुष्कळ शहाणें करावयाचें आहेत, अशा कामांत द्रव्य घालतील तर मोत्यांच्या कंठ्या, पोच्या, शिरपेच घालण्यापेक्षा शोभा अधिक पडेल, यांत संशय नाही.

---

पत्र नं० ५७ २२ एप्रिल १८४९

## हिंदु लोकांचा व्यापार

सांप्रत हिंदु लोक भिकारी होत चालले आहेत व त्यांस रोजगारधंदा नाही. याचें कारण मला असें दिसतें की, या लोकांचा व्यापार अगदी बुडाला; इंग्रज व दुसरे देशचे लोक फार शहाणे होऊन या लोकांस सर्व जिनसा पुरवितात. आणि हे मुकाट्यांनी स्वस्ताईमुळे खरीदी करतात.

वास्तव या लोकांनी एकत्र होऊन जर असा कट केला की, आपले देशांत दुसरे मुलखाचा जिन्नस आला तरी घ्यावयाचा नाही; आपले देशांत पिकेल तेवढाच माल घ्यावा; आपले लोक कापडे जाडी वाईट करितात, परंतु तींच नेसावीं; इकडे छत्र्या करितात, त्याच घ्याव्या, म्हणजे या लोकांत व्यापार राहून इकडे सुख होईल. परंतु हे लोक असें करीत नाहीत. आणि थोडी किंमत म्हणून लोकांचा जिन्नस विकत घेतात. वास्तविक पाहिलें तर हल्ली दाणे मात्र

इकडे पिकवून हे लोक खातात. अजून दाणे परदेशांतील येऊं लागले नाहीत. बाकी सर्व पदार्थ तें परदेशचें आहे. आमचे कपडे, आमची छत्री, आमची चाकू-कात्री, आमचें घड्याळ, आमची गाडी, आमची बुकें, सर्व परदेशांतील आहेत. आम्ही दाणे मात्र आपले खातों. यामुळे सर्व व्यापार बुडाला. उदमी, मजूरदार, कसबी, कारागीर घरीं बसले. आणखी तर काय सांगावें, परंतु आमचे रुपये, आमचे घरांत सनकाड्या × देखील युरोपचा. इकडे लोक पैशाचा शंभर सनकाड्या देतात. त्या पेटवावयास वित्तव पाहिजे; ठेवावयास मोठी जागा पाहिजे; परंतु विलायतेचा सनकाड्या सुंदर पेटीमध्ये तयार करून भरलेल्या पैशाचा शंभर मिळतात. वित्तव पेटवावयास नको. अशी सोय पाहून आम्ही आपले देशाचा लोकांचा सनकाड्या घेत नाही. परंतु याजमुळे आमचे लोक किती भिकारी झाले आहेत !

याजकरिता सर्वांही असा कट करावा की, जें आपल्या देशांत पिकेल, तेंच नेसूं, तेंच वापरूं, कसेंही असो. आणि तितक्यांत चांगल्या विद्या व जिन्नस उत्कृष्ट करावयास विद्या शिकूं. आम्हांस मिळेल तसेंच घेऊन आम्ही काळ काढूं. मग हजारों खंडी कापूस इकडून विलायतेस कशास जाईल ? कापूस विकणारांनी असा बेत करावा की, इंग्रेजांस इकडे तयार केलेलीं कापडें द्यावीं, परंतु कापूस देऊं नये. येणेंकरून हे लोक सुखी होतील. सांप्रत आपलेच लोक आपल्या लोकांस मारीत आहेत. जशी बाहेरची चांगली स्त्री पाहून घरची लग्नाची स्त्री टाकून तिचे पाठीस लागतात आणि भुलतात, तसें या लोकांचें झालें. येणेंकरून हाहःकार झाला आहे आणि जो तो शेत करूं लागला. दुसरा व्यापार कांही नाही.

परंतु शेत करण्यांत तरी काय नफा? वर्षभर मजूरी मरे मरेतों करावी तरी लंगोटी आणि शिळी कोंड्याची भाकर देखील मिळावयाची भ्रांति. बहुत दाणे पिकवितात, परंतु घेतो कोण ? पैसा दुसऱ्या देशांत चालला.

+ सनकाड्या– पूर्वीच्या 'आगकाड्या'.

श्रीमंत लोक, ज्यांजवळ लाखो रुपये आहेत, ते विलायती जिनसा घेतात आणि पैसा उडवितात. त्यांचे पोटास पावशेर दाणे पाहिजेत, त्याची मात्र किंमत रयतेकडे जाते. बाकी हजारो रुपये विलायतेस थेट जातात. याप्रमाणे हमेश चालले आहे. असा कट करणें वगैरे उपयोगी गोष्टी आहेत, त्या पुराणिक, हरदास यांणी लोकांस सांगाव्या, त्या टाकून दुसऱ्या गोष्टी सांगतात आणि याजकडे लक्ष देत नाहीत.

लोक भिकारी झाले, याचें कारण कोणी मनांत आणीत नाही. जर हरदास व कथेकरी यांनी अशीं मतें घेतलीं आणि लोकांस जर भरविलीं, तर बहुत लोक एकत्र होतील. कारण की, ही गोष्ट उघडी आहे. परंतु देव आधी बुद्धि नेतो व मग आंबवल नेतो. तशी या लोकांची बुद्धि पापाचरणाकडे गेली. नंतर या संकटांत ते आले. परंतु सर्व मागील पुराणांतील कथा एकीकडे ठेवून हल्लीचे लोकांची स्थिति सुधारण्यांबद्दल लोकांस उपदेश केला, तर महान् पुण्य आहे. तसें हे हरदास करीत नाहीत. चांगल्या गोष्टी छापखान्यांतून निघाव्या, असेंच नाही. हरदासांनीही काढाव्या व त्यांस लोक एकत्र करण्याची फार शक्ति आहे. कारण की, ते चौघांत उभे राहून उपदेश करण्याचा आरंभ करितात. त्यांनी असे उपयोगी विषय लोकांस शिकविले, तर सर्व आख्यानाहून हीं आख्यानें चांगलीं होतील.

आणखी लोकांस समजवावें की, तुम्ही मूर्ख आहां. विचार करीत नाही. यास्तव विचार करा व विद्या करा. व विलायतेंतील लोकांप्रमाणे अक्कलवान् व्हा. म्हणजे तुम्हांस लक्ष्मी अनुकूल होईल. छापखाने पुष्कळ ठेवा. पुष्कळ ग्रंथ वाचा, म्हणजे तुम्हांस सर्व बातम्या लागतील. लष्करचा भाकऱ्या कोण भाजतो, असें म्हणूं नका. परदेशांत गेलें तर विटाळ होतो, ही कल्पना सोडा, म्लेंच्छाचा देशांत जाऊं नये, म्हणून अटकाव होता. पण आता तुमचा देश म्लेंच्छाचा झाला, तेव्हा तो सार्थ राहिला नाही. तात्पर्य विद्या करा. विद्वानांचें ऐका. मदोन्मत्त होऊं नका. अशा प्रकारचा कथा सांगितल्या, तर फार फायदा होईल.

## हिंदु लोकांचा व्यापार

हे गोसावी कथा करितात, हे व्यर्थ लोकांस आळशी मूर्ख करितात कारण की, अमानुष गोष्टी त्यांस सांगतात. काळ यवन आला आणि कृष्णाने त्यास मुचकुंदाचे हातून जाळिला. रामास संकट पडलें, तेव्हा मारुतीने एक पाय लंकेंत आणि दुसरा अयोध्येंत ठेविला. भीष्म ऐकेना तेव्हा अर्जुनाने पाशुपतास्त्र व नारायणास्त्र सोडिलें, या गोष्टी सांगून कांही तरी उपयोग आहे काय ? आता लोक भिकारी आहेत. यांजवर सोन्याची वृष्टि होत नाही व मागील गोष्टी झाल्या, तशा आता होत नाहीत, यांत संशय नाही. तस्मात् अमानुष कथा लोकांस सांगितल्या, तर लोकांस कांही उपयोग नाही. त्यांस आळशी अधिक करण्याचा मात्र उपयोग आहे.

परंतु त्यांस कांही माणसासारख्या कथा सांगाव्या की, अमुक राज्य हें कशाने गेलें ? दिल्लीचें राज्य, बाजीरावाचें राज्य कां गेलें ? काय व्यंग त्यांत होतें हें काढावें. तसेंच विलायतेंत राज्य कसें आहे ? परंतु या गोष्टी आपले लोक मूर्ख आहेत, त्यांस सांगितल्यावर ते म्हणतील की, 'राज्य कशाने गेलें ? तर सद्दी फिरली म्हणजे राज्य जातें.' हें काळाचें माहात्म्य इंग्रजांची सद्दी फिरेल तेव्हा त्यांचेंही राज्य जाईल. परंतु हें कांही उत्तर नाही. लोक अगदी मूर्ख झाले आहेत. त्यांचीं चित्तें मागील अमानुष गोष्टींवर फार आहेत.

यांजमुळे त्यांस असें वाटतें की, अवतारी पुरुष होईल, तेव्हा आमचें कल्याण करील. हें मनुष्याचें कृत्य नव्हे. अशा मूर्खपणाचा समजुती आहेत. परंतु जरी ईश्वर सर्व गोष्टी घडवितो, तरी मनुष्यांनी मूर्खासारखा नशिबावर भरंवसा ठेवून आळशीपणांत राहूं नये. जो उद्योग करतो, त्यास ईश्वर सहाय्य होतो. म्हणून लोकांनी उद्योग करावा व प्रयत्न करावा, हेंच उत्तम. सद्दी या शब्दाचा अर्थ पाहिला तर कांही नाही; लोकांचा मूर्खपणा आहे.

---

# हिंदु लोकांनी काय करावें ?

पुण्यांत मागे एक साहेब आला होता व त्यास कारकून ठेवावयाचे होते. हें वर्तमान बाहेर फुटतांच दोन हजार उमेदवार त्याचे येथे आले.

मग त्याने निवडून निवडून त्यांतून थोडेसे ठेविले आणि म्हणूं लागला की, हें फार आश्चर्य आहे. जर एक न्हावी किंवा शिंपी ठेवूं लागलों तर मिळत नाही. आणि चांगले कारकून बोलावल्याखेरीज हजारो येतात. कारकुनीचा धंदा हिंदु लोकांमध्ये इतका स्वस्त आणि इतर धंदे स्वस्त नाहीत; याजवरून विचार करतां मला वाटतें की, ही गोष्ट खरी आहे. पुण्यांत आज पाहिलें तर दोन हजार ब्राम्हण उमेदवार चांगले लिहिणारे आहेत. परंतु त्यांस रोजगार नाही. कित्येक दहा दहा वर्षे कचेरींत जाऊन मेहनतीने लिहितात. फुकट चाकरी करितात. परन्तु पांच रुपयेदेखील कोणास मिळत नाहीत. तसेंच भट हजार आहेत; कित्येक जन्मपर्यंत वेद पाठ करण्याची मेहनत करितात. परन्तु आगांतुकी करावयास लागतील. याजकरिता मी या भटांस व उमेदवार कारकुनास फार उत्कंठेने बोध करतों की " तुम्ही दुसरा कांही व्यापार करीत जा. " यावर ते म्हणतात की, " पेशवाईंत आमचें यथास्थित चालत होतें. आता चालत नाही, हें इंग्रजांचे पायगुणाने झालें. " असो.

या गोष्टीचें उत्तर देणें जरूर नाही. तें कशानेही असो, पेशवे चांगले असोत अगर इंग्रेज वाईट असोत, जें प्राप्त झालें आहे तें खरें. सांप्रत ब्राम्हण लोकांची हलाखी आहे, हें सर्व कबूल करतील. बरें, जे इंग्रेजी राज्यास नांवें ठेवितात व मनांत चुरचुरतात, त्यांनी व्यर्थ काळजी करूं नये. कारण पेशव्याचें किंवा दुसरे कोणाचें चांगलें त्यास पाहिजे

तसें राज्य त्यांच्याने स्थापवत नाही. व इंग्रजांसही सध्या जा किंवा अमुक रीतीने चाला, हें म्हणण्याचीही या मटांची व कारकुनांची प्राप्ती नाही.

यास्तव जें आपणांस कर्तव्य, त्यावर विचार मात्र आपण करावा. तो कोणता म्हणाल, तर ऐका. सांप्रत काळीं जें दरिद्र प्राप्त झालें आहे, हें मोडावें कसें, याचा विचार पडला आहे. वास्तविक पाहिलें तर ब्राम्हण लोकांचें अज्ञान व मूर्खपणा पराकाष्ठेचा आहे. त्यांस दरिद्र फार आलें आहे. कारण इंग्रजांचे राज्यांत न्हावी, परीट, मोची इत्यादिक जे मजुरीने पोट भरणारे, त्यांचा रोजगार कायम आहे;. आणि ब्राम्हण लोक व मोठे सरदार, मराठे कुलीन हे तेव्हां मजुरीने पोट भरीत नव्हते, ते आता विलायतेस जसे लार्ड आहेत, तसें होते. व मोठालीं कामें आणि सरदाऱ्या करीत होते. हे लोक आता इंग्रजांचा उपयोगी नाहीत.

कारण या देशांत जे लाभ म्हणजे मोठ्या जागा व अधिकार ते ते सर्व आपल्या लोकांस देतात व फक्त मजुरीचे रोजगार इकडील लोकांस शिल्लक राहिले आहेत. याजमुळे फार दरिद्र व मोठ्या लोकांस लज्जा प्राप्त झाली आहे. ही दूर होण्यास हे लोक थोडेसे शहाणे झाले म्हणजे उपाय सुचतील. ते असे की, विलायतेंत पार्लमेंट आहे. परन्तु तें इकडील देशाचा कांही विचार करीत नाही. कारण त्यांस स्वदेशाचा कारभार फार आहे. पहा, सातारचा राजाने किती प्रयत्न केला, परन्तु पार्लमेंटाचाने कांही झालें नाही. सर्व मेहनत व्यर्थ गेली. व शेवटी कंपनी सरकाराने केलें तें बहाल झालें.

तात्पर्य, विलायतेंतील पार्लमेंट यास हा देश कसा वाटतो की, जसा आपले घरीं गडी आहे. त्याने एकादा व्यापार केला व त्यांत त्याने अन्याय केला तरी आपण तें मनास आणीत नाही. कारण आपण आपले घरचें काम टाकून गड्याचा घरचा कारभार कशाला पाहूं ? तद्वत् पार्ल-

मेंट म्हणतें की, आमचे देशांतील सावकार लोक यांनी परदेशांत मुलूख घेतला; तेथील ब्यायमनसुबी आम्ही पहाण्यास काय गरज ? आमचे देशांतील आम्हांस काय थोडें आहे ? याप्रमाणे आहे. सवतीचे मुलाची काळजी कोण करितो ?

तेव्हा आमचे लोकांनी एकत्र होऊन पार्लमेन्ट मागावें आणि मुंबई कलकत्ता अशा ठिकाणीं ते नेमून तेथे कांही इंग्रज व आपले सर्व जातींचे शहाणे शहाणे लोक त्यांत ठेवावे आणि त्यांचे हुकुमाने कारभार करावा. म्हणजे विलायतेचे बादशाहइत्यादी-सही नाही म्हणवणार नाही. कारण की विलायतेंत पार्लमेन्ट असावें व येथे नसावें अशी आम्हीं कांही चोरी केली नाही. हा एक मोठा उपाय साध्य व्हावयाजोगा आहे.

दुसरा सर्व दरिद्र मोडण्यास उपाय असा आहे की, ब्राम्हण लोकांनी आपल्या मूर्खपणाचा समजुती सोडाव्या व केवळ कारकून आणि भट हे दोनच रोजगार आम्ही करूं, असें म्हणूं नये. या देशांत आणखी पुष्कळ रोजगार आहेत व तेही आता दिवसेंदिवस इंग्रज घेत चालले. सावकारी, शेतकी वगैरे इंग्रज करूं लागले. हेच रोजगार आपले लोकांनी करावे. कोणते म्हणाल तर, काच, कापड, सुरी, कात्री, लाकडी सामान, घड्याळें, चाबूक, यंत्रें इत्यादि पुष्कळ इकडे इंग्रज खपावितात. हीं सर्व आपले लोकांनी करावयास शिकावें व येथे जो माल खपणार नाही तो दुसऱ्या देशास घेऊन जावा, आणि तेथे विकावा. पुष्कळ देश आहेत, या गोष्टीचा शोध करावा. व इंग्रजांचें देशाचें सामान बंद करावें किंबहुना आपलें सामान त्यांस द्यावें. परन्तु त्यांचे आपण घेऊं नये. जो इकडे उत्पन्न होईल तितका माल घ्यावा. विलायती कापड घेऊं नये. वास्तव आपल्यास जाडीं, मोठीं कापडें नेसावयास लागलीं तर काय चिंता आहे ? परंतु आपले देशाचें रक्षण करावें. असें झालें म्हणजे बहुत रोजगार रहातील.

## हिंदु लोकांनी काय करावें ?

परंतु हें या लोकांस सुचत नाही. यांस असें वाटतें की, आम्ही आजपर्यंत केलें नाही, तें करणार नाही. व भलताच रोजगार करणार नाही. दहांबरोबर मरण लग्नासमान आहे, असें ते मानितात, आणि उपाशी मरतात. भट पन्नास हजार खेपा घालतात, तेव्हा एक श्राद्धाचें आमंत्रण येतें. तसेच शंभर धक्के कोंडींत खातात, तेव्हा दोन पैसे दक्षिणा मिळवितात. चोरा लबाडांची स्तुति करतात, तेव्हा चार पैसे काढतात. दारू पिणाराने शुद्ध व्हावयास पैसा दिला म्हणजे त्यांस शुद्ध करतात. तात्पर्य, सांप्रत ब्राम्हण पैशाकरिता कसलेंही दुष्कर्म करावयास सोडीत नाहीत. तसेच उमेदवार, कारकून दोनशे खेपा घालतील, तेव्हा दप्तरदाराची भेट. पांचशे खेपा घालतील तेव्हा तो 'या' म्हणतो. मग पंचवीस वर्षे गावांत भीक मागून त्याचे घरांत काम करावें. चाकरी क्वचित कोठे येणार व ती तो आपल्या सोयऱ्याधायऱ्यास प्रथम देणार; म्हणजे सर्व उमेद्वारांनी हात आपटीत असावे. असे त्यांचे हाल होतात व माणसें अशीं जिकीरीस येतात, तीं पहावत नाहीत.

यास्तव त्यांनी स्वस्थपणाने दुसरे रोजगार करावे. म्हणजे इंग्रज लोकांचा, शिरस्तेदाराचा शिव्या, भटांचा अपमान हें कांही सोसावयास नको. याचप्रमाणे अलीकडे इंग्रजी लिहिण्याची अवस्था आहे. जो तो इंग्रजी शिकतो. परंतु इतक्याची गरज नाही. याजमुळे दीनवाणी फिरतात. या गोष्टीचा विचार केला असतां बरें पडेल.

---

# ८ विवाहविषयक

बाल- विवाहाला कसून विरोध आणि पुनर्विवाहाचा मनापासून पुरस्कार लोकहितवादींनी कसा केला, याची प्रचीति या १० पत्रांवरून येते. यासंबंधी अधिक लिहिण्याजोगें कांही नाही. महाराष्ट्रांत लोकहितवादींच्या नंतर कित्येक वर्षांनी पुनर्विवाहाची चळवळ निघाली आणि तिची विटंबना, ' जहालांनी ' आधी राजकीय सुधारणा हवी, या तत्त्वाधारें कशी केली, वगैरे इतिहास अगदी ताजा आहे. म्हणून तत्संबंधी विशेष सांगण्याचें कारण नाही. लक्ष्यांत ठेवावयाचें इतकेंच की, ही सुधारणा ब्राम्हणजातिपुरतीच मर्यादित होती, तरी तिला इतका विरोध झाला ! —नव्हे " वर्णानां गुरुः " ठरलेल्यांनीच केला.

लोकहितवादींच्या बावनकशी कळकळीचा उत्कृष्ट नमुना या पत्रांत आढळतो. यांतही त्यांचें द्रष्टेपण दिसून येतें आणि स्त्रीपुरुषांना समान हक्काने वागविण्याची त्यांची उदार वृत्ति व्यक्त होते.

## ८ विवाहविषयक


१ लहानपणच्या लग्नापासून अडचणी
७ छापण्याची कला व म्हातारपणीं लग्न
१० पुनर्विवाह
१५ लग्नाविषयी विचार
१६ विधवा पुनर्विवाहाविषयी
३० स्त्रियांची स्थिति
७० पुनर्विवाह
९० लग्नें
९९ पुनर्विवाह
१०१ पुनर्विवाह
१०४ पुनर्विवाह
१०५ पुनर्विवाह
१०६ पुनर्विवाह
१०८ पुनर्विवाह वगैरे सुधारणा

पत्र नं० २

## लहानपणच्या लग्नापासून अडचणी

तारीख ५ वी, माहे मार्च सन मजकूरचे पत्रांत आपल्यास 'प्रवासी' याणे पत्र लिहिलें, तें आपण कृपा करून लोकांत प्रसिद्ध केलें, त्यांतील मजकूर पहातां फार समर्पक आहे. यास्तव त्याचे अनुमोदनार्थ हें पत्रही प्रसिद्ध कराल असा हेतु आहे.

सांप्रत काळांतील लोक अल्पायुषी व रोगिष्ट असतात, असें महाराष्ट्र देशांतील लोक म्हणतात व त्याचे प्रतिपादनार्थ वृद्ध पुरुष अंगापिंडाने सदृढ असतात, त्यांचें उदाहरण दाखवितात. असें होण्याचें कारण 'प्रवासी' याणे लिहिलें आहे त्याजवरून साफ दिसत आहे की, लोकांच्या चाली आणि नीति भ्रष्ट झाल्यामुळे हा परिणाम निदर्शनास आला आहे. केवळ काळाचे सत्तेने अशी गोष्ट घडते असें नाही, हा तर निश्चय दिसतो; परन्तु अविचारी लोक मनास येईल तसें बोलतात आणि कारण लक्ष्यांत आणीत नाहीत. त्याजमुळे त्यांस आपली नीति ही सुधारतां येत नाही. जर लोक थोडासा विचार करितील व शास्त्राज्ञा कशी आहे, तें पहातील, तर हल्लींचे उत्पत्तींतील लोकही पूर्वींचे लोकांप्रमाणे सदृढ आणि दीर्घायुषी होतील व असें झालें म्हणजे पूर्वींचे लोकांप्रमाणे पराक्रमीही होतील; परन्तु असें न करितां बहुत लोक व त्यांत मुख्यत्वेंकरून ब्राह्मण फार बाकडे आणि अज्ञान चालतात.

हल्ली लग्नाचे दिवस आहेत, याजमुळे किती एक ठिकाणीं वारंवार असें पहाण्यांत येतें की, मोठे मोठे संभावित गृहस्थांचा मुलगा पांच वर्षांचा झाला, म्हणजे ते काळजींत पडतात. ती त्यांची काळजी दोन प्रकारची असते; एक मुलाचें लग्न लौकर कसें होईल आणि त्यास हुंडा पुष्कळ कसा मिळेल? यास्तव मोठा प्रयत्न करून हीं दोन्हीं कार्यें साधि-

तात; आणि सातआठ वर्षांचे मुलास बरोबरीची मुलगी मिळाली किंवा ती विद्रूप व हीन कुळोत्पन्न असली, तरी द्रव्याच्या आशेने ती करितात, व मग लग्न उभें राहिलें, म्हणजे आपल्यास धन्य मानून कर्ज करून पुष्कळ खर्च करितात. या प्रकारें करून कर्जबाजारी होऊन तें लग्न कोणीकडून तरी दगडीवर दगड घालून सिद्धीस नेतात. पुढे लवकरच ' प्रवासी ' याणे जे परिणाम लिहिले आहेत, ते निदर्शनास येतात. आणि बहुधा बापाचे, आईचे डोळ्यादेखत पुत्राचें व सुनेचें वाकडें पडतें व पहिल्याने जी जोडी गोजिरवाणी दिसते, ती मग शत्रूप्रमाणे दिसूं लागते. जो विद्या करण्याचा काळ व जा वयांत शरीर बळकट व्हावयाचें, त्या समयीं पुत्र संसारी व मुलाबाळांचा धनी होतो. मग त्याची विद्या तरी कशी सम्पूर्ण होईल ? आणि शरिरांत जोम कसा येईल ?

घोडा किंवा बैल मेहेनतीसाठी तयार करावयाचा असेल, तर त्यास घोडीचें व गाईचें दर्शन होऊं देत नाहीत. याचें कारण हेंच की, मग तो वळू होईल आणि मेहेनतीचीं कामें करावयास अयोग्य होईल. तसेंच मनुष्याविषयी आहे; कारण मनुष्य तरी एक जनावरच आहे. व या जनावरास ईश्वराने बुद्धि-कौशल्य इतरांपेक्षा अधिक दिलें आहे. असें असतां रानचे जनावरांपेक्षाही मूर्खपणाने कोणी कोणी वागतात, तेव्हा त्यास ईश्वराने बुद्धिविशेष व विचार दिल्याचा उपयोग काय आहे ? आणि अल्प वयांत मुलास यौवन प्राप्त आहे किंवा नाही, याचा संशय आहे, तों इतक्यांत स्त्रीविषय-लुब्ध झाल्याने त्यास दुर्गुण आणि अपौरुष प्राप्त होतें आणि त्याचे जन्माचें सार्थक होत नाही. फजिती मात्र होते. आणि त्याचा बदलौकिक झाला, म्हणजे सर्व कुळाचाही होतो. मग त्याचे बापाने लवकर लग्न करून शिफारस मिळविल्याचें त्यास बक्षीस काय मिळालें बरें ? व्यभिचार मात्र अज्ञाने बहुत वाढला आहे. आणि विप्रस्त्रियांनी इतर जातींपेक्षा ताळ टाकला आहे, हें बहुधा लोक समजतात. व पूर्वीपासून बाजीराव पेशवे यांचे अमलांत लोकांमध्ये भ्रष्टाकार होऊन जी

अधर्म-प्रवृत्ति उत्पन्न झाली, तीस लोकांचे अज्ञानानें उत्तेजन आलें आहे-व येणेंकरून ब्राम्हणधर्मास फार लज्जा आली आहे. ही दूर करण्याकरितां आपलेसारख्यांनी भगीरथ प्रयत्न केला पाहिजे. वारंवार लोकहित-संबंधी मजकूर आपण प्रगट केल्यास काळेंकरून तरी त्या गोष्टी हृदयांत ठसून नीति आणि धर्म यांचें स्थापन होईल.

यास्तव ही माझी विनंती सर्व लोकांस कळवावी की, जा चाली एक वेळ पडतात, त्या जरी वाईट असल्या, तरी लोकांस फार लाडक्या वाटतात. याजमुळे त्यांचा त्याग करण्यास अनमान होतो. व जे लहान किंवा गरीब आहेत, ते तर अगदींच धजत नाहीत. ते मोठे लोकांकडे पाहून वधतात. यास्तव कोणी संभावित लोकांनी आरंभ केल्याशिवाय हें होणार नाही. महाराष्ट्र देशांत जे मोठाले गृहस्थ आहेत, त्या सर्वांस बहुत करून मुलेंबाळें आहेत. त्यांणी ही गोष्ट मनांत वागवून केली, तर इतर लोक त्यांचे पाठीमागे चालू लागतील. जसें बाजीराव यांचें राज्य बुडालें, तेव्हा शूरांचा फार तोटा पडला, तसें आता इतकें मूर्खपण पसरलें आहे की, लोकांस मार्ग दाखविण्याजोगे शहाणे देशांत नाहीत, असें अवर्षण कां पडलें ?

लहानपणीं बापांनी आपलीं मुलें शहाणीं केलीं, तर किती एक चांगले निघतील आणि लग्न हें केव्हा तरी त्यांचे स्वसामर्थ्यानें घडेल; परन्तु मुलास रोजगारधंदा नाही, शहाणपण नाही व पुढे कसा निघतो त्याचा अंकुर दिसत नाही, तों त्याचे गळ्यांत मुलगी बांधून जोखिमांत घालावा व त्याची विद्या, आयुष्य सर्व बुडवावें यांत काय लाभ होतो ? लग्न बापानें केलें, म्हणजे त्यांत काय मोक्षसाधन आहे ? ज्याचा तो आपले पराक्रमानें करील, तर फार चांगलें; आणि मोठेपणीं लग्न झालें, म्हणजे लग्नसंबंधी शपथा व वचनें साक्षीनिशीं व ईश्वरास स्मरून घ्यावीं लागतात. तीं पुरुषाचे मनांत सार्थ वागतील, आणि त्याप्रमाणें तो वर्तेल; परन्तु लहानपणीं हें सिद्धीस जात नाही. व त्यांच्यापिण्याची सोय झाल्यापूर्वी की व मुलें गळ्यांत पडतात. मग त्याणे

पोटास मिळवावें ? किंवा स्त्रीचे बरोबर रहावें ?

थोडके दिवसांत पुण्यांत असा पर्याय झाला की, एके संभावित गृहस्थाचे मुलाने एक गरीब व्यापाऱ्याची मुलगी फसविली, म्हणून तोहमा उत्पन्न झाला होता. कोणी लबाड मनुष्य होते, त्यांस सरकारांतून शासन होऊन निवारण झालें; परन्तु कारण पाहिलें असतां त्या स्त्रीचें लग्न झाल्यापासून नवरा बाहेरगावीं पोट भरावयास गेला होता व त्याचे पश्चात् ती कन्या यौवनदशेस आली. तेव्हा तिने एक द्रव्यवान् शेजारी गृहस्थ होता, त्याचे संबंधाने बहुत कुकर्मे केलीं, याजमुळे तो नवरा पुनः पुण्यांत आला, तेव्हा त्याणे तें वर्तमान ऐकून स्त्रीचा त्याग केला, असें ऐकण्यांत आलें आहे. तेव्हा यांत अपराध कोणाचा ? हें वाचणारांचे लक्ष्यांत येईलच.

माझें म्हणणें इतकेंच की, असे दुराचार घडतात व फार ठिकाणीं घडले आहेत, त्यांचा विचार करून जे चांगले गृहस्थ आहेत, त्यांणी कांही तजवीज काढावी, म्हणजे बरें होईल. नाही तर पापवृद्धि फार होत आहे, तीस कोण आवरील तो आवरूं.

---

पत्र नं० ७

## छापण्याची कला आणि म्हातारपणीं लग्न

छापण्याचे कलेचा उपयोग आता बहुत लोकांस करूं लागला आहे व तेणेंकरून बहुत लोकांचे डोळे उघडूं लागले आहेत. जसें दोन मनुष्य जवळ जवळ बसून भाषण करितात, त्याप्रमाणे सांप्रत सर्व देशांतील मनुष्यें, स्नेह असो अथवा नसो; परंतु त्यांचे मनोभाव बहुत अंतरावर दृष्टीस पडतात. व आपले पत्रद्वारें लोकांचीं संभाषणें उघडपणीं चालतात.

आमचे मुखांतील ही लघुजिव्हा व आपलें पत्र हें बृहत्तर जिव्हा असें समजलें पाहिजे. कारण की, त्यांचे द्वारें दूर देशींचें भाषण एकावश्यास येतें व प्रतिउत्तर देतां येतें. असें हें परस्परें मनांतील अन्वय कळविण्याचें द्वार आहे. याचा उपयोग जसा इंग्रज लोक करितात, तसा आपले लोक करून शहाणपणा वाढवतील तर फार चांगलें होईल. आणि हा समय असा आहे की, आता आपले मनांतील गोष्ट उघडपणीं निर्भय-पणाने सांगतां व कळवतां येते. असें पूर्वी नव्हतें. मागील राजे असें लोकांचे भाषणास मोकळीक देत नव्हते; परंतु राज्याविषयी व धर्मा-विषयी व आणखी किती एक प्रकरणांविषयी लोकांस बोलण्याचा प्रतिबंध होता. कितीकांच्या जिव्हा व हात तोडले जात होते. पेशवाई कारकीर्दीत कोकणांत एक मामलेदार होता, त्याचें कर्म असें ऐकण्यांत आहे की, एक स्त्री त्याचा जुलूम पाहून, तुझे अमलाला आग लागो, असें म्हणाली. तेव्हां त्या ब्राह्मण सुभेदाराने त्या स्त्रीचें अंगास लोकर वगैरे जळावयाजोगे पदार्थ बांधून त्याला आग लावली. अशी क्षुल्लक अपराधाकरिता स्त्री-हत्या केली. ही एकच गोष्ट नाही. अशा मी किती एक सांगेन; परंतु सांगण्याचें प्रयोजन नाही. आपल्या लोकांस त्या चाली माहीत आहेत. तेव्हा या दृष्टांतावरून हल्ली छापखान्याचा किती फायदा आहे की, त्या द्वाराने वाजवी गोष्ट पाहिजे त्याणे लिहून कळवावी, वाईट चालीची निंदा करावी, चांगल्या गोष्टी सुचवाव्या. सरकाराविषयी व इतर कारभाऱ्यां-विषयी सुलभपणाने व मोकळिकेने बोलावें. अशी मोकळीक मागे कधी तरी होती काय?

पूर्वी सर्व गोष्टी चोरीने व गुप्तपणाने होत होत्या व सरकारच्या गोष्टीविषयी कोणी बोलतां कामास नये. बाजीराव पेशव्याचे अमलांत एसरांतील कांही बातमी फुटली, म्हणून तीस कारकून एकदा किल्ल्यावर टाकले. असा प्रतिबंध होता. तेव्हा आता लोकांचे हिताचा समय आहे, परंतु सर्वांनी असें मनांत आणिलें पाहिजे की, 'तापी-तीरवासी' याचे

तारीख १९ वी मार्च रविवारचे पत्रांत मजकूर कळविला, तो पाहून मला वाटतें की, याणे जें लिहिलें आहे, तें सर्व यथास्थित आहे. लग्नासारखे स्वसत्तेंतील कामांत सरकारचा उपद्रव येणें, हें अगदी ठीक नाही. पूर्वीपासून लग्नाविषयी जो मजकूर आपले पत्रांत छापत आहे, त्याजवरून लोकांची खात्री होईल व पुढेही खात्री करण्याकरिता उद्योग चालवून स्वइच्छेने अशा सुधारणा व्हाव्या, हें चांगलें. केवळ जबरदस्तीने लोकांकडून पूर्वीपासून चालत आलेली चाल मोडवून नवी रीति काढणें, हें योग्य नाही. अशा गोष्टी लोकांनी समजुतीने मोडाव्या हेंच बरें; परंतु कोणी असें म्हणतील की, हिंदु लोक इतके शहाणे नाहीत, तर काय चिंता आहे? आजचें उद्या होईल; पण आणखी आणखी सरकारचे हातांत जाणें, हें त्या उशिरापेक्षा वाईट व जें जबरीने चालू झालें, त्याचा खचितपणा नाही. जा काळीं जबरी एकीकडे होईल, तेव्हा पुन्हा लोक पूर्वीप्रमाणेच करूं लागतील. तेंव्हा उत्तम मार्ग हाच आहे की, ही गोष्ट लोकांचे मनांत अनेक तऱ्हेने भरवून द्यावी आणि हें काम समंजस पंडित आहेत, त्यांचें आहे आणि स्वसंतोषाने लोक समजूं लागले, म्हणजे पहिली चाल मोडून नवी चालू करतील. आणि किती एक देशांत असें झालें नाही काय? पुष्कळ ठिकाणीं झालें आहे.

असें करण्याविषयी मी एक सूचना अशी करतों की, मोठे मोठे शास्त्री अगदी सुज्ञ नाहीत, असें नाही. त्यांणी बरे ही गोष्ट डोकीवर घेऊन सभा जमवून ठरवावी. लग्नकार्य झालें म्हणजे दोन पैशाचे आशेने शेकडो ब्राम्हण जमतात व उड्या घालतात. मग असे लोकहिताकरिता द्रव्याशा सोडून वर्षांत एक दिवस कां जमत नाहीत? जर असे चार सभ्य जमतील, तर अशी गोष्ट ठरावांत सहज येईल; परन्तु मला वाटतें की, सांप्रत काळीं धैर्यवान् लोक थोडे आहेत. सर्व आपले पोटाचा विचार पाहतात. हल्ली पुण्यांत किती एक लग्नें होत आहेत, त्यांत असें पहाण्यांत येतें की,

पन्नास साठ वर्षांचे पुरुष मरणोन्मुख व गंतुकाम × झाले तरी तरुण स्त्री करावयाची इच्छा करितात. व आर्जवी जोशी त्यांस सांगतात की, अमकी मुलगी करा, तिचे जातकांत + वैधव्य नाही व तुमचें आयुष्य शहाण्णव वर्षें आहे. असें हे जोशी नादीं लावून मुलींचा घात करतात. असल्या कर्मास काय म्हणावें ? त्या लग्न करणाऱ्यास, मुलींचा विक्रय करणाऱ्यास व भटास धिःकार असो. मागाहून आणखी लिहिण्यांत येईल.

---

पत्र नं० १० १४ मे १८४८

## पुनर्विवाह

सांप्रत आपले लोकांमध्ये हा केवढा अनर्थ आहे की, स्त्रियांस पति वारल्यावर पुनरपि लग्न करूं देत नाहीत ! ईश्वराने स्त्री व पुरुष सारखे उत्पन्न केले व उभयतांचे अधिकार समसमान आहेत. असें असतां पुरुषास पुन्हा विवाहाची आज्ञा आणि स्त्रियांस मात्र मनाई, हा केवढा जुलूम आहे ?

चार शहाणे लोक मनावर घेऊन हें कार्य करतील, तर किती एक जीव विनाकारण दुःखांत व अपराधांत पडत आहेत, त्यांचें संरक्षण होईल; परन्तु हें भाषण साधारण लोकांचे कर्णी पडलें, म्हणजे त्यांस असें वाटेल काय ? नाही. ते म्हणतील की, आम्ही भूदेव, आमचें शास्त्र ईश्वरोक्त आहे; त्याचें उल्लंघन आम्ही करणार नाहीं, व काशीपासून रामेश्वरापर्यंत ब्राम्हणांचा दबदबा आहे, तो जाऊन लोक थट्टा करतील; व जुने चालीस विरुद्ध येईल. आणखी ते म्हणतात की, 'त्यांत काय आहे ? जा स्त्रीच्या नशिबीं सुख नाही, तिचाच नवरा मरतो.' अशीं मूर्खपणाचीं प्रमाणें दाखवितात.

× गन्तुकाम– परलोकीं जाण्याची इच्छा असलेला; म्हातारा; पक्व.

+ जातक–फलज्योतिष. ( पत्रिका )

परन्तु त्यांस असें समजत नाही की, आमच्या जा कन्या त्यांचें रक्षण करण्याचा आमचा धर्म असून, त्यांचा असा घात करूं नये व आमचे लोकांमध्ये पुष्कळ शास्त्रजाणते व ग्रंथ पहाणारे व विद्वान् म्हणून मिरविणारे आहेत; परन्तु त्यांस खरे विद्वान असे कोणी म्हणेल काय? नाही. जांस आपण सुखी कोणच्या रीतीने होऊं हें कळत नाही व जे आपले कन्यांचा सर्वस्वी घात करितात, ते विद्वान कशाचे? हा एक चमत्कार आहे की, पांच वर्षांपासून पंधरा वर्षेपर्यंत कन्येचा पुनर्विवाह करावा, म्हणून शास्त्राज्ञा आहे; परन्तु तीदेखील मानीत नाहीत. शास्त्राज्ञा आहे ती झाकून ठेवितात, हा केवढा अनर्थ आहे?

अहो लोकांनो! तुम्ही आपले कन्यांचे वध करणारे आहांत. सांप्रतचे ब्राम्हणांस शिकवणें फार अवघड आहे. चालीविरुद्ध गोष्ट त्यांचे कानीं पडली, म्हणजे ते नाक मुरडितात आणि म्हणतात, ' छेः, हें काय? त्यांत काय आहे? पूर्वापार चालत आलेली चाल असून तीस विरुद्ध कसें बोलतां? आमचे वडील तर लक्षावधी रुपये मिळवीत होते. आता आम्ही हलक्या अवस्थेप्रत पावलों, म्हणून अशी बुद्धि झाली.' जसा एखादा पहिलवान एक पल्ला ओझें उचलणारा असतो आणि त्यास क्षयरोग झाला, म्हणजे तो औषध घेत नाही. तो म्हणतो की, ' अरे, माझें पल्लाभर उचलावयाचें बळ होतें, तेव्हा मीं औषध घेतलें नाही. आता मी थकलों, आता औषध घेऊं काय? मी कधी घेणार नाही.' आणि औषध तुच्छ मानून जर्जर होऊन मरण पावतो. तसे ब्राम्हण लोक मूर्ख होऊन विचार करितात आणि म्हणतात की, ' अहो, आमचे पूर्वज विश्वामित्र, त्याने नवी सृष्टि केली; अगस्तीने समुद्र प्राशन केला; दुर्वासाचे शापाने विष्णूने दहा जन्म धारण केले व भृगूने लक्ष्मीनारायणास लाथ मारली; असे आम्ही देवांचे देव आणि सर्वांहून वरिष्ट; आम्हांस शहाणपण शिकवावयास कोणी समर्थ नाही.'

" अरे अरे!" फुकट हे ब्राम्हण लोक गर्वाने जळतात!

मागील गोष्टी मनांत कशास आणतात ? मी तुम्हांस पुसतों की, जेव्हा तुम्ही आपले जावयाचें मरणाची खबर ऐकतां आणि तुमची कन्या तर लहान, तिचें आणि जावयाचें अजून दर्शन झालें नाहीं; असें असतां त्या लहान अर्भक बालकाविषयी तुम्ही आपले मनांत निष्ठुरपणा कां आणितां ? आणि आपले कन्यांस तुमचे तुम्हीच खाटीक कां होतां बरें ? अरे, परकी लोक यांणी जर तुमच्या कन्या रस्त्यांतून जातांना पाहिल्या, तर त्यांची अवस्था पाहून अंतःकरण चरचरा भाजतें आणि दया उत्पन्न होती; परन्तु तुम्ही आईबाप, भाऊबंद, शहाणे व विचार करणारे व बरें-वाईट जाणणारे, असें असून एवढा तुमच्या घरांतील अनर्थ तुमच्याने दूर कसा होत नाहीं ? तुम्ही आपल्या स्त्रिया व कन्या मूर्खपणाचे अवस्थेंत जन्मापासून बाळगिल्या आहेत; म्हणूनच हा तुमचा जुलूम त्यांजवर चालतो व त्या सोसतात.

जर त्यांस थोडेसें ज्ञान असतें, तर त्यांनी त्याचा विचार काढून जे पुनर्विवाह करूं नये म्हणतात, त्यांचे श्रीमुखांत दिली असती, यांत संशय नाहीं; परंतु अज्ञान आणि भोळसरपणामुळे सर्वत्र जुलूम चालतो, असा नेम आहे. त्याप्रमाणे हे झाले आहेत. जर आपल्या देशांत दहा स्त्रिया विद्वान असत्या आणि त्या जर विधवा झाल्या असत्या, तर त्यांनी आपला पुनर्विवाह करण्याचें ठरविलें असतें. आणि दुष्ट ब्राम्हणांचे तंत्रांत त्या कधी राहिल्या नसत्या, यांत संशय नाहीं.

परंतु आजपर्यंत ब्राम्हणांनी मोठी सावधगिरी केली की, कन्यांस विद्या शिकविली नाहीं. हे अनर्थ घरोघर आहेत. आईबाप शेकडो आहेत, किती एक दुःखाने विव्हळ आहेत; परंतु त्याचा उपाय त्यांस सुचत नाहीं. बरें, असें पहा की, पुनर्विवाह जे इतर लोक करितात ते काय ब्राम्हणांपेक्षा कमी आहेत ? कन्येचें दुसरें लग्न केल्यांत ब्राम्हणांस काय लहानपणा येईल ? व त्यांत काय लाज आहे ? ब्राम्हणांनी सर्व धर्म कोठे चालविले आहेत ? किती एक अधर्म करितात, त्यांतच यांची गणना करून हें दुःख त्यांनी दूर

करावें. यांत कांही अप्रतिष्ठा नाही, आणि यांत कांही अधर्म नाहीं आणि असें केलें, तर कांही भ्रष्टाकार जाईल; परंतु हें त्यांचे मनांत कधी येईल न कळे.

आज काळीं तर वृद्ध लोक आहेत, त्यांची समजूत पडणें अवघड आहे. त्यांचें मन त्या दुष्ट बुद्धीशीं बहुत दिवस राहून तन्मयच झालें आहे व तसेच अलीकडील जे लोक ते वृद्ध लोकांच्या समागमाने बसले आहेत. सांप्रत विद्या म्हणजे कागद लिहितां यावा व वाचतां यावा, दुसरें त्यांस कांही ठाऊक नाही. असे जरी अविचारी आहेत, तरी ते नाक मुरडितात. त्यांचे कानीं अशी गोष्ट पडली, तर त्यांचे अंतः-करणास शस्त्र लागतें; त्याचें त्यांस कारण पुसलें तर सांगतां येत नाही. त्यांस ' चाल ' इतका शब्द मात्र ठाऊक, बाकी कांही विचार नाही. व ते सद्बोधास वाईट मानितात. तेव्हा जे गुजराथेंतील रजपूत कन्या उपजतांक्षणीं मारतात, ते अधिक किंवा दक्षिणी ब्राम्हण जे आपले कन्यांस दुष्ट कर्मांत प्रवीण करतात आणि पुनर्विवाह करूं देत नाहीत, ते अधिक, याचा न्याय करणें लोकांकडे आहे.

---

पत्र नं० १५

## लग्नाविषयी विचार

सांप्रत काळीं ब्राम्हण लोकांत स्त्रियांचे हाल व विपत्ति बहुत होतात व कन्या झाली म्हणजे लोक नाक मुरडितात, याचे कारणाचा विचार केला असतां सहज कळून येईल. बहुधा मोठे गृहस्थांचे कुळांत कन्या जन्मली म्हणजे त्यांस असें वाटतें की, माझे घरांत अवदसा शिरली, व जर कन्या मेली तर ते सुखी होतात. याचें कारण लोकांमध्ये

कांही मूर्खपणाच्या चाली आहेत. कच्छ देशांत झाडीज रजपूत म्हणून एक जातीचे लोक आहेत, ते आपल्या कन्या मारितात. कारण की तसें न, केल्याने खर्चवेच व नवरा पहाण्याची मेहनत पडते. दक्षिणी ब्राम्हण लोक आहेत हे तरी आपले कन्येविषयी बहुत अडचणी भोगतात. त्या अडचणी आपले देशांतून जातील तर लोक बहुत सुखी होतील.

(१) कन्यादान ब्राम्हणाहून इतर जातींशीं करावें किंवा न करावें याचा विचार दुसरे वेळेस करूं. परन्तु इतकी तरी मोकळीक असावी की देशस्थ किंवा कोकणस्थ वगैरे ब्राम्हणजातीचा वर असावा. अमुक एक जातीचा पाहिजे हें नसावें, म्हणजे मोठी अडचण दूर होईल व संबंध यथायोग्य होतील. किती एक लोक नवरा मुलगा श्रीमंताचा मिळत नाही म्हणून गरीब मुलास घरजांवई करितात. तसें करण्यास नको. व आईबापास संकट पडणार नाही; व मुलीचेंही कल्याण होईल. आणि तिचे जन्माचें दुःख सुटेल. हा एक लाभ.

(२) ज्योतिषी यांस लग्नसंबंधी कांही एक पुसूं नये. गणमैत्री षडाष्टक आणि मुहूर्त हे पहाण्याची कांही गरज नाही; येणेंकरून फार अकल्याण होईल. चांगलें सुस्थळ मिळालें व सर्व गोष्टी अनुकूल झाल्या तरी हे जोशी यांचा विध्वंस करितात; पहा बरें, आजपर्यंत ब्राम्हणांनी जोशांचे अनुमताने लग्नें केलीं तरी बहुत विधवा झाल्या आहेत. व बहुत विघ्नें आलीं आहेत. तेव्हा परिणाम पहातां या फुकट अडचणी वेडे-पणाच्या आहेत. जोश्याचे नादीं लागून लोकांनी आपला घात करूं नये.

(३) मुलींचे लग्नास पैका खर्च करितात, तो आपले योग्यतेप्रमाणे व मिळकतीप्रमाणे करितात असें नाही. लोकांचे खुशीप्रमाणे करितात, हा मोठा मूर्खपणा आहे. लोकांचे संतोषाकरिता आपलें धन उधळावें याचें कारण काय? नेमका खर्च बेताप्रमाणे करावा हें उत्तम. फार पैसा खर्चिल्याने मुलीस कांही नफा होतो असें नाही. व आईबापासही नाही. त्यापासून चार लफंगे व आळशी पोसतात इतकें मात्र होतें.

(४) मुलीचे लग्नास अमुक वय असावें हा नियम अस नये. आठ नऊ वर्षे मुलीस झालीं म्हणजे आईबापास काळजी पडते की आता या पोरीचें लवकर लग्न केलें पाहिजे; नाही तर आम्हास लोक हस तील की, पहा यांनी आपली मुलगी केवढी वाढविली ? अजून ल नाही ! परन्तु ही सर्व वेडेपणाची समजूत आहे; याचा बेत कशास पाहिजे लहानपण विद्या शिकविण्यांत घालावें व पुढे सरासरी वीस वर्षांचे आंत तिला कळूं लागलें म्हणजे तिचे व आईबापाचे संमताने लग्न करावें. येणेकरून बहुत फायदे होतील. आजच्या काळांत आईबाप मुलींचीं लग्नें जबरदस्तीने करितात म्हणून त्यांस आपली मुलगी आपले स्वार्थाकरिता विकावयास सापडते, हा केवढा जुलूम आहे बरें !

आता किती एक म्हातारे पुरुष मरणास पात्र, ज्यांच्या तोंडांत एकही दात राहिला नाही, डोळ्याने न्याहाळवत नाही, अंगावर सुरकुत्या पडल्या आहेत, असे वयस्कर लोक आपल्यास तरुण स्त्रिया नऊदहा वर्षांच्या करितात. हा केवढा चमत्कार आहे ! जर स्त्रियांना स्वसत्तेत लग्न करूं दिलें तर, अशा प्रेतरूप पुरुषांस त्या वरतील कीं काय ? तेव्हा या चालीने फार वाईट होतें, व जें विद्या करण्याचें वय, तें सासऱ्यास रहाण्यांत व हाल सोसण्यांत जातें. व लवकर लग्नाचा संबंध झाल्यामुळे कोणतेही प्रकारें सुखावह होत नाही. आणि जनावराप्रमाणे मुली वाढतात, परन्तु जीं भय धरून लहानपणीं लग्नें करितात, तींच पुढे येतात. चुकत नाहीत.

(५) स्त्रियांचा पुनर्विवाह होत नाही, याजमुळे मुलीचें जन्माचें मोठें संकट प्राप्त होतें. कारण तिचा नवरा मेला म्हणजे सर्वस्वी घात होऊन ती आईबापांचे येथे येऊन रहाणार; तेव्हा आईबापास असें होतें की, जन्मापर्यंत हिला आम्ही खायास घालावें त्यापेक्षा ही मेली तर बरें; कारण अन्न घालून तरी सुख नाही. तिचें विद्रूप आणि हाल इतकेच पहावयाचे. आणखी सासरचे लोक म्हणतात की, आमचा मुलगा मेला, तेव्हा या रांडेचा पायगुण वाईट. मग ही कशास पाहिजे ? असें म्हणून

तिला वाईट कामें सांगतात, आणि अमेरिका खंडांत गुलाम नेऊन त्यांचे हाल करीत होते, मारून काम घेत होते, व त्यांत तो मनुष्य मेला तरी फिकीर करीत नव्हते; तद्वत् किंवा पृथ्वीवर एक लांब प्रदेश आहे, त्या स्थळीं अशी चाल होती की, मनुष्यास मारून खावें व किती एक ठिकाणीं अशी चाल होती की, कोणास मुलगी झाली तर तिला जिवंत पुरावें. व आणखी एक ठिकाणीं अशी चाल होती की, जांचे घरांत मुलीं जन्मतील त्याणे आपली बायको गावकऱ्यास व पोरें शानांतील जनावरास खाण्यास टाकावींत; अशा अनेक चाली पृथ्वीवर होत्या. व असे चमत्कारिक दुष्ट लोक पृथ्वीवर होते. मला वाटतें, की पूर्वी दैत्य आणि राक्षस होते म्हणतात, ते असलेच लोक असतील. राक्षस म्हणजे मानवाचे शत्रु; तेव्हा जे मनुष्यांचें मांस भक्षितात ते राक्षसच होत. असेच पूर्वी हिंदुस्थानांत असतील. व यावरून अशी कल्पना होते की, पूर्वी हिंदु लोक सीथिया देशांतून हिंदुस्थानांत आले त्या वेळेस त्यांस हे राक्षस इकडे आढळले, तेव्हा त्यांचीं वर्णनें पुराणांत त्यांनी लिहिलीं आहेत. अस्तु.

या दुष्ट लोकांपासून ही पृथ्वी आता निर्धूत होत चालली आहे व किती एक घातकी चाली लोक सोडीत चालले आहेत. परन्तु असे हे रानटी लोक व हिंदु लोक जे आपल्यास मोठे थोर सुधारलेले व शहाणे म्हणवितात, त्यांणी अशा अनर्थकारक चाली पुढे चालवाव्या, हें मोठें आश्चर्य आहे.

पूर्वी परशरामभाऊ पटवर्धन यांची मुलगी विधवा झाली. तेव्हा त्यांणी मार्तंड वगैरे पुस्तकांवरून असें ठरविलें की, पुनरपि विवाह करावा; परन्तु राज्यांत नाना फडणीस मोठे शहाणे होते. त्यांणी त्यास विघ्न केलें आणि सांगितलें की, 'तुम्ही असें करूं नका. कारण एकाने केलें म्हणजे सर्व करतील.' तेव्हा तें सिद्धीस गेलें नाही. ही गोष्ट केवढी झाली, तथापि त्याचें लोक वर्णन करितात, आणि सांगतात की, पानशे हे तोफखान्या-वरील सरदार होते. त्यांचे घरीं सत्तावन बोडक्या होत्या. हें मोठें शहाणपण समजतात. परन्तु मला वाटतें की, हा मोठा अनर्थ

आणि मनुष्ययज्ञ होय. पहिले लोक दांडगे होते. व बायकांस घरांत कैदेंत ठेवीत व पाहिजे तसे हाल करीत. त्यांची स्तुति काय करावयाची आहे ? वंशवृद्धि व्हावयाची तिचा नाश व किती एक जिवांस दुःख, याचें कारण कोणाचे लक्षांत न येऊन शंकराचार्यास धर्माचे मोठे अध्यक्ष म्हणवितात. व शास्त्रीपंडित आहेत ते सर्व आंधळे, उंटाचे कतारी * सारखे एकाच्या नाकांत वेसण तो दुसऱ्याचे, तेव्हा ओढत ओढत चालतात. लोकांचें हित कसें होईल, याचा विचार करीत नाहीत. जर स्त्रियांचा पुनर्विवाह केला तर किती लोक सुखी होतील ! व मला खचित वाटतें की, यामुळे एका जिल्ह्यांत सरासरी शंभर बाळवध होत असतील. या मानाने पुण्यांत व आसमन्तात् प्रांतीं शंभर कोसांत दोनतीन हजार लेकरें मारलीं जातात. मग कच्छ आणि काठेवाड येथील कन्याहत्या व हें सारखेंच नव्हे काय ?

दक्षिणेंतील ब्राम्हणाच्या विधवा पुत्र व कन्या या दोघांस एकंदरच मारतात. आवडनिवड करीत नाहीत. इतकें असूनही लोक डोळे झाकतात आणि म्हणतात की, आमची चाल आहे व हिच्या जर विपरीत केलें तर सर्व बुडेल; परंतु काय बुडेल, हें कोणी सांगत नाही ! कोणी म्हणतात की, 'अरेरे ! असें शास्त्र आहे व मनूने असें स्मृतींत लिहिलें आहे.' परंतु त्यांस मी एक प्रश्न करितों; मनूने असें ठरविलें आहे की, ब्राम्हणाच्या स्त्रीने एक वेळ नवरा मेला तर पुनरपि लग्न करूं नये, तिणे आयुष्य तसेंच घालवावें किंवा आपल्यास जाळून घ्यावें; परंतु मनु हा जर ईश्वरांश होता, तर त्याने अशीही सत्ता पृथ्वीवर कां प्रगट केली नाही की, जर आपण असें शास्त्र केलें तर असेंही करूं की कोणे एकेही ब्राम्हणाचे स्त्रीचा नवरा मरणार नाही ? प्रथम स्त्री मरावी, नंतर नवरा मरावा; असा क्रम जर पृथ्वीवर घातला असता तर मी म्हटलें असतें की, मनु हा ईश्वर होता व ब्राम्हण हें ठीक करितात. आणि मनु हा ईश्वर-अंश असें मी

* (उंटाचे) कतार — रांग. ( एकाच्या वेसणीचा दोरा दुसऱ्याच्या शेपटीस बांधून उंटांचा काफिला हिंडतो तो. )

समजलों असतों. परंतु ज्यापेक्षा तसें नाही, मरावयाचे ते मरतात व जगावयाचे ते जगतात, त्याचा बंदोबस्त मनूष्याने कांही होत नाही; शास्त्र करून त्यास लोकांस सांगावयास मात्र येतें, घात चुकत नाही, असें आहे, तर मग त्यास फिरविण्यास काय चिंता आहे?

अहो, नवरा मरणें हें कोणाचे स्वाधीन नाही. तें ईश्वराधीन आणि स्त्री व नवरा यांचा सबंध संसारापुरता आहे. तेव्हा एखाद्या ब्राम्हणास मी जर सांगितलें की, तुम्ही यज्ञोपवीत घेतलें आहे, हें तुमचें अखेरीचें आहे. जर हें तुमचे अंगावर तुटलें तर त्या दिवशीं तुम्ही त्यासहवर्तमान जाळून घ्यावें किंवा आम्ही तुमचे पांच पाट काढून तुम्हास विद्रूप करून जन्मपर्यंत तुमचे हाल करूं व बोडकीप्रमाणे तुम्हांस ठेवूं; तर त्या ब्राम्हणास तें आवडेल काय? तद्वत् स्त्रीचा नवरा तिला थोर व त्याचे आज्ञेंत चालावें हा धर्म खरा, परंतु जर तो मेला तर काय उपाय आहे? दुसरा करावा हें ठीक आहे. याविषयी थोडकें लिहिलें आहे, पुढले प्रसंगीं तपशीलवार लिहूं.

---

पत्र नं० १६ ४ जून १८४८

## विधवा पुनर्विवाहाविषयी

आपले लोकांत पुनर्विवाह चालू करण्यास फार अवघड नाही, परंतु मूर्ख लोकांची अडचण फार आहे. नाही तर मला खास ठाऊक आहे की, बहुतांचे मनांत हा धर्म वागला आहे, व किती एक लोक या अनर्थकारक चालीस त्रासले आहेत. व आईबाप आपले मुलींचें दुःख पाहून केवळ पोटांत दगड घालतात.

ही दुष्ट रीति हिंदुस्थानांत लोकांचे अज्ञानामुळे किती एक वर्षे चालली; परंतु राजाचा जुलूम फार झाला म्हणजे प्रजा दंगा

करिते, व कायद्याचा जुलूम झाला म्हणजेही लोक त्याचा त्याग करितात, तसे सांप्रत काळीं बहुत लोकांचे मनांत पुनर्विवाह करण्याचें आहे. परंतु शास्त्रीपंडित अनुकूल करण्यास पांच चार लाख रुपयांचें काम आहे. जर इतके कोणी देईल तर आता ही चाल चालू होईल. ब्राम्हणास एक एक शालजोडी दिली म्हणजे त्याजकडून कोणतेही कामास अनुमोदन देण्यास आळस होणार नाही; परंतु आजकाळीं इतका मुबलगपणाने कोणी खर्च करील असा सामर्थ्यवान् व शहाणा आपले लोकांमध्ये नाही. कोणी द्रव्यवान आहेत ते मूर्ख आहेत. त्यांना दिवस उजाडल्याची व मावळल्याची शुद्ध नाही.

तेव्हा माझें म्हणणें असें आहे की, जा लोकांचे मनांत ही गोष्ट कर्तव्य आहे, त्यांनी एक सभा करून अनुमती घ्याव्या. प्रथमतःच पांच-चारशे संमती पडतील, यांत संशय नाही. व असेंच जागोजाग होईल. मग इतके लोक जमल्यावर त्यांस कोणी प्रतिबंध करणार नाही. सरकार तर अशा सुधारणुकीस अनुकूल आहे; किंबहुना आपले लोक जातीबाहेर टाकतील तर काय चिंता आहे ? सांप्रत सर्व ब्राम्हण वगैरे हिंदु लोकांही इंग्रजांस जातीबाहेर ठेविलें आहे, म्हणून इंग्रजांचें काय कमी झालें ? व ब्राम्हणांचें काय अधिक झालें ? उभयतांचें सारखें आहे. मूर्ख लोकांचे मताप्रमाणे चालावें यांत कांही हित नाही. दोन हजार लोक एकत्र जमले तर ती एक प्रजाच होईल. तीस कोणाची गरज नाही. तिने ब्राम्हणां-प्रमाणे धर्म आचरावे आणि पुनर्विवाहाविषयी मात्र सुधारणा करावी. आता त्याबद्दल मूर्ख लोक काय दोष देतील तो देवोत; परंतु अशा हितकारक सुधारणेस उशीर किमपि करूं नये.

ही पुनर्विवाह करणारी जात उभी राहिली म्हणजे अर्थातच इतर ब्राम्हण त्यांस येऊन मिळतील व कांही दिवसांनी सर्व एक होतील. पुनर्विवाह हिंदु लोकांचे सुधारणेचें मूळ आहे, व त्यांत निम्मे सुधारणा आहे. व तेणेंकरून फार लाभ आहेत. हें पाहून कोणा गृहस्थाची मुलगी

विधवा झाली म्हणजे त्याचे मनांत येईल की, आपले मुलीचा घात करावा आणि मूर्ख ब्राम्हणांचे जातींत रहावें, त्यापेक्षा सुधारक हिंदु जातींत कां जाऊं नये ? तेथे काय कमी आणि येथे काय जास्ती आहे ? असे लोक पुष्कळ मिळतील. परंतु प्रथमतः करण्यास कोणी धजत नाही, हा वेडेपणा आहे. त्यांत कांही ब्राम्हणाचें बुडत नाही, व कांही थोरपणा कमी होत नाही, आणि धर्म बुडत नाही. परंतु त्यांनी वेडेपणाने धर्म, रीति, चाली, शास्त्र हें सर्व एकत्र केलें आहे.

पहा, सांप्रत काळचे लोक इतके मूर्ख आहेत की, त्यांस चाल म्हणजे काय, असें कोणी पुसलें तर ते म्हणतात की, अरे, चाल म्हणजे धर्म, परंतु त्यांस असें कळत नाही की, धर्म, चाल व शास्त्र हीं सर्व वेगळालीं आहेत. परंतु हे लोक इतके विद्वान व समजूतदार असते तर मूर्खपणाने स्वताचे घातास का प्रवर्तक होते ?

शास्त्र यद्यपि असेल की, स्त्रीचा पुनर्विवाह करूं नये, तर शास्त्र हे कायदे आहेत व जे अनहितकारक कायदे असतील ते सोडून दुसरे करण्यास कांही चिंता नाही. मला वाटतें की, मनुष्यें लवकर संपवावीत व लोक वृद्धिंगत होऊं नयेत, म्हणून स्त्रियांनी पुनर्विवाह करूं नये, असें ठरविलें नसेल ना ? ब्राम्हणांचे ताब्यांत त्यांनी रहावें, व आपला नवरा गेला, मेला किंवा हरला तर मला त्राता कोणी नाही, तस्मात् यांचींच आर्जवें करावीं, असें स्त्रियांस वाटावें, म्हणून ब्राम्हणांनी त्यांस आपल्या दासी करण्याकरिता आपले जाळ्यांत त्यांस धरलें. सर्व प्रजा व राजे इत्यादि त्यांनी आपले ताब्यांत घेतले आहेत. मग स्त्रिया तरी कशा सुटतील ?

ब्राम्हणांनी शास्त्र केलें की, राजाने प्रथम ब्राम्हणांचें प्रतिपालन करावें, नाही तर त्याचे राज्यास वाईट होईल. परंतु असें लिहिलें नाही की, राजाने सर्वांचें प्रतिपालन करावें. ब्राम्हणांचेंच विशेष करावें, हें कशास पाहिजे ? बापप्रमाणे ब्राम्हणांचीं पोटें भरावीं व त्यांचें माहात्म्य

राजापासून आपले स्त्रियांपर्यंत सारखें या भूमीवर रहावें व ब्राम्हणांचें कोठें न्यून पडूं नये, यास्तव हें शास्त्र आहे; ब्राम्हणांस मदकीं द्यावीं, फळें द्यावीं, धान्याच्या राशी द्याव्या, इतक्या युक्ति याजकरितां केल्या की, त्यांस कांही न्यून नसावें. परंतु या सर्व युक्ति लोक अज्ञान व ब्राम्हण मात्र शहाणे होते, तेव्हा चालल्या. आतां ज्ञान सर्व ज्ञातींत प्रसृत झालें आहे; म्हणून आतां या तजविजी सर्व व्यर्थ होतील. आणि ब्राम्हण व इतर जात सारखीच होईल.

जो विद्वान् तोच ब्राम्हण; जो शूद्राचें आचरण करितो तो ब्राम्हण कशाचा ? असें होऊन भेद आहे तो अर्थातच निवेल व जुनें शास्त्र स्त्रियांस दासी करण्याकरिता केलें तें फिरेल. ब्राम्हण पाहिले भिकारी व रानांत रहाणारे होते, त्यांस खावयास मिळावयाचीही भ्रांत होती व स्त्रियांस सुखप्रद कांही नव्हतें, म्हणून त्या नाखूष राहून कदाचित् पळून जातील, किंवा त्यांस कोणी घेऊन जाईल, यास्तव हें अवघड शास्त्र केलें आहे की, स्त्रीने सती जावें, नाही तर पुनर्विवाह करूं नये, विधवा जन्मपर्यंत असावें व विद्रूप व्हावें, अलंकारशून्य असावें व दोनदा जेऊंही नये. याचें तात्पर्य पहाल, तर (एक) पुनर्विवाह करूं नये; या आपले हितार्थ ब्राम्हणांनी शास्त्र केलें; व त्यापासून हें सर्व उत्पन्न झालें. पुनः लग्न करूं नये म्हटलें. तेव्हा अर्थातच स्त्रिया व्यभिचार करतील; पण त्यांस वरण्यास कोणा पुरुषाची इच्छा होऊं नये म्हणून केश काढून बोडक्या करण्याचें शास्त्र केलें, म्हणजे त्यांस कोणी पुरुष अनुकूल होणार नाहीच. हें तात्पर्य. असो.

हें सर्व जुलूम आहेत, व स्त्रियांस विद्या शिकवूं नये म्हणतात. याचेंही कारण हेंच आहे की, त्यांनी जर शास्त्राभ्यास केला तर त्या विरुद्ध गोष्टीस प्रतिकार करतील. सारांश, एकदा मनुष्य जसा स्वतन्त्र कारभार करण्यास इच्छितो व मध्ये दुसरा कोणी असेल तर त्यास हाकून देऊन आपण एकटें बसावयाचें करितो, तद्वत् पहिले ब्राम्हण होते. त्यांचा

असा मतलब की, आपली बरोबरी कोणी करूं नये; म्हणून त्यांनी कायदा केला की, शूद्रांनी व स्त्रियांनी पोथी उघडूं नये. व जर त्यांस कांहीं शास्त्र पहावयाचें असेल तर त्यांनी ब्राह्मणांचे मुखांनी ऐकावें. ज्या वेळेस हे कायदे केले त्या वेळेस तरी लागलेच लोकांनी हे ग्रहण केले असतील असें म्हणवत नाही. बहुत काळें करून पहिले लोकांची योग्यता मोठी, असें समजूं लागलें. मग जसजसा तो जुना होतो ततसे लोक त्याचें भजन करितात व अगदी आंधळे होतात. अस्तु.

स्त्रियांचे हाल, विपत्ति, जनावराप्रमाणे अवस्था, ज्ञानशून्यता व पुरुषांची क्रूरता प्राचीन शास्त्राधारें बहुत दिवस चालली, पण आता तरी हा ईश्वरी क्षोभ जावो, आणि जसे पुरुष तशा स्त्रिया आहेत, असें आंधळ्या हिंदु लोकांस समजो, ही माझी अतिशय इच्छा आहे; तर जे सुधारक हिंदु असतील त्यांहीं या कामास निर्भयपणाने प्रारम्भ करावा.

---

पत्र नं० ३० ८ आक्टोबर १८४८

## स्त्रियांची स्थिति

सांप्रत काळीं हिंदु लोकांचे स्त्रियांची अव्यवस्था व दुर्दशा फार आहे. स्त्रिया पुरुषांवर अमल करीत असतात. व त्यांचे स्वभावाप्रमाणे बहुत लोकांस वागावें लागतें. त्यांचे गुण लहान मुलांस प्राप्त होतात. त्याजमुळे स्त्रिया शहाण्या असणें जरूर आहे. ज्या देशांत स्त्रियांचे अधिकार लोक मानीत नाहीत त्या देशांत लोकांची स्थिति वाईट असते. हिंदु लोकांत फारच मूर्खपणा आहे; वास्तव स्त्रियांची दुर्दशा फार आहे. प्राचीन काळीं असें नव्हतें.

कारण मागील काळचे कथेवरून पाहिलें असतां असें दिसतें की, पूर्वी

## स्त्रियांची स्थिति

हिंदु लोकांत स्त्रियांचा मान फार होता. हल्ली लग्नांत स्त्रिया पुढे चालतात व मागे पुरुष असतात; व पुण्याहवाचन वगैरे धर्मासंबंधी कांही एक कर्म स्त्री बरोबर बसल्यावाचून होत नाही. याजवरून स्त्रियांचा प्रमुखपणा मानला आहे, असें दिसतें. राज्याभिषेकामध्येही राणीस मान फार आहे.

आता ब्राम्हणांच्या समजुती आहेत, त्या पूर्वी असत्या तर शास्त्रांत प्राचीन ब्राम्हण असें न लिहिते. तेव्हा आता स्त्रियांचा अपमान होण्यास कारण काय, याचा शोध लाविला असतां असें दिसतें की, हिंदुस्थानांत इंग्रज येण्याचे पूर्वी मुसलमान आले, त्यांस सांप्रत आठशे वर्षें झालीं. तेव्हा त्या लोकांच्या रानटी चाली फार होत्या. त्या सर्व हिंदु लोकांस लागल्या. म्हटलें आहे की, "यथा राजा तथा प्रजा" व "राजा कालस्य कारणम्" असें भारतांत आहे. हिंदु लोकांच्या सुंदर स्त्रिया पाहून मुसलमान जबरीने घेऊन जात, याजमुळे स्त्रियांस झाकून ठेवणें जरूर झालें. व मुसलमान लोक फार मूर्ख आहेत; त्यांची चाल जनानखाना तुरुंगासारखा असावा अशी आहे. तीच चाल हिंदु लोकांस लागली आहे. मुसलमान लोक यांचें राज्य पांचशे वर्षें हिंदुस्थानांत चाललें. त्यामध्ये हिंदु लोकांची स्थिति फार बदलली, भाषा बदलली, फारशी शब्द चालू झाले. जमाखर्च, हिशेब, गाणें, रीतिभाती सर्व मुसलमानांच्या चालू झाल्या. पूर्वी संस्कृत सनदा देण्याची चाल होती, ती जाऊन फारशी सनदा देऊं लागले. पेशव्यांचें राज्य होतें तरी त्या वेळीं हिंदु लोकांस मूळचे स्थितीस आणावयाचा प्रयत्न कोणीं केला नाही. जाजती जाजती घसरतच गेले. हिंदु लोक ताबुद करूं लागले. फकीर होऊं लागले. धर्मभ्रष्ट झाले. त्याजमुळे हिंदु लोक स्त्रियांचा अपमान करून त्यांस जनावरांप्रमाणे मानूं लागले. पूर्वी रामाबरोबर सीता सभेंत बसत होती. पांडव द्रौपदीसहित बसत होते. पण लोकांचीं मनें आता इतकीं बिघडलीं आहेत की, जर त्यांस हें सांगितलें, तर ते देव होते, असा जबाब देतात; परंतु असें लक्षांत आणीत नाहीत की, तीं माणसेंच होतीं. देवांनी अवतार घेतले तरी माणसांचे चाली-

प्रमाणे ते वागले. तेव्हा त्या वेळच्या मनुष्याच्या चाली तशाच होत्या, त्याप्रमाणे आताही चालावयास चिंता नाही. आणि हिंदु लोकांच्या मूळच्या चाली त्याच आहेत. परंतु हल्ली त्यांस ही गोष्ट मोठी वाईट वाटते व इंग्रेज लोकांत स्त्रियांचा मान ठेवण्याची चाल आहे, हें त्यांस मोठें आश्चर्य वाटतें. व ते म्हणतात की, हा फार निर्लज्जपणाच व्यभिचारवृद्धीचें कारण आहे.

परंतु हिंदु लोकांस शहाणपण नाही. व त्यांचें मन हल्ली मूर्खपणाने, दुष्ट बुद्धीने व वाईटपणाने इतकें भरलें आहे की, तें शुद्ध होण्यास हिंदुस्थानांत ज्ञानाची फार प्रसृति झाली पाहिजे व लोक सुधारले पाहिजेत. व पूर्वीचे मूर्ख वृद्ध लोक आहेत ते सर्व मेले पाहिजेत. जेव्हा नवीन प्रजा शहाणी व पुष्कळ होईल तेव्हा लोकांच्या रीतीभाती बदलून चांगल्या होतील, यांत संशय नाही. परंतु त्यांस किती एक वर्षें पाहिजेत.

ज्ञान म्हणजे काय, हें लोकांस ठाऊक नाही. इंग्लंडांतील थोरली सनद, पार्लमेंट, फराशीस यांची राज्यक्रांति, रूमचे राज्याचा नाश, अमेरिका खंडांत युरोपियन लोकांची वस्ती, लोक-सत्तात्मक राज्य, या शब्दांचा अर्थही बहुत हिंदु मनुष्यांस ठाऊक नसेल. हे इतिहास इकडे प्रसिद्ध होण्यास बहुत दिवस पाहिजेत. हल्ली जास लिहितां वाचतां येतें ते शहाणे; र, ट, फ करतां येतें ते बोलणारे; व दंगा-लूट झाली म्हणजे ती राज्यक्रांति; इतकें या देशांतील लोकांस ठाऊक आहे. पृथ्वीवर काय आहे व लोक कसे आहेत, याविषयी त्यांस कांही कळत नाही. पुराणिक एक पोथी सोडून बसला म्हणजे सर्व आनंदाने डोलतात. व रावणास दहा डोकीं व सहस्रार्जुनास हजार हात, पृथ्वीचा अंत नाही, उत्तर समुद्राचा ठिकाण नाही, दुधाचा व दह्याचा समुद्र आहे व पृथ्वीवरील कांही देशांत घोडमुखी माणसें आहेत, इत्यादि गोष्टी ऐकल्या म्हणजे सर्व आनंदाने डोलतात. बायका फार खुष होतात व पुरुष म्हणतात की, आम्ही आज मोठें ज्ञान संपादन केलें. त्यांस असें ठाऊक नाही की, चमत्कारिक परंतु या खोडसाळ गोष्टी

दहापांच हजार वर्षांपूर्वी लिहिले गेले आहेत. तर हल्ली पृथ्वीची स्थिति कशी आहे व तिजवरील राजे कसे आहेत व समुद्र कसा आहे व लोक कसे आहेत याचा विचार केला पाहिजे, म्हणजे खरें ज्ञान वाढेल. केवळ लहानपणचा अंगरखा व मोठेपणचा अंगरखा सारखा नाही. तेव्हा व्यास व वाल्मीक यांणी ग्रंथ लिहिले त्यापुढे अलीकडे कोणीं ग्रंथ लिहिले नाहीत व शोध केला नाही. तेव्हापासून हिंदू लोक स्वस्थ निद्रेत आहेत. त्यांची बुद्धि पुढे चालण्याची बंद झाली.

परंतु इंग्रज वगैरे लोक यांणी उद्योग चालविला व त्यांणी नवीन ग्रंथ पुष्कळ केले. ते पाहिल्यावाचून हे लोक समजणार नाहीत. मागील पेशवाईंतील जे शहाणे आहेत, ते म्हणतात की, त्यांत आहे काय? इंग्रजांचा लाभकाळ होता म्हणून हे इकडे आले. त्यांजवळ आमच्यापेक्षा जाजती शहाणपण कांहीं नाही. त्यांस जर कोणी वेडे म्हटलें तरी त्यांस फार राग येतो आहे. ते उत्तर करतात की, आम्ही पेशवाईंत लाखो रुपये मिळविले व फौजा बाळगिल्या, त्या आम्हीं मूर्ख म्हणून बाळगल्या नाहीत. आणि आताचे लोक, नवीन जास कांहीं ठाऊक नाही, ते आम्हांस वेडे म्हणतात, यास काय म्हणावें? आमचें नशीब असतें तर आम्हांस कोणी वेडे म्हणते ना. परंतु आमचें नशीब वाईट म्हणून आमचीं शहाणपणें अदृश्य झालीं आहेत, असें ते म्हणतात.

वास्तविक पाहिलें तर, पहिले जुने लोक आहेत ते शुद्ध बैल आहेत. त्यांस खाण्याचें व पिण्याचें मात्र ज्ञान आहे. व ते जनावरासारखें कर्म करितात. परंतु माणसासारखें कांहीं करीत नाहीत. व त्यांस कांहीं ठाऊक नाही. मोठ्या प्रकरणांत तोंड घालावयाची देखील त्यांस योग्यता नाही. व इंग्रज कोठले, हें कांहीं त्यांस ठाऊक नाही. व इंग्रजांनी अलीकडे ज्ञान किती वाढविलें आहे, याची त्यांस खबर नाही. अबवर्खें इतक्यापर्यंत त्यांची समजूत आहे. जास्ती कांहीं नाही. जेव्हा सगळे मूर्ख होते तेव्हा त्यांतच ते पराक्रमी झाले.

परंतु आता नवीन मंडळींत ते मूर्खासारखे दिसतात. कारण की, इंग्रजांचे योगाने हिंदुस्थानांत बहुत प्रकारचें ज्ञान वाढलें आहे व तें ज्याणे संपादलें त्यासच त्याची गोडी, इतरास नाही. तेव्हा या जुन्या मंडळींचा गर्व व्यर्थ आहे. त्यांणी असें समजावें की, आम्ही शहाणे, असें म्हणून नवीन लोकांची निंदा करूं नये. कारण की, त्यांची अक्कल आता सर्व उजेडांत आली. व ते पूर्वी लंगड्या गाईत वासरू प्रधान म्हणून शहाणे होते, परंतु आता नाहीत. त्यांजमध्ये पराक्रम, विद्या व शौर्य नाही. लिहिण्या वाचण्याची भ्रांति. प्रवास ठाऊक नाही, परदेश ठाऊक नाही व लढाईची कला ठाऊक नाही; मग त्यांणी गर्व कशास करावा?

हल्ली पुण्यास जे गृहस्थ आहेत त्यांच्या अवस्थेचा विचार व त्यांचें शहाणपण पाहिलें म्हणजे सर्व हिंदु लोकांचा वृत्तान्त कळतो. जसा कोणी मेला म्हणजे त्याचे नांवें वृषोत्सर्ग × सोडतात; तशी मराठ्यांची राजधानी गेली आणि बाजीरावाचे नांवाचे इंग्रजांनी पोळ सोडले म्हणजे इंग्रजांनी कोणास जहागिरी व कोणास पेनशनें दिलीं आहेत. तीं ते खातात आणि पोळासारखे फिरतात. याचप्रमाणे सर्व हिंदु लोकांचीं जा जा ठिकाणीं संस्थानें आहेत व जेथे ब्राम्हणास खाण्याची सोई आहे, तेथे असेंच आहे. पहा! लोक किती धुंदींत आहेत! किती आपले ठिकाणीं गर्वांत आहेत! राज्यांत काय होतें याचा त्यांस ठिकाण नाही.

सांप्रत पुण्यांत पुस्तकगृह आहे; पण त्यांत कोणी जुन्या लोकांपैकी किंवा आजवळ खाण्यापुरता पैका आहे तो येत नाही. असे अळीकडील ब्राम्हण आहेत. कोणास ज्ञानाची आस्था आहे असें नाही. मग इतर लोकांची अवस्था काय पहावयाची आहे! अशा समयीं स्त्रियांची अवस्था सुधारणें अवघड आहे. बहुतकरून आणखी दोनशें वर्षे, निदान शंभर वर्षे तरी पाहिजेत, तेव्हा हे लोक जागुतींत येतील. आता जे लोक आहेत त्यांचा दोनचार पिढ्या खास्त्या पाहिजेत. व ज्ञान वाढलें पाहिजे. पुरुष शहाणे झाले

× वृषोत्सर्ग–मृतप्रीत्यर्थ वळू ( गोऱ्हा ) सोडतात, तो.

म्हणजे अर्थातच स्त्रिया शहाण्या व ज्ञानी होतील. अल्पवयांत लग्न आणि जन्मपर्यंत विधवा राहणें, या दुष्ट चाली मोडल्याखेरीज कांही एक सुधारणा व्हावयाची नाही.

---

पत्र नं० ७० ६ आगष्ट १८४९

# पुनर्विवाह

ब्राम्हण लोकांच्या विधवा पाहून फार हळहळ वाटते. त्यांस कोणता उपाय करावा ? हे ब्राम्हण तर स्वहितास आंधळे, म्हणून पुनर्विवाह करूं देत नाहीत. प्रत्येकाचे घरीं विधवा नाही असें नाही. आणि किती एकांच्या कन्या अशा लहानपणीं विधवा झाल्या आहेत की, त्यांस नवरा म्हणजे काय, तें ठाऊकदेखील नाही. आणि त्यांचें पुनः लग्न नाही; हा केवढा जुलूम आहे !

हे सर्व शास्त्री, जुने लोक मेले म्हणजे हें लौकर होईल. सांप्रत अडचण आहे. किती एक पोरी व्यभिचारी निघतात; पोरें मारतात. पण त्यांस लग्न करून नांदिवल्या तर फार चांगलें होईल. हजारो जीव मरतात आणि दुःखी होतात आणि बोडकी झाली म्हणजे तिचे हाल करितात. तिला जेवावयास कमी घालितात; सर्व प्रकारें तिचे हाल. तिला हजामत करविण्याची लज्जा. तात्पर्य, सर्व गोष्टी तिला प्रतिकूल होतात. जी आज सुंदर सौभाग्यवती दिसते, तीच उद्या केशरहित, अलंकाररहित होते. आणि तिचें तोंड पाहिलें तर देखील वाईट म्हणतात. तेव्हा विधवांचा अपमान केवढा होतो ! त्यांजला असें वाटतें की, आमचा जीव व्यर्थ; जन्मास येऊन सुख नाही. आमचें तोंड पहात नाहीत. लग्नकार्यांस आम्ही कामास नये. बरें, आम्हांला दुखणें लागलें तर सर्व इच्छितात की, मरतील तर बऱ्या.

आम्हांला लुगडीं घ्यावयास कोणी नाही. स्त्रियांस नवरा म्हणजे त्यांचा भर्ता व सोबती. ईश्वराने त्यांस निर्बळ केल्या आहेत. त्यांस पुरुषांचा आश्रय असला म्हणजे त्यांस मोठें बल असतें. परंतु, तें बल त्यांचे दैवाने गेलें तर त्यांणी काय करावें ? तत्रापि त्यांस पुन्हा नवरा करण्याची परवानगी नाही. हा शास्त्राचा अतिशय जुलूम आहे.

मला वाटतें की, असे निर्दय, मूर्ख आणि आंधळे लोक या चारी खंड पृथ्वींत नसतील आणि कोणत्या तरी शास्त्रावरून असा जुलूम दुनियेंत झाला नसेल ! बायका अगदी गरीब; त्यांस अबला असें म्हणतात, आणि त्यांची अवस्था अशी करतात, हें कोठें फेडतील ! आजपर्यंत बायका किती जाळिल्या आहेत ? आणि अजून जिवंत किती जाळितात ? याविषयी कोणी दुष्टाभिमान धरून एकदम सर्व जण एकत्र होऊन हें कार्य करावें. तुम्ही न कराल तर सर्व लोक कधी तरी करतीलच, यांत संशय नाही. परंतु यश घ्याल तर बरें आहे. इतके दिवस तुम्ही स्त्रियांस या देशांत दुःखांत घातल्या; अजून तरी त्यांस तुमच्या ब्राम्हणी पाशापासून सोडवावें.

मनूचें वचन असो, याज्ञवल्क्याचें असो, कोणाचेंही असो. ब्रम्हदेवाचें का असेना; "बुद्धिरेव बलीयसी," असें आहे. त्यापेक्षा तुम्ही जें उघड पहाता त्याचा बंदोबस्त शास्त्रांत नाही म्हणून करीत नाही, हें योग्य नाही. शास्त्रास एकीकडे ठेवा, आपली बुद्धि चालवा, विचार करून पहा. घातक वचनावर हरताळ लावा. हा प्रसंग तुम्ही कसा जाणत नाही ? मी तुम्हा सर्वांस असें म्हणतों की, तुम्ही आपल्या मुली व बहिणी विधवा पहाता, तेव्हा तुम्हांस लाज वाटत नाही काय ? त्यांस सुखी करण्यास तुम्हांस सामर्थ्य आहे, परंतु तुम्ही करीत नाही, हा मूर्खपणा आहे.

तुम्ही आजपर्यंत बायकांचे शाप घेतलेत. व पुढे घेता, त्याचे झाडे कोठे घाल ? अहो, जिचा नवरा मरतो तिचा अधःपात होतो, ती

दुःखी होते; आणि तुम्ही तशा अवस्थेंत निर्दयपणानें तिचे केश काढिता, आणि तिचे अंगावरचे दागिने काढून घेता हा काय धर्म आहे? आणि तुम्ही असें म्हणतां की, तिचें दैव वाईट, म्हणून तिचा नवरा मेला; परंतु तुम्ही दुष्ट म्हणून तिला दुसरा नवरा करून देत नाही. दुर्दैवी मनुष्याशीं दुष्टपणा करणें हें फार नीचपणाचें काम आहे. बायकांचे नवरे प्रारब्धानें मरतात. त्यांस दुसरा करण्यास मना करतां, आणि हा धर्म आहे असें समजतां! हा धर्म कशाचा बरें? धर्मशास्त्र हा केवळ कायदा आहे. व्यावहारीक गोष्टी करतां त्यांतील एका वाक्यास हरताळ लावली म्हणून काय झालें?

आणि लोक तरी कोठे आता धर्मशास्त्राप्रमाणें चालतात? किती एक चालत नाहीत. अधर्म करितात. असें तुमच्या डोळ्यांपुढे असून तुम्ही आपल्या बहिणींचीं व पोरींचीं बुद्धया घरें बुडवितां, हें तुम्हास कसें बरें वाटतें? नाही. तुमच्या पोरींची दया तुम्हांस येत नाही. तुम्ही आपल्या पोटांत दगड कसे घालतां? याजकरिता माझें ऐका, आणि स्त्रियांस पुरुषासारखे अधिकार आहेत असें ठरवा आणि हा धर्म चालू करा. स्त्रियांनी विद्या करावी. जाणतेपणीं पुरुषाचें व स्त्रीचें लग्न व्हावें हें चांगलें. आणि जिचा नवरा मरेल तिने खुशी असल्यास दुसरा नवरा करावा. म्हणजे तुम्ही फार सुखी व्हाल. लग्न लवकर करून पोरांचें आयुष्य संपवितां व प्रजा निर्बल व भिकारी करतां, आणि विधवांस दुःख देऊन हाल करतां, याचीं पापणीं कोठे फेडाल?

आता पुरें करा! आजपर्यंत विधवा जाळिल्या तितक्या पुरे करा. तुम्ही म्हणाल की, इंग्रज लोकांनी जशी सती बंदी केली, तसेंच हेंही करावें. परंतु विधवांचीं लग्नें करावयास इंग्रज इकडे आले नाहीत. तुमची तुम्हास खबर नाही. मग त्यांस कशास असावी! ते दूरचे लोक. तुम्ही मेलेत तर त्यांस सुतक येणार नाही, हें ध्यानांत धरा.

---

## लग्नें

हिंदु लोकांमध्ये लग्नसंबंधाविषयी विचार केला तर पृथ्वीवर असे कोणतेही लोक नसतील. ( प्रथम ) मुलीस तर मुदतीचा कायदा लावून दिला आहे. पूर्वीचे कायदे करणारे ऋषी यांस लग्नाची फार घाई असे आणि त्यांचे मनांत मुलीस त्वरित देऊन टाकाव्या व कोणीकडून तरी लग्नें होऊन प्रजावृद्धि व्हावी, अशा धोरणाने त्यांणी ठरविलें की, आठ वर्षांचे आंत मुलगी दिली तर उत्तम, निदान दहा वर्षांचे आंत तर मुलगी दिलीच पाहिजे. यामुळे वर पहाणें प्रशस्तपणीं होत नाही, जशी स्वताची मुदत जाऊं लागली म्हणजे कोणी तरी वकील पाहून, फिर्याद लावून टाकावी, मग कांही होऊं, तसें आठ वर्षांची मुलगी झाली म्हणजे बापास तातड लागते.

( दुसरें, ) अशीं त्वरित लग्नें केल्यामुळे मुलीस विद्याभ्यास होत नाही. ( तिसरें, ) लग्नास मुहूर्त पहातात व जातक पहातात. त्यांत गुणाकार, भागाकार कमीजास्ती समविषम आला म्हणजे एकनाड, षडाष्टक वगैरे येऊन पटत नाही, असें म्हणतात. यामुळेही चांगले वर टाकावे लागतात. ( चौथें, ) गोत्र प्रवर एक असूं नये, म्हणून ठराव आहे. त्यानंतर ( पांचवी) अडचण अशी आहे की, देसस्थ, कोकणस्थ, यजुर्वेदी, ऋग्वेदी, कण्व, माध्यंदिन, गुजराथी व दक्षिणी ब्राह्मण इत्यादि हजारो भेद आहेत. त्यां-मध्ये विवाह-व्यवहार होत नाही. अशा अनेक अडचणी घालून त्यापासून फळ कोणतें झालें म्हणाल, तर सुंदर रत्नासारख्या मुलींची धुळधाणी आणि दुर्दशा झाली. बरें, इतक्या अडचणींतून त्यास बरावाईट नवरा मिळाला व तो देवी, गोवर, जरीमरी इत्यादि रोगांनी मारला, तर ती विचारी जन्मपर्यंत विधवा. तिकडून सासरा, दीर, सासू, जावा यांनी म्हणावें की,

करंटी अवदसा नवरा मारून तोंड कशाला दाखवते? बाप आपले घरीं कां ठेवीना? बरें, इकडे माहेरीं यावें तो भाऊ, बहिणी म्हणतात, आमचे घरीं तुझें काय आहे? एथे कशास येतेस? बरें, रस्त्यांत फिरलें तर लोक म्हणतात की, बोडकी पुढे आली. आता पुढे पाऊल कसें टाकावें? त्याप्रमाणे त्या पोरीने आपली तिन्ही वर्षें काढावीं लागतात.

बरें, कोणाचा आश्रय करावा तर तेथे तरी टीका होते की, रंडकीमुंडकीस तूप-दही कशास हवें? गादी निजावयास कशास हवी? तेव्हा तिने बैराग्यासारखे संसारांत राहून दिवस काढावे लागतात. याप्रमाणे खाटिकाचे घरीं मेंढराचीही दुर्दशा नाही. तो त्यांस एक वेळ सुरी लावतो. त्या वेळेस मात्र काय दुःख होतें तेवढेंच. परंतु तेथपर्यंत तो हाल करीत नाही. आणि हे हिंदु लोक किती दुष्ट आहेत की, जे आपल्या स्त्रियांची अशी दुर्दशा करतात, त्यांस जगांत तरी कोठे दुसरी तुळणा मिळेल कीं काय? वास्तव या सर्व अडचणी मोडून स्वयंवर व्हावें. हेंच प्रशस्त आहे. स्वयंवर होऊं लागलें म्हणजे बाकीच्या अडचणी सर्व आपल्या आपण जातील आणि लग्न हें जाचें त्याचें काम आहे. त्यांत इतरांनी पडणें अयोग्य आहे. बाप जरी झाला तरी त्याने लग्नाचें काम मुलीचे इच्छेवर व मुलाचें इच्छेवर ठेवावें, हें योग्य.

परंतु अज्ञानी लोकांस दया नाही व स्वजातीचा कळवळा नाही. अज्ञानाने ते आपले मुलीविषयी व बहिणीविषयी खाटकाहून खाटीक होऊन गेले आहेत. आता ते बुद्धिपुरस्सर असे झाले नाहीत व त्यांस इतर कामांत माणसाची तर काय परंतु जनावरांची देखील दया आहे. परंतु अज्ञानाचा जोर मोठा, म्हणून स्त्रियांविषयी असा दुष्टपणा होतो. आता हा जरी त्यांणी बळेंच किंवा बुद्ध्या केला नाही, तरी स्त्रियांस फळ सारखेंच आहे.

(दुसरें) लग्नास विनाकारण खर्च करितात; आणि लौकिक संपादन

करतात व भटाभिक्षुकांस गावयास गोष्टी पुष्कळ होतात. परंतु लग्नाचे खर्चांचे जुलमामुळे हजारो लोकांस कर्ज होऊन ते दरिद्री झाले आहेत. शास्त्राप्रमाणे लग्न पांच रुपयांत होईल, परंतु त्याचा लौकिक इतका वाढला की, दहा रुपये महिन्याची जास्त प्राप्ति आहे, त्यास दोनशे रुपये खर्चास पाहिजेत. उभय पक्षांची समजूत पडत नाही. दोघेही खराबीस येतात. मनुष्यास पोटाचें कर्ज इतकें होत नाही. कारण नित्यापुरतें मनुष्य मिळविलोच. परंतु एकदम दोनशे रुपये कर्ज केलें, म्हणजे त्याचें व्याज-देखील सावकाराचें फिटत नाही. असे किती कर्जभरी झाले आणि किती कुळंबी खर्चांचे पेचांत आले, याचा दीर्घ विचार केला तर हा मोठा अनर्थ आहे, असें दिसतें. परंतु याजविषयी लोक कांही विचार करीत नाहीत. पांच रुपयांत सर्व लोक लग्नें करितील. तर कर्ज होण्याचें मूळच उपटून जाईल.

पूर्वींचे ऋषी वगैरे शास्त्र करणारे होते, त्यांनी ही मोठी चूक केली की, मुलींचा विवाह स्वछंदाने व्हावा, तो न होऊं देतां जबरदस्तीने करण्याची चाल घातली. तिजपासून होणारे अनर्थ आता अगदी स्पष्ट दिसूं लागले आहेत, तरी नियम लोक फिरवीत नाहीत. मागाहून शास्त्राचा शोध पाहिला तर जुनें नवें होत आलेंच आहे. हजारो शास्त्रांचे नियम ऋषींनी फिरविले आहेत. परंतु लोक असें म्हणतात की, हें ऋषींनी केलें. आता ऋषी कोठे आहेत ?

परंतु मी त्यांस पुसतों की, ऋषी म्हणजे काय ? जे ग्रंथकर्ते त्यासच ऋषी म्हणतात. आपण नवे ग्रंथ केले तर आपण ऋषी होऊं. कायदे करणें, हें तर राष्ट्राचें काम आहे; प्रत्येक काळीं जे जे शहाणे लोक असतील, त्यांणी शास्त्र करावें, हें उचित आहे. कोणी जर असें म्हणेल की, लहानपणीं माझी आई मला बाळकडू पाजीत होती आणि आता मी म्हातारा झालों आहें व मला अर्धांग-वायु झाला आहे, तर मी औषध कसें घेऊं ? माझी आई कोठे आहे ? तर त्या बेट्यास लोक हसतील कीं नाही ? आई मरून बहुत वर्षें झालीं.

पण आता रोग झाला तर वैद्याकडून जें औषध मिळेल तें घ्यावें. तद्वत् आता मरून गेले ते ऋषी कोठून आणावेत? आपणच ऋषी होऊन शास्त्र यथायुक्त असेल तें ठरवावें, हेंच योग्य. सांप्रत इंग्रज सरकार दर दिवशीं नवे कायदे करितात. त्यावरून सर्व व्यवहार, राज्यकारण व फौजेचा बंदोबस्त होतो. आणि लग्नाकार्याविषयी क्षुल्लक ठराव आपण केले तर चालणार नाहीत कीं काय?

परंतु या लोकांत कोणी चांगला पुढारी सुधारणा करणार नाही व जरी कोठे असला तरी लोक इतके हलके स्थितीस आले आहेत की, त्याचे ते ऐकणार नाहीत. पूर्वी शंकराचार्य, भास्कराचार्य इत्यादि झाले, त्यांचे ग्रंथ लोकांनी मान्य केले. परंतु अलीकडे अज्ञान फार दृढ झालें आहे. सांप्रत हे लोक शिकविण्याचे स्थितींत नाहींत. यास्तव यांचा पुढारीपणाही कोणी घेत नाहीत. जसे लहान अर्भकास पंतोजी शिकवील, परंतु अगदी इस्पितळांत वेडे आहेत, त्यास कोणी उजळणी शिकवूं शकेल कीं काय?

---

पत्र नं० ९९

## पुनर्विवाह

जो दिवस उजाडतो, त्या त्या प्रत्येक दिवशीं असें अनुभवास येतें की, ब्राम्हण जातींत स्त्रियांचा पुनर्विवाह त्वरित चालू करणें जरूर आहे. ही जात हतभाग्य आहे. याजमुळे आपली सुधारणा हे समजत नाहींत व त्यांचे प्रारब्धीं अजून पुढे किती एक दिवस महान् दुर्घट भोक्तृत्व आहे, यास्तव त्यांचे बुद्धीस हें कर्तव्य अजून स्पष्ट दिसलें नाही.

जशी बहुत काळाची ग्रंथी असते, ती लवकर सुटत नाही. तद्वत् त्यांची बहुतकालिक ही समजूत पडली आहे, ती त्यांचे बुद्धीचा त्याग

लवकर करीत नाही. दृढपणाने चिकटून बसली आहे. ती इतकी की, जरी मोठाले षड्शास्त्री पंडित, ज्यांची बुद्धि व विचार चपळ झाले आहेत व युक्तिप्रयुक्ति त्यांस सांगतां येतात, परंतु पुनर्विवाहापासून नफा काय आहे, येविषयी त्यांची बुद्धि केवळ शून्य असोन, अंतःकरण निर्दय व क्रूरकर्मी प्रवृत्त झालें आहे.

ब्राम्हण लोकांमध्ये लग्नाची घाई बहुत करितात. याजमुळे किती एक मुलगे व मुली आठ वर्षांच्या देखील विवाहित होतात. आणि पुढे दोन-चार वर्षांचे आंत विपरीत गोष्ट घडून भर्ता निधन पावतो. त्या काळीं वास्तविक पाहिलें, तर त्या स्त्रीस आपली जाति किंवा नातें कळत नाही. केवळ बाल, अज्ञान आणि परस्वाधीन अशी व्यवस्था तिची असते; परंतु पुनरपि तिचा विवाह करीत नाहीत. आणि मायबाप आपलें मन क्रूर व निर्दय, दृढ पाषाणवत् करून स्वकन्येची विपत्ति पहातात. ती विपत्ति एक पर्यायाची नाही; परंतु अनेक पर्याय त्यांत असतात. ते ब्राम्हणांस विदित आहेतच. आणि जामात मेल्याचें दुःख सर्वांहून ब्राम्हणास अधिक आहे.

कारण की, कन्येस प्रारब्ध योगाने पति नाहीसा झाला, हें एक; खर्चवेच झाला तो व्यर्थ गेला, हें दुसरें. हीं दोन दुःखें आहेत. जरी पुनर्विवाहप्रवृत्ति चालू झाली, तथापि हीं चुकणार नाहीत. याशिवाय, ब्राम्हणांच्या दुःखाचा महजर × फार लांब आहे. तो असा की, पुनश्च पति जरी प्रिय, सुशील, विद्वान, सज्जन, असा साध्य असेल, तरी अप्राप्त. वास्तव जन्मपर्यंत तिचा निर्वाह कसा चालेल ! अन्न कोण घालील ? याची काळजी. वंशाचा छेद झाला, यद्यपि सासऱ्याचे घरीं खावया-पुरती सोय असली, तरी तेथे सर्व माणसें विधवा स्त्रीस काम जास्ती सांगतात आणि हाल करितात. आणि तिला कोणी मालक नाही, म्हणून निराश्रित होत्साती सर्वांचे दुष्ट शब्द तिला सहन करावे लागतात. दागिन्यांवर बांधला आला कामास नये. चोळी घालितां कामास नये. काळें

× महजर- सनद, कैफियत, पुरावा.

लुगडें नेसतां कामास नये. कुंकू व नाहाण करतां कामास नये. फार तर काय, दुसऱ्याने जेवावयास बसली, तर लोक हासतात व उपहास करतात. याजकरिता एकपोटी, एकवाढी जेवण करावें लागतें. कार्यप्रयोजनांस जातां नये; मंगल कार्यास अपशकून होतो; तोंड पाहिलें तर वाईट शकून झाला म्हणतात; म्हणून लज्जेने दूर रहावें लागतें; असा दुःखांत जन्म काढावा लागतो.

या गोष्टी जेव्हा आईबापांच्या मनांत येतात, तेव्हा म्हणतात की, मेला जावई मोठा दुष्ट. इचा कोणी पूर्वजन्मीचा वैरी, दावेदारी होता तो इचा छळ करण्याकरिता जन्मास येऊन इच्याशीं लग्न करून मेला. असे शाप देत असतात. दर एक दिवसास आईबापांस परम दुःख होतें. जों जों मुलगी वाढत जाते, तों तों त्यांचें रक्तमांस जाऊन कृश होतात. आणि कन्या जिवंत असतां मेली अशी समजूत करून दुःखाचें सहन मोठ्या धैर्याने करतात.

परंतु या सर्व दुःखाचें मूळ पाहिलें, तर कोठें आहे? ज्याच्या त्याच्या समजुतींत आहे. आपणच होऊन गैरसमजुतीने आपला गळा कापावयास प्रवर्तक झाला असतो. त्यांस असें वाटतें की, मी हें सर्व दुःख सहन करीन आणि असें करण्यांत माझी धन्य आहे. असे जे कोणी प्राचीन काळचे मूर्ख समजुतीचे लोक आहेत ते म्हणतात, व किती एक म्हणतात की, काय करावें, दुष्ट जात ही ब्राम्हणांची पडली; जर पुनर्विवाह करावा, तर लोक हसतील. ही गोष्ट मनांतील काढतां देखील येत नाही. आणि माझे मनांतील दुःख कोण जाणतो ? तस्मात् सर्व देशचे, जातीचे, शेजारी, नातलग इत्यादिक सोडावे, त्यापेक्षा ही मुलगी मेली म्हणावें, हें बरें. असें समजून किती एक उगेच आहेत.

परंतु इतक्यावरून इतकें सिद्ध होतें की, ब्राम्हणांमध्ये समजूत व विचार अगदी नाही. परदुःख जाणतच नाहीत. आपले देशचे लोकांचें दुःख किंवा आपले जातीचें दुःख किंवा आपला शेजारी याचें

## दुष्ट, चांडाळ ब्राम्हण !

दुःख किंवा आपला मित्र याचें दुःख मनांत आणीत नाहीत व त्यांचा कळवळा करीत नाहीत. दुसऱ्याची मुलगी विधवा झाली, तर त्यांत आपलें काय गेलें ? असें म्हणून अशा दुसऱ्याचे महान् संकटाविषयी विनोद व उपहास करितात.

अरे ! अरे ! काय हे दुष्ट, चांडाळ ब्राम्हण आहेत आणि कोण यांचे पुढारी पंडित, शास्त्री आहेत ! या जातीचे पुढारी दुसरे कोण होतील ? बरें, यांचे संगतीने सर्व ब्राम्हण लोक दुर्भाग्य होऊन दीनवाणे झाले आहेत. गरीब, तरुण, दुर्भाग्य स्त्रियांचे हाल पाहून या चांडाळांस दया येत नाही. पुनर्विवाहाची गोष्ट कोणी बोलला, तर त्यांस असें वाटतें की, हा कोणी राक्षस धर्म बुडविणारा आहे. याचें ऐकूं नये. असे हे विचारास पराङ्मुख झाले आहेत.

परन्तु मला असें वाटतें की, सर्व ब्राम्हणजातीने निश्चय करून पुनर्विवाह चालू करण्याचा शिरस्ता घालावा व पंडितांचें ऐकूं नये. दोनचारशे लोकांनी असा एक कटाव केला, म्हणजे पंडित उगीच रहातील किंवा सामील होतील. परन्तु त्यांच्याने द्वेष होणार नाही व कांही उपद्रव होणार नाही. पंडितांस सामर्थ्यहीन करण्यास एक कटाव मात्र पाहिजे. मला वाटतें की, असें होण्यास बहुत दिवस नकोत. हे पंडित शास्त्री मूढशिरोमणी आहेत. आणि त्या गृहस्थादिकांस शास्त्र सांगणारे म्हणवितात. त्यांस कनिष्ठ जातीचे ठरवावे आणि चांगले शहाणे लोक, जे धर्माचें संरक्षण, धर्माचें कल्याण, सुखोत्पत्ति करतील, त्यांस पुढारी करावें.

त्यांस असें समजत नाही की, पूर्वी ब्राम्हण कंद-मुळें खाणारे व रानांत रहाणारे व थोडके होते. याजमुळे त्यांच्या स्त्रियांशी लग्नें झालीं न झालीं तरी चिंता नव्हती. व त्या काळचे व त्या स्थितीस लागू असें केलेलें शास्त्र आहे. त्या शास्त्रांत पुनर्विवाह करूं नये, असें लिहिलें आहे. त्यांत आणखी किती एक गोष्टी आता उपयोगी नाहीत,

अशा आहेत. पहा की, बारा वर्षे ब्रम्हचर्य, वेदाभ्यास, गृहस्थाश्रम याप्रमाणे सर्व काळ तपश्चर्या करीत भिक्षा मागून असावें. याप्रमाणे कोणी आज करीत आहे किंवा कोणी करील कीं काय ? सती जावें असें त्यांत आहे; परन्तु ही मूर्ख रीति नाहीशी झाली किंवा नाही ?

ज्याणे पुनर्विवाह करूं नये म्हणून ठरविलें, त्याच्यावर चढ, ज्याणे सती जावें, म्हणून ठरावेलें, त्याणे केला. असे कायदे करणारे यांची स्त्रियांविषयी किती गैरसमजूत होती, हें उघड दिसतें; कारण की, त्यांस स्त्रिया म्हणजे जनावरें वाटत असतील. एका खाटकाने एक बकरूं देवीस द्यावें म्हणोन सांगितलें; त्याजवर दुसरा शहाणा निघाला, तो पांच द्यावीं, म्हणोन सांगतो. याप्रमाणे किती गरीब जनावरांचा प्राण जातो. आपल्यास लाभ होतो त्यापेक्षा गेलें काय ? " देवो दुर्बलघातकः " याप्रमाणे हे शास्त्रार्थ जाणावे. देशकालवर्तमान पाहून यांस मागे ठेवावें. जसे इतर बहुत रद्द आहेत, तसे हेही समजावें आणि हल्लीचे ब्राम्हणाचे रोंजगार, धंदे आहेत, त्याप्रमाणे शास्त्रही पाहिजे. तात्पर्य, सारासार विचार करावा. चांगली गोष्ट विचाराचे दिसेल ती अंगीकारावी.

---

पत्र नं० १०२

## पुनर्विवाह

हल्ली ' कल्याणोन्नायक मंडळी ' पुण्यांतील पंडितांनी उभी केली आहे. या मंडळीचे दोन तीन उद्गार तुमचे पत्रद्वारें आले, त्याजवरून या मंडळीचे ज्ञानाची व विचाराची प्रशंसा अत्यंत झाली व येणेंकरून पाठशाळेंत विद्या कोणत्या प्रकारची शिकतात, याची प्रसिद्धी दिगंतापर्यंत होईल.

या प्रकारची विद्या प्राप्त होऊन हे लोक देशाचें कल्याण करण्यास

समर्थ कसे होतील, हें आश्चर्य आहे. या विद्येचा उपयोग इतकाच दिसतो की, जे लोक अज्ञानांत आहेत त्यांस मात्र आपली विद्या मोठी आहे अशी भ्रांति दाखवून पैका उपटावा. म्हणून लोकांस सावध करणें अवश्य आहे. मागील एक पत्रीं या मंडळींतील एकाने पुनर्विवाहाविषयी पत्र लिहिलें, तें वाचून बहुतेक समजदार लोक यांणीं काय म्हटलें असेल बरें ? हें हल्ली शके १७७२ चे शालिवाहनाचें वर्ष चाललें आहे. या वर्षीं अशी मूर्खपणाची गोष्ट पत्रद्वारें प्रसिद्ध करतात, ही कशी मान्य होईल ? जेव्हा हिंदु लोक भोळसर व पंडित सांगतात तसे ऐकणारे होते, तेव्हा त्यांणी सती जावें म्हणून सांगितलें, तेंच लोकांनी कबूल करून आपल्या सुना, मुली, बहिणी जिवंत जाळल्या. विधवा स्त्रियांचीं लेणीं वगैरे घेऊन त्यांची हजामत करूं लागले. आणि फार तर काय परंतु त्यांचा अशुभ प्रश्न दर्शनेंकरून होतो, त्यांस एकदा जेवण द्यावें व हाल करावें, म्हणून जे प्रतिपादन करितात ते कलियुगांतील राक्षस, माणसें खाणारेच समजावे.

त्यांच्या पुनर्विवाहाविषयी ज्या समजुती आहेत, त्यांतील एकही योग्य नाही. त्यांस असें वाटतें की, कांही तरी लिहिलें म्हणजे झालें. दर एक शब्दास नवीन कोटी म्हणतात, परंतु त्यांत अर्थ व ज्ञान काय, याचा विचार करीत नाहीत. आजचे काळीं मूर्खांचेही मनांत असें नाही की पुनर्विवाह न व्हावा. हें पंडित सांप्रत काळचे विद्येशीं व ज्ञानाशीं आपलें जीर्ण ज्ञान (परंतु वास्तविक पाहिलें तर तो मूर्खपणाच होय, त्यास) युद्धास उभें करतात. मग हे जय पावतील कसे ? ही गोष्ट खरी आहे की, जों काळपर्यंत जुने वेडसर लोक आहेत, तोंपर्यंत हे पंडित आपलें ज्ञान मिरवतील. परंतु त्याचा परिणाम नाही. पंडितांचा धर्म म्हणजे जितका लोकांनी केलेला मूर्खपणा आहे तितका त्यांचा धर्म. वास्तविक विचार व ईश्वरभक्ति व लोकहित हें त्यांणी टाकून दिलें आहे.

पंडितांनी हिंदु धर्मास काळिमा लाविली आहे. त्यांस विद्वान

म्हणावें कोणीं ? हे पंडित व हे भट खरे विद्वान असते तर या देशाची माती कां होती ? जा देशांत शंभरांत एखादा विद्वान आहे त्या देशाकडे पहा किती सुधारणा झाली आहे ! त्या लोकांच झेंडे पृथ्वीवर या टोकापासून त्या टोकापर्यंत लागले आहेत. आमचे देशांतील हे पहा विद्वान ! की त्यांची संख्या म्हटली तर पुण्यांतच विद्वान म्हणविणारे भट व पंडित हजार आहेत, व दर एक गृहस्थाचे घरीं दोनचार विद्वान आहेत; इतकी विद्वानांची स्वस्थता आहे. परंतु विद्या पाहिली तर शून्य ! हे फुकट खातात व जेवणाच्या गोष्टी व ग्रामण्यें व प्रायश्चित्तें सोधीत बसतात. यांणीं लोकांचें हित कधी मनांत आणलें आहे ? व आपलेकडून पलीकडे कधी पाहिलें आहे ? हे जाति–अभिमानाने मरतात. जरी यांणीं हित केलें तरी म्हणतील की, " गोब्राम्हणहिताय च. " हे सर्व लोकांचें हित कदापि करणार नाहीत.

हे विचारतात की, सुधारणा म्हणजे काय ? तर याचें उत्तर असें आहे की आपुली विद्या अपूर्ण व यत्किंचित असतां, ती पूर्ण म्हणून गर्व करितां; सार्वजनिक हिताचा मार्ग तुम्हांस दिसत नाही, तो दिसावा, याचें नांव सुधारणा, हें समजा.

---

पत्र नं० १०४

## पुनर्विवाह

अलीकडे दोन पत्रीं ' कल्याणोन्नायक मंडळींत ' प्रमुख यांणी आपले मतें मोठें गूढ ज्ञान प्रगट केलें आहे. तें कोणतें म्हणाल, तर पुनर्विवाह करूं नये हें ! यांस असें वाटतें की, ब्राम्हण-जातींत पुनर्विवाह करणें वाईट; आणि त्यांस शास्त्र व युक्ति अनुकूल नाही. व त्यांत कांही लभ्यही नाही. याजकरितां मोठे डौलाने दोन तीन वेळ पत्रें

त्यांणी लिहिली आणि उत्तर मागितलें.

त्यास असा विचार करणाऱ्या पुरुषांशीं वाद करणें म्हणजे आंधळ्यापुढे मशाल धरणें किंवा प्रेताच्या तोंडाशीं औषधाची वाटी लावणें याप्रमाणे आहे. हे पहिल्या काळचे वेडे, यांस कांहीच युक्तायुक्त समजत नाही. मी तरुण लोकांच्या सुधारणेकरिता लिहितों आणि पुनर्विवाहाचें प्रतिपादन करतों. तें ऐका.

शास्त्रीपंडितांच्या कोट्या करणें म्हणजे अशा आहेत कीं, शब्द प्रमाण आहेत कीं नाही, असें पुसतात. म्हणजे तुमचा आजा होता, हें तुम्हांस ऐकून ठाऊक, आहे हें खरें मानतां कीं नाही? उत्तर खरें आहे, तेव्हा शब्द प्रमाण जहाला. यास्तव ग्रहणांत स्नानदान करावें, म्हणून विधि सांगितला आहे, तो खरा कीं नाही? याप्रमाणे कोटी करतात.

परंतु तो शब्द प्रमाण मानला, म्हणून हा शब्द प्रमाण नाही. तुम्ही म्हणाल की, " तुम्ही प्रेत आहां " तर मी शब्द प्रमाण घेऊन खरें मानावें कीं काय? शब्द प्रमाण कोठे कोठे मानूं? जेथे विचार व युक्ति वसत नाही, तेथे मानणार नाही. याप्रमाणे शास्त्रीपंडितांचे वाद आहेत. भलतेंच आकाशाचें टोक पाताळास मिळवितात आणि म्हणतात की, आम्हीं मोठी कोटी केली. परंतु विचार केला, तर केवळ मूर्खपणा होय. अशा कोट्या करून पंडितांनी या देशांत अज्ञान वाढविलें आहे. कोठे झरा असला, म्हणजे त्यास गंगा म्हणतात आणि माहात्म्य लिहितात. अद्यापपर्यंत त्यांस विचार करणें म्हणजे काय, याचें भान नाही.

हिंदुस्थानांत एक झरा आहे. त्याचें मूळ एका माहात्म्यांत लिहिलें आहे की, एका राजाचे बायकोनें स्वयंपाक करीत असतां राग येऊन पाणी ओतून टाकलें, तो झरा झाला. दुसरें, गाईचें तोंड खरबरीत आहे त्यास ते म्हणतात की, कृष्णाने उष्ट्या शिताचे हाताने तिला मारल्यापासून तें तसें झालें. तुळशीला म्हणतात की, ही एक स्त्री होती. तिणे विष्णूचें आराधन केलें, ती तुळस झाली. उंबराचीं फुलें सोन्याचीं आहेत, तीं देव

नेतात. घोड्यास पंख होते. याप्रमाणे जें जें स्वाभाविक होतें, तें उलटें लोकांस समजून दिलें आहे.

याप्रमाणे हे लोक मूर्ख असतात. यांजपासून विचार खरा कसा निघेल? पुनर्विवाहास शास्त्राधार नाही, असें कोणी म्हणतात व कोणाचे मतें अनुकूलता आहे. त्यास, आम्ही पुनर्विवाह करणाऱ्याचे पक्षी आहों. ते असें की, शास्त्र असो किंवा नसो, परन्तु हित जाणून शास्त्र एकीकडे ठेवून ही रूढि घालावी. किती एक रूढीनें शास्त्र रद्द होतें. व कालमानेंकरून शास्त्र बंद करावें लागतें. जसें, मुंज केल्यावर बारा वर्षे कोण रहातो? तद्वत् जें घातुक तें टाकलें पाहिजे. शास्त्र म्हणजे लोकांस सुख होण्याकरिता रीति घातलेली आहे. त्यांतून जर विपरीत कांही असेल, तर एकीकडे ठेवल्यास चिंता काय? जसें इंग्रजांनी सती बंद केल्या, त्यास तुम्ही वाईट म्हणाल कीं काय? तसेंच, पुनर्विवाह चालू करण्यांत बहुत फायदे आहेत. एक मुख्य असा की, स्त्रियांचा अधिकार पुरुषाप्रमाणे चालू झाला. विचारास हेंच येतें की, जो अधिकार संसारसंबंधी व सुखाविषयी पुरुषास आहे, तोच स्त्रियांस असावा. जर पुरुषास पुनर्विवाह करण्यास चिंता नाही; तर स्त्रियांसदेखील नाही. कारण की, आचार आणि धर्म ईश्वरी नेमानुसार असावे. जसें चोरी न करणें, व्यभिचार न करणें, इत्यादि नीति स्वस्थता होण्याकरिता ठरविली; परन्तु ग्रहणांत स्नान करावें, हा नीतीचा नेम नाही. नीति म्हणजे जे नेम सर्व देशांत, सर्व धर्मांत सारखे चालतात आणि आचार म्हणजे कल्पित नेम. एक राष्ट्रांत मानले जातात, दुसरे राष्ट्रांत मानीत नाहीत. तेव्हा दुसऱ्यास दुःख देऊं नये, हा नीतीचा नेम आहे. आपल्यास दुःख वाईट लागतें, तसें तें दुसऱ्यासही वाईट आहे.

आपलें कोणीं चोरलें तर ठीक नाही. तसेंच आपण दुसऱ्याचें चोरूं नये. ईश्वरी संकेतास अनुसरून जो शास्त्रार्थ असेल, तो आम्हांस मान्य

आहे; त्यास विपरीत असेल तो मान्य नाही. हेंच शास्त्राचें रूप आहे. खरें बोलावें, नम्रता धरावी, दुसऱ्यास साह्य करावें, इत्यादि धर्म जे आहेत, ते विचाराने सिद्ध होतात. व अंतर्याम याविषयीं साक्षी देतें की, हे खरे धर्म आहेत. बाकीच्या ज्या खटपटी आहेत, त्या हे मुख्य धर्म राखण्याकरिता योजिल्या असतील, हें स्पष्ट आहे; परन्तु त्यांची गरज जेव्हा नाहीशी होईल, तेव्हा सुधारणा पाहिजे, आणि ते मुख्य धर्म रहाण्याकरिता जा खटपटी पाहिजे असतील, त्या कराव्या. जसा अंगरखा करतात हा अंगास वारा लागूं नये, इजा कांही होऊं नये व हवेपासून रक्षण व्हावें, म्हणून करतात. मग पुढे चार वर्षांचें मूल होतें, तेव्हा जो अंगरखा केला, तोच तिसावे वर्षीं उपयोगी पडेल कीं काय ? तो बदलला पाहिजे. कारण जर तुम्ही मुख्य हेतूची स्मृति कराल, तर तेंच योग्य आहे की, तो लहान अंगरखा टाकून नवा करावा. जर तुम्ही मुख्य हेतूस विसरलेत, तर तोच ठेवाल.

तद्वत् हल्लीचे हिंदु लोक इतके मूर्ख झाले की, तुळशी वहाणारास चांगला म्हणतात, परन्तु खरें बोलणारास म्हणत नाहीत. याप्रमाणे जुन्या काळच्या खटपटी त्यांस बऱ्या वाटतात. व मुख्य हेतू समजत नाहीत, पोरपणचा अंगरखा बापाने दिला तो कसा टाकावा, म्हणून तोच तिसावे वर्षीं घालावयाचा यत्न करून अनर्थ करितात.

तद्वत् या काळीं स्त्रियांस पुनः विवाह करण्याची परवानगी देणें हें प्रशस्त आहे. ईश्वराने जितके पुरुष तितक्या स्त्रिया उत्पन्न केल्या आहेत. व त्या परस्वाधीन; तेव्हा त्यांचा विसावे वर्षीं नवरा मेला तर जन्मपर्यंत कोण सांभाळ करील बरें ? त्यांस कोण सुख देईल ? त्यांनी आपला जीव कोठे ठेवावा ? मनांतील सुखदुःख कोणास सांगावे ? अन्न-वस्त्रांकरिता कोणाकडे पहावें ? लहान मुलबाळ असेल, तर त्याचा परामर्श कोणीं घ्यावा ?

ब्राम्हण लोकांमध्ये किती एक घरें असतील की, जेथे एका एका

गृहस्थाचीं चार पांच तरुण मुलें ज्वानींत मरून गेलीं. आणि त्यांच्या तरुण स्त्रिया पाठीमागे राहिल्या आहेत. जवळ कांहीं नाही, त्या बोडक्याकडे पाहून आईबाप झुरतात, त्यांस खावयास घालावयास नाही. म्हणून श्रमी; आणि त्या लज्जेने जशा समुद्रांत टाकाव्या त्याहूनही अवघड प्रसंगीं दुःखाचे सागरीं बसतात. अन्नाची सोय नाही. जरी तारुण्य आणि लावण्य असेल तरी बळेंच वेडेविद्रें स्वरूप करून बसतात. आणि शास्त्री पंडित म्हणतात की, त्या बाईने पूर्वजन्मीं वाईट तपश्चर्या केली म्हणून हें फळ असें प्राप्त झालें. ईश्वराने उन्हांत उभी केली हें पूर्वजन्माचें दुष्कृताचें फळ म्हणून आता तरी व्रतें करा; आणि आमचें पोट जाळा, म्हणजे सुकृत होऊन सात जन्म वैधव्य प्राप्त होणार नाही. असें सांगून गरीब व भोळे जिवास फसवितात.

मला तर असें वाटतें की, स्त्रियांचें दुःख इतकें भारी आहे की, त्याची स्मृति झाली तर रोमांच उभे राहातात आणि आईबापांस दुःखाचे पर्वत पडतात. आणि दुष्काळांत पाऊस पडत असतां रहातात. अरेरे ! हा अनुभव घरोघर आहे. इतके असून जुन्या काळाचीही समजूत दृढ बसली आहे की, आपली पोरें आपण मारतात. हे ब्राम्हण लोक आपल्या मुली मारल्यापेक्षा अधिक दुःखांत ठेवतात. त्या दुःखास पारावार नाही. अद्यापि या सुधारणेविषयी उलटे बोलणारे आहेत. परन्तु जसा व्याघ्र रानांत माजला तर सर्व जण जाऊन मारतात; तसें या उलटें बोलणारांचा लोक धिःकार कां करीत नाहीत ? व याविषयीं एकमत कां होत नाही ? बारा, पंधरा, वीस, तीस वर्षांच्या पोरींचे गळे कापतात. हें पाहून अंतःकरण खवळून न जावें काय ? ही मूर्ख समजूत पडून गेली आहे. स्त्रियांनी पुनर्विवाह केला म्हणून त्यांत काय तुमचा नामाश झाला ? तुमच्या पोरी, बहिणी सुखेंकरून नांदतील; हल्ली जो कल्होळ दृष्टीस पडतो तो पडणार नाही. पोरें आणि बाळें घेऊन पतीशिवाय काय काय उपातापास, दुःखें या विधवा भोगितात ? परन्तु

भले हिंदु हो, धन्य तुमची! तुम्हीच आपल्या मुलींचे खाटीक स्वस्थपणाने होतां. तुमच्यासारिखें राष्ट्र आणि तुमच्यांतील विद्वानांसारखे विद्वान यांस तुलना पृथ्वीवर कोठेही मिळणार नाही, हेंच खरें.

पुनर्विवाह झाल्याने व्यभिचार कमी होईल, व्यवस्था चांगली राहील. पतित स्त्रियांस पती होतील आणि सुखी रहातील. आणि त्यांनी असें रहावें हा ईश्वराचा संकेत आहे. स्त्रीपुरुषांचे विधिरूप लग्न होऊन त्यांणी नांदावें असा क्रम; त्यांस विघ्न करणारे शास्त्रांतील नेमधर्म आहेत. फक्त पुरुषांनीच स्त्रियांस जनावरांप्रमाणे पशू मानून त्यांजवर पाहिजे तसा जुलूम चालविला आहे. त्यांत नीति नाही, धर्म नाही, विचार नाही, सत्कर्म नाही, व युक्ति नाही. मागे करीत आले, व लिहून ठेविलें म्हणून पुढे करतात; परंतु त्याची कांही मर्यादा पहा. लक्षावधि स्त्रिया उपाशी मरतात. घर नाही, दार नाही, वस्त्र नाही; अन्न नाही, आणि हे दुष्ट पंडित अशा प्रकरणीं दैत्यासारखे निष्ठुर होऊन बोलतात. त्यांस काय म्हणावें?

---

पत्र नं० १०५

# पुनर्विवाह

पुनर्विवाहाची चाल ब्राम्हण जातींत पडली असतां मोठी सुधारणा होईल. पुनर्विवाह न करूं देणें हा महान् अविचार आहे. आणि हे लोक भोळसर म्हणूनच यांनी हा कहर सोसला.

आता किती एक विचार करून पाहूं लागले की, आमच्या जातींत बायकांस इतका अधिकार नाहीसा करून त्यांस जनावरांप्रमाणे मानितात व दुःखसागरीं लोटून देतात. पुरुषावर स्त्रीची प्रीति अधिक असावी व

तिणें देवच मानावा. आणि तिने त्याचा नाश कदापि इच्छूं नये. या हेतूने हा धर्म स्थापन केला असेल. परंतु हें कारण अयोग्य आहे. या पृथ्वीवर ब्राम्हण जातींत स्त्रियांस दीनत्व विनाकारण प्राप्त होतें. आजपर्यंत दोन चार हजार वर्षें तरी हा कायदा चालू असेल, परंतु याविषयी कोणाचें तोंड उघडलें नाही. सर्व लोकांच्या डोळ्यांवर झोप होती. युरोपियन लोक इकडे आले त्यांच्या सहवासाने हिंदु लोकांस विचार आला. त्यामुळे त्यांचे नेत्र उघडले. त्यांणी सती बंद केली. हें मोठेंच यश घेतलें. आता पुनर्विवाह-वादही चालू लागले.

पूर्वीची रीत अशी होती की, चालीप्रमाणे मुकाट्याने चालावें, कोणी विचारूं नये. बायकोस जिवंत जाळूं लागले. आणखी यांचें वर्चस्म चाललें तर पुराणांत एखादा आणखी श्लोक घालते की, आईबरोबर लेकीने व भावाबरोबर बहिणीने जळावें; असाही कारखाना चालता; परंतु मुसलमान या देशांत आल्यापासून ब्राम्हणांचें महात्म्य संपलें. इंग्रजांनी तर त्यांस जर्जर केलें. आमच्या देशापलीकडे काय आहे, याचा विचार ब्राम्हणांनी व पंडितांनी केला नाही. परंतु त्यांची झोप जाऊन त्यांणी जागृत व्हावें म्हणून त्यांचीं व परदेशीय यांची गाठ देवाने घातली. जसें पांडवांचें अक्षौहिणी सैन्य मेलें, आणि रामाचे युद्धांत पद्मांच्या पद्मं मेलीं. त्याप्रमाणे आज इतकीं वर्षें हजारो बायका जिवंत जाळल्या; व बळेंच भादरून दुःखाचे विहिरींत टाकल्या.

याप्रमाणे ब्राम्हणांनी युद्ध केलें. परन्तु निर्दय पुरुषांनी कांही विचार केला नाही. ते भटांचे व पंडितांचेच मानीत होते. पुढे ग्रामस्थ म्हणजे शूद्र वृत्ती करून पोट भरूं लागले. ब्राम्हणांत ती एक आडजात निघाली व तेही पंडितांसच मानूं लागले; परन्तु कोणाचा धीर असा झाला नाही की, अरे, हा असा शास्त्रार्थ आहे म्हणतात खरा; परन्तु किती एक शास्त्रार्थ लौकिकाकरिता एकीकडे ठेवितां व विचाराने सारासार पहातां, तसेंच हें घातकी वचन म्हणून टाकावें आणि जो विधि

विचारास विरुद्ध असेल त्या विधींचा निषेध करावा, हेंच योग्य आहे, आणि हा अनर्थ तर उघड आहे. किती एक स्त्रिया या दुःखसागरांत लज्जेने दीन होऊन, व्यभिचारी होऊन मेल्या.

'कल्याणोन्नायक मंडळी'चा सभासद लिहितो की, अशा स्त्रियांनी एक वेळ जेवावें, चांगलें अन्न खाऊं नये, उपासतापास करावे, यात्रा कराव्या. परन्तु बळेंच त्यांस अडचणींत घालून हें सांगावें काय ? नवरा मरणें ही प्रारब्धाची गोष्ट आहे व तत्संबंधी जुलुम फक्त हिंदु लोकांच्या अज्ञानी व गरीब बायकांनीच सोसला आहे. जेव्हा या स्त्रिया विद्वान होतील, तेव्हा या पंडितांस चरण-संपुष्टांनी पूजा अर्पण करतील; यांत संशय नाही. परन्तु याच कारणास्तव ब्राम्हण लोक स्त्रियांस शहाण्या करण्यास असे प्रतिकूल आहेत. जुलमाने शास्त्र जेथे चालू आहे तेथे जरूरच आहे की, बायका जनावरांप्रमाणे नीच अवस्थेंत राहल्या पाहिजेत. स्त्रिया सुशिक्षित होतील, तेव्हा आपला अधिकार स्थापतील. आणि संसारसुखास हानि करणारे पंडितापासून असा तहनामाच करून घेतील. परन्तु सांप्रत बायका अगदी जनावरें पडल्या म्हणून पंडितांस संधि सापडली आहे.

हिंदु लोक सुधारत तोंपर्यंत मोठ्या पदवीवर येण्यास योग्य नाहीत. पहा, जर एकादा पंडित न्यायाधीश केला आणि त्यापुढे ब्राम्हणी स्त्रिया विधवा गर्भपात करून आल्या तर तो त्यांजला बळेंच महान् अपराधी असें आणून मोठी शिक्षा देईल. परंतु त्यांस असें वाटणार नाही की, आमचे शास्त्राने एवढी अडचण घातली आहे की, ती तोडण्यालायक आहे. याजमुळे ही स्त्री अपराधी कमी आहे, असें त्यास किमपि वाटणार नाही.

---

पत्र नं० १०६

# पुनर्विवाह

पुनर्विवाहाची चाल पाडणें, हें शास्त्रविरुद्ध म्हणतात; परंतु लोकांचे हिताकरिता करावें हेंच माझें म्हणणें आहे. जसा दुष्काळ पडला असतां श्राद्ध करावयाचें असल्यास ठेवावें; कारण की, पोटास मिळून आपला जीव जगत नाही, तर खर्च कशास करावा? तद्वत् चांगली व्यवस्था होईल तो नियम करावा; आणि जें पूर्वी शास्त्र लिहिलें तेंच सर्वकाळ चाललें पाहिजे, असें म्हणणें हा मूर्खपणा आहे.

जसें पूर्वींचें वैद्यक आहे, परंतु त्यांत आता जी सुधारणा झाली असेल ती घेतली पाहिजे; तसेंच ज्योतिष, तसेंच धर्मशास्त्र. यांत फेरफार केले पाहिजेत; व त्यांतील नियम सुधारले पाहिजेत. किती एक रद्द करण्याजोगे जे होते ते लोकांनी कोणास न पुसतां रद्द केले आहेत. कारण की तसें करणें जरूर पडत गेलें. ब्राम्हणांनी राज्य करूं नये; परंतु पेशवे यांणी केलें. मुंजीनंतर बारा वर्षें गेल्यावर लग्न करावें; तें सोडून पूर्वीच करितात. अशा शास्त्रविरुद्ध चाली लोकांनी स्वमताने हजारो काढल्या आहेत. त्यांस शास्त्री म्हणतील की या बहुत दिवसांच्या आहेत. तेव्हा मला इतकेंच पुसावयाचें की, बहुत दिवस गेले म्हणजे बहुत दिवसांच्या होतात. परंतु या माणसांनी केल्या किंवा ईश्वराने केल्या हें पहा. तसेंच एकदा संमत देऊन पुनर्विवाहाची चाल घातली म्हणजे या लोकांचा स्त्रियांवर हा जुलूम नसावा. जें सरकार लोकांवर जुलूम करतें त्याजवर लोक बंड करितात. जें शास्त्र लोकसुखास विरुद्ध आहे त्यास लोक सोडतात, हा निश्चय. याजकरिता जें सुखास आडवें येईल तें दूर करावें. लग्नाचा नियम हा धर्म नव्हे; ही रीत आहे. लोकांमध्ये व्यवस्था होण्याकरिता केला; ती जर वाईट असें स्पष्ट दिसेल तर दुसरे नियम करण्यास चिंता नाही.

तुम्ही म्हणाल की, लोकांस व्यभिचार करण्यास सांगावें म्हणजे सुख आहे. परंतु येथे तुम्ही चूक करिता. व्यभिचाराने लोकांत व्यवस्था रहाणार नाही. जरी एकास सुख झालें तरी दुसऱ्यास तें दुःख आहे. याजकरितां परस्परांनी आपलें सुखरक्षणाकरितां व्यभिचार सोडावा. साधारण नियम असा आहे की, एकाचें सुख दुसऱ्याने हरण करूं नये. सर्वांनी व्यभिचार केला असतां लोकांची दुर्दशा होईल. म्हणून तो अधर्म व नीतीचे विरुद्ध व त्याचेंच नांव पाप. ज्याचे साधारण परिणाम चांगले व जें सर्व मुलखांत चालू झाल्याने लोकांचें कांही वाईट होत नाही आणि चांगलें होतें, तेंच पुण्य व तोच धर्म, असें माझें मत आहे.

ज्या काळीं ऋषींनी शास्त्र लिहिलें त्या काळीं त्यांचे सर्व नियम लोकांचे सुख वृद्धीकरितां व व्यवस्थेकरितां लिहिले, त्यांणी लोकांचे घात व्हावे असें आणून लिहिले नाही. बरें, त्यांस लोक बहुत काळपर्यंत मानीत आले. ते फिरविण्यास आपण चांगला विचार करावा. उगेच दांडगाईने मोडूं नये खरें; परन्तु पुनर्विवाहाचा निषेधी दुष्ट परिणाम सर्वांस समजला आहे. परन्तु अंध परंपरेस भितात इतकेंच. वास्तव जितकी त्वरा होईल तितकी अशा समयीं करावी. कारण की, एक घटका उशीर झाला तर हजारो स्त्रियांस समुद्रांत लोटून दिल्याचें पातक डोकीवर बसतें.

वास्तव लोकांस मी उपदेश करितों की, अगदी भिऊं नका. रस्ता सुखाचा व सोईचा आहे. तुमची सुधारणा करावी हें पंडितांचे उपजीविकेस विरुद्ध आहे. तुम्हांस शहाणे करण्यास विद्या पाहिजे. नवीन ग्रंथ हजारो पाहिजेत, शाळा पाहिजेत; हें खरें आहे. आता एक गृहस्थाजवळ लाख रुपये आहेत, असें म्हणा; आणि तो धर्म करावयास इच्छितो. आणि त्याणे जर शाळा व ग्रंथकर्ते व पुस्तकगृहें इत्यादिकांस धर्म केला तर पंडितांचे व भटांचे हातीं एक पैसा तरी जाईल ? तेव्हां या धर्मास ते अनुकूल होऊन आपला रोजगार कसा बुडवतील ? वास्तव ते असें सांगतात की, भट भिक्षुकांस बोलाव आणि दोन रुपये दर एकास

दे. आणि शंभर गोप्रदानें कर, शंभर प्रायश्चित्तें कर, आणि दहा दहा रुपयांचा विषय एका एका ब्राम्हणास पोचीव. आणि एक सहस्र भोजन घाल, एक इच्छा भोजन घाल, एक कोट तुळशी वाल, ब्राम्हणद्वारा महारुद्र कर, पांच शालजोड्या विद्वान भटास दे, मोठाले पंडित गावांत आहेत, त्यांची संभावना कर; दर एक स्त्रीस नथ दे, भटास धोतरजोडा दे, म्हणजे महान धर्म होऊन मोक्षास जाशील. या गोष्टींचे उलटें हे कधी तरी सांगतील ? तस्मात् या सुधारणेस ते सर्वथैव विरुद्ध आहेत. म्हणून त्यांची आशा धरतील ते मूर्ख आहेत.

---

पत्र नं० १०८

## पुनर्विवाह वगैरे सुधारणा

'कल्याणोन्नायक मंडळी' ने आपली विद्वत्ता बाहेर दाखविण्याकरिता दोन प्रश्न प्रथम काढिले. एक संस्कृत विद्या सर्वांहून वरिष्ठ व दुसरा पुनर्विवाह करूं नये. या दोहोंचीं समर्पक उत्तरें झालीं. आणखी माझें त्यांस उत्तर आहे की, तुम्ही असें मनांत आणा; मी जर एक कायदा केला की, पुरुषाची स्त्री मेली तर त्यास श्मश्रु करून लागलाच संन्यास द्यावा; व घराबाहेर काढून द्यावा; व त्या दिवसापासून त्याचा रोजगार, व्यापार सर्व बंद; त्याणे गंध देखील लावूं नये. आणि हा कायदा चालू करण्याचे मला सामर्थ्य असतें, तर पुरुषांनी काय म्हटलें असतें ?

आता पंडित म्हणतात की, बायकांस परवानगी दिली तर त्या नवरे मारतील. परंतु माझें उत्तर हें आहे की, इतर देशांत व जातींत परवानगी आहे म्हणून पुरुषांनी आपल्या बायका मारून दुसऱ्या केल्या आहेत कीं काय ? पुरुषांस परवानगी असावी आणि बायकांस नसावी काय ? जीं

कारणें तुम्ही दाखवितां तीं पुरुषांसही लागू आहेत. मग आम्ही असें म्हणूं की, पुरुषाची बायको मेली म्हणजे त्याचें सौभाग्य गेलें. मग त्याणे मीठ खाऊं नये, तीर्थयात्रा कराव्या व विधवेसारखें होऊन असावें. तर मग पंडितांस केवढा चमत्कार वाटेल बरें ?

अहो, हा प्रत्यक्ष अनर्थ; यास विचार कशास पाहिजे ? अनेक गोष्टींची सुधारणा आमचे लोकांत केली पाहिजे. विद्वान कोणास म्हणावें हें समजलें पाहिजे. विद्या म्हणजे काय ? हें समजलें पाहिजे. कर्ममार्ग वृथा आहे, नीति हाच मार्ग खरा; हजार तुळशी वाहिल्यांत कांही नाही, मन शुद्ध पाहिजे; चांगले ग्रंथ नवीन तयार होऊन ते प्रसिद्ध व्हावे असें केलें पाहिजे. पुनर्विवाहादिक चाली घातल्या पाहिजेत. लोक विचार करूं लागतील अशी युक्ति पाहिजे. लोक विद्वान होतील अशी युक्ति पाहिजे. अधिकारावर असल्यास कोणते प्रकारची वर्तणूक असावी, खरेपणा इत्यादि सद्गुण असावे, या सर्व सुधारणुकेच्या गोष्टी लोकांस कळाव्या म्हणून 'कल्याणोन्नायक मंडळी'ने मेहनत करावी व सांप्रतचा मूर्खपणा सोडून द्यावा.

तुम्ही म्हणाल की, विधवेचें लग्न करावें, असें अनुमत दिल्यास आम्हांस सर्व जन हसतील, तर बाबांनो, हें खरें आहे. लोक हसतील खरें, परंतु पांच चार वर्षांनी चांगले म्हणतील. तुम्हास योग्य वाटेल तसें करा. लोकांस भिऊं नका. तुम्हास लोकांचें कल्याण कर्तव्य असेल तर चांगला मार्ग दाखवा. लोक मूर्ख होऊन राहिले आहेत. म्हणून त्या मूर्खपणास तुम्ही सहाय होऊन वाढवूं नका. तुम्ही शहाणे आहां हें दाखवा. जर तुम्ही लोकांसारखे मूर्ख आहों असें दाखवाल व लोकांस प्रिय तें बोलाल तर तुमचे नांवास बट्टा आहे. याजकरिता तुम्ही मोठाले मान्य पंडित आहां, तेव्हां हा प्रसंग फुकट जाऊं नका. त्याचे सुधारणेस तुम्ही लागा. सरकार जबरीने किंवा ईश्वर सत्तेने किंवा आम्हांसारखे जे पुढे होतील ते आपलीं मतें चालू करतील

परंतु तुम्ही आपली विटंबना होऊं देऊं नका.

हें झाल्याखेरीज रहाणार नाही. तुम्हांस कळत नाही म्हणून तुम्ही संशयांत आहां. तुम्ही जरी पन्नास हजार ग्रंथ पाठ केले असले तरी तुम्ही घोके आहा. तुमचें ज्ञान निरुपयोगी जाणून तुम्ही लौकर शुद्धीवर या. हें माझें मागणें तुम्हांजवळ आहे. तुम्ही मंडळी स्थापन केली याचा मला संतोष आहे. हें करणें तुमचें चांगलें आहे. परंतु भलतेंच बोलतां, म्हणून वारंवार तुम्हांस सुचवितों, तुम्ही चांगले रीतीनें विचार करा व पहिला वेडेपणा सर्व सोडून द्या. विचारानें चाला म्हणजे सर्व आहे. तुम्ही लोकांचें कल्याण करा ही माझी तुम्हांस शेवटची विनंती आहे.

---

# १ संकीर्ण

लोकहितवादींच्या सर्वच लिखाणांत अनेक जिव्हाळ्याच्या विषयावर विचार प्रकट केलेले आढळतात. अमुक एक विषय त्यांनी वगळला आहे किंवा सरकारी नोकरीत ते होते म्हणून विशिष्ट विषय त्यांना वर्ज्य होता, असें दिसत नाही. राजकारण, समाजसुधारणा, पुनर्विवाह, ब्राम्हणांची कानउघाडणी, औद्योगिक चळवळींचा पुरस्कार, विद्येचा अभिलाष—......असे किती तरी विषय त्यांच्या या पत्रांत सापडतील. पण त्या सर्वांत एक सूर प्रभावीपणाने उमटलेला ऐकूं येईल— लोकहिताची अस्सल कळकळ. या कळकळीस दूरदृष्टीची जोड मिळाली आणि शुद्ध विचारांचा पाठिंबा होता, म्हणून ते द्रष्टे ठरले.

या पत्रांतही त्याच त्याच गुणांची खूण पटते. "इकडे काच करतां येईल, तारवें करतां येतील, लोखंडाचा रस करतां येईल, भूमींतला कोळसा सापडेल, कापड करतां येईल" ( ८५ ) असा त्यांचा आशावाद आंधळा नव्हता, हें आज आपणां सर्वांस कळून चुकलें. "गरीब हा जात्या गरीब नसतो, तो श्रीमंताचे जुलमाने गरीब होतो," ( ७९ ) हें तत्त्वज्ञान मार्क्सवादाचा अभ्यास न करतां (त्या वेळीं तो इकडे आलाही नव्हता) त्यांनी सांगितलें; आणि "भिकारी व श्रीमंत यांचे शरिरामध्ये कांही फरक नसतो" ( ४७ ) म्हणून बजाविलें. आमच्या देशबांधवांचे दुर्गुण तर त्यांनी वेळोवेळीं स्पष्ट करून दाखविले आहेत. आमच्या सनातन वैदिक धर्मांतले जे दोष त्यांना हास्यास्पद वाटले, त्यांजवर टीका करण्यास ते कचरले नाहीत.

" दुसऱ्या जनावरांवर आपलें पाप ठेवून त्यांजला मारावें, म्हणजे त्यांचे दुःखाने आपलें पाप जाईल, ही गोष्ट विचारास विरुद्ध आहे " ( ७९ ) म्हणून त्यांनी सांगितलें. नादविद्येची ( म्हणजे संगीत कलेची ) महति त्यांनी गाईली असून ती रमणीय विद्या आमच्या स्त्रियांस शिकविण्याची पद्धत नाही, म्हणून समाजाला दोष दिला आहे. " स्त्रियांस कुत्र्याप्रमाणेही मान देत " नसलेली ही मंडळी "रमणीय विद्या कोठून शिकविणार?" (५६) असे ते विचारतात. "जातीचा अभिमान बाळगणारे मूर्ख " ( ३९ ) सध्या अधिक झाले, अशी त्यांची रास्त तक्रार आहे. " भट विद्वान् नाहीत, शुद्ध टोणपे आहेत " ( २२ ) कारण त्यांची ज्या गुणावरून प्रशंसा होते तो खाण्याचा आहे, इत्यादि दोषांचें वर्णन त्यांनी केलें आहे.

नुसतें दोषदिग्दर्शन करून लोकहितवादी थांबले नाहीत. विधायक सूचना तर त्यांनी भरपूर केल्या. " या देशांतील लोकांनी विलायतेस जावें, तेथे वस्ती करावी, विद्या शिकावी, तिकडील कलाकौशल्य इकडे आणावें. " ( ८५ ) " ज्ञान आहे तेथे सर्व पराक्रम " असल्याने ज्ञान संपादन करणें, ( ८५ ) हें आमचें आद्य कर्तव्य आहे. शहाणपणासुद्धा आमचे अंगीं नाही; " एकावर अन्याय झाला तर सर्वांनी त्याचा न्याय होण्याकरिता मदत करावी, " ( ४७ ) हें आम्हांस समजत नाही; एवढेंच नव्हे तर "दुःख व अन्याय सोसण्याची चाल व सवय पडली असल्याने तिची लाज वाटत नाही. " ( ४७ ) म्हणून ही परिस्थिति जितक्या त्वरेने बदलेल तितकी बरी, असें लोकहितवादींना वाटे. आणि म्हणून आपल्या परीने त्यांनी या शतपत्रद्वारा शक्य तो प्रयत्न केला. त्यांना यश कितपत आलें, यावरून त्यांची योग्यता न ठरवितां त्यांचा प्रयत्न पद्धतशीर होता कीं नाही, त्यांची दृष्टि शास्त्रशुद्ध होती कीं नाही, यावरूनच लोकहितवादींची श्रेष्ठता ठरवावी लागेल.

## ९ संकीर्ण

२१ जातींविषयी विचार
३९ वर्णविचार
४१ नाना फडणिसाचें शहाणपण
४७ दया
५१ उद्याचा विचार
५६ नादविद्या
६५ नीतिप्रशंसा
६८ उद्योगप्रशंसा
७९ दया
८५ ज्ञान हाच पराक्रम
८८ नीतिप्रशंसा
९१ भिकारी
९५ अभिमान

# जातीविषयी विचार

हिंदु लोकांचें कांही वर्णन लिहावयाचें असलें, तर मुख्यत्वेंकरून ब्राम्हण लोकांचें लिहावें. म्हणजे त्यांत सर्व लोकांचे स्थितीचें वर्णन आलें; कारण हिंदु लोकांत विद्येचे महत्वाचे मुख्य मालक ब्राम्हण आहेत. व त्यांचीं मतें लोकांमध्ये प्रबल आहेत. वास्तव आम्ही बहुधा हिंदु लोकांचें वर्णन लिहावयाचें असलें, म्हणजे ब्राम्हणांचेंच लिहूं व तेणेंकरून सर्वांचें वर्णन झालें, असें समजावें.

प्राचीन हिंदु शास्त्राप्रमाणें लोकांचे चार वर्ण आहेत. ते अशा प्रकारचे वर्ण दुसऱ्या देशांत नाहीत. हिंदुस्थानांत मात्र अशी व्यवस्था आहे. ते चार वर्ण असे— एक ब्राम्हण, दुसरा क्षत्रिय, तिसरा वैश्य आणि चवथा शूद्र. शास्त्रांत असें लिहिलें आहे की, हे चारी वर्ण कुळपरंपरा चालावे. जो ब्राम्हण त्याचा वंशही ब्राम्हणच. तसें, जो शूद्र त्याचा वंशही शूद्रच, असा नियम स्मृतिरूप धर्मशास्त्रांत आहे; परन्तु तें शास्त्र लिहिण्या-पूर्वी व पश्चात् असा नियम चालला असेलसें वाटत नाही; कारण वाल्मीक ऋषि हा प्रथम कोळी होता व नंतर ऋषि झाला. गाधि राजा क्षत्रिय असतां ब्राम्हण झाला. पाराशर ऋषीने शूद्र स्त्री केली. हरिश्चंद्र राजाने काशीस जाऊन महाराचें कर्म पत्करिलें व किती एक राजे क्षत्रिय असतां ब्राम्हण झाले. तसेच, दुसरे ब्राम्हण असतां क्षत्रिय झाले, अशीं वर्णनें पुराणांत लिहिलीं आहेत. आणि मोठ्या कुळांत राजे वगैरे जे लिहावयासारखे झाले, त्यांचीं नांवें पुराणांत सापडतात. तेव्हा त्या काळीं अशी बहुधा चाल असेल. परंतु सर्वांचीं नांवें पुस्तकांत लिहिलीं गेलीं नाहीत, म्हणून पक्कें समजत नाही. तथापि चाल पुष्कळ होती, असें विचारें करून सिद्ध होतें. आणि उत्तम मार्ग हाच की, कर्मे करून जातीचा आणि वर्णाचा निश्चय असावा.

ब्राम्हण असून शूद्राहूनही नीच कर्म करील, तर तो ब्राम्हण नव्हे. तसेंच क्षत्रियानें ब्राम्हणकर्म केलें, तर तो ब्राम्हण व्हावा, असें केलें नाहीं, तर किती एक अयोग्य लोक ब्राम्हणाचें नांवानें मिरवतील आणि किती एक वास्तविक ब्राम्हण शूद्राचें नांवानें आच्छादित रहातील. जर कोणी राजानें असा नियम केला की, जे हल्लीं कामदार आहेत. त्यांजकडे तीं कामें वंशपरंपरा चालवावयाचीं, तर ते जोंपर्यंत आहेत, तोंपर्यंत तीं कामें बरोबर चालतील. पुढें त्यांचे मुलगे वगैरे अर्थातच मूर्ख निघतील; कारण बापाप्रमाणे मुलगा निघतो असा निश्चय नाहीं. यास्तव ज्याचे त्याचे स्वयमेव गुण पाहून त्याची योजना करावी, हा उत्तम पक्ष होय. नाहीं तर घालमेल होऊन जे शहाणे ते मागे राहून मूर्ख मंडळी परंपरेच्या कायद्याचे जोरानें सर्व मोठे मोठे कामांत शिरूं लागेल व मग त्या राज्यांत काय व्यवस्था होईल बरें ?

बाकी चार भेद हिंदुस्थानांतच आहेत. इतर देशांत नाहीत असें नाहीं. प्रत्येक मुलखांत चारी वर्ण आहेतच. ( १ ) पंडित, ( २ ) शिपाई, (३) सावकार आणि (४) चाकर हे सर्वत्र आहेत. याशिवाय तर कोठेंही चालावयाचें नाहीं. परंतु अंतर इतकेंच आहे की, अन्य देशांत हे धर्मपरंपरा चालत नाहीत. वाणी आहे आणि त्याचा मुलगा बुद्धिमान् निघाला, तर तो पंडितांमध्ये जातो. आणि पंडिताचा मुलगा मूर्ख निघाला, तर तो चाकरांत जातो. अशा रीतीनें हे चारी वर्ण सर्व देशांत आहेत.

परंतु हिंदुस्थानांत त्यांचीं वेगळालीं कुळें झालीं आहेत. आम्हांस वाटतें की, पूर्वी जातींत फेरफार होण्याची चाल असे. रावण ब्राम्हणाचा मुलगा, परंतु दैत्य झाला; कारण तो महा दुष्ट होता. याजवर किती एक लोक असें म्हणतील की, ते मागले युगांतील लोक. त्यांचें उदाहरण आतां घ्यावयाचें नाहीं; परंतु हें म्हणणें उपयोगी नाहीं; कारण वर्ण, व्यापार व जात तर मागील युगांतीलच आहे. व मागील युगांत तरी माणसेंच होतीं. देवाचे अवतार जरी झाले, तरी मनुष्यें होतींच. प्रत्येक जीव देव नवता; व आतां सारखेच सर्व लोक तेव्हांही होते. म्हणजे दुष्ट होते व

सुद्धी होते. फरक इतकाच की, आता विचार कोणी करीत नाहीत. बहुधा चालीवरून चालतात.

सांप्रत काळचे ब्राम्हण कोणी विद्वान आहेत काय, असें पाहिलें तर सर्वांस दिसेल की, हे भट विद्वान नाहीत. शुद्ध टोणपे दिसतात. त्यांस कांहीच ज्ञान नाही. जसे बैरागी अंगास राख लावून भीक मागतात, तसे कोणत्या तरी वेषाने हे पोट भरितात. हे स्वभावाने आळशी व काम करावयास नको. तेव्हा निर्लज्जपणाने भीक मागून पोट भरितात. एवढांच त्यांचा रोजगार आहे. मला वाटतें की, त्यापेक्षा, आचारी, पाणके बरे. व हे त्यांहून निंद्य. कारण हे हरामाचें खातात. आणि लोकांस यांपासून कांही उपयोग नाही. ब्राम्हणांचा स्वधर्म असा आहे की, आपली सद्वर्तणूक आणि पवित्रपणा बाळगून विचार करीत अरण्यांत स्वस्थ बसावें म्हणजे तेच मुनी व ऋषी होत. व असें त्यांचें कर्म पवित्र व वागणूक निर्दोष म्हणून, राजे ब्राम्हणांस थरथर कापत होते, व सर्व लोक त्यांचें भय बाळगीत होते, अशा कथा आहेत. व ते आपले सत्कर्मेंकरून व उपदेशेंकरून सर्वांस सुशिक्षा लावीत होते. व धर्मसुधारणेचा आणि लोकहिताचा विचार करीत होते. तेव्हा लोकही त्यांस मानीत होते. त्या प्रकारचा एक तरी ब्राम्हण काशीपासून रामेश्वरापर्यंत आता आहे काय ?

आताचे ब्राम्हण असे आहेत की, जेवावयापुरती काळजी करितात. सकाळपासून पोट कोठे भरेल, याचा शोध करून जेवावयास मिळालें, म्हणजे उताणे पडतात. किंवा स्वस्थ गोष्टी सांगत बसतात. कोणी म्हणतो की मी ५० लाडू खाल्ले. कोणी म्हणतो की मी शेरभर तूप प्यालों. सारांश, जे भटांचे मंडळींत क्षणभर बसतात, ते जाणत असतील की, त्यांचें भाषण किती उपयोगाचें व किती शास्त्रपर आहे. त्यांचा मोठा गुण ज्यावरून ते आता प्रशंसा पावतात, तो खावयाचा आहे. म्हणजे जो फार खाईल, तो उत्तम भट. गृहस्थही मूर्खच असतात. त्यांस वाटतें की, ब्राम्हण जितकें खातील तितकें आम्हांस विशेष पुण्य लागेल.

## धर्माच्या नांवाने लूट

मी एका गृहस्थाचा खरा वृत्तांत जाणतों की, त्याचा बाप मेला आणि त्याजजवळ पांच हजार रुपयांची जिनगी होती. तेव्हा त्याचे मनांत काय वेड भरलें, तें न कळे. त्याणे असा बेत केला की, हे सर्व रुपये ब्राम्हण-भोजनांत घालावयाचे. मग त्याणे दोन चार वर्षेपर्यंत शेकडो ब्राम्हणांस यथेच्छ परोपरीने भोजन घातलें. आणि आपली सर्व जिनगी गमावली. तेव्हा मला असा चमत्कार वाटतो की, हे ब्राम्हण फार दुष्ट आहेत. त्या गृहस्थास कोणी असें म्हटलें नाही की, 'अरे, तुम्ही, पोरें-बाळें व बायका जेणेंकरून मरतील, असा हा धर्म कोठला ? तूं आपले कुटुंबाचें रक्षण कर' असा उपदेश कोणीं एकाही ब्राम्हणाने केला नाही. सर्वांनी त्याचें सरेतों-पर्यंत लाडू व सरव्यावर घरोघर निघून गेले.

दुसरें उदाहरण, बाजीराव पेशवे यांणी अनंत ब्राम्हण जेवावयास घातले. त्यांस तर नेहमी हेंच वेड होतें; परन्तु त्यांतील एका ब्राम्हणाने तरी असें म्हणावयाचें होतें की, 'अरे राजा, तुझें कर्म प्रजा-पालन करावयाचें, तें तूं नीट कर; प्रजेपासून जुलमाने पैसा घेऊन रिकामे ब्राम्हणांस जेवूं घालूं नको; कर कमी कर; बंदोबस्त नीट ठेव. व्यभिचार करूं नको, राज्य बुडवूं नको; फौज नीट बाळग; हेंच तुला स्वर्गास नेईल; लूट करून ब्राम्हणांस घालण्याचा उपयोग नाही,' असें एकाने तरी सांगितलें काय ? नाही.

तस्मात् हे ब्राम्हण लुटारू आहेत. हे धर्माचें नांव करून लुटतात. पेशव्यांचे राज्यांत एकच ब्राम्हण होता आणि जोंपर्यंत तो होता, तोंपर्यंत तें राज्य कृतयुगाप्रमाणे चाललें. त्या ब्राम्हणाचें नांव रामशास्त्री होय. एके दिवशीं माधवराव पेशवे स्नानसंध्या करीत असतां शास्त्रीबावा भेटीस गेले, तों वर्दी आली की, श्रीमंत स्नानसंध्येंत आहेत. तेव्हा त्यांस संताप आला व तसेच आंत गेले. आणि त्यांनी विनंती केली की, "मला आज्ञा द्यावी. मी काशीस जातों. कारण आमचीं कर्में तुम्ही करावयास लागला. तेव्हा आता आम्ही रहाणार नाही."

श्रीमंतानी पुसलें, "हें काय ?" त्याणीं सांगितलें की—

"तुम्ही ब्राम्हण जातीचे खरे; परन्तु तुम्ही स्नानसंध्येचा धर्म सोडून क्षत्रियाचा धर्म घेतलात. आणि शिपाईगिरी करून राज्य करितां. आता स्नानसंध्या केली तर धड ब्राम्हणांचें कर्मही साधावयाचें नाही. व वेळ फुकट जाऊन क्षत्रियांचें कर्मही बुडवाल. आणि कोणतेंच कर्म न केलेंसें होऊन नरकांत जाल. तर तुम्ही जी वेळ स्नानसंध्येंत घालतां तीच वेळ रयतेस दाद देण्यांत घालवा. व येथून दोनशे कोसपर्यंत तुमचे अमलांत कामगार कसे काय करितात, हें पहा. जप कशाचा करितां ? जर तुम्हांस जप करावयाचा असेल, तर राज्य सोडा. आणि दुसरा कोणी गादीवर बसवा आणि वनांत चला. तुम्हीआम्ही बरोबर जाऊं. व असें करावयाचें नसेल, तर राज्य चांगल्या रीतीने नीट करा. लोकांचे घात करूं नका. अशी स्नानसंध्या ईश्वरास मान्य होणार नाही." असें सांगून त्या दिवसा-पासून त्याने श्रीमंतांस प्रातःकाळीं दरबारांत येऊन बसावें, असें ठसवून दिलें. याचें नांव ब्राम्हण व याचें नांव सारासार विचार.

ज्याने आपले अकलेस आलें, तें खरें जाणून सुचविलें; भीड धरिली नाही, तोच धन्य. तसेंच, जेव्हा घाशीराम कोतवालाने× कांही माणसें मारलीं, तेव्हा रामशास्त्री यांजकडे नाना फडणीस यांनी शास्त्रार्थ नेला आणि सांगितलें की, 'मी तुमचा स्नेही आहें. व माझा स्नेही घाशीराम आहे. त्यापक्षी याचा जीव जाऊं नये, असें करावें.' त्यांनी सांगितलें की, "मी वास्तविक असेल तेंच सांगेन. तुमचा प्रपितामह आला तरी

× घाशीराम कोतवाल– स० १७७२–९१ पर्यंत पुणें शहरचा कोतवाल नाना फडणिसांच्या मर्जीतला. याने बंदोबस्त छान ठेवला; पण जुलूम जबर-दस्तीही पुष्कळ केली; असें दिसतें. ३५ तेलंगी ब्राम्हणांस एक खणी खोलींत रात्रभर कोंडल्यामुळे त्यांतले पुष्कळ मेले, म्हणून पुण्यांतील तैलंगी ब्रम्हवृंदांनी पेशव्यांकडे दाद मागितली. घाशीरामाची धिंड काढून शेवटीं त्यांस ब्राम्हणांनी ठेचून मारला. (स० १७९१.)

सत्याचा अव्हेर तुमचे भिडेमुळे मी करणार नाही.' आणि त्यांनी तसेंच श्रीमंतास सांगितलें, व त्याजवरून त्याचा वधही झाला. सारांश, जे असे असतील ते ब्राम्हण. नाही तर सहस्त्र भोजनास पुष्कळ जमतात. तेव्हा विचारावें, तुमचें नांव काय ? 'ब्राम्हण.'

'येतें काय ?'

'शंख.'

'जेवतां किती ?'

'चार शेर.'

'करतां काय ?' 'आगांतुकी.'

वाः हे ब्राम्हण कशाचे ? आताचे शास्त्री यांजवळ म्हटला तो प्रायश्चित्त तयार आहे. 'भटजीबुवा, असत्य भाषण केलें, तर काय करावें ?'

उत्तर– 'ब्राम्हणास पुतळी दक्षणा द्यावी.'

यावरून हल्लीचे ब्राम्हणांत कांही विचार, नीति किंवा पवित्रपणा नाही. शास्त्री व भट हे रुजूरदार आहेत. जसे हेलकऱ्यास चार पैसे दिले, म्हणजे कोसभर जातो व आठ पैसे दिले म्हणजे दोन कोस. तद्वत् पांच रुपये दिले म्हणजे प्रायश्चित्त, व शालजोडी दिली, म्हणजे दारू प्याली तरी चिंता नाही, ती निर्दोष, असा ब्राम्हणांचा रोजगार आहे.

---

पत्र नं० ३९ १० डिसेंबर १८४८

## वर्ण विचार

हल्ली ब्राम्हण जातीस मोठा अभिमान आहे. त्यांस असें वाटतें की, आम्ही श्रेष्ठ, आमच्या सारखा कोणी पृथ्वीवर नाही. इतर लोक कसेही असले तरी आमची योग्यता पावणार नाहीत.

परंतु जातीविषयी कोणी गर्व करूं नये. आपलें कर्म तशी आपली जाति आहे. जात म्हणजे कर्मावरून योग्यता. क्षत्रिय म्हणजे त्यांनी युद्ध करावें. ब्राम्हण म्हणजे त्यांनी विद्या करावी. सोनारांनी सुवर्णाचें काम करावें. परीट यांणी वस्त्रें धुवावीं हींच कामाचीं नांवें आणि जात. जातीची कांही वेगळी खाण नाही. सर्वांचें मूळ एक. याविषयी तुकारामाचा अभंग असा—

तुम्ही नका करूं गर्व । नीज जाती म्हणुनी सर्व ॥
शुक्रशोणिताची खाणी । तुम्हा आम्हा एकच योनी ॥
रक्तमास चर्महाडें । सर्वां ठायीं सम पाडें ॥
अन्नउदक घरोघरीं । निष्ठा नाही हो दुसरी ॥
तुका म्हणे हेंचि खरें । नाही देवाशीं दुसरें ॥१॥

याजवरून उघड न्याय होत आहे की, जातीचा अभिमान मानणारे मूर्ख आहेत. आणि जाति व्यवहारावरून आणि कर्मावरून झाल्या आहेत, यांत संशय नाही. येविषयी मनूचें वचन आहे की, ब्राम्हणाचा शूद्र होतो आणि शूद्राचा ब्राम्हण होतो—

(अध्याय १०)

शूद्रायां ब्राम्हणाज्जातः श्रेयसा चेत् प्रजायते ।
शूद्रो ब्राम्हणतामेती ब्राम्हणश्चैति शूद्रताम् ।
क्षत्रियाज्जातमेवंतु विद्याद्वैश्यास्तथैव च ॥ (६५)

(अध्याय ७)

कुबेरश्च धनैश्वर्यं ब्राम्हण्यं चैव गाधिजः ॥ (४२)

इत्यादि वचनेंकरून असें सुचविलें आहे की, धर्माचे फेरफाराने क्षत्रियाचा ब्राम्हण होतो, शूद्राचा ब्राम्हण होतो, असें आहे.

मग आता जे दुसरे जातीचे लोक ब्राम्हणांचा गर्व हरण करण्याकरिता बळेच नमस्कार करितात, बळेच अग्निहोत्र घेतात, इत्यादि

खटपट करितात. आणि ब्राम्हणांचा मत्सर करितात, यांत त्यांस लाभ म्हटला तर कांही नाही. ब्राम्हणांचें कर्म कोणी सुखानें करणार नाही. वास्तविक त्यांत सुख नाहीच; फार उपद्रव, त्रास व कष्ट आहेत; परन्तु तितकेंही सहन करून नीच जातीचे लोक ब्राम्हणपणा मिळविण्याकरिता जों जों खटपट करितात, तों तों ब्राम्हण चिडतात; आणि दोघांचे वादविवाद सुरू होतात. त्यांत अर्थ पाहिला तर कांही नाही. माझे मतें हल्लींचे ब्राम्हण आणि नीच जातीचे लोक हे दोघेही एकसारखेच आहेत. कारण कीं उंच म्हणविणारे यांचीं व नीच म्हणविणारे यांचीं कर्मे समान आहेत. येविषयी प्रमाण—

त्र्यहेण शूद्रीभवति ब्राम्हणः क्षीरविक्रयात् ।

इत्यादि वचनें धर्मशास्त्रांत आहेत. त्याप्रमाणे म्हटलें, तर सर्व ब्राम्हण कांही तरी दोषानें शूद्राचे योग्यतेस आले आहेत. आता कुळाचार मात्र राहिला आहे. दोरी जळाली पण पीळ राहिला, तसें हें आहे.

ब्राम्हणांस आपलें कर्म कांही ठाऊक नाही. सर्व प्रकारचा व्यापार, चाकऱ्या, धंदे, हे करतात; विद्याशून्य व ज्ञानशून्य आहेत, हे ब्राम्हण कशाचे? असें असतां अभिमानाकरिता दुसरे लोक झटतात, हेंही अज्ञान आहे. असो, भले लोकांनी जातीचा अभिमान कधी करूं नये, त्यांत कांही हशील नाही. लोकांस असें वाटतें की, ब्राम्हणांनी रामोशाची सोयरगत करावी काय? तर असें नव्हे. साधारणतः असें कधीही होणार नाही. जे ब्राम्हण आहेत, ते ब्राम्हणांतच बहुधा सोयरगती करतील. ब्राम्हणांची सोय-रीक मिळेल ती टाकून बळेंच परिटाचे घरांत शिरणें जरूर नाही. व कोणी तसें करणारही नाही. ज्या लोकांमध्ये जाति नाहीत, त्या लोकांमध्येही असें करीत नाहीत. मोठा मुसलमान मोठे मुसलमानाशींच संबंध ठेवितो. ही परंपरा चालू आहे. बळेंच कोणी अगदी खेवटल्याचे घरीं जात नाही.

यास्तव जातिअभिमान सोडला, तरी जाति कायम राहातील, यांत संशय नाही. परंतु तंटे व भांडणें मोडतील. मत्सर करणार नाहीत. इतका

फायदा होईल. सर्व लोक एकत्रपणाने वागतील. ब्राम्हण असें म्हणणार नाहीत की, अमका तो महार आहे, त्याचें तोंड पाहूं नये, त्याचा विटाळ होतो. हा वेडेपणा मात्र जाईल. मग तो महार अर्थातच ब्राम्हणांचे गर्विष्ठ-पणाचे शब्द ऐकून नीट इंग्रजांचे घरीं जातो आणि म्हणतो, ब्राम्हण आता फार माजले. मी त्यांस हात दाखवीन. इंग्रज लोकांचे फौजेंत नीच जातीचे लोक फार असतात; कारण त्यांस ब्राम्हण लोक तुच्छ मानतात, त्यांस उष्टें खावयास घालतात व केवळ जनावरांप्रमाणे समजतात. याजमुळे त्यांस उपाय सुचतो, तो ते करितात. आणि ब्राम्हणांचें काम काढितात, हा परिणाम जातिअभिमानाचा आहे. ब्राम्हण आपसांतदेखील फुटले आहेत. देशस्थ, कोकणस्थ, पळशे, कुडाळे, जौळ, खिस्ती, तीरगुळ, कराडे, किरवंत, शेणवी, इत्यादिक ब्राम्हणांच्या जाती असून, त्यांचे दरम्यान अनेक विपर्यास जाले आहेत. आणि ते परस्परविवाह करीत नाहीत, ही चाल वाईट आहे. .

ब्राम्हणांशीं ब्राम्हणांनी खुशाल सोयरीक करावी. त्यांस त्याविषयी अटकाव असूं नये. जर कोकणस्थाची जात मिळेल, तर कोकणस्थाने कोकण-स्थाची सोयरीक करावीं; परंतु देशस्थाची करण्यास प्रतिबंध नसावा. जसें ज्यास सोईचें वाटेल, तसें त्याने करावें. बहुधा जो तो आपले जातीची आणि आपले देशाची मुलगी करील, हें उघड आहे. जरी प्रतिबंध नसला, तरी दक्षणचा रहाणार गुजराथ्याची मुलगी करणार नाही, हें उघड आहे. परंतु याचा प्रतिबंध नसावा. आता जातीचे फार भेद जहाले. मराठे लोकांतही जातकुळाचा भेद, ब्राम्हणांचा पाहून झाला आहे. सात कुळांतील मराठे विधवेचें लग्न करीत नाहीत, हा सर्व मूर्खपणा आहे. यांत कांही शहाणपण नाही; परंतु लोकांस जे मोठें वाटतात, त्याप्रमाणे ते चालतात. वास्तव हे लोक अभागी आहेत. ईश्वर त्यास सुबुद्धि देवो.

---

पत्र नं० ४१ ३१ डिसेंबर १८४८

## नाना फडणिसाचें शहाणपण

सांप्रत मराठे लोकांत अशी म्हण आहे की, नाना फडणिसासारखा कोणी शहाणा नाही; परंतु मला वाटतें की, आता इंग्रजांमध्ये सहस्रशः नानापेक्षा शहाणे आहेत. नाना फडणिसाचें शहाणपण वर्णन करण्याजोगें सर्वोत्कृष्ट नवतें. त्या लोकांमध्ये त्याची कीर्ति होण्याचें कारण इतकेंच की, मूर्खांचे सभेंत थोडासा कोणी शहाणा असला, म्हणजे त्याची ख्याति होत्ये. आणि गांवढा जोशी गांवढ्यांत पंडीत असतो, कारण की, त्या गावचे लोक जितके ज्ञानी असतात, त्याहून त्यास विद्वानपणा अधिक असतो.

वास्तविक पाहिलें तर नाना फडणीस कांही विद्वान् नवता व त्यास दूरदृष्टि नवती. जन्मापासून त्याने कारभार केला, याजमुळे त्याची बुद्धि बरीच होती, व मराठे दरबारचा बंदोबस्त त्याला चांगला करतां येत होता; परंतु मेंढक्यास मेंढ्या वळता आल्या, म्हणून तो कांही घोडेस्वार होत नाही. इंग्रज लोकांतील कारभारी यांची बुद्धि विशाल, मसलत खोल. अनेक देशींचे वृत्तान्त त्यांस माहीत व त्यांचें आपसांत एकमत असे. नाना फडणिसाचे ठायीं हें नवतें. तो जुन्या चालीचा ब्राम्हण; त्याची माहिती कमी व आपसांत दुष्टपणा फार होता.

पहा बरें, नाना फडणिसाचे हातीं सर्व राज्यकारभार होता; परंतु त्याने कांही राज्यांत अधिकाऱ्यांची रचना व पदव्या हें ठरविलें नाही. इंग्रजींत एक मेला, म्हणजे दुसरा तयार असतो..हा क्रम मराठी राज्यांत नव्हता. कायदे कांही नवते. बरें, त्यांचे समीप इंग्रज होते, त्यांचा शोध तरी त्याणे कांही करावा, तेंही कांही नाही. इंग्रजांनी मात्र सर्व लोकांच्या डोक्यावरचे केस मोजून ठेवले; परंतु मराठे लोकांस इंग्रजांविषयी कांही माहीत नाही.

त्यांचा देश व नांवगाव कांहीं एक ठाऊक नाहीं. नानाचे वेळचे पत्रांत कोठे इंग्रजांस जलचर, कोठे कलकत्तेकर असें म्हटलें आहे. याजवरून त्यांचें ज्ञान समजतें. टिपूशीं लढाई केली, तेव्हा लॉर्ड कॉर्नवालीस तेथे गेले होते. व त्याजबरोबर परशुरामभाऊ वगैरे सरदार पेशव्यांकडून गेले होते; परंतु त्यांजपैकी एक जणासही ते कोण होते, हें ठाऊक नाही. व कोठून आले, हें माहीत नवतें. इंग्रजांचा वकील पुण्यांत होता, त्याची मात्र त्यांस ओळख होती; परंतु त्याचा शेंडाबुंधा किंवा हिंदुस्थानांत इंग्रज कोठे कोठे आहेत व फराशीस कोठे आहेत व फिरंगी कोठे आहेत, याचा कांहीं शोध लागत नाही.

नाना फडणिसाची बातमी फार होती, असें म्हणतात; परंतु ही बातमी फुसक्या गोष्टींची होती. शिखांचें व नेपाळ वगैरे संस्थान दूरवर होतें, त्याचा त्यास ठिकाण नव्हता. व राज्यांत टपाल वगैरे नवतें. नानाची बातमी इतकीच होती की, आपले ओळखीचे लोकांतील कोण कोठे गेला, कोण काय जेवला, ही मात्र बातमी तो चित्त देऊन काढीत असे. एवढ्यावरून मूर्ख लोकांस असें वाटतें की, आम्ही काल अमुक करीत होतों. तें नानास ठाऊक कसें झालें ? परन्तु या बातमीचा उपयोग काय ? बातमी म्हणजे संपूर्ण जगांत कोणतीं राष्ट्रें आहेत, कोणते मुलुख मोठे आहेत, हें समजावें. तळेगावास इंग्रज आले होते, तेव्हा मराठे लोकांनी एकावर हजार जाऊन त्यांचा पराभव केला. या गोष्टीचें मराठे लोक मोठें वर्णन करितात; परन्तु असली गोष्ट कांहीं मोठी नव्हे. व त्यांत कांहीं शहाणपण नाही. घोडें मनुष्यास मारील यांत काय आश्चर्य आहे ? परन्तु त्यामुळे घोडा शहाणा व मनुष्य वेडा, असें म्हणूं नये. ती गोष्ट एखादे वेळेस झाली, म्हणून वारंवार होणार नाही. नेहमी मनुष्य घोड्यावर बसतात; तद्वत् इंग्रजांचा पराभव मराठे लोकांनी केला; पण त्याजमुळे इंग्रज नाहीसे झाले नाहीत. आणि इंग्रज लोक शहाणे, ते इकडे आल्यावर त्यांणी या लोकांच्या सर्व माहितगाऱ्या काढल्या आणि मग

त्यांस जिंकण्यास उशीर लागला नाही. अशी मराठ्यांनी इंग्रजांची माहितगारी कां काढिली नाही?

नाना फडणिसास ही गोष्ट करण्यास अनुकूल होतें. परंतु त्यास हें कांही ठाऊकच नाही. त्याच्या समजुती अशा होत्या की, पृथ्वी काय ती एवढीच, व सर्व जग इतकेंच आहे. याशिवाय कोठे कांही नाही. इंग्रज हे कोणत्या बेटांतून आले आणि प्रथम दहावीस जण, नंतर शे दोनशे असे इतके दूर येऊन एवढें राज्य जमविलें, ही कृति विश्वकर्म्यासारखी नव्हे काय? परभाषा, परमुलुख, परजात, परधर्म, तथापि वरिष्ठता पावले, हें केवढें शहाणपण बरें? इंग्रज कोण हें वर्तमान ठाऊक नाही, हा केवढा मूर्खपणा आहे? आपले लोक पेशवाईत मूर्ख होते, यांत संशय नाही. त्यांस कांहीच कळत नवतें. बरें, आणखी नाना फडणीस यास कांही आपले देशाचा अभिमान नवता व शौर्यही नवतें. तो स्वभावाने कुत्सित होता व हलके मनाचा होता. सर्व देशाचें कल्याण करण्याचें त्याचे मनांत क्षणभर देखील येत नव्हतें. परन्तु त्याचीं आंतून बहुत सरदारांशीं वाकडीं मात्र होतीं.

त्याने सर्वांस एक कायदा लावून देऊन सर्वांस एकत्र जमविण्याचा प्रयत्न कधीच केला नाही. आपले घरापर्यंत व आपले राज्यापर्यंत मात्र नजर ठेविली. लोकांच्या सुधारणेचा प्रयत्न केला नाही. श्रीकाशीक्षेत्रास जाणें तरी बरोबर दोनशे लोक लागत. तेव्हा मनुष्यें माघारी येत होतीं. नाही तर भिल्ल, रामोशी, पेंढारी वगैरे चोरटे लोक लुटीत होते. त्यांचा बंदोबस्त त्याच्याने झाला नाही. कासीही आपलेकडे इंग्रजांकडून घेवविली नाही. व त्यास आपले राज्याबाहेर कोण अंमल करितो, याची खबर बिलकुल नवती. या लोकांचें कोणतेंही कल्याण त्याचे हातून झालें नाही. मग त्यास कोणत्या प्रकाराने लोक शहाणा म्हणतात, हें कांही कळत नाही.

नीति, सुधारणा, किंवा विद्येची वृद्धि त्याने केली नाही. व कलाकौशल्येंही वाढविलीं नाहीत. नशिबाने राज्य चाललें, नाही तर असे लोकांचे हातांत राज्य क्षणभरदेखील असूं नये. परन्तु काळाच्या योगाने

इंग्रज त्या वेळेस इकडे फारसे आले नाहीत. याजमुळे हें राज्य चाललें; नाही तर असे लुटारू, अडाणी लोकांचें बेकायदा राज्य निभूं नये, परन्तु ईश्वरसत्तेने तें झालें.

तात्पर्य, नाना फडणिसाविषयी जो अभिप्राय लोकांचा आहे, तो खोटा आहे. आता जर नाना फडणीस असता, तर त्याजला लोक वेडा म्हणूं लागते. आणि तो पळूनही जातां, यांत संशय नाही.

---

पत्र नं० ४७ ११ फेब्रु० १८४९

## द या

हिंदु लोकांचीं अंतःकरणें पराकाष्ठेचीं थंड आहेत. हीं उष्ण करण्यास महान् उपाय पाहिजेत. त्यांत मुख्यत्वेंकरून ब्राम्हण लोक फार निर्दय व शैत्यान्तःकरणी आहेत. असें की जर कोणी मरत असेल, तर किंवा दुखणेकरी असेल तर ते त्याजकडे पाहिल्याशिवाय वाटेने स्वस्थ जातील.

या दुर्गुणाची निंदा पुराणांत कोठे कोठे केली आहे. त्याजवरून असें सिद्ध होतें की, हा दुर्गुण प्राचीन काळापासून या लोकांत आहे. एके ठिकाणीं व्यासांनी अलंकारपूर्वक असा दुर्गुण वर्णन केला आहे की, एके समयी श्रीशंकर व पार्वती हे संवादांत म्हणाले की, शिवांनी काशीक्षेत्र निर्माण केलें त्या ठिकाणीं जे लोक जातात ते सगळे मोक्षास जातील की काय? असें पार्वतीने पुसलें. तेव्हा शंकर म्हणाले की, काशीस जाण्याने सर्वांस मोक्ष होतो, असें नाही. जे सदय अंतःकरण आहेत, ते जरी गेले न गेले तरी मोक्षास पात्र आहेत.

तेव्हा याची प्रचीति दाखवावी, म्हणून उभयता कैलासाहून निघालीं. एकाने व्याघ्रस्वरूप व एकीने गायत्रीस्वरूप धारण केलें; आणि काशीचे

वाटेवर यात्रेमध्ये चिखल होतो, त्यांत गाय बुडाली आहे आणि पलीकडे कोरडी जागा आहे, तेथे व्याघ्र उभा आहे व तो गाईवर टपून बसला आहे, असें दाखाविलें. त्या वाटेने हजारो लोक जात होते. परंतु ते सर्व यात्रेवर नजर देऊन गाईची मोकळीक न करतां पुढे गेले. एक ब्राम्हण मात्र दयावान् होता. त्याच्याने पुढे जाववेना, तेव्हा त्याने व्याघ्रावर शस्त्र धरून त्यास पळवून लाविलें. आणि गाईस बाहेर काढिलें. त्या समयीं शिवास पार्वतीने सांगितलें की, इतक्या यात्रेमध्ये एवढा मात्र प्राणी मोक्षास पात्र आणि यास मात्र यात्रेचें फळ आहे. कारण की त्याची वासना सत्कर्मावर आहे. बाकीचे लोक सत्कर्मास न जाणून यात्रा मात्र करितात. ती निर्फळ होय.

याजवरून तात्पर्य असें की, दया हें मोठें स्वर्गाचें द्वार आहे; परंतु सांप्रत काळचे लोक आमचे पहाण्यांत असे आले आहेत की, त्यांचीं अंतःकरणें पाषाणाप्रमाणे कठीण आहेत. ते आपले अंगावर दहा हजारांचें जवाहीर व शंभर रुपयांचा पोषाख वापरतील, परंतु जवळ एक भिकारी चिंध्या पांघरलेला आणि उपाशी दीनवाणीने मागावयास आला, तर त्यास कांही देणार नाहीत. अशा गोष्टीची त्यांस लज्जा वाटत नाही व दुसऱ्याचें दुःख पाहून मनास कोमलता येत नाही. वास्तविक पाहिलें असतां जे श्रीमंत आहेत, त्यांणी गरिबांस पाहिलें म्हणजे त्यांस लज्जा यावी; आणि अंतःकरण विरघळावें.

कारण की, भिकारी आणि श्रीमंत यांचे शरिरामध्ये किंवा बुद्धीमध्ये कांही फरक नसतो. इतकेंच की कालेंकरून एकाने दुसऱ्याचें हरण करून फार माल जमविला असतो व दुसऱ्याचा तो हरण झाला म्हणून तो भिकारी असतो. ईश्वराने पृथ्वीवर पदार्थ निर्माण केले, हे सर्वांस सारखे पोचावे हा त्याचा हेतु होय. परंतु मनुष्यामध्ये जितकें शहाणपण, तितकाच मूर्खपणा आणि अज्ञान आहे. याजमुळे पन्नास लोकांस लुटून एक श्रीमंत होतो.

पन्नास कुळंबी गावांतील नांगर धरून मेहनत करितात आणि एक

जहागिरदार किंवा इनामदार त्यास कोंडा ठेऊन त्यांचे दाणे घेतो आणि आपण रेशीमकाठी धोतरें नेसतो; व कामकाज कांही एक करीत नाही. हें महात्म एकाचें आणि दुसरे गरीब बिचारे इनामदारापेक्षा शहाणे असले तरी आपल्या मेहनतीचा हिस्सा त्यास देतात, हें आश्चर्य आहे.

आणखी जर एक गोष्ट सांगितली, तर याविषयी पक्की खात्री होईल. प्राचीन काळीं एक विचारशील मनुष्य शेतांत बसत असे. आणि भिक्षा मागून खाई. त्याणे एक दिवस पाहिलें की, एक विलक्षण जनावराची टोळी जिचें नांव जाणते पक्षी ते सरासरी दोनशे त्या शेतांत आले. तेव्हा दाणे पुष्कळ पडले होते, ते सर्वांनी सारखे खावे, तें सोडून त्यांणी काय केलें, त्या पक्षांपैकी एक रोगिष्ट व निर्बल होता त्यास त्यांनी एका पारावर बसविलें आणि बाकीचे सर्व शेतांत जाऊन त्यांनी आपले आपले शक्तीप्रमाणे दाणे जमा करून त्या रोगिष्ट पक्षाजवळ आणून रास घातली आणि आपण कांही न खातां त्या पक्षीराजाच्या सभोवते बसले आणि तो पक्षिराज त्या दाण्यांचे राशीवर नाचे आणि उडवी; परंतु कोणास कांही देत नसे. आणि कमांस त्या पक्षांपैकी बलिष्ठ होते, ते सहाय्य होऊन इतर पक्षी जरी क्षुधेने व्यास होते तथापि त्यांस कांही खाऊं देत ना. जरी त्यांणी ती रास घातली होती, तरी त्या राशीपैकी कोणी खावयास लागला, तर सर्व पक्षी एकत्र जमून त्या अपराधी पक्षास मारून टाकीत. असे दोनचार पक्षी मारले.

हें त्या पहाणाऱ्या मनुष्यास आश्चर्य वाटून, तो आपले मित्राकडे गेला आणि त्यास त्याने हें वर्तमान विदित केलें. आणि म्हणाला पक्षांची जात काय मूर्ख आहे! आपण उपाशी मरतात आणि रोगिष्टांकडून आपण संचय केलेलें धान्य नाशिवतात. तेव्हा तो म्हणूं लागला की, "अरे बाबा, याचें तुला आश्चर्य कां वाटलें? या गोष्टी तर प्रत्येक दिवशीं मनुष्यांमध्ये पहाण्यांत येतात. एक राजाचें क्षयरोगी पोर असतें परंतु त्याचे सर्व लोक आर्जव करितात आणि त्यास सर्व दौलत देतात व आपण उपाशी मरतात.

बरें, त्याणे स्वतः कांही काम केलें आहे काय? नाही. तथापि लोक आंधळ्यासारखे त्यास बलिष्ठ मानितात. आणि त्यास किनखापाच्या, मखमलीच्या कापडावर बसवितात. व त्याच्याहून हजारपट शहाणे असतात, ते भीक मागतात. चिंध्यादेखील त्यांस मिळत नाहीत आणि राजाचे घरीं कोणी एक पैसा चोरला, तर त्यास फाशी देतात, व त्यास सर्व वहावा म्हणतात. आणि न्याय चांगला झाला म्हणतात.

याणे चोरी का करावी? अशीं आश्चर्यें लोकांमध्ये आहेत. याजवरून जितके श्रीमन्त व जितके थोर पदवीस आलेले आहेत, त्यांस असें वाटतें की, आम्ही नालायक असून हें आम्हांस प्राप्त झालें आहे. याजवर आमचे हक्क. परन्तु ही समजूत मूर्खपणाची आहे. आपणांहून लहान लोकांचे सुखाकडे याचा उपयोग करावा, म्हणजे याचें सार्थक जहालें. मला वाटतें की, प्राचीन काळचे शास्त्रकारांनी ब्राम्हणांस भिक्षा मागावयाचा धर्म लावून दिला आहे, त्याचें कारण हेंच दिसतें की, भिक्षान्नासारखें दुसरें अन्न पवित्र नाही, ही गोष्ट खरी आहे; परन्तु जे श्रीमंत आहेत, त्यांस क्षणभरही पश्चाताप होत नाही. आंणी धर्माने द्रव्य संपादन केलें आहे, असा हजारांत एक सापडेल. बाकी तर लबाडीने द्रव्य मिळविलेले आहेत. त्यांत हिंदु लोकांमध्ये तर क्वचित्च धर्मवान् श्रीमंत आहेत. श्रीमंतांस असें वाटतें की, आम्ही या माळाचे मालक आहों; आम्हांस हे भिकारी त्रास कां देतात?

परन्तु वास्तविक पाहिलें तर त्यांस लाज वाटावी, हेंच योग्य; कारण ते जें सुख भोगितात, तें लोकांचे मूर्खपणामुळे भोगितात. तेव्हा त्या मूर्खांवर कांही तरी दया करणें योग्य आहे. यास्तव सर्व धर्मांत दान देणें हा मोठा धर्म सांगितला आहे. सर्व धर्म याविषयी मिळतात. मोक्षाचा मार्ग दानधर्म आहे. परंतु हिंदु लोकांस दानधर्म करण्याची सवय आहे, तो दानधर्म नव्हे. वास्तविक धर्म असा की, दुसऱ्याचें जें न्यून आहे, तें परिपूर्ण करावें. आणि लोकांस ज्ञानवृद्धि करून शहाणे करावें.

परंतु हा धर्म या लोकांस कळत नाही. हिंदु लोकांमध्ये एकमेकांचा

कळवळा अगदी नाही, उलटें एकमेकांचा नाश करून त्यांत थोरपणा मानणारे बहुत आहेत. जर अन्यायाने एकाचा नाश जहाला, तर इतर स्वस्थ जाग्यावर बसून त्याचे हाल पहातील. एकावर अन्याय जाहला, तर सर्वांनी त्याचा न्याय होण्याकरिता मदत करावी, हें शहाणपण त्यांस नाही. यास्तव मुसलमानांनी हिंदुस्थानांत प्रवेश केला, इंग्रेज लोकही आले व पुढेही किती एक येणार. परंतु या लोकांस दुःख व अन्याय सोसण्याची चाल व सवय पडली आहे, तिची त्यांस लाजच वाटत नाही. व दया नाही म्हणून हे अनर्थ या देशांत आहेत. आणि लोक एकमेकांचें अंतःकरण जाणण्याजोगे शहाणे होतील, तोंपर्यंत हे अनर्थ दूर होणार नाहीत, असें मला खचित वाटतें.

---

पत्र नं० ५२ १८ मार्च १८४९

## उद्याचा विचार

माझ्या पहाण्यांत हिंदु लोकांचा स्वभाव एक विलक्षण आला आहे. तो असा की, हे लोक उद्याचा विचार करीत नाहीत. कितीएक लोक असें म्हणतात की, ही गोष्ट बोलून काय उपयोग ? आमचे डोकीस हें कार्य घडत नाही, मग कशास प्रयत्न करावा ? ही समजूत लहानांपासून थोरांपर्यंत आहे.

राजा म्हणतो आपण मेल्यावर कसें का होईना; याजमुळे तो कांही कायदाकानू, किंवा नेम आपल्यामागे राज्य कसें चालावें, याविषयी करीत नाही. आणि आपले मरणपर्यंत मात्र आशा बाळगतो. आपण आहों तेथ-पर्यंत चाललेंच आहे. पाठीमागे कसेंही होऊं, याजमुळे हे लोक अगदी बुडाले. जी कांही गोष्ट पन्नास वर्षांनी फळास यावयाची असते, ती जर या

लोकांमध्ये काढली, तर ते मनापासून हसतात, आणि म्हणतात पन्नास वर्षे कोणीं पाहिलीं ? उद्याचा भरवसा नाही. ईश्वर काय करील तें कोणास ठाऊक ? पन्नास वर्षे कोणीकडे ? आपला आताचा आतापुरता विचार पहावा ! इतक्या दूरच्या खबरा पाहिजेत कशास ? या प्रकारचीं भाषणें करितात.

परन्तु या मूर्खांस असें कळत नाही की, (थोडेसें स्पष्ट उदाहरण देतों) जर पेशवे सरकारने व बाजीरावाने उद्याचा विचार पाहिला असता, तर राज्य बुडतें ? जर इंग्रेज पहिल्याने आले, तेव्हा हिंदु लोक सावध असते. आणि समजते की हे लोक आज थोडे दिसतात. उद्माकरता आले आहेत. परंतु त्यांचे पाठीमागे पेडें फार लांब आहे, यांस फार जपलें पाहिजे. व यांस फौज वगैरे ठेवूं देऊं नये; कारण की हे उद्या राज्य बळकावतील. असा जर आमचे वडील, आजे, पणजे यांणी उद्याचा विचार पाहिला असता, तर आज हे लोक इंग्रजांच्या अमलांत दीनवाणे का फिरते ? परंतु उद्याचा विचार केला नाही, त्याचें फळ आम्ही भोगितों. असाच जर आम्ही उद्याचा विचार केला नाही, तर आमचे नातू, पणतू, दुःखाविष्ट होतील, हें लक्ष्यांत कसें येईल ?

इंग्रज लोक हे या देशांत ईश्वराने गुरू पाठविले आहेत. त्यांजकडे पाहिलें,म्हणजे ते उद्याचा विचार करितात,हें समजतें. जर नाना फडणीसासारखा आपल्यापुरता विचार ते करते, तर त्यांजमध्ये पराक्रम नसता. परन्तु ते सर्व एक मताने पांचशे वर्षांपुढे होणार तें आज पहातात. कल्पना काढवितात. आणि बंदोबस्त करितात. आपल्याचाने एकही गोष्ट घडत नाही, तितकीच ठेवितात. पुढे येतो तो तेंच करितो. याप्रमाणे पन्नास जणांचे हात लागतात, तेव्हा १०० वर्षांनी ती गोष्ट सिद्धीस जाते. जर इंग्रज लोक मुळीं व्यापाराच्या निमित्ताने या देशांत यावयास धजते ना,तर आज त्यांचें इकडे एकछत्री राज्य झालें नसतें.

लाखो इंग्रज अमीरांसारखे इकडे येऊन रोजगार करितात. आणि

## उद्याचा विचार

हिंदु लोक दीनवाणे मूर्खांसारिखे तोंडाकडे पहातात व त्यांणी केलेल्या रस्त्यावर चालतात. व त्यांणी केलेलीं वस्त्रें नेसतात, असें होतें काय? हें सर्व उद्याचा विचार केला म्हणून झालें कीं नाही? वास्तव ही समजूत लोकांनी सोडावी. इंग्रज उद्याचा विचार आज करितात. जर हिंदु लोकांनी एक कंपनी केली असती आणि विलायतेंत व्यापार करण्यास गेले असते आणि तेथे किल्ले बांधिते व शिपाई ठेविते, तर या घटकेस हाकून देते. हे लोक इकडे दंगा करण्यास आले आहेत, असें म्हणते. असे ते सावधपणाने आपले देशांत वागतात. व एक दिशेच्या कोपऱ्यावर काय होतें, तें सर्व मुलखांतील लोकांस समजतें. आणि पत्ता लावतात हे कोण? कोठचे? येथे यांचें येण्याचें प्रयोजन काय? याचा तपास करतील. सुस्ती करणार नाहीत.

परंतु तुम्ही मनांत आणा कीं, जेव्हा इकडे इंग्रज फराशीस, पोर्तुगीज मुसलमान इत्यादि लोक आले तेव्हा हिंदु लोक किती अंधारांत होते! मुसलमान लोक सातशे वर्षें राज्य हिंदुस्थानांत करीत होते तरी कोणास ठाऊक नाही. दक्षिणेंत लोक निद्रिस्त होते. तसेंच पोर्तुगीज लोकांनी गांवें घेतलें. परंतु हिंदुस्थानचे लोकांस कांही खबर नाही. व आजपर्यंत देखील किती एकांस ठाऊक नसेल. याप्रमाणे हे लोक झोपेंत आहेत. जांस स्वदेशाचें ज्ञान नाही ते परदेशास जाऊन काय पराक्रम करतील बरें? हें तर अर्थातच आहे.

परंतु जर कोणास पुसलें, तर आम्ही अज्ञान आहों, असें म्हणणार नाहीत. व ब्राम्हण तर कधीच कबूल करणार नाहीत. तें म्हणतील की, प्रारब्ध, देवाची मर्जी, ईश्वरी संकेत; त्यास काय उपाय? परंतु यांणी उपाय केले असते, तर आम्ही ईश्वरी संकेत म्हटला असता, परंतु जांणी उद्योग केला नाही ते मूर्ख समजावे.

तात्पर्य, या लोकांची स्थिति जसें एखादें जनावराचें प्रेत पडतें आणि तें कुजलें म्हणजे, त्याचा एक एक केस वेगळा होतो, तद्वत् हिंदु लोक मूर्ख होऊन कुजून गेले आहेत. यांजमुळे त्यांची प्रत्येकांची चित्तें पृथक आहेत.

पेशवे म्हणतात टिपु बुडवावा; होळकर म्हणतात शिंद्यास मारावा; व गायकवाड म्हणतात, पवारास मारावें. असे आपलेमध्ये कज्जे करतां करतां परकी लोकांचें काम झालें. आणि हे गमावून बसले. याचें कारण या लोकांस विद्या नाही. मोठे लोक आहेत, त्यांस तर विद्येविषयी त्यांच्या बापाची शपथ आहे. त्यांचे हातास कधी ग्रंथाचा स्पर्श झाला नाही. व वडिलांपासून तो संस्कारच नाही. कोणी भीष्माचार्य वृद्ध असतील, ते गीताबीता वाचतात, परंतु फळ काय? त्याचा अर्थ समजेल तर शपथ! हे विद्येचे व ज्ञानाचे वैरी लोक आहेत, म्हणून यांची अशी दशा आहे.

---

पत्र नं ५६ — १५ एप्रिल १८४९

## ना द वि द्या

हिंदु लोकांमध्ये नादविद्या व तिचा शाखा गायन, वाद्य, नृत्य इत्यादिक यांस वाईट म्हणतात. याचें कारण मला दुसरें कांही दिसत नाही. परंतु या लोकांमध्ये शहाणपण नाहीसें झालें आहे. व विद्या अगदी बुडाली आहे. नाही तर नादविद्येस असे सदोष न मानते.

वास्तविक पाहिलें तर नादविद्या बहुत निर्दोष आहे. व या विद्येपासून जें सुख म्हणजे इंद्रियसुख होतें. तें ज्ञानसुखाचे जवळ जवळ आहे. विद्वान यांनी असें म्हटलें आहे की, ज्ञानसुखापुढे सर्व इंद्रियसुखें तुच्छ आहेत. तें खरें; परंतु नादविद्येचें सुख ज्ञानसुखासारखें आहे. कारण हें विकार रहित आहे. यांत दोष नाहीत. व येणेंकरून चित्ताचें समाधान, मनाचा संतोष, इंद्रियांस उल्हास आणि जिवास विश्रांती होऊन कंटाळा जातो. व पूर्वी याचा अंगिकार नारदासारखे देवऋषि, शंकरासारखें अवतारी यांणी केला होता. तस्मात् या विद्येचें वर्णन काय करावयाचें आहे? या विद्येने दया, प्रीति, भक्ति इत्यादिकांचा उत्कर्ष करतां येतो व "गायनः

पंचमो वेदः" असें व्यासांनी म्हटलें आहे. कोणी स्वर्गसुखाची प्रतिमा म्हटलें आहे. व मुसलमान लोक तर गायनवाद्येंकरून तर मृत प्राणी जिवंत झाले आहेत, असें म्हणतात व हिंदु लोक गायनाचें वर्णन करण्यांत कमी नाहींत.

भागवतांत गोष्ट आहे की, नारदास गर्व फार होता, तेव्हा तो गर्व हरण करण्याकरिता सांगितलें की, तुम्ही जाऊन एक जांबुवंत नामें अस्वल श्रीरामाचा सेवक आहे, त्यांस भेटावें. याजवरून नारद तेथे गेले. तों जांबुवंत गात बसला आहे. आणि दगड पाषाण आसमंतात भागीं विरघळून रस झाले आहेत. नारदांनी आपला वीणा ठेवला तो त्या रसांत पडला आणि गायन बंद होतांच पूर्ववत् पाषाण झाले, आणि वीणा आंत अडकला. तेव्हा जांबुवंताने नारदास सांगितलें कीं, तुम्ही गावयास बसावें आणि दगडाचें पाणी करून वीणा काढावा. तें नारदाच्याने होईना, तेव्हा तो जांबुवंतास शरण गेला अशी पुराणांत कथा आहे. अस्तु.

**गायनेंकरून निर्जीव पदार्थ द्रवतील, हें खरें म्हणवत नाही. परंतु सजीव प्राणी द्रवतात खरें.** जे क्रोधी असतात, त्यांचा क्रोध जातो. निर्दय दयाळू होतात व मांडखोर शांत होतात. हें खरें आहे. याचा अनुभव मनुष्यास आहे, असेंच नाही; परंतु इतर जनावरांसही आहे. मोर, हरणें, सर्प इत्यादि गायन ऐकतात. येविषयी गोष्टी या देशांत पुष्कळ आहेत. व तानसेन गवयी गाऊन दिवे लावी, असें म्हणतात. अशा गोष्टी चमत्कारिक या विद्येचा आहेत. व प्राचीन काळीं रावणादिक राक्षसांनी गायनें करून शिवाची प्रसन्नता केली असेंही आहे. व संस्कृत भाषेत पुष्कळ पुस्तकें याजवर आहेत. परंतु तीं सर्व आता लोकांनी बांधून ठेविलीं आहेत व जयदेवासारखे पंडित यांणी ग्रन्थ केले आहेत व कवनें केलीं आहेत.

परंतु सांप्रत काळीं हिंदु लोक म्हणतात की गायनाची विद्या मुसलमान लोकांची. परन्तु त्यांचे लक्षांत असें येत नाही की, हिंदु लोकांच्या विद्या मुसलमान शिकले आणि हिंदू लोक विसरले, म्हणून ती विद्या त्यांची

झाली असें नाही. परंतु सांप्रत काळीं दोन कारणांनें या विद्येस प्राप्त झाली आहेत. एक जे गाणार व नादविद्येत प्रवीण असतात, ते मूर्ख, व्यसनी, व भांगे असतात. लोकांस शिकवीत नाहीत. ग्रंथ पहात नाहीत. व मदोन्मत्त होऊन थोडकेसें आलें, म्हणजे स्वच्छंद होतात. आणि (दुसरें) दुर्जनांनी या विद्येचा अंगिकार केला आहे. व व्यभिचारिणी बहुधा या विद्येस लोकांस लुब्ध करून नादीं लावण्याकरिता अंगिकारितात. याजमुळे या विद्येचा हलकेपणा लोकांत झाला आहे. आणि गाणें वाजविणें म्हटलें की, लागलेच म्हणतात की अरेरे! हा छंद वाईट व हलका आहे. सारंगी हातांत घेतली किंवा मृदंग हातांत घेतला, म्हणजे साजिंदेपणा ठरतो व वीणा घेतला, म्हणजे गोसावीपणा ठरतो.

याप्रमाणे लोकांच्या मूर्ख समजुती पडल्या आहेत. परंतु जर गणितविद्या चोरटे लोक शिकले किंवा बंडवाले युद्धविद्या शिकले, तर त्या विद्या वाईट झाल्या की काय? व त्या त्याग करण्यास योग्य आहेत कीं काय? स्वर्गसुखाची प्रतिमा नादविद्या आहे, असें असतां भांगट लोक व दुष्ट स्त्रिया यांणी तिचा अंगिकार करून व चांगल्या लोकांनी त्याग करून, विद्या वाईट असें ठरविलें आहे. परंतु हा मूर्खपणा आहे. जर्मन देशांत नाद विद्या सरकारी शाळेत शिकवितात. फ्रेंच व इंग्रज म्हणतात की, संभावित गृहस्थ यांणी ही विद्या शिकल्याशिवाय त्यांची विद्या परिपूर्ण होत नाही. जसें देशाटण हा विद्याभ्यासाचा भाग आहे. तद्वत् ही विद्या आहे. व बायकांस अवश्य शिकवितात. संभावित गृहस्थांचे स्त्रियांस नाद विद्येत प्रवीणता नाही, असें आढळत नाही. अशा शहाणे लोकांच्या चाली आहेत व याप्रमाणे हिंदु लोकांच्या युगांतरीं होत्या. कारण की विराट राजाचे कन्येस गायन व नृत्य शिकविण्यास अर्जुन बृहन्नडा या वेषाने राहिला, ही कथा भारतीं प्रसिद्ध आहे. तेव्हां याविषयी संशय नाही.

परंतु आताचे हिंदु लोक फार रानटी झाले आहेत. त्यांस निर्मळ ज्ञान, सुख, याचा अनुभव नाही. व त्यांच्या स्त्रियांस ते कुत्र्याप्रमाणेही

मान देत नाहीत. मग त्यांस या रमणीय विद्या कोठून शिकविणार? नवरा म्हणतो माझी बायको कुळंबिणीपेक्षा अधिक, मी मेलों तर दूर्णे जाळून घ्यावें. व माझे पायाचें तीर्थ घ्यावें व माझी पूजा करावी. इला दुसरा देव नाही. याप्रमाणे जनावरांप्रमाणे वर्तणूक करितात. यांस सुधारावयास बहुत दिवस पाहिजेत. घरून उठून गाणें ऐकावयास कसबिणीच्या इथे बहुत लोक सांप्रत जातात. व गाण्याचे, वाद्याचे बहुत लोक इष्की म्हणवितात. यांणी जर आपल्या स्त्रियांस विद्वान केल्या, तर असे अनाचार करण्याची जरूर नाही. परंतु हें त्यांस मोठें विरुद्ध वाटतें. कारण हे लोक अगदी वेडे झाले आहेत. व त्यांस नीट गोष्ट सांगणारा देशांत एकही राहिला नाही. सर्व एका राशीचे झाले आहेत.

सर्व देशांत जितके लोक आहेत, तितके विद्वान नसतात. परन्तु कांही असतात. व त्यांचे आधाराने इतर लोक चालतात. परन्तु देशांत दोनशे चारशे तरी शहाणे व लोकांचे हितकर्ते पाहिजेत. मग बाकीचे अडाणी लोक असले, तरी चिंता नाही. परन्तु जे विद्वान आहेत त्यांस विद्वान समजून त्यांचे मार्गाने वागण्याची इतरांस बुद्धि पाहिजे. सांप्रत हिंदु लोकांमध्ये वास्तविक विद्वान कित्ती एक होत चालले आहेत. परन्तु पुष्कळ लोक यांचें सांगितलें ऐकावें, असें मानीत नाहीत. यास्तव त्या विद्वानांचा बुद्धीचा उपयोग होत नाही. परंतु मोत्यांची हेळणा कावळे करितात. त्या दृष्टांताप्रमाणे हें आहे. हल्ली जे विद्या शिकून विद्वान झाले आहेत, त्यांचे सांगितल्याप्रमाणे लोकांनी चालावें. अशी लोकांस बुद्धि येण्यास अवकाश आहे.

ही गोष्ट जा दिवशीं होईल. त्या दिवसापासून पंचवीस वर्षांत हिंदुस्थानचा रंग फिरेल. सर्व लोकांस उत्कंठा अशी झाली पाहिजे की, आम्हांमध्ये विद्वान कोण आहे ? चला त्याची बोलणीं ऐकूं, त्याचा बुद्धिवाद घेऊं; हें लोकांच्या दुर्भाग्यामुळे झालें नाही; परंतु होईल, यांत संशय नाही. परंतु हें होण्यास ब्राम्हणांचा गर्व अगदी निस्तोष गेला

पाहिजे. ते अद्याप आपले धुंदींत आहेत. आणि मूर्खपणा आपले जवळ असून, वास्तविक विद्वानांची बोलणीं ऐकत नाहीत. प्राचीन काळीं आम्हांस देव असें लोक मानीत होते, तसेंच आता मानावें, असें ते इच्छितात. परंतु आता ते लौकरच माणसांसारखे होण्याचा समय आला आहे. आता लोक अज्ञानांत नाहीत, हें त्यांणी पुरतें समजावें.

---

पत्र नं० ६५ २४ जून १८४९

## नीति-प्रशंसा

मी आपले पत्रांत ब्राम्हण जातीवर पुष्कळ हल्ला केला आहे. याजकरिता किती एक ब्राम्हणांस वाईट वाटत असेल.त्यांस मी त्यांची क्षमा मागून अशी विनंती करतों की, ब्राम्हणांचे दोषविवेचन मीं फार केलें आहे. याचें कारण आमचे लोकांत मुख्य ब्राम्हण. ते जें करतील तसे इतर वर्ततात. गाव-खेड्यांत देखील जो कुळकरणी, त्याचे पाया पडतात. म्हणून ब्राम्हणांचे सुधारणुकेस्तव मी झटतों. त्यांची सुधारणा झाली, म्हणजे सर्व हिंदु लोकांची जहाली.

त्यांचें अज्ञान पाहून मला दया येते. राग येत नाही. जें मीं लिहिलें आहे, तें सर्व त्यांचे हिताकरिता आहे. मला खात्री वाटते की, सांप्रत काळीं माझे पत्राचा अक्षरशः अर्थ करून त्यांतील आशय जाणतील असे ब्राम्हण कोणी नाहीत. कदाचित् हजारांत एक असेल. कारण कीं त्यांचें अज्ञान अतिशय आहे. बाळपणापासून जी सवय झाली, ती सवय मोठेपणीं कितीही सांगितलें तरी जात नाही; परंतु मी आशा करितों की, पुढे जे होतकरू मुलगे आहेत ते हीं पत्रें पाहून अज्ञानांतून सुटतील आणि माझे अभिप्रायाचा विचार करतील. मग त्यांस जें पसंत वाटेल, तें तीं करोत.

आजचे ब्राम्हण असे आहेत की, हें पत्र हातीं धरतांच टाकून देतील व म्हणतील हें काय ? भलतेंच लिहिलें आहे. असो, त्यांचें अज्ञान त्यांचे कामास दिवसेंदिवस येत आहे. परंतु मला वाटतें की, म्हातारे जुने ब्राम्हण आहेत ते असोत; परंतु नवीन उमेदवार यांनी आपलें अंतःकरण ज्ञानें-करून व विचारेंकरून पवित्र करावें, म्हणजे पुष्कळ फायदा होईल. मागील पत्रांत धर्मसुधारणा लिहिली आहे. ही बहुतांस भयंकर व कितीं एकांस दुर्घट वाटून कितीं एक पंडित व शास्त्री पुराणांतील वाक्यें वर्णसंकर, कली इत्यादि म्हणतील, हें मला कळत आहे; परंतु महाराज, तुम्ही विचार कराल तर हा वर्णसंकर नव्हे. आता जो आहे तो वर्णसंकर खरा. जे ब्राम्हण भडवेपणा करितात, त्यांस तुम्ही पंक्तीस घेता व नीतिमान् शूद्रास नीच मानतां, हा वर्णसंकर खरा. शास्त्राचा आधार माझे मतास पुष्कळ आहे; व तुम्ही विचार केला असतां सापडेल. वेडांत शिरूं नका. ही धर्मसुधारणा झाल्याशिवाय तुमचा बंद खुला होणार नाही.

आता जो धर्म चालला आहे, हा धर्म नव्हे; हा बेबंद, गोंधळ आहे. यांत कांही नाही. नीति नाहीशी झाली व धर्म बुडाला. मला तर धर्म कोठे दिसत नाही. म्हणून धर्माची स्थापना करण्याचा माझा यत्न आहे. व असें झालें असतां पुष्कळ नीतिवान पुरुष होतील. व जे गैरनीतीने चाल-तील, तेच भ्रष्ट म्हणावे. केवळ आचारांत जपून वागले, तर उपयोग नाही. आचार हें केवळ सोंग आहे. नीतीचें ज्ञान व्हावें, म्हणून आचार सांगितला आहे, हें तुम्हांस क्षणभर विचार केला तर कळेल, पहा. की शास्त्रांत असें लिहिलें आहे की, ग्रहणांत श्राद्ध करावें, म्हणजे बाप मोक्षास जातो. बरें, ग्रहणांत जो ब्राम्हण जेवतो, त्यास जर पाप लागतें असें आहे, तर दुसऱ्यास पापांत घालून बापास मोक्ष कसा होईल हें सांगा. एकाचें डोकें मारल्याने दुसरा जिवंत होतो काय ? तात्पर्य, शास्त्र करणाराचें मत असें दिसतें की, ग्रहणांत जेवलें तर पाप मुळींच नाही. हें त्यास ठाऊक होतें. कारण की, ग्रहण छाया पडल्यामुळे होतें, त्यांत जेवलें म्हणून पाप कशाचें ? नित्य शुक्र

पक्षांत चंद्रावर सावली असते, त्यामुळे अंगुलमात्र चंद्र कमी अधिक होतो, हेंही ग्रहणच आहे. कारण की जा कारणाने ग्रहण, त्याच कारणाने शुक्ल व कृष्णपक्षीचा अधिक-उणा चंद्र होतो. याजमुळे चांदण्यांत कोणी जेवीत नाहीत कीं काय?

तो शास्त्रकर्ता इतकें समजत होता. परंतु ग्रहणांत ब्राम्हणांस जेवावयाचे निमित्ताने त्यांस रुपये मिळवून द्यावयाचे होते. याजकरितां हा धर्म काढून दिला. वस्तुतः पाप नाही, हेंच खरें. आणि पुराणकर्त्यांनी लिहिलें आहे की, हीं पुराणें आम्हीं स्त्रिया व शूद्र इत्यादि जातींस वाचण्याकरिता केलीं आहेत. याजमुळे असें दिसतें की, इतर जातींस अज्ञानांत ठेवून ब्राम्हण जातीजवळ मात्र वास्तविक ज्ञान ठेवावें, असा त्यांचा हेतु होता. म्हणून त्यांनी पुराणांत ब्राम्हणांचें पाहिजे तसें महात्म्य व नाना प्रकारच्या वेड लावावयाच्या गोष्टी लिहिल्या आहेत. त्यांचा अर्थ लाक्षणिक समजला पाहिजे. जसा चंद्र कमी होतो, म्हणून त्यास क्षयरोग आहे, असें कवींनी वर्णन केलें आहे. व अधिक होतो म्हणून त्यास बळ अमृत आहे, असेंही लिहिलें आहे.

परंतु हें खरें नाही. केवळ कवीची कल्पना आहे. इत्यादि गोष्टी अशा असता मला चमत्कार वाटतो की, हल्ली हे मुंबईचे व इतर ठिकाणचे परभु व सोनार ब्राम्हणांत शिरण्याचा हेवा, मत्सर व उद्योग कशाला करितात? त्यापेक्षा आपण सर्व मिळोन एक होण्याचा यत्न केला, तर बरें होईल. किती एक परभू ब्राम्हण व्हावें, अशी इच्छा करितात. ते ब्राम्हणासारखें गंध लावतात व देवपूजा वाढवतात. परंतु मला तर हे मूर्ख वाटतात. इतका प्रयत्न करून ब्राम्हणांत बेऊन फायदा काय? किती एक नमस्कारासाठी भांडतात. मला वाटतें कीं, महारासदेखील नमस्कार करावा. त्यांत आहे काय? या किंचित् गोष्टीचा वाद कशास पाहिजे? परंतु ब्राम्हणांस परभांपासून पैसा काढण्याचें साधन या युक्तीने होतें. परभू ब्राम्हणांची संध्या वगैरे मुलांस शिकवितात. त्यापेक्षा एखादें सार्थ नीतीचें अगर धर्माचें पुस्तक का

शिकवीत नाहीत? ही भटांची मजुरी कशास शिकवितात? यांत काय आहे? मला तर कांही वाटत नाही.

परंतु हे दोन्ही जातींचे लोक मूर्ख आहेत. ते ब्राम्हण व्हावयास पहातात. अशी ही तऱ्हा चालली आहे. तेव्हा आता धर्मसुधारणा निघेल तर हे सर्व तंटे मिटतील. व आपला धर्म शुद्ध आणि सुंदर म्हणून पुष्कळ लोक यास साह्य करतील, यांत संशय नाही. हें कोणी तरी मनावर घेणें जरूर आहे.

---

पत्र नं० ६८ २२ जुलई १८४९

## उद्योगप्रशंसा

हिंदु लोकांची बुद्धि फारच क्षीण झाली आहे, याजमुळे ते किती एक गोष्टी विनाकारण तुच्छ मानतात. जर कोणी एखादे गृहस्थास सांगितलें की, इंग्रज लोकांमध्ये विद्या फार आहे व ते लढाईंत जय मिळवितात, याचें कारण विद्या आहे, तर तो उत्तर देईल की, कशाची विद्या? सद्दी फिरली म्हणजे असेंच होतें. प्रालब्ध अनुकूल झालें, म्हणजे विद्यावगैरे सर्व येते. व जा मनुष्यास दैव अनुकूल नाही, त्याचे ठायीं सर्व गुण असले, तरी व्यर्थ दिसतात.

भर्तृहरि वगैरे कवि यांणी फक्त प्रारब्ध वर्णिलें व उद्योगाची प्रशंसा सोडून दिली. येणेकरून लोकांमध्ये हें मत आता असें प्रबळ झालें आहे की, फक्त दैवावर भरंवसा ठेऊन लोक बसतात. क्षणभर देखील विद्या काय आहे, याचा विचार करीत नाहीत. रामाने रावण जिंकिला तेव्हा वानरांनी राक्षसास मारिलें इत्यादि दृष्टांत देतात. आणि जी जी सुधारणुकीची गोष्ट तिजवर भरवसा ठेवीत नाहीत. जर कोणी ग्रंथ किंवा वर्तमानपत्र हातीं

दिलें तर म्हणतात की, यांत काय आहे ? याने काय ज्ञान वाढणार आहे ? आजपर्यंत हेंच कोठे होतें ? इत्यादि भाषणांनी उद्योग व्यर्थ मानितात. हें मोठें दुर्दैव आहे. ईश्वरइच्छेने हे लोक असेच नाहीसे होणार असले, तर कोणाचा काय उपाय आहे ? परंतु मला कठीण दिसतें व या लोकांचा परिणाम भयंकर आहे, असें भासतें. कालेंकरून हे सर्व क्रिस्तीयन धर्मांत जातील. किंवा स्वधर्मास जाणून यासच सुधारून त्याची स्थापना करतील, हें समजत नाही.

इंग्रज इकडे राज्य करितात, ते आताच आम्हांस गुलामांप्रमाणे मानतात. व आफ्रिकेंत लोक आहेत ते इतके मूर्ख आहेत की, त्यांच्याने राज्य किंवा एकत्रपणा कांही होत नाही. याजमुळे जो पाहिजे तो त्यास धरून विकावयास रानच्या जनावराप्रमाणे देशांतरीं नेतो. तद्वत् या हिंदु लोकांची स्थिति होईल. कांही दिवसांनी इंग्रज येथे येऊन घरेंदारें करून राहूं लागतील. म्हणजे बहुतकरून आमचे रोजगार गेलेच आहेत; व जे राहिलेले आहेत, ते समूळ जातील; कारण की ते लोक शहाणे आहेत. मग आम्हांस दर एक इंग्रजांच्या घरीं गुलामगिरीचीं कामें करावीं लागतील. आणि सर्व मोठेपणा व धनीपणा इंग्रजांकडे जाईल. असें होतां होतां उत्तर अमेरिकेंत इंग्रज लोक राहिले आणि चारपांचशे वर्षांत तेथील लोक सर्व मरून नाहीसे झाले. व सर्व इंग्रजांचीच वस्ती झाली, तसा हा देश केवळ इंग्रजांचे वस्तीचा होईल कीं काय ? असा प्रकारचे प्रश्न माझे अंतःकरणांत येतात. व यांची विवंचना करितां करितां ईश्वरइच्छा काय आहे तें समजत नाही.

म्हणून या देशांत जे राहिलेले, सुधारलेले लोक आहेत, त्यांस मात्र मी पुसतों की, तुम्हांसही जर सर्व गोष्टी भयंकर दिसतात, तर तुम्ही स्वस्थ कसे बसलेत ? लौकिक रीतींत, चालींत, धर्मांत सुधारणा करावयास झटावें तर सर्व लोक आपल्यास वाईट म्हणतील, म्हणून तुम्हांस भय वाटतें काय ? परंतु मला वाटतें की, शंभर मूर्खांनी वाईट म्हटलें तर आणि

## उद्योग-प्रशंसा

एका शहाण्याने चांगलें म्हटलें तर तें चांगलें म्हणणें अधिक; याजकरिता लोकापवाद मूर्खांचा आपण मानूं नये. हे लोक अतिशय वेडे आहेत; आणि यांजवर भ्रांति पडली आहे. येणेकरून जसा मद्यपी मनुष्य मस्त असतो व त्यास कांही सुचत नाही, तसे हे लोक भुलले आहेत, व यांस काळाने घेरलें आहे, म्हणून असा आळस करितात.

मीं पुष्कळ सामर्थ्यवान पुरुषांस विचारलें की, तुम्ही याविषयी कांही उद्योग करतां काय? तर ते म्हणतात की, ईश्वरइच्छा असेल तसें घडेल; आपल्याच्याने काय होणार आहे? रवी फिरली म्हणजे कांही उपाय चालत नाही. जसें होणार तसें होऊं, आपला आपण विचार पहावा. इत्यादि पोरांसारखीं मूर्खपणाचीं भाषणें करतात. आणखी जर त्यांस म्हटलें की, शिखांचा पराभव इंग्रजांनी विद्येने केला; तर म्हणतात कांही नाही. सर्व नशिबाने केलें. याप्रमाणे नशिबावर त्यांची श्रद्धा आहे. त्यांस एखादें कारण दाखविलें तर त्याचा विचार करीत नाहीत. आणि यांत काय आहे; असें म्हणतात. असा या लोकांचा चमत्कार आहे.

विद्या म्हणजे काय, हें कांही एक त्यांस ठाऊक नाही. व लष्कराचें, कवाईतीचें फळ काय हें माहीत नाही. ज्यांनी याचा विचार मुळीच केला नाही, ते देखील धिःकाराने म्हणतात की, यांत काय आहे? कशाची कवाईत? व कशाचें शहाणपण? विदुराचें शहाणपण थोडें होतें काय? पण काय झालें? अशीं उत्तरें हर एकाविषयी अर्थ न जाणतां धीटपणाने देतात. कारण त्यांची श्रद्धा दैवावर आहे. त्यांस असें वाटतें की, आमच्या जा पूर्वापार समजुती आल्या आहेत त्या खऱ्या. याजमुळे हे लोक उद्योग करीत नाहीत. यास्तव कोणीतरी या लोकांची समजूत व्हावयाजोगा ग्रंथ लिहून प्रगट करावा की, दैव म्हणजे काय? मुळी तो पदार्थ नाही. नांव मात्र आहे. व आळशी लोकांस हा फार प्रिय आहे. परंतु वास्तविक पाहिलें तर ईश्वरइच्छा अशी आहे की, सर्वांनी उद्योग करावा. रामाने लंकेंत जाण्याचा उद्योग केला की नाही? मग वानराच्या हातून सिद्धि होऊं द्या; परंतु उद्योग

करणें अवश्य आहे. मुळीच उद्योग सोडून राम अयोध्येंत, बसला असता तर रावणास मारूं शकता काय ?

ईश्वरइच्छा खरी, परंतु असें तुम्ही त्यास प्रार्थाल तशी तुम्हांस सिद्धि होईल. तुम्ही संसारांत आहां, परंतु उद्योग केला तर मोक्षास जाल की नाही ? ईश्वरइच्छा तुमचे भावनेप्रमाणे व प्रार्थनेप्रमाणे आहे. ईश्वराची प्रार्थना करणें, याचाच भाग उद्योग करणें आहे. उद्योग न करतां कोणी प्रार्थील तर ईश्वराचे क्षोभास मात्र तो पात्र होईल. याजकरिता तुम्ही दैवावर भार ठेवूं नका. दैव पांगळें आहे.

---

पत्र नं० ७९ २१ आक्टोबर १८४९

## द या

श्रीमंतांचा व गरिबांचा या जगांत दूरचा संबंध आहे, तरी परलोकांत फार जवळचा संबंध आहे. याकरिता दया हा आपला एकमेकांचा प्रथम धर्म आहे. सर्व धर्मांचें सार दया आहे.

गरीब हा श्रीमंतांचे जुलमाने होतो. कांही जन्मतः कोणी गरीब नसतो. याकरिता सर्वांवर दया करावी हा उत्तम मार्ग. सर्वदा न्याय दयेच्या अनुषंगाने करावा. आणि असें मनांत वागवावें की, आम्ही मरणानंतर ईश्वरापाशी दया मागूं. त्याचे दयेवाचून आमचा परिणाम लागणार नाही. म्हणून जर आपण दुसऱ्यापाशी दया मागण्यास सिद्ध आहों, तर तसेंच आपण करून दाखविलें पाहिजे. तरच आपलें मागणें पसंत होईल. सर्व जीवजंतु ज्ञात-अज्ञात हे दयेस पात्र आहेत. परन्तु हिंदु धर्मांत यज्ञादिक निर्दय कर्मे आहेत, तीं ईश्वरापासून झालीं असतील, असें मला वाटत नाही. दुसऱ्या जनावरांवर आपलें पाप ठेवून त्याजला मारावें, म्हणजे त्याचे दुःखाने आपलें पाप जाईल; ही गोष्ट

विचारास विरुद्ध आहे. परन्तु याप्रमाणे चाल बहुत दिवसांपासून आहे.

जा काळीं ईश्वराने माणसें निर्माण केलीं, त्या काळीं तीं अमक्याच कारणांकरिता केलीं, असें पक्कें समजत नाही. परन्तु अमुक रीतीने चालावें व अमुक रीतीने न चालावें, हें ईश्वराने प्रत्येक माणसाचे बुद्धींत प्रेरिलें आहे, हें खचित आहे. ईश्वराने आपली बडाई वाढवावी, म्हणून माणसें केलीं असें नाही. ईश्वरास माणसांच्या कीर्तनाने अधिक थोरपणा येतो, हें मिथ्या आहे. तत्रापि मनुष्यांनी जो आपला निर्माणकर्ता असेल, त्याची सेवा करावी, हाच धर्म योग्य आहे. व नीतीने वागावें म्हणजे सुख होतें. परन्तु यज्ञ करण्यास सांगितलें असेल, असें वाटत नाही. यज्ञ करणें हें अनुचित व अविचारी कर्म आहे. हें बहुधा मनुष्यांनी योजिलें असावें. प्रथम मला वाटतें, तें ईश्वराने इतकाच धर्म लावून दिला असेल की, यांनी चांगली वर्तणूक करावी आणि ईश्वरावर भार ठेवून वागावें, एवढाच धर्म होता.

हें अशावरून वाटतें की, इतर धर्म सर्व माणसांस लागू पडत नाहीत. जर इंग्रजांचा धर्म खरा म्हणावा तर अलीकडे उत्पन्न झाला. तेव्हा त्याचे मागे व जा देशांत तो धर्म माहीत पडला नाही, त्या देशांतील माणसें नरकांत गेलीं कीं काय ? हें बरोबर नाही. तशीच मुसलमानांचे धर्माची अवस्था आहे. ईश्वरप्रेरित धर्म सर्वांस सारखा कळावा. जशी त्याणे लोकांस खाण्यापिण्याची सोय करून दिली, तद्वत धर्माचीही तयारी केली असेल व जर जनावरांचे यज्ञ यांस धर्म म्हणावा, तर त्याविषयींही ऐक्यता होणार नाही व जनावरें वेगळालीं प्रत्येक देशांत आहेत. तेव्हा त्यांपैकी कोणत्या जनावराचा रक्ताने ईश्वर संतुष्ट होतो, तेंही बरोबर कळत नाही. व यज्ञ करतां करतां माणसें माणसांचा यज्ञ करूं लागलीं व जर इतर जनावरांचा यज्ञ देवास पाहिजे, तर मग माणूस, सुंदर जनावर, याचा यज्ञ कां नको ? तस्मात् यज्ञाचा धर्म अगदी खोटा आहे. आता हा धर्म खोटा आहे, असें दिसतें.

याजवर कोणी अशी तक्रार करतील की, मरण गेल्याने देव पापें

सोडतो असें जर आहे, तर एक दिवस ईश्वरास शरण गेलें, म्हणजे पापमुक्त होऊं. तर त्याचें उत्तर असें आहे की, ईश्वर न्यायी आहे व दयाळू आहे. हे दोन्ही गुण ईश्वरास आहेत. म्हणून तो पापाचें शासन करील हेंही उचित आहे, परन्तु शासन करण्यास तो स्वतः अधिकारी आहे, असें म्हणावें तर न्यायास विपरीत होतें; परंतु तसें नाही. न्याय व दया होते, याचा पर्याय असा आहे की, ईश्वराने आपल्यास प्रतिबंधकारक कांही नेम केला नाही. तेव्हा पापास दंड हें उचित. परन्तु जे पापी शरण येतील, देवाचें भय ठेवितील, व शरण आल्यापासून पुनरपि पाप करणार नाहीत, ते पापी मुक्त होतात. एकीकडे शरण जावें आणि दुसरीकडे पाप करावें, हा अर्थ त्याचा नाही.

यास आधार गीतेंत असा आहे " मामेकं शरणं व्रज; " " मला शरण ये, म्हणजे पापमुक्त होशील आणि तरशील " दुसरे ठिकाणीं असें सांगितलें आहे की, " ददामि बुद्धियोगं-" म्हणजे शरण येतो, तो भावबळाने चांगला होतो. पुनरपि पाप करीत नाही. तेव्हा ईश्वरास जो प्राणी शरण गेला, त्यास अशी बुद्धि झाली, म्हणजे तो प्रसाद असें समजावें. व त्या प्रसादाचा दाखला असा आहे की, त्याने पाप सोडून द्यावें म्हणजे तो शरण गेला हें उचित, व त्याचा भाव बसला हें उचित; आणि ईश्वराची कृपा त्याचे ठिकाणीं राहिली हें उचित. नाही तर हातांत माळा घेऊन लबाड लोक भजन करितात आणि खोटें बोलतात व पापकर्म सोडीत नाहीत, म्हणून ते शरण झाले असें आम्ही मानीत नाही.

जगांत नाना प्रकारच्या युक्ती काढल्या आहेत; परन्तु मीं वरती धर्मांचें मूळ लिहिलें आहे, याप्रमाणे एक साधूच्या मुखांतून मीं ऐकिलें आहे. परंतु गीतेचीं वाक्यें त्याने अशीं जुळलीं तीं ऐकून मी समजलों, धर्मांचें तात्पर्य एकच आहे. खिस्तीयन म्हणतात की, मनुष्यामध्ये आणि ईश्वरामध्ये एक जामीन रदबदलीस पाहिजे. असेंच मुसलमानांचे धर्मांत आहे, व तो सर्व पापें आपले शिरावर घेतो, असें मत आहे; पण मला वाटतें की,

मध्यस्थाची योजना धर्म लावून देणारांनी ईश्वरावर भाव बसण्याकरिता अशा मूर्ति हिंदु लोकांनी केल्या, तशी त्यांची जामिनाची व मध्यस्थाची युक्ति काढली आहे. परन्तु मुख्य तात्पर्य हेंच आहे की, ईश्वर न्यायी आहे; तथापि दयाळू आहे व शरणागतांस रक्षितो.

जर एखाद्याने असा नेम केला की, मी जितके चोर आढळतील तितक्यांस मारीन; परन्तु जर कोणी चोर मला शरण येऊन वचन देईल की, पुनः चोरी करणार नाहीं, आजपर्यंत अज्ञानाने झालें तें क्षमा करा, मी पुन्हा करणार नाहीं; तर त्यास माफी देऊन जे चोर दांडगे असतील त्यांस मात्र मारीन, तर तो पुरुष न्यायी आणि दयाळू म्हणावा किंवा नाही? त्याने चोरास सुटण्याकरिता एक मध्ये संधि ठेवली म्हणून त्याचे न्यायास विरुद्धता येत नाही. ईश्वर तर दयाळू आहे. त्याणे प्रत्येक जन्मांत वारंवार संधि ठेविली आहे. जो जो मनुष्य जन्मास येईल त्यास ती संधि आहेच. तरणोपायास मनुष्यजन्म आहे. या जन्मीं न केला तर पुनः ईश्वर जन्मास घालील तेव्हां-तरी करावा. अशा त्याने दयाळूपणाने वाटा ठेवल्या आहेत. म्हणून त्याचे न्यायास विरुद्धता येत नाही. इंग्रजांचे मताप्रमाणे एकच संधि आहे. पण हें बरोबर नाही.

अशक्त जीवावर दया करणें हा मुख्य ईश्वरभजनाचा मार्ग आहे. दयेविना धर्माचें व कर्माचें सार्थक नाही. परन्तु किती एक लोकांस आम्ही या जगांत मरणार, याचें विस्मरण होतें व मग ते आपणांस आणि दुसऱ्यास एक नजरेने पहात नाहीत. जो घोड्यावरून जातो, त्यास पायांनी कोण चालतो हें दिसत नाही. आणि आमचे लोकांस दया फार कमी आहे. मूर्खपणास दया समजतात, म्हणजे अपराध्यास सोडणें ही दया नाही. न्यायास विरुद्ध न येतां सोडणें ही मात्र दया. असेंच दया म्हणजे अज्ञानास ज्ञान द्यावें; गरिबास द्रव्य, रोग्यास औषध, निराधारास व भुकेल्यास अन्न इत्यादि स्वभावाने द्यावें व त्यांत संतोष मानावा. गरीबास पहातांच कळवळा यावा, असे सत्पुरुष थोडे आहेत. परन्तु जन्माचा हाच उपयोग आहे.

---

# ज्ञान हाच पराक्रम

सांप्रत काळीं हिंदु लोक गरीब आहेत व अज्ञानी आहेत, एतद्विषयी मी सिद्धांत लिहितों की, संपदा आणि ज्ञान हीं दोन्ही, जोंपर्यंत यांस आपली स्थिति कळली नाही, तोंपर्यंत प्राप्त होणार नाहीत. जरी हा देश उत्तम प्रकारचें उत्पन्न करणारा, व धनधान्यसमृद्धिकर्ता आहे, तरी या लोकांस त्याचें फळ नाही.

आता पृथ्वीवर दुसरे अनेक देश आहेत. त्यांची अवस्थाही फार वाईट आहे. रयत लोक इकडल्यापेक्षा तेथे दरिद्री आहेत; परंतु हें उदाहरण या देशास उपयोगीं नाही. कारण की, हा देश पूर्वी कसा होता व हल्ली कसा आहे, तें पाहून विचार केला पाहिजे. किती एक लोक असे आहेत की, मुसलमानांचे राज्यास नांव ठेवीत नाहीत; परंतु इंग्रजांचें राज्य विशेषें करून दरिद्रास कारण समजतात. व त्यांस कांही नवीन शहाणपणाची युक्ति सांगितली, तर ऐकत नाहीत आणि म्हणतात की, आम्हांस आजपर्यंत या युक्ति कोठे होत्या ? आजपर्यंत आम्ही दुःखी नव्हतों; आता मात्र झालों, ते इंग्रजांमुळे झालों. वास्तव या युक्तींने आमचें दरिद्र जाणार नाही, इंग्रज आणीक तर मात्र जाईल. असें समजून युक्तीस बहुत लोक अगदी मानीत नाहीत. फक्त हें राज्य वाईट, असें म्हणून संध्याकाळपासून उजाडेपर्यंत, आणि उजाडल्यापासून सारा दिवसभर जप करितात.

या प्रकारचे लोक आम्ही नित्य पहातों. तेव्हा अशा लोकांची समजूत पाडणें हें सर्वांहून अवघड आहे. परंतु पहा की, असा विचार करीत बसणें मूर्खपणाचें आहे. उद्योगास झटणें हा शहाणपणा आहे. दरिद्र आहे खरें, व तें पदोपदीं वृद्धिंगत होत चाललें आहे. द्रव्याचें साधन कमी होत चाललें आहे; परंतु अशा जपाने उपाय होणार नाही. जर विद्या व ज्ञान येणे-

करून आपलें दरिद्र कमी केलें, तरच होईल. ज्ञान जेथे आहे, तेथे सर्व पराक्रम आहे. परंतु हिंदु लोकांमध्ये एकमत असेल, तर या गोष्टी घडतील. आपलेपासून आपली कंठाळ एखादा घेऊन गेला, तर जाग्यावर बसून शिव्या दिल्या तर कंठाळ येईल कीं काय ? यास्तव जे नेणारे आहेत, तें परत देण्यास अनुकूल करण्याचे जे प्रयत्न असतील, ते करावे. ते तरी शहाणपणाखेरीज कसे सापडतील ? यास्तव शहाणपण मुख्य पाहिजे. त्याचे योगाने दरिद्र कमी होईल.

या देशांतील लोकांनी विलायतेस जावें, तेथे वस्ती करावी, विद्या शिकावी, जे श्रीमान् आहेत, त्यांणी या कामांत द्रव्य खर्चावें, तिकडील ज्ञानाची वृद्धि करावी. तिकडील कलाकौशल्य इकडे आणावें; आपल्या दुष्ट चाली सोडाव्या, हेंच शहाणपण आहे. या शहाणपणाने या लोकांस समर्थता येईल. आणि समर्थतेनंतर दरिद्र जाईल. मुख्य ज्ञानापासून सर्व पराक्रम आहेत. कधी कधी ज्ञानाबरोबर लागलेच पराक्रम दृष्टोत्पत्तीस येत नाहीत. कारण की, किती एक मूर्ख असून, अधिकार पावतात, तेव्हा त्यांस अधिकार कसा मिळाला ? हा प्रश्न बहुतेक हिंदु लोक करितात; परंतु हा केवळ पोरकट प्रश्न आहे. पराक्रमाची रीति अशी आहे, की, जो कोणी घरांत प्रमुख शहाणा असतो, तो बहुत द्रव्य संपादन करतो. नंतर त्याचे विभाग पश्चात् किंवा केव्हा तरी होतात, तेव्हा त्यांतील एक विभाग अयोग्य पुरुषाच्या हातीं लागतो, म्हणून कोणी जर असें म्हटलें की, हें सर्व मूर्खपणाने संपादन केलें आहे, तर ही गोष्ट सत्य नाही.

कारण की, वाटणींत ही चूक आहे; परंतु संपादनांत मूर्खपणा नाही. मिळविणाराने शहाणपणानेच मिळविलें आहे. तसें इंग्रज लोकांनी सर्वांनीच पराक्रम केला असें नाही किंवा सर्व शहाणे आहेत, असेंही नाही; परंतु त्यांच्यांतून जे शहाणे निघाले, त्यांणी पुढारी होऊन कवाईत व युद्धविद्या काढिली आणि पुढे हिंदुस्थानांत आले. त्यांत जे शहाणें पुरुष एलफिन्स्तन-साहेबाप्रमाणे किंवा हेस्टिंगसाहेबाप्रमाणे झाले, त्यांनी पराक्रम केला,

आणि जातेसमयीं आपले लोकांचे हातीं अधिकार दिला, आणि सांगितलें की, तुम्ही आता याची वहिवाट करा. त्या वहिवाटीवर कोर्ट डैरेक्टर व गवरनरादिक आहेत. ते त्या पराक्रमाचे फलाचे लोकांस हिस्से देत आहेत. कोणास जडज, कोणास कलेक्टर नेमतात. त्यांनी एखादा हिस्सा भिडेने मूर्खांस दिला, म्हणून मूर्खपणाने हा पराक्रम मिळविला, असें सिद्ध होत नाही. याजकरिता ही समजूत आमचे लोकांची मुख्य पडली पाहिजे. शहाणपणाशिवाय कांही पराक्रम नाही.

यास्तव हिंदुस्थानांत असे कोणी लोक प्रमुख होऊन त्यांणी सर्व आपले लोकांस बळवान व शहाणे करून ठेविले पाहिजेत. त्यांस नवीन द्रव्योत्पत्तीचे मार्ग दाखविले पाहिजेत. इंग्रजांनी राज्य बलात्काराने घेतलें, असें असलें तर असो; परन्तु व्यापार तर बलात्काराने घेतला नाही ? त्यांतच हे लोक का शहाणे होत नाहीत ? इकडे कांच करतां येईल. व तारवें करतां येतील. लोखंडाचा रस करतां येईल. भूमींतला कोळसा सापडेल. कापड करितां येईल. इतक्या गोष्टी समजून आल्या, म्हणजे किती कार्य झालें ? व हे लोक किती बलवान् होतील ? याप्रमाणे प्रथम असेंच होऊं द्या की, सर्व व्यापाराचा माल इकडेच व्हावा. विलायती नको. इंग्रजांस इकडील कच्चा माल खरेदी केल्याशिवाय निर्वाह नाही. यास्तव अशी गोष्ट केल्यानंतर राज्य मात्र त्यांचे हातीं राहील. राहिलें तर काय चिंता आहे ? जो पैसा ते तिकडे नेतील, तो आपण जिन्नस देऊन खरेदी करून परत आणूं; परंतु या गोष्टीस शहाणपण असून, सर्व लोकांचें काम होईवर घेणारे पाहिजेत. असे लोकांचा फार तोटा आहे.

---

# नीति – प्रशंसा

आमचे लोकांची सुधारणा व्हावयास मुख्य काय पाहिजे, याचा विचार केला असतां असें दिसतें की, मुख्य त्यांस विद्या पाहिजेत. विद्या कोणत्या म्हणाल तर हल्ली जा विद्या सत्यप्रतिपादक व वास्तविक जे व्यवहार आणि राज्यनीति यांचा दर्शक आहेत, त्या विद्या प्रगट झाल्या पाहिजेत.

पूर्वीच्या विद्या जा संस्कृतद्वारा येतात, त्या उपयोगी नाहीत. कारण त्यांत असत्य गोष्टी फार आहेत व मूर्खपणाच्या समजुती फार आहेत. त्या विद्या प्राचीन काळच्या लोकांच्या, इतकेंच जाणून त्या आता एकीकडेच ठेवून दिल्या पाहिजेत व नूतन जा कळा, शिल्प इत्यादि निघाल्या आहेत, त्या ग्रहण केल्या पाहिजेत. पूर्वीच्या चुकांनी ज्या भरलेल्या विद्या आहेत, त्या उपयोगी नाहीत. लहान मुलांस अठराही पुराणें पढविलीं, तरी त्यांस काय ज्ञान येईल बरें ? याचा विचार पहा; त्यांतील असारसिद्धान्त तेही आता दाखवितों.

क्षारइक्षुसुरासर्पिदधिक्षीरजलार्णवः ॥

हें सागराचें ज्ञान होईल. स्त्रियांचे गुण कसे आहेत, हें वृद्ध चाणक्यांत दुसरे अध्यायांत एका श्लोकांत दाखविलें आहे की—

" अनृतं साहसं माया, मूर्खत्वमतिलोभता
अशौचत्वं निर्दयत्वं स्त्रीणां दोषाः स्वभावजाः "

हें तो समजेल. आणखी,

" विप्रपादोदकं तीर्थं जठरे धारयाम्यहम् "

हें समजेल आणि,

"यथानयंति रागास्ते न गंगा न सरस्वती" म्हणजे गाईल तो

मोक्षास जाईल, हें समजेल इत्यादिक अज्ञानभरित वाक्यांचा संग्रह होऊन तेणेंकरून मूढमति मात्र होईल. यास्तव या प्राचीन काळच्या विद्या कांहीं उपयोगी नाहीत. या विद्या जितक्या वाढतील तितकें अज्ञान दृढ होईल. आणि हा देश कधी सुधारणार नाही.

याप्रमाणेच शास्त्रें आहेत. व्याकरणशास्त्रांत शब्द हाच ईश्वर असें प्रतिपादन आहे. मीमांसांत वेद हाच ईश्वर असें प्रतिपादन आहे. धर्मशास्त्रांत यज्ञादिक खटपट केली म्हणजे मोक्ष होतो. बापास पिंड दिला म्हणजे मोक्ष होतो, पुत्र असला म्हणजे २१ पिढ्या स्वर्गास जातात, इत्यादिक प्रतिपादन केलें आहे. तसेंच दर एक पुराणांत देवता, विशेष उपासना लिहिल्या आहेत. त्यांत तंत्रें वगैरे आहेत. त्यांत तर अतिशय मूर्ख मतें प्रतिपादन केलीं आहेत. तशांत हीं शास्त्रें व पुराणें प्राचीन काळचीं ज्ञानें आहेत, इतक्याकरिता पढावीं, परंतु त्याप्रमाणे व्यवहारांत वर्तणूक केली, तर अशुद्ध होईल, यांत संशय नाही. यास्तव या पढण्याचा संक्षेप होऊन वास्तविक विद्या वृद्धिंगत झाल्या पाहिजेत, असें लिहिलें म्हणून धर्मविरुद्ध होत नाही.

हिंदु लोकांचा धर्म केवळ समुद्राचे वर्णनांत नाही व स्त्रियांचे वर्णनांतही नाही. धर्म हा ईश्वराचें वर्णन आहे. त्यांत दुसरे अधर्म मिश्र झाले आहेत. ते मात्र जातील व केवळ भक्तिज्ञान हे धर्म रहातील. कर्ममार्ग कमी होईल, व मूर्ख समजुती कमी होतील, व वास्तविक धर्म लोकांत प्रकट होईल. ईश्वरभक्तीचा भाग राहून बाकीचा भाग सुधारेल. या सर्व समजुतींसच धर्म म्हणणारे आहेत. ते मूर्ख व या पृथ्वीचें वगैरे ज्ञानाविषयी शास्त्राविरुद्ध लिहिलें तर धर्मविरुद्ध होत नाही. परंतु बहुत लोकांस असें वाटत नाही. याचें कारण अज्ञान आहे. व या प्राचीन ग्रंथकारांनी व्यवहाराचीं व धर्माचीं पुस्तकें वेगळालीं लिहिलीं नाहीत, म्हणून व्यवहाराचा व धर्माचा भेद राहिला नाही. अस्तु. हा भेद आता लोकांस समजेल. शास्त्राचें प्रमेय लोक समजत नाहीत. शास्त्री, पंडित

अर्थांचा अनर्थ करितात. व कांही कांही गोष्टी ज्या आहेत, त्यांचा यथार्थ अर्थ समजत नाहीत. आता पहा की एका ठिकाणीं पुराणांत असें लिहिलें आहे की—

विप्रौघदर्शनात् क्षिप्रं क्षीयंते पापराशयः।
वंदनान्मंगलावाप्तिरर्चनादच्युतं पदम् ॥१॥
आधिव्याधिहरं नृणां मृत्युदारिद्र्यनाशनम्।
श्रीपुष्टिः कीर्तिदं वंदे विप्रश्रीपादपंकजम् ॥२॥
सागरे सर्वतीर्थानि पदे विप्रस्य दक्षिणे ॥३॥

याप्रमाणे ब्राम्हणांचें वर्णन केलें आहे, तें खरें समजून लोक ब्राम्हणांच्या पायांचें तीर्थ पितात. सदावर्तें ब्राम्हणांकरिताच घालतात, ब्राम्हणांची पूजा केली, तर मोक्ष होतो, असें समजतात. व यास प्रमाण पुराणांचें दाखवितात की, प्राचीन राजे व श्रीकृष्णदेखील ब्राम्हणांचीं उष्टीं काढीत होते. याप्रमाणे ब्राम्हणांस चढवून दिले आहेत. तेव्हा अशा गोष्टींवर किती विश्वास ठेवावा, याचें प्रमाण लोकांस समजत नाहीं. व पुराणिक आणि हरिदास असाच उपदेश करून लोकांस वेड लावितात. याचा विचार लोकांनी करावा. ब्राम्हण हे मनुष्य. यांचे पायांचें पूजन केलें म्हणजे, मोक्ष कसा होईल ? हें विलक्षण मत आहे.

याप्रमाणे लक्षावधि गोष्टी आहेत. याचप्रमाणे लोक क्षुल्लक धर्म व महान् धर्म यांचा भेद जाणत नाहीत. महान् व परम धर्म असे की, सत्य बोलणें, दया करणें, क्रोध न करणें, शांति धरणें, चोरी, अभिलाषा न करणें, व्यभिचार न करणें इत्यादि नीतीचे धर्म. या विषयी आभिमान सोडून क्षुल्लक धर्म सांगतात. ते असे की, तुम्ही तुळशी वहाव्या, बेल वहावा, चंदनाचीं खोडें झिजवावीं, वाती जाळाव्या, काळे वस्त्राने विटाळ होतो; काडी मोडली म्हणजे ब्राम्हणहत्या होते, शंखोदक घेतलें म्हणजे पाप जातें, वाती तुपांत घालाव्या, डबींत मंगळसूत्र द्यावें. सारांश, इत्यादि मूर्खपणाच्या गोष्टींस धर्म असें माझ्याने म्हणवत नाही. या विषयी लोकांस वेड

लावून हे करवितात; परंतु परम धर्म कोणास सांगत नाहीत.

पहा की, कामदार मोठाले असतात; त्यांस कोणी असें सांगत नाही की, तुम्ही लाच खाऊं नका, खरें काम करा, लबाड बोलूं नका. हें सांगावयाचें सोडून, त्यांचे पूजा करावयाचें ढोंग, देवपूजेची भांडीं, ढोल व देव्हारे वाढवितात. आणि त्यांस दुर्नीतीचे मार्ग शिकवितात. ब्राम्हणांचीं मतें अशीं आहेत की, चोऱ्या केल्या, तरी चिंता नाही. ब्राम्हणांस भोजनें घातलीं, म्हणजे मग त्याचें पाप नाही. किती एक लोक गळ्यांत शाळीग्राम बांधतात व खांद्यावर तुळशीचीं झाडें घेतात, आणि पंढरपुरची यात्रा करितात. परंतु हे लोक अशा कर्मांने तरतील काय ? जो मनुष्य जन्मांत लोकांचे कल्याणाची गोष्ट मनांत आणीत नाही, दया करीत नाही व ईश्वराचें भजन, पूजन ज्ञानाने करीत नाही, तो शाळीग्राम दगड गळ्यांत बांधून ईश्वरापाशीं कसा जाईल ? तसेंच, जा स्त्रीने व्यभिचारकर्म केलें, तिणे तांदूळ निवडून लाखोल्या वाहिल्या व पुष्कळ वायनें दिलीं, तर ईश्वरास ती प्रिय होईल काय ? परंतु ब्राम्हण आळशी यांस पैसा मिळाला पाहिजे, म्हणून ते नाना प्रकारचीं वेडें लोकांस लावून पैसा काढितात.

तसेंच शास्त्री, पुराणिक हे लोकांस अनर्थ सांगून भ्रष्ट करितात. हें सर्व पोटाकरिता आहे व हें माझेंच मत आहे, असें नाही. पूर्वी तुकाराम इत्यादि साधू होते. त्यांणीही ब्राम्हणांची लबाडी जाणून अभंग केले आहेत की—

पोटासाठी केलें ढोंग, तेथे कैचा पांडुरंग ? ।
द्रव्यलोभाचें कीर्तन, तेथे कैचा नारायण ? ॥

इत्यादिक बहुत साधूंनी ब्राम्हणांच्या लबाडीविषयी वर्णन केलें. ज्ञानेश्वर म्हणतात की—

जपतपक्रियाधर्म, घाउगाची व्यर्थ नेम ।

तसेंच रामदास म्हणतात की—

नको कंठ शोषूं बहू वेदपाठीं,
नको तूं पडूं साधनांचे कपाटीं ।

## नीतिप्रशंसा

तेव्हा याजवरून असें सिद्ध होतें की, हे किरकोळ नेमधर्म जे आहेत, त्यांत कांही नाही; हे सर्व व्यर्थ आहेत. ईश्वराचें मनाने भजन, पूजन करावें व मन शुद्ध ठेवावें हाच धर्म. स्नान केलें नाही, तर दुःख वाटूं नये. आणि लबाड बोललें तर दुःख वाटावें. परंतु ही भावना आमचे लोकांची नाही. हे लोक आचाराकरिता प्राण देतात आणि विचार मुळीच करीत नाहीत. भस्म लावलें म्हणजे शुद्धि होते, असें समजतात. परंतु पन्नास वेळ भस्म लावलें व दोनशे वेळ अंग धुतलें तर मनाचे मळ जातील काय ?

ईश्वर शरिरास पहात नाही; मनास पहातो. मुख्य मन शुद्ध पाहिजे; परंतु हल्लीचे ब्राम्हण पैसा काढण्याकरिता हें सांगत नाहीत. फक्त आचार जेणेंकरून पैसा मिळावयाचा, तेच सांगतात. सर्व धर्म आता लोकांच्या पैशावर आला आहे, पैसा दिला म्हणजे पाप जातें, प्रायश्चित्त होतें, ईश्वर प्रसन्न होतो, असें ब्राम्हण सांगतात; याजकरिता हे असें सांगणारे सर्व मूर्ख आहेत. यांजवर भरवसा ठेऊं नये. धर्म कोणता, याचा विचार करावा, केवळ क्षुल्लक धर्मावर भरवसा ठेऊं नये. त्यांत कांही नाही; परंतु जर कोणी शास्त्राचे प्रमेय न पहातील व मूर्खपणाने भलतेच अर्थ काढतील आणि ब्राम्हण लोकांच्या बुद्धी ऐकतील तर त्याचा परिणाम लागणार नाही. आजपर्यंत ही दशा ब्राम्हणांच्या बुद्धीने झाली आहे. पंडित व शास्त्री हे मूर्ख आहेत. त्यांस अर्थ नीट करतां येत नाही. ते फक्त मूर्खपणा वाढवितात व लोकांस वेडे करितात. वास्तव यांत कांही खऱ्या गोष्टी नाहीत; केवळ निर्फळ आहेत.

# भिकारी

आमचे लोकांत सोवळ्या ओवळ्यामुळे अनेक अडचणी पडल्या आहेत. जर ब्राम्हणास एका गावाहून उठून दुसऱ्या गावास जावयाचें आहे, तर किती खटपट केली पाहिजे की, बरोबर भांडीं व वस्त्रें घेतलीं पाहिजेत. कारण की दुसऱ्या जातीचे येथे जाऊन त्यांचे भांड्यांत खातां येत नाही. बरें, आमची कोठे कोठे धर्मशाळा वगैरे नाहीत, म्हणून कोठे जाऊन उतरावें, तर आपला जिन्नस चोरीस जाईल की काय, याचें भय पडतें. सर्व गावांत फिरून एका ठिकाणाहून लाकडें, दुसरे ठिकाणाहून पीठ असें जमवून आणावें लागतें. जर कोणाचे घरीं उतरलें आणि त्याची जात भिन्न असली, तर त्याचें पाणी उपयोगी नाही. व त्याची मदत उपयोगी नाही. व त्याचा स्पर्शही उपयोगी नाही. तेव्हा स्वतः पाणी नदीवरून आणावें व पुनः कापडें, तर आमची हेलपाटा घ्यावा, असे तापत्रय पडतात. वास्तव ब्राम्हणांकरिता अडचणी घालतात. तेणेंकरून हे ब्राम्हणांचे श्रम जावे इतकाच त्यांचा हेतु आहे.

या देशांत ब्राम्हणास बाहेर प्रवास करणें म्हणजे अतिशय दुःखकारक आहे. याजकरिता जर दर एक गावीं एक घर बांधून, त्यांत सर्व सोयी केल्या, तर फार चांगलें होईल. परंतु जातीमुळे अडचणी फार आहेत. तथापि प्रवासी लोक जातीचा विधिनिषेध फारसा पाळीत नाहीत. बरोबर शिजलेलें अन्न घेतात. त्यास कोणी शिवलें, तरी तेंच खातात. त्यांचे रीतीप्रमाणे एक घर सर्व जातींस बांधलें, तरी त्यांत सर्व प्रवासी लोक रहातील, यांत संशय नाही. आणि सुख फार होईल. पण, आता पुण्यांत असें नाही म्हणून प्रवासी कोणी आला, तर त्याला उतरावयास जागा बहुधा मिळत नाही. कदाचित्

मिळाली तर ती देवळांत किंवा धर्मशाळेंत. व त्यास कोणी सामान देणारा नाही. हात धुवावयास नदीवर गेलें पाहिजे. लाकडें शोधून आणलीं पाहिजेत, याजकरितां जरूर आहे की, एका माणसाने अशा धर्मशाळेचे मुखत्यार होऊन त्याणे पैसा घेऊन सर्व पुरवावें. व जातीप्रमाणे प्रत्येकाचा धर्म राखावा, इतकी तजवीज झाली तर बरें पडेल.

मुंबईचे वाटेने असे ब्राम्हण लोक आहेत. परंतु जेथे ब्राम्हण लोक आहेत, तेथे कुळंबी जावयाचा नाही. जेथे कुळंबी जातो, तेथे महार जाणार नाही. या अडचणी अतिशय आहेत. या युक्तीनेच दूर केल्या तर होतील. नंतर ब्राम्हण लोक प्रवास करूं लागतील. सांप्रत ब्राम्हणांस जर चौपट नफा जहाला, तर घराबाहेर जाणार नाहीत. ते म्हणतात पुण्यांत दहा रुपये नफा बरा; पण मुंबईस पन्नास रुपये नको. ते म्हणतात की, त्या विटाळांत कोण जातो ? येथून जाण्याचें तापत्रय, आपला ब्राम्हणी विचार व आचार कसा चालेल ? कोठे प्रवासास जावें ? इत्यादि विचार करून ब्राम्हण लोक बहुतकरून घराबाहेर पडत नाहीत. जर कदाचित् उपाय नाहीसा झाला, तर मात्र पडतील. तरी त्यांस फार अमंगळ वाटेल. त्यांस वाटेल की, आज पंधरा दिवस मुंबईत मी राहिलों खरा, परंतु जरी दोन पैसे नफा झाला, तरी धर्म बुडाला, पाणी विटाळाचें पियालों, शिवाशिव जहाली; निर्मळपणा कांही राहिला नाही. सोनार, परभू यांचा संपर्क जहाला, आणि या प्रमाणे हजारो ब्राम्हण म्हणतात. ब्राम्हणांची रीत अशी आहे की, घरांत सोवळें-ओवळें माजवावें व पुढे पाणी शिंपून मागे चालावें. ग्रहण पडलें म्हणजे सर्व घरांतील टाकून द्यावें. आंघोळी कराव्या. कुळंब्याचा शब्द कानीं पडूं देऊं नये. हें त्यांस गोड वाटतें, म्हणून बाहेर पडावयाचा कंटाळा आणि त्रास करतात.

दुसरे आणखी बहुत प्रकार गैरशिस्त या देशांत आहेत, त्यांपैकी कांही खाली लिहितों. भिकारी लोक जे आहेत, त्यांचा कर सर्वांवर आहे. धर्माप्रमाणे त्यांस देणें योग्य आहे. परंतु पहा की, भिकारी लोकांच्या

अव्यवस्था आमचे लोकांमध्ये किती आहेत ? भिकारी लोकांमध्ये दोन पक्ष समजले पाहिजेत. एक पक्ष धर्माध्यक्ष भिकारी आणि दुसरा पक्ष अशक्त भिकारी. आता पहिले पक्षांत शास्त्री, पंडित, हरिदास, पुराणिक, वैदिक, जोशी, भट, तपस्वी हे सर्व जाणावे. दुसरे पक्षांत हर एक जातीचे आंधळे, पांगळे, लंगडे, व्याधिष्ट, दरिद्री, वयाने लहान, अज्ञान इत्यादि सर्व जाणावे. आता पहा की, दुसरे पक्षाचे भिकारी लोकां-करिता कोणी कांहींच धर्म करीत नाही. हिंदु लोक अज्ञान दूर करण्या-करितां आणि रोग जाण्याकरिता आणि विद्या होण्याकरिता कांही धर्म करतील, हें तर होणार नाही. कोणी मेला व त्याचे पोरांचें रक्षण करण्या-करिता कोणी नाही, तर त्याजकरिता कोणी धर्म करणार नाही.

जात पाहून धर्म करतात. तैलंग ब्राम्हण भिक्षेकरी असला तर त्यास तांदूळ घालतात, तोच गुजराथी असला तर जोंधळे घालतात; बहिरागी असला तर कदाचित् पीठ घालतात. माधुकरी मागणारा जर ब्राम्हण असला, तर आंत येऊं देतील, नाही तर माधुकरी कदापि घालणार नाहीत. जेवतांना दुसरे जातीचा शब्द कानांवर पडला असतां विटाळ जहाला, म्हणतील. जर रक्तपित्ती होऊन वृद्धापकाळाने व रोगाने उद्या मरणार, असा मनुष्य परजातीचा रस्त्यावर पडला असेल व त्यास अन्न चार दिवस खावयास मिळालें नसेल, तर त्याजकडेस कोणी पहाणार नाहीत. शेकडो ब्राम्हण लोक जोक्यावर जातील, परन्तु त्या गरिबाकडे डोळादेखील करावयाचे नाहीत. आणि तो जर महाराचे जातीचा असला तर त्यास शिवणार नाहीत व पाणी देणार नाहीत. तो तेथे अन्नावाचून मरेल. असें किती एक नित्य मरत आहेत. त्यांत गांव खेडें असलें तर कांही तरी संभाळ होईल. परंतु शहरांत लोक अगदीच पुसणार नाहीत. जर गाय बैल मरत असेल तर त्यास कोणी तरी ब्राम्हण जपतील, परंतु अन्य जातीच्यास अगदींच पहाणार नाहीत. याप्रमाणे गरिबांचा धर्माची व्यवस्था आहे.

शिवाय आणखी चाल अशी आहे की, पुण्यासारख्या शहरांत

आगांतुक ब्राम्हण आहेत; ते लोकांस उपद्रव करून पोट भरतात. व असेच जेथे तेथे ब्राम्हणांची वस्ती आहे, तेथे आगांतुक आहेत. तैलंग देशांतून ब्राम्हण पोट भरावयास इकडे देशांतरास येतात; परंतु ते रोजगार धंदा किंवा शेतकी कांही करीत नाहीत. फक्त आगांतुकी करितात. याप्रमाणे आळशी ब्राम्हण शेकडो आहेत. त्यांस काम काज, विद्या व उद्योग न करितां लोक संरक्षण करतात. आणि गरीब धर्मास पात्र जे आहेत, त्यांस कोणी पुसत नाही. आणि लग्नकार्य जहालें म्हणजे कोणी पांचशे रुपये दक्षणा, कोणी हजार रुपये दक्षणा वाटतात. ती वाटण्याची रीति अशी आहे की, जो बळकट व दांडगा असेल, त्यास मात्र ती दक्षणा पोंचेल. रोगी, अशक्त, लहान असला तर त्यास कदापि पैसा मिळावयाचा नाही. या प्रकारे दक्षणा वाटतात व जेवावयासही याप्रमाणेच घालतात.

आता पहिल्या पक्षाचे म्हणजे धर्माध्यक्ष भिकारी यांस पैका देण्याची रीति तरी चांगली नाही. त्यांस पैसा देणें, तो त्यांजपासून लोकांचा कांही फायदा व्हावा, ही त्यांची बुद्धि नाही. फक्त त्यांस दिलें म्हणजे पुण्य होतें, ही समजूत आहे. याजकरिता उपयोग कोणीच पहात नाही. कोणी अनुष्ठानें करतो. म्हणजे शिवरात्रीचा अतिरुद्र म्हणून एक अनुष्ठान आहे. म्हणजे एक दोन तीनशे ब्राम्हण जमा करावे, एकेकास दोन रुपये द्यावे आणि त्यांस आणून स्वस्थ बसवावें. एक तिळाचा होम करितो. बाकीचे सर्व त्याजकडे पहातात. असे अकरा हजार होम झाले, म्हणजे अतिरुद्र झाला. याबद्दल खर्च दोनतीन हजार होतो, तो ब्राम्हणांस पोचतो. आता त्याचा उपयोग पाहिला तर पांच हजार ब्राम्हणांचा वेळ व्यर्थ गेला. दोनतीन हजार रुपये खर्च जहाले; त्यापासून विद्या वाढली नाही, शहाणपण वाढलें नाही, उद्योग झाला नाही, विचार झाला नाही; कांही एक नाही. एक मूर्खांचे समजुतीप्रमाणे खर्च जहाला इतकेंच फळ.

याप्रमाणे हजारों अनुष्ठानें आहेत. कोणी म्हणतो, शतचंडी; कोणी म्हणतो अभिषेक. या प्रमाणे आळशी लोक स्वस्थ जेवण, दक्षणा घेतात

आणि बसतात. धर्माचें रक्षण करीत नाहीत; गरीबाची तजवीज करीत नाहीत, लोकांस धर्मार्थी व धर्मतत्पर करावें तें नाही, फक्त आपलें पोट आणि यजमानाची स्तुति, अशीं मात्र ते आळशी लोक कामें करतात. व त्यांस जो पैका देतात, तो कांही उपयोगाकरिता देत नाहीत. असा धर्म करणें हें फक्त आळशीपणाची वृद्धि करणें आहे. या प्रमाणे अनुष्ठानें, जप-वगैरे जितक्या ब्राम्हणांचा मिळकती आहेत, त्या सर्व अशाच आहेत. व प्राचीन काळापासून चालत आलेल्या दक्षिणा, खिचडी, सभा, देवस्थानें या प्रकारचीं आहेत. यांची सुधारणा लोकांशिवाय होणार नाही. लोक सुधारले म्हणजे अर्थातच सर्व त्यांचे पुढारी सुधारतील, किंवा जेव्हा त्यांचे पुढारी सुधारतील, तेव्हा लोक सुधारतील. परंतु सांप्रतचे धर्मांत सर्वांचें कल्याण होणें, हें अगदी होत नाही.

---

पत्र नं १५

# अ भि मा न

मागले पत्रांत सरकारास मदत मिळत नाही, म्हणून लोकांच्या वेडेपणाचा स्वभाव वर्णन केला; परन्तु आणखीही लिहितों की, आमचे लोक सरकारास मदत कोठून देणार ? आमच्यापैकी एक शहाणा होऊन पुढारी झाला, तर त्याणे जें कांही सांगितलें, तें देखील ऐकावयाचे नाहीत, व त्यास शहाणा असें मानणार नाहीत. दुसऱ्यास शहाणा म्हणणें हें मोठें अपमानाचें कारण आहे, असें सर्व लोक समजतात. ब्राम्हण तर मुख्यत्वेंकरून असें समजतातच.

जर एक पंडित दुसऱ्यापेक्षा शहाणा असेल, तर त्याशीं शत्रुत्व करून व त्यावर कुतर्क करून, त्यास सभेंत निरुत्तर करावें म्हणजे

त्याचा अपमान करण्यांत आपला मान वृद्धिंगत झाला असें समजतात. दुसऱ्यास प्राण गेला तरी शहाणा म्हणत नाहीत. सांप्रत कोणत्याही ब्राम्हणास पुसा की, इंग्रज शहाणे आहेत कीं काय ? तर ते म्हणतील ' छिः छिः ! शहाणे कशाचे ? त्यांस काय येत आहे ? त्यांची विद्या व शास्त्रें, ज्ञानें सर्व आमच्याहून कमी आहेत, परंतु ते श्रीमान आहेत म्हणून त्यांचे शहाणपणाचें प्रकटीकरण होतें. आणि आमचे शहाणपणाचें प्रकटीकरण होत नाही.' साधारण वैद्यास पुसा की, इंग्रजांचें वैद्यक व शारीर तुमच्या-पेक्षा अधिक आहे कीं काय ? तर मूर्ख वैद्यही म्हणेल की, ' छिः कशाचें वैद्यक व कशाचें शारीर ? आमच्यामध्ये सर्व आहे. किंबहुना जास्ती आहे.' परन्तु हें सांगण्यास त्याने इंग्रजी वैद्यक पहावयास नको. तें पाहिल्या-शिवाय व अनुभव घेतल्याशिवायच तो म्हणेल की, छिः त्यांत कांही नाही. हा त्याचा स्वभावच.

ब्राम्हणास आपलेहून वरिष्ठ कोणीच वाटत नाही. व कोणत्राही ग्रंथ त्याचे हातांत द्याल तर ते म्हणतील की, ' दगड आहे यांत. ' नांव देखील वाचून पहावयाचे नाहीत. आणि म्हणतील की, यांत गोष्टी आहेत. जळल्या त्या गोष्टी. हीं बुकें आपलीं उगाच छापतात. त्यांत कांही नाही. प्राण गेला तरी त्या बुकांत काय आहे, ते पहाणार नाहीत; व व त्याचें एक पानही उलटून पहाणार नाहीत. भट, वैदिक हे सगळी संहिता पाठ करतील, पण वर्तमानपत्राची एक ओळ वाचणार नाहीत.

तसेंच शास्त्री, पंडित यांस तर सर्व तुच्छ वाटतें. आपले ठिकाणीं गर्व करून ते बसतात आणि आपल्यास ते व्याकरणी म्हणवितात. परंतु त्यांस साधारण गोष्टीचें देखील ज्ञान नसतें. पुणेंशहर येथील मोठे काम-दार व मोठे पंडित यांस आणून पुसा की येथे लष्कर किती आहे ? व साहेब व मुख्य कोण आहे ? तर त्यांस समजणार नाही. आणि पाहिलें तर साठ हजार कौमुदी पाठ करितात व साधारण निर्व्यातीक त्या जवरीच्या

गोष्टी त्यांविषयी मूर्ख असतात. जर कोणी शहाणे मनुष्याने त्यांचें बोलणें ऐकलें, तर त्यास असें वाटेल की, हा काय वेडा आहे ? किंवा मूर्ख आहे ? किंवा भ्रांतीवद आहे ? असें मूर्ख असोन आपली प्रतिष्ठा लोकांत मिरवितात आणि लोकांस तर कोणाची प्रतिष्ठा करावी, हें समजत नाही. असें असोन मोठ्या शालजोड्या अंगावर घेऊन आचार्यबुवा, भटजीबुवा म्हणवितात. परंतु हीं सर्व ढोंगें आहेत, हें लोक जाणत नाहीत आणि त्यांचे नादीं लागून त्यांस पैसा देतात. परंतु स्वतः विचार पहात नाहीत. बरें वाईट दुसऱ्याने दाखविलें तरी पहात नाहीत. त्यास मूर्ख म्हणून त्याची फजिति करितात.

अलीकडे नवे ग्रंथ बहुत झाले आहेत. रसायनशास्त्र, यंत्रज्ञान, शिल्प इत्यादिक. परंतु त्यांतील गोष्ट कोणी एकही पहात नाही व लोकांचे स्वभाव असे विलक्षण आहेत की, पुढारी होईल त्यांस पाडाव करितात. त्यांचें रक्षण कोणी करीत नाही. त्यांचा एकत्रपणा मुळींच नाही. जर त्यांस लग्नास, मुंजीस, वगैरे बोलाविलें तर पांच हजार लोक येऊन चार घटिका उगेच बसतात; परंतु अमुक विचार करावयाचा आहे तेथे या म्हणून बोलाविलें तर येणार नाहीत; व आले तरी त्यांस बोलतां येणार नाही. त्याच्याने विचार करवत नाही. त्यांचीं चित्तें विचाराकडे नाहीत. मागील चाल पडली आहे, म्हणून लग्नास वगैरे तरी जमतात. परंतु चालीविरुद्ध अमुक एक तर्‍हे नीट करावयाचें आहे, त्यास पट्टी करण्यास बोलाविलें, तर कदापि येत नाहीत.

बरें, हें पैसा देण्याचें काम आहे, म्हणून असो. परंतु लोक दारू पितात, त्यांचा बंदोबस्त कोणत्या रीतीने करावा, याजकरिता फुकट बोलाविलें तरीही बहुतकरून जमणार नाहीत व शास्त्री, पंडित त्यांत असले तर एकही गोष्ट सिद्धीस जावयाची नाही. कोणी कुतर्क करील. दुसरा पंडित बोलला, म्हणजे त्यास उगेच उत्तर करावें, म्हणजे श्रेष्ठत्व झालें, भलतेंच बोलतात. या प्रकारची यांची व्यवस्था

आहे. मग मोठाले विचार करणार कोठून ? यांस माहितगारी नाही; बरें, जें दुसरें सांगतात तें तरी ऐकावें; तेंही करीत नाहीत. ग्रहण चंद्राचे छायेने पडतें, हें कदापि खरें मानीत नाहीत. व त्याचा पुरावा पहात नाहीत. पुराणांतील वेड मनांत भरलेलें असतें, तें जातच नाही. या प्रकारचें लोक मूर्ख आहेत, आणि सरकारास अगदी मदत करीत नाहीत. आज सरकारास मदत करणारे लोक पारशी मात्र आहेत. त्यांमध्ये मात्र कांही सुधारणा झाल्या आहेत.

ग्रंथांचे तर्जुमे स्वभाषेत करावे, त्यांस पैसा द्यावा, गरीबांकरिता धर्मशाळा कराव्या व गरीबांकरिता औषधपाणी देण्याकरिता वैद्यखाने, दवाखाने करावे, हीं धर्मकृत्यें आहेत, असें ते जाणतात. व सरकाराने कांही एक कामांत पैसा दिला, तर आपण बाकीचा देऊन सरकारचा मनोदय पुरता करितात. व लग्नकार्यास पैसा उडवीत नाहीत. ज्याचे घरीं लग्न होईल, तो पन्नास रुपये धर्म करावयाचा, तो करखान्यास देतो. जर ब्राम्हणांमध्ये ही गोष्ट कोणी पुढे काढील आणि लग्न प्रयोजनांतील दक्षिणा बंद करील, तर ब्राम्हणांचें मोठें शत्रुत्व होईल. त्यांस असाच पैसा उडवावा, गरीब, आंधळे यांनी औषधाशिवाय, घराशिवाय मरावें, हेंच बरें वाटतें. व उद्धट, दांडगे, आगांतुक यांस पैसा मिळाला, म्हणजे मोठें कार्य झालें असें वाटतें. यास्तव जसे पारशी लोक आपले जातींत व्यापार वृध्दीचें व विद्यावृद्धीचें उदाहरण दाखवीत आहेत, तसें ब्राम्हणांनी करून सरकारास मदत करावी. म्हणजे सरकार सर्व बेत सिद्धीस नेईल. तें न करून रडत बसतात. आणि सरकारास नांव ठेवितात. हे मूर्ख आहेत कीं नाही, याचा हें पत्र वाचणारे यांणी विचार करावा.

पत्र नं० ९४

# इंग्रज सरकार

इंग्रज सरकार या देशांत आहेत, याविषयी लोक उघड नाही, तरी मनांतले मनांत कुरकुर पुष्कळ करितात व मुख्यत्वेंकरून भट, पंडित, शास्त्री हे तर फार हैराण आहेत; परंतु माझें मत असें आहे की, या देशास हेंच सरकार ठीक आहे.

प्रथम असें पहा की, मागलें सरकार किती वाईट व मूर्ख होतें. जिकडे-तिकडे जुलूम होत होता. हें हल्ली जे इंग्रज सरकारचे पदरीं मराठे अमलदार आहेत, त्यांची वर्तणूक कशी आहे, हें पाहिलें म्हणजे ध्यानांत येतें. याच प्रकारचे मागे सर्व लोक होते. त्यांणीं देशाची सुधारणा व विद्यावृद्धि कांहीच केली नाही. फक्त भट, वैदिक या मूर्ख लोकांचें पोषण करून राखिलें. तसेंच पेंढारी, रामोशी, काटक, डाकवदे, ठक, चोर इत्यादिकांस राखिलें आणि देशांत लूटसांड पुष्कळ करीत.

होळकर स्वता श्रीमंतांचा चाकर असतां त्याने पुणें लुटिलें, व लोकांचें हाल केले. अशा सरकारास कोण चांगलें म्हणेल? जो बळकट असेल, तो मात्र पोटभर खाई. पाहिजे त्याने शेतभात, गावघर लुटावें; दादफिर्याद कोठे लागत नव्हती. हल्ली हैदराबाद, ग्वाल्हेर येथे वर्तमान काय आहे, तें पहा, म्हणजे मागील राजाचें सर्व लक्षांत येईल.

तेव्हा मागील राज्य अगदी वाईट होतें, हें सिद्ध आहे. याशिवाय हल्ली आमचे लोकांस राज्य मिळालें, तर तीच अवस्था करतील. तेव्हा हेंही उपयोगी नाही. बरें, दुसरे देशचे लोक मोगल, फराशीस वगैरे आले, तरी तेही वाईट लोक आहेत. यास्तव इंग्रज हेच सुधारलेले चांगले लोक आहेत. यांचें राज्य या देशांत आहे, हेंच चांगलें. व ईश्वराने हे आम्हांस चांगले राजे दिले आहेत, हें खचित दिसतें. याहून चांगले राजे आम्हांस कदापि

पत्र नं० ६९ २९ जुलाई १८४९

# संस्कृत आणि इंग्रजी विद्या

लोकांमध्ये अशी समजूत आहे की, शहाणपण हें अंगस्वभावानें येतें. परन्तु ही जरी थोडीशी खरी गोष्ट आहे; तत्रापि सर्व शहाणपण अंगस्वभावांत असतें, असें नाही.

शहाणपण पुष्कळ मिळवावें लागतें. लोकांमध्ये समजूत अशी आहे व ज्ञान मिळणें हें संसारकृत्य आहे; याजकरिता किती एक जण इंग्रजी शिकतात. त्यांस लोक पुसतात की, तुम्हांस रोजगार लागला. आता विद्या शिकतां कशाला ? शहाणपण व ज्ञान म्हणजे काय, याचा अर्थच त्यांस कळत नाही. मनुष्याने ग्रंथ वाचले पाहिजेत; पुष्कळ विद्या व भाषा शिकल्या पाहिजेत; म्हणजे बहुत गोष्टी कानावर पडून माहितगारी होते; केवळ संस्कृत वाचूनच होणार नाही. मला निश्चयेंकरून वाटतें की, ज्यास शहाणपण व ज्ञान मिळवावयाचें असेल, त्याने इंग्रजी भाषा किंवा त्या भाषेतील ग्रंथांचे तर्जुमे तरी वाचावे, म्हणजे त्यांस पुष्कळ गोष्टी कळतील.

आता इंग्रजी विद्या फार सुधारली आहे. याजमुळे त्यांतील भूगोलावर एक ग्रंथ पढलेला आणि जितके संस्कृत किंवा इतर भाषेंत ग्रंथ आहेत, ते सर्व जमा केले, तर त्या एकाची बरोबरी व्हावयाची नाही, असें आहे, कारण इंग्रज लोकांनी विद्या फार सुधारल्या. याजमुळे त्या शुद्ध आहेत. आणि पूर्वीच्या काळीं शोध कमी होते. याजमुळे विद्या अर्धवट झाल्या, तितक्याच राहिल्या आहेत. केवळ संस्कृतानेच मनुष्य शहाणा व ज्ञानी होईल, असें नाही. शास्त्रें इत्यादिक पढले आहेत. त्यांच्या बहुत वाकड्या समजुती आहेत. व हें एक संस्कृताचें धोरण आहे. आणखी बहुधा पहाण्यांत आहे की, संस्कृत पढलेले भ्रमिष्ट, मताभिमानी, अर्थाचे अनर्थ करणारे आणि वाकड्या रीतीने भलतेच दृष्टान्त देऊन विचार करणारे असे असतात.

मागे कधी झालें नाही व पुढेही होणार नाही. पुराणांतल्या गोष्टी पुराणांत ठेवाव्या. भलतेच अर्थ मूर्ख पुराणिक असतात ते करितात, व भलतीच समजूत पाडितात.

याजकरिता सांप्रत इंग्रजींत जा जा विद्या भूगोल, खगोल, राज्य-नीति इत्यादिक आहेत, त्यांचा विचार करावा व त्यांतील समजुती करून घ्याव्यात, म्हणजे तुम्हांस फार संतोष होईल. असें केल्याशिवाय लोकांस कोणतेंही कार्य नीट करतां येणार नाही. सरकाराने लोकांस मोठीं कामें दिलीं, तर ते अनर्थ व जुलूम करतील, लाच खातील, ढोल करतील व लोकांचे कल्याणार्थ झटावयाचे नाहीत. याचें प्रत्यंतर सांप्रत जे लोक रोजगारावर आहेत, त्यांजकडे पाहिलें म्हणजे मिळेल.

तात्पर्य, जांस ईश्वराचें भय नाही व विद्या काय हें जांणी ऐकलेंही नाही, त्यांस नीति येईल कोठून ? व शहाणपणही कसें येईल ? बहुत लोक संध्या झाल्यावर स्तोत्र पाठ करितात, परन्तु केवळ सडकेवर माती वहाण्याची मजुरी आणि स्तोत्रपाठ सारखाच आहे; कारण की त्यांत अर्थ नाही. पाठ करण्याने पुण्य होतें, असें समजून व्यर्थ आयुष्य कशास घालवितात ?

---

पत्र नं० ७७ — २० सप्टेंबर १८४९

## पाठ करण्याची चाल

श्रीमंत आणि विद्वान् या दोन लोकांचा हातून लोकांचे व देशाचे सुधारणेकरिता प्रयत्न व्हावयाचे. या दोघांशिवाय कोणी करणार

योग्य नाही ज्या अर्थाने तो शब्द लोकांत प्रसिद्ध आहे, आणि ज्या अर्थाने तो शब्द उच्चारला, तोच अर्थ मनांत आणून शिक्षा करावी. यास्तव ' लोकहितवादी ' याने संस्कृत वाक्याचा सरळ व प्रसिद्ध आहे, तोच अर्थ केला. ब्राम्हण लोकांमध्ये क्वचित् सूज्ञ आहेत, असें आम्ही समजतों, व 'यथार्थवादी' त्यांतीलच एक सूज्ञ आहेत असें आम्ही समजतों; परन्तु रीतीचा वाद सोडून त्यांनी पंडिताच्या कोट्या घेऊन वाकडे रस्त्यांत शिरूं नये.

( ३ ) रे कलमांत ते लिहितात की, ब्राम्हण जन्मांत मात्र मोक्ष आहे, व ब्राम्हण या शब्दाचा अर्थ फिरवून लिहितात, त्यासही सदहू कलम लागू आहे. ' यथार्थवादी'ने हें पहावें की, सांप्रत गुण, कर्म, स्वभाव येणेंकरून युक्त असे ब्राम्हण किती आहेत ? आणि जर बहुतांमध्ये हें नाही, तर त्यांस पूर्वापार जें महत्त्व दिलें आहे, तें भोगण्यास ते योग्य आहेत कीं काय ?

( ४ ) ' यथार्थवादी ' यांचें म्हणणें की, पुराणांतील बाष्कळ कथा कल्पभेदाने समजाव्या, व विषयपर वचनें ज्ञानपर आहेत; परन्तु हें ओढून-ताणून जबरदस्तीने, सरळ अर्थ सोडून उलटा अर्थ करणें प्रशस्त नाही. एखादी असंभाव्य कथा कल्पांतरींची म्हणून मानिली, तर त्याच अध्यायांत विधिनिषेध येतात, तेही कल्पांतरींचे असें मानिले पाहिजे. आणि याप्रमाणे सर्व उडविलें म्हणजे या कल्पांतील कोणते विधि याचा मुळीच ठिकाण नाहींसा होईल. त्याचप्रमाणे भागवतांतील विषयपर कथा असतां ज्ञानपर लाविल्या, तर कथेचा ओघ फिरेल आणि संजोग बिघडेल. यास्तव या कोट्या व्यर्थ आहेत. जे उघड अर्थ दिसतात, ते खरे, असें सर्व प्रामाणिक व सूज्ञ कबूल करतील.

( ५ ) पुराणांत पुष्कळ म्हणी चांगल्या आहेत, हें आम्ही जाणतों; परन्तु सर्व निर्बाध आहेत, असें प्रतिपादन करणें 'यथार्थवादी'स योग्य नाही, असें वाटतें. यास्तव त्यांणी विचार करून याविषयीचा जबाब वास्तविक-पणाने द्यावा.

---